# पश्चिमवारे...



म. ग्रं. सं. ठाणे
विषय प्रवास
क्र. नं. 228

REFBK-0009746

शि. बा. पत्की...

# पश्चिम वारे

[पाश्चिमात्य जीवनाचं धावतं दर्शन]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. [illegible]

लेखक

एम्. ए. (मुंबई)
डिप्लोमा इन् जर्नॅलिझम् (लंडन)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...................... दि. ..............
क्रमांक ...................... नों दि. ..............
[illegible]

REFBK-0009746
REFBK-0009746

किंमत ५ रुपये

व्हीनस प्रकाशन : पुणें २

पहिली आवृत्ति :
नोव्हेंबर १९५७

सर्व हक्क
प्रकाशकांचे स्वाधीन

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
४१० शनिवार : पुणें २

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी : मुंबई ४

ती. य. ह. सुखठणकर

ऊर्फ नाना

यांस

आदरपूर्वक

अर्पण

ठाणे. स्थळप्रत.
दि.
क्रमांक नों. दि.

# हद्गत

★

*सप्टेंबर १९५५ मध्यें मी वृत्तपत्रलेखनाच्या अभ्यासासाठीं इंग्लंडला जावयास निघालों तेव्हां कोल्हापूरच्या दैनिक 'सत्यवादी' चे संपादक माझे मित्र श्री. बाळासाहेब पाटील मला म्हणाले,*

*"आमच्या दैनिकासाठीं तुम्ही इंग्लंडमधून कांहीं तरी नियमितपणें लिहावं अशी आमची सर्वांची फार इच्छा आहे."*

*तथापि, "कांहीं तरी" लिहिण्यापेक्षां आजचं इंग्लंड आणि पाश्चिमात्य जीवन यांची थोडी-फार तरी कल्पना (जशी मला येईल तशी) त्यांना व त्या निमित्तानं वाचकांना देतां आली तर द्यावी, असं मनाशीं ठरवून मी लिहायचं कबूल केलं आणि भारताचा किनारा सोडल्यापासून पुन्हां भारताच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवीपर्यंत मीं जें जें पाहिलं, ऐकलं आणि अनुभवलं, आणि तें पाहतांना, ऐकतांना आणि अनुभवतांना जे विचारतरंग माझ्या मनांत उठले त्यांचं शब्द-चित्र रेखाटण्याचा प्रयत्न त्यांना लिहिलेल्या पत्रांतून मीं केला.*

*तींच पत्रं आज एकत्र करून मराठी वाचकापुढें नम्रपणें ठेवीत आहे.*

इंग्लंडला जाण्यापूर्वी इंग्लंडबद्दल व युरोपांतील इतर देशांबद्दल कांहीं मराठी व थोडीं इंग्रजी पुस्तकं मीं वाचलीं होतीं. त्या ग्रंथांच्या लेखकांनीं जें जें सांगितलेलं होतं, त्यापेक्षां कांहीं तरी निराळं सांगतां आलं तर किती बरं होईल असं माझ्या मनाला सारखं वाटे. किंबहुना, हीं पत्रं लिहितांना हा विचार माझ्या मनांत खोल कुठें तरी सारखा असे. हा हेतु कितीसा साध्य झाला आहे हें आतां सुबुद्ध वाचकांनींच ठरवायचं आहे.

हीं पत्रं लिहिलीं जात असतांना माझे आतेभाऊ श्री. विठ्ठल वर्टीकर (आतां प्राचार्य, कॉमर्स कॉलेज, नाशिक) यांच्या अनुभवाचा, वाचनाचा आणि चर्चेचा मला किती तर फायदा झाला, याचा उल्लेख मला अवश्य केला पाहिजे. बोटीवरून लिहिलेल्या पत्रांखेरीज बाकीच्या सर्व पत्रांचे तेच पाहिले वाचक, म्हणूनच त्यांनीं केलेल्या सूचनांबद्दल आणि त्यांच्या लंडन स्कूल ऑफ् एकॉनॉमिक्सच्या अद्यावत् ग्रंथसंग्रहालयांतून त्यांनीं मला उपलब्ध करून दिलेल्या अनेक संदर्भ ग्रंथांबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानणं मी माझं कर्तव्य समजतों.

हीं पत्रं प्रसिद्ध होत असतांना अनेक अपरिचित व्यक्तींकडूनहि उत्तेजनपर व सूचनात्मक पत्रं मला आलीं. त्यांतील सर्व सूचनांचा मला परामर्श घेतां आला नसला तरी ज्यांनीं अत्यंत आपुलकीनं या सूचना केल्या त्यांचे मला अवश्य आभार मानले पाहिजेत.

त्याचप्रमाणें, प्रस्तुत पुस्तकाची मुद्रणप्रत तयार करण्याचं कंटाळवाणं कामहि सर्वश्री सुधाकर दांडेकर, भास्कर जोशी व राम सावंत यांनीं मोठ्या उत्साहानं केलं त्याबद्दल त्यांचाहि मी आभारी आहें.

अखेर, हीं सर्व पत्रं येवढ्या आकर्षक स्वरूपांत आज प्रसिद्ध होत आहेत याबद्दल व्हीनस प्रकाशनचे संचालक श्री. स. कृ. पाध्ये व मौज प्रिंटिंग ब्यूरोचे श्री. भागवत यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

मुंबई,
१२ नोव्हेंबर १९५७

**वि. वा. पत्की**

# पार्श्वभूमि

★

इंग्लंडला जाण्यासाठीं लागणाऱ्या तिकिटापुरतेहि पैसे जवळ नसतांना, एम्. ए. होऊन सतरा वर्षं झाल्यानंतर आणि वयाची चाळिशी उलटल्यावर विद्यार्थी म्हणून एक वर्षाच्या अभ्यासक्रमासाठीं मी इंग्लंडला कसा गेलों, ही सारीच कथा सांगण्यासारखी—आणि तुम्हांला ऐकावीशी वाटली तर ऐकण्यासारखी—आहे.

आपल्या मुलांना इंग्लंडला किंवा परदेशीं शिक्षणासाठीं पाठविण्याची भाषा ज्या वयांत माणसं बोलूं लागतात, त्या वयांत स्वतःच विद्यार्थी म्हणून इंग्लंडला जाण्याची कल्पना मला सुचली ती मोठ्या योगायोगानं! किंबहुना, ही कल्पना मला सुचली असं म्हणणं हेंहि चूक आहे, कारण तिचं जनकत्व माझ्याकडे नाहीं!

हें सारं मोठ्या योगायोगानं घडलं आहे, कल्पना देखील नसतांना!

त्याचं असं झालं—

१९५५ च्या सुरुवातीस मिरज येथें सरकारी कामाच्या निमित्तानं मुंबई सरकारचे एक मंत्री येणार होते आणि त्यांच्या भाषणाचा वृत्तपत्रांसाठीं रिपोर्ट घेण्याच्या माझ्या नेहमींच्या कामासाठीं मी तिथं गेलों होतों. मंत्र्यांना यायला थोडा वेळ होता म्हणून त्या समारंभाकरितां जमलेले आम्ही सरकारी अधिकारी वेळ घालण्यासाठीं उगीचच रिकामटेकड्या गप्पा मारीत एका कोंपऱ्यांत उभे होतों. अशाच एका समानधर्म्याशीं मी बोलत असलेलं तिथं जमलेल्या श्रोत्यांपैकीं एकानं पाहिलं आणि मी त्या व्यक्तीपासून थोडा दूर होतांच माझ्याजवळ येऊन कमालीच्या विनम्र भावनेनं ते गृहस्थ म्हणाले,

"माझं एक काम करतां का, साहेब?"

मी त्यांच्या त्या प्रश्नाकडे आणि चेहऱ्याकडे कुतूहलानं पाहात राहिलों. मला सर्वस्वी अपरिचित असलेला हा माणूस माझ्याकडे येऊन 'माझं एक काम करतां का?' असं विचारतो याचं मला मोठं नवल वाटलं, पण तें शब्दांतून किंवा दृष्टींतून फारसं व्यक्त होऊं नये अशा सावधगिरीनं मीं त्यांना म्हटलं,

"तुमचं काम तर सांगा—"

एखाद्या अपरिचित माणसाजवळ आपली मनोभावना व्यक्त करायची झाली कीं माणूस जसा अडखळतो तसे अडखळत ते गृहस्थ म्हणाले,

“ माझं नांव जोशी. इथून पांच-सहा मैलांवर असलेल्या एका खेडेगांवांतील शाळेंत मी शिक्षक आहें—”

“ बरं, मग ?—”

“ गेलीं १०–१२ वर्षं मी सारखं म्हणतोंय, कीं मॅट्रिकला बसायचं, पण मी राहतों तिथं शाळेची सोय नाहीं, तेव्हां इथं मिरजेला माझी बदली व्हावी म्हणून मी खटपट करतोंय्...”

त्यांना जें सांगायचं होतं त्यांतला अभिप्राय लक्षांत येतांच मीं म्हटलं,

“ तुमची बदली मिरजेला करायला आत्तां ज्यांच्याबरोबर मी बोलत होतों त्या तुमच्या ॲड्मिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरनां मीं सांगावं येवढंच ना तुमचं म्हणणं ? ”

त्यांनीं नुसतीच मान हलविली.

पण मी त्या अधिकाऱ्यांकडे त्यांना हें सांगण्यासाठीं वळणार तोंच मंत्रिमहाशयांचं आगमन झालं, सगळे लोक आपापल्या जागेवर बसले आणि सभेच्या कामाला सुरुवात झाली. सुदैवानं ॲड्मिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर माझ्या शेजारच्या खुर्चीवर बसलेले दिसले तेव्हां अगदीं ऐकूं जाईल न जाईल अशा स्वरांत मीं त्यांना जोशीमास्तरांचं म्हणणं सांगितलं, तेव्हां ते म्हणाले, “ तुमची ओळख आहे वाटतं त्यांच्याशीं ? ”

मीं म्हटलं, “ मुळींच नाहीं. ”

“ तरीहि त्यांनीं तुम्हांला गांठलं ? ”

“ आपलं काम व्हावं अशी तळमळ असली म्हणजे माणूस कुणालाहि गांठतो !—” मी सहज बोलून गेलों.

“ करूं कीं त्यांचं काम, त्याचं काय मोठंसं ? त्यांना तीन वर्षं झालींच आहेत तिथं, तेव्हां मार्च-एप्रिलमध्यें बदल्या करायच्या वेळीं लक्षांत ठेवून तुमचं काम करीन. ”

मीं त्यांना हसत हंसत म्हटलं, “ हें माझं काम नाहीं, माझी त्यांची ओळखहि नाहीं ! पुन्हां कधीं ते भेटले तर मी त्यांना ओळखीन तरी कीं नाहीं कुणाला ठाऊक ?...”

खरोखरच पुढें तसं झालं !

संध्याकाळीं पिंपळावर जमलेलीं पाखरं सकाळ झाल्याबरोबर उडून जावीं तशीं समारंभ आटोपल्याबरोबर सारीं माणसं पांगलीं. सभेचा वृत्तांत तारेनं पाठविण्यासाठीं मीं पोस्ट ऑफिस गांठलं, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर सांगलीला निघून गेले आणि जोशी मास्तर गर्दीत कुठें गडप झाले तें कळलंहि नाहीं. ते भेटले

असते तर त्यांच्या कामाबद्दल त्यांना सांगायचं माझ्या मनांत होतं, पण ते आतां भेटणंच शक्य नाहीं हें मला दिसत होतं आणि पुढें तर माझ्या कामाच्या गड-बडींत मी हें सारं पार विसरूनहि गेलों.

पण मी विसरलों, तरी जोशी मास्तर विसरले नव्हते. कारण, या प्रसंगानंतर सुमारें ८–१० दिवसांनीं त्यांची मूर्ति एक दिवस सकाळींच दत्त म्हणून माझ्या कोल्हापुरांतील घरीं उभी राहिली. एकदांच चेहरा पाहिलेला, तेव्हां प्रथम ओळ-खच पटली नाहीं, पण ते बोलूं लागले तसा मी मनांत म्हणालों, 'मिरजेला सभेच्या वेळीं भेटलेले हे जोशी मास्तर!'

त्यांच्या कामाबद्दल मी ताबडतोब ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरांच्याकडे कसा बोललों होतों, जानेवारी महिन्यांत शिक्षकांच्या बदल्या सहसा केल्या जात नसल्याचं त्यांनीं कसं सांगितलं होतं आणि मार्च-एप्रिलमध्यें त्यांची बदली होण्याची कशी शक्यता होती हें मीं त्यांना सांगितलं, तरीहि ते गप्पच राहिलेले मला दिसले आणि जाण्यासाठीं उठत अगदीं निराशेच्या स्वरांत म्हणाले, "नेहमींचंच आहे हें!—"

त्यांच्या शब्दांतली ती उद्विग्नता आणि आर्तता मला बोचली आणि त्यांना निरोप देतां देतां मीं म्हटलं,

"असं करतां?—"

"काय?" वाळत चाललेल्या वेलीला टवटवी यावी तसा त्यांच्या शब्दाला जिवंतपणा आला होता. या परिस्थितींतहि कांहीं तरी नवा मार्ग मी दाखवीन असं उगीचच त्यानां वाटलं असावं आणि म्हणूनच त्यांनीं पुन्हा विचारलं, "काय करूं म्हणतां?"

"तुम्ही असं करा..." त्यांच्याकडे पाहात मीं म्हटलं, "उद्यां सकाळीं तुम्ही माझ्याबरोबर सांगलीला चला. तिथं आपण ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरांच्याकडे जाऊं आणि कांहीं करतां आल्यास पाहूं."

दुसऱ्या दिवशीं सकाळच्या एस्. टी. नं आम्ही दोघेहि सांगलीला जायला निघालों. महागाईच्या वणव्यांत सांपडलेल्या मध्यमवर्गाची कहाणी आम्ही एक-मेकांना सांगत होतों आणि यांतून बाहेर पडण्याचा कांहीं मार्ग नाहीं असं म्हणत उसासे टाकीत होतों.

तोंच बोलतां बोलतां जोशी मला म्हणाले,

"तुमचा हात पाहूं, साहेब!"

"अहो, हात पाहून काय कळणार आहे?" असं म्हणत मीं हात पुढेंहि केला होता. हस्तसामुद्रिकावर माझा कधीं विश्वास नव्हता. बुद्धिवादाच्या निकषावर हें

शास्त्र टिकूं शकत नसल्यामुळं मी थोड्याफार हेटाळणीच्या दृष्टीनं या शास्त्राकडे पाहात आलों आहे.

पण जोशींनीं माझा हात हातांत घेऊन बराच वेळ त्याच्याकडे निरखून पाहिलं तशी त्यांची थट्टा करण्याची ऊर्मि मला आवरतां येईना. मी त्यांना म्हणालों,

"येवढं काय पाहातांहा निरखून? कुठून कांहीं घबाड मिळण्याची शक्यता दिसतीय कीं काय माझ्या हातांत तुम्हांला? महागाईच्या वाळवंटांत तेवढीच आशेची एक पाणथळ जागा आहे माझ्यासारख्याला—"

"थट्टा करूं नका, साहेब! खरंच—"

"काय खरंच?"

"खरंच एक मोठा विलक्षण योग आहे तुमच्या आयुष्यांत—"

"कसला?—खरंच कळतं तुम्हांला हस्तसामुद्रिक?"

"कळतं थोडंसं, पण खरंच मोठा योग आहे तुमच्या हातावर—तुम्ही चार-सहा महिन्यांत कुठें तरी परदेशीं जाणार!"

'चारसहा महिन्यांत परलोकीं जाण्याचीच तेवढी शक्यता आहे' असं त्यांना सांगायचं माझ्या अगदीं ओठांवर आलं होतं, पण ज्या गांभीर्यानं ते सारं सांगत होते त्याची अशी क्रूर थट्टा करणं मला योग्य वाटेना, म्हणून मी म्हणालों,

"तुमचं भविष्य शंभर टक्के चुकणार! अहो, आतां चाळिशी उलटल्यावर मी कशाला परदेशीं जाणार आहे? मला कोण पाठविणार आणि शिकण्यासाठीं तर जाणंच अशक्य! आतां काय शिकणार मी परदेशांत जाऊन? आणि जायचंच म्हटलं तर पैसे कुठून आणणार मी? इंग्लंडला जायचं म्हटलं तर तिकिटापुरते-सुद्धां पैसे माझ्याजवळ नाहींत. कर्ज काढायचं म्हटलं तर ना गांवांत घर, ना माळावर शेत..."

माझी ही चर्पटपंजरी ते मोठ्या खुषींत येऊन ऐकत होते आणि माझं बोलणं संपलं तेव्हा ते म्हणाले,

"तें मला कांहीं सांगूं नका. मी कोल्हापूरला नेहमीं येतों आणि तुमच्या घरापलीकडच्या चौथ्या-पाचव्या घरांतच उतरतों. आणखी दोन-तीन महिन्यांनीं मी तुमची मुद्दाम गांठ घेईन, तेव्हां तुम्ही परदेशीं जायचं सारं नक्की केलेलं आहे कीं नाहीं तें पाहा..."

त्यांचे ते शब्द ऐकून मला मोठी गंमत वाटली. मीं मनांत म्हटलं, यांचं म्हणणं खरं झालं तर तो एक चमत्कारच मानावा लागेल.

मात्र सांगलीला ज्या कामासाठीं मी त्यांना घेऊन गेलों तें तसंच राहिलं.

कारण, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरांची गांठ ते फिरतीवर गेल्यामुळं पडूं शकली नाहीं आणि परदेशीं जाण्याची कल्पना डोक्यांत घेऊन मी कोल्हापूरला घरीं येण्यासाठीं सांगलींतून बाहेर पडलों.

कांहीं केल्या ही कल्पना मला मनावेगळी करतां येईना. त्या कल्पनेनं जणुं माझा पिच्छा पुरविला. कोल्हापूर–सांगलीच्या प्रवासांत माझ्या मनांत विचाराचं एकच चक्र घोंघावत होतं, 'हें कसं शक्य आहे?' मी १९३८ सालीं एम्. ए. झालों तेव्हां तत्त्वज्ञानाच्या आणि मानसशास्त्राच्या पुढील अध्ययनासाठीं इंग्लंडला जायच्या कल्पनेनं असाच माझ्या मनाचा वेध घेतला होता, पण आकाशांतला चंद्र हातांत आणून देणारा आरसा उपलब्ध न झाल्यामुळं आपलं स्वप्न कधीं साकार होणं शक्य नाहीं हें ओळखून मीं त्या विचाराला पुढें मनांत थारा दिला नव्हता.

लहानपणापासून इंग्लंडबद्दल अनेक कुतूहलजनक गोष्टी वाचल्या–ऐकलेल्या असल्यामुळं कधीं तरी विद्यार्थी म्हणून त्या देशांत जायचं मात्र हजारदां माझ्या मनांत आलं होतं, पण दरिद्र्यांचे मनोरथ हे केवळ मनांत उत्पन्न होऊन अखेर विरून जायचे हा अनुभव प्रत्येक वेळीं आला होता.

तथापि, 'दोन तीन महिन्यांत तुम्ही परदेशीं जायचं नक्की केलेलं आहे कीं नाहीं पाहा!' असं जोशी मास्तरांनीं सांगितलं तशी माझ्या मनानं पुन्हां उचल खाल्ली. सांगलीहून कोल्हापूरला येईपर्यंत मी एकसारखा स्वतःला विचारीत होतों, 'हें कसं शक्य आहे?'

पहिला प्रश्न मी स्वतःला विचारला, 'मीं आतां कशासाठीं इंग्लंडला जाणं शक्य आहे?' तत्त्वज्ञानांतली पीएच्. डी. पदवी घेणं आतां शक्य नव्हतं. सतरा वर्षांत शिकलेलं सारं तत्त्वज्ञान विस्मृतींत केव्हांच गडप झालं होतं! आणि जर हें शक्य नाहीं तर मी इंग्लंडांत जाऊन काय शिकणार आहे? कांहीं केल्या मला उत्तर सुचेना, पण कुठून कुणास ठाऊक, एका नव्या विचाराचा कडवसा मनांत चमकला—'ज्या प्रसिद्धि खात्यांत मी नोकरी करतों त्या खात्यांत उपयोगी पडेल असं शिक्षण घेणं आणि या खात्याचा इंग्लंडसारख्या देशांत कसा कारभार चालतो याचा अभ्यास करणं काय अशक्य आहे? वृत्तपत्रव्यवसायाचं शास्त्रशुद्ध शिक्षण घेतां आलं तर तें कां घेऊं नये? ब्रिटिश सरकारच्या प्रसिद्धि संघटनेचा सूक्ष्म अभ्यास कां करूं नये?' मी सांगलीहून त्या दिवशीं परत आलों तो या विचारांशीं चाळा करीतच!

कोणत्या अभ्यासक्रमासाठीं इंग्लंडला जायचं या विचाराबरोबर दुसरा त्याहिपेक्षां अधिक महत्त्वाचा एक विचार मला अस्वस्थ करीत होता. तो म्हणजे इंग्लंडला



संग्रहालय, ठाणे .. स्थळ
अनु. 22626 दि: [illegible]

जाण्यासाठीं लागणाऱ्या खर्चाचा! इंग्लंडला वृत्तपत्रव्यवसायाच्या आणि प्रसिद्धि संघटनेच्या अभ्यासासाठीं जायचं तर किती दिवस राहावं लागेल आणि किती खर्च येईल याची मला कांहींच कल्पना नव्हती. इंग्लंडला कशासाठीं जायचं हें जसजसं मनांत पक्कं होऊं लागलं तसतशी यासाठीं लागणाऱ्या खर्चाची तरतूद कशी करायची याची विवंचना माझ्या मनाला सारखी टोचूं लागली. यासाठीं प्रथम एक गोष्ट निश्चित होणं आवश्यक होतं, 'इंग्लंडांत वृत्तपत्रव्यवसायाचा अभ्यासक्रम आहे काय आणि असला तर तो किती दिवसांचा आहे?' तो अभ्यासक्रम कांहीं वर्षांचा असला तर तोहि मला नको होता, कारण दीर्घ मुदतीपर्यंत इंग्लंडांत राहणं मला शक्य नव्हतं.

पण इंग्लंडला जायचा बेत जसजसा मनांत नक्की होऊं लागला तसतसे पुढील मार्ग दिसूं लागले. मी मुंबई विश्वविद्यालयांतील फॉरिन् युनिव्हर्सिटीज् ब्यूरो आणि दिल्लींतील ब्रिटिश इन्फर्मेशन सर्हिस यांना पत्रं पाठवून इंग्लंडांत अल्प मुदतीचा वृत्तपत्रव्यवसायाचा अभ्यासक्रम आहे काय अशी पृच्छा केली आणि दोन्ही ठिकाणांहून लंडनच्या पॉलिटेक्निक् संस्थेंत असा एक वर्षाचा अभ्यासक्रम आहे, असं कळतांच मला वाटूं लागलं, 'प्रयत्न केला तर हें कांहीं अगदींच अशक्य नाहीं!'

पण खरी अडचण होती ती पैशांची. इंग्लंडला जाण्या-येण्याचा आणि वर्षभर तिथं राहायचा खर्च सुमारें आठ हजार रुपये येईल असं चौकशी करतां मला समजलं तेव्हां माझी छाती दडपूनच गेली. आणायचे कुठून येवढे पैसे? मात्र याहि अडचणींतून अखेर मार्ग निघेल असं वाटूं लागलं. मुंबईला राजाध्यक्ष फॉरि एज्युकेशन सोसायटीकडे मीं चौकशी केली तेव्हां परदेशीं जाणाऱ्या लायक विद्यार्थ्यांसाठीं पांच हजारांपर्यंत कर्जरूपानं शिष्यवृत्ति (Loan Scholarship) मिळण्याची शक्यता असते असं मला कळलं. माझ्या प्रॉव्हिडंट फंडातूनहि मला कर्ज मिळूं शकेल असं समजलं तेव्हां म्हटलं, 'प्रयत्न तर करून पहावा!'

सर्व प्राथमिक माहिती गोळा करतां करतां १९५५ चा मार्च महिना उजाडला होता आणि शिष्यवृत्ति आणि माझ्या प्रॉव्हिडंट फंडांतून मिळणारं कर्ज माझ्या हातीं ऑगस्ट महिन्यापर्यंत पडणं शक्य नव्हतं! मात्र इंग्लंडला जायचं अखेर निश्चित झालं तरी त्यासाठीं बोटीचं तिकिट (passage) पांच-सहा महिने तरी आधीं 'बुक' करणं आवश्यक होतं असं समजलं तेव्हां माझं मन थोडं गोंधळलं. अजून कशालाच पत्ता नव्हता. लंडनमध्यें माझा आतेभाऊ शिकत होता, त्यानं पॉलि-टेकनिकमध्यें सहज प्रवेश (admission) मिळेल असं कळविलं होतं, म्हणून थोडा

निश्चिंत होतों, पण पैशांची सोय झाल्याशिवाय इंग्लंडचं तिकीट काढणं हें वधू किंवा वर निश्चित होण्यापूर्वीच मांडवाच्या तयारीला लागण्यासारखं होतं !

पण ही तयारीहि करण्यावांचून गत्यंतर नव्हतं. अखेर एप्रिल महिना उजाडला तसा एक दिवस मी मुंबईला गेलों, माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची गांठ घेतली, सप्टेंबर १९५५ पासून एक वर्षाची रजा मिळावी आणि प्रॉव्हिडंट फंडांतून कर्ज मिळावं म्हणून अर्ज दिला आणि मी इंग्लंडला जाणार असल्याची येवढे दिवस गुप्त ठेवलेली बातमी, माझी कांहीं एक तयारी झालेली नसतांना, मग माझ्या मुंबईतल्या कचेरींत सर्वतोमुखीं झाली. कोणत्याहि प्रकारें कोणाकडून कसलंहि आश्वासन नसतांना इंग्लंडला कर्ज काढून जाण्यांत मी फार मोठा धोका पत्करीत आहे, असा मित्रत्वाचा इशारा अनेकांनीं दिला, तर 'तुम्ही अवश्य हें साहस करा, साहसाशिवाय जगांत कुणाला कांहींच मिळत नाहीं' असं प्रोत्साहनहि अनेकांनीं दिलं.

याच सुमारास एक अनपेक्षित घटना घडली.

मीं इंग्लंडला जायचं ठरविलं होतं तरी माझ्या निकटच्या नातेवाइकांनासुद्धां अजून कांहीं कळूं दिलं नव्हतं. एक तर अद्याप कसलीच तयारी झाली नव्हती. शिवाय पैशांची तयारी झाली नाहीं तर अखेर आपलं हसं होईल अशी भीति होतीच. याला अपवाद एकच होता. तो म्हणजे माझे मेहुणे डॉ. सातोसकर यांचा. सप्टेंबरांत इंग्लंडला जायची माझी कल्पना मी त्यांना सांगितली तसा त्यांना आनंद झाला आणि ते मला म्हणाले.

"तुम्ही 'पॅसेज' 'बुक' केला काय ?"

मीं म्हटलं, "नाहीं."

"मग १२ सप्टेंबरच्या 'स्ट्रॅथडेन' बोटीनं 'बुक' करा, मीहि त्याच बोटीनं केलाय्!"

हें सारं ऐकून मला आश्चर्याइतकाच आनंदहि झाला. मीं इंग्लंडला जायचा केलेला बेत त्यांना माहीत नव्हता, त्यांचा मला माहीत नव्हता ! या आनंदांतच मग आम्ही दोघे जण थॉमस कुक कंपनीच्या ऑफिसांत गेलों आणि ५० रुपये भरून माझं इंग्लंडचं १२ सप्टेंबरचं तिकीट मीं रिझर्व केलं ! पॉलिटेक्निक् संस्थेंत प्रवेश मिळविण्यासाठीं करायचा अर्जहि सरकारतर्फे रवाना करण्याची व्यवस्था केली आणि कोल्हापूरला परत आलों तों कल्पनाहि नव्हती अशी अनपेक्षित अडचण दत्त म्हणून माझ्यापुढें उभी राहिली !

वृत्तपत्रव्यवसायाच्या एक वर्षाच्या शिक्षणक्रमासाठीं मीं जायचं ठरविलं तेव्हां माझ्या दृष्टीनं सर्वांत मोठी अडचण होती ती पैशांची, तथापि आठ

आठ हजार रुपयांचं कर्ज मिळण्याची शक्यता जशी दिसूं लागली तसा विलायत-यात्रेचा मार्ग सुकर झाला असं मला वाटूं लागलं आणि पुढच्या तयारीला मी लागलों, तों एक दिवस लंडनहून ज्या पॉलिटेक्निक् संस्थेंत मी शिकायला जाणार होतों त्या संस्थेच्या वृत्तपत्रव्यवसाय शाखेच्या प्रमुखाचं पत्र माझ्या हातांत अचानक पडलं. त्यांत त्यांनीं लिहिलं होतं:

It is very unlikely that I shall be able to offer you a place and I therefore recommend that you should not make the journey at present.

हें पत्र वाचून मला कमालीचं आश्चर्य वाटलं. पॉलिटेक्निक्मध्यें सहज प्रवेश मिळेल असं मला सुरुवातीला समजलं होतं आणि म्हणून प्रवेश मिळविणं ही अगदीं एक दुय्यय बाब आहे असं मी गृहीत धरून चाललों होतों. इंग्लंडला जाणं कठीण असतं याचा अर्थ तिथल्या शिक्षणसंस्थांत प्रवेश मिळविणं कठीण असतं असा मी तरी कधीं केला नव्हता. या अभ्यासक्रमासाठीं जायचे विचार माझ्या मनांत घोळूं लागले तसं मी पॉलिटेक्निक्मधील वृत्तपत्रव्यवसाय शाखेच्या प्रमुखांना पत्र पाठवून मला प्रवेश देण्याबद्दल विनंति केली होती, तिला 'तुम्ही इंडिया हाऊस-मार्फत अर्ज पाठवा' असं मोघम उत्तर आलं होतं, त्यावरून प्रवेश मिळणं ही एक अगदीं मामुली गोष्ट आहे अशी माझी कल्पना झाली होती. तथापि माझा अर्ज मीं भारताच्या हायकमिशनरमार्फत पाठविल्याचं कळविल्याबरोबर त्यांच्याकडून हें उत्तर आलेलं पाहतांच मी सर्दच झालों!

काय करावं हें कळेना. एकदां वाटलं, इंग्लंडला जायची कल्पना जोशीमास्तरांनीं माझ्या डोक्यांत घातली नसती तर किती बरं झालं असतं! पण आतां झाल्या गोष्टीला इलाज नव्हता आणि पाऊल मागं घ्यावं असंहि वाटत नव्हतं. मात्र ज्या संस्थेंत मला शिकायला जायचं होतं तिनंच प्रवेश द्यायचं नाकारलं तर कुणाकडे जायचं? 'नवऱ्यानं मारलं आणि पावसानं झोडपलं तर कुणाकडे दाद मागायची?' अशी एक जुनी म्हण आहे. पण नवऱ्यानं मारलं तर हा मानवतेविरुद्ध गुन्हा आहे म्हणून टाहो फोडतां येतो आणि पावसानं झोडपल्याची तक्रार तर छत्र्या, ओव्हरकोट किंवा निवाऱ्याच्या जागा निर्माण होण्यापूर्वीच्या काळांतील असावी! नवऱ्याच्या बडविण्यावर आणि पावसाच्या झोडपण्यावर उपाय होते, पण शिक्षण संस्थेनं प्रवेश द्यायचं नाकारलं तर माझ्या दृष्टीनं तरी कांहीं इलाज नव्हता.

तरीहि मला वाटलं, कीं पुन्हा एकदां त्याच संस्थेला विनवणी करून पाहावी. खरोखरच मीं तसं केलं. आर्थिक सुलभता नसतांनाहि मीं या शिक्षणासाठीं यायचं

कसं ठरविलं आहे, कर्ज मिळविण्याच्या धडपडींत मी कसा आहें, मी सरकारी नोकर असल्यामुळं एक वर्षाची रजा मिळणं अशक्य असतांहि मी ती मिळविण्यासाठीं कशी धावपळ करीत आहें, मी १२ सप्टेंबरच्या बोटीचं तिकीट कसं रिझर्व केलं आहे आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे ही संधि गेली तर वृत्तपत्रव्यवसायाचा अभ्यास करण्याची संधि माझ्या वयामुळं मला कधींच कशी मिळणार नाहीं, याचं वर्णन करणारं एक सविस्तर पत्र लिहून संस्थेच्या चालकांना टाकलं आणि रोजच्या डाकेकडे डोळे लावून बसलों. पण फार दिवस थांबावंच लागलं नाहीं. एके दिवशीं एअर मेलनं उत्तर आलं :

"I regret that the quota for overseas students for the Diploma Course in Journalism has been taken."

माझ्या हातीं हें पत्र पडलं तेव्हां मीं मनांत म्हटलं, 'झालं! कर्ज काढूनसुद्धां इंग्लंडला जातां येणं आणि आपला इच्छित शिक्षणक्रम पुरा करणं आतां अशक्य आहे!'

पण माणसाची आशा मोठी चिवट असते हें कांहीं खोटं नाहीं. मला उगी-चच वाटायचं, अजूनहि कांहीं मार्ग निघेल. काय करावं हेंच सुचेना.

मी दिङ्मूढ झालों. सारखा तळमळत होतों. अनपेक्षितपणें एखाद्या माणसावर हल्ला झाला तर तो गोंधळून जाईल तसा मी गोंधळलों होतों, बेचैन झालों होतों.

या गोंधळलेल्या मनःस्थितींत एके दिवशीं एक नवी कल्पना मला सुचली. मीं मनांत म्हटलं, "असंच करावं..."

मी तीन दिवसांची रजा घेतली आणि कुणालाहि न सांगतां मुंबईला गेलों. मी मनाशीं ठरविलं होतं कीं मुंबईत जाऊन श्री. बाळासाहेब खेर यांची भेट घ्यायची, त्यांचा सल्ला घ्यायचा आणि या पेंचप्रसंगांतून ते कांहीं मार्ग सुचवितात का पाहायचं.

या मार्गांत पहिली अडचण होती ती अशी, कीं बाळासाहेबांचा अन् माझा यत्किंचितहि परिचय नव्हता. ते मुंबईचे मुख्य मंत्री असतांना त्यांच्या भाषणांचें रिपोर्ट घेण्यासाठीं चारदोन वेळां त्यांच्याबरोबर गेलों होतों आणि एकदांच त्यांच्या-बरोबर दोन शब्द बोललों होतों. सार्वजनिक जीवनांत अशीं अक्षरशः हजारों माणसं त्यांना भेटलेलीं असणार हें उघड होतं, पण व्यक्तिशः ओळख नव्हती तरी ते इंग्लंडांतील हायकमिशनरच्या जागेवरून सेवानिवृत्त होऊन नुकतेच परत आलेले असल्यामुळं त्यांची भेट घेतली तर ते कांहीं तरी मार्ग सुचवितील अशा आशेनं मीं त्यांची भेट घ्यायचं ठरविलं आणि मुंबईत आलों. तिथं आल्यावर समजलं कीं 'हिंदी कमिशन'च्या कामासाठीं बाळासाहेब सारखे हिंदुस्थानभर फिरत असतात

व त्यांची भेट घेणं जवळजवळ अशक्य असतं. तथापि, आज बाळासाहेब मुंबईत आहेत का अशी मी त्यांच्या फोर्टमधील सॉलिसिटरच्या फर्ममध्यें चौकशी केली तेव्हां ते आहेत असं समजलं. मीं मनांत म्हटलं, 'मुंबईची खेप कांहीं अगदींच फुकट गेली नाहीं!'

पण बाळासाहेबांची सरळ गांठ घेण्यापेक्षां त्यांचे सेक्रेटरी श्री. राव यांना अगोदर भेटून सगळं सांगावं आणि मग दोघांनीं मिळून बाळासाहेबांच्याकडे जावं असं मनाशीं म्हणतच मी त्यांच्या फर्ममध्यें गेलों आणि श्री. राव यांची चौकशी केली तों तिथं बसलेले एक गृहस्थ म्हणाले,

"थोड्या वेळापूर्वीं राव इथं होते, पण आतां कुठें आहेत माहीत नाहीं. कदाचित् आंत बाळासाहेबांच्याकडेहि असतील. तुम्ही बसा, मी पाहून येतों."

थोड्या वेळानं ते परत आले आणि मला म्हणाले,

"आपणाला बाळासाहेबांना भेटायचं आहे कीं रावानां?"

"मला भेटायचं आहे बाळासाहेबांना, पण रावनां भेटून मग मी त्यांना भेटणार होतों." मीं म्हटलं.

"आपणांला बाळासाहेबांना भेटायचं असेल तर माझ्याबरोबर चला. बाळासाहेबांनींच सांगितलंय् मला आपणाला घेऊन यायला."

मी थोडासा गडबडलों, कारण बाळासाहेबांच्याकडे एकदम जावं लागेल अशी मला कल्पनाच नव्हती. तथापि त्यांनींच बोलावल्यावर जाण्यावांचून गत्यंतर नव्हतं.

मी त्यांच्या खोलींत शिरलों तों जाड काचांचा चष्मा लावून ते कांहीं तरी वाचीत असलेले दिसले. मला पाहतांच हातांतले कागद त्यांनीं बाजूला ठेवले आणि चष्मा काढीत मला म्हणाले,

"बसा ना."

त्यांना अभिवादन करीत खुर्चीवर बसत मी म्हणालों,

"मुद्दाम आपली भेट घ्यावी म्हणून मी कोल्हापुराहून आलों आहें—"

"आजच आलांत हें चांगलं झालं. आज संध्याकाळींच मी कलकत्त्याला जाणार आहे. स्टेशनावर तिकिट रिझर्व करायला त्यासाठींच राव गेले आहेत, म्हणून तुम्हांला ते भेटले नाहींत...बरं, काय काम होतं तुमचं?"

मी त्यांना सारं क्रमवार सांगूं लागलों. इंग्लंडला जाणं अशक्य असतांनाहि मीं सर्व तयारी कशी केली आहे आणि आयत्या वेळीं प्रवेशच मिळत नसल्याचं पत्र आल्यामुळं कसा पेंच निर्माण झाला आहे, हें मीं सगळं सांगण्यापूर्वींच मला मध्येंच थांबवून ते म्हणाले,

" म्हणजे विजयालक्ष्मी पंडितनां मी एक पत्र पाठवावं, आणि—"

" काय करायचं तें आपण ठरवा. आपला सल्ला घेण्यासाठींच मी आलोंय्."

" आत्तां लगेच लिहूं या पत्र. अगोदर या कोर्सला इकडून कोणी जात नाहीं, आणि तुम्ही जायला निघालांत तर तुम्हांला ॲडमिशन मिळत नाहीं. तुम्हांला ॲडमिशन मिळाली पाहिजे..."

आमचं हें बोलणं चालू असतांनाच राव बाहेरून आले. विजयालक्ष्मींना पत्र लिहिण्यापेक्षां ' इंडिया ऑफिस 'मधील एका अधिकाऱ्याला पत्र लिहायचं मग त्यांनीं ठरविलं आणि थोड्या वेळांतच तें पत्र टाईप होऊनहि माझ्या हातांत पडलं!

मीं बाळासाहेबांचा कृतज्ञतापूर्वक निरोप घेतला आणि बाहेर पडलों. बाळासाहेबांना ' अजातशत्रु ' आणि ' सौजन्यमूर्ति ' हीं विशेषणं लोकांनीं लावलेलीं मीं अनेक वेळां ऐकलीं—वाचलीं होतीं, पण माझ्यासारख्या अपरिचित माणसाशींहि बोलतांना त्यांनीं दाखविलेलं सौजन्य खरोखरच अविस्मरणीय होतं.

बाळासाहेबांनीं माझ्या अपेक्षेबाहेर माझं काम केलं होतं. तथापि आणखी एके ठिकाणीं जाऊन मीं यासाठीं प्रयत्न करायचं ठरविलं. मुंबईत इंग्लंडच्या डेप्युटी हायकमिशनरची कचेरी आहे. त्या अधिकाऱ्यांना भेटून आपली अडचण सांगावी म्हणून मीं तिथं जाऊन चौकशी केली आणि मला डेप्युटी हायकमिशनरांची भेट घ्यायची आहे असं सांगितलं तेव्हां तिथल्या अधिकाऱ्यांनीं माझं नांव आणि कामाचं स्वरूप विचारलं आणि ते मला म्हणाले,

" तुम्हांला मदत करतां आली असती तर मला आनंद झाला असता, पण असल्या प्रकरणांत आम्हीं ढवळाढवळ करूं नये अशी अपेक्षा असते, कारण हिंदी विद्यार्थ्यांना इंग्लंडांतील विश्वविद्यालयांत प्रवेश मिळवून देणं हें ' इंडिया हाऊस 'चं काम आहे."

त्यांचे हे उद्गार ऐकून मीं मनांत म्हटलं, ' हा आणखी एक फुकट गेलेला प्रयत्न.'

पण मी त्यांचा निरोप घेऊन जायला निघालों तसे ते गृहस्थ म्हणाले,

" आम्ही तुमच्यासाठीं कांहीं करूं शकत नसलों तरी एक मार्ग मी तुम्हांला सांगतों—"

मीं मनांत म्हटलं, ' ऐकून तरी घ्यावं काय सांगतात तें.'

ते गृहस्थ म्हणाले,

" इथं ' ब्रिटिश कौन्सिल ' या नांवाची एक संस्था आहे आणि इंग्लंडला जाऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना ती सर्व प्रकारें मदत करते. तुम्ही आत्तां जात असाल तर तिथल्या सेक्रेटरीला मी फोन करतों म्हणजे तो तुम्हांला आपल्या साहेबाकडे लगेच घेऊन जाईल."

कोणताहि प्रयत्न आतां शिल्लक ठेवायचा नाहीं अशा निर्धारानंच मी कोल्हापुराहून आलों होतों, तेव्हां या संधीचाहि मीं फायदा घ्यायचं ठरविलं आणि 'ब्रिटिश कौन्सिल'च्या कचेरींत गेलों. तिथं थांबावंच लागलं नाहीं.

लालबुंद आणि स्थूल वाटणाऱ्या अधिकाऱ्याच्या खोलींत सेक्रेटरीनं मला नेलं तेव्हां माझं स्वागत करीत त्यानं एका प्रशस्त खुर्चीकडे अंगुलिनिर्देश केला आणि मी आसनस्थ होतांच विनम्र शब्दांत पृच्छा केली,

"What can I do for you, please!"

'काय' सांगायचं हें आतां ठरलेलंच असे. 'कसं' सांगायचं हें प्रत्येक वेळीं ठरवावं लागे, पण त्यांतहि मी आतां पारंगत झालों होतों. मीं सुरुवातीसच त्यांना म्हटलं,

"I want to go to your country but I cannot go."

"I want you to go to my country. Well, what is the difficulty?

मीं माझ्या अडचणींचा पाठ झालेला पाढा धडाधड म्हटला, तो ऐकून ते म्हणाले,

"You want to go to my country and you are not getting admission? I will try to get admission for you!"

माझ्या देखतच त्यांनीं आपल्या 'स्टेनो' ला बोलावलं आणि पत्र 'डिक्टेट' केलं.

मीं त्यांचे आभार मानले आणि त्यांचा निरोप घेतला तसे ते म्हणाले,

"I do hope that you go to my country!"

'ब्रिटिश कौन्सिल'च्या कचेरीतनं मी बाहेर पडलों तो दोन ठिकाणीं शक्य ते सर्व प्रयत्न करतां आले या समाधानानंच. मला मुंबईत कोणालाच भेटायचं नव्हतं. भेटून तरी 'मला इंग्लंडमध्यें ॲडमिशन मिळत नाहीं' ही रडकथाच सांगायची ना? त्याच दिवशीं मीं कोल्हापूरची गाडी गांठली.

पुन्हा पोस्टमनच्या वाटेकडे डोळे लागले—

—आणि काय आश्चर्य! श्री. बाळासाहेब खेर आणि ब्रिटिश कौन्सिलचे मि. मायकेल वॉडन या दोघांच्याहि पत्रांना आलेलीं उत्तरं एके दिवशीं माझ्या हातीं आलीं!

दोघांच्याहि पत्रांत एकच मजकूर होता—सर्व जागा भरल्यामुळं श्री. पत्की यांना प्रवेश देतां येत नाहीं! श्री. बाळासाहेब खेर यांच्या सेक्रेटरींच्या नांवानं आलेलं पत्र त्यांनीं जसंच्या तसं माझ्याकडे पाठविलं होतं, तर मि. मायकेल वॉडन यांनीं याबद्दल मला एक सविस्तर पत्र लिहून इंग्लंडमध्यें वृत्तपत्रव्यवसाय किती थोड्या

ठिकाणीं शिकविला जातो आणि त्यामुळं सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश देणं कसं कठीण असतं, हा प्रवेशहि कसा पद्धतशीरपणें (Methodical way) व निःपक्षपातीपणें दिला जातो हें सर्व मला लिहिलं होतं, मी ज्या पेंचांत सांपडलों होतों त्याबद्दल कमालीची सहानुभूति व्यक्त केली होती आणि पानभर टाईप केलेला मजकूर अपुरा आहे असं वाटून कीं काय, पत्राच्या शेवटीं सही केल्यानंतर एक वाक्य हातानं मुद्दाम लिहिलं होतं, "I do hope that all will turn out well in the end" (शेवटीं सर्व कांहीं जुळून येईल अशी मला फार आशा आहे.)

या सर्व सहानुभूतीचं मोल मला समजत होतं, पण या सर्व प्रकरणाचा अर्थ एकच होता, मी इंग्लंडला जाऊं शकत नाहीं. मध्यंतरीं लंडनच्या 'इंडिया हाऊस' मधील ज्या अधिकाऱ्याला श्री. खेर यांनीं जें पत्र पाठविलं होतं त्यांच्याकडूनहि मला एक उत्तर आलं, कीं वृत्तपत्रव्यवसायाच्या कोर्सला फार थोड्या विद्यार्थ्यांना प्रवेश देतात, त्यामुळें यंदा प्रवेश मिळाला नाहीं म्हणून निराश होऊं नका!

इंग्लंडांतील वृत्तपत्रव्यवसायाच्या अभ्यासक्रमासाठीं आलेली संधि कायमची गेली म्हणून मी हताश झालों. आतां प्रवेश मिळविण्यासाठीं आणखी प्रयत्न काय करायचे हेंच मला कळेना. प्रयत्नांची शिकस्त झाली होती आणि जोशी मास्तरांचं भविष्य खोटें ठरणार हें सांगायला आतां भविष्यवादी नको होता!

वृत्तपत्रव्यवसायाच्या अभ्यासक्रमाच्या निमित्तानं जो डोंगरायेवढा पत्रव्यवहार मीं केला होता, ज्या गांठीभेटी घेतल्या होत्या, त्यामुळं एक गोष्ट मला समजली होती—ती म्हणजे लंडनच्या पॉलिटेक्निक्मधील वृत्तपत्रव्यवसाय शाखेच्या प्रमुखाचं नांव—मिस्टर विल्यम्स्! इंडिया हाऊस, श्री. बाळासाहेब खेर, ब्रिटिश कौन्सिलचे मि. मायकेल वॉडन या सर्वांनीं माझ्यासाठीं प्रयत्न केले होते आणि माझ्या दुर्दैवानं त्या सर्वांनीं अपयश आलं होतं. अखेर सर्व प्रयत्न संपले आणि मी हताश झालों. आतां कोणतीहि गोष्ट करायची शिल्लक नव्हती. इंग्लंडचं रिझर्व्ह केलेलं तिकीट रद्द करणं, राजाध्यक्ष फॉरिन एज्युकेशन सोसायटीला पत्र पाठवून मीं मागितलेलं पांच हजार रुपयांचं कर्ज (मिळत असल्यास) मला नको आहे असं कळविणं आणि एक वर्षाच्या रजेसाठीं केलेला अर्ज परत घेणं येवढंच करायचं काय तें शिल्लक होतं!

तेंहि तांतडीनं करणं आवश्यक होतं, पण तें करण्यापूर्वी मीं मनांत म्हटलं, एक अखेरचा प्रयत्न म्हणून आपण स्वतःच पॉलिटेक्निक्मधील वृत्तपत्रव्यवसाय शाखेचे प्रमुख मिस्टर विल्यम्स् यांना एक पत्र लिहून सारी हकीकत आणि

आपणांपुढें उभा राहिलेला पेंच कथन करून कांहींहि करून मला प्रवेश द्या, अशी विनंति कां करूं नये? हा आतां अखेरचा प्रयत्न आहे असं मनांत म्हणत मीं मिस्टर विल्यम्स यांना एक पत्र लिहिलं. या पत्रांत सर्व परिस्थिति मीं निवेदन केलीच, पण शेवटीं लिहिलं:

If, in spite of all these facts, I fail to get admission, I must curse myself and finally say "Good-bye" to you and to your country!

या पत्राचं काय उत्तर येणार याची मला कल्पना होती, ती खरी ठरलीच, पण निराशेच्या या भयाण अंधारांत आशेचा एक किरण प्रथमच चमकला, कारण माझ्या पत्राला लिहिलेल्या उत्तरांत मिस्टर विल्यम्स् यांनीं म्हटलं:

"I have read through your letter very carefully, but regret to inform you that I cannot accept you as a student in the Journalism Course.

Should one of the overseas students not be able to take up his place, I will offer it to you, but this may not be known till September."

हें सर्व होईपर्यंत जून महिना आला होता आणि या पत्राचा अर्थहि सरळ होता. प्रवेश मिळणं अशक्य होतंच, पण 'जर' एखादा परदेशीय विद्यार्थी आला नाहीं आणि त्याची जागा रिकामी राहिली 'तर' ती मला द्यायचं अभिवचन त्यानीं दिलं होतं. आणि हें कळणार होतं केव्हां? तर सप्टेंबरमध्यें—वर्ग सुरू झाल्यावर!

या आशेवर जगण्यांत कांहींच अर्थ नव्हता, पण मीं मनांत म्हटलं, समजा असं झालंच आणि सप्टेंबर महिन्यांत मला प्रवेश दिल्याची केबल आलीच, तर माझी जाण्याची तयारी पाहिजे! या सगळ्या प्रकारांत 'जर' 'तर' फार होते आणि प्रवेश मिळणं तर जवळ जवळ अशक्यच होतं, पण अखेर प्रवेश मिळणार असं गृहीत धरून मीं इंग्लंडला जाणाऱ्या विमानांच्या दरांची आणि वेळांचीहि माहिती निरनिराळ्या विमान कंपन्यांना पत्रं पाठवून मिळवून ठेवली!

प्रवेश मिळणं अशक्य होतं हें उघड असतांनाहि त्यासाठीं कराव्या लागणाऱ्या प्रयत्नांत माझ्याकडून तरी कांहीं कसूर झाली नाहीं येवढं एकच मानसिक समाधान मला मिळत होतं. मिस्टर विल्यम्स् यानीं एखादा परदेशीय विद्यार्थी आला नाहीं तर प्रवेश द्यायचं अभिवचन दिलं होतं, त्याला फारशी किंमत देण्यांत अर्थ नाहीं, कोणालाहि एकदम न दुखविण्याच्या ब्रिटिश लोकांच्या सौजन्याचा तो एक भाग

आहे असं मनाशीं म्हणत इंग्लंडला जायची आणि पुन्हां एकदां विद्यार्थी होण्याची आयुष्यांतली संधि हुकली या विचारानं माझं मन हिरमुसलं झालं आणि माझ्या नेहर्मींच्या उद्योगांत अधिकाधिक मन घालून झालेल्या दुःखाचा विसर पडावा म्हणून एकसारखं वाचन करून स्वतःचं दुःख विसरण्याचा मला माहित असलेला एकमेव मार्ग मी चोखाळूं लागलों. सतरा वर्षांनंतर पुन्हा एकदां विद्यार्थि होण्याची आणि विद्येच्या उपासनेंतील आनंद उपभोगण्याची संधि गेली—खरोखरच गेली, या दुःखाच्या जाणिवेनं मग त्या वाचनांतहि गोडी वाटेनाशी झाली, मन आणि शरीर सुन्न झालं!

पण सूर्यप्रकाशाचे पहिले, अस्पष्ट किरण येण्यापूर्वी जो भयाण अंधार पसरतो तशीच ही अवस्था होती!

कारण, एके दिवशीं अकरा वाजतां मी माझ्या कचेरींत गेलों तों पॉलिटेक्-निक्चं कव्हर असलेलं नेहर्मींच्या परिचयाचं एक पत्र माझ्या टेबलावर पडलेलं मला दिसलं!

आणि उघडून पाहतों तों काय? मिस्टर विल्यम्स् यांनीं लिहिलं होतं :

"I am pleased to inform you that owing to the withdrawal of an overseas student, I can now offer you a place in the Diploma Course in Journalism for the session 1955–56. You should report in London on September 20, at 9-30 A. M.

पत्रांतला हा मजकूर वाचून मला विलक्षण आनंद तर झालाच, पण अखेर इंग्लंडला जायचं आणि सतरा वर्षांनंतर पुन्हा विद्यार्थी होण्याचं माझं स्वप्न साकार होणार म्हणून आकाश ठेंगणं वाटूं लागलं! आशा-निराशेचा खेळ आतां संपला होता, घनदाट अंधारांतून प्रकाशाचे किरण आतां आले होते!

आणि यानंतरहि जी एक विलक्षण घटना घडली ती कोणाचा विश्वासहि बसूं नये येवढ्या अकल्पितपणें!

मीं १२ सप्टेंबर रोजीं मुंबईहून निघणाऱ्या 'स्ट्रॅथडेन' बोटीचं तिकीट एप्रिल महिन्यांत रिझर्व केलं होतं आणि माझे मेहुणेहि याच बोटीनं जाणार असल्यामुळं आतां आम्ही दोघेहि एकाच बोटीनं इंग्लंडला जाणार या आनंदांत मी होतों, पण एके दिवशीं माझ्या मेहुण्यांचं पत्र आलं, कीं ज्या 'ग्लॅक्सो' कंपनीनं त्यांच्या इंग्लंडमधील पुढील अभ्यासाची व्यवस्था केली होती त्या कंपनीनं त्यांचं 'स्ट्रॅथडेन' बोटीचं तिकीट रद्द करून त्यांना 'सिलिसिया' या फक्त पहिला वर्ग असलेल्या बोटीचं तिकीट काढून दिलं होतं. मींहि त्याच बोटीनं शक्य तर यावं असं

माझ्या मेहुण्यांनीं मला लिहिलं तेव्हां मीं मनांत म्हटलं, 'सिलिसिया' बोटीनं जायचं तर निदान तीनचारशें रुपये तरी जास्त पडणार! (कारण त्या बोटीवर फक्त 'फर्स्ट क्लास' च होता) तेव्हां येवढा खर्च उगीचच्च कशाला करायचा? नाहीं तरी नंतर आम्ही इंग्लंडमध्यें भेटणारच्च होतों, तेव्हां मीं त्यांना लिहिलं, कीं मला 'सिलिसिया' बोटीनं निघतां येणं शक्य नाहीं, कारण उगीचच्च अधिक पैसे खर्च करणं मला अशक्य आहे!"

मीं हें पत्र लिहून पोस्टांत टाकलं आणि त्याच दिवशीं मला थॉमस कुक कंपनीचं पत्र आलं कीं 'स्ट्रॅथडेन' या पी. ॲंड ओ. कंपनीच्या बोटीच्या ऐवजीं ॲंकर लाइनच्या 'सिलिसिया' बोटीनं प्रवास करण्याची माझी तयारी आहे कीं काय तें कळवावं! या पत्रांत मला असंहि कळविण्यांत आलं कीं, 'स्ट्रॅथडेन' बोटीचं जें ८२ पौंड (सुमारें १०९३ रुपये) तिकीट मला पडणार होतं त्याऐवजीं ७५ पौंड (सुमारें १००२ रुपये) तिकीट पडेल! माझं मन वळविण्यासाठीं आलेल्या पत्रांत आणखी लिहिलं होतं:

"This is the only berth available and we strongly recommend you to accept the same. You are really fortunate as this steamer provides only First Class accommodatoin and you have the full run of the ship."

आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो तीन त्यांतलाच्च हा प्रकार झाला! पत्रव्यवसायाच्या अभ्यासक्रमासाठीं अशक्य वाटणारा प्रवेश तर मिळालाच, पण 'टूरिस्ट' वर्गाच्या तिकिटापेक्षांहि कमी पैसे भरून पहिल्या वर्गांतून आणि तेंहि माझ्या मेहुण्यांच्या संगतींत प्रवास करण्याची संधि मला मिळणार, या आनंदांतच मग मी पुढच्या तयारीला लागलों आणि ८ सप्टेंबर १९५५ रोजीं 'सिलिसिया' बोटींत पाऊल टाकलं तें इंग्लंडला जायचं आणि सतरा वर्षांनंतर पुन्हा विद्यार्थी होण्याचं माझं स्वप्न अखेर साकार झालं या विलक्षण आनंदाच्या धुंदींत, गुंगीत, बेहोषींतच्च!—

—वि. वा. पत्की

# प श्चि म वा रे

★

कोल्हापूर येथील
दैनिक 'सत्यवादी'चे संपादक
श्री. बाळासाहेब पाटील
यांना पाठवलेलीं पत्रं

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| पत्र १ : | मायभूमीचा निरोप | २५ |
| पत्र २ : | पाकिस्तानचं अंतरंग | ३७ |
| पत्र ३ : | एडन | ४७ |
| पत्र ४ : | अद्भुत सौंदर्याचं माहेरघर | ५७ |
| पत्र ५ : | इंग्लंडांतील दैनंदिन जीवन—१ | ६९ |
| पत्र ६ : | इंग्लंडांतील दैनंदिन जीवन—२ | ७६ |
| पत्र ७ : | इंग्लंडांतील दैनंदिन जीवन—३ | ८४ |
| पत्र ८ : | इंग्लंडांतील दैनंदिन जीवन—४ | ९३ |
| पत्र ९ : | इंग्लंडांतील शिक्षणपद्धति | १०२ |
| पत्र १० : | इंग्लंडांतील नाताळ | ११० |
| पत्र ११ : | इंग्लंडांतील विद्येचीं तीर्थक्षेत्रं आणि ज्ञानाचीं सदावर्तं | ११८ |
| पत्र १२ : | इंग्लंडांतील हिंवाळा | १२७ |
| पत्र १३ : | इंग्लंडांतील कल्याणकारी राज्य—१ | १३६ |
| पत्र १४ : | इंग्लंडांतील कल्याणकारी राज्य—२ | १४५ |
| पत्र १५ : | इंग्लंडांतील कल्याणकारी राज्य—३ | १५५ |
| पत्र १६ : | इंग्लंडांतील कल्याणकारी राज्य—४ | १६४ |
| पत्र १७ : | युरोप-दर्शन—१ | १७३ |
| पत्र १८ : | युरोप-दर्शन—२ | १८१ |
| पत्र १९ : | युरोप-दर्शन—३ | १९० |
| पत्र २० : | युरोप-दर्शन—४ | १९९ |
| पत्र २१ : | युरोप-दर्शन—५ | २११ |
| पत्र २२ : | इंग्लंडांतील वृत्तपत्रव्यवसाय | २२० |
| पत्र २३ : | मागं वळून पाहतांना— | २३२ |
| पत्र २४ : | मातृभूमीचं पुनर्दर्शन ! | २४२ |

: १ :

# मायभूमीचा निरोप

★

‘ सिलिसिया ’
कराची-एडन प्रवास
१६ सप्टेंबर, १९५५

प्रिय बाळासाहेब,

शकुनांवर माझा कांहीं फारसा विश्वास नाहीं, पण चार सप्टेंबर रोजीं कोल्हापूर सोडतांना निसर्गाचं जें प्रसन्न स्वरूप माझ्या दृष्टीस पडलं, तें पाहून अनेक मित्रांचा, हितचिंतकांचा आणि नातेवाईकांचा निरोप घेतांना गहिवरलेलं माझं मन थोड्याच वेळांत उल्हसित झालं. वृत्तपत्रलेखनाच्या शिक्षणासाठीं मी इंग्लंडला जायचं ठरविलं, तेव्हांपासून अनेकांनीं मला उत्तेजन दिलं होतं, आपापल्या परीनं सहाय्य केलं होतं हें जरी खरं, तरी चाळीशी उलटल्यावर अभ्यासाच्या निमित्तानं येवढं मोठं आर्थिक धाडस—आणि तेंहि केवळ स्वतःच्या जबाबदारीवर—करणं कितीसं इष्ट आहे या विचारानं माझं मन सारखं हुरहुरत होतं. सतरा वर्षांनंतर कां होईना, पण माझी विद्यार्थी-दशा पुन्हां परत येणार आहे, या एकाच विचारानं अखेर मी हें धाडस करायचं ठरविलं होतं, पण कोल्हापूर सोडायचा दिवस जस-जसा जवळ येऊं लागला, तसतसं माझं मन अधिकाधिक अस्वस्थ होऊं लागलं. मात्र प्रत्यक्ष कोल्हापूर सोडायचा दिवस जसा उगवला तसा सारा रंग पालटला, अगोदर चार-सहा दिवस अखंड चाललेली पर्जन्यवृष्टि एकदम थांबली आणि रविवार तारीख चार सप्टेंबर रोजीं दुपारीं मी कोल्हापूर सोडलं तेव्हां तर सारं आकाश निवळलं होतं, पाऊस थांबला होता आणि स्वच्छ, प्रसन्न ऊन चहुंकडे पसरलं होतं, तें पाहून माझं मन अगदीं न कळत म्हणालं, ‘माझ्या प्रवासाची सुरुवात तर मोठी छान झाली...’

कोल्हापूर सोडतांनाच नव्हे, तर मला इंग्लंडला घेऊन जाणाऱ्या 'सिलिसिया' बोटींत मी पाऊल टाकलं तेव्हां सुद्धां असंच मोठं प्रसन्न वातावरण होतं. मी कोल्हापुराहून मुंबईला आलों तेव्हां पावसाची झिमझिम सारखी सुरू होती, पण गुरुवार तारीख आठ सप्टेंबर रोजीं सकाळीं आठ वाजतां ज्या अलेक्झँड्रा डॉकमध्यें 'सिलिसिया' बोट उभी होती तिथं मी आलों, तेव्हां पाऊस थांबला होता, कोवळीं उन्हं पसरलीं होतीं आणि मनांतली सारी हुरहुर शांत झाली होती. या ठिकाणची विलक्षण धांदल आणि गडबड मात्र विचारूं नका! जाणाऱ्या एका माणसाला निरोप देण्यासाठीं जीं पांच—पन्नास तरी माणसं आलेलीं होतीं त्यांचीं अखेरचीं निरोपाचीं बोलणीं सद्गदलेल्या स्वरांत चाललीं होतीं, डोळे पुसले जात होते, गळ्यांत मोठमोठाले हार घातले जात होते, निरनिराळ्या व्यक्तीबरोबर जाणाऱ्या माणसाचे फोटो पुनः पुन्हां घेतले जात होते. पासपोर्ट, लस टोंचल्या-बद्दलचीं आरोग्यखात्याचीं सर्टिफिकिटं, बरोबर आणलेल्या वस्तूंबद्दल करावं लागणारं डिक्लरेशन, या साऱ्या सव्यापसव्यांतून बाहेर पडतांना निरोप देण्यासाठीं आलेल्या जवळच्या नात्यांतल्या माणसाजवळसुद्धां दोन शब्द बोलण्याइतकी फुरसत मिळत नव्हती. अखेर बरोबर न्यायच्या सामानाची तपासणी करण्याच्या निमित्तानं कस्टमच्या अधिकाऱ्यांचा हस्तस्पर्श त्या सामानाला झाला आणि 'फ्री पोर्टर' अशीं निळ्या अंगरख्यावर अक्षरं असलेल्या हमालानं माझं सामान उचलून बोटीकडे नेलं, तसा मी मनांत म्हणालों, 'खरंच झाली कीं आतां इंग्लंडच्या प्रवासाची सुरुवात!'

माझ्याबरोबर माझ्या नात्यांतलीं जीं माणसं मला निरोप देण्यासाठीं आलीं होतीं, त्यांना बोटीच्या जिन्यावर मी आधीं चढूं दिलं आणि सर्वांत शेवटीं मग मी जिन्यावर पहिलं पाऊल टाकलं. निदान वर्षभर तरी या भूमीपासून आपणाला दूर रहावं लागणार आहे या विचारानं जणूं कांहीं माझं मन मुकेपणानं त्या भूमीचा निरोप घेत होतं, पण अधिक वेळ तिथं रेंगाळत रहायला मला कोण सवड देणार होतं? जड ओझीं घेऊन हमाल धांवत होते, प्रवासाला जाणाऱ्यांची आणि निरोप द्यायला आलेल्यांची बोटीच्या दिशेनं एकमार्गी वहातूक सुरू होती, पांढरे स्वच्छ कपडे घातलेले बोटीवरील अधिकारी मोठ्या आदबीनं आंत येणारांचं स्वागत करीत होते आणि प्रत्येकाच्या केबिनचा नंबर विचारून इच्छित ठिकाणीं पोंचवीत होते. या लोंढ्याबरोबर मीहि मग माझ्या केबिनकडे आलों. पाठोपाठ माझं सामान घेऊन येणारा हमालहि आला आणि तें केबिनमध्यें व्यवस्थित लावून ठेवल्यानंतर

बक्षिसाच्या आशेनं त्यानं माझ्याकडे पाहिलं. तो 'फ्री पोर्टर' होता खरा, पण त्याला तसंच विन्मुख पाठविणं माझ्याहि जिवावर आलं. मात्र तो चार–आठ आणे घेणारा हमाल नव्हता हेंहि माझ्या चटकन लक्षांत आलं. असं सांगतात, कीं पंडित मदन मोहन मालवीय हे बनारस हिंदु युनिव्हर्सिटीसाठीं मदत मागायला जात आणि एखाद्यानं हजार–दोन हजार रुपये हातावर ठेवले कीं म्हणत, "मी भिकारी आहे खरा, पण लाखांनीं भिक्षा घेण्याची मला संवय आहे!" माझ्या तीन बॅगा धक्यावरून बोटींत आणल्याबद्दल त्याला पांच रुपये तरी मी द्यावे असं त्यानं म्हटलं तेव्हां मला मालवीयजींच्या या उद्‌गारांची आठवण झाली आणि अखेरीस मी दोन रुपये त्याच्या हातावर ठेवले तरीहि तो असंतुष्टच दिसला!

पण त्याच्याकडे अधिक लक्ष द्यायला मला आतां सवड नव्हती. आपली माणसं आणि मायभूमि सोडून जाण्याच्या विचारानं मन सारखं हुरहुरत तर होतंच, पण बोटींतली ती असामान्य स्वच्छता, टापटीप, सेवातत्परता आणि आतिथ्यशीलता पाहून माझं मन प्रसन्न झालं. यांतल्या एकेका गोष्टीनंहि माणसाचं मन उल्हसित झालं असतं, मग किमु यत्र चतुष्टयम्? थोड्या वेळांतच मग येणाऱ्यांची धांदल संपली आणि कुणी केबिनमध्यें, कुणी डेकवरच्या आराम-खुर्च्यांवर तर कुणी लायब्ररींतल्या मऊ मऊ प्रशस्त सोफा सेटवर आपल्या बरोबरच्या माणसांशीं बोलत बसले होते. आम्ही सकाळीं आठाच्या सुमारास धक्क्यावर आलों खरे, पण तीन तास केव्हां गेले हे कळलंहि नाहीं. मग समजलं, कीं बोट दुपारीं तीन वाजतां सुटणार आहे. येवढा वेळपर्यंत निरोप द्यायला आलेल्या माणसांना थांबवून धरणं मला तरी इष्ट वाटलं नाही. मला निरोप द्यायला आलेल्यांचा मग मीच वरवर हंसत पण अंतर्यामीं अस्वस्थ मनानं निरोप घेतला आणि बोटीवरून उतरून तीं दृष्टिआड होईपर्यंत त्यांच्येकडे पाहात राहिलों. ज्या दिशेनं तीं सारीं माणसं निघून गेलीं होतीं त्या दिशेकडे नुसतं पाहात राहूनहि मग मनाचं समाधान होईना...अगदीं एकटं एकटं वाटूं लागलं, बोटीवर माणसांची येवढी गर्दी असून सुद्धां! माझ्याबरोबर माझे मेहुणे डॉ. सातोसकर हे शेफील्ड विश्वविद्यालयांतील वैद्यकशास्त्राच्या पीएच्. डी. च्या अभ्यासासाठीं निघाले होते. त्यांच्याच केबिनमध्यें मग आम्ही किती वेळ तरी बसून राहिलों, तोंच मोठ्या सुरेल आवाजांत बिगुल वाजवीत जाणारा बोटीवरील नोकर दृष्टिस पडला. दुपारच्या जेवणा (Lunch) ची सूचना या रूपानं दिली जात होती हें समजतांच आम्ही उठलों आणि जेवणाच्या प्रशस्त हॉलमध्यें आलों. सुमारें दीड-दोनशें माणसांना

कोल्हापूर सोडतांनाच नव्हे, तर मला इंग्लंडला घेऊन जाणाऱ्या 'सिलिसिया' बोटींत मी पाऊल टाकलं तेव्हां सुद्धां असंच मोठं प्रसन्न वातावरण होतं. मी कोल्हापुराहून मुंबईला आलों तेव्हां पावसाची झिमझिम सारखी सुरू होती, पण गुरुवार तारीख आठ सप्टेंबर रोजीं सकाळीं आठ वाजतां ज्या अलेक्झँड्रा डॉकमध्यें 'सिलिसिया' बोट उभी होती तिथं मी आलों, तेव्हां पाऊस थांबला होता, कोवळीं उन्हं पसरलीं होतीं आणि मनांतली सारी हुरहुर शांत झाली होती. या ठिकाणची विलक्षण धांदल आणि गडबड मात्र विचारूं नका! जाणाऱ्या एका माणसाला निरोप देण्यासाटीं जीं पांच—पन्नास तरी माणसं आलेलीं होतीं त्यांचीं अखेरचीं निरोपाचीं बोलणीं सद्गदलेल्या स्वरांत चाललीं होतीं, डोळे पुसले जात होते, गळ्यांतें मोठमोठाले हार घातले जात होते, निरनिराळ्या व्यक्तींबरोबर जाणाऱ्या माणसाचे फोटो पुनः पुन्हां घेतले जात होते. पासपोर्ट, लस टोंचल्या-बद्दलची आरोग्यखात्याचीं सर्टिफिकिटं, बरोबर आणलेल्या वस्तूंबद्दल करावं लागणारं डिक्लरेशन, या साऱ्या सव्यापसव्यांतून बाहेर पडतांना निरोप देण्यासाटीं आलेल्या जवळच्या नात्यांतल्या माणसाजवळसुद्धां दोन शब्द बोलण्याइतकी फुरसत मिळत नव्हती. अखेर बरोबर न्यायच्या सामानाची तपासणी करण्याच्या निमित्तानं कस्टमच्या अधिकाऱ्यांचा हस्तस्पर्श त्या सामानाला झाला आणि 'फ्री पोर्टर' अशीं निळ्या अंगरख्यावर अक्षरं असलेल्या हमालानं माझं सामान उचलून बोटीकडे नेलं, तसा मी मनांत म्हणालों, 'खरंच झाली कीं आतां इंग्लंडच्या प्रवासाची सुरुवात!'

माझ्याबरोबर माझ्या नात्यांतलीं जीं माणसं मला निरोप देण्यासाटीं आलीं होतीं, त्यांना बोटीच्या जिन्यावर मी आधीं चढूं दिलं आणि सर्वांत शेवटीं मग मी जिन्यावर पहिलं पाऊल टाकलं. निदान वर्षभर तरी या भूमीपासून आपणाला दूर रहावं लागणार आहे या विचारानं जणूं कांहीं माझं मन मुकेपणानं त्या भूमीचा निरोप घेत होतं, पण अधिक वेळ तिथं रेंगाळत रहायला मला कोण सवड देणार होतं? जड ओझीं घेऊन हमाल धांवत होते, प्रवासाला जाणाऱ्यांची आणि निरोप द्यायला आलेल्यांची बोटीच्या दिशेनं एकमार्गी वहातूक सुरू होती, पांढरे स्वच्छ कपडे घातलेले बोटीवरील अधिकारी मोठ्या आदबीनं आंत येणारांचं स्वागत करीत होते आणि प्रत्येकाच्या केबिनचा नंबर विचारून इच्छित ठिकाणीं पोंचवीत होते. या लोंढ्याबरोबर मीहि मग माझ्या केबिनकडे आलों. पाठोपाठ माझं सामान घेऊन येणारा हमालहि आला आणि तें केबिनमध्यें व्यवस्थित लावून ठेवल्यानंतर

बक्षिसाच्या आशेनं त्यानं माझ्याकडे पाहिलं. तो 'फ्री पोर्टर' होता खरा, पण त्याला तसंच विन्मुख पाठविणं माझ्याहि जिवावर आलं. मात्र तो चार–आठ आणे घेणारा हमाल नव्हता हेंहि माझ्या चटकन लक्षांत आलं. असं सांगतात, कीं पंडित मदन मोहन मालवीय हे बनारस हिंदु युनिव्हर्सिटीसाठीं मदत मागायला जात आणि एखाद्यानं हजार–दोन हजार रुपये हातावर ठेवले कीं म्हणत, "मी भिकारी आहे खरा, पण लाखांनीं भिक्षा घेण्याची मला संवय आहे!" माझ्या तीन बॅगा धक्क्यावरून बोटींत आणल्याबद्दल त्याला पांच रुपये तरी मी द्यावे असं त्यानं म्हटलं तेव्हां मला मालवीयजींच्या या उद्‌गारांची आठवण झाली आणि अखेरीस मी दोन रुपये त्याच्या हातावर ठेवले तरीहि तो असंतुष्टच दिसला!

पण त्याच्याकडे अधिक लक्ष द्यायला मला आतां सवड नव्हती. आपली माणसं आणि मायभूमि सोडून जाण्याच्या विचारानं मन सारखं हुरहुरत तर होतंच, पण बोटींतली ती असामान्य स्वच्छता, टापटीप, सेवातत्परता आणि आतिथ्यशीलता पाहून माझं मन प्रसन्न झालं. यांतल्या एकेका गोष्टीनंहि माणसाचं मन उल्हसित झालं असतं, मग किमु यत्र चतुष्टयम्? थोड्या वेळांतच मग येणाऱ्यांची धांदल संपली आणि कुणी केबिनमध्यें, कुणी डेकवरच्या आराम-खुर्च्यांवर तर कुणी लायब्ररींतल्या मऊ मऊ प्रशस्त सोफा सेटवर आपल्या बरोबरच्या माणसांशीं बोलत बसले होते. आम्ही सकाळीं आठाच्या सुमारास धक्क्यावर आलों खरे, पण तीन तास केव्हां गेले हे कळलंहि नाहीं. मग समजलं, कीं बोट दुपारीं तीन वाजतां सुटणार आहे. येवढा वेळपर्यंत निरोप द्यायला आलेल्या माणसांना थांबवून धरणं मला तरी इष्ट वाटलं नाही. मला निरोप द्यायला आलेल्यांचा मग मीच वरवर हंसत पण अंतर्यामीं अस्वस्थ मनानं निरोप घेतला आणि बोटीवरून उतरून तीं दृष्टिआड होईपर्यंत त्यांचेकडे पाहात राहिलों. ज्या दिशेनं तीं सारीं माणसं निघून गेलीं होतीं त्या दिशेकडे नुसतं पाहात राहूनहि मग मनाचं समाधान होईना...अगदीं एकटं एकटं वाटूं लागलं, बोटीवर माणसांची येवढी गर्दी असून सुद्धां! माझ्याबरोबर माझे मेहुणे डॉ. सातोसकर हे शेफील्ड विश्वविद्यालयांतील वैद्यकशास्त्राच्या पीएच्. डी. च्या अभ्यासासाठीं निघाले होते. त्यांच्याच केबिनमध्यें मग आम्ही किती वेळ तरी बसून राहिलों, तोंच मोठ्या सुरेल आवाजांत बिगुल वाजवीत जाणारा बोटीवरील नोकर दृष्टिस पडला. दुपारच्या जेवणा (Lunch) ची सूचना या रूपानं दिली जात होती हें समजतांच आम्ही उठलों आणि जेवणाच्या प्रशस्त हॉलमध्यें आलों. सुमारें दीड-दोनशें माणसांना

एकदम जेवायला बसतां येईल येवढा मोठा तो हॉल आहे. पांढरे स्वच्छ कपडे घातलेले वेटर मोठ्या आदबीनं जेवणाच्या पदार्थांची यादी (Menu) हातांत देत होते आणि त्यांतले कोणते पदार्थ आणायचे ते विचारीत होते. प्रत्येक टेबलावर बसलेलीं चार चार माणसं उगीचच इकडे-तिकडे पाहात होतीं. बहुसंख्य माणसं तर आयुष्यांत पहिल्यांदाच परदेशच्या सफरीवर निघालेलीं, त्यामुळं सारंच सर्वांना नवीन होतं. जेवणाच्या यादींत जीं नांव होतीं यांतलीं बहुतेक तर अपरिचित, शेवटीं त्यांतले शाकाहारी पदार्थ कोणते असं मीच वेटरला विचारलं आणि त्यानंहि हंसत हंसत दोन चार पदार्थांवर भराभरा बोटं ठेवलीं, जणू तोंडानं बोलायची बंदी होती! वास्तविक मी कांहीं पूर्ण शाकाहारी नाहीं, पण मांसाहाराचीहि मला फारशी गोडी नाहीं. त्यामुळं निदान सुरुवातीला तरी शाकाहार घ्यायचंच मी ठरविलं आणि मग भाजीपाल्यांचा सूप, पाव, लोणी, मासे, उकडलेले बटाटे, काकडी, टॉमेटो, लेटयूस, बीट इत्यादि पदार्थ हळुहळु टेबलावर आले तसं बोटीवरील पहिलं जेवण तरी कंटाळा न येतां झालं या समाधानानं शेवटचं आइस्क्रीम आणि कॉफी घेतली आणि भोजनगृहांतून बाहेर पडलों.

या वेळपर्यंत दीड वाजायला झाला होता. निरोप द्यायला आलेलीं पुष्कळच माणसं अजून बोटीवर आणि धक्क्यावर होतीं, तोंच All visitors to proceed ashore, please! (निरोप द्यायला आलेल्या माणसांनीं आतां खालीं उतरावं) असं बोटींतल्या लाऊड स्पीकरमधून पुनः पुन्हां सांगण्यांत येऊं लागलं. पितळेची चकचकीत थाळी वाजवीत एक नोकर हीच बातमी प्रत्येक केबिनच्या जवळ जाऊन सांगू लागला, तसं सर्वांनींच ओळखलं, कीं आतां बोट सुटणार! सर्वत्र पुन्हा एकदां एकच धांदल उडाली. निरोप घ्यायचं काम सुरू झालं! डोळे पुसले जाऊं लागले, वडीलधाऱ्या माणसांचे हात पाठीवरून फिरूं लागले आणि जड पावलानं एकेकजण बोटीला लावलेल्या जिन्यावरून खाली उतरूं लागला. थोड्या वेळांतच मग बोटीचा भोंगा वाजला, हळूहळू बोट धक्क्यापासून दूर सरकूं लागली आणि अखेरीस ज्या दोरखंडानं बोट धक्क्याला बांधून ठेवलेली होती तोहि खलाशांनी काढून पाण्यांत सोडला. अगदीं मंद गतीनं बोट पुढें सरकूं लागली, निरोप देणाऱ्यांच्या आणि निरोप घेणाऱ्यांच्या हातांतले रुमाल हलूं लागले, माणसं डोळे पुसूं लागलीं, किती वेळ तरी! अखेर माणसांचे चेहरेहि ओळखतां न येण्याइतके दूर गेले, फक्त हालणारे रुमाल तेवढे दिसूं लागले, कबुतरांचे पांढरे शुभ्र पंख फडफडावे तसे! बोटीला आतां वेग येऊं लागला

होता, धक्क्यापासून बोट वरीच दूर जाऊं लागली होती. एकेक इमारती मागं पडूं लागल्या—वेलार्ड पियर वरच्या इमारती, गेट वे ऑफ् इंडिया, ताजमहाल हॉटेल—सारं सारं थोड्याच वेळांत मागं पडलं. मुंबईची माहिती असणारीं सुमारें शंभर तरी माणसं चवथ्या मजल्यावरच्या प्रशस्त डेकवर उभीं राहून क्षणाक्षणाला मागं राहाणाऱ्या मुंबईचं अखेरचं दर्शन घेत होतीं. कोणी अंगुलिनिर्देश करून म्हणत होतं, "तो उंच दिसतोय ना, तो युनिव्हर्सिटीचा राजाबाई टॉवर, त्याच्या एका बाजूला तें हायकोर्ट आणि दुसऱ्या बाजूला ते जुनं सेक्रेटेरिएट...आणि तो उंचच उंच सुळका दिसतोय ना, तो अफगाणा चर्चचा, ही समोर पाण्यांत दिसतीय ती कुलाब्याची दांडी." येवढ्या वेळपर्यंत कुलाब्याच्या दांडीला वळसा घालून बोट खोल समुद्रांत शिरूं लागली होती. पश्चिमेकडे झुकलेल्या सूर्याचे किरण पडल्यामुळं मरीन ड्राईव्हवरच्या इमारती चकाकतांना स्पष्ट दिसत होत्या, वाळकेश्वराचं टोंक अजूनहि स्पष्ट ओळखतां येत होतं. सुमारे अर्धा–पाऊण तास हे असं चाललं होतं. हळुहळु सारं अस्पष्ट होऊं लागलं होतं. युनिव्हर्सिटी टॉवर, हायकोर्ट, सेक्रेटरीएट फक्त परिचित माणसालाच आतां ओळखतां आलं असतं. कुलाब्याची दांडीहि काड्याच्या पेटीतली काडी पाण्यांत उभी करावी तशी दिसूं लागली होती आणि थोड्या वेळांतच हेहि सारं दिसेनासं झालं तसं माझं मन अगदी अस्वस्थ झालं. मी आणि माझे मेहुणे डॉ. सातोसकर किती वेळ तरी कठड्याला टेकून उभे राहिलों आणि मग डेकवरच्याच प्रशस्त आराम खुर्चीवर येऊन बसलों. ज्या बाजूला मुंबई राहिली होती त्या दिशेला जमीन असावी असं अस्पष्ट दिसणाऱ्या टेकड्यांच्या रेषांवरून काय तें ओळखूं येत होतं आणि हेंहि आतां थोड्या वेळांतच दिसेनासं होणार म्हणून तिकडे पुनःपुन्हां पाहावंसं वाटत होतं.

पण आतां असं पाहाण्यांतहि कांहीं अर्थ नाहीं अशी माझ्या मनाची मी समजूत घातली आणि स्वतःच्या केबिनमध्यें जाऊन पडावं असा विचार मनाशी करीत मी उगीचच पुन्हां कांहीं दिसतं का म्हणून पाहाण्यासाठीं कठड्याजवळ आलों. आतां कांहीं कांहीं दिसत नव्हतं, टेकड्यांची अंधुक रेषासुद्धां! मुंबईच नव्हे तर मातृभूमीहि दृष्टिआड झाली होती, पुन्हां परत येईपर्यंत ती आतां दिसेल अशी आशा उरली नव्हती...कठड्याजवळ उभं राहून कंटाळा येऊं लागला होता आणि म्हणून केबिनकडे जाण्यासाठीं मी वळणार तोंच लाउडस्पीकरमधून शब्द आले, "Please put on your life jackets, they are in your cabin and

come to the Deck (तुमच्या केबिनमध्यें असलेली लाइफ जॅकेट घालून डेकवर या.) अपघाताच्या वेळीं उपयोगी पडणारं लाईफ-जॅकेट कसं घालायचं याचं शिक्षण प्रत्येक प्रवाशाला घ्यावंच लागतं, पण हें सारं दुसऱ्या, तिसऱ्या दिवशीं करतात असं मी ऐकलं होतं, तथापि आतां विचार करायला किंवा कोणाला विचारायला सवड नव्हती. सर्व उतारू धांवतच आपल्या केबिनकडे गेले. आणि लाईफ जॅकेट घालीत घालीतच डेकवर आले. मीहि त्यांतच होतों. एका स्टुअर्डनं तें कसं बांधायचं असतं हें दाखविलं आणि पांच मिनिटांतच ही 'ड्रिल' आटोपली, तोंच चहाची वेळ झाल्याचं लाऊडस्पीकरमधून सांगण्यांत आलं. पहिलाच दिवस असल्यामुळं प्रत्येक गोष्ट लाऊडस्पीकरमधून सांगितली जात होती. चहा-कॉफी, केक-बिस्कीटं पुढ्यांत आणून ठेवण्यांत आलीं आणि हें सारं आटोपलं, तोंच बोट विलक्षण हलूं लागल्याचं सर्वांच्याच लक्षांत आलं. कठड्याजवळ उभंहि राहतां येईना म्हणून आम्ही डेकवरच्या खुर्च्यांवर येऊन बसलों तों एक विलक्षण घटना घडत असल्याचं दिसलं, अगदीं एखाद्या कादंबरींत शोभेल अशी !...

आतांपर्यंत सुमारें दीड, पावणे दोन तास पश्चिमेकडे तोंड करून जाणारी आमची बोट पुन्हां पूर्वेकडे तोंड करून चालूं लागली होती ! मी मनांत म्हटलं, 'हें आहे तरी काय ? आपण पूर्वेकडे कुठें निघालों आहों ?' बोटीतल्या डेकवर उभ्या असलेल्या सर्व उतारूंच्या लक्षांत ही गोष्ट आली आणि पांच दहा मिनिटांतच केबिनमध्यें विश्रांति घेत पडलेल्या उतारूंनाहि ती कळली. सारे उतारू पुन्हां डेकवर आले आणि मग समजलं कीं, इंजिनांत कांही बिघाड झाल्याचं लक्षांत आल्यामुळं बोट पुन्हा मुंबईला परत निघाली आहे ! बोटींत कोणतीहि माहिती हवी असेल तर ती देण्यासाठी जो 'ब्यूरो' आहे, तेथेंहि अनेकांनी चौकशी केली, तेव्हां त्यांना समजलं, कीं बोट मुंबईला परत निघाली आहे. आश्चर्य असं, कीं प्रत्येक बारीक-सारीक गोष्टहि लाऊड-स्पीकरवर सांगितली जात असतांना या महत्त्वाच्या गोष्टीबद्दल मात्र एक शब्दहि लाऊड स्पीकरवर सांगण्यांत आला नाही ! बोटीवरील प्रवाशामध्यें विनाकारण भीतीचं वातावरण निर्माण होईल म्हणूनच बोटीवरील अधिकाऱ्यांनी ही सावधगिरी घेतली होती कीं काय कुणास ठाऊक ?

पण आपण खरोखरच मुंबईस परत चाललों आहे याबद्दल मग कुणालाच शंका उरली नाही, कारण थोड्या वेळापूर्वी अदृश्य झालेल्या टेकड्या पुन्हां अंधुकपणें

दिसूं लागल्या, कुलाब्याची दांडी पुन्हां जवळ येऊं लागली, युनिव्हर्सिटी टॉवर, हायकोर्ट, सेक्रेटरीएट, अफगाण चर्च पुन्हां स्पष्ट होऊं लागलं आणि इंग्लंडला न पोचतांच इंग्लंडहून परत येतांना कसं वाटेल याचाहि मोठा विचित्र अनुभव घेतां आला! हळूहळू बोट मुंबईच्या बंदरांत आली आणि अखेर समुद्रांत सुमारें तीन मैल अांत उभी राहिली तेव्हां रात्रीचे आठ वाजायला आले होते आणि लक्षावधि विद्युद्दीपांनीं उजळलेली मुंबई नगरी दृष्टिसमोर उभी होती!

आम्ही खरोखरच मुंबईत परत आलों होतों. आजपर्यंत विमानांच्या इंजिनांत बिघाड झाल्यामुळं तीं विमानतळावर परत आल्याचीं किंवा कुठें तरी अज्ञात ठिकाणीं उतरल्याचीं उदाहरणं अनेकांना माहित होतीं, पण बोटीच्या इंजिनांत बिघाड होऊन इंग्लंडच्या प्रवासाला निघालेली बोट परत आल्याचं कुणाच्या ऐकिवांत नव्हतं, पण आतां तेंहि घडलं होतं...

कदाचित् पुन्हां आपल्याला धक्क्यावर उतरायला मिळेल म्हणून अनेक लोकांप्रमाणेंच मलाहि आनंद झाला होता. मला निरोप द्यायला आलेली माझी पत्नी व मुलगा गिरगांवांत ज्या ठिकाणीं उतरलीं होतीं त्याठिकाणीं मी असा अवेळीं गेलो तर त्यांना आश्चर्याचा केवढा धक्का बसेल आणि आनंद होईल या विचारांशीच मग किती वेळ तरी माझं मन चाळा करीत राहिलं. "घरीं जायचं झालं तर टॅक्सीपुरतेहि पैसे माझ्याजवळ नाहींत" असं एकजण म्हणाले तेव्हां सगळ्यानांच मोठी मौज वाटली, कारण हिंदी नाण्यांचा आतां उपयोग होणार नाही म्हणून बहुतेक सर्वांनींच आपल्या जवळचे पैसे निरोप द्यायला आलेल्या माणसांजवळ परत दिले होते...

पण पुन्हां धक्क्यावर उतरण्याचा मुळीं प्रश्नच आला नाही. इंजिनाची दुरुस्ती होईपर्यंत बोट समुद्रांतच उभी राहील, प्रवाशांना खालीं उतरतां येणार नाहीं असं सांगण्यांत आलं तेव्हां सारे तर्क-कुतर्क थांबले आणि केव्हां एकदां हें दुरुस्तीचं काम संपतं आणि बोट पुन्हां सुरू होते असं सर्वांना झालं. कोणी म्हणत, दुरुस्ती आटपायला दोन-तीन दिवस तरी लागतील; कोणी म्हणत, उद्यां दुपारच्या आंत दुरुस्तीचं काम नक्की संपेल. नक्की माहिती कुणालाच नव्हती. प्रवासाच्या सुरुवातीसच असा अपशकुन व्हायला नको होता असं अनेकजण म्हणत होते. "माझ्या आयुष्यांतली प्रत्येक महत्त्वाची गोष्ट शनिवारीं घडली आहे. तेव्हां आपल्या या प्रवासालासुद्धां शनिवारींच सुरुवात होणार आहे"... असं एक अनुभवी गृहस्थ म्हणाले ते कांहीं लोकांना फारसं आवडलं नाहीं, कारण

याचा अर्थ आणखी दोन दिवस इथं समुद्रांत राहावं लागणार असा होता...

आणि आश्चर्य असं कीं खरोखरच तसं झालं. बोटीच्या इंजिनांत जो बिघाड झाला होता, ती दुरुस्ती शनिवारी सकाळीं संपेल, मग १०–१५ मैल ट्रायल घेतली जाईल आणि नंतर बोट सुटेल असं एक अधिकारी म्हणाले होते तेंच अखेर खरं झालं. या सर्व प्रकारामुळं शुक्रवारचा सबंध दिवस मोठ्या अस्वस्थ मनःस्थितींत गेला. बाहेर झिमझिम पाऊस पडत होता, आकाशांत पावसाचे आणि मनोवितानांत निराशेचे ढग जमले होते. सारं वातावरण कुंद झालं होतं, गप्पांना रंग चढत नव्हता, अजून नीटसा परिचय न झाल्यामुळं संभाषणांत मोकळेपणा येत नव्हता आणि सारं लक्ष लागलं होतं तें बोट कधीं सुटणार या एकाच गोष्टीकडे. कोणतीहि नवी गोष्ट दृष्टीला पडत नव्हती.

नाहीं म्हणायला मुंबई राज्यांत राहाणाऱ्यांच्या मात्र एक गोष्ट फार दिवसांनी दृष्टीस पडत होती. ती म्हणजे इथं चाललेलं मनसोक्त मदिरापान. बोटीच्या चवथ्या मजल्यावर लायब्ररी रूम, स्मोकिंग रूम आणि मोकळे, विस्तीर्ण डेक जसे आहेत तसं मदिरागृहहि आहे. मुंबईच्या बाहेरून आलेले अनेक प्रवासी या मदिरागृहांत शिरून मनसोक्त पान करीत होते. पण मुंबई प्रांतांतले अनेकजणहि बरेच दिवसांत न मिळालेलं हें पेय चाखून पाहात होते, इतरांना आग्रह करीत होते. मी सरकारी नोकर आहे हे आतां माहित झालेले एक गृहस्थ मुद्दामच मला म्हणाले,

"इथं कांहीं मोरारजींचं राज्य नाहीं आतां, चला तुम्ही आमच्याबरोबर...!"

त्यांच्या बोलण्यांतला अभिप्राय लक्षांत येतांच मीहि म्हटलं,

"दारूच काय पण चहाला सुद्धां मी कधीं शिवत नाहीं. मद्यपान जीवनाला आवश्यक आहे असं मला मुळींच वाटत नाहीं. येवढंच नव्हे तर समाजांतून एका भयंकर व्यसनाची हाकालपट्टी आमचं सरकार करीत आहे, याचा मला मोठा अभिमान वाटतो."

"मग उद्या इंग्लंडांत कसं चालेल तुमचं 'ड्रिंक' घेतल्याशिवाय?..." मला पेचांत टाकण्याच्या हेतूनं ते मुद्दामच म्हणाले असावे.

"इंग्लंडांत राहूनहि मद्यपान न करतां परत आलेलीं माणसं मला माहित आहेत. खुद्द इंग्लंडांतहि मद्यपान न करणारीं माणसं आहेत, आणि इतकंहि करून मद्यपान केल्यावांचून इंग्लंडांत राहतांच येत नाहीं असं मला दिसून आलं तर पहिल्याच विमानानं मी हिंदुस्थानला परत येईन..."

ते गृहस्थ माझ्याकडे पहात राहिले, तसा मी म्हणालों,

"तुमचा यावर विश्वास बसत नसेल तर पुढल्या वर्षी इंग्लंडहून परत आल्यानंतर मी तुम्हांला खात्रीनं भेटेन आणि सांगेन माझे अनुभव तुम्हांला."

ते गृहस्थ कांहीं न बोलतांच निघून गेले. त्यांच्या दृष्टीनं मोठा अरसिक माणूस होतों मी !

सबंध दिवस माणसं उगीचच डेकवरून फिरत होतीं, गप्पा मारीत होतीं, खात होतीं, पीत होतीं ! पण खरं सांगायचं तर कशांतच उत्साह नव्हता. प्रवासाला अजून सुरुवातहि झालेली नाहीं या विचित्र जाणीवेचं ओझं कांहीं केलं तरी मनावरून दूर करतां येत नव्हतं. बोटीवर भारताच्या साऱ्या भागांतून आलेलीं माणसं आहेत. इथं मुकर्जी आहेत तसे चतर्जी आहेत, प्रसाद आहेत तसे शास्त्री आहेत, स्वामी आहेत तसे गोस्वामी आहेत, सिद्दिकी आहेत तसे महंमद आहेत, पटेल आहेत तसे शहा आहेत. शुद्ध मराठी बोलणाऱ्यांची संख्याहि कांहीं कमी नाहीं. मुंबईचे डॉ. निंबकर आहेत, पुण्याचे वडगांवकर आहेत, इचलकरंजीचे मराठे आहेत, बँक ऑफ इंडियाचे लिमये आहेत, मुंबईच्या सिद्धार्थ कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य दळवी आहेत, गोव्याचे पाणंदीकर आहेत, मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌चे रानडे आहेत. पुरुष आहेत तशा स्त्रियाहि आहेत, आणि छोटीं छोटीं दहा-पंधरा मुलं तरी डेकवर शिवाशिवीचा खेळ सदैव खेळत असतात. विश्वविद्यालयाच्या अखेरच्या परीक्षांत घवघवीत यश मिळविलेले विद्यार्थी इथं आहेत, तसा इंटर सायन्सला कमी मार्क मिळाल्यामुळं इंजिनियरिंग कॉलेजांत प्रवेश न मिळालेला पदवी–पूर्व शिक्षणासाठीं इंग्लंडला निघालेला अठरा वर्षांचा विद्यार्थीहि इथं आहे. आपल्या चार पांच वर्षांच्या मुलीला आणि आईला बरोबर घेऊन इंग्लंडला बॅरिस्टर होण्यासाठीं निघालेल्या एक बंगाली भगिनी इथं आहेत, तसंच नवीनच उद्‌भवलेल्या कांहीं शारीरिक विकृतीमुळं सहकुटुंब सहपरिवार इंग्लंडला जायला निघालेले एक गृहस्थ इथं आहेत आणि शक्य तर तिथंच स्थायिक होण्याचाच त्यांचा विचार चालू आहे. बोटीवर असलेल्या प्रवाशांपैकीं बहुसंख्य विद्यार्थी आहेत. कोणी वैद्यकीय, कोणी बँकिंगच्या, कोणी कृषिविषयक, कोणी व्यवसायशास्त्राच्या, कोणी पशुसंवर्धनाच्या, तर कोणी विमाशास्त्राच्या उच्च शिक्षणासाठीं जात आहे, पण अर्थशास्त्राचं आणि इंजिनियरींगच्या निरनिराळ्या शाखांचं शिक्षण घेण्यासाठीं निघालेल्या विद्यार्थ्यांची संख्याच सर्वांत अधिक आहे.

या सर्वांचा परस्पर परिचय आपोआपच होत गेला. डेकवरील शेजारच्या खुर्चीवर बसलेल्या माणसाची प्रत्येकजण मोठ्या आस्थेनं चौकशी करतो आणि आपली माहिती त्याला सांगतो. हे सर्व होतां होतांच अखेर मुंबईच्या बंदरांतला दुसरा दिवसहि संपत आला आणि बोट शनिवारी सकाळी सुटणार अशी नक्की बातमी सर्वत्र पसरली. सकाळीं सहा वाजतां बिछान्यांतच मिळणारा चहा (किंवा कॉफी), आठ वाजतां मिळणारी भरपूर न्याहारी, दहा वाजतां डेकवर फिरून किंवा रमी, ब्रिज, पिंगपाँग, रिंग टेनिस खेळून झाल्यावर मिळणारं आईस्क्रीम, दुपारी साडेबाराला मिळणारं लंच, चार वाजतां डेकवर मिळणारा चहा–कॉफी–बिस्किट–केक, सहा वाजतां 'त्या' पेयासाठीं मिळणारे खारे शेंगदाणे आणि वेफर्स, रात्रीं आठाला मिळणारं जेवण आणि दहा वाजतां झोंपायला जाण्यापूर्वी मिळणारी गरमागरम कॉफी आणि चीज व टॉमॅटो सॅन्डविचिस् असा खाण्या-पिण्याचा भरघोस कार्यक्रम दिवसभर चालू झाला होता......

आणि अखेर शनिवारी सकाळीं नऊ वाजतां बोटीनं मुंबई बंदर सोडलं तेव्हा सारा निरुत्साह मावळला. पुन्हा एकदां सारी माणसं डेकवर जमा झालीं आणि योगायोगानं पुन्हां एकदां दृष्टीस पडलेली मुंबईतील ती परिचित दृश्यं पुन्हां दिसणार नाहींत म्हणून आधाशीपणानं पाहूं लागलीं. युनिव्हर्सिटीचा टॉवर, हायकोर्ट, सेक्रेटरीएट, अफगाण चर्च आणि अखेर कुलाब्याची दांडीहि पुन्हां दिसेनाशी झाली तशी सारी माणसं उत्साहानं पुन्हां खेळूं लागली, फिरूं लागली, वाचनालयांत बसून वाचूं लागली, आणि गप्पांना नवा रंग भरूं लागला. तथापि एकंदरींत डेकवरील आराम खुर्चीवर बसून वाचणाऱ्यांचीच संख्या अधिक होती. टॉलस्टॉयची 'ॲना कॅरेनिना,' टागोरांची 'गीतांजलि,' मुल्कराज आनंदची 'टू लीव्हज् ॲंड ए बड्,' हेमिंगवेची 'ओल्ड मॅन ॲंड दि सी,' डॉ. राधाकृष्णन् यांची 'भगवद्‌गीता,' बर्नार्ड शॉचं 'गेटिंग मॅरिड,' इब्सेनचं 'डॉल्स हाऊस' या पुस्तकांच्या बरोबरच पेंगविन् सीरीजमधील छोटीं छोटीं स्वस्त मिळणारीं पुस्तकं, वाचनालयांतनं आणलेल्या गुप्त हेरांच्या कथा आणि कादंबऱ्या खुर्ची–खुर्चीत उघडलेल्या दिसत होत्या, लाऊड स्पीकरमधून बारीक सारीक गोष्टी सांगितल्या जात होत्या, सकाळची न्याहारी, दुपारचं आणि रात्रीचं जेवण यांची सूचना देणारा बिगुल वाजत होता आणि साऱ्या जीवनक्रमाला यांत्रिक स्वरूप येऊं लागलं होतं. दुपारीं डेकवर बसल्या बसल्या कांहींजण भविष्य जाणण्यासाठीं आपले हात बंगालचे प्रसिद्ध शिल्पकार कमल रॉय यांना दाखवीत होते. हें पाहून त्यांच्या शिल्पकला

ज्ञानाबरोबर त्यांच्या हस्तसामुद्रिकाच्या ज्ञानाचं अनेकांना आश्चर्य वाटलं, पण रात्रीं जेवणानंतर त्यांनीं कल्याण, तोडी, मालकंस इत्यादि राग वाद्यांच्या साथीशिवाय म्हणून दाखविले तेव्हां त्यांच्याबद्दलचं कौतुक शिगेला पोंचलं. रॉय यांच्या अभिजात संगीत-गायनानंतर पुण्याच्या सौ. आगरकर यांनीं माडगुळकरांची भावगीतंहि आपल्या सुरेल आवाजांत म्हटलीं तेव्हां आपण पुन्हां आपल्या मराठी मायबोलीच्या प्रदेशांत आलों आहों, असा भास अनेकांना झाला.

हें सारं दुसऱ्या दिवशीं रात्रीं आठ वाजतां कराची येईपर्यंत चाललं होतं. जेवणाच्या आणि न्याहारीच्या सोयीसाठीं तयार करण्यांत आलेले चार चार जणांचे गट आतां निरनिराळे बेत करण्यांत गुंतलेले दिसत होते. मी ज्या गटांत आहे त्यांत मुंबईच्या के. ई. एम्. हॉस्पिटलमध्यें काम करणारे निमकर, सातोसकर आणि हजारी हे तीन डॉक्टर आहेत. आम्हांलाहि कराची शहर पाहायची उत्सुकता होती, म्हणून पासपोर्ट दाखवून खालीं उतरण्याचा पास आम्ही घेऊन ठेवला. जवळजवळ ३६ तासांनीं पुन्हां जमीन दृष्टीस पडूं लागली होती. बाहेर पाहिलं कीं सगळीकडे आतांपर्यंत पाणीच पाणी दिसत होतं, त्याऐवजीं आतां थोड्या अंतरावर कां असेना, जमीन निश्चित आहे याची खात्री पटत होती. आकाशांत छोटे छोटे काळे ढग तरंगत होते, त्यामुळंच कीं काय पाण्याला दाट काळा रंग चढल्यासारखा वाटत होता. किंबहुना, या पाण्याच्या रंगाची गंमत सकाळपासून मी पाहात होतों, तसतसा या पाण्याचा रंग तरी कोणता याचं कुतुहल माझ्या मनाला वाटत होतं. सकाळीं सूर्याचे किरण त्याच्यावर पडले तेव्हां तें हिरवं आहेसं मला वाटलं, दुपारीं सूर्यप्रकाशांत तें निळं असलं पाहिजे असं मी म्हटलं आणि संध्याकाळीं आकाशांत ढग दिसूं लागल्यावर त्याचा रंग काळसर झालेला मला दिसला. वास्तविक पाणी निळं नव्हतं, हिरवं नव्हतं आणि काळंहि नव्हतं. त्याला कदाचित् कसला रंगहि नसेल, पण आकाशाचा रंग त्यानं आपल्या पोटांत घेतला होता. खाण तशी माती असं म्हणण्याचा प्रघात आहे, पण सबंध दिवसांत दिसलेले हे पाण्याचे रंग पाहून मला वाटलं, कीं एक नवी म्हणहि तयार करतां येईल—जसं आकाश, तसं पाणी !

अखेरीस रात्रीं आठाच्या सुमारास कराचीच्या धक्क्याला आमची बोट लागली तेव्हां आम्ही भोजनगृहांत शिरलों आणि सकाळीं न्याहारी आटोपून शहर पाहायला जायचं ठरवीत मग थोड्या वेळानं बिछान्यावर अंग टाकलं. दुसऱ्या दिवशी अकरा वाजेपर्यंत शहर पाहायला जाणाऱ्यांनी परत आलं पाहिजे असा बोर्ड लाव-

ण्यांत आला होता. तो पाहून मी मनांत म्हटलं, 'दोन अडीच तासांत जेवढं पाहातां येईल तेवढं पाहून घेतलं पाहिजे. अशी संधि पुन्हां कधीं येईल कीं नाहीं कुणास ठाऊक?'

तुमचा,

वि. वा. पत्की

: २ :

## पाकिस्तानचं अंतरंग

★

‘ सिलिसिया ’
एडन–पोर्टसैद् प्रवास
२१ सप्टेंबर, १९५५

प्रिय बाळासाहेब,

कराची शहर पाहायला जायचं आम्ही ठरविलं खरं, पण कराचींत जाऊन काय पहायचं याची फारशी माहिती कुणालाच नव्हती. आम्हीं सगळेजणच कराचींत नवीन होतो. त्याशिवाय शहराचा विस्तार केवढासा मोठा आहे आणि सबंध शहर दोन अडीच तासांत पाहून कसं संपवायचं हाहि आमच्या पुढें प्रश्न होताच. शेवटीं आम्ही ठरविलं कीं, धक्क्यावर उतरून थोडंसं चालत जायचं आणि एखादी टॅक्सी मिळाली कीं ती ठरवून सबंध शहर पाहून घ्यायचं.

पण धक्क्यावरून आम्ही गांवाच्या दिशेनं चालूं लागलो तो टॅक्सीच दिसेना. एक पिवळ्या रंगाची टॅक्सी येवढ्यात भरकन् निघून गेली. तेव्हां आम्ही म्हटलं कीं, इथं पाकिस्तानांत सुद्धां भाड्याच्या टॅक्सीनां पिवळा रंग देण्याची पद्धत असावी. तेव्हां तशीच टॅक्सी दृष्टीस पडेपर्यंत चालण्यावांचून गत्यंतर नव्हतं. जेवणाच्या टेबलासाठीं निंबकर, सातोसकर, हजारी हे तीन डॉक्टर आणि मी यांचा जो गट तयार झाला होता तेच आम्ही चौघेजण शहर पाहायला म्हणून निघालों होतों. दोन अडीच फर्लांग चालल्यानंतर गेट–वे–ऑफ इंडिया सारखा दिसणारा एक फारच छोटा दरवाजा दिसूं लागला, येवढ्यांत आम्हांला कुणीतरी सांगितलं, कीं त्या ठिकाणीं गेलं कीं बाहेरच्या बाजूला भाड्याच्या टॅक्सीज् हव्या तेवढ्या मिळतात.

अखेरीस ‘ गेट–वे–ऑफ्–पाकिस्तान ’ (हें नांव आतां आम्हीच दिलं होतं!)

ओलांडून आम्ही आंत आलों तो पिवळ्या रंगाची एकहि टॅक्सी तिथं उभी नव्हती. पाकिस्तानांत अनेक गोष्टींचं दुर्भिक्ष असल्याचं आम्ही ऐकलं होतं, त्यांत टॅक्सी ही वस्तूदेखील असेल अशी आमची कल्पना नव्हती, पण आम्हांला हवी असलेली पिवळ्या रंगाची टॅक्सी दिसेना तेव्हां कदाचित हा रहदारीचा रस्ता नसेल आणि म्हणून या बाजूला टॅक्सींची ये–जा होत नसेल किंवा पाकिस्तानांत भाड्याच्या टॅक्सीनां पिवळा रंगच देत नसतील असं स्वतःचं समाधान करीत समोर उभ्या असलेल्या बसकडे आम्ही वळलों. टॅक्सी मिळाली नाहीं तर बसनं गावांत जायचं आणि एखादी टॅक्सी मिळवायची असा बेत येवढ्यांत बोलतां बोलतां आम्ही केला होता, पण आमची पावलं बसच्या दिशेकडे वळलीं तोंच एक टॅक्सीवाला आमच्या जवळ येत म्हणाला,

'टॅक्सी पाहिजे काय, साहेब?' आपल्या टॅक्सीकडे अंगुलिनिर्देश करीत त्यानं आम्हांला कुठें जायचं आहे, किती वेळ टॅक्सी पाहिजे, सबंध शहर पाहायचं तर किती वेळ लागेल, "तुम्हाला क्लिफ्टन पार्क, बोल्टन मार्केट, म्युझियम, गांधी पार्क सारं दाखवून आणतों" हें सारं सांगितलं आणि शेवटीं म्हणाला, "प्रत्येकाचे पांच रुपये द्या. अकराच्या आंत सारं दाखवून परत आणतों." दोन तासासाठीं त्यानं सांगितलेले पैसे आम्हांला फार वाटले, तरी कराचींत काय काय पाहाण्यासारखं आहे हें न विचारतांच आम्हांला समजलं आणि त्याचा फायदा घेऊन मी म्हटलं,

"बस्? येवढंच कराचींत पाहाण्यासारखं आहे?"...

"आणखी आहे साहेब. सदर बाजार आहे, जीनांची कबर आहे, विमानतळ आहे... पण सगळया ठिकाणी जायचं म्हटलं तर तुमची बोट सुटून जाईल, साहेब!...

चौघांचे वीस रुपये द्यायचे म्हणजे थोडं जिवावरच आलं. टॅक्सी सोडावी तर वेळ फुकट जातो, धरावी तर वीस रुपये अधिक वाटतात अशा पेंचांत आम्ही सांपडलों होतों, तोंच समोर पुन्हां बस येऊन उभी राहिली आणि एका क्षणाचाहि विचार न करतां आम्ही बसमध्यें चढलों. हातचं गिऱ्हाईक आतां चाललं हें पाहून टॅक्सीवाल्यानं अखेर म्हटलं 'चार चार रुपये द्या प्रत्येकाचे.'

पण एवढ्यांत बस सुरू झाली होती. डॉक्टर निंबकरांच्या जवळ कंडक्टर आला होता आणि तिकिटं काढण्यासाठीं त्यांनीं एक रुपया त्याच्या हातावरहि ठेवला होता. एखादी अद्‌भुत वस्तु हातांत पडली म्हणजे ज्या कुतुहलानं मनुष्य तिच्याकडे पाहील त्याच औत्सुक्यानं कंडक्टरनं त्या चलनाकडे पाहिलं आणि तो म्हणाला,

"ही रुपयाची नोट इथं चालणार नाहीं!..." पाक रुपयाचं अवमूल्यन झाल्याची बातमी आतां बरीच शिळी झाली होती आणि पाकिस्तानांत भारतीय रुपये मोठ्या खुषीनं घेतले जातात असं कालपासून अनेक लोक बोलल्याचं आम्हांला माहीत होतं, त्यामुळं भारतीय नाणीं बदलून पाकिस्तानी नाणीं घेण्याची आवश्य-कताच आम्हांला वाटली नव्हती. ती वाटली असती तरीहि बोटीवर तीं नाणीं मुळींच मिळत नव्हतीं आणि ती बदलून मिळणारीं ठिकाणं कराचींत असलींच तर अजून दूर होतीं, त्यामुळं ही रुपयाची नोट चालणार नाहीं असं कंडक्टरनं म्हणतांच पुढच्या स्टॉपवर बसमधून उतरणं हाच (सभ्य माणसांना शोभण्या-सारखा!) एक मार्ग आम्हांला मोकळा होता!

बसमधून उतरल्यानंतर 'पुढें काय' हा प्रश्न उभा राहाणार होता, पण बस-मधून आम्ही उतरलों ते नेमके रिक्शा स्टँडवर. बोटीमधून उतरून टॅक्सी-स्टँडपर्यंत येई पावेतों उंटांच्या आणि गाढवांच्या गाड्याप्रमाणेंच पुण्यांत सर्रास दिसणाऱ्या ऑटोरिक्शासारख्याच रिक्शा आमच्या दृष्टीस पडल्या होत्या, पण अजूनपर्यंत तरी टॅक्सींतूनच फिरायचा बेत मनांत घोळत असल्यामुळं रिक्शा-बद्दल आम्ही चौकशीहि केली नव्हती, परंतु बसमधून खाली उतरल्यानंतर रिक्शामधून गांव पाहाण्याची कल्पना सुचली आणि मला तर ती कल्पना फार आवडली. बंद टॅक्सीमधून सबंध गांव नीटसं दिसणार नव्हतं, त्याऐवजीं उघड्या रिक्शामधून फिरलं तर साऱ्या गांवाची नीट कल्पना येईल, या विचारानं अखेर प्रत्येकाचे तीन तीन रुपये द्यायचे ठरवून आम्ही रिक्शांत बसलों आणि आमच्या दोन्ही रिक्शा कराची शहरांतून भरधांव धावूं लागल्या. येणारी प्रत्येक मोठी इमारत कसली आहे, फुटणारा रस्ता कुठें जातो हे सारं आमचे मुसलमान रिक्शावाले मोठ्या आस्थेनं सांगत होते. किंबहुना आम्हीं सारे मुंबईहून आलों आहों हें कळतांच त्यांना एक प्रकारची विलक्षण आपुलकी वाटली असावी, कारण तेहि पूर्वी मुंबईत आणि हैद्राबादेंत होते, असं त्यांच्याच बोलण्यावरून समजलं होतं आणि आपल्या गांवांत आलेल्या या "मेहमानां" ना जेवढं कांहीं दाखवितां येईल तेवढं दाखविलं पाहिजे आणि त्यांच्या पैशाचा जास्तीत जास्त मोबदला दिला पाहिजे अशा धोरणानं ते वागत होते. ही अनोळखीं माणसं आहेत, तेव्हां त्यांना लुबाडावं अशी त्यांची वृत्ति दिसली नाहीं, त्यामुळं कराची शहरांतलं जेवढं कांहीं दाखवितां येण्यासारखं होतं तेवढं त्यांनी मोठ्या खुषीनं दाखविलं.

प्रथम त्यांनी आम्हांला नेलं तें क्लिफ्टन भागांत. हा भाग कराची शहरापासून

अगदीं तुटलेला आहे. कराची शहर आणि क्लिफ्टन वसाहत यांना जोडणारा सुमारें दोन–अडीच मैलांचा जो चकचकीत, डांबरी रस्ता आहे त्यावरून जातांना पोटांतलं पाणीसुद्धां हालत नव्हतं, पण मधून मधून जे वाळूचे लोट येत होते त्यापासून डोळ्यांचं संरक्षण करतां करतां पुरेवाट होत होती. किंबहुना, सारं कराची शहरच वाळूवर वसलेलं उघड दिसत होतं. कराचीतल्या ( आणि पाकिस्तानांतल्या ) हरघडी बदलणाऱ्या राजकीय वातावरणाचं वर्णन राजकारणी मुत्सद्यांनीं The Shifting Sands of Sind या शब्दांनीं केलेलं आहे तें किती अन्वर्थक आहे हें या कराचीतल्या रस्त्यांवरून वाळूच्या लोटांना तोंड दिल्याशिवाय कळायचं नाहीं, पण एकदां या दिव्यांतून बाहेर पडून क्लिफ्टन वसाहतीत प्रवेश केला कीं, माणसाचं मन प्रसन्न झाल्यावांचून राहायचं नाहीं. ठेंगण्याच पण सुबक इमारती अंतरा—अंतरावर उभ्या आहेत. प्रत्येक इमारतीच्या परिसरांत लहान मोठ्या बागा आणि त्यांत फुललेलीं विविध रंगांची फुलं मोठ्या उल्हासानं डुलत आहेत, हें दृश्य मोठं आकर्षक आहे. या वसाहतींतून जाऊं लागल्याबरोबर निरनिराळ्या इमारतींवर निरनिराळ्या राष्ट्रांचीं निशाणं डौलानं फडकतांना दिसतात. त्यावरून परराष्ट्रीय वकीलातीचा हा भाग आहे हें कुणी सांगावंहि लागत नाहीं. एका इमारतीवर भारतीय राष्ट्रध्वजहि फडकतांना दिसला आणि पाकिस्तानांतले एक मुत्सद्दी सुऱ्हावर्दी यांच्या नांवाची पाटीहि एका बंगल्यावर दिसली. या सर्व वसाहतीच्या शेवटीं समुद्र किनाऱ्यावर क्लिफ्टन पार्क नांवाची सुंदर बागहि आहे. पायऱ्या पायऱ्यानीं उतरत सुमारे दोन फर्लांग आंत गेलं, कीं समोर पसरलेल्या अथांग सागराचें दर्शन घडतें आणि डोळ्यांत आलेल्या वाळूच्या कणांकडे दुर्लक्ष करूनहि या दृश्याकडे किती वेळ तरी पाहात रहायचा मोह आवरतां येत नाहीं...

पण हा मोह आम्हांला तरी आवरणं आवश्यक होतं, कारण हा भाग पाहून होईपर्यंत साडेनऊ झाले होते आणि अद्यापि पुष्कळ पाहायचं होतं. त्यामुळं या भागातनं बाहेर पडून पुन्हां गांवांत म्युझियमजवळ रिक्शावाल्यांनी आम्हांला आणलं, पण त्याचे दरवाजेच बंद होते ! ते उघडून म्युझियम पाहात आम्ही राहिलों तर आमच्या बोटीचेच दरवाजे बंद होतील ही भीति असल्यामुळं म्युझियमच्या इमारतीला एक प्रदक्षिणा घालीत आम्हीं पुन्हां रिक्शांत बसलो आणि मग गांवांतल्या गजबजलेल्या भागांत आलों. ‘सदर’ अशी पाटी असलेल्या ट्रॅम हा भागांतून जात-येत होत्या आणि ट्रॅमचा हा एकच रस्ता आहे असंही कुणीतरी

आम्हांला सांगितलं. साऱ्या ट्रॅम भरलेल्या दिसत होत्या, येवढंच नव्हे तर मुंबईतल्या लोकल गाड्यांतनं बाहेरच्या बाजूला माणसं लोंबकळत प्रवास करीत असतात तशी या ट्रॅमलाही लोंबकळत होतीं. सारे रस्ते गजबजलेले होतेच पण कां कुणास ठाऊक, लोकांच्या चालण्यांतहि बेशिस्तपणा उघड दिसत होता....

अखेर आम्ही बोल्टन मार्केटांत आलों तेव्हां तिथलं वातावरण मोठं मासलेवाईक दिसलं. लोक रस्त्यावर खुशाल मांड्या घालून बसले होते, खाद्यपेयांचीं दुकानं उघड्यावर मांडलेली होतीं, भज्यांसारखे कांहीं पदार्थ तळले जात होते आणि साऱ्या बाजाराला अगदीं अवकळा आलेली दिसत होती. क्लिफ्टन भाग पाहून माझं मन जसं प्रसन्न झालं तसा हा भाग पाहून झालं नाहीं, उलट रिकामटेकड्या लोकांची ही भाऊगर्दी पाहून पाकिस्तानांत बेकारी आणि उद्योगधंद्यांचा अभाव फार मोठ्या प्रमाणांत असावा असं अनुमान माझ्या मनानं काढलं. तासा-अर्ध्या तासांत दृष्टीस पडलेल्या दृश्यांवरून सबंध राष्ट्राबद्दल अनुमान बांधणं कदाचित् चुकीचं असेल, पण समुद्राच्या पाण्याची अगाधता किनाऱ्यावरील ओंजळींत घेतलेल्या पाण्यामुळं आली नाहीं, तरी सागरांतल्या अफाट जलाचे सारे गुणधर्म या ओंजळींतल्या पाण्यांतहि आल्यावांचून राहायचे नाहीत हें लक्षांत घेतलं म्हणजे अल्पावधींतहि दिसलेलं पाकिस्तानचं हें बाह्य स्वरुप मोठं उत्साहजनक आहे असं मला वाटलं नाहीं...

आणि याच ठिकाणीं मी वर्तमानपत्रं विकत घेतलीं तेव्हां तर माझं मन अगदीं उद्विग्न झालं. सकाळीं धक्क्यावरून निघाल्यापासून वर्तमानपत्रं कुठें मिळतील असं मी माझ्या रिक्शावाल्याला सारखं विचारीत होतों, कारण आठ सप्टेंबरला मुंबई सोडल्यापासून वर्तमानपत्रांचं दर्शनहि घडलं नव्हतं, त्यामुळं बाहेर जमिनीवर काय चाललं आहे हें जाणण्याची माझ्या मनाची उत्सुकता वाढलेली होती. नियमानं रोजचीं वर्तमानपत्रं (प्रसिद्धि खात्यांतील नोकरीमुळं सक्तीनं कां असेना!) वाचणाऱ्या माझ्यासारख्या माणसाला बातम्यांवांचून आज चार दिवस उपास घडला होता आणि म्हणून ताजं वर्तमानपत्र कधीं एकदां हातांत पडेल असं मला झालं होतं. वर्तमानपत्रं विकणाऱ्या एका दुकानदाराकडे माझा रिक्शावाला मला घेऊन गेला आणि ताजं वर्तमानपत्र मी मागितलं तसा तो म्हणाला,

'आज सारीं दैनिकं बंद आहेत.'

"आज वर्तमानपत्रं निघालींच नाहींत?" मी आश्चर्यानं त्याला विचारलं.

अगदीं तुटलेला आहे. कराची शहर आणि क्लिफ्टन वसाहत यांना जोडणारा सुमारें दोन–अडीच मैलांचा जो चकचकीत, डांबरी रस्ता आहे त्यावरून जातांना पोटांतलं पाणीसुद्धां हालत नव्हतं, पण मधून मधून जे वाळूचे लोट येत होते त्यापासून डोळ्याचं संरक्षण करतां करतां पुरेवाट होत होती. किंबहुना, सारं कराची शहरच वाळूवर वसलेलं उघड दिसत होतं. कराचीतल्या (आणि पाकिस्तानांतल्या) हरघडी बदलणाऱ्या राजकीय वातावरणाचं वर्णन राजकारणी मुत्सद्यांनीं The Shifting Sands of Sind या शब्दांनीं केलेलं आहे तें किती अन्वर्थक आहे हें या कराचीतल्या रस्त्यांवरून वाळूच्या लोटांना तोंड दिल्याशिवाय कळायचं नाहीं, पण एकदां या दिव्यांतून बाहेर पडून क्लिफ्टन वसाहतीत प्रवेश केला कीं, माणसाचं मन प्रसन्न झाल्यावांचून राहायचं नाहीं. ठेंगण्याच पण सुबक इमारती अंतरा—अंतरावर उभ्या आहेत. प्रत्येक इमारतीच्या परिसरांत लहान मोठ्या बागा आणि त्यांत फुललेलीं विविध रंगांची फुलं मोठ्या उल्हासानं डुलत आहेत, हें दृश्य मोठं आकर्षक आहे. या वसाहतींतून जाऊं लागल्याबरोबर निरनिराळ्या इमारतींवर निरनिराळ्या राष्ट्रांचीं निशाण डौलानं फडकतांना दिसतात. त्यावरून परराष्ट्रीय वकीलातीचा हा भाग आहे हें कुणी सांगावंहि लागत नाहीं. एका इमारतीवर भारतीय राष्ट्रध्वजहि फडकतांना दिसला आणि पाकिस्तानांतले एक मुत्सद्दी सुऱ्हावर्दी यांच्या नांवाची पाटीहि एका बंगल्यावर दिसली. या सर्व वसाहतीच्या शेवटीं समुद्र किनाऱ्यावर क्लिफ्टन पार्क नांवाची सुंदर बागहि आहे. पायऱ्या पायऱ्यानीं उतरत सुमारें दोन फर्लांग आंत गेलं कीं समोर पसरलेल्या अथांग सागराचं दर्शन घडतं आणि डोळ्यांत जाणाऱ्या वाळूच्या कणांकडे दुर्लक्ष करूनहि या दृश्याकडे किती वेळ तरी पाहात रहायचा मोह आवरतां येत नाहीं...

पण हा मोह आम्हांला तरी आवरणं आवश्यक होतं, कारण हा भाग पाहून होईपर्यंत साडेनऊ झाले होते आणि अद्यापि पुष्कळ पाहायचं होतं. त्यामुळं या भागातनं बाहेर पडून पुन्हां गांवांत म्युझियमजवळ रिक्शावाल्यांनी आम्हांला आणलं, पण त्याचे दरवाजेच बंद होते! ते उघडून म्युझियम पाहात आम्ही राहिलों तर आमच्या बोटीचेच दरवाजे बंद होतील ही भीति असल्यामुळं म्युझियमच्या इमारतीला एक प्रदक्षिणा घालीत आम्हीं पुन्हां रिक्शांत बसलो आणि मग गांवांतल्या गजबजलेल्या भागांत आलों. 'सदर' अशी पाटी असलेल्या ट्रॅम हा भागांतून जात-येत होत्या आणि ट्रॅमचा हा एकच रस्ता आहे असंही कुणीतरी

आम्हांला सांगितलं. साऱ्या ट्रॅम भरलेल्या दिसत होत्या, येवढंच नव्हे तर मुंबईतल्या लोकल गाड्यांतनं बाहेरच्या बाजूला माणसं लोंबकळत प्रवास करीत असतात तशी या ट्रॅमलाही लोंबकळत होतीं. सारे रस्ते गजबजलेले होतेच पण कां कुणास ठाऊक, लोकांच्या चालण्यांतहि बेशिस्तपणा उघड दिसत होता....

अखेर आम्ही बोल्टन मार्केटांत आलों तेव्हां तिथलं वातावरण मोठं मासले-वाईक दिसलं. लोक रस्त्यावर खुशाल मांड्या घालून बसले होते, खाद्यपेयांचीं दुकानं उघड्यावर मांडलेली होतीं, भज्यांसारखे कांहीं पदार्थ तळले जात होते आणि साऱ्या बाजाराला अगदीं अवकळा आलेली दिसत होती. क्लिफ्टन भाग पाहून माझं मन जसं प्रसन्न झालं तसा हा भाग पाहून झालं नाहीं, उलट रिकाम-टेकड्या लोकांची ही भाऊगर्दी पाहून पाकिस्तानांत बेकारी आणि उद्योगधंद्यांचा अभाव फार मोठ्या प्रमाणांत असावा असं अनुमान माझ्या मनानं काढलं. तासा-अर्ध्या तासांत दृष्टीस पडलेल्या दृश्यांवरून सबंध राष्ट्राबद्दल अनुमान बांधणं कदाचित् चुकीचं असेल, पण समुद्राच्या पाण्याची अगाधता किनाऱ्यावरील ओंज-ळींत घेतलेल्या पाण्यामुळं आली नाहीं, तरी सागरांतल्या अफाट जलाचे सारे गुणधर्म या ओंजळींतल्या पाण्यांतहि आल्यावांचून राहायचे नाहीत हें लक्षांत घेतलं म्हणजे अल्पावधींतहि दिसलेलं पाकिस्तानचं हें बाह्य स्वरुप मोठं उत्साहजनक आहे असं मला वाटलं नाहीं...

आणि याच ठिकाणीं मी वर्तमानपत्रं विकत घेतलीं तेव्हां तर माझं मन अगदीं उद्विग्न झालं. सकाळीं धक्क्यावरून निघाल्यापासून वर्तमानपत्रं कुठें मिळतील असं मी माझ्या रिक्शावाल्याला सारखं विचारीत होतों, कारण आठ सप्टेंबरला मुंबई सोडल्यापासून वर्तमानपत्रांचं दर्शनहि घडलं नव्हतं, त्यामुळं बाहेर जमिनीवर काय चाललं आहे हें जाणण्याची माझ्या मनाची उत्सुकता वाढलेली होती. नियमानं रोजचीं वर्तमानपत्रं (प्रसिद्धि खात्यांतील नोकरीमुळं सक्तीनं कां असेना!) वाचणाऱ्या माझ्यासारख्या माणसाला बातम्यांवांचून आज चार दिवस उपास घडला होता आणि म्हणून ताजं वर्तमानपत्र कधीं एकदां हातांत पडेल असं मला झालं होतं. वर्तमानपत्रं विकणाऱ्या एका दुकानदाराकडे माझा रिक्शावाला मला घेऊन गेला आणि ताजं वर्तमानपत्र मी मागितलं तसा तो म्हणाला,

'आज सारीं दैनिकं बंद आहेत.'

"आज वर्तमानपत्रं निघालींच नाहींत?" मी आश्चर्यानं त्याला विचारलं.

" होय, " तो म्हणाला, " काल कायदे—आझम जीनांची पुण्यतिथि होती त्यामुळं सगळ्या वर्तमानपत्रांचीं ऑफिसं बंद होतीं. कालचे अंक पाहिजे तर देतों. चालतील ? "...

"Any port in storm" असं मनांत म्हणत मी 'पाकिस्तान टाईम्स' आणि 'कराची टाईम्स' चे दोन अंक विकत घेतले आणि ते उघडीत उघडीतच रिक्शांत येऊन बसलों, कारण धक्क्यावर येण्याची आतां घाई झाली होती. वाटेंत पांच मिनिटांत 'गांधी गार्डन' आम्ही पाहिली. मुंबईच्या व्हिक्टोरिया गार्डन्सच्या मानानं ती लहान तर वाटलीच, पण जंगली जनावरांचे अनेक पिंजरे रिकामेहि दिसले, तेव्हां त्यांच्यावरील सावधगिरीच्या सूचना देणारे ते फलक वाचून मोठी गंमत वाटली !

थोड्या वेळांतच आमच्या रिक्शा धक्क्यावर आल्या, तेव्हां अकरा वाजायला झाले होते. रिक्शावाल्यानीं आपली कामगिरी चोख बजावली होती आणि चौघांचे बारा रुपये आम्हीं त्यांच्या हातावर ठेवले तेव्हां संतुष्ट मनानं सलाम करीत त्यांनीं आमचा निरोप घेतला होता.

येवढा वेळपर्यंत कराची पाहायला गेलेले बहुतेक प्रवासी बोटीवर परत आले होते. कुणाला शहर पाहाण्यासाठीं पांच रुपये लागले होते, कुणाला आठ, कुणाला दहा! तेंच शहर आम्ही प्रत्येकानं अवघे तीन रुपये खर्च करून पाहिलं होतं. तथापि, याचं बरंच श्रेय आमच्या पाक अंतःकरणाच्या रिक्शावाल्यांना होतं. सारं शहर मला तरी मोठं आधुनिक वाटलं नाहीं. क्लिफ्टनचा स्वच्छ, आरस्पानी भाग आणि रस्त्यावर नवीन लावलेलीं छोटीं छोटीं रंगीबेरंगी फुलझाडं सोडलीं तर सारा मामला सामान्य! रस्त्यावर तर मध्यम वर्गांतलीं माणसं कुठें दिसलींच नाहींत. लोक होते ते एक तर अमीरउमराव शोभतील असे तरी होते, किंवा भुकेकंगाल, दरिद्री, फाटक्या कपड्यांतले तरी होते. कामावर जाण्याची वेळ असू-नहि स्त्री औषधालासुद्धां कुठं दिसली नाहीं.

वर्तमानपत्राच्या दोन घड्या हातावर आपटी—आपटीतच मी बोटींत पाऊल टाकलं. जेवायला जायला अजून तास दीडतास अवकाश होता, म्हणून केबिनमध्यें जाऊन मी वर्तमानपत्रं उघडून वाचूं लागलों तेव्हां मला काय वाटलं तें कसं सांगूं? सरकारी नोकर या नात्यानं मी तें न सांगितलेलंच चांगलं, पण तीं वाचून मला अगदीं संताप आला, येवढंच मी म्हणतों. पाकिस्तानचे राष्ट्रपिता म्हणून पाक वृत्तपत्रांनीं जीनांचा गौरव केला तर त्यांत त्यांना दोष देण्यासारखं कांहीं नाहीं,

कारण मुत्सद्दी म्हणून जीनांनीं भारतीय स्वातंत्र्यलढ्यांत अनेक वर्षं राष्ट्रविरोधी भूमिका घेतली होती हें जरी खरं, तरी व्यक्ति या नात्यानं, त्यांच्या अंगीं कांहीं फार मोठे सद्गुण होते असं मला तरी वाटत आलेलं आहे. पहिल्या दर्जाचे वकील म्हणून जीनांनीं कीर्ति मिळविली होती, तथापि अप्रामाणिकपणानं त्यानीं आपल्या अशिलांना कधीं फसविलं नाहीं, असं सारेजणच म्हणतात. त्यांच्या धंद्यांतील प्रामाणिकपणा (Professional honesty) बद्दल कधींतरी भारतांतील एका वृत्तपत्रानं प्रसिद्ध केलेली एक आठवण मी तरी कधीं विसरणार नाहीं. आपलं वकीलपत्र जीनांनीं घेतलं, कीं आपल्या कज्जांत यश हमखास आहे अशी खात्री पटलेल्या एका अशिलानं आपल्या कज्जाचे सारे कागदपत्र जीनांच्याकडे नेले, तेव्हां कागदपत्रांचा तो ढीग पाहून जीना म्हणाले होते, "हे सारे कागदपत्र वाचायला मला २० तास तरी लागतील. त्याबद्दल मी तासाला १०० रुपये याप्रमाणें फी येईन आणि मग ठरवीन तुमचं वकिलपत्र घ्यायचं कीं नाहीं तें!" जीनांची ही अट मान्य करून अशिलानं दोन हजार रुपये त्यांना आगाऊ दिले आणि पुन्हां दोन–चार दिवसांनीं तो परत आला. जीनांनी त्याचं वकिलपत्र घ्यायचं कबूल केलं आणि वर म्हटलं "तुमचे कागद आठ तासांतच वाचून झाले, तेव्हां उरलेले हे बाराशें रुपये तुम्ही परत घ्या." मला वाटतं, धंद्यांतल्या प्रामाणिकपणाचं याहून अधिक चांगलं उदाहरण क्वचितच दाखवितां येईल. तेव्हां अशा व्यक्तीच्या–आणि त्यांतहि एका राष्ट्राला जन्म देणाऱ्या राष्ट्रपुरुषाच्या–गुणांचं गौरव वृत्तपत्रांनीं केला तर त्यांत कांहींहि गैर नाहीं. पण त्या निमित्तानं भारतावर आणि विशेषतः पंडित नेहरुंच्यावर वृत्तपत्रांनीं जी आग पाखडली होती, नेहरुंच्या धर्मातीत धोरणाची (Secularism) जी कुचेष्टा केली होती, ती वाचून मला वाटलं, 'नेहरूंच्या धोरणाची ही प्रतिक्रिया आमच्या सामान्य वाचकांपर्यंत पोंचतच नसावी. ती पोंचली असती तर आमच्या पां. वा. गाडगीळांनी आणि ह. रा. महाजनींनींच नव्हे तर दैनिकांतल्या सहसंपादकानीं आणि स्तंभ लेखकानींहि त्यांचा खरपूस समाचार घेतला असता....' या वृत्तपत्रांत बातम्या होत्या त्याहि साऱ्या पाकिस्तानांतल्याच, जणूं वृत्तपत्रांनीं आपल्या वाचकांना कांहीं सांगावं असं जगांत घडतच नव्हतं! या साऱ्या प्रकारामुळं गेल्या चार दिवसांत मला वृत्तपत्रं मिळालीं नव्हतीं, ती आज मिळालीं हा आनंद फार वेळ टिकला नाहीं, कारण या वृत्तपत्रांनीं कांहीं नवं 'वृत्त' मला दिलंच नव्हतं, म्हणूनच अठरावीस तासांच्या मुक्कामानंतर दुसऱ्या दिवशीं आमची बोट पुन्हां एडनकडे जाण्यासाठीं

निघाली तेव्हां आणखी शहाण्णव तास जगांतल्या साऱ्या घडामोडीपासून आपण अलिप्तच राहाणार हें उघड दिसूं लागलं—

—आणि थोड्या वेळांतच मग बोटीनं कराचीचा धक्का सोडला तसा बोटीवरील जीवनाला पुन्हां प्रारंभ झाला. या जीवनांतला नवेपणा चार दिवसांच्या अनुभवानंतर आतां कमी होऊन इंग्रजी शब्दोच्चार आणि इंग्रजी संगीत यांचा सराव कानांना आतां होऊं लागला होता. समुद्र प्रवासापासून येणारा तात्पुरता आजारीपणा (Sea-sickness) आतां हळुहळू कमी होऊं लागला होता आणि प्रवासी मिळेल त्या साधनांनी वेळ घालवूं लागले होते. ब्रिज आणि रमी खेळणाऱ्या टेबलांची संख्या आतां वाढली होती, रिंग टेनिससाठीं पाळीं लावून रहावं लागत होतं, पिंगपाँगचं टेबल कधीं रिकामं राहात नव्हतं, चवथ्या मजल्यावरच्या डेक चेअर्स पुस्तकं वाचीत बसणाऱ्यांनीं अडविलेल्या दिसत होत्या, तर सहाव्या मजल्यावरील पोहण्याच्या टँक मध्यें सदा कोणी ना कोणी पोहत असलेलं दिसत होतं. ज्यांना यापैकीं कोणतंच काम नव्हतं ते डेकच्या सभोवतीं फिरण्याचा व्यायाम घेत होते आणि Eleven times round this deck equals one mile ही पाटी पुनःपुन्हां वाचीत होते. सकाळीं न्याहारी घेऊन डायनिंग सलून मधून बाहेर पडलं, कीं ताज्या बातम्या टाईप केलेला कागद नोटीस बोर्डावर दिसे. या बातम्यांत बातम्या असत त्या लंडनच्या, पॅरिसच्या, मॉस्कोच्या, बॉनच्या, वॉशिंग्टनच्या, हिंदुस्थान खेरीज जगांतल्या सर्व भागांतल्या! या पांच–सात दिवसांत हिंदुस्थानच्या बातम्या दोनदां दिसल्या त्याही कसल्या, तर इंग्लंडचे भारतांतील हायकमिशनर माल्कम् मॅक्डोनल्ड यांनीं आपलीं अधिकारपत्रं राष्ट्राध्यक्ष राजेंद्रप्रसाद यांना सादर केल्याच्या आणि भारत-पाक पंतप्रधानांचीं बोलणीं लवकरच सुरू होणार आहेत याबद्दलच्या! या बातम्यांत इंग्लंडमधील शेअर्सचे बाजारभाव आणि फुटबॉलच्या मॅचिसचे निकालहि दिले जातात, पण पूर्वेकडील बातम्या मात्र अभावानं तळपत असतात. जणूं काय बोटीवरच्या एरियलवर पश्चिमेकडचे वारे तेवढेच येऊन आदळतात आणि पूर्व दिशेकडून संदेश आणणारे वारे येऊंच शकत नाहींत! ज्या बोटीवरील बहुसंख्य प्रवासी हिंदी आहेत त्यांच्यासाठीं कांहीं केलं पाहिजे ही दृष्टीच इथं नाहीं. दिवसभर इंग्रजी संगीताच्या रेकार्डस ऐकूं येतात, पण हिंदी संगीताचं नांव नाहीं. नाहीं म्हणायला 'बाबूजी धीरे चलना, संभालना' ही (किंवा अशीच कांहींशी) एकुलती एक हिंदी चित्रपटातली एक रेकॉर्ड कधीं लहर लागलीच तर वाजविली जाते, बाकी इथून तेथून सारं कुणालाहि न समजणारं इंग्रजी संगीत! संगीता-

बद्दलच हें असं आहे असं नव्हे, रोज रात्रीं करमणुकीचे म्हणून जे कार्यक्रम होतात तेहि इंग्रजी पद्धतीचे, जुगाराच्या पंक्तीतले! कदाचित् इंग्रजी राहाणी आणि इंग्रजी आचारविचार यांचा परिचय होण्यासाठीं हें थोडं आवश्यक आहे असं मानलं तरीहि या सर्व गोष्टींचा अतिरेक पाहिला, कीं स्वतंत्र भारतानं प्रवासी वाहतुकीकडे लक्ष देण्याची वेळ खचित आली आहे असं वाटूं लागतं...

हें थोडं विषयांतर झालं खरं, पण बोटीवरच्या जीवनाची पूर्ण कल्पना येण्या-साठीं तें आवश्यक आहे असं मला तरी वाटतं. कराची ते एडन या चार दिवसांच्या प्रवासांत इंग्लंडांतील वास्तव्यांत उपयोगी पडतील अशा अनेक गोष्टी दृष्टीस पडल्या, जेवणांतील पदार्थांचीं नांवं परिचित होऊं लागलीं. आपल्या जेवणाच्या टेबलावर स्त्री असेल तरी ती आल्यावेळीं (उशिरा आली तरी!) आणि जातांना (लवकर गेली तरी!) इतरांनीं उठून (किंवा उठल्यासारखं करून!) तिचं स्वागत करायचं असतं किंवा तिला निरोप द्यायचा असतो, यासारख्या गोष्टीहि शिकतां आल्या.

या चार दिवसांत सारा जीवनक्रम अगदीं यांत्रिक झाला होता. बिगुल वाजला कीं न्याहारी, दुपारचं आणि रात्रीचं जेवण घ्यायला जायचं, रोज किंवा एक दिवसाआड अर्धा तास किंवा एक तास सांगतील त्याप्रमाणें घड्याळ मागं करायचं, पावणेचार वाजले कीं, दुपारच्या चहासाठीं स्मोकिंग रूममध्यें, शेजारच्या प्रशस्त हॉलमध्यें किंवा डेकवर जमायचं, आणि रात्रीं नऊ वाजले कीं डेकवर होणाऱ्या करमणुकीच्या कार्यक्रमासाठीं वाटलं तर जायचं, असं हें ठरलेलं, कोरीव यांत्रिक जीवन सुरू होतं...

नाहीं म्हणायला बाहेर आकाशाचं आणि समुद्राचं बदलतं स्वरूप हाच काय तो अखंड चाललेला निसर्गाचा खेळ. समुद्रांत कधीं जोराचे वारे वाहूं लागतात आणि बोट चांगलीच हालायला लागते. पाण्याला कधीं काळा तर निळा रंग चढतो आणि किनारा जवळ येऊं लागला कीं शार्क माशांची मनसोक्त चाललेली जलक्रीडा दृष्टीस पडूं लागली, कीं त्या क्रीडेकडे कितीहि पाहिलं तरी समाधान होत नाहीं. आमची बोट एडन बंदराच्या जवळजवळ येऊं लागली, तसा समुद्र इतका शांत झाला होता, कीं एखाद्या शांत तळ्यांतूनच हा सारा प्रवास चालल्यासारखं वाटत होतं आणि स्वच्छ सूर्यप्रकाशांत मोरपिसांच्या रंगाचा मऊमऊ गालिचा वाऱ्याच्या मंद झुळकीनं हलावा तसं समुद्राचं पाणी हेलावत होतं. पण या असामान्य जलसौंदर्याला विसंगत असं एडनच्या परिसरांतल्या टेकड्यांचं स्वरूप

होतं. टेकड्या कसल्या, प्रचंड खडकच होते ते ! त्यांच्यावर एकहि झाड नव्हतं कीं माणसाची वस्ती दाखविणारं कसलं चिन्ह नव्हतं, पण हळुहळू एडनचं बंदर दृष्टिपथांत येऊं लागलं, तशा शोभिवंत इमारतींच्या रांगा दिसूं लागल्या आणि कितीतरी लहानमोठीं जहाजं पाण्याच्या पृष्ठभागावर तरंगतांना दृष्टीस पडूं लागलीं. अखेर आमच्या बोटीनं एडनच्या बंदरांत नांगर टाकला तेव्हां मुलांना घरीं ठेवून गेलेल्या आईला, ती परत आलेली दिसतांच धांवत येऊन मुलांनीं बिलगावं तशा अनेक होड्या बोटीला येऊन बिलगल्या आणि इतरांच्या बरोबर मीहि धक्क्यावर जाण्यासाठीं म्हणून त्यांपैकीं एकींत उतरलों. एडन पाहायची उत्कंठा तर मनांत होती, पण एडनबद्दल अनेकांनीं सांगितलेल्या भीतिदायक हकिगतीहि मनांत तरंगत होत्या आणि आलेल्या नवख्या प्रवाशांना किती तऱ्हेनं लुबाडलं जातं आणि अखेर प्रवाशाला अनेक स्वस्त वाटणाऱ्या वस्तु विकत घेण्याचा मोह होऊन कसं पेचांत सांपडावं लागतं हें मला विसरतां येत नव्हतं. सुदैवानं, असं फसण्याचा किंवा लुबाडण्याचा प्रसंग आमच्यापैकीं कुणावरच आला नाहीं, पण इथं घडलेले अनेक प्रसंग खरोखरच सांगण्यासारखे आहेत.

तुमचा,

वि. वा. पत्की

## : ३ :

# एडन

★

‘सिलिसिया’
पोर्ट–सैद्–लिव्हरपूल प्रवास
२४ सप्टेंबर, १९५५

प्रिय बाळासाहेब,

एडन बंदर ज्या दिवशीं येणार होतं त्या दिवशीं सकाळीं न्याहारीच्या वेळींच आमच्या स्टुअर्डनं सांगितलं होतं, “साहेब, माझ्यासाठीं एक टाईम–पीस घेऊन या गावांतनं,दहा रुपयांना मिळेल.” आठ दिवस तिन्हीत्रिकाळ आम्हांला स्वादिष्ट अन्न आणून देणाऱ्या या मूळच्या गोव्यांतील ख्रिश्चन स्टुअर्डनं एडन गांवांतल्या स्वस्ताईची चुणूक त्याच्या या विनंतीनं दाखविली होती. एडन हें व्यापाराचं एक मुक्तद्वार (Open port) असल्यामुळं इथं अनेक वस्तु स्वस्त मिळतात हें बोटींतल्या साऱ्या प्रवाशांना माहित होतं, म्हणूनच ‘आगफाचा छानसा कॅमेरा घेणार आहे मी,’ ‘इथं बायनॉक्युलर किती स्वस्त मिळतात कल्पना नाहीं तुम्हांला,’ ‘मुंबईत पंधरा रुपयांनाहि न मिळणारा शर्ट इथं दहा–बारा शिलिंगांना मिळतो,’ ‘स्वित्झर्लंडचे रुबाबदार टाय लंडनच्या अर्ध्या किंमतीला मिळतात इथं, माहित आहे?’ या सारखीं चाललेलीं प्रवाशांचीं बोलणीं बोट उभी राहाण्यापूर्वीपासूनच ऐकू येत होतीं. मी ज्या गटांत होतों त्यापैकीं कुणालाच कोणतीहि ठराविक वस्तु विकत घ्यायची नव्हती हे खरं, पण एखादी वस्तु स्वस्त दिसलीच तर घ्यायची, पण मुख्यतः शक्य तेवढं फिरून सारं शहर पाहायचं या हेतूनंच बोटीला येऊन लागलेल्या छोट्या छोट्या होड्यांपैकीं एकींत आम्ही उतरलों आणि धक्क्यावर येऊन पोंचलों. मुंबई किंवा कराचीसारख्या मोठ्या बोटी लागणारा धक्का इथं नसल्यामुळं या छोट्या होड्यांनींच बंदरावर उतरावं लागतं.

पण धक्क्यावर उतरून गांवांत जाणाऱ्या कमानींतून आंत आम्ही जाऊं लागलों तसं समजलं, कीं बोटींतून खालीं उतरून पुन्हां परत जाणाऱ्या प्रवाशाला सव्वा दोन शिलिंग (म्हणजे सुमारें दीड रुपया) कर भरावा लागतो. तिकिटं आंत जातांनाच दिलीं जातात आणि परत येतांना काढून घेतात. आमच्यापुढें बरीच मोठी रांग होती त्यामुळं या ठिकाणी थोडं थांबावंच लागलं, तेवढ्यांत गांवांत जाण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या टॅक्सींच्या दराचा जो एक विस्तीर्ण फलक या ठिकाणींच लावलेला होता तो पाहिल्याबरोबरच आमच्या लक्षांत आलं, कीं मुंबई किंवा कराचीपेक्षां टॅक्सींचे दर या ठिकाणीं अधिक आहेत. मैलाला एक शिलिंग सहा पेन्स. ब्रिटिश नाण्यांशीं आतां थोडा परिचय होऊं लागला होता, तरीहि एक शिलिंग म्हणजे जवळजवळ हिंदी अकरा आणे या कोष्टकाप्रमाणें प्रत्येक जण मनांतल्या मनांत हिशेब करून पाहात होता. तथापि, महाग असली तरी टॅक्सी करण्यावांचून गत्यंतर नव्हतं, पण त्याच्या आधीं आमच्यापैकीं सर्वांनांच एका ओळखीच्या गृहस्थांना भेटायचं होतं. त्यांच्या ओळखीमुळं कुठें कुठें आणि काय काय पहायचं हें ठरवितां येणार होतं आणि एक जुने मित्रहि सर्वांना भेटणार होते.

हे गृहस्थ म्हणजे डॉ. म्हसकर. मी ज्या गटांत होतों, त्या गटांतील डॉक्टरांचे ते मुंबईच्या मेडिकल कॉलेजांतील सहाध्यायी, तर पूर्व खानदेशांतील ज्या अमळनेर गांवात मी माझ्या नोकरीच्या निमित्तानं दोन वर्षं काढलीं त्या गांवांतल्या डॉ. म्हसकरांचे हे चिरंजीव, त्यामुळं मलाहि थोडेसे परिचित. तथापि या सर्वांपेक्षां एडनची माहिती असणारे एक सद्गृहस्थ या नात्यानंच त्यांची भेट घेण्याची उत्कंठा आम्हांला होती. डॉ. निंबकर यांनीं कराचीहून निघण्यापूर्वी एअर-मेलनं एक पत्र त्यांना पाठविलं होतं आणि ते धक्क्यावर येतील असं आम्हांला वाटलं होतं, पण मोठ्या कष्टानं त्यांचं घर शोधून काढल्यानंतर त्यांच्याकडूनच आम्हांला समजलं होतं कीं निंबकरांचं पत्र त्यांना मुळीं मिळालंच नव्हतं, कारण कराचीहून आठवड्यांत फक्त दोन वेळां इथं विमानं येत होतीं. साहजिकच त्यांना पत्र मिळालं नव्हतं आणि म्हणूनच आम्ही ज्या बोटींतून उतरलों त्या बोटीलाच "क्लिअरन्स" देण्यासाठी म्हणून ते या बोटीवर येऊनहि आम्हांला भेटले नव्हते.

बोलतां बोलतां अनेक गोष्टी स्पष्ट झाल्या होत्या. इथं पिण्याच्या पाण्याचं दुर्भिक्ष कसं आहे, प्रॅक्टिससाठीं येणाऱ्या नवीन डॉक्टर—वकिलांना केवढा भरपूर वाव आहे, चैनीच्या वस्तूंपेक्षां गरजेच्या रोजच्या वस्तु केवढ्या भरमसाट भावानं घ्याव्या लागतात आणि या सर्वांपेक्षां ओळखीच्या आणि त्यांतहि मराठी भाषा

बोलणाऱ्यांची सोबत ही केवढी दुर्मिळ चीज आहे, या साऱ्या गोष्टी समजल्या होत्या. चैनीच्या वस्तु खरोखरच स्वस्त मिळतात का, असं मी मुद्दामच त्यांना विचारलं तेव्हां तर ते म्हणाले होते, "बंदरांत प्रवासी लोकांची बोट आली आहे असं कळलं, कीं बाजारांतल्या किंमती पन्नास टक्क्यांनीं वाढतात. आणि या वस्तूंचे भाव ठरवितांना जी घासाघीस करावी लागते तिची तर आपणांस कधीं संवयच नसते. एखाद्या वस्तूची पंधरा शिलिंग किंमत दुकानदारानं सांगितली तरी अखेर तो ती दहा शिलिंगानांहि देतो, पण एडनचा माहितगार असेल तर तो ती आठ शिलिंगानांच मिळवितो."

एडनचं हें 'अर्थशास्त्र' मनांत घोळवीतच आम्ही डॉ. म्हसकरांचा निरोप घेतला आणि त्यांना आमच्याबरोबर येतां येणार नव्हतं म्हणून आम्हीच शहर पाहायला निघालों. बंदरापासून सुमारें सहा मैलावर एडन शहराचा 'क्रेटर' म्हणून जो भाग आहे त्या ठिकाणीं गेलं कीं एडनची कल्पना तुम्हांला सहज येईल असं डॉ. म्हसकर म्हणाले होते म्हणून या "स्टीमर पॉईन्ट" पासूनच टॅक्सी करून आम्ही जायचं ठरविलं. कराचीप्रमाणें इथं टॅक्सी मुळीं शोधावीच लागली नाहीं. एकामागून एक भरधांव सुटलेल्या टॅक्सीज् रस्त्यावर हव्या तेवढ्या दिसत होत्या आणि नंतर आम्ही ठरविलेल्या टॅक्सीच्या ड्रायव्हरला विचारलं तेव्हां तर आम्हांला समजलं, कीं लाख–सव्वा लाख वस्तीच्या या शहरांत सुमारें आठ हजार टॅक्सीज् होत्या.

'स्टीमर पॉईंट' पासून क्रेटरकडे जसजशी आमची टॅक्सी जाऊं लागली तसा शहराचा विस्तार स्पष्टपणें दिसूं लागला, कारण क्रेटरकडे जाणारा रस्ता सपाटीवरून मुळींच जात नाहीं. किंबहुना एडन शहर हें स्टीमर पॉईंट आणि क्रेटर यांचं मिळून झालेलं असलं तरी दोन्ही भाग एका उंच टेकडीनं तुटलेले आहेत. स्टीमर पॉईंटकडून क्रेटरकडे आपण जाऊं लागलों कीं वळणा–वळणाच्या सुंदर, डांबरी रस्त्यावरून टेकडी चढत चढत वर जावं लागतं आणि टेकडीच्या वरच्या टोंकाला आलं कीं दोन प्रचंड, अजस्र खडकांच्या मधून सुमारें एक फर्लांग लांबीचा येवढा सुंदर रस्ता कोरून काढलेला दिसतो, कीं या ठिकाणापासून टेकडीच्या दोन्ही बाजूला दिसणारे शहराचे भाग सुंदर कीं या खडकांच्या मधून जाणारा हा रस्ता सुंदर असा भ्रम माणसाच्या बुद्धीला पडल्यावांचून रहात नाहीं. हा रस्ता ओलांडून जरा पुढें आलं, कीं टेकडीच्या दुसऱ्या कुशींत क्रेटर भाग पसरलेला दिसतो, त्याची शोभा तर अपूर्व वाटते. आम्ही या भागांत जात होतों

तेव्हां तर संध्याकाळचे साडेचार–पांच वाजले होते आणि सूर्याचे निमुळते किरण पडून या साऱ्या पांढऱ्या रंगाच्या इमारती अधिकच चकाकत होत्या. आमचा ड्रायव्हर उंची सिगरेट ओढीत ओढीतच मोडक्या तोडक्या इंग्रजींत या भागाची माहिती सांगत होता.

अखेर आम्ही क्रेटरच्या भर बाजाराच्या भागांत आलों आणि टॅक्सी स्टँडवर आमची टॅक्सी उभी करून थोडं पायीं फिरून यायचं ठरवलं. उभा–आडव्या रस्त्यांनीं आम्ही सुमारें अर्धा तास फिरलों. बाजारचा भाग तर बराच गजबजलेला होताच, पण पट्टयापट्टयाच्या रंगीबेरंगी टोप्या घालून भर रस्त्यावर थंड पेयांचीं दुकानं थाटून बसलेले अरब दुकानदार आम्हांला न समजणाऱ्या भाषेंत जो किलबिलाट करीत होते तो मोठा गंमतीचा वाटत होता. आम्हांलाहि तहान लागली होती, पण इथं उघड्यावर 'किट्टी कोला' पिण्यापेक्षां एखाद्या चांगल्या दुकानांत जाऊन 'कोका–कोला' घ्यायचं आम्ही ठरविलं आणि आमच्या टॅक्सी ड्रायव्हरनंहि आम्हांला एका चांगल्या दुकानांत नेलं. या ठिकाणचा चहा मोठा स्वादिष्ठ होता असं पिणारे सांगत होते, पण मी घेतलेला कोका कोलाहि खरोखरच चांगला वाटला, पण खरी गंमत झाली ती पेयांचं बिल देतांना. हिंदी नाणीं तर इथं चाललीं नाहींतच, पण दुकानदार ब्रिटिश नाणींहि घेईना! या अडचणींतून आमची सुटका केली ती आमच्या ड्रायव्हरनं.

वास्तविक आतां शहर पाहून झालं होतं आणि स्टीमर पॉईंटकडे यायला कांहीं हरकत नव्हती. बाजारांतल्या अनेक दुकानांत शिरून आणि वस्तूंचे भाव विचारून आम्ही खालीं उतरलों होतों पण आणखी कांहीं पाहाण्यासारखं असलंच तर तें राहूं नये या हेतूनं आम्ही मोडक्या तोडक्या हिंदींत आणि त्यालाहि नीटसा न समजणाऱ्या इंग्रजींत आणखी कुठें पाहण्यासारखं असेल तर 'चल' म्हटलं आणि आमची टॅक्सी रिफायनरीचा जो पांच सात मैलावरचा भाग आहे त्या रस्त्यानं भरधांव जाऊं लागली, तसं माझं मन उगीचच अस्वस्थ होऊं लागलं. एडनचे टॅक्सीवाले प्रेक्षणीय स्थळं दाखविण्याच्या निमित्तानं दूर घेऊन जातात आणि 'पेट्रोल संपलं' किंवा 'पंक्चर झालं' असं सांगून बोट चुकविण्याची वेळ आणतात आणि अडलेल्या प्रवाशांकडून भरमसाट पैसे मागून दुसरी टॅक्सी मिळवून देऊन त्यांची वाटमारी करतात, असं मला एकदोन प्रवासी लोकांनीं पूर्वी सांगितलं होतं त्याची आठवण झाली. दोन्ही बाजूला समुद्र असलेल्या निमुळत्या रस्त्यावरून मोटार तर वाऱ्याच्या वेगानं जात होती आणि हा रस्ता संपणार तरी कधीं

असं माझ्याप्रमाणेंच सातोसकरांनाहि वाटत होतं (असं ते नंतर म्हणाले) त्यामुळं रस्त्याचा मध्यभाग दाखविणारे जे सुंदर खडे (Cat's eyes) बसविलेले होते त्यांच्याकडे लक्ष देण्याच्या मनःस्थितींतच मी नव्हतों. आपण वस्तीपासून फार दूरवर जाणार आहों याची कुणालाच कल्पना नसल्यामुळं मोठ्या मनांतली भीति मी बोलून दाखविली नव्हती. तसं बोलायला मुळीं सवडच नव्हती. अखेर आमच्या मोटारनं मोठं वळण घेतलं आणि झगझगीत दिव्यांच्या वस्तीकडे मोटार वळली तसं मला जरा बरं वाटलं.

हें 'अरब टाऊन' होतं. सारीं घरं बैठीं होतीं. आतां दिवेलागणी झाली होती आणि सारा बाजारभाग गजबजलेला दिसत होता. हरतऱ्हेच्या पदार्थांचीं, खाद्यपेयांचीं, माशांचीं, मांसाचीं दुकानं ओळीनं मांडलेलीं दिसत होतीं आणि या गर्दीतून मार्ग काढतांना मोटारचा वेग कितीतरी कमी करावा लागला होता. इथं थोडा वेळ तरी थांबायचं सगळ्यांच्याच मनांत होतं, पण आतां सात वाजायला झाले होते आणि स्टीमर पॉईंटपासून आम्ही बारा मैलांवर होतों तेव्हां घाईघाईनं परत येण्यावांचून दुसरा मार्गच नव्हता.

पण स्टीमर पॉईंटवर परत आल्यानंतर आमच्या टॅक्सीवाल्यानं टॅक्सीच्या बिलाबद्दल जो घोळ घातला तो पाहून डॉ. म्हसकरांनीं 'टॅक्सीचं भाडं ठरविल्याशिवाय टॅक्सींत बसूं नका' असा दिलेला इषारा किती मोलाचा होता हें लक्षांत आलं. आम्ही भाडं ठरविलं नव्हतं असं नव्हे, पण स्टीमर पॉईंटवरून क्रेटर पर्यंत जाऊन येण्याचे आणि तिथं थांबण्याचं मिळून सुमारे १५-१६ रुपये पडतील असा आमचा अंदाज, पण रिफायनरीला घातलेला वळसा आणि अरब टाऊनचं अंधारांत घडलेलं दर्शन यामुळं त्यानं मागितलेले साठ शिलिंग ऐकून त्याच्या आतांपर्यंतच्या अबोलपणाचा बरोबर अर्थ लागला. अखेर आम्ही जे २७ मैल गाडींतून फिरलों होतों त्याचे मैलप्रमाणें होणारे पैसे आणि क्रेटर भाग आम्ही पहात असतांना त्याची झालेली खोटी याचा त्याच्या जवळच्याच रेटकोर्डाप्रमाणें हिशोब केला आणि हिशोबाप्रमाणें झालेले पैसे त्याच्या हातावर ठेवले. समाधान येवढंच होतं, कीं आम्हांला टॅक्सी ड्रायव्हरला फसवितां आलं नव्हतं कीं आम्ही फसलों नव्हतों, पण एडन शहर म्हटलं कीं स्टीमर पॉईंट आणि क्रेटर यांना जोडणाऱ्या टेकडीच्या टोंकावरील खडकांतून कोरलेल्या सुंदर रस्त्याचं स्मरण जसं मला पुढे होईल तसा रिफायनरीकडे जाणारा सुंदर रस्त्याचा मध्य भाग दाखविणारे चकचकीत 'मांजराचे डोळे' आणि ड्रायव्हर आपणाला नेतो आहे तरी

कुठें म्हणून किंचित् भयग्रस्त झालेली मनःस्थिति यांचं विस्मरणहि मला तरी कधीं होणार नाहीं.

पण एकदां स्टीमर पॉईन्टवर आल्यावर आणि बोटीवर जाणाऱ्या होडींत पाऊल टाकल्यावर एडनमध्ये दिसलेल्या भरधांव धावणाऱ्या भाड्याच्या 'ओपेल' गाड्या, ड्रायव्हरांचे ते रंगी-बेरंगी जरीचे काम केलेले डोक्याला गुंडाळलेले रुमाल, प्रशस्त रुंद रस्ते, इस्लामी संस्कृतीची आठवण करून देणाऱ्या इमारती, पाण्याचा पुरवठा करण्यासाठीं शहरांतून फिरणाऱ्या उंटांच्या गाड्या, यांचं चित्रच माझ्या डोळ्या-पुढं येत राहिलं आणि मग रात्रीं मी बिछान्यावर अंग टाकलं तें खरोखर आपण एक नवं, सुंदर शहर पाहिलं या समाधानानंच. बोट कधी सुरू झाली तेंहि मग समजलं नाहीं. सकाळीं जाग येऊन केबिनच्या पोर्टहोलमधून सहज बाहेर पाहिलं तों भराभर पाणी कापीत बोट चालली होती आणि मग मी नीट जागा झालों तों माझ्या लक्षांत आलं, कीं अरबी समुद्रांतून आपण आतां तांबड्या समुद्रांत प्रवेश करीत आहों.

पण तांबड्या समुद्रांतला प्रवेश हा मात्र लवकरच धोक्याच्या लाल दिव्यासारखा वाटूं लागला. कराची ते एडन हा प्रवास करतांना बोटीला मधून मधून हेलकावे बसले होते खरे, पण समुद्र बराच शांत होता आणि एडनच्या जवळ तर त्याला शांत सरोवराचं स्वरूप आलं होतं. तांबड्या समुद्रांत प्रवेश केल्यापासून मात्र जल-देवतेनं आपलं शांत स्वरूप टाकून रौद्र स्वरूप धारण केल्यासारखं वाटूं लागलं. शांत असणाऱ्या समुद्रांत आतां लाटा फुटून फेंस उसळूं लागला होता आणि आकाश-भागांत जमलेल्या श्यामवर्ण मेघांनीं तांबड्या समुद्राचं पाणी काळं करून टाकलं होतं. थोड्या वेळांतच सोसाट्याच्या वाऱ्याबरोबरच जलधारांचं आगमनहि झालं होतं आणि चारहि दिशा धुक्यांत गुरफटल्यासारख्या दिसत होत्या. पण थोड्या वेळांतच सारं निवळलं आणि सोसाट्याचे वारे तेवढेच घुमत राहिले, त्यामुळं डेकवर उभं राहणंसुद्धां कठीण होऊन गेलं. हे वारेहि कोणत्या दिशेनं येऊन कुठें जात होते हें सामान्य माणसाला कळणं शक्य नव्हतं, पण नेमका याच वेळीं बोटीच्या समोरच एक चमत्कार दृष्टीस पडला आणि ही बातमी निरनिराळे खेळ खेळण्यांत गुंतलेल्या प्रवाशांच्या कानावर जातांच सारेजण डेकवर जमा झाले. आकाशांतले ढग आणि समुद्रांतलं पाणी यांच्यामध्यें एक जलस्तंभ (Water Column) निर्माण झाला होता. चारी बाजूनीं जोराचे वारे वाहूं लागले कीं कोणत्यातरी एका बिंदूवर ते केंद्रित होतात आणि त्या ठिकाणचं समुद्राचं पाणी आकाशांत

खूप उंच उडतं. त्याच वेळीं आकाशांत ढग आलेले असले म्हणजे त्या ढगापर्यंत हें पाणी गेलेलं दिसतं आणि जणूं काय वरच्या ढगांतूनच समुद्रांत पाणी ओतलं जात आहे असा भास होतो. ही निसर्गचमत्कृति क्वचितच दृष्टीस पडते म्हणतात म्हणूनच ती दिसूं लागतांच सारे प्रवासी डेकवर धांवत आले होते आणि बायनॉक्युलरमधून निरखून पाहूं लागले होते, पण एकमेकांना हा चमत्कार दाखवीपर्यंत ५-१०. मिनिटांतच, उन्हांत बर्फाचा खडा वितळून जावा तसा, नाहींसा झाला होता. वादळी वारे मात्र अजून थांबले नव्हते. बोट तांबड्या समुद्रांत गेली, कीं खूप हलूं लागते असं पूर्वीपासूनच लोक बोलत होते तें खरं झालं होतं. ...

जवळ जवळ दोन दिवस हें असं चाललं होतं. बोटींतल्या रोजच्या नित्यक्रमांत खंड पडण्याचं कांहीं कारण नव्हतं. बिछान्यांत असतानांच स्टुअर्डनं जागं करून मिळणारा चहा, न्याहारी, आईस्क्रीम, दुपारचं जेवण, दुपारचा चहा, रात्रीचं जेवण आणि झोंपण्यापूर्वीं मिळणारी कॉफी आणि सँडविचीस असा जो खाण्या-पिण्याचा कार्यक्रम मुंबईत सुरू झाला होता तो निर्वेधपणें चालला होता. रात्रीं कधीं चित्रपट कर कधीं नाच, कधीं 'हाउसी' (Housie) चा खेळ तर कधीं लाकडी घोड्यांच्या पैसे लावून चाललेल्या शर्यती असे करमणूकीचे कार्यक्रम सुरू होते. समुद्र प्रवासांतून निर्माण होणाऱ्या आजारीपणांतून आतां सारे लोक बरे झाले होते आणि त्यामुळं निरनिराळ्या खेळांनाहि आतां नवा रंग येऊं लागला होता. आतां बोट निरुंद समुद्रांतून चालली होती त्यामुळं क्वचित कधीं पुसट डोंगर दिसत होते. अमूक वेळीं अमूक ठिकाण दिसेल असे बोर्ड पर्सरच्या ब्यूरोजवळ लावले जात होते. कराचीहून एडनला येईपर्यंत 'कुरिया-मुरिया' हींच तेवढीं बेटं दिसायचीं होतीं, पण तांबड्या समुद्रांत मात्र अनेक लहान मोठीं ठिकाणं दिसलीं होतीं. तांबड्या समुद्रांत बोट पुढें पुढें जाऊं लागली तसं पाणी अधिकाधिक निळं असावं असं वाटूं लागलं. आतां वादळी वारे थांबले होते आणि पाण्याला गडद, दाट, निळा रंग चढूं लागला होता, त्यामुळं या समुद्राला तांबडा समुद्र न म्हणतां नील सागर (Blue Sea) म्हणावं असं अनेक जण सुचवूं लागले होते. पोर्ट सुडान या बंदरांत एडन सुटल्यानंतर दोन दिवसांनी संध्याकाळी आमची बोट थांबली तेव्हां तर आकाशांत कसल्याच ढगांचं अस्तित्व नव्हतं, बोट खाडीसारख्या निमुळत्या भागांत येऊन उभी राहिल्यामुळं किनारा हांकेच्या अंतराइतका जवळ वाटत होता आणि संध्याकाळी साडेपांच पावणेसहालाच

चांगला काळोख पडून आकाशांत तृतीयेची चंद्रकोर आज प्रथमच दृष्टीस पडत होती...

मुंबई सुटल्यापासूनच घड्याळ मागं मागं करण्याचा उद्योग चालू झाला होता, पण त्याचा परिणाम माझ्या तरी लक्षांत आला तो या पोर्ट सुडान बंदरांत. मी 'सूर्यवंशी' नसल्यामुळं सामान्यतः बाहेर दिसूं लागलं, कीं उठायचं ही माझी इतक्या वर्षांची संवय, पण सुडान बंदरांत मात्र मला जाग आली ती आमच्या केबिनच्या पोर्ट होल मधून सूर्याचे किरण आंत आलेले दिसले त्यामुळं. मला वाटलं, आज आपणाला फार वेळ झोंप लागली. रात्रीं ब्रिज खेळत बसल्यामुळं झोपायला अकरा, साडे अकरा वाजले होते खरे, पण इतकी झोंप कशी लागली याचं आश्चर्य वाटत होतं, म्हणून उठल्याबरोबर माझ्या केबिनच्या समोरच जें घड्याळ आहे त्यांत पाहिलं तों पांच–वीस झाले होते! नॉर्वे किंवा स्वीडनमध्यें मध्यरात्रीं सूर्य दृष्टीस पडतो असं मी वाचलं तेव्हां मला तें खरं वाटलं नव्हतं, पण आज पहांटे (?) पांच वाजतांच सूर्य उगवलेला दिसला तेव्हां तें सारं खरं असावं असं वाटूं लागलं आणि मी मनांत म्हटलं, 'कालाचा प्रवाह अखंड चाललेला आहे, आमच्या घड्याळांची त्याला काय पर्वा?'

एडनप्रमाणेंच सुडान बंदरालाहि मुंबई–कराचीसारखा मोठा धक्का नाहीं, त्यामुळं किनाऱ्यांपासून जवळ असली तरी बोट समुद्रांतच उभी होती. तथापि एडनला प्रवाशांना खालीं उतरायला परवानगी मिळाली होती. तशी इथं मिळाली नसल्यामुळं जमिनीवर जाऊन प्रेक्षणीय स्थळं पाहणं किंवा आवडीच्या वस्तु खरेदी करणं या ठिकाणीं शक्य नव्हतं, पण महंमद पर्वताकडे जाऊं शकत नव्हता म्हणून अखेर पर्वतच महंमदाकडे आला होता! किनाऱ्यावरचे छोटे छोटे व्यापारी आपला माल लहानग्या होड्यांत भरून बोटीजवळ आले होते आणि दोऱ्या बांधून लहान लहान टोपल्यामधून चौथ्या मजल्यावर उभ्या राहिलेल्या प्रवाशांना तो ते विकीत होते! बोटीवरील स्त्री प्रवाशांची संख्या कांहीं फारशी मोठी नाहीं, पण माल खरेदी करणाऱ्यांत त्यांचीच गर्दी अधिक होती. ती पाहून मात्र मला 'Man loves woman, woman loves shopping' या कुणी तरी विनोदप्रिय माणसानं तयार केलेल्या म्हणीची आठवण झाली आणि हंसूं आलं. अर्थातच दुकानदारांनीं आणलेल्या वस्तूंत पुरुषापेक्षां स्त्रियांनाच आवडतील अशा वस्तु अनेक होत्या–रंगी बेरंगी शंख, लाकडी उंट, पोवळीं, मोठे शिंपले, चित्रं रंगवलेल्या पर्स, मुलांना आवडतील अशीं शिंपल्यांचीं लहान

अुडन । 22622 दि:
क्रमांक 228 नों: दि:

लहान खेळणीं ! या वस्तूंच्या किंमती भरमसाट वाटत, पण सहा शिलिंगाला सांगितलेली वस्तु व्यवहारचतुर स्त्री दोन शिलिंगाला मागत होती आणि दुकानदारहि ती आढे–वेढे घेत देत होते, हें पाहून सहा शिलिंगांची वस्तु दोन शिलिंगांत मिळविणारी स्त्री व्यवहारचतुर कीं जिला कांहींच किंमत पडली नव्हती ती वस्तु मिळेल तेवढ्या जास्तींत जास्त किंमतीला स्त्री—गिऱ्हाईकांच्या गळ्यांत बांधणारे पुरुष दुकानदार हुषार, हें कोडं मला तरी सुटत नव्हतं !

सुडान बंदर सुटलं तेव्हां समुद्र शांत झाला होता खरा, पण इतकं मनस्वी उकडत होतं कीं कांहीं विचारूं नका ! आपल्या केबिनमध्यें जाऊन पडणं तर अशक्य होतंच पण चौथ्या मजल्यावर प्रशस्त हॉलमध्यें डोक्यावर विजेचे पंखे फिरत असतांना सुद्धां घामाच्या धारा लागत होत्या आणि खेळांकडेहि नीटसं लक्ष लागत नव्हतं. आम्ही ‘ काळ्या ’ प्रवाशांनीं कपडे तरी अंगावर ठेवले होते पण गोऱ्या प्रवाशांनीं जणुं काय लज्जारक्षणापुरतेच कपडे अंगावर कसे तरी धरले होते आणि उघडे–बंब पुरुष आणि वेताचींच वस्त्रं अंगावर ठेवलेल्या स्त्रिया खुशाल डेकवरच्या खुर्च्यां अष्टौप्रहर अडवून बसलेल्या होत्या. पौर्वात्य राष्ट्रांना असंस्कृत म्हणून हिणविण्याचं पाश्चिमात्यांनीं आतां सोडून दिलं असलं तरी पाश्चिमात्यांनींच पौर्वात्यांकडून संस्कृतीचे धडे घेणं आवश्यक आहे, असा विचार माझ्या मनांत तरी हे सारं पाहून आल्यावांचून राहिला नाहीं.

तांबड्या समुद्रांत बोट जसजशी पुढें पुढें जाऊं लागली तसतसे उष्ण वारे कमी होऊं लागले खरे, पण एकवीस तारखेला सकाळीं सहा वाजतां बोट सुएज कालव्याजवळ थांबून ज्यांना इजिप्तमधील पिरामीड पाहायला जायचं असेल त्यांना सुएज बंदरांत उतरण्याची, तेथून मोटरनं कैरोला नेण्याची, पिरामीड व कैरो शहर दाखविण्याची व रात्रीं पोर्ट सैद बंदरांत मोटरनंच आणण्याची व्यवस्था केली जाईल व त्यासाठीं आठ पौंड (म्हणजे सुमारें १०७ रुपये) द्यावे लागतील अशी नोटीस लागली तसं साऱ्या प्रवाशांत उत्साहांचं आणि विचारांचं एव नवं वारं संचारलं. या प्रवासासाठीं आठ पौंड खर्च करायचे तर जिवावर येत होतं, पण जगप्रसिद्ध पिरॅमिड आणि सुएझ, कैरो व पोर्टसैद ही इजिप्तमधील तीन प्रमुख शहरं पाहायची संधि घालवायची कीं काय हा यक्षप्रश्न प्रत्येकापुढें उभा होता. त्यांत असाहि पर्याय अनेकांनी काढला कीं पिरॅमिड पहातां आले नाहींत तरी १०० मैल लांबीचा सुएझचा कालवा आपणाला (कांहीं खर्च न करतां !) पाहतां येईल, कारण हा कालवा म्हणजेहि स्थापत्यशास्त्रांतील कौश-

त्याचा एक परमोच्च बिंदु मानला जातो! पिरॅमिड पहायला जायचं ठरविणाऱ्यांनींहि म्हटलं, सुएझचा कालवा काय परत येतांनाहि आपणाला दिसेलच, पण पिरॅमिड पाहायचे राहिले तर येतांना ते पाहतां येतीलच असं खात्रीनं सांगतां यायचं नाहीं, कारण पोर्ट सैद किंवा सुएझ या ठिकाणीं जाणारी किंवा येणारी बोट अगदीं सकाळींच आली तरच सबंध दिवसभर चालणारी ही 'क्विक् ट्रीप' आंखतात आणि प्रवाशांना इजिप्तमधील शहरं आणि पिरॅमिड पाहतां येतात.

तथापि आठ पौंड खर्च करायचं जिवांवर येऊनसुद्धां अखेर पिरॅमिड पाहायला जायचं मी ठरविलं. या खेपेला आमचा एक पांच जणांचा नवा गट तयार झाला होता. त्यांत डॉ. सातोसकर, सिद्धार्थ कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य दळवी, बँक ऑफ इंडियाचे श्री. लिमये, इंग्लंडमधील स्कॉटलंड यार्ड या गुप्त पोलिस संघटनेचं शिक्षण घेण्यासाठीं निघालेले श्री. वैष्णव व मी असे पांच जण होतों. ही सफर आटोपून रात्रीं दहा वाजतां थकून जाऊन बोटींत बसण्यासाठीं म्हणून आम्ही पोर्टसैदला आलों, तेंव्हां या सफरींत आलेला प्रत्येकजण म्हणत होता,

"आठ पौंड वसूल झाले!"

ही सफर खरोखरच अशी संस्मरणीय झाली!

तुमचा,

वि. वा. पत्की

त्याचा एक परमोच्च बिंदु मानला जातो ! पिरॅमिड पहायला जायचं ठरविणाऱ्यांनींहि म्हटलं, सुएझचा कालवा काय परत येतांनाहि आपणाला दिसेलच, पण पिरॅमिड पाहायचे राहिले तर येतांना ते पाहतां येतीलच असं खात्रीनं सांगतां यायचं नाहीं, कारण पोर्ट सैद किंवा सुएझ या ठिकाणीं जाणारी किंवा येणारी बोट अगदीं सकाळींच आली तरच सबंध दिवसभर चालणारी ही 'क्विक् ट्रीप' आंखतात आणि प्रवाशांना इजिप्तमधील शहरं आणि पिरॅमिड पाहतां येतात.

तथापि आठ पौंड खर्च करायचं जिवांवर येऊनसुद्धां अखेर पिरॅमिड पाहायला जायचं मी ठरविलं. या खेपेला आमचा एक पांच जणांचा नवा गट तयार झाला होता. त्यांत डॉ. सातोसकर, सिद्धार्थ कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य दळवी, बँक ऑफ इंडियाचे श्री. लिमये, इंग्लंडमधील स्कॉटलंड यार्ड या गुप्त पोलिस संघटनेचं शिक्षण घेण्यासाठीं निघालेले श्री. वैष्णव व मी असे पांच जण होतों. ही सफर आटोपून रात्रीं दहा वाजतां थकून जाऊन बोटींत बसण्यासाठीं म्हणून आम्ही पोर्टसैदला आलों, तेंव्हां या सफरींत आलेला प्रत्येकजण म्हणत होता,

"आठ पौंड वसूल झाले !"

ही सफर खरोखरच अशी संस्मरणीय झाली !

तुमचा,

वि. वा. पत्की

: ४ :

# अद्भुत सौंदर्याचं माहेरघर

★

' सिलिसिया '
पोर्टसैद्–लिव्हरपूल प्रवास
३० सप्टेंबर, १९५५

प्रिय बाळासाहेब,

' दोन तासांत शंभर मैलांचा प्रवास झाला खरा, पण या शंभर मैलांत एक गांव किंवा झाड दिसलं असेल तर शपथ ! सारं रखरखीत, उजाड वाळवंट ! ' असे उद्गार पिरॅमिड पहायला निघालेल्या प्रवाशांपैकीं प्रत्येकानं, सुएझहून कैरोला आल्यानंतर काढले नसते तरच नवल ! कारण, सुएझ ते कैरो हा सारा मुलूख खरोखरच असा निर्जन आणि निर्जल आहे.

पिरॅमिड पहायला जाणाऱ्या ३३ लोकांचा गट लॉंचमधून सुएझच्या बंदरावर सकाळीं आठाच्या सुमारास उतरला, तेव्हां आम्हाला नेण्यासाठीं कोऱ्या करकरीत पांचसात मोटारी उभ्या असलेल्या दिसल्या. आणि प्रत्येकींत पांच पांच किंवा सहा सहा माणसं बसल्यानंतर सर्व गाड्या सुएझ शहरांतून भरधांव गेल्या, तेवढ्यांत गांवाची संपूर्ण कल्पना येण्यासारखी नव्हती, तरी सकाळच्या कोंवळ्या उन्हांत चकाकणाऱ्या आधुनिक बांधणीच्या उंच इमारती, रेंगाळत जाणाऱ्या गाढवांच्या आणि उंटांच्या गाड्या, आणि खूप दूरवर विस्तारलेलं शहर सहज दृष्टीस पडलं. मात्र गाड्या सुरुं झाल्याबरोबर समोरून भरधांव येणाऱ्या गाड्या दिसल्या, कीं आतां अपघात होणार की काय अशी उगीचच भीति वाटायची आणि जाणारी गाडी सफाईनं निघून गेली कीं जीव भांड्यांत पडायचा ! याला कारण असं कीं हिंदुस्थानांत वाहनं डाव्या बाजूनं जात असलेलीं पाहाण्याची जी संवय दृष्टीला झालेली असते तिला इथं सारं चुकल्यासारखं वाटतं, कारण इथं रस्त्यावरील सारी

वाहतुक उजव्या बाजूनं जायची पद्धत आहे. सुएझमधेंच नव्हे, साऱ्या इजिप्तभर. शहरांतून आमच्या गाड्या बाहेर पडून कैरोच्या रस्त्याला लागल्या त्याहि अक्षरशः असामान्य वेगानं. सुरुवातीला चाळीस पन्नास मैल वेग होता तेव्हां गंमत वाटायची, पण गाडीचा वेग दाखविणारा कांटा साठ—सत्तरकडे झुकूं लागला कीं डोळे मिटून घ्यावेसे वाटत! एवढ्या प्रचंड वेगानं गाड्या जाण्याइतका रस्ताहि सुंदर होता—काळाभोर, तुकतुकीत, गुळगुळीत! रस्त्यावर कुठें बारीक खडा नव्हता कीं खळगा नव्हता, सबंध शंभर मैलांत! पण या शंभरहि मैलांना सोबत होती तीहि निर्जन वाळवंटाची! या सबंध शंभर मैलांत माणसं दिसलीं तीं तेलाची पाईप-लाईन टाकली जात आहे तिच्यावर काम करणारींच तेवढीं फक्त! रस्त्याच्या बाजूला क्वचित् कुठें वीतभर उंच वाढलेली कांटेरी रोपटीं आणि क्वचित् दृष्टीस पडणारे उंट यांच्या शिवाय कसला मागमूसहि नव्हता. रस्त्यावरील वाहतूक मात्र फार मोठी होती. कैरोला पोंचेपर्यंत निदान दोन तीनशें मोटारी तरी या दोन तासांत उलट दिशेनं गेल्या असतील!

दहा वाजण्याच्या सुमारास कैरो शहरांतल्या मशिदींचे आणि इमारतींचे मनोरे दिसूं लागले, येवढंच नव्हे तर गांव सुरू झाल्याबरोबर रस्त्याच्या दोन्ही बाजूला लावलेलीं उंच उंच झाडं आणि वेगानं धांवणाऱ्या ट्रॅम गाड्या दिसूं लागल्या, तसे आम्ही वाळवंटांतून प्रवास करून आलों आहों हें खरंसुद्धां वाटेना. शहराचा अलीकडेच बांधलेला सुबक भाग आणि चांगली तीन-तीन पुरुष उंचीची तुर्की टोपीच्या आकारासारखीं मुद्दाम कापलेलीं हिरव्यागार पानांचीं शोभिवंत झाडं आलीं तसे आपण एका नव्या जगांत आलों आहों असं वाटूं लागलं. वास्तविक कैरो हे फार जुनं शहर आहे, पण ज्या भागांतून आम्ही सुरवातीसच जात होतों तो भाग अलिकडेच बांधलेला आहे असं ड्रायव्हरनं सांगितलं आणि अखेर आमच्या गाड्या शहरांत येऊन थांबल्या तेव्हां तर एका फार मोठ्या शहरांत आपण आलों आहों हें सहजच उमगलं. कैरो राजधानीचं शहर आहे आणि अनेक राजघराण्यांचे उदय आणि अस्त इथं झाले आहेत, हें मला माहित असलं तरी कैरो शहर येवढं आधुनिक आणि मोठं असेल अशी माझी कल्पना नव्हती. या शहरांत आपल्याला तास दोन तासांपेक्षां अधिक राहातां येणार नाहीं याची हळहळ मनाला सारखी वाटत होती, पण ज्या संस्थेमार्फत आमची ही सफर आंखण्यांत आली होती त्यांनीं अल्पावधींतहि शक्य तेवढी शहराच्या वैभवाची कल्पना आम्हांला यावी अशी मोठी चोख व्यवस्था केली होती. किंबहुना परदेशांतून

आपला देश पाहायला आलेल्या प्रवाशांची आपण जास्तींत जास्त काळजी घेतली पाहिजे याची जाणीव सरकारलाहि होती आणि म्हणूनच State Tourist Service असे बॅज दंडावर लावलेले अधिकारी ठिकठिकाणीं दिसत होते आणि कांहीं माहिती विचारली, कीं मोडक्या तोडक्या इंग्रजींत आदबीनं सांगत होते.

कैरो आणि त्याच्या सभोवतालचीं प्रेक्षणीय स्थळं आम्हांला दाखविण्याचं काम ज्या वाटाड्याकडे सोपविण्यांत आलं होतं त्यानं आमची गाडी शहरांत उभी राहिल्याबरोबर 'गुड मॉर्निंग, सर!' म्हणत आमचं स्वागत करीत आपल्या मनगटावर बांधलेल्या पट्ट्यावरील 'द्रागोमन' (Dragoman) या अक्षरांकडे आमचं लक्ष वेधलं होतं, यानंतर आपणच सर्व दाखविणार आहों असं म्हणत तो आमच्याच मोटारींत येऊन बसला होता आणि आतां आपण काय काय पाहाणार आहों हें सांगत होता. ज्या ठिकाणीं आम्ही थांबणार नव्हतों तीं भराभर मागं जाणारीं स्थळं कोणतीं हे तो सांगत होता. इजिप्त सरकारच्या कचेऱ्यांची प्रचंड चौदा मजली इमारत ज्या 'लिबरेशन स्क्वेअर' मध्यें आहे तिथं आम्ही आलों आणि आतां आपण इजिप्तचा म्युझियम् पाहाणार आहों अशी सुरवात करून म्युझियम्‌च्या प्रवेशद्वारा-जवळच एका छोट्याशा तळ्यांत कमळं आणि डॅफोडिल फुलं लावलेली होती त्याकडें अंगुलिनिर्देश करीत आमचा द्रागोमन म्हणाला होता, 'दिस इज द् सिंबॉल ऑफ इजित. लोतस रिप्रेझेंतस् द् ईस्त, दॅफॉदिल रिप्रेझेंतस् द् वेस्त." त्याच्या त्या शब्दोच्चारांची मोठी गंमत वाटत होती. त्याची मातृभाषा अर्थातच इंग्रजी नव्हती पण प्रवासी लोकांना तींच तींच ठिकाणं पुनः पुन्हां दाखविण्याचा त्यांचा धंदाच असल्यामुळं पाठ केल्यासारखं, पण सफाईनं तो हें सारं सांगत होता. 'लोटस' च्या ऐवजी तो 'लोतस' म्हणत होता, 'ईस्ट' ला 'ईस्त' म्हणत होता. फ्रेंच भाषेच्या सरावामुळंच कीं काय इंग्रजी भाषेंतला कठोरपणा त्याच्या शब्दोच्चारांत नव्हता; आणि म्हणूनच त्याचे उच्चार कानाला सुसह्य वाटत होते.

म्युझियम्‌च्या भव्य प्रवेशद्वारांतून आंत गेल्यावर इजिप्तमधील शेंकडों वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या राजांचे प्रचंड पुतळे, देवांच्या मूर्ती, जुनीं नाणीं, राजांचं ऐश्वर्य हें सारं दाखवीत दाखवीत देशोदेशचे प्रवासी जे मुद्दाम पाहाण्यासाठीं म्हणून या पुराणवस्तुसंग्रहालयांत येतात ते हजारों वर्षांपूर्वींचे मानवांचे पेट्यांत घालून ठेवलेले मृत देह दाखविण्यास द्रागोमननं सुरुवात करतांच इजिप्तच्या प्राचीन संस्कृतीची अंधुकशी कल्पना आल्यावांचून राहिली नाहीं. ज्या पेट्यांत हजारों वर्षांपूर्वींचे मृत देह ठेवलेले होते त्या पेट्यांवर ज्याचा मृत देह आंत असे त्याचं चित्र कोरलेलं

असे आणि त्याचं दफन करतांना जे नानाविध अलंकार आणि शस्त्रास्त्रं त्याच्या अंगावर असत तीं काढून शेजारींच कांचेच्या बंद पेटींत ठेवलेली दिसत. राजांचे सोन्यानं मढविलेले पलंग, मौल्यवान् हिरे—माणकांचे अलंकार, तलवारींच्या रत्न-जडित मुठी, या वस्तूबरोबरच त्या कालांतील वाहनं, होड्या, इतकंच काय पण चहाच्या किटल्यासुद्धां ठिकठिकाणीं मांडून ठेवलेल्या होत्या. सुमारें चार-साडेचार हजार वर्षांपूर्वी कॅनव्हास सारख्या कपड्यांत गुंडाळलेला मृतदेह आतांच गुंडाळलेला असावा असा भास होत होता आणि गवताच्या टोपलीत हातपाय एकत्र जोडून विश्रांति घेत पडलेल्या मृत देहाच्या आकृतीकडे पहातांना तर अंगावर शहारेच येत होते. स्त्रिया तर त्याच्याकडे नुसता ओझरता दृष्टिक्षेप करून लांबूनच तेथून जात होत्या. इजिप्तमधल्या 'मर्मी'च हें दर्शन थोडं भयप्रद आहे खरंच!

यानंतर आमच्या ड्रागोमननं आम्हांला सिटाडेल भागांतील उंच मनोऱ्यांच्या भव्य मशिदींत नेलं. या ठिकाणाहून संगळं कैरो शहर दिसूं शकतं, इतका हा भाग उंचावर आहे. मशिदीचं पावित्र्य कायम रहावं (किंवा बाहेरची घाण आंत जाऊं नये) म्हणून येणाऱ्या प्रवाशांच्या पादत्राणाभोंवती एक कॅनव्हासचं आवरण बांधलं जातं आणि ते बांधल्यानंतरच प्रवाशांना आंत जातां येतं. मशिदींतला प्रार्थनेचा हॉलहि चांगलाच स्वच्छ आणि मोठा आहे. पांच मोठे झुंबर या हॉलमध्यें लावलेले दिसतात आणि या हॉलमध्यें जे विजेचे दिवे लावलेले आहेत त्यांची संख्या तर साडेसातशें आहे! हे सर्व दिवे लावले म्हणजे या हॉलला केवढी शोभा येते हे आम्हांला कळावं म्हणून हे सारे दिवे लावण्यांत आले होते. या मशिदीतून बाहेर पडून आम्ही आलों ते सरळ कैरोच्या बाजारांत. हा भाग मात्र आतांपर्यंत आम्ही पाहिलेल्या भागापेक्षां फार निराळा तर वाटलाच, पण रस्त्यावर लोक अस्ताव्यस्त चालत होते आणि नासकीं-कुजकीं फळं रस्त्यावर फेकलेलीं होतीं. पायघोळ झगा घातलेले फेरीवाले हातांत हजार तऱ्हेच्या वस्तु घेऊन प्रवाशांच्या मागं लागत होते. उंटाच्या कमावलेल्या कातड्यांच्या वस्तूच यांत फार होत्या आणि हे फेरीवाले त्यांच्या किंमती किती सांगत याला कांहीं सुमारच नव्हता. दहा शिलिंगाला सांगितलेली वस्तु गिऱ्हाईकाच्या पदरांत अखेर दोन तीन शिलिंगानाहि पडे. दुकानांतहि हीच तऱ्हा. सकाळपासून आम्ही फिरलों होतों ते सारं नव्या कैरोंत, पण आतांचा हा सारा भाग म्हणजे जुनं कैरो शहर. बाजाराची ही मांडणी मुंबईतल्या लालबाग किंवा भेंडी बाजाराची आठवण करून देत होती. लोकांचे पेहरावहि मोठे ऐटदार होते असं नव्हे. स्त्रिया अजूनहि काळ्याकुळकुळीत रंगाचा

पायघोळ झगा घालीत असाव्या हे उघड दिसत होतं, पण तोंडाचा सगळा भाग झांकण्याऐवजी हनुवटी आणि तोंड झांकून नाका-डोळ्यांचा आणि कपाळाचा भाग उघडा दिसे, त्यावरून त्यांचा गौरवर्ण कुणाच्याहि लक्षांत यायला वेळ लागत नव्हता.

हे सारं होईपर्यंत दुपारचा दीड वाजायला झाला होता आणि पिरॅमीड पहायला जायचं तर 'लंच' लवकर आटोपणं जरूर होतं. आमची ही सफर आखणाऱ्यांनीं 'लंच' ची व्यवस्था केली होती ती 'कुरसाल' नांवाच्या एका बादशाही इजिप्शियन् हॉटेलांत. तिथं वाटलं तर इजिप्शियन पद्धतीचं किंवा इंग्रजी पद्धतीचं जेवण मिळत होतं. आम्ही इंग्रजी पद्धतच पसंत केली होती. जेवण उत्कृष्ट होतंच, पण जेवणाच्या शेवटीं जीं ताजीं फळं देण्यांत आलीं होतीं त्यांतल्या ताज्या खजुराची कल्पना वर्णन करून सांगतांच यायची नाहीं. किंबहुना ताज्या खजुराची कल्पनाहि करतां यायची नाहीं, कारण असला खजूर हिंदुस्थानांत खायलाच काय पण पहायलाहि मिळत नाहीं. आपल्याकडे झाडावरून काढलेलीं पक्क जांभळं जशीं दिसतात तसाच हा ताजा खजूर दिसत होता. टचटचीत पण मऊ! वरची पातळ साल काढली, कीं आंतला गर लोण्यासारखा मऊ आणि स्वादिष्ट !

'कुरसाल' हॉटेलांतनं आमच्या मोटारी निघाल्या त्या सरळ पिरॅमिडांच्या पायथ्यांशीं. कैरो शहरापासून अवघ्या पांच-सहा मैलांवर हे पिरॅमिड आहेत आणि गांवापासून या ठिकाणापर्यंत ट्रॅमचा रस्ताहि नेलेला आहे. दुतर्फा वाढलेलीं उंचच उंच झाडं आणि दोन ठिकाणीं पुलावरून ओलांडावी लागणारी नाईल नदी यांची शोभा अपूर्व तर होतीच, पण पिरॅमिडांचं दर्शन कधीं होतं म्हणून उतावीळ झालेलं मन या शोभेकडे फारसं लक्ष द्यायला तयार नव्हतं. गांवांतून बाहेर पडल्यापासूनच हे पिरॅमीड दिसूं लागतात, पण जसजसं जवळ जावं तसतसा त्यांचा भव्यपणा अधिकाधिक लक्षांत येऊं लागतो. ट्रॅमचा रस्ता ज्या ठिकाणीं संपतो त्या ठिकाणींच सर्व वाहनं थांबविण्याचा प्रघात दिसला आणि पुढें दोनच फर्लांगावर असलेले पिरॅमीड पायीं जाऊनहि सहज पाहातां येण्यासारखे असले तरी हे अंतर उंटावर बसून तोडण्यांत जी कांहीं मिजास आहे ती कांहीं विचारूं नका ! आमच्या सफरीत दोन-चार स्त्रिया होत्या त्याच काय त्या गाड्यांत बसून पिरॅमीडाच्याजवळ गेल्या, बाकीचे आम्ही सारेजण पिरॅमिडांचं दर्शन घ्यायला निघालों ते उंटावरचे शहाणे होऊन ! उंटाच्या मालकानं उंटाची दोरी हातांत धरली आहे आणि उंटावर आरूढ झालेले आम्ही लपक् लपक् करीत त्याच्या मागून चाललो आहों हें दृश्य अक्षरशः फोटो काढण्यासारखं होतं ! आमचे

उंट येऊन थांबले तेहि पिरॅमिडच्या पुढ्यांत. ज्या जगप्रसिद्ध पिरॅमिडांचे फोटोच आजपर्यंत आपण पाहिले होते त्यांच्या प्रत्यक्ष पुढ्यांत उभें राहिल्यानंतर त्यांचा भव्यपणा सहज लक्षांत येतो. आमच्या ड्रागोमननं सांगितलं कीं, यांची ऊंची सुमारे ४०० फूट आहे. मान उंच करून आकाशाकडे पाहिल्याशिवाय त्याचं वरचं टोंक दिसत नव्हतं. एकाजवळ एक असे तीन मोठे आणि तीन लहान पिरॅमीड एके ठिकाणींच आहेत. त्यांतला प्रत्येक बांधायला जवळ जवळ तीस वर्षे लागलीं होतीं आणि हें कधीं तर सुमारें साडेपांच हजार वर्षांपूर्वी! देशाच्या राजाचं आणि राणीचं थडगं सुरक्षित रहावं म्हणून एकावर एक सुमारें चारशें फुटापर्यंत दगडावर दगड ठेवून हे प्रचंड पिरॅमीड तयार करण्यांत आले आणि त्यांचा भव्यपणा एवढा लोकविलक्षण ठरला कीं, जगांतल्या सात आश्चर्यांतलं पिरॅमीड एक आश्चर्य होऊन बसलं. ही चमत्कृति पाहाण्यासाठीं जगाच्या कानाकोपऱ्यांतून लोक येतात आणि हें पिरॅमीड दृष्टीस पडले, कीं आपल्या डोळ्यांचं पारणं फिटलं अशी कृतकृत्यता मानून परत जातात. समोर उभं राहिलं, कीं एक प्रचंड त्रिकोण आपल्यापुढें उभा आहे असा भास होतो. पण तळापाशी हा एक चौकोन आहे आणि त्याचं एक निमुळतं टोंक आकाशांत गेलं आहे. याच्या अंतर्भागात अंधाऱ्या मार्गांतून ३०–४० फूट गेल्यानंतर सुमारें १०० पायऱ्यांचा एक निमुळता जिना आहे आणि या जिन्यांतून मोठ्या कष्टानं चढून वर गेलं कीं एका प्रशस्त हॉलमध्यें थडगीं ठेवलेली दिसतात! शत्रूपासून, थंडीवाऱ्यापासून आपल्या लाडक्या राजाराणीच्या थडग्याचं संरक्षण व्हावं म्हणून घेतलेली ही दक्षता पाहिली, कीं राजघराण्याबद्दल लोकांत केवढी आदराची भावना असेल याची अंधुक कल्पना येते. हें सारं प्रचंड काम गुलामांच्याकडून करवून घेण्यांत आलेलं असलं तरी आपल्या राजघराण्यावर लोकांची विलक्षण निष्ठा असल्याशिवाय असलीं प्रचंड कामं झालींच नसतीं. या पिरॅमिडच्या जवळच असलेला ‘स्फिंक्स’ हि तितकाच जगप्रसिद्ध आहे. अखंड दगडांत कोरलेला माणसाचा चेहरा आणि खालीं दुसऱ्या प्राण्याची आकृति असं स्फिंक्सचं विकृत स्वरुप आहे, पण जवळून पाहिल्यानंतर तो एवढा भव्य आणि अजस्र दिसतो कीं शिल्पकृतीचा एक अपूर्व नमुना म्हणून त्याच्याकडे किती तरी वेळ पाहूनहि समाधान होत नाहीं.

हें सारं होईपर्यंत संध्याकाळ होऊं लागली होती आणि पोर्टसैदाला जाण्यासाठीं साडेपांचला निघायचं ठरलेलं होतं, त्यामुळं चहासाठीं सफरींतल्या साऱ्या लोकांना ‘ग्रोपी’ नांवाच्या प्रशस्त हॉटेलांत नेण्यांत आलं होतं. मुंबई सुटल्यापासून बारा

चौदा दिवसांत वर्तमानपत्र दृष्टीस पडलं नव्हतं. म्हणून एखादं वर्तमानपत्र इथं मिळालं तर पाहावं म्हणून मी हिंडून पाहिलं, पण इंग्रजी वर्तमानपत्र इथं औषधालाहि नव्हतं. जी होतीं तीं सारीं फ्रेंच भाषेंतली आणि नंतर मोठ्या कष्टानं 'इजिप्शियन गॅझेट' हें इंग्रजी पत्र मिळालं तेंहि सहा पेन्स देऊन! या वर्तमानपत्रांत पुष्कळच जागतिक बातम्या होत्या, इतकच काय पण रशियाचे पंतप्रधान बुल्गॅनिन हे नोव्हेंबरच्या अखेरीस भारताला भेट देणार असल्याची बातमीहि प्रमुख ठिकाणीं छापलेली दिसली. तथापि खुद्द भारतांतील एकहि बातमी त्यांत नव्हती!

आमच्या मोटारी कैरोहून पोर्ट सैद्‌ला जायला निघाल्या तेव्हां कैरो शहरांतले सारे दिवे लागले होते आणि त्या झगझगीत प्रकाशांत सारी नगरी उजळून निघाली होती. मोटारी पांच-दहा मैल दूर गेल्या तरीहि झगझगाट स्पष्ट दिसत होता. अद्‌भुत सौंदर्याचं माहेरघर असलेला हा भूभाग क्षणाक्षणाला आतां मागं राहूं लागला होता. पण आतां सकाळच्या पेक्षांहि अधिक वेगानं आमच्या मोटारी निघाल्या होत्या, कारण १७५ मैलांचं अंतर तोडून साडेतीन तासांत आम्हांला पोर्ट-सैद्‌ला पोंचायचं होतं.

पण पोर्टसैद सुमारे २० मैलावर आलं तेव्हां आमचा ड्रायव्हर म्हणाला, "आपण आतां सुएझच्या कालव्याजवळूनच जाणार आहों." येवढं तो म्हणेपर्यंत आमची मोटार वळण घेऊन सुएझ कालव्याला समांतर असलेल्या रस्त्यावरून वेगानं धावूंहि लागली होती आणि सुएझच्या कालव्यांतून अतिशय कमी वेगानं चाललेल्या अनेक मोठ्या बोटीहि दिसत होत्या, इतकंच काय पण आमची 'सिलीसिया' बोटसुद्धां एवढ्यांत एकदम दिसली. बोट आणि रस्ता यांच्यामधील अंतर इतकं कमी होतं कीं मोठ्यानं बोललं तर बोटीवर सहज ऐकूं जात होतं. आमची बोट दिसतांच आम्ही थांबलों. अनेकजण डेकवर उभे होते, त्यांना रुमाल हालवून आम्ही इषारे दिले आणि "Bon voyage" "Bon voyage" असें ओरडायलासुद्धां कमी केलं नाहीं!


यावेळीं रात्रीचे साडेनऊ वाजले होते आणि उरलेलं अंतर आम्ही पंधरा वीस मिनिटांत तोडून जाणार होतों परंतु बोटीला पोर्टसैद्‌ला पोचायला दोन तास तरी लागणार होते आणि तेवढ्यांत संपूर्ण नसलां तरी पोर्टसैद्‌चा पुष्कळच भाग पाहतां येण्यासारखा होता. आम्ही तसंच केलं. पोर्टसैद गांवांत आता जाण्यासारखं नसलं तरी बंदरावरच जी मोठी बाजारपेठ आहे तिच्यांत आम्ही फिरलो. दहा वाजून गेले होते तरी एकूण एक दुकानं उघडीं होतीं. सार्‍या दुकानांतून दिव्यांचा झगझगाट होता. प्रवाशांच्या बोटी यायच्या असल्या कीं ही दुकानं चोवीसहि तास उघडीं अस-

तात असं समजलं आणि पोर्टसैद हे येवढं महत्वाचं बंदर आहे, कीं येथें बोटीची सारखी ये–जा सुरु असते. हें बंदर म्हणजे पूर्वेकडे जाणाऱ्या व पूर्वेकडून येणाऱ्या समुद्र वहातुकीचं प्रवेशद्वारच आहे. हिंदुस्थान, सिलोन, पूर्व आफ्रिका, चीन, जपान, ऑस्ट्रेलिया या देशांकडे जाणाऱ्या व तिकडून येणाऱ्या शेंकडों बोटी पोर्टसदला येतात आणि गिऱ्हाईकांची वर्दळ अष्टौप्रहर सुरू असते. दुकानांतहि हरतऱ्हेचा माल मिळतो. सुती आणि लोकरीचे कपडे, कातड्याच्या बॅगा, घड्याळं, कॅमेरे, सुगंधी तेलं-जे हवं असेल तें! आम्हीहि या बाजार पेठेंत खूप फिरलों, कांहीं खरेदीहि झाली आणि आमची बोट बंदरांत आलेली दिसतांच बंदरांत सोडलेल्या तरंगत्या लाकडी धक्क्यावरून सरळ बोटीवर आलो त्यावेळीं रात्रींचे बारा वाजले होते.

—आणि मग या प्रवासाच्या अखेरच्या भागाला सुरुवात झाली. नऊ दिवसांनीं लिव्हरपूल येणार होतं. बोट सुरू झाल्यानंतर नित्यक्रमाला पुन्हां सुरवात झाली. पण त्यांतहि आतां फरक होत चालला होता. आतां थंडीचा प्रदेश हळुहळु येऊं लागला होता. त्यामुळं प्रत्येकाच्या बिछान्यावर पांघरण्यासाठीं आतांपर्यंत पांढरी चादरच होती तिच्या जोडीला आतां ऊबदार रग आले. सकाळीं दहा वाजतां मिळणाऱ्या आईस्क्रीमच्या ऐवजीं आतां 'बीफ-टी' व कॉफी आली, बोटीवरील खलाशांचे व अधिकाऱ्यांचे आतांपर्यंत पांढरे स्वच्छ कपडे होते त्यांची जागा आतां काळ्या कपड्यांनी घेतली आणि प्रवाशांच्या अंगावरहि लोकरीचे जाड कोट, लोकरीच्या काळ्या रंगाच्या विजारी आणि लोकरीचे स्वेटर सर्वत्र दिसू लागले......

तथापि पोर्टसैद ते लिव्हरपूल हा प्रवास एकंदरींत अत्यंत कंटाळवाणा असाच आहे. एकदां पोर्टसैद सुटलं कीं नऊ दहा दिवसपर्यंत पाणी आणि आकाश यांचीच अखंड सोबत! मधून मधून कधीं एखादं बेट, एखादा किल्ला, जिब्राल्टरचं बंदर दुरून दिसलं तेवढंच काय तें! नाहीं म्हणायला भूमध्य समुद्रांत सूर्यास्ताची जी अपूर्व शोभा दिसते, तिची कल्पना शब्दांनीं देतांच यायची नाहीं. या ठिकाणीं सूर्य समुद्रांत बुडालेला दिसत नाहीं. तो बराच वर असतांनाच एखाद्या मोठ्या तांबड्या लाल फळाचा खालचा भाग सुरीनं कापीत गेलं म्हणजे तें जसं कमी कमी होत जाईल तसा सूर्य हळुहळू अदृश्य होत जातो. या ठिकाणी सूर्याचा खालचा भाग जसजसा अदृश्य होत जातो तसतशी उरलेली तांबडी-लाल कोर तेवढी आकाशांत अधांतरी तरंगत राहिल्यासारखी वाटते आणि मग अजिबात दिसेनाशी होते.


आतांपर्यंत बोटीवरच्या प्रवाशांचा एकमेकांशी पुष्कळच परिचय झाला होता. इथं माणसं तरी किती प्रकारची होतीं! इथं व्यापारी होते, अधिकारी होते,




इजिप्तमधील उंट, स्फिंक्स आणि पिरॅमिड



कैरो (इजिप्त) : उंच मनोऱ्याची मशीद (अंतर्भाग)




लंडन :
ट्रॅफलगार
स्क्वेअर




लंडन :
पिकॅडिली
सर्कस

धर्मोपदेशक होते, इतिहास, अर्थशास्त्र, विज्ञान, रसायन शास्त्र, वैद्यकशास्त्र, स्थापत्यशास्त्र या विषयांत प्राविण्य संपादन केलेले विद्यार्थी होते; गायक होते, चित्रकार होते, शिल्पकार होते, पण खरं सांगू? ज्याच्या बुद्धितेजानं दिपून जावं असा एकहि प्रवासी माझ्या तरी आढळांत आला नाहीं. ज्यांचं वर्णन Commonplace, Mediocre या शब्दांनीं केलं तरी चालेल अशींच बहुतेक माणसं होती. माझ्या सुदैवानं अनेक बुद्धिमंतांचा सहवास मला आजपर्यंत घडला आहे. त्यामुळं बुद्धीचं तेज—मी एक सामान्य माणूस असूनहि—ओळखण्याची संवय मला झाली आहे. या साऱ्या माणसांची वागण्याची तऱ्हा, बोलण्याची पद्धत, हंसण्याचे विषय आणि खेळांतला सामान्यपणा मीं पाहिला, तेव्हां माझं मन विषण्ण झालं आणि किती वेळां तरी माझ्या मनांत आलं, यांच्यापेक्षां किती तरी पटीनं हुषार आणि चलाख असलेली माणसं माझ्या मायदेशांत आहेत, पण उच्च शिक्षण घेण्याची किंवा संशोधन करण्याची संधिच त्यांना मिळत नसल्यामुळं बिचारीं अंधारांतच राहिलीं आहेत आणि या पुढेंहि राहतील! परदेशला उच्च शिक्षणासाठीं म्हणून जे विद्यार्थी निघाले आहेत त्यांतले कोणी जमिनदारांचे, कारखानदारांचे, गिरणी मालकांचे, मोठमोठ्या अधिकाऱ्यांचे चिरंजीव किंवा नातेवाईक आहेत, कारण परदेशांत जाऊन आलं कीं परंपरेनं चालत आलेलं सारं वैभव आपल्या पायापाशींच राहील अशी त्यांची खात्री आहे! केवळ स्वतःच्या असामान्य हुषारीवर जाणारे विद्यार्थी इथं नाहींत असं नाहीं, पण ते हाताच्या बोटावर मोजतां येतील येवढेच! या सामान्य बुद्धिमत्तेमुळंच सिनेमाच्या वेळीं शिट्या वाजविणारे आणि दिवसांतून पंधरा-सोळा तास झोपणारे विद्यार्थीहि इथं आहेत! परदेशला जायचं म्हणजे प्रत्येक वस्तु सुरी–कांट्यानं खावी लागते हे वेड डोक्यांत घेऊन बोटींत पाऊल टाकलेला एक विद्यार्थी तर चक्क जेवणांतलं अखेरचं आईस्क्रीमहि सुरीकाट्यांनं खातांना दिसला, बिचाऱ्यानं कॉफीचा कप तरी तोंडाला लावला हे नशीब! विद्यार्थ्यांचे हें सारे नमुने पाहिले, कीं उद्यां उच्च विद्या विभूषित होऊन आपल्या मायभूमीची कीर्ति आणि वैभव हे विद्यार्थी वाढवितील यांवर माझा विश्वास बसत नाहीं, वाटलं तर मला निराशावादी म्हणा तुम्ही! आडांतच नाहीं तर पोहऱ्यांत येईल कुठून? मानवी बुद्धि म्हणजे कांहीं शरीरांतला एखादा अदृश्य भाग नव्हे, कीं चर्मचक्षुनां दिसला नाहीं तरी तो तिथं असेलच अशी खात्री देतां यावी! बुद्धिमत्ता कशाला म्हणायचं याची मीमांसा मानसशास्त्रवेत्त्यांनीं अनेक तऱ्हेनं केलेली असली तरी कोणत्याहि विषयांतलं मर्म



लंडन :
ट्रॅफलगार
स्क्वेअर

लंडन :
पिकॅडिली
सर्कस



धर्मोपदेशक होते, इतिहास, अर्थशास्त्र, विज्ञान, रसायन शास्त्र, वैद्यकशास्त्र, स्थापत्यशास्त्र या विषयांत प्राविण्य संपादन केलेले विद्यार्थी होते; गायक होते, चित्रकार होते, शिल्पकार होते, पण खरं सांगू? ज्याच्या बुद्धितेजानं दिपून जावं असा एकहि प्रवासी माझ्या तरी आढळांत आला नाहीं. ज्यांचं वर्णन Commonplace, Mediocre या शब्दांनीं केलं तरी चालेल अशींच बहुतेक माणसं होती. माझ्या सुदैवानं अनेक बुद्धिमंतांचा सहवास मला आजपर्यंत घडला आहे. त्यामुळं बुद्धीचं तेज—मी एक सामान्य माणूस असूनहि—ओळखण्याची संवय मला झाली आहे. या साऱ्या माणसांची वागण्याची तऱ्हा, बोलण्याची पद्धत, हंसण्याचे विषय आणि खेळांतला सामान्यपणा मीं पाहिला, तेव्हां माझं मन विषण्ण झालं आणि किती वेळां तरी माझ्या मनांत आलं, यांच्यापेक्षां किती तरी पटीनं हुषार आणि चलाख असलेली माणसं माझ्या मायदेशांत आहेत, पण उच्च शिक्षण घेण्याची किंवा संशोधन करण्याची संधिच त्यांना मिळत नसल्यामुळं बिचारीं अंधारांतच राहिलीं आहेत आणि या पुढेंहि राहतील! परदेशाला उच्च शिक्षणासाठीं म्हणून जे विद्यार्थी निघाले आहेत त्यांतले कोणी जमिनदारांचे, कारखानदारांचे, गिरणी मालकांचे, मोठमोठ्या अधिकाऱ्यांचे चिरंजीव किंवा नातेवाईक आहेत, कारण परदेशांत जाऊन आलं कीं परंपरेनं चालत आलेलं सारं वैभव आपल्या पायापाशींच राहील अशी त्यांची खात्री आहे! केवळ स्वतःच्या असामान्य हुषारीवर जाणारे विद्यार्थी इथं नाहींत असं नाहीं, पण ते हाताच्या बोटावर मोजतां येतील येवढेच! या सामान्य बुद्धिमत्तेमुळंच सिनेमाच्या वेळीं शिट्या वाजविणारे आणि दिवसांतून पंधरा-सोळा तास झोपणारे विद्यार्थीहि इथं आहेत! परदेशाला जायचं म्हणजे प्रत्येक वस्तु सुरी–कांट्यानं खावी लागते हे वेड डोक्यांत घेऊन बोटींत पाऊल टाकलेला एक विद्यार्थी तर चक्क जेवणांतलं अखेरचं आईस्क्रीमहि सुरीकाट्यांनं खातांना दिसला, बिचाऱ्यानं कॉफीचा कप तरी तोंडाला लावला हे नशीब! विद्यार्थ्यांचे हें सारे नमुने पाहिले, कीं उद्यां उच्च विद्या विभूषित होऊन आपल्या मायभूमीची कीर्ति आणि वैभव हे विद्यार्थी वाढवितील यांवर माझा विश्वास बसत नाहीं, वाटलं तर मला निराशावादी म्हणा तुम्ही! आडांतच नाहीं तर पोहऱ्यांत येईल कुठून? मानवी बुद्धि म्हणजे कांहीं शरीरांतला एखादा अदृश्य भाग नव्हे, कीं चर्मचक्षुनां दिसला नाहीं तरी तो तिथं असेलच अशी खात्री देतां यावी! बुद्धिमत्ता कशाला म्हणायचं याची मीमांसा मानसशास्त्रवेत्त्यांनीं अनेक तऱ्हेनं केलेली असली तरी कोणत्याहि विषयांतलं मर्म

बिनचुक हुडकून काढण्याची शक्ति म्हणजे बुद्धि अशी सोपी, सुटसुटीत व्याख्या करायला मला तरी कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं आणि अशी बुद्धि इथं किती जणांच्या ठिकाणीं आहे हें मी आज बावीस दिवस पहातोंच आहे ! पण हे असंच चालणार आहे आणि त्याबद्दल खंत करीत बसण्याचंहि कारण नाहीं, कारण जोंपर्यंत पैसा हेंच समाजांतला श्रेष्ठपणा मोजण्याचं साधन समाज मानीत राहील तोंपर्यंत तो हातीं असणारेच समाजाचीं सारीं सूत्रं आपल्या हातांत ठेवतील हें सांगायला कोणी भविष्यवादी का हवा ?

थोड्या भलत्याच विषयांत मी शिरलों, नाहीं ? उच्च शिक्षणासाठीं परदेशाला जायला निघालेले बहुतेक विद्यार्थी अगदीं सामान्य आहेत हें सांगतां सांगतां आमच्या समाजरचनेचींच ही फळं आहेत, या विचारसरणीवरच आलों कीं मी ! जाऊं द्या ! मात्र आश्चर्य असं, कीं हे सारे विद्यार्थी बुद्धिमान् आहेत असं आमचे सारे भोळे–भाबडे लोक मानीत आहेत. माझ्या घरावर 'इथं प्रामाणिक माणूस राहतों' अशी पाटी मी लावली आणि माझ्या रोजच्या वागण्यांत तो प्रामाणिकपणा दिसला नाहीं तर या पाटीवरून का तुम्ही मला प्रामाणिक माणूस मानणार आहां ? इथं दिसणारे हे 'बुद्धिमान्' विद्यार्थीहि याच जातीतले मला तरी दिसले !

आमची बोट रोज पुढें पुढें चाललीच होती. समुद्र कधीं शांत तर कधीं क्षुब्ध, कधीं काळा तर कधीं निळा, कधीं उष्ण तर कधीं थंड, असा रोज बदलतच होता. सागराचा हा लहरीपणा पाहिला, कीं मोठेपणा आणि लहरीपणा हीं अभिन्न असावींत हे खरं वाटूं लागतं. एकसारखं हालणाऱ्या या अफाट जलाशयाकडे पाहत राहिलं कीं मन कसं सुन्न होतं आणि मनाला कसलाच चाळा नसला कीं या पाण्याकडे पहातां पहातांच कोल्हापुरांतलीं, सांगलींतलीं, सोलापुरांतलीं, साताऱ्यांतलीं, रत्नागिरींतलीं, पुण्यातलीं, मुंबईतलीं अनेक स्थळं मला दिसूं लागतात, अगदीं जवळच्या नात्यांतल्या माणसाच्या भोंवतीं माझं मन घुटमळत राहतं आणि या साऱ्यांच्या आठवणीनं मन गहिवरून येतं. I am home sick असं बरेचजण म्हणतांना मी ऐकतों त्याचा असाच कांहीं तरी अर्थ असावा. सहा हजार मैलांवरूनहि ही दृश्यं पाहाण्याची आणि आठवणी ताज्या ठेवण्याची मानवी मनाची ही अमोघ शक्ति पाहिली कीं, सागराची अगाधता आणि आकाशाचा विस्तार यांची अपूर्वाई वाटेनाशी होते आणि माणसाचं मन हें सागरापेक्षांहि खोल आणि आकाशापेक्षांहि विशाल असलं पाहिजे याबद्दल शंका उरत नाहीं.

माझ्या मनाचे हे सारे खेळ चालू असतांना काळाची अखंड गति पुढें पुढें चालूच

होती. आतां प्रवासांतले अखेरचे दिवस सुरू झाले होते. ज्यांची सोबत इतके दिवस लाभली त्यांचा सहवास आतां संपणार होता आणि रात्रीं निवाऱ्यासाठीं एकत्र जमलेले पक्षी सकाळ झाल्याबरोबर पुन्हां आकाशांत उडूं लागावे तशी कलकत्त्याची, पाटण्याची, नागपूरची, मद्रासची, कूर्गची, ओरिसाची, मसूरीची, पुण्याची आणि मुंबईची ही सारीं पांखरं लिव्हरपूलला उतरल्या बरोबर लंडनला, एडिंबरोला, मँचेस्टरला, ग्लासगोला, डब्लीनला, लीडस्‌ला, ऑक्सफर्डला आणि केंब्रीजला उडून जाणार होती. त्यांची अखेरचीं निरोपाचीं बोलणीं आतां सुरू झालीं होतीं. कोणी पुन्हा सुटींत भेटण्याबद्दल बजावीत होते, कोणी पत्रांनं तरी मैत्रीचे बंध कायम ठेवण्याबद्दल विनवीत होते आणि कोणी कदाचित् आपण भेटूं किंवा नाहीं या शंकेनं विव्हळ झाले होते !

पण बोटीवरच्या आठ-नऊ दिवसांच्या या कंटाळवाण्या प्रवासांतहि उल्हासाचं नवं वारं भरलं तें अखेरच्या दोन दिवसांत. सारे निरोपाचे समारंभ आतां सुरू झाले होते. रोजच्या इंग्रजी संगीताच्या आणि खेळांच्या कार्यक्रमांत भारतीय नृत्याच्या कार्यक्रमामुळं चांगलाच रुचिपालट झाला आणि उतरण्याच्या आदल्या दिवशीं बोटीवरील छोट्या छोट्या मुलामुलींच्या धांवण्याच्या आणि इतर खेळांच्या ज्या चढाओढी झाल्या त्यामुळं आपण एका बोटीवरून समुद्रप्रवास करीत आहों याची कांहीं काळ तरी विस्मृति झाली. किंबहुना या साऱ्या प्रवासांतला कांहीं कंटाळ-वाणा भाग सोडला तर आपण एका बोटींत नसून एखाद्या प्रशस्त, सर्व सुखसोयींनीं सज्ज असलेल्या बादशाही हॉटेलांत थोड्या मुक्कामासाठीं उतरलों आहों असा भास सदैव होत असे. इथं काय नव्हतं ? उंची खाद्यपेयं होती, करमणुकीसाठीं नाना तऱ्हेचे खेळ होते, चित्रपट होते, नाच होते, खोलींखोलींत गरम आणि थंड पाण्याचे नळ होते, सेवातत्पर नोकर होते, सारं कांहीं होतं ! या साऱ्यांचा आतां निरोप घ्यायचा होता म्हणूनच या निरोपाच्या समारंभानाहि एक निराशेची अस्पष्ट कडा होती, पण ती निराशाहि अखेर बुडाली ती निरोपाचं बोटीवरील अखेरचं जेवण झालं त्या वेळच्या उल्हासाच्या धबधब्यांत ! जेवणाचा नेहमींचाच हॉल येवढ्या आकर्षक रीतीनं सजविलेला होता, कीं श्रीमंत माणसंसुद्धां लग्न समारंभाचे वेळीं लग्नमंडप असे शृंगारीत नसतील. रंगी बेरंगी फुगे सर्वत्र टांगले होते, उंची खाद्यं पुढ्यांत आणून ठेवलीं जात होतीं आणि या समारंभा-साठीं मुद्दाम तयार केलेल्या अनेक रंगाच्या कागदी टोप्या डोक्यावर ठेवून, हातांतल्या पिपाण्या तऱ्हेतऱ्हेनं वाजवून आणि डोक्यावर टांगलेले फुगे सिगारेटचं

जळतं टोक, टांचणी इतकंच काय पण दुसरं कांहीं साधन मिळालं नाहीं तर टेबलावरचा कांटा (fork) टोंचून हे फुगे फटाफट फोडले जात होते. या जगांत कुठें दुःख, दारिद्र्य, निराशा, अपमान, व्याधी असतील असं या क्षणीं वाटतच नव्हतं. या साऱ्या गोष्टींना इथं अवकाशच नव्हता. मध्य रात्र उलटून गेली तरी हे सारं चाललं होतं. जेवणाच्यावेळीं घातलेल्या टोप्या तशाच डोक्यावर ठेवून पुरुष आणि स्त्रिया डेकवरून धांवत एकमेकांच्या खोड्या काढीत हिंडत होत्या, उरले-सुरले फुगे इथं फोडले जात होते. रंगी बेरंगी टोप्यांवर तर मोठी मिस्किल वाक्यंहि क्वचित् लिहिलेलीं होतीं. 'Young at heart,' 'You need me now' या सारख्या वाक्यांवरून इंग्लिश माणसाच्या अंतःकरणांतला रंगेलपणा सर्वत्र थयथय नाचत होता...

हे सारं होतां होतांच इंग्लंडचा किनारा अखेर दिसूं लागला तसा सारा मनु पुन्हां पालटला. बाहेर समुद्र आतां शांत होता, पण मनःसागरांत उल्हासाच्या आणि हर्षाच्या लाटा आतां उसळूं लागल्या होत्या. इंग्लंड! ज्या इंग्लंडला जायची इच्छा माझ्या बालपणापासून मी धरली होती तेंच हें इंग्लंड! गेल्या सहा महिन्यांतल्या आशा–निराशेच्या खेळामुळं माझ्या स्वप्नभूमींतून सदैव दूरदूर जात होतं तेंच हें इंग्लंड! साम्राज्याचे उदय आणि अस्त झाले तरी ज्या देशांतील विश्वविद्यालयांनीं ज्ञानाच्या उपासनेंत कधीं खंड पडूं दिला नाहीं तोच हा इंग्लंड देश! संकटकालींहि ज्या देशांतील लोकांचं नैतिक धैर्य कधीं खचलं नाहीं आणि आपल्या देशाच्या मोठेपणावरील श्रद्धा कधीं ढळली नाहीं तोच हा इंग्लंड देश! ज्या देशानं लोकमताची कदर न करणाऱ्या राजालाहि उघडपणें फांसावर लटकविलं आणि ज्या देशाच्या राजाला आपल्या ऐहिक साम्राज्यापेक्षां स्वतःच्या अंतःकरणांतल्या प्रीतीचं वैभव अधिक लोभनीय वाटलं आणि म्हणूनच प्रीतीसाठीं राज्यत्याग करतांनाहि ज्याचं मन कचरलं नाहीं, तोच हा देश! पिट आणि बर्क, शॉ आणि शेक्सपिअर, ग्लॅड्स्टन आणि डिझरेली, कीट्स् आणि शेले, लॉईड जार्ज आणि चर्चिल, फ्लेमिंग आणि रुदरफोर्ड यांची कर्मभूमि झालेला हाच तो भाग्यशाली देश! याच देशाच्या भूमीवर मी आतां पाऊल टाकणार होतों आणि सतरा वर्षांनंतर कां असेना, पण माझी विद्यार्थीदशा परत येणार होती तीहि याच देशांत!

तुमचा,

वि. वा. पत्की

## : ५ :

# इंग्लंडांतील दैनंदिन जीवन—१

★

६, सॉंडर्स ग्रव्ह,
लंडन ( डब्ल्यू. ११ )
१६ ऑक्टोबर, १९५५

प्रिय बाळासाहेब,

वृत्तपत्रलेखनाच्या शिक्षणासाठीं इंग्लंडला यायचं मी ठरविलं तेव्हां ज्या अनेक गोष्टींबद्दल माझ्या मनांत कुतुहल होतं त्यापैकीं लंडन शहरांतली ट्यूब रेल्वे ही एक होती. लंडनमध्यें मुंबईसारख्या लोकलगाड्या कुठें दिसत नाहींत असं मी ऐकलं होतं, मग या आगगाड्या जातात तरी कुठून आणि कशा हे कोडं माझ्या मनाला सारखं वाटत आलं होतं आणि म्हणूनच १ ऑक्टोबर रोजीं लंडनमध्यें आल्यानंतर मी ज्या ठिकाणीं शिकायला जाणार होतों त्या पॉलिटेक्निक संस्थेकडे जाण्याचं वरवर निमित्त सांगून लंडनमध्यें पाऊल ठेवल्यापासून दोन तासांच्या आंत मी घरांतून बाहेर पडलों तो या ट्यूब रेल्वेंत बसण्यासाठींच. मला ज्या ठिकाणी शिकायला जायचं होतं ती संस्था तर शक्यतों लवकर पहायची होतीच पण ही संस्था पहायला जायचं तर ट्यूबनंच जाणं सोयीस्कर आहे असं मला समजलं तसा मला मोठा आनंद झाला. माझी संस्था तर मला पहायला मिळणार होतीच, पण ट्यूबमध्यें बसायचा आनंद अनायासें लाभणार होता. एका दगडानं दोन पक्षी मी मारणार होतों !

मी ज्या ठिकाणी उतरलों होतो त्या ठिकाणाहून अगदीं जवळच्या ट्यूब स्टेशनकडे माझे आतेभाऊ श्री. विठ्ठल वर्टीकर यानीं मला नेलं तेव्हां केवढ्या उत्साहानं मी त्याच्याबरोबर गेलो, पण कुठे स्टेशनच दिसेना तेव्हां मला मोठा अचंबा वाटला. शेवटीं रस्त्यानं जातां जातांच विठ्ठल मला म्हणाला,

"हे पहा तुमचं स्टेशन. याचं नांव शेफर्ड्स् बुश्. या ठिकाणाहून आतां रोज तुम्हांला ऑक्सफर्ड सर्कस स्टेशनला जावं लागणार आहे. त्या स्टेशनपासून अवघ्या पांच मिनिटांच्या रस्त्यावर आहे तुमची पॉलिटेक."

एखाद्या अद्‌भुत वस्तूकडे मुलानं भयचकित दृष्टीनं पाहावं तसा या स्टेशनकडे मी नुसता पाहातच राहिलों. रस्त्याला आजुबाजूला जीं दुकानं होती तीं संपली कीं आतां स्टेशन येईल अशी माझी अपेक्षा होती. पण या या दुकानांच्या रांगेतच एक खूप मोठा रुंद दरवाजा दिसला, तसं थांबून विठ्ठल म्हणाला होता,

"पुढे कुठें चाललांत, हेंच तुमचं स्टेशन !"

मी पहातच राहिलों. स्टेशन कुठेंच दिसत नव्हतं. स्टेशन म्हटलं, कीं प्लॅट-फॉर्म, रूळ असले पाहिजेत ही माझी कल्पना, पण इथं नुसती पाटी होती—"London Transport: Shepherds Bush" आणि आंत शिरल्यावर तिकीट ऑफिस ! स्टेशन कुठें आहे असं विचारूं तरी कसं, असं मला होऊन गेलं. अगदींचं गांवढळ ठरलों असतो कीं मी! तरीहि धीर करून मी म्हटलंच,

"कितीसं लांब आहे स्टेशन ?"

"लांब ? खोल विचारा वाटलं तर !..."

"खोल ?..."

"होय, साठ—सत्तर पायऱ्या उतरून आपण खालीं गेलों कीं दिसेल तुम्हांला स्टेशन...."

हे ऐकतांना, कां कुणास ठाऊक, कसल्या तरी अनामिक भीतीनं माझ्या अंगावर कांटा उभा राहिला. पण आतां थांबायला वेळ होता कुठें ? लोकांची विलक्षण गर्दी स्टेशनच्या दिशेनं पुढें पुढें सरकत होती आणि या लोंढ्याबरोबर वाहात जाण्यावांचून मग गत्यंतरच नव्हतं.

पण अशी पंधरा–वीस पावलं चालून गेल्यावर समोर जें दिसलं ते पाहून माझं मन थोडंसं तरी गांगरून गेलं आणि मी स्वतःशींच उद्‌गारलों, 'अरे, बापरे!...'

कारण, स्टेशनवर जाण्यासाठीं जो जिना होता त्याच्यावरून मुळीं चालत जावंच लागत नव्हतं. माणसं नुसती पुढें पुढें सरकत जात आहेत येवढंच दुरून माझ्या डोळ्यांना दिसत होतं आणि त्या जिन्यावर पाऊल टाकायचा क्षण जवळ येत होता तसं वाटत होतं, 'या ट्यूब रेल्वेशिवाय दुसरी वाहनंच नाहींत का या लंडनमध्यें प्रवास करण्यासाठीं ?... "

पण हा विचार मनांतून नाहींसा होण्यापूर्वींच मी जिन्याच्या पहिल्या पायरी-

जवळ येऊन अगदीं न कळत थांबलो होतों, तोंच विठ्ठलचे शब्द माझ्या कानावर आले, "घाबरूं नका. नुसतं एक पाऊल टाका पायरीवर, कीं कांहीं न करतांच आपण खालीं उतरून जाऊं. पहिल्यांदा मलासुद्धां भीति वाटायची आणि कित्येक दिवस तर मी बसनंच जायचा..."

इतकं होईपर्यंत दहा-पंधरा पायऱ्या खालीं खालीं सरकत आम्ही आलोंहि होतों. रस्ता, तिकीट ऑफिस किंवा रस्त्यावरची अफाट गर्दी कांहीं कांहीं दिसत नव्हतं ! प्रत्येक क्षणाला आपण खालीं खालीं एखाद्या भुयारांत प्रवेश करीत आहों असं वाटत होतं आणि जीव गुदमरून गेल्यासारखा वाटत होता. वास्तविक या ठिकाणी दिव्यांचा झगझगाट आणि वाऱ्याचा झोत एवढा प्रचंड होता कीं गुदमरून जाण्यासारखं कांहींच नव्हतं, पण आपण भुयारांत शिरत आहों, कुठें तरी खोल खोल दरींत जात आहों या जाणीवेची सुरुवातीला जी मानसिक प्रतिक्रिया होते तिच्यामुळं अवघडल्यासारखं झालं होतं आणि नको हा ट्यूबचा प्रवास असं वाटत होतं. ट्युबमध्यें बसण्याच्या आनंदापेक्षां हें भीतीचं आणि अद्भुततेचं दडपण माझ्या मनावर तरी येवढं प्रचंड होतं, कीं भुकेल्या माणसाला अंधाऱ्या खोलींत कोंडलं आणि पंचपक्वान्नाचं ताट त्याच्या पुढ्यांत ठेवलं कीं त्याची जी अवस्था होईल तीच माझीहि झाली होती...

पण हा जिना उतरून (?) आम्ही खालीं आलों तोंच खाड्–खाड् आवाजांत गाडी येऊन उभी राहिली. गाडीचे दरवाजे उघडले गेले. भराभर सारी माणसं आंत घुसलीं, तसा मीहि आंत शिरलो. गाडीचा दरवाजा पुन्हां खाड्कन बंद झाला आणि गाडी बोगद्यांत घुसली. विलक्षण वेगानं. सकाळीं लिव्हरपूरला मी उतरलों तेव्हापासून मी एक गोष्ट मनानं टिपली होती. ती म्हणजे गर्दीच्या ठिकाणींहि दिसणारी असामान्य शांतता. गर्दी म्हटली कीं, गडबड, गोंगाट असायचाच अशी संवय झालेल्या माझ्या मनाला या गोष्टीचं मोठं नवल वाटलं होतं, पण आतां या ट्यूबमध्यें त्याहिपेक्षां अधिक गर्दी असूनहि एक शब्दहि कुठून ऐकूं येत नव्हता. माणसं हंसत नव्हतीं, बोलत नव्हतीं येवढंच काय पण एकमेकां-च्याकडे पाहातहि नव्हतीं ! हातांत धरलेल्या उघड्या वर्तमानपत्रांत प्रत्येकानं आपलं डोकं खुपसलं होतं आणि ज्यांचं वाचनांत मन रमत नव्हतं ते सिगारेट ओढीत विमनस्कपणें कुठें तरी पहात होते. कुणीहि कुणाशीं बोलायचं नाहीं अशा संकेतानं सारे वागत होते, त्यामुळं गाडींत येवढी प्रचंड गर्दी असतांनासुद्धां कुणाचा शब्द म्हणून ऐकूं येत नव्हता. कदाचित् यामुळंच कीं काय, बोगद्यांतून

जाणाऱ्या गाडीचा आवाज कानठळ्या बसविणारा आहे असं वाटत होतं आणि ही निःशब्द शांतताहि मनाला असह्य होत होती. परिचय झाल्याशिवाय किंवा करून दिल्याशिवाय पाश्चिमात्य देशांत कुणी कुणाशीं बोलत नाहीं असं मी ऐकत होतों त्याचा प्रत्यय या पहिल्या दिवशींच आला होता आणि पाश्चिमात्यांच्या या वागण्याचा उपहास करणारी एक गोष्ट पुनः पुन्हां माझ्या मनांत येत होती. पोहायला गेलेला एक मनुष्य बुडत आहे हें किनाऱ्यावरून पाहाणारा त्याला वांचविण्याऐवजीं 'Oh! Had I been introduced to him!' (अरेरे! याची माझी ओळख असती तर...) असं म्हणतो आणि बुडणाऱ्याला वांचविण्याचा प्रयत्नहि करीत नाहीं अशी ती हकिगत आहे. ही कथा कदाचित् काल्पनिक किंवा अतिरंजितहि असेल, पण पाश्चिमात्यांच्या वागणुकीवर उपहासाचे कोरडे ओढणारी आहे, यांत कांहींच शंका नाहीं. या वागणुकीमुळंच असेल, पण आम्हां पौर्वात्यांना आपण परक्या ठिकाणी आलों आहों असं सारखं वाटत राहातं. अगदीं सर्वांनांच. परवा गाडींत खरंच असा प्रकार घडला. माझ्या शिक्षण संस्थेतून परत येतांना मी ऑक्सफर्ड सर्कस स्टेशनमध्यें शिरलों तेव्हां एक गृहस्थ गर्दीतून वाट काढीत काढीत घाईघाईनं माझ्याजवळ आले आणि मला म्हणाले.

"Do you come from the East?" (तुम्ही पौर्वात्य देशांतले आहां काय?...")

"Yes, I come from India" (होय, मी हिंदुस्थानांतला आहे) मी म्हटलं.

माझं हे उत्तर ऐकून त्यांना विलक्षण आनंद झाला आणि माझा हात आपल्या हातांत घेत त्यानीं म्हटलं,

"From India? Nehru s India?' (हिंदुस्थानांतून? नेहरूंच्या हिंदुस्थानांतून?)

पंडित नेहरूंचा उल्लेख ऐकतांच माझ्या अंगावर मूठभर मांसच ढल्यासारखं मला वाटलं, मी त्यांना 'होय' म्हणत त्यांची चौकशी केली आणि ते सिंगापूरचे आहेत असं कळतांच मलाहि आनंद झाला. येवढी अफाट गर्दी इथं असते, पण एकमेकांची येवढ्या आस्थेनं चौकशी करणारी माणसं सहाऱ्यांतल्या पाणथळ जागेसारखीच दुर्मिळ असावीं हें केवढं आश्चर्य!

अरेच्या! हें काय भलत्याच विषयाबद्दल सांगत बसलों कीं मी! सांगायचा मुद्दा येवढाच, कीं गाडीच्या प्रवासांतच काय पण इतर ठिकाणींहि माणसं उगीचच बोलत उभी असलेली इथं कुठंच दिसत नाहींत आणि क्वचित् बोललींच तर

येवढ्या हळु आवाजांत बोलतात, कीं आपल्या बोलण्यानं कुणाला त्रास होऊं नये. त्यामुळं गाडी स्टेशनांत उभी राहिली, कीं बुटांच्या ठोक्-ठोक् अशा आवाजांचे प्रतिध्वनीच काय ते घुमत राहातात, त्या वरून माणसं चालूं लागलीं आहेत असं आंधळ्या माणसालाहि ओळखतां येईल. माणसं मोठमोठ्यानं बोलतांना दिसलीं कीं खुशाल ओळखावं कीं हीं परदेशातनं आलेलीं आहेत. भारतांतून किंवा पौर्वात्य राष्ट्रांतून आलेलीं माणसं सुरुवातीला खरोखरच सार्वजनिक ठिकाणीं मोठ्यानं बोलतात, पण येथल्या जीवनांत ती एकदां रुळूं लागलीं, कीं या देशाचा गुण त्यांच्यांतहि उतरूं लागतो, तींहि अबोल होतात! एकंदरींत इंग्रज माणसाला फार बोलणं आवडतच नसावं असं मला वाटूं लागलं आहे. माझ्याबरोबर वृत्तपत्रलेखनाचा अभ्यास करणारे जे विद्यार्थी आहेत त्यांतले परदेशांतून आलेले विद्यार्थी मोकळेपणानं एकमेकाशीं बोलतात, पण इथले विद्यार्थी मात्र भेटल्याबरोबर 'Good Morning' म्हणून हंसण्यापलीकडे आपल्या शब्दसंपत्तीची उधळपट्टी होऊं देत नाहींत.

ट्यूब रेल्वेबद्दल सांगत होतो नाहीं का मी? शेफर्डस् बुश स्टेशन पासून मला ऑक्सफर्ड सर्कसला जायचं होतं, पण आपल्याला कुठें जायचं आहे आणि तें स्टेशन कधी येणार आहे हे गाडींतल्या गाडींत कळावं अशी मोठी छान व्यवस्था प्रत्येक डब्यांत असते. लंडन शहर अफाट आहे खरं, पण या ट्यूब रेल्वेचं येवढं अजस्र जाळं लंडन शहराच्या पोटांत पसरलेलं आहे कीं पाहाणाराला आश्चर्य वाटावं. या रेल्वेचे निरनिराळे सात मार्ग आहेत आणि ज्या मार्गावरून गाडी जात असते त्या मार्गाचा सबंध नकाशा प्रत्येक डब्यांत अनेक ठिकाणी चिकटविलेला असतो आणि तोहि इतक्या सोयीस्कर रीतीनं कीं प्रत्येक प्रवाशाला आपल्या जागेवरून तो स्पष्टपणें दिसावा आणि वाचता यावा. या सर्व मार्गावर मिळून लंडन शहरांत जवळ जवळ २७५ रेल्वे स्टेशनं आहेत, यावरून शहराच्या विस्ताराची व वहातुकीची थोडीशी तरी कल्पना येते का पहा. ट्यूब रेल्वेचे निरनिराळे मार्ग दाखविणारे छोटे नकाशे प्रत्येक स्टेशनवर फुकट मिळतात आणि हा नकाशा हातांत असला आणि आपणाला कुठें जायचं येवढं माहित असलं, कीं जगांतल्या या सर्वांत मोठ्या शहरांत लिहितां-वाचतां येणाऱ्या कोणाहि माणसाला इच्छित स्थळीं कुणाला न विचारतांहि सहज जातां येतं, इतकी चोख व्यवस्था केलेली आहे या ट्यूब रेल्वेनं. प्रत्येक स्टेशन हे जमिनीपासून ५० फुटापासून २०० फुटांपर्यंत खालीं तळघरांत असल्यासारखं आहे आणि त्यामुळं

नवख्या माणसाला भांबावल्यासारखं होण्याचाहि भीति असते, पण गाडींतून एकदां खालीं उतरलं, कीं वर रस्त्यावर कसं आणि कुठून जायचं हें दाखविणाऱ्या पाट्या समोर दिसूं लागतात आणि एक पाटी दिसेनाशी होईपर्यंत दुसरी दिसूं लागते आणि अखेर रस्त्यावर आणणाऱ्या फिरत्या जिन्यावर आपण अगदीं सहज येतो. हे सरकते जिने ( escalators ) सारखे फिरतच असतात आणि एक पाऊल टाकून त्यांच्यावर उभं राहिलं कीं एक दोन मिनिटांतच रस्त्यावर पुन्हां येता येतं. स्टेशनमध्यें गाडी पकडण्यासाठीं जातांना जिना खालीं जातो तेव्हां प्रथम भीति वाटते, पण गाडींतून उतरून तशाच तऱ्हेच्या, पण उलट्या गतीनं फिरणाऱ्या, जिन्यावरून आपण वर वर येऊं लागतो तेव्हां सुरवाती-सुरवातीला तरी फार बरं वाटतं. पाताळांतून पृथ्वीवर येत आहों या भावनेनं मन प्रसन्न होतं. एकंदरींत अधोगति वाईट आणि उन्नति चांगली हेंच खरं!

मला ज्या ठिकाणीं शिकायला जायचं होतं त्या ठिकाणी जाऊन आल्यावर बाजारातनंहि एक फेरफटाका मारायचं माझ्या मनांत होतं. मी तसं माझ्या आते-भावाला सांगितलं तेव्हां तो म्हणाला,

"आता पांच वाजून गेले आहेत. एकसुद्धां दुकान उघडं दिसायचं नाहीं आतां तुम्हांला..."

"म्हणजे ? इथं पांच वाजल्यानंतर कांहीं विकत घेतां येतच नाहीं की काय ?..."

"होय" तो म्हणाला, "सकाळीं नऊ वाजले, कीं इथं दुकानं उघडतात, पांच वाजले कीं बंद होतात. आणखी फार तर अर्धा तास भाज्या आणि फळं विकणाऱ्या गाड्या रस्त्यावर दिसतात. पण त्यानंतर मात्र सारा शुकशुकाट असतो."

तरीहि बंद झालेल्या बाजारांतूनहि एकदां फिरून यायचा आग्रह मी धरला आणि मी ज्या भागांत राहतो त्या भागांतून उगीचच आम्ही फिरलो. आश्चर्य असं, कीं पांच वाजून गेल्यामुळं दुकानांतून माणसं नव्हतीं खरीं, पण सारीं दुकानं मात्र उघडीं असल्यासारखी दिसत होतीं. याचं कारण असं, कीं इथं प्रत्येक दुकानाला फार मोठी 'शो रूम' असते आणि दुकानांतल्या साऱ्या वस्तु मोठ्या आकर्षक रीतीनं किंमतीच्या चिठ्या प्रत्येक वस्तूला लावून, या शो रूममध्यें मांडून ठेवलेल्या असतात आणि झगझगीत प्रकाशाचे झोत या वस्तूंवर सोडलेले असतात, त्यामुळं दुकानांत माणसं नसलीं तरी या शो रूममुळं दुकान चालूच आहे कीं काय असा भास नवख्या माणसाला होतो, पण दुकानाचा जो दरवाजा

असतो त्याच्यावर CLOSED किंवा OPEN अशी जी पाटी असते त्यावरून दुकान बंद आहे कीं सुरू आहे हें ओळखायचं असतं आणि शो रूममधली वस्तु पसंत पडली असेल तर ती मागण्यासाठींच फक्त दार लोटून आंत जायचं असतं. इथं माणसाच्या श्रमाला फार किंमत पडत असल्यामुळं दुकानांतील वस्तु विकणारी व्यक्ति वस्तु आणून देऊन किंमत घेण्यापलिकडे कांहीं फारसं करीत नाहीं. घासा-घीस करणं, किंमत ठरविणं या गोष्टी त्यामुळंच इथं अजिबात दिसत नाहींत. जणूं शब्दांनी बोलण्याची इथं गरजच नसते. डोळ्यांनीं वस्तु पहायची, किंमत द्यायची, पैसे परत येणार असले तर दुकानदारानं तें हातावर ठेवले कीं वस्तु घेऊन बाहेर पडायचं ! शब्दाची आणि भाषेची गरज आहेच कुठें ? आणि हेहि सगळं मोजक्या वेळांत ! सकाळीं नऊ ते संध्याकाळीं पांच-बस्स ! प्रत्येक माणसाला सामाजिक जीवन आहे याची जाणीव इथं उघड दिसते, मग तो भाजी विकणारा दुकानदार असो, न्हावी असो, धोबी असो, डॉक्टर असो, शिक्षक असो कीं मंत्री असो ! प्रत्येकानं आपलं नेमलेलं काम केलं, कीं त्याला त्याच्या खाजगी जीवनासाठी मोकळा वेळ दिलाच पाहिजे हा संकेत साऱ्या समाजानं मान्य केला आहे, म्हणूनच पांच वाजले की सारीं दुकानं बंद होऊं शकतात आणि रविवारीं संपूर्ण सुटी मिळूं शकते. सामाजिक जीवनाची ही घडी पाहिली, कीं आपणालाहि यापासून पुष्कळ शिकतां येईल, असं नाही तुम्हांला वाटत ?

तुमचा,

वि. वा. पत्की

: ६ :

# इंग्लंडांतील दैनंदिन जीवन — २

★

६, सॉंडर्स ग्रव्ह,
लंडन (डब्ल्यू. ११)
१ नोव्हेंबर, १९५५

प्रिय बाळासाहेब,

इंग्लंडसारख्या पाश्चिमात्य देशांत जायचं म्हटलं, कीं निदान बोलण्यापुरती तरी इंग्रजी भाषा आली पाहिजे हें प्रत्येकाला माहित असतं. पण इकडे येऊन पोंचल्याबरोबर पहिलीच अडचण येते ती भाषा समजण्याची. आम्ही इंग्रजी भाषेचे केवढेहि पंडित असलों आणि भाषाशास्त्राचा केवढाहि गाढ अभ्यास आम्ही केलेला असला तरी इकडे आल्याबरोबर प्रथम ज्यांच्याशीं संबंध येतो त्यांचं बोलणं नीट ऐकूनहि समजत नाहीं आणि सुरुवातीला तरी आपल्या मनांत उगीचच एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण होतो. आम्ही नोकरीसाठीं, व्यापारासाठीं किंवा शिक्षणासाठीं आलेलों असलों तरी प्रथम गांठ पडते ती धक्क्यावरच्या, स्टेशनवरच्या किंवा विमानतळावरच्या पोर्टरशीं, तिकीट कलेक्टरशीं, टॅक्सी ड्रायव्हरशीं, कंडक्टरशीं हॉटेलांतल्या वेट्रेसशीं किंवा अशाच कोणत्या तरी माणसाशीं! आणि हीं सारीं माणसं तर अशा कांहीं बोलीभाषेंत बोलत असतात कीं त्यांना काय म्हणायचं असतं हेंच नीट समजत नाहीं आणि त्यांना टाळून तर पुढें जातां येत नाहीं अशा पेंचांत नवा माणूस सांपडतो! पण सर्वच माणसांचं बोलणं समजत नाहीं असं मात्र नव्हे. इथं आल्यानंतर दुसऱ्याच दिवशीं मी इंडिया हाऊसमध्यें महात्माजींच्या वाढदिवस समारंभासाठीं गेलों होतों. त्यावेळीं भारताचे एक मित्र होरेस अलेक्झँडर यांनी गांधीजींच्या तत्त्वज्ञानावर केलेलं भाषण शब्द न् शब्द मला समजलं आणि माझ्या वृत्तपत्रलेखनाच्या वर्गांत शिक्षक जें बोलतात तेंहि मला समजतं, पण वर्गांतलीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
वि: 22८२L दि: 3.2.1.26.40
नों: दि:



आयर्लंड, स्कॉटलंडच काय पण इंग्लंडतल्या ससेक्स-इसेक्स परगण्यांतीलच नव्हे तर लंडनच्या परिसरांतीलहि मुलं बोलूं लागतात, विनोद करून खो खो हंसतात आणि शिक्षकांना कांहीं गंमतीचे (हें आम्हांला नंतर समजतं!) प्रश्न विचारून खसखस पिकवितात तेव्हां परदेशांतून आलेल्या आम्हां विद्यार्थ्यांचे चेहरे इजिप्तमधल्या स्फिंक्ससारखे अगदीं निर्विकार असतात! आणि प्रत्येकाची बोलण्याची पद्धत तरी किती निराळी! यांत अस्वाभाविक असंहि कांहीं नाहीं. आपण सगळे मराठी बोलणारे तरी एकाच पद्धतीनं कुठें बोलतों? मराठींत मनुष्य बोलूं लागला तरी हा कोंकणांतला, हा घाटावरचा, हा खानदेशांतला, हा वऱ्हाडचा हा फरक आपल्याहि लक्षांत येतोच कीं नाहीं? तसंच इथंहि आहे. इथला प्रत्येक माणूस इंग्रजी भाषाच बोलतो खरा, पण प्रत्येकाची बोलण्याची तऱ्हा वेगळी असते आणि तो बोलूं लागला, कीं तो कोणत्या भागांतील आहे हें सहज ओळखतां येतं (असं म्हणतात.) बर्नार्ड शॉ तर म्हणत असे कीं, इंग्लंडमधला माणूस बोलूं लागला कीं तो कोणत्या गल्लींत राहातो हेंहि मी सांगूं शकेन! इतकी भाषेची विविधता इथं आहे.

मात्र ही अडचण अगदीं थोड्या दिवसांपुरती असते. इथल्या जीवनाशीं आपण एकदां रुळूं लागलों कीं, सूर्यप्रकाशांत धुकं वितळूं लागावं तशी ही अडचण नाहींशी होते, पण माणसाला खरी संवय करावी लागते ती इथल्या हवेची. इंग्लंडची हवा फार थंड असते हें भूगोलाच्या पुस्तकांत वाचणं निराळं आणि प्रत्यक्ष हवेंतला गारठा अंगाला झोंबू लागला कीं कुडकुडणं निराळं! मी इकडे आलों तेव्हां ऑक्टोबरच्या सुरवातीला फारशी थंडी नव्हतीच, आणि पांच-सात दिवस तर अगदीं हिंदुस्थानांतल्या सारखंच स्वच्छ ऊन पडलं होतं, पण त्यानंतर सूर्यानं जी दडी मारली आहे तो आतां पुन्हां कदाचित् हिंवाळा संपल्यानंतरच तोंड दाखवील! इंग्लंडमध्यें ऊन पडलं कीं शाळांना सुटी देतात असं माझ्या लहानपणीं कुणी तरी म्हटल्याचं मला आठवतं. तशी सुटी इथं मुळींच मिळत नाहीं हें आतां मी अनुभवानं सांगूं शकतो, पण हिंवाळ्याच्या दिवसांत अशी सुटी द्यायची म्हटली तरी सुटीचे दिवस दोन-चार तरी येतील कीं नाही याची मला शंका आहे. सारा दिवस आकाश अभ्राच्छादित असतं आणि आपल्याकडे आषाढ-श्रावण महिन्यांत काळ्याकुट्ट पावसाळी ढगांनी आकाश भरलेलं असलं म्हणजे जसं अंधारून जातं, तसं इथं सारखं असतं. अजून कांहीं तसा हिंवाळा सुरु झालेला नाहीं, पण दिवस हळुहळु लहान होऊं लागले आहेत आणि संध्याकाळीं

पांच वाजले, कीं कसा चक्क अंधार झालेला असतो! या सगळ्या वातावरणाची इथं राहणाऱ्या माणसांना संवय असली तरी नवागताला सारंच नवल वाटत असतं. हिंवाळ्यांत पुढं पुढं तर दुपारीं साडेतीन वाजतांच अंधार पडूं लागतो आणि उन्हाळ्यांत रात्रीचे (?) दहा वाजले तरी सूर्य मावळत नाहीं म्हणतात, त्यामुळं इथं सारे व्यवहार करावे लागतांत ते घड्याळाकडे पाहून! अंधार पडल्यानंतर दीड दोन तासानीं जेवायचं म्हटलं तर इथं हिंवाळ्यांत संध्याकाळीं पांच वाजतां आणि उन्हाळ्यांत रात्रीं बारा वाजतां रात्रीचं जेवण जेवावं लागेल! कदाचित् या मुळंच असेल, इथं रात्रीचं जेवण संध्याकाळीं सहा साडेसहा वाजतांच घेण्याची पद्धत आहे, पण या 'डिनर' नंतर रात्रीं १० च्या सुमारास पुन्हां कॉफी, सॅंडविचीस, बिस्किटं असलेलं 'सपर'हि लोक घेतात आणि मग्न झोंपतात.

इंग्लंड देश इतर अनेक गोष्टींप्रमाणें हवेच्या लहरीपणाबद्दल सुविख्यातच आहे. इथं कोणत्या वेळीं पाऊस पडेल याला नियमच नसतो. म्हणजे खरं सांगायचं तर नियम असतो, पण तो सामान्य माणसाला माहित नसतो. हवामान शास्त्रानुसार हा अंदाज सांगता येतो आणि म्हणून रोजच्या वर्तमानपत्रांत आज हवा कशी काय रहाणार आहे हें वाचायची लोकांना संवय झाली आहे. सगळीं वर्तमानपत्रंहि 'आज सबंध दिवस पावसाची बुरबुर (drizzle) राहील, पण मधून मधून ऊन (sunny intervals) पडेल, किंवा 'आज सबंध दिवस धुके राहील' किंवा 'जोराची वृष्टि (heavy showers) होईल' असे अंदाज प्रसिद्ध करीत असतात आणि ते वाचल्यावांचून लोकांचं समाधान होत नाहीं. धुकं तर नेहमींच असतं आणि इंग्लंड हा मूख्यतः उद्योगधंद्यांचा देश असल्यामुळं मोठ्या शहरांतून धुक्या (fog) च्या जोडीला धूर (smoke) हि असतो. इंग्रज लोक हे स्वभावतःच मित-भाषी असल्यामुळंच कीं काय There is smoke and fog असं न म्हणतां There is smog असें म्हणून शब्दांची बचत करीत असतात! हा शब्द अर्थातच शब्दकोशांत नाहीं, पण लोकांच्या बोलींत मात्र तो सर्रास वापरला जातो. हा शब्द प्रथम अमेरिकेंत जन्माला आला म्हणतात, पण व्यवहारचतुर ब्रिटिश लोकांनीं तो तात्काळ उचलला आणि तो वापरून त्याच्यावरील आपली मालकी प्रस्थापित केली. दुसऱ्याची वस्तु आपली म्हणून खुशाल वापरण्यांत ब्रिटिश लोक किती तरबेज आहेत हें चांगलं दीडशें वर्षे आपण पाहिलंच आहे कीं!

इथल्या थंड हवेला आवश्यक अशीच येथील एकंदर घरांचीहि ठेवण आणि

रचना आहे. हवेंत सामान्यतः गारठा असतोच व हिंवाळ्यांत तो वाढतो यामुळं बाहेरच्या थंडीपासून निवारण करण्यासाठीं शक्यतों बाहेरची गार हवा आंत येणार नाहीं अशाच खिडक्या आणि दारं असतात. प्रत्येक घराला आणि खोलीला चांगली पांच-सहा फूट उंचीची आणि साडेतीन-चार फूट रुंदीची अखंड काचा असलेली खिडकी असते. त्यामुळं ती खिडकी सदैव बंद राहिली तरी बाहेरचा प्रकाश आंत येऊं शकतो आणि थंडीला मात्र आंत प्रवेश मिळत नाहीं. प्रत्येक घरांत किंवा खोलींत विजेचा, गॅसचा किंवा साधा कोळशाचा 'फायर' असावाच लागतो, कारण कडाक्याची थंडी पडली, कीं उष्णता निर्माण करणाऱ्या या साधना-शिवाय राहाणंच अशक्य होऊन जाईल. पारशी लोक अग्नीची देव म्हणून पूजा करीत असले तरी इथं गरज म्हणूनच अग्निला प्रत्येक घरांत स्थान आहे आणि म्हणूनच Home aud Hearth या इंग्रजी शब्दप्रयोगाचा अर्थ इंग्रज माणसाचं घर पाहिल्यावांचून नीट समजायचाहि नाहीं. किंबहुना, हा घरांतला 'फायर' सदा धगधगत राहाण्यावरच इथं माणसाचं जिणं अवलंबून होतं आणि आतां विजेचं बटन दाबलं किंवा गॅसची किल्ली फिरविली, कीं अग्नि प्रज्वलित होत असला तरी वीज किंवा गॅस येण्यापूर्वी प्रत्येक घरांत हें अग्निकुंड सदा पेटतं असे, हें विसरतां कामा नये. आतां जुन्या साधनांचं आधुनिकीकरण झाल्यामुळं जुने शब्दप्रयोग अप्रयोजक वाटले तरी त्यांच्यामागं राष्ट्राची परंपरा आणि संस्कृति आहे, हें लक्षांत आल्या-वांचून राहात नाहीं. हल्लीं वीज आणि गॅस यांचा सर्रास उपयोग होऊं लागल्यामुळं प्रत्येक घरावर दिसणारीं धुराडीं अनावश्यक वाटलीं तरी इंग्लिश घराचं तें वैशिष्टय इथं कुठेंहि गेलं तरी दृष्टीस पडतं. घरांतल्या गॅसच्या शेगडीला तर आतां मीटरच बसविलेलें असतात आणि पेटणारी शेगडी विझूं लागतांच मीटरमध्यें शिलिंगाचं नाणं टाकल्याबरोबर शेगडी पेटूं लागते हा चमत्कार पाहिला, कीं मोठी गंमत वाटते. पैसा मिळाला कीं ब्रिटिश माणूस केवढ्या तत्परतेनं आपलं काम करतो यांचें हें प्रतीकच वाटतं मला! युद्धभूमीवर ब्रिटिशानीं नेपोलियनचा पराभव केला असला तरी 'दुकानदारांचा देश' (A nation of shopkeepers) हे त्यानं ब्रिटिशांचं केलेलं वर्णन किती अचूक होतं याची खात्री पटते हें सारं पाहून!

इथं राहाण्याच्या घरांचं आणि भाड्याच्या खोल्यांचं जे वैपुल्य आहे तें पाहून मात्र जागेच्या टंचाईनं हैराण झालेल्या आणि राहायला जागा मिळत नाहीं म्हणून सक्तीनं ब्रह्मचारी राहाणाऱ्या भारतांतल्या नगरवासी लोकांना लंडनचं खचित मोठं आकर्षण वाटेल. पण राहाण्याच्या जागेचा प्रश्न केवळ यदृच्छया सुटलेला आहे,

असं मात्र नव्हे. माणसाला चांगल्या अन्नाइतकीच राहाण्याच्या चांगल्या जागेचीहि आवश्यकता असते हें ओळखून जागृत राजकीय पक्षांनी सरकारला आपल्या कार्यक्रमांत घरबांधणीचा प्रश्नहि हातीं घ्यायला भाग पाडलं, अनेक हाऊसिंग सोसायट्यानीं शेंकडो नवीं घरं बांधलीं, त्यामुळं युद्धकालांत बॉंब हल्ल्यानं अनेक घरं उध्वस्त झालीं असतांहि राहायच्या घरांची टंचाई लोकांना भासली नाहीं आणि राहण्याच्या जागेचा प्रश्न सुलभ झाला. त्यामुळंच रोजच्या वर्तमानपत्रांत रिकाम्या जागांच्या जाहिराती तर असतातच (केवळ राहाण्याच्या जागांची माहिती देणारं एक नियतकालिकच इंग्लंडांत आहे !) पण कुठेंहि फिरत गेलं तरी Rooms and flats to let अशा पाट्या दिसतात आणि अशाहि पाट्या ज्यांना लावतां येत नाहीत किंवा आपल्या कुटुंबांत पैसे घेऊन ज्यांना लोकांना ठेवून घ्यायचं असतं अशा लोकांच्या हातानं लिहिलेल्या छोट्या छोट्या जाहिराती कोपऱ्याकोपऱ्यावर एकत्र लावलेल्या अनेक ठिकाणीं दिसतात. पण याचा अर्थ युरोपियनेतर लोकांना त्या सर्रास मिळतात असा मात्र नव्हे हं! याचं मुख्य कारण परदेशांतून आलेल्या आम्हां लोकांना स्वच्छता आणि टापटीप यांचं महत्त्व कधीं नीटसं कळत नाहीं हेंच आहे, हें मोठ्या दुःखानं कबूल करण्यावांचून गत्यंतर नाहीं. इथं अस्वच्छपणानं राहाणारे भाडेकरू मालकालाच नको असतात. येवढंच नव्हे तर मोठ्यानं आरडा ओरडा करणारे लोकहि अशा जागांतून फार काळ राहूं शकत नाहींत. एक आठवड्याची नोटीस देऊन मालकच त्यांची उचलबांगडी करतो ! त्याचप्रमाणें पतिपत्नीला राहायला मिळालेली खोली त्यांना मूल होण्याचीं चिन्हं दिसूं लागतांच मालकच सोडायला लावतो आणि मूल जन्माला आल्यानंतर तर जागा मिळणंहि कठीण होऊन बसतं ! लहान मूल म्हटलं की त्याचं रडणं आणि त्याच्यासाठीं घेतलेली बाबागाडी याचीहि अडचण मालकाला वाटूं लागते आणि मूल होण्यापूर्वी दिलेली जागा मूल झाल्यानंवर त्या जोडप्याकडे ठेवायला मालकच तयार नसतात! मात्र आपल्या जागा अत्यंत स्वच्छ ठेवण्यासाठीं स्वतः मालकहि श्रम घेतो. तो भिंती पुसतो, कांचा स्वच्छ ठेवतो, जमीन घांसून-पुसून लख्ख करतो आणि जिन्यांवरसुद्धां कागदाचा कपटाहि दिसूं नये अशी दक्षता घेतो.

पण हीं घरं जशीं आरशासारखी स्वच्छ आणि आकर्षक असतात तशीं त्यांचीं भाडींहि तशींच असतात. माझंच उदाहरण सांगतो. मी ज्या लंडनच्या पश्चिम भागांत रहातो तो भाग कांहीं श्रीमंत, सुखवस्तु किंवा विलासी लोकांचा नाहीं. उलट, ज्याला आपण कनिष्ठ मध्यम वर्ग किंवा कामगार वर्ग म्हणूं असेच लोक

इथं सभोवतीं मला दिसतात, पण मी आठवड्याला माझ्या खोलीचं २८ शिलिंग भाडं देतो आणि हेंहि पुष्कळच स्वस्त आहे असं लंडनच्या इतर भागांत राहाणारे लोक मला सांगतात. याचा अर्थ असा, कीं मला माझ्या खोलीसाठीं दररोज चार शिलिंग भाडं द्यावं लागतं. इथं सारे व्यवहार आठवड्याच्या परिभाषेंत चालत असतात. त्यामुळं मी महिन्याला माझ्या खोलीसाठीं एकशेंवीस शिलिंग भाडं देतो असं म्हणत नाहीं, पण तेवढं भाडं देतोच कीं मी! हिंदी चलनांत हा हिशेब सांगायचा तर माझ्या खोलीसाठीं मी दरमहा ८० रुपये भाडं देतों! मात्र इतकं भाडं घेतलं म्हणजे व्यवस्थाहि उत्तम ठेवलेली असते. खोलीत गालिचे असतात, टेबल खुर्च्या असतात, पलंग असतो, मऊमऊ गाद्या असतात, उशा असतात आणि पांघरण्यासाठीं ३–४ तरी रग असतात. खोलींत विजेचा किंवा गॅसचा 'फायर' हा असायचाच. राहाण्याच्या जागांचं हे भाडं भरमसाट आहे असं वाटलं तरी इथलं राहणीचं मानच इतकं उंच आहे, कीं अगदी कष्टाचं काम करणारी माणसंहि आठवड्याला सहा-सात पौंड सहज मिळवितात. म्हणून आठवड्याचं दोन पौंड भाडं द्यावं लागलं तरी त्याची क्षिति त्यांना वाटत नाहीं. काम केल्यावांचून कोणीहि इथं शक्यतों राहात नसल्यामुळं राहाणीचा सकृद्दर्शनीं मोठा खर्च करतानाहि कांहीं वाटत नाहीं.

बाजारांत गेलं कीं गरजेच्या रोजच्या वस्तूहि किती महाग असतात याची कल्पना येते. एका अंड्याला सहा पेन्स (एक पेन्स म्हणजे जवळजवळ एक आणा) कोबी, कॉली फ्लॉवर एका शिलिंगाला (म्हणजे अकरा आण्याला) रत्तल, केळींहि शिलिंगाला तीन आणि एका ल्हानशा वांग्यालाहि आठ, नऊ पेन्स! सिगरेट तर इतक्या महाग असतात कीं त्या ओढून मी पैशाचा धूर करीत नाहीं याचं मोठं समाधान वाटतं, कारण इथं चांगल्या जातीच्या १० सिगरेटांच्या पाकिटाला दोन शिलिंग पडतात. म्हणजे एका सिगरेटला अडीच आणे म्हणाना! केस कापायला गेलं तरी कमीत कमी अडीच शिलिंग (म्हणजे पावणे दोन रुपये) आणि कपभर कॉफी प्यायची म्हटली तरी एक शिलिंग हे इथले आणखी कांहीं दर! एका काड्याच्या पेटीला दोन पेन्स तर शर्टच्या धुलाईला दीड शिलिंग! इथं अनेक हिंदी लोक येऊन कायमचेच राहिले असल्यामुळं पापड, लोणचीं, हिंग, लवंग, चिंच, गव्हाचं पीठ या सगळ्या वस्तु देणारीं अनेक दुकानं इथं आहेत. पण या वस्तूंचे दर मात्र विचारूं नका! एक रत्तलभर चिंच घ्यायची झाली तर दोन शिलिंग द्यावे लागतात. गंमत म्हणून या दुकानांतून इथले गोरे

लोकसुद्धां हे पदार्थ नेतात आणि एकदां त्यांची चटक लागली, कीं पुनः पुन्हां या वस्तू घेण्यासाठीं या दुकानांत गर्दी करीत असतात.

पण याचा अर्थ इथं प्रत्येक वस्तूच महाग मिळते असा मात्र नव्हे. पाव, बटाटे, मासे आणि दूध या वस्तु अपेक्षेपेक्षा स्वस्तच नव्हे तर हिंदुस्थानांत मिळतात त्याहिपेक्षा इथं स्वस्त मिळतात. याला कारण असं कीं पाव आणि दूध लोकांना स्वस्त मिळावं म्हणून सरकार स्वतः झीज सोसून (subsidise) या वस्तु लोकांना स्वस्त मिळतील अशी व्यवस्था करतं आणि यासाठीं दरसालच्या अंदाज-पत्रकांत कोट्यावधि पौंडाची तरतूद केलेली असतें. सबंध इंग्लंड देशच समुद्रानं वेढलेला असल्यामुळं माशांची विपुलता इथं असावी हें स्वाभाविक असलं तरी ते महाराष्ट्रांतल्या कोणत्याहि शहरांत मिळत नसतील इतके इथं स्वस्त मिळतात. आणि बटाट्याचं उत्पादनच इथं येवढं प्रमाणाबाहेर वाढलं आहे म्हणतात, कीं ते स्वस्त विकण्यावांचून गत्यंतरच नाहीं ! लोकांनी आपल्या अन्नांत दुधाचा उपयोग पुष्कळ करावा म्हणून सरकारचीं प्रसिद्धिपत्रकं आणि पोस्टर्स सर्वत्र लावलेले दिसतात आणि मिळणारं दुधहि नुसतं स्वस्तच नव्हे तर कमालीचं सकस आणि स्वच्छ असतं. एका पिंटच्या बाटलीला (साधारणतः साडेतीन कप भरतील एवढ्या) फक्त आठ पेन्स पडतात. मात्र इंग्लंडांत म्हैशी अजिबात नसल्यामुळं गाईचं दूधच सर्वत्र वापरतात. गरोदरपणीं स्त्रियांनीं भरपूर दूध घ्यावं म्हणून आठ पेन्सांना मिळणारी ही बाटली अवघ्या दीड पेन्सला मिळण्याची व्यवस्था सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य योजने (National Health Service) मार्फत केली जाते. तरीहि इंग्लंड हें डेन्मार्क-स्वीडन सारखं पुढारलेलं कल्याणकारी राज्य (Welfare State) नाहीं अशी टीका ऐकूं येते. यावरून पाश्चिमात्य राष्ट्रांनी केवढी मजल मारली आहे आणि आपल्याला अजून किती प्रगति करायची आहे याची कल्पना येते काय पहा.

इथं आल्यानंतर स्टेशनवर सरकते जिने, लोकांना नोकरीवर जायचं किंवा नोकरीवरून परत यायचं असतं त्या वेळीं दर अर्ध्या मिनिटाला येणारी ट्यूब रेल्वे, एक शब्दहि न बोलतां चालणारा लोकांचा प्रवास या सर्व गोष्टी पाहून मला मोठं नवल वाटलं खरं, पण आधुनिक सुखसोयींची भाऊगर्दी झालेल्या सुमारें एक कोटि लोकसंख्येच्या, जगांतील पहिल्या नंबरच्या, या नगरींत माझ्या सारख्याला दररोज आंघोळ करायची म्हटली तर तें किती कठीण आहे हें कसं सांगूं ? श्रीमंतांच्या घरांत स्वतःची स्नानगृहं अर्थातच आहेत, पण दर आठवड्याला २८ शिलिंग

भाडं द्यावं लागतं त्या ठिकाणीं तरी आंघोळीची कांहींहि सोय नाहीं हेंहि एक नवलच नव्हे काय? मी इकडे येण्यासाठीं 'सिलिसिया' बोटीनं निघालों आणि रोज सकाळीं गरम-गरम पाण्यानं आंघोळ करूं लागलों तेव्हां मद्यपान न केल्या-बद्दल (आणि त्याला माझा विरोध असल्याबद्दल) माझी थट्टा करणाऱ्यांना तर एक नवाच विषय मिळाला होता आणि त्यांतले एकजण तर मला म्हणाले होते, "इंग्लंडांत नाहीं हं रोज मिळायची तुम्हांला आंघोळ करायला!" त्यांचा या बोलण्याचा त्यावेळीं मला नीटसा अर्थबोध झाला नव्हता, पण इथं आल्यानंतर आंघोळीची सोय खरोखरच मी राहतों तिथं नाहीं हें जेव्हां मी पाहिलं तेव्हां माझं मन थोडं अस्वस्थ झालं. आंघोळीशिवाय रहायची कल्पनाच करवत नव्हती आणि म्हणून मी इथं आंघोळीची काय व्यवस्था करतात असं विचारलं तेव्हां मला समजलं, कीं इथं सार्वजनिक स्नानगृहं (Public Baths) असतात आणि ज्यांच्या घरीं स्नाना-साठीं खोल्या नाहींत त्यांना स्नानासाठीं त्यांचाच उपयोग करावा लागतो. शनिवार–रविवारी नऊ पेन्स आणि इतर दिवशीं सहा पेन्स दिले कीं स्नानासाठीं गरम पाणी मिळतं. मात्र याशिवाय टिप् द्यावी लागते आणि त्या ठिकाणीं जाण्यासाठीं बसचा खर्च येतो तो वेगळाच! याचा सरळ अर्थ असा होतो, कीं आंघोळ करायची म्हटली तर प्रत्येक वेळीं एक-दीड शिलिंग (म्हणजे रुपयाभर तरी!) खर्च येणार होता, पण तो न करून चालणारहि नव्हतं. 'रोज आंघोळ करायचा विचारच करूं नका, पैसेहि लागतील आणि दोन तास तरी मोडतील' हा उपदेश ऐकण्यावांचून आतां गत्यंतरच उरलं नव्हतं. या अडचणीतूनहि मी एक मार्ग शोधून काढला आहे आणि रोज आंघोळ केल्यासारखं तरी वाटेल अशी व्यवस्था केली आहे, पण त्या युक्तीची वाच्यता इथं न करणंच बरं! इथं वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या कांहीं मजकुराचा copy-right ठेवण्याची पद्धत आहे, तसाच माझ्या युक्तीचाहि मी copy-right ठेवला आहे म्हणाना! आतां इंग्लंडांत आल्यावर इंग्लिश लोकांच्या सारखं थोडं तरी वागायला हवंच कीं मला, खरं ना?

तुमचा,

वि. बा. पत्की

: ७ :

## इंग्लंडांतील दैनंदिन जीवन—३

★

६, सॉंडर्स ग्रव्ह,
लंडन (डब्ल्यू. ११)
१६ नोव्हेंबर, १९५५

प्रिय बाळासाहेब,

आपण भारतीय लोक परंपरापूजक आहों हे तर खरंच, पण पाश्चिमात्य लोक मोठे सुधारलेले असं जग मानीत असलं तरी ते कांहीं कमी परंपराभिमानी असतात असं समजूं नका! त्यांतून ब्रिटिश लोकांचं तर कांहीं विचारूंच नका! किंबहुना, ब्रिटिश लोकांची ही स्थितिप्रियता (Conservatism) आणि आपल्याच बऱ्यावाईट मतांना चिकटून राहायची त्यांची प्रवृत्ति पाहिली कीं, ग्रीसच्या एका तत्त्ववेत्त्याची मला नेहमीं आठवण होते. त्याचं नांव डायोजिनिस्. ही स्वारी येवढी विलक्षण बुद्धिमान् आणि कर्तबगार होती, कीं कुणाची पर्वा त्यानं कधीं केली नाहीं, प्रत्यक्ष देशाच्या राजाची सुद्धां! पण त्याच्या बुद्धिमत्तेचा आणि कर्तृत्वाचा सुगंध लपून थोडाच राहणार? आपल्या देशांत येवढा बुद्धिमान् आणि कर्तृत्व-संपन्न माणूस आहे याचा राजालाहि अभिमान वाटला आणि त्यानं डायोजिनिसला आपल्या भेटीला बोलावलं. बरेच दिवस स्वारी राजाच्या भेटीला गेलीच नाहीं आणि अखेर गेली ती कशी, तर फाटकं, भोकं पडलेलं जाकीट अंगांत घालून! राजानं येवढं भेटीला बोलावलं म्हणून चांगले कपडे त्याला घालतां आलेच नसते असं थोडंच आहे? पण राजाला येवढी किंमत द्यायलाहि स्वारी तयार नव्हती. राजदरबारांत स्वारी आली ती भोकं पडलेलं फाटकं जाकीट घालून! पण राजा मोठा चतुर होता. डायोजिनिसची बुद्धिमत्ता त्याला माहित होती. त्यानं डायोजि-निसला आपल्या शेजारीं बसवून घेतलं आणि म्हटलं, "Your pride is peeping

through the holes of your jacket ! " (तुझ्या जाकिटाच्या भोंकांतून तुझा स्वाभिमान कसा बाहेर डोकावून पाहातोय पहा ! )

ब्रिटिशांचे एकेक व्यवहार माझ्या दृष्टीस पडत आहेत तसा त्यांचा परंपराभिमान त्यांच्या कृतीतून डोकावत असलेला मलाहि दिसतो आणि मोठं नवल वाटतं. बाजारांत तुम्हीं कुठेंहि गेलांत तरी शोरूममध्यें लावून ठेवलेल्या वस्तूंना किंमतीच्या ज्या चिठ्या लावलेल्या असतात त्या अनेक वेळा पौंड शिलिंगामध्यें वस्तूंची किंमत सांगत नाहींत. शोरूममधल्या रेडिओची किंमत लावलेली असते २१ गिनी म्हणून ! वास्तविक इंग्लंडमध्यें गिनी हे नाणं (किंवा चलन) आज मुळींच अस्तित्वांत नाहीं, पण तरीहि त्याचा वापर रोजच्या व्यवहारांत ब्रिटिश माणूस करतोच ! वास्तविक एखाद्या वस्तूची पांच गिनी किंमत सांगितली तर द्यावे लागतात पांच पौंड आणि पांच शिलिंग, मग त्या वस्तूची किंमत पांच पौंड पांच शिलिंग आहे असं सरळ म्हणायला ब्रिटिश माणसाला काय हरकत होती ? पण तसं तो करायला तयार नाहीं, कारण परंपरेनं गिनी हें नाणं चालत आलं म्हणून प्रत्यक्षांत नसणारं नाणं, तो आहे असंच समजून चालतो आणि व्यवहारांत तसा वागतो ! केवळ परंपरेच्या अभिमानाशिवाय दुसरं कोणतं नांव द्याल तुम्ही याला ? नाण्यापुरतंच हें खरं आहे असं नव्हे. या देशांतल्या नाण्यावर ज्या राजाचं (किंवा राणीचं) चित्र असतं त्याला (किंवा तिला) काडीचाहि अधिकार नाहीं हें काय कुणाला माहित नाहीं ? सारी सत्ता पार्लमेंटच्या म्हणजे लोकांच्या हातांत असते आणि थोडं थट्टेन कां असेना पण म्हटलं जातंच ना, कीं पार्लमेंटला वाटलं तर राजाला स्वतःला फांशी देण्याच्या हुकूमावरसुद्धां सही करावी लागेल म्हणून ? मात्र परंपराभिमानी इंग्रज लोकांना, नामधारी कां असेना, पण राजा हवा असतो. जगांत साम्राज्यं लयाला गेलीं, सिंहासनं गडगडलीं, देशाच्या प्रमुखपदावर प्रेसिडेंट किंवा मुख्यप्रधान आले तरी परंपराभिमानी इंग्रज लोकांनीं अधिकाराचीं सारीं वस्त्रं काढून घेऊनहि सिंहासनावर राजाला कायम ठेवलंच आहे ! इतकं कशाला, पण आज विसाव्या शतकाच्या द्वितीयार्धातहि विजेचे दिवे सर्वत्र लागलेले असतांना आमच्या देवळांत समया आणि ब्रिटिशांच्या प्रार्थनामंदिरांत मेणबत्त्या तेवत असलेल्या दिसतात, तेव्हां राजकीय क्षेत्रांत एकेकाळीं ब्रिटिश लोक आमचे विरोधक असले तरी परंपरेच्या आणि धर्माच्या क्षेत्रांत दोघेहि सारखेच आहों याची खात्री पटते आणि हंसूं येतं ! परवां एका प्रार्थनामंदिरात बाहेर विजेचे दिवे आणि आंत मेणबत्त्या लावलेल्या

मला दिसल्या तेव्हां मला राहवलं नाहीं. मी प्रार्थनामंदिराची व्यवस्था पाहाणाऱ्याच्या लक्षांत ही विसंगति आणून दिली तेव्हां हंसत हंसत त्यानं मला म्हटलं, "We want to keep up traditions."

पण ब्रिटिशांच्या परंपराप्रियतेचा खरा साक्षात्कार संपूर्ण स्वरूपांत मला घडला तो परवां राजकन्या मार्गारेटच्या गाजलेल्या प्रेम-प्रकरणांत! राजकन्येचं प्रेम टाऊनसेंड या एका देखण्या तरुणावर बसलं असल्याची बातमी सुमारें अडीच तीन वर्षांपूर्वीच सर्वतोमुखी झाली होती. परंतु राजघराण्यांतील व्यक्तींच्या विवाहाबद्दलचा १७७२ सालचा जो कायदा आहे त्या प्रमाणें वयाला २५ वर्षें पूर्ण झालेली नसल्यामुळं, राजाच्या (किंवा राणीच्या) संमतिवांचून तिला त्याच्याशीं लग्न करतां येत नव्हतं. स्वतःच्या वयाला २५ वर्षें पूर्ण होईपर्यंत तिनं वाट पाहायचं ठरविलं व तो दिवस अखेर आला तेव्हां त्यांच्या उघडपणें गांठी-भेटी सुरू झाल्या आणि राजकन्येचा वाङ्निश्चय होण्याची घटका जवळ आली म्हणून सामान्य माणसाचं कुतुहल शिगेला पोंचलं. लंडनमधल्या लोकप्रिय वृत्तपत्रांनीं तर लोकांची जिज्ञासा तृप्त करण्यासाठीं पैसा आणि वृत्तपत्रातली किती जागा खर्च केली याला सुमारच नाहीं. पीटर टाऊनसेंड राजकन्येला भेटण्यासाठीं क्लेरन्स हाऊसमध्यें गेला, तिथून परत आला, पुन्हां तीं दोघं लंडनच्या बाहेर गेलीं, या सर्व घडामोडींची चित्रं या पत्रांनीं इतकी प्रसिद्ध केली, कीं आतां वाङ्निश्चय झाल्याचंच तेवढं जाहीर व्हायचं आहे असं सामान्य माणसाला वाटलं. मार्गारेट हंसतांना दिसली कीं तिचा हंसरा फोटो प्रसिद्ध करून She is happy म्हणून मोठाले मथळे द्यायचे, ती गंभीर दिसली तीं Is she sad? म्हणून तिच्या गंभीर दिसणाऱ्या फोटोखाली लिहायचं. 'त्यांच्या लंडनच्या बाहेर भेटी झाल्या खऱ्या, पण No ring yet' असं म्हणून वाचकांची जिज्ञासा अधिक ताणायची, हे सारे खेळ हीं वृत्तपत्रं खेळत होतीं. मी तर वृत्तपत्रलेखनाच्या वर्गातच शिकत असल्यामुळं लंडन शहरांतलीं सारीं प्रमुख वृत्तपत्रं रोज वर्गात दिसायचीं आणि एकच बातमी केवढ्या निरनिराळ्या तऱ्हेनं वृत्तपत्रांनीं दिली आहे, वृत्तपत्रांची जात आणि प्रकार त्यावरून कसे ओळखतां येतात ही तात्विक चर्चाहि मग त्यावरून वर्गात व्हायची.

त्या सबंध पंधरवड्यांत लोकांचं कुतुहल पराकोटीला गेलं होतं यांत शंकाच नाहीं. राजकन्या एका सामान्य माणसा ( Commoner ) बरोबर लग्न करणार आहे ही बातमीच केवढी नवलाची होती! पण राजकन्येच्या या विवाहामुळं मोठी

गुंतागुंत निर्माण होईल, ख्रिश्चन धर्माप्रमाणें घटस्फोट घेतलेल्या माणसाबरोबर लग्न केल्यास राजकन्येला आपला वारसाहक्क सोडून द्यावा लागेल अशी मल्लिनाथी परंपरापूजक वृत्तपत्रांनीं सुरू केली, तर राजकन्येला आपल्याला आवडलेल्या माणसाशी लग्न करण्याविरुद्ध एक कट केला जात आहे असा उघडउघड आरोप 'जगांतलं सर्वांत अधिक खपाचं दैनिक' (Biggest daily sale on earth) असं शिरोभागीं लिहिणाऱ्या पन्नास लक्ष खप असलेल्या 'डेली मिरर' (Daily Mirror) पत्रानं केला आणि त्यामुळं या प्रश्नाला एक नवी धार आली. 'डेली मिरर'ला अनेक पत्रांनीं साथ दिलीच, पण 'मँचेस्टर गार्डीयन' (Manchester Guardian) सारख्या समतोल वृत्तीच्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पत्रानं स्पष्टपणें म्हटलं,

There has been growing impatience with obsolete forms like the Royal Marriage Act and the technicalities a spiteful king introduced to hurt his family a hundred and eighty years ago. The Act laid down that British descendants of George II should not marry under 25 without the sovereign's consent, at 25 they were free to marry without that consent but they must give twelve month's notice to the Privy Council and the two Houses of Parliament must not object in the interim. What nonsense it is. And we must remember that it was introduced really to prevent the King's brothers from marrying British commoners. To invoke any of this mumbo-jumbo now would be ridiculous. Better repeal the Act straightaway as a matter of grace and fair play. Then it has been assumed by some that the Princess's marriage with a commoner must necessarily lead to the renunciation of the succession. Why should this be so? Her accession is a very remote chance with a young Sovereign and two young children ahead of her. And even if it were not remote, would the idea of non-royal consort be so terrible, if our democracy means anything?

याचा सरळ अर्थ असा कीं '१८० वर्षांपूर्वी केलेल्या कायद्याची सबब सांगून राजकन्येच्या विवाहाला विरोध करणं हा केवढा मूर्खपणा ! वाटलं तर या कायद्यांतच दुरुस्ती करा ! आणि राजकन्येनं एका सामान्य माणसाबरोबर लग्न केलं तर तिचा वारसा-हक्क हिरावून घेणं याला कांहीं अर्थ आहे काय ? अद्यापि आपली राणी

तरुण आहे. तिलाहि दोन मुलं आहेत, अशा परिस्थितीत राजकन्या (मार्गारेट) गादीवर येण्याची शक्यता फारच कमी आहे आणि तशी शक्यता निर्माण झालीच तर राजघराण्याबाहेरचा मनुष्य तिचा नवरा असण्यानं काय बिघडणार आहे ?'

'मँचेस्टर गार्डियन'च्या या विचारसरणींत सामान्य माणसाचं मत पुष्कळ अंशीं प्रतिबिंबित झालं होतं आणि मार्गारेटचा विवाह पीटर टाऊनशेंड बरोबर व्हावा असं सामान्य माणसाला वाटत होतं. पण जसजसा अधिकाधिक कालावधि लोटूं लागला तसतसे या प्रश्नाला निरनिराळे फांटे फुटूं लागले. राजकन्या मार्गारेट हिनं आज राणीची भेट घेतली, दुसऱ्या दिवशीं आर्चबिशप बरोबर तिनं चर्चा केली अशा बातम्या येऊं लागल्या. 'टाईम्स' सारख्या पत्रानीं तर मोठ्या सावधगिरीनं या विवाहामुळं निर्माण होणाऱ्या परिस्थितीचं चित्र उभं केलं आणि दुसऱ्याच दिवशीं मार्गारेटनं राष्ट्रकुल आणि धर्म यांच्याबद्दलचं आपलं कर्तव्य लक्षांत घेऊन आपण टाऊनशेंड बरोबर विवाह करणार नसल्याचं जाहीर केलं ! या बातमीनं साऱ्या लोकांना धक्का दिलाच, पण 'डेली मिरर' सारख्या पत्रांनीं आपली मोहीम सोडून देण्याऐवजीं 'This must not wreck two lives' असं प्रक्षोभक शीर्षक देऊन ज्या कायद्यामुळंच हा प्रकार घडला तो १७७२ सालचा कायदाच बदलून घेण्याविषयीं लोकमताला आवाहन केलं !

या सबंध प्रकरणांत राजकन्येवर कोणत्याहि प्रकारे कोणीहि सक्ति केली नाहीं, तिनें आपण होऊनच निर्णय घेतला असं पुनः पुन्हां सांगण्यांत आलं आणि तें खरंहि असेल. पण जगांतल्या खिस्ती धर्माच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी राजकन्येच्या या निर्णयाचं उर्ध्वबाहूनीं जें स्वागत केलं, तिच्या मनोधैर्याची जी प्रशंसा केली, इतरांना अनुकरणीय असं उदाहरण तिनं घालून दिल्याबद्दल तिचे जे गोडवे गायिले यांतूनच त्यांचा परंपराभिमान न कळत प्रगट झाला असं कां म्हणूं नये ? राजकन्या मार्गारेट हिनं अखेर टाऊनशेंड बरोबर विवाह करायचाच हट्ट धरला असता तर धर्मद्रोही म्हणून तिची निर्भर्त्सना करायला हे धर्ममार्तंड धजले असते काय ? म्हणूनच मार्गारेटचा निर्णय जाहीर झाल्यानंतर 'धर्म आणि राष्ट्रकुल यांच्याबद्दलच्या कर्तव्या—विषयी तिची दिशाभूल करण्यांत आली' असं एका आर्चबिशपनींच म्हटलं आणि इंग्लंडचे पंतप्रधान सर अँटनी ईडन यांनी तर Our advice was neither sought nor given ! (आमचा सल्ला कोणी मागितलाहि नाही आणि आम्ही दिलाहि नाहीं !) म्हणून आपल्या कानावर हात ठेवले ! तथापि, राजकन्या मार्गा-रेटबद्दल सहानुभूति दाखविणाऱ्या वृत्तपत्रांनींहि या बाबतीत अखेर मूग गिळून

स्वस्थ बसण्यापलीकडे कांहीं केलं नाही आणि दोन निष्पाप जीवांची झालेली तातातूट उघड्या डोळ्यांनी पाहिली यांत त्यांचाहि परंपराभिमानच दिसला असं म्हणण्यांवाचून गत्यंतर नाहीं. सतरा-अठरा वर्षांपूर्वी आठव्या एडवर्डनं प्रीतीसाठीं राज्यत्याग केला तेव्हां सारं इंग्लंड त्याला डोक्यावर घेऊन नाचलं आणि आज धर्म आणि राष्ट्रकुल यांच्यासाठीं राजकन्येनं आपल्या प्रीतीवर पाणी सोडलं तरीहि तिच्या धैर्याची प्रशंसा होत आहे. याचा अर्थ परंपराप्रिय लोकांना परंपरेच्या बाहेर जाणारीं माणसं नको होतीं असाच इतिहासकार तरी लावल्यावांचून राहाणार नाहींत. या परंपराभिमान्यांना सामान्य स्त्रीबरोबर लग्न करणारा राजा नको होता, पण प्रीतीसाठीं राज्यत्याग करणारा प्रेमवीर म्हणून त्याला डोक्यावर घेऊन नाचण्याची त्यांची तयारी होती. आज सामान्य माणसाबरोबर राजकन्येचं लग्न झालेलं त्यांना (मनांतून तरी) आवडत नव्हतं, म्हणून आठव्या एडवर्डनं केलेल्या गोष्टीच्या दुसऱ्या टोकाला जाऊनहि धर्म आणि परंपरेच्या अभिमान्यांची स्तुतिस्तोत्रं तिला ऐकायला मिळत आहेत ! परंपरेचा अभिमान दोन्ही ठिकाणी कसा ओतप्रोत भरला आहे, पाहिलात ?

तथापि, या प्रेमप्रकरणाच्या निमित्तानं येथील वृत्तपत्रांचं स्वरूप, कर्तृत्व आणि व्याप यांचं दर्शन मला अगदीं जवळून घडलं आणि वृत्तपत्रांची केवढी जबरदस्त मोहिनी सामान्य माणसाच्या मनावर असते याचाहि प्रत्यय आला. इथल्या वर्तमान-पत्रांच्या खपांचे आंकडे पाहिले म्हणजेहि वर्तमानपत्रांचं वेड लोकांना किती असतं याची कल्पना येते. एकट्या 'डेली मिरर'चेच पन्नास लक्ष अंक रोज खपतात, त्याशिवाय 'डेली एक्सप्रेस', 'डेली हेरल्ड', 'न्यूज क्रॉनिकल', 'डेली टेलिग्राफ', 'डेली मेल' या पत्रांचे खपहि, कुणाचा चाळीस लाख तर कुणाचा वीस लाख, कुणाचा पंधरा लाख तर कुणाचा दहा लाख असे आहेत. माणसाला अन्नाइतकीच—किंबहुना त्यापेक्षांहि—वर्तमानपत्रांची गरज आहे असं मानूनच जवळजवळ प्रत्येकजण वागतो. दुसऱ्याच्या वर्तमानपत्रांत डोकावून पाहणं हें त्याच्या खाजगी जीवनांत डोकावून पाहण्याइतकंच इथं असभ्य मानतात. त्यामुळं वर्तमानपत्रांचा खप इथं येवढा प्रचंड असलेला दिसतो. लोकांचं एकदां वर्तमान-पत्र विकत घेऊनहि कधीं समाधान होत नाहीं. सकाळीं आपल्या कामावर जातांना त्यांच्या हातांत सकाळचं ताजं वर्तमानपत्र असतं, तसंच संध्याकाळीं कामावरून परत येतांनाहि संध्याकाळचं वृत्तपत्र त्यांच्या हातीं हटकून दिसतं. वर्तमानपत्र वाचून झालं कीं, अक्षरशः फेकून द्यायचं अशा धोरणानं लोक

वागतात. आपल्याकडे वर्तमानपत्रांची रद्दी विकण्याची पद्धत आहे, इतकंच नव्हे तर या रद्दीच्या किंमतींतून वर्तमानपत्राची किंमत वसूल करण्याची प्रवृत्ति आहे, पण इथं तसं मुळींच नाहीं! उलट, इथं रद्दीचं काय करायचं हाच प्रश्न असतो. घरीं रद्दी नेली तर तिचे ढीग रोज वाढतच जातील म्हणून एकदां वर्तमानपत्र वाचून झालं, कीं स्टेशनवरच्या केरकचरा टाकण्याच्या कुंडींत अक्षरशः फेकून लोक पुढें चालूं लागतात किंवा ट्यूबमध्यें बसल्याजागींच ठेवून जातात! मी इथं आल्याबरोबर असे अनेक डब्यांत लोक बसल्या ठिकाणींच अंक ठेवून उतरायचे तेव्हां त्यांच्या विसरभोळेपणाची मला गंमत वाटायची. पण हा विसर—भोळेपणा नसून आपल्याजवळची रद्दी कमी करण्याचा हा एक शिष्टसंमत मार्ग आहे, हें मग माझ्या लक्षांत येऊं लागलं!

पण इथं लाखांनींच नव्हे तर अक्षरशः कोटींनीं वृत्तपत्रं खपतात आणि प्रत्येक जण एक नव्हे तर दोन वृत्तपत्रं रोज विकत घेतो, म्हणून हीं सारीं वृत्तपत्रं मोठीं भारदस्त आणि गंभीर विषयांची चर्चा करणारीं असतील अशी जर तुमची कल्पना झाली असेल तर ती मात्र खचित चुकीची आहे. राजकीय किंवा आंतरराष्ट्रीय विषयांची चर्चा करणारीं वृत्तपत्रं इथं नाहींत असं नव्हे, पण हीं प्रचंड खपाचीं वृत्तपत्रं गुन्हेगारीच्या, लैंगिक विषयांच्या, प्रेम-प्रकरणांच्या बातम्या येवढ्या भडक, आकर्षक आणि वेधक स्वरूपांत देतात कीं सामान्य मनुष्याचं लक्ष त्यांच्याकडे चटकन् वेधावं! जगांत अनेक राजकीय उलथापालथी होत असतांना हीं वृत्तपत्रं त्यांचा निर्देश केलाच तर कुठें तरी आठव्या-दहाव्या पानावर करतात आणि पहिलीं पानं भरलेलीं असतात तीं कुणाच्या तरी खाजगी आयुष्यांतल्या भान-गडींच्या सचित्र बातम्यांनीं! मोरोक्कोच्या सुलतानाला देशत्याग करावा लागल्याची बातमी भारदस्त पत्रांनीं (Quality papers) ठळकपणें ज्या दिवशीं दिली त्याच दिवशीं या सवंग लोकप्रियतेला बळी पडलेल्या पत्रांनीं (Popular papers) मोठ्यांत मोठ्या टाईपांत बातमी दिली होती ती कसली, तर पॅरिसमध्यें रिटा हेवर्थ आणि प्रिन्स अली यांच्या गांठीभेटी पुन्हां होत आहेत, त्यांच्या प्रणया-राधनाला पुन्हा सुरुवात होणार कीं काय या पृच्छेची! परवां राजकन्या मार्गारेटचं पीटर टाऊनशेंडबरोबर लग्न व्हायचं घाटत असतांना टाऊनशेंडच्या पहिल्या घटस्फोटित पत्नीला गांठून (तिनं आतां पुन्हां लग्न केलेलं आहे) टाऊनशेंड बरोबर घालविलेल्या वैवाहिक जीवनाची कथा तिनं कांहीं लेखांक लिहून लोकांना सांगावी म्हणून तिला हजारों पौंडांचं आमिष या पत्रानीं दाखविलं! तिनं ही

मागणी नाकारली हा प्रश्न निराळा, पण लोकांना कसल्या बातम्या पुरविण्याची स्पर्धा वृत्तपत्रांत चाललेली असते याची कल्पना तुम्हाला यावी म्हणून हें एक उदाहरण म्हणून सांगितलं. जबरदस्त शिक्षा झालेल्या गुन्हेगारांच्या मुलाखतीहि मोठ्या युक्तीनं हीं वृत्तपत्रं मिळवितात आणि त्यासाठीं हजारों पौंड खर्च करतात.

वृत्तपत्रांचे अंक कोटींनीं खपतात म्हणजे वाचकवर्गाची अभिरुचि मोठी सुसंस्कृत असते असं चुकूनहि तुम्हांला वाटूं नये यासाठींच हें सारं सांगितलं. तथापि वृत्तपत्रांचं हें वैगुण्य सांगूनहि त्यांचं धंद्यातलं कौशल्य मात्र दृष्टिआड होऊं देतां कामा नये. भडकपणा हें त्यांचं वैशिष्ट्य असलं तरी लोकांचं लक्ष नेमक्या गोष्टीवर वेधण्याचं त्यांचं कौशल्यहि तितकंच मोठं असतं हें नाकारतां येणार नाहीं. परवांच इंग्लंडचे अर्थमंत्री बटलर यांनीं आपलं पुरवणी अंदाजपत्रक मांडलं आणि स्वयंपाकाच्या भांड्यांसारख्या वस्तूवरहि विक्रीकर वाढविला, त्याबरोबर या वृत्तपत्रांनीं Butler raids the kitchen किंवा Butler hits the housewife यासारखे मथळे देऊन लोकांचं लक्ष या गोष्टींकडे इतकं वेधलं, कीं त्याचे प्रतिध्वनी पार्लमेंटांत उमटले. लोकांची अभिरुचि अधिक सुसंस्कृत करण्याकडे तीं लक्ष देत नसलीं तरी लोकमत जागृत ठेवण्यासाठीं त्यांचा फार मोठा उपयोग होतो यांत मात्र शंका नाहीं. याच्या उलट भारदस्त पत्रांचा खप बाह्यतः कमी दिसला तरी लोकमताला वळण लावण्याचं काम त्यांच्याकडून फार मोठ्या प्रमाणांत होतं आणि लोकांना ताज्यांत ताजी आणि भरपूर माहिती पुरविण्यांत तर या भारदस्त पत्रांचाच हिस्सा फार मोठा आहे. रात्रीं नऊ वाजतां सुरू होऊन अकरा वाजतां संपलेल्या पार्लमेंटांतील भाषणांचा जसाच्या तसा (Verbatim) वृत्तांत 'टाइम्स' सारखीं वृत्तपत्रं अवघ्या चार तासांच्या आंत बारा-बारा स्तंभ भरतील येवढा विस्तृत देतात हें पाहिलं, कीं आपल्या देशांतील मोठ्या खपाचीं आणि मोठ्या भांडवलवाल्यांचीं पत्रं (मोठा फायदा काढण्याच्या हेतूनं चालविलेलीं कां असेनात!) या बाबतींत केवढा चुकारपणा करतात हा विचार माझ्या सारखा मनांत येतो. असे वृत्तांत घ्यायचे तर फार मोठा खर्च करावा लागतो हें उघड आहे, पण मोठ्या पत्रांनीं वाचकांना भरपूर मोबदला देण्याचे दृष्टीनं तरी असे वृत्तांत कां देऊं नयेत? पण याचं उत्तरहि अगदीं उघडच आहे कीं! मतदार जागरूक असला, कीं राजकीय पक्ष आपल्या कर्तव्यांत चुकारपणा करूं शकत नाहींत हें जसं खरं, तसंच आमचा वाचकवर्ग चोखंदळ झाल्याशिवाय

आमचीं वृत्तपत्रंहि सुधारणार नाहींत हेंहि तितकंच खरं आहे! वृत्तपत्रांनीं वाचकांना सुधारायचं का वाचकांनीं वृत्तपत्रं सुधारायचीं अशी ही मोठी गंमतीची समस्या आहे!

तुमचा,

वि. वा. पत्की

: ८ :

# इंग्लंडांतील दैनंदिन जीवन—४

★

६, सॉंडर्स ग्रव्ह,
लंडन (डब्ल्यू. ११)
१ डिसेंबर, १९५५

प्रिय बाळासाहेब,

शिक्षणाचा प्रसार वाढूं लागला, कीं आपल्या देशांत आपल्याला पहिली भीति वाटूं लागते ती सुशिक्षितांत बेकारी वाढेल याची! वातविक शिक्षणाची वाढ अधिकाधिक होण्यावर समाजांत सुसंस्कृतपणा, सहिष्णुवृत्ति, कलांची आवड इत्यादि सद्‌गुणांची वाढ होण्याची शक्यता असतांना या गोष्टी शिक्षणाच्या वाढीनं समाजांत येतील याचं समाधान वाटण्याऐवजीं शिक्षणांतून माणूस बाहेर पडला, कीं तो बेकार होईल अशीच धास्ती आपणाला वाटावी ही खरोखरच एक आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट आहे. तथापि याचं मुख्य कारण आपल्याला मिळ-णाऱ्या शिक्षणांतच असतं. परकीय सत्तेनं केवळ कारकून निर्माण करणारे कारखानेच विश्वविद्यालयांच्या नांवाखालीं चालविले, त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, नोकरी मिळाली नाहीं (आणि तीहि सरकारी कचेरींत किंवा सरकार-मान्य संस्थेंत मिळाली नाहीं) कीं सारं शिक्षण फुकट गेलं अशी विफलतेची भावना आमच्या मनांत रुजते आणि बेकारींतून आत्मघातासारखे आततायी प्रकारहि घडल्याचीं उदाहरणं मधून मधून ऐकायला मिळतात. नोकरी याचा अर्थ पोषाखी नोकरी असाच आजपर्यंत आपण करीत आलों, त्याचा परिणाम अखेरीस असा झाला, कीं सुशिक्षित माणसाला दुसरं कोणतंहि काम करणं कमीपणाचं वाटूं लागलं आणि बेकार राहीन, पण कांहीं झालं तरी दुसरं कांहीं करणार नाहीं असं मानण्यांत तो स्वतःहि भूषण मानूं लागला! रिकामं मन हें अनेक अनर्थांचं

मूळ होतं याचा विचार समाजानंहि कधीं केला नाहीं आणि हवी असलेली नोकरी मिळाली नाहीं तर दैवाच्या नांवानं खडे फोडण्याऐवजीं स्वतः सुशिक्षितानंहि कांहीं केलं नाहीं अशी दुरवस्था झाली. सुदैवानं स्वातंत्र्य प्राप्तीनंतर (आणि युद्ध-परिस्थितींतून निर्माण झालेल्या नोकऱ्यांमुळं!) ही परिस्थिति सुधारत असल्याचा भास होत असला तरी या मलमपट्ट्यांनीं आंतला रोग बरा होणार नाहीं याची वाढती जाणीव समाजांत निर्माण झाली तरच हा प्रश्न सुटेल असं अनेक वेळां माझ्या मनांत येई.

आणि आतां पाश्चिमात्य जीवनांतील एक एक नवी गोष्ट माझ्या दृष्टीस पडत आहे तसतसे हे प्रश्न या लोकांनीं कसे सोडविले हें पाहतांना यापासून आपणहि पुष्कळच बोध घेतला पाहिजे असं मला वाटूं लागलं आहे. एक काळ असा होता, कीं पाश्चिमात्यांच्या सर्वच गोष्टींचं अनुकरण करण्यांत आमचा सुशिक्षित वर्ग कृतकृत्यता मानी. याचा परिणाम असा झाला, कीं पाश्चिमात्यांच्या वरवर दिसणाऱ्या गोष्टींचंच तेवढं आम्हीं अनुकरण केलं आणि ज्या सद्गुणाचा राष्ट्र-विकासासाठीं उपयोग होतो त्याची आठवणहि आम्हांला कधीं झाली नाहीं. आम्हीं ब्रिटिशांच्या पोशाखाचं स्वतःच्या देशांत त्याची आवश्यकता नसतांनाहि अनुकरण केलं, त्यांच्यासारखं धूम्रपान करण्यांत भूषण मानूं लागलों आणि मद्यपान न करणारा सुशिक्षित नव्हे असं समीकरण आम्हीं मनानं मांडलं! पण ब्रिटिश माणूस बाहेरून आल्याबरोबर घरांत आपल्या पत्नीला घरकामांत मदत करूं लागतो, घर झाडतो, फरशा पुसतो आणि जेवण तयार झालं कीं दोघं एकदमच एकत्र बसून जेवतात आणि जीवनांतील आनंद वाढवितात हें कांहीं आम्हांला कुणी सांगितलं नाहीं!

कुणी म्हणेल, 'पाश्चिमात्य देशांत काय, पुरुष आणि स्त्री दोघंहि नोकऱ्या करतात, तेव्हां नोकरीवरून परत आल्यानंतर पतीनं पत्नीला घरकामांत मदत केली तर त्यांत येवढं नवल कसलं? तसं झालं नाहीं तर त्यांच्या जीवनांत रोजच खटके उडतील आणि जीवनांतली सारी गोडीच नाहींशी होईल.' हें म्हणणं अगदींच खोटं नाहीं, कारण आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असणारी स्त्री पुरुषाच्या लहरीप्रमाणें रोजच वागेल हेंच फारसं शक्य नाहीं. पण आपल्या समाजांत आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र असणाऱ्या स्त्रीचीहि कशी ओढाताण आणि कुचंबणा होते हेंहि पाहण्यासारखं आहे. दिवसाचे आठ तास शाळेंत शिक्षिकेचं, कचेरींत टायपिस्टचं किंवा अशाच प्रकारचं कोणतं तरी काम करून दमून-भागून घरीं आलेल्या स्त्रीलाहि घरांत पाऊल टाकल्यापासून कामाचे डोंगर उपसावे लागतात,

स्वयंपाक करावा लागतो आणि घरांतल्या साऱ्या माणसांना जेवूं घातल्यानंतर उरलं-सुरलं काय असेल तें खाऊन राहावं लागतं हें कुणाला दिसत का नाहीं? याचा परिणाम मात्र असा होतो, कीं ऐन तारुण्यांतच त्यांचा उत्साह आटतो आणि 'नको ती नोकरी' असं त्यांना होऊन जातं! नोकरी सोडवत नाहीं आणि संसारांतले कष्ट करवत नाहींत अशा पेचांत ती सांपडते. उलट, पाश्चिमात्य देशांत ही श्रमविभागणी पद्धतशीरपणें झाल्यामुळं जीवनाबद्दलचा उत्साह आटत नाही आणि तारुण्यांतच वार्धक्याची अवकळा येत नाहीं.

मग हा सारा चमत्कार घडून येतो तरी कसा, असं तुम्ही विचाराल. पहिली गोष्ट अशी, कीं यांत चमत्काराचा यत्किंचितहि भाग नाहीं, हा सारा व्यवहार आहे. जीवनांत स्त्री आणि पुरुष दोघांनाहि सुख हवं असेल तर दोघांनींहि एकमेकांच्या सहकार्यानं सारं केलं पाहिजे, हा विवेक इथं फार काळापूर्वी लोकांना सुचला आहे. पाश्चिमात्य देशांतलं राहाणीचं मान उंच आहे, असं आपण नेहमीं म्हणतो. पण राहणीचं मान उंच वाढवायचं म्हणजे आम्ही मोटारींतून फिरायचं, स्वयंपाक्यानं स्वादिष्ट अन्न तयार करून चकचकींत पात्रांतून तें आमच्या पुढें आणून ठेवायचं आणि आम्ही ढेकर देत पलंगावर आडवं व्हायचं असा का करायचा आहे? इथं राहणीचं मान वाढलं आहे तरीसुद्धां कोणाहि सामान्य मध्यमवर्गीय माणसाच्या घरांत कुठें नोकर नसतो, स्वयंपाकी नसतो कीं मोलकरीण नसते हें खरं वाटेल तुम्हांला? राहणीचं मान वाढलं याचाच अर्थ असा कीं 'हलकीं' वाटणारी कामं करणारा वर्गच इथं राहिला नाहीं. किंबहुना हीं कामं 'हलकीं' आहेत असं लोक मानीत नाहींत आणि हींच नव्हेत तर कोणतेंहि काम हलकं नाहीं आणि तें करण्यांत कमीपणा नाहीं असं बाळकडूच इथं मिळालं आहे. याचा फार मोठा परिणाम सामाजिक जीवनावर झाला आहे आणि जीवनविषयक सारीं मूल्यंच बदललीं आहेत.

कसं तें पाहा. आपल्याकडे विश्वविद्यालयांच्या अखेरच्या परीक्षेंतून सोडाच पण शालांत परीक्षेंतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकीं किती जण नोकरी मिळाली नाहीं तर साध्या सायकलच्या दुकानांत सायकली पुसण्याची नोकरी मिळाली तर ती करायला तयार होतील? किती जण ताजीं वर्तमानपत्रं घेऊन स्टेशनवर खळबळ उडविणारीं शीर्षकं ओरडतील? किती पदवीधर मुंबईत ट्रॅमच्या किंवा बसच्या कंडक्टरचं काम लाज न बाळगतां करायला तयार होतील? टॅक्सी ड्रायव्हर होऊन किती पदवीधर आपली उपजीविका, दुसरी चांगली नोकरी मिळेपर्यंत तरी,

करायचं मान्य करतील ? दुकानांतून गिऱ्हाइकांच्या वस्तू कागदाच्या पिशव्यांत बांधून द्यायला किती बेकार पदवीधर तयार होतील ? पण इथं स्वावलंबी होण्यांतच माणूस भूषण मानीत असल्यामुळं यांतलं कोणतंहि काम करायला माणूस तयार असतो. त्यामुळंच आज सायकलच्या दुकानांत काम करीत असलेला मनुष्य उद्यां संधि मिळाली तर देशाच्या मंत्रिमंडळांतहि गेलेला दिसतो आणि ही सारी पार्श्वभूमि माहित नसलेल्या आपल्यासारख्या माणसांना हा सारा प्रकार अरबी भाषेंतल्या सुरस आणि चमत्कारिक गोष्टींपेक्षांहि विस्मयजनक वाटतो आपली उपजीविका प्रामाणिकपणें करण्यासाठीं मिळेल तो व्यवसाय आणि कोणतंहि काम करण्यांत पाश्चिमात्य देशांतला माणूस कमीपणा मानीत नाहीं. यामुळं केवळ धंद्यावरून किंवा व्यससायावरून त्याची पात्रता अजमावतांच येत नाहीं. आणि एकदां रोज असं आठ तास काम केलं, कीं त्याची सामाजिक प्रतिष्ठा इतर कोणाहि माणसाइतकीच श्रेष्ठ ठरते. व्यवसायांत असेपर्यंत तो वर्तमानपत्रविक्या असेल, ड्रायव्हर असेल, वकील असेल, कंडक्टर असेल, दुकानांत माल देणारा असेल, शिक्षक असेल कीं मंत्री असेल, पण एकदां तें काम संपलं कीं तो एक समाजांतला माणूस झाला, ही जाणीव इथं प्रत्येकाला झालेली स्पष्ट दिसते.

इथल्या जीवनांत मोठी कृत्रिमता असावी असं सुरुवाती–सुरुवातीला तरी वाटूं लागतं. पण इथल्या सामाजिक जीवनाची ही पार्श्वभूमि एकदां लक्षांत येऊं लागली, कीं त्या वागण्याचा अर्थ लक्षांत येऊं लागतो. तुम्ही घरातनं एकदां बाहेर पडलांत कीं, Thank you, Sorry, Excuse, Please या शब्दांची साखरपेरणी इतक्या वेळां करावी लागते कीं कांहीं विचारूं नका ! तुम्ही स्टेशनवर किंवा बसमध्ये बसण्यासाठीं तिकिट मागितलं तरी Please चं तोंडीलावणं हवंच. तुम्ही तिकिटाची किंमत हातावर ठेवली तरी Thank you ची परत भेट तुम्हांला स्वीकारावी लागते आणि मोडींतले पैसे कंडक्टरनं हातावर ठेवले तरी पुन्हा Thank you म्हणून त्याची परतफेड करावीच लागते. हा एक केवळ उपचार आहे हें तर खरंच, पण आपलं काम करणारा आपला नोकर नसून मित्र आहे ही केवढी उच्च भावना या शब्दांच्या मागं आहे, नाहीं ? दुकानांत आज वस्तूंच्या पुड्या बांधून देणारी स्त्री, आपलं उपजीविकेचं साधन म्हणून हें काम करते, पण हें काम आटोपलं कीं आपल्या फुरसतीच्या वेळांत ती अर्थशास्त्राच्या प्रमेयांचा अभ्यासहि करीत असेल, एखाद्या ट्रेड युनियनच्या कचेरींत प्रचाराचं कामहि करीत असेल किंवा ही नोकरी करून इतर देशांत कामगार संघटनांचं काम कसं चालतं

याच्या अभ्यासासाठीं लागणाऱ्या खर्चाची तरतूदहि ती करीत असेल, नाहीं कुणी म्हणावं? म्हणजे आज दुकानांत फळांचे डबे, बिस्किटांचे पुडे, क्रीमच्या बाटल्या काढून देणारी स्त्री उद्यां मजुरांच्या मतदार संघांतून पार्लमेंटमध्यें निवडूनहि जाईल आणि वेळ आली तर आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेंत आपल्या देशाची प्रतिनिधि म्हणूनहि उपस्थित राहील. म्हणून आज तिनं दुकानांत अंडीं मोजून माझ्या पिशवींत घातलीं म्हणजे तिची लायकी कमी झाली असं मानतां येणार नाहीं आणि म्हणूनच तिनं जें काम केलं त्याबद्दल तिचे नुसते शब्दानं आभारहि माणसानं मानले नाहींत, तर आपल्या व्यक्तिमत्त्वाचा अपमान झाला अशी तीव्र जाणीव तिच्या मनाला कां होऊं नये? वरवर औपचारिक वाटणाऱ्या शब्दा-पाठीमागची ही भूमिका पाहिली, कीं या शब्दांना सामाजिक जीवनांत आलेलं महत्त्व अस्थानीं आहे असं वाटत नाहीं. किंबहुना समाजांतल्या जीवनमूल्यांचं प्रतिबिंब या औपचारिक वाटणाऱ्या शब्दांत स्पष्टपणें दिसलं असं मी म्हटलं तर तें तुम्हांला अतिशयोक्तीचं वाटूं नये.

माणसामाणसातला श्रेष्ठ-कनिष्ठपणा नाहींसा करण्यासाठींसुद्धां या जीवनमूल्यांचा फार उपयोग झाला आहे. आपल्याकडे कचेरींत कांचेच्या दाराआड बसणारा 'साहेब' आपली वैयक्तिक बारीकसारीक कामं कांचेच्या दाराबाहेर बसलेल्या शिपायानं करावीं असं नुसतं मानीतच नाहीं तर तीं त्याच्याकडून हक्कानं करून घेतो. त्यानं तीं केलीं तर 'त्याचं तें कामच आहे' अशा वृत्तीनं त्याच्याशीं वागतो आणि त्यानं तीं केलीं नाहींत—अरे बाप रे!—तर त्याला नोकरीवर राहणंहि कदाचित् अशक्य होऊन जाईल! इथल्या कचेऱ्यांत तुम्ही गेलांत तर अगोदर पोषाखावरून 'साहेब' आणि 'शिपाई' यांच्यांतला फरकच तुमच्या लक्षांत येणार नाहीं. कॉलेजांत गेलांत तर शिपाई कुठला आणि प्राध्यापक कुठला हेंच प्रथम लक्षांत येत नाहीं. दुपारच्या जेवणासाठीं प्राध्यापक आणि शिपाई एकाच रांगेंत उभे राहून कँटिनच्या वेट्रेसकडून हवे असलेले पदार्थ मागून घेऊन आपापल्या जागेवर जाऊन बसतात आणि आपला 'लंच' आटोपतात! शिपायानं साहेबाला खाद्यपदार्थ आणून द्यायचे ही कल्पना इथं नाहीं. साहेबानं आपलं काम करायचं, शिपायानं आपलं काम करायचं—बस्स! श्रेष्ठ-कनिष्ठपणाचं अनिष्ट प्रदर्शन हवंच कशाला?

पण याचा अर्थ कोणी कोणाबद्दल आदर दाखवूंच नये असा थोडाच आहे? मात्र तो दाखविण्याची इथली तऱ्हा मला अनुकरणीय तर वाटली नाहींच,

पण आम्ही पौर्वात्यांची तऱ्हा अधिक सुसंस्कृतपणाची आहे याबद्दल माझ्या मनांत तरी शंका नाहीं. इथं बोलतांना ज्याच्याशीं आपण बोलतों तो नुसता वरिष्ठच नव्हे तर गुरुजन असला तरीसुद्धां त्याला 'सर' म्हणण्याची मुळींच पद्धत नाहीं. यांत मला गैर असं कांहींच वाटलं नाहीं. स्वातंत्र्याच्या हवेंत पिढ्यान् पिढ्या वाढलेल्या माणसानं आपल्या वरिष्ठाला झालं तरी 'सर' कां म्हणावं? ॲन्डरसनच्या हाताखालीं काम करणारा एखादा रसेल कामासाठीं रजा मागायला गेला तरी 'Would you mind if I go an hour early today, Mr. Anderson ? असं विचारतो, आणि प्राध्यापकानं सांगितलेला विषय नीट समजला नाहीं तर 'I have not followed you, Mr. Clarke' असं वर्गातला विद्यार्थी आपल्या जागेवरून न उठतांच सांगतो. समानतेच्या भूमिकेकरून प्रत्येक जण दुसऱ्याशीं वागावा हें योग्य असलं तरी ज्याच्यापासून आपण विद्यादान घेतों त्याच्या-बद्दलचा आदर बाह्यतः तरी दाखविण्याची कांहींच योजना समाजांत नसावी हें थोडं विचित्र आहे असं मला तरी वाटतं. माझ्या बापानं भरलेल्या करांतून सरकार शिक्षकाला पगार देतं आणि पगार घेऊन रोज ज्ञानाचे रतीब तो घालतो, मग आमच्या घरीं येणाऱ्या गवळ्यापेक्षां त्याला मी अधिक किंमत कां द्यावी ही वृत्ति व्यवहारी असली तरी मानवी मनाचा विकास दर्शविणारी खचित नाहीं. कदाचित् हाच पूर्व आणि पश्चिम यांतला फरक असेल, आणि याचाच अभिमान साम्राज्यवादी किपलिंग कवीला वाटून 'पूर्व ती पूर्व आणि पश्चिम ती पश्चिम' असं तो म्हणाला असेल तर मीहि त्याला म्हणेन, 'तुझी ही संस्कृति तुलाच लखलाभ होवो!'

आजपर्यंत ब्रिटिशांच्या सरकारचंच नव्हे तर विचारांचंहि साम्राज्य आम्हां भारतीयांवर होतं, त्यामुळं आपल्या मनांत उगीचच एक प्रकारचा न्यूनगंड असे आणि गोऱ्या कातडीच्या खालीं कांहीं दुराग्रह किंवा दुर्गुण असतील असं मानायला (निदान उघडपणें बोलायला तरी!) आम्ही तयारच नव्हतों. त्यामुळं सद्‌गुण आणि दुर्गुण यांची मोठी विचित्र गल्लत आम्हीं केलेली होती. पण आतां स्वतंत्र माणसाच्या भूमिकेवरून जेव्हां आपण या गोष्टींकडे पाहतों तेव्हां ब्रिटिशांच्या प्रत्येक कृतीचं कौतुक केलंच पाहिजे असं बंधन उरत नाहीं, सद्‌गुण-दुर्गुणाचं योग्य मूल्यमापन करतां येतं आणि कोणत्या गोष्टी अनुकरणीय आणि राष्ट्रहितपोषक आहेत हें ठरवितां येतं, हा स्वातंत्र्याचा केवढा मोठा फायदा नकळत आपल्याला झाला आहे! अशा अनेक अनुकरणीय गोष्टींपैकीं कोणतंहि काम करण्याची मानसिक तयारी ही एक फार महत्त्वाची

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

—४...... दि: ...११...... 22e22 3-5-41 22e नों. दि. 3/7/7...

गोष्ट आहे असं वाटल्यावांचून राहत नाहीं. ही मानसिक तयारी असल्यामुळं आणि उद्योगधंद्यांची भरभराट झालेली असल्यामुळं 'नोकरी मिळत नाहीं' म्हणून कपाळाला हात लावून बसण्याचा प्रसंगच इथं कुणावर येत नाहीं. अगदीं अलीकडे ब्रिटिश सरकारच्या मजूर खात्यानं बेकारीबद्दल जे आंकडे प्रसिद्ध केले आहेत त्यावरून देशांत शेंकडा एक एवढीहि बेकारी नाहीं असं दिसतं. ज्याची काम करण्याची तयारी आहे त्याला नोकरी मिळते. सहज बाजारांतून जाऊं लागलं तरी दुकानांच्या दाराजवळ Vacancies अशा एका पाटीखालीं कोणकोणत्या जागा रिकाम्या आहेत हें लिहिलेलं असतं. Do you need a job ? किंवा Wanted Station-men and Station-women अशा पाट्याहि अनेक ठिकाणीं दिसतात. विशेषतः ज्या कामांत थोडं तरी कौशल्य लागतं अशा नोकऱ्या पुष्कळच उपलब्ध असतात आणि आठवड्याला आठ-दहा पौंड सहज मिळवितां येतात. याचा फायदा परदेशांतून आलेले अनेक विद्यार्थी घेतात आणि स्वावलंबनानं आपलं शिक्षण करतात. इकडे येण्यापुरते पैसे कसे तरी (जरूर तर कर्ज काढूनहि) जमविले तर इथं नोकरी करूनहि सहज शिकतां येतं. नोकरी करणाऱ्यांसाठीं संध्याकाळीं भरणारे सर्वच विषयांचे वर्ग इथं असतात. अभ्यासक्रम एक वर्षाऐवजीं दोन वर्षांचा, दोहोंच्या ऐवजीं तीन वर्षांचा, तिहींच्या ऐवजीं पांच वर्षांचा असतो, येवढंच काय तें. परदेशांत जाऊन चांगलं शिक्षण मिळवायचं अशी ज्यांची महत्त्वाकांक्षा असेल त्यांना इथं सहज मिळणारी नोकरी करून आपला शिक्षणक्रमहि पुरा करतां येईल, इतकी नोकऱ्यांची विपुलता इथं आहे.

इकडील परिस्थितीची खरी जाणीव अनेकांना होत नाहीं यासाठीं थोडं विस्तारानं मुद्दामच हें लिहिलं. मात्र इकडची राहणी खर्चाची असल्यामुळं कोणतंहि काम करण्याची मानसिक तयारी असली, कीं या भांडवलावर पुष्कळ गोष्टी सहज करतां येतील. पाश्चिमात्य देशांत कोणतंहि काम करण्याला माणसाची तयारी असते त्याबरोबरच इकडच्या सामाजिक जीवनांत सामान्यतः जो एक प्रामाणिकपणा दिसतो त्याचाहि उल्लेख अवश्य केला पाहिजे. रस्त्यावर वर्तमान-पत्र आणि फुलांचे गुच्छ कोणीहि विक्रेता नसतांहि विक्रीला ठेवलेले अनेक ठिकाणीं दिसतात आणि प्रत्येक जण वस्तूची योग्य ती किंमत तिथल्या पेटींत टाकून वस्तू नेतो, हा रोजचा अनुभव आहे. माणसाची सामान्यतः राहणीच अशी आहे कीं, बारीकसारीक वस्तूंची चोरी करण्याची बुद्धीच त्याला होत

नाहीं. ज्याला आठवड्याला सात पौंड म्हणजे सतराशें-अठराशें पेन्स सहज मिळवितां येतात तो दोन पेन्सांचं वर्तमानपत्र चोरील्च कशाला? म्हणजे एका अर्थानं या प्रामाणिकपणाचा उगम माणसाच्या सत्प्रवृत्तींत आहे असं म्हणण्यापेक्षां आर्थिक परिस्थितींत आहे असंच म्हणावं लागेल. इथं चोऱ्या होत नाहींत असं नव्हे, पण त्या बँकेंतली रोकड पळविण्यासाठीं किंवा जवाहिऱ्याच्या दुकानांतल्या लक्षावधि पौंडांच्या मौल्यवान् वस्तू करण्यासाठीं होतात, शेजारच्या घरांतलं भांडं चोरण्यासाठीं नव्हे! याचा अर्थ इथं सर्वच देवमाणसं आहेत असा मात्र नव्हे. मोड देतांना कमी पैसे हातावर ठेवणारीं आणि हें निदर्शनाला आणतांच Sorry म्हणून बाकीचे पैसे हातावर ठेवणारीं माणसं इथंहि आहेत, पण एकंदरींत सामाजिक जीवनांत प्रामाणिकपणा अधिक आहे हें मान्य करावंच लागेल.

इथली राहणी एकंदरींत महागाईची असते हें आतां सर्वांना माहित झालेलं आहे. पण इथं सर्वांना अधिक किंमत पडते ती मानवी श्रमाला! घरकामाला माणसं मिळत नाहींत, कारण बाहेर कुठेंहि गेलं आणि रोज आठ तास काम केलं तर आठवड्याला सात-आठ पौंड मिळण्याची खात्री असतांना तुमच्या घरीं भांडीं घासायला आणि केर काढायला तेवढा मोबदला दिल्याशिवाय मोलकरीण मिळेलच कशी? आपलीं कामं आपणच करण्याची प्रवृत्ति यांतूनच जन्माला आली आणि 'हलकीं कामं' हा शब्दप्रयोगच समजांतून हद्दपार झाला! विकलांग किंवा वृद्ध माणसांसाठीं नोकर मिळतात, पण येवढं वेतन मिळालं तरच! घरकाम करणारी मोलकरीणहि इथं मिळते, पण तिला बाहेर मिळणाऱ्या वेतनाइतकं वेतन आणि विश्रांतीचा वेळ मिळेल अशी खात्री असेल तरच! नोकरांच्या वेतनामुळंच दुकानांतल्या वस्तूंचे भाव वाढतात हें ओळखून मानवी बुद्धीनं इथं जी एक योजना आंखली आहे तिची गंधवार्ताहि अजून आमच्या सामान्य माणसापर्यंत गेलेली नाहीं! या योजनेचं नांव आहे Self-service. दुकानांत वस्तू काढून देण्यासाठीं जीं नोकर माणसं ठेवावीं लागतात त्यांचा पगार अखेर त्या वस्तूंवरच बसून त्या महाग होतात म्हणून दुकानांतल्या वस्तू गिऱ्हाइकाला दाखविणारा हा वर्गच नाहींसा करण्याचा इथं एक अभिनव प्रयोग सुरू आहे आणि Self-service चीं अनेक दुकानं दिसूं लागलीं आहेत. गिऱ्हाइकानं दुकानांत जायचं, लोखंडी तारांची एक टोपली उचलायची, सबंध दुकानांत फिरून आपणाला पाहिजे असलेल्या वस्तू टोपलींत भरून पैसे घेणाऱ्याच्या टेबला (Counter) जवळ यायचं आणि तिथल्या माणसानं त्या वस्तूंच्या किंमतींचा हिशोब करून पैसे घ्यायचे! प्रत्येक

वस्तू ज्या ठिकाणीं ठेवलेली असते त्या ठिकाणीं एक चिठी लावून त्या जातीच्या वस्तूंची किंमत लिहिलेली असते, त्यामुळं वस्तूंची किंमत कोणाला विचारावी लागत नाहीं आणि गिऱ्हाईक व दुकानदार या दोघांचाहि वेळ मोडत नाहीं. रोजच्या गरजेच्या वस्तू विकणाऱ्या दुकानांप्रमाणेंच Self–Service च्या उपाहार-गृहांतूनहि लोक आपणाला पाहिजे असलेले खाद्य पदार्थ स्वतःच उचलून घेतात आणि त्यांची किंमत देऊन मग टेबलावर खात बसतात. तथापि, ही पद्धति समाजोपयोगी असली तरी प्रत्येक वेळीं तिचा उपयोग करूं लागलों कीं ती कशी हास्यास्पद होते, हें परवां येथील 'पंच' या जगद्विख्यात साप्ताहिकानं मोठ्या मार्मिकपणें दाखविलं आहे. लाकडाचा एक अजस्र ओंडका गाडीवर टाकून 'फायरवुड' विकणारा ऐटीनं गाडीच्या पुढं चालला आहे आणि त्या ओंडक्यालाच एक कुऱ्हाड आणि करवत खिळे मारून अडकवून तिथं Self–Service अशी पाटी लावली आहे असं हें मोठं गंमतीदार व्यंगचित्र होतं. म्हणजे लाकूड पाहिजे असेल तर तें स्वतःच कापून किंवा तोडून घ्यायचं आणि मालकानं फक्त पैसे घ्यायचे !

नोकराचा पगार अजिबात कमी झाल्यामुळं या Self–Service च्या दुकानांतून इतरत्र एक शिलिंगाला मिळणारी वस्तू दोन-तीन पेन्सांनीं तरी स्वस्त मिळते. वस्तू गोळा करतांना त्या टोपलींत न टाकतां गिऱ्हाईक खिशांत टाकील ही शक्यता आहे खरी, पण एखादा मनुष्य गुन्हेगार आहे असं सिद्ध होईपर्यंत तो निरपराधी आहे हें जसं कायदा मानतो, तसाच प्रत्येक माणूस त्याची लबाडी उघडकीस येईपर्यंत प्रामाणिक आहे असं ब्रिटिश दुकानदार गृहीत धरतो असंच म्हणा ना ! एखाद्यावर आपण विश्वास टाकला, कीं मग आपणाला फसवितांना त्याचं मन कचरतं हें मानसशास्त्र जाणण्याइतका ब्रिटिश दुकानदार खचित हुषार असतो ! पिढ्यान् पिढ्या व्यापारच करीत आलाय् ना तो !

तुमचा,

वि. वा. पत्की

वा. क्र. ९८७६५

: ९ :

# इंग्लंडांतील शिक्षण-पद्धति

★

६, सॉंडर्स ग्रव्ह,
लंडन, (डब्ल्यू ११)
१६ डिसेंबर, १९५५

प्रिय बाळासाहेब,

मी इकडे येण्यापूर्वी रत्नागिरीला गेलों असतांना मी आतां लवकरच इंग्लंडला जाणार आहे हें माहीत झालेले माझे एक हितचिंतक थोड्या काळजीच्या स्वरांत मला म्हणाले होते—

"सांभाळून रे बाबा ! इंग्लंडला गेलेला माणूस कधीं गेला तसा परत आलेला कांहीं कुणाला माहीत नाहीं, तेव्हां..."

त्याच्या बोलण्यांतला अभिप्राय माझ्या लक्षांत आला होता, पण मुद्दाम वेड पांघरून मी म्हणालों होतों,

"मग मीसुद्धां जातों तसा मुळींच येणार नाहीं परत, खरंच !—"

"तूंसुद्धां? म्हणजे—"

"होय, मीसुद्धां! मला तिकडे जाऊन पुष्कळ शिकायचं आहे, पाहायचं आहे आणि नवीन गोष्टी शिकून आणि पाहून सुद्धां मी आहे तसाच राहावा असं वाटतं तुम्हांला? नवं ज्ञान मिळवून आणि नवं जग पाहून सुद्धां माणसानं आहे तसंच राहावं असं खरंच वाटतं तुम्हांला? मग जायचं कशाला येवढं दूर? आणि इतका खर्च करून?"

माझं हें बोलणं ऐकतांना त्यांच्या मनावरची काळजीची छाया कमी झाली होती कीं काय तें मला सांगतां यायचं नाहीं. पण माझ्या या बोलण्याची त्यांना थोडी गंमत वाटली असावी असं त्यांच्या अर्धस्फुट हास्यावरून मला वाटलं.

मात्र आपला हेतु स्पष्ट केल्यावांचून त्यांच्यानं राहवेना आणि ते म्हणाले,

"तसं नाहीं रे मी म्हणत, पण मदिरा आणि मदिराक्षी यांचा मोह मोठ-मोठ्यांनाहि सुटलेला नाहीं, म्हणून जरा—"

"मग त्यांचा मोह मला झाला नाहीं तर एक गोष्ट आपोआपच सिद्ध होईल कीं!"

"ती रे कोणती?"

"—कीं मी मोठा माणूस नाहीं!"

आतां मात्र खरंच ते मोठ्यानं हंसले. त्यांचं तें हंसणं आतांसुद्धां माझ्या कानांत कसं घुमतं आहे!

तरुण मनुष्य परदेशांत जाण्यासाठीं निघाला, कीं तिथल्या मोहांना तो बळी पडेल ही भीति आपुलकीच्या पोटींच जन्माला येते हें उघड आहे. जणुं काय परदेशांतच सारे मोह असतात आणि स्वतःच्या देशांत नसतात! पण आंधळ्या प्रीतीला हें सत्य नीटसं दिसत नाहीं. मात्र कांहीं जण क्षणिक मोहांना बळी पडले तरी ज्यांची ज्ञानलालसा तीव्र असते ते लोक मात्र परदेशांतून—आणि विशेषतः ज्ञानाची निष्ठेनं उपासना करणाऱ्या इंग्लंडांतून—पुष्कळ नवे संस्कार घेऊन जातात ही गोष्ट कांहीं नवी नाहीं. भारतांतील लोकांच्या मनांत पारतंत्र्याची चीड आणि स्वातंत्र्यलालसा पाऊणशें वर्षांपूर्वींच निर्माण केली ती इंग्लंडांत शिक्षण घेऊन गेलेल्या किंवा इंग्रजी विचारसरणीचे संस्कार मनावर झालेल्या महाभागांनींच ना? भारतीय स्वातंत्र्यलढ्याला निर्णायक स्वरूप आणलं तें गांधी, वल्लभभाई, जवाहरलाल, जयप्रकाश, सुभाषबाबू यांनींच ना? आणि यांच्यापैकीं प्रत्येकावर पाश्चिमात्य शिक्षणाचे संस्कार झाले होते हें काय कुणाला माहीत नाहीं? मग केवळ चार स्वच्छंदी माणसं मोहाला बळी पडलीं असलीं म्हणून तेवढ्यासाठीं साऱ्या शिक्षणपद्धतीचा अधिक्षेप करणं हा केवढा वेडेपणा!

उलट, ज्या देशानं आपल्या प्रत्येक नागरिकाच्या अंतःकरणांत स्वदेशाभिमानाची ज्योत अखंड तेवत ठेवली आहे आणि आपला देश मोठा करण्यासाठीं आपण झटलं पाहिजे या विचारसरणीचं बीज पेरलं आहे त्या देशानं हें सारं कसं केलं हें समजावून घेणं खरंच फार आवश्यक आहे. इथं इंग्लंडांत शिक्षण घेण्यासाठीं आलेल्या अनेक भारतीय विद्यार्थ्यांत सुद्धां स्वतःच्या देशाविषयीं तीव्र अभिमान असलेला क्वचितच दृष्टीस पडतो आणि 'आहे काय आपल्या देशांत?' असं उघडपणें ते विचारतात तेव्हां मला मोठं नवल वाटतं आणि दुःख होतं.

इथली सुबत्ता, सामाजिक सुरक्षितता आणि मोह पाडणारं जीवन पाहून आपल्या देशांत हें वैभव कसं निर्माण करतां येईल हा निदिध्यास आम्हांला कधीं लागत नाहीं आणि बाह्य गोष्टींचं तेवढं अनुकरण आम्ही करूं लागतों, म्हणूनच तरुण विद्यार्थी परदेशांत शिक्षणासाठीं जाऊं लागला, कीं तो नवं विचारधन घेऊन येईल असं वाटण्याऐवजी तो तिथल्या मोहांत बळी पडेल अशी भीति स्वकीयांना वाटते.

यासाठींच इकडे आल्यापासून इथली शिक्षण-पद्धति समजावून घेण्याचा मी प्रयत्न करीत आहें. मीहि एक विद्यार्थीच असल्यामुळं या शिक्षणपद्धतीचा थोडा थोडा अनुभव मी स्वतःच घेत आहें कीं ! अगदीं प्रथम एक गोष्ट चटकन् लक्षांत येते ती ही कीं या शिक्षण-पद्धतींत विद्यार्थ्यांच्या स्वतंत्र विचारांना भरपूर वाव दिला जातो. केवळ शिक्षक सांगतो तें खरं मानायचं अशी वृत्ति विद्यार्थ्यांत निर्माण होणार नाहीं अशी दक्षता घेतली जाते आणि विद्यार्थ्यांच्या स्वतंत्रपणें विचार करण्याच्या (Free Thinking) वृत्तीला नेहमीं उत्तेजन दिलं जातं. तासभर तोंड-पाटिलकी केली कीं संपलं आपलं काम, असं शिक्षक मानीतच नाहींत, उलट आपण जें सांगितलं त्यामुळं विद्यार्थ्यांच्या मनांत जे विचारतरंग उठले असतील, ज्या शंका-कुशंका निर्माण झाल्या असतील, त्यांचं समाधान करणं आपलं कर्तव्य आहे असं ते मानतात आणि आपला विषय सांगून संपला कीं, "And now Questions!" (आतां विचारा पाहूं प्रश्न!) असं म्हणून विद्यार्थ्यांनीं प्रश्न विचारावे म्हणून उत्तेजन देतात! आणि ही प्रश्न विचारण्याची एकदां परवानगी मिळाली, कीं विद्यार्थी इतके प्रश्न विचारतात कीं कांहीं सोय नाहीं! आश्चर्य असं, कीं प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रश्नांतूनच त्याचीं विचारसरणी कशी एकांगी आहे हें त्याला पटवून दिलं जातं, या चर्चेंतूनच ज्ञानाचा खरा लाभ घडतो आणि 'बाबा वाक्यं प्रमाणम्' ही वृत्ति मूळ धरूं शकत नाहीं! शाळेंतल्या किंवा कॉलेजांतल्या शिक्षकानं विद्यार्थ्यांच्या रिकाम्या मनःपात्रांत ज्ञानामृत ओतायचं आणि विद्यार्थ्यानं आपलं भांडं भरून घ्यायचं ही वृत्ति मनोविकासाला उपकारक नाहीं, हें आमच्या शिक्षण-शास्त्रज्ञांनाहि माहीत आहे खरं, पण तिचा अंमल कितीसा होतो ?

स्वतंत्रपणें विचार करण्याच्या पद्धतीमुळं ज्ञान हें केवळ 'दिलं' जात नाहीं, तें 'संपादन केलं जातं' याचीं एकदोन माझ्याच अनुभवांतलीं उदाहरणं सांगतों हवीं तर. मी ज्या वृत्तत्रपलेखनाच्या वर्गांत शिकतों त्यांत ज्या वृत्तपत्रांत आपणाला लिहायचं असतं त्या वर्तमानपत्राचं स्वरूप ओळखल्याशिवाय लेखनच करतां यायचं नाहीं हा एक अविवाद्य सिद्धांत मानला जातो. म्हणजे ज्या वृत्तपत्रांत

मी लिहितों त्यांत केवळ घडलेल्या हकीगतीचा सरळसरळ, जसा घडला तसा वृत्तांत दिला जातो कीं हा वृत्तांत देतांना (आणि तो वाचतांना) वाचकांचा ग्रह अमुक बाजूनं व्हावा म्हणून मुद्दाम दक्षता घेतली जाते हें वृत्तपत्रलेखकाला प्रथम ध्यानांत घेऊनच मग टाक उचलावा लागतो. आणि हें जर खरं तर जसाच्या तसा वृत्तांत देणारीं पत्रं आणि वृत्ताला मुरड घालणारीं पत्रं (इंग्रजींत यांना Quality papers व Popular papers असं संबोधण्याचा प्रघात आहे. वृत्ताला अजिबात मुरड न देणारं वृत्तपत्र हें निर्गुण आणि निराकार परमेश्वरासारखंच फक्त कल्पनेंतच असूं शकतं हा प्रश्न निराळा!) असं वृत्तपत्राचं वर्गीकरण आपोआपच होतं. यांतूनच असा प्रश्न निर्माण होतो, कीं मग या वृत्तपत्रांचीं वैशिष्ट्यं तरी कोणतीं? शिक्षकाला तीं आम्हांला सांगतां आलीं असतीं, पण तसं न करतां लंडनमध्यें जीं दैनिक वृत्तपत्रं निघतात तीं एक दिवस वर्गांत आणलीं होतीं आणि त्यांतूनच या वृत्तपत्रांची जी वैशिष्ट्यं दिसलीं तीं पाहून, त्यांच्याबद्दल चर्चा करून जी यादी आम्हीं तयार केली तेवढी यादी 'जर्नालिझम्' वरच्या एकाहि पुस्तकांत नव्हतीं! आणि हीं आम्हीं शोधून काढलेलीं असल्यामुळं हें ज्ञान 'मिळविलं' हा आनंद झाला तो निराळाच. ज्ञान देण्याऐवजीं ज्ञानाची भूक विद्यार्थ्यांत निर्माण करतो तोच खरा शिक्षक हें इथं गृहीतच धरलं जातं आणि याचा उपयोग विद्यार्थ्यांत स्वतंत्रपणें विचार करण्याच्या शक्ति निर्माण करण्यांत होतो.

दुसरं उदाहरण थोडंसं वैयक्तिक आहे. वृत्तपत्रलेखकाला भाषा हेंच माध्यम वापरायचं असल्यामुळं भाषेवरील प्रभुत्व फार आवश्यक असतं आणि तें यावं म्हणून निरनिराळ्या लेखकांच्या कलाकृतींचा अभ्यास वृत्तपत्रलेखकाला करावा लागतो. इंग्रजी भाषा चांगली यावी याच हेतूनं अगदीं अलीकडील लेखकांच्या कादंबऱ्याहि यासाठींच आमच्या अभ्यासक्रमांत ठेवलेल्या आहेत. त्यांतल्या एका कादंबरीवर 'वृत्तपत्रीय परीक्षण' आम्हाला लिहायचं होतं आणि ही कादंबरी पहिल्या दर्जाची कलाकृति आहे असं तर कांहीं टीकाकारांचं म्हणणं होतं. आमच्या प्राध्यापकांचा तर हा फार आवडता लेखक होता. आम्हांला परीक्षण लिहायला सांगितलं तेव्हां मी "कलादृष्ट्या ही कादंबरी अगदीं सामान्य आहे आणि हार्डी किंवा टॉलस्टॉय यांच्या कादंबऱ्यांच्या तुलनेनं इंग्रजी वाङ्मयांतसुद्धां ही अल्पजीवीच ठरेल" असं भाष्य केलं, तेव्हां केवळ इतरांच्यापेक्षां माझी टीका (शिक्षकांना ती पसंत नसूनहि!) स्वतंत्र विचारदर्शक आहे म्हणून शिक्षकांनींच माझी पाठ थोपटली! सांगायचा मुद्दा येवढाच, कीं स्वतंत्रपणें विचार करण्याची

संवय विद्यार्थ्याला लागावी अशी काळजी सदैव वाहिली जाते आणि तिचा परिणाम अखेर जीवनाच्या सर्व क्षेत्रांत झालेला स्पष्टपणें दिसतो.

शिक्षण संस्थांतूनसुद्धां जीं निरनिराळ्या विद्वानांचीं भाषणं होतात त्या भाषणांच्या शेवटीं प्रश्नोत्तरांचा एक ठराविक कार्यक्रम असतो. किंबहुना वक्त्याच्या भाषणानंतर प्रश्नोत्तरं व्हायचींच हा इकडे एक प्रघातच आहे. वक्त्यानं वाटेल तीं विधानं करावीं आणि श्रोत्यांनीं तीं नुसतीं ऐकून घरीं जावं अशी इथं पद्धतच नाहीं. मात्र वक्त्याचं भाषण शांतपणें ऐकून घ्यायचं आणि त्याचं भाषणं संपलं कीं प्रश्न विचारून आपलं शंका निरसन करून घ्यायचं ही पद्धत मला तरी मोठी अनुकरणीय वाटली. व्याख्यानाच्या शेवटीं प्रश्नांना तोंड द्यावं लागणार आहे याची जाणीव व्याख्यात्यांनाहि असते, त्यामुळं केवळ भरमसाट विधानं करून चालायचं नाहीं हें ओळखून तो बोलतो आणि त्याच्या ज्ञानाची, हजरजबाबीपणाची आणि वादविवादकौशल्याची परीक्षा त्याच्या व्याख्यानापेक्षां या प्रश्नोत्तराच्या वेळींच नेहमीं होते. या कसोटीला आपल्या देशांतले किती पुढारी, विद्वान् आणि सार्वजनिक कार्यकर्ते उतरतील? हा प्रयोग खरोखरच करून पाहण्यासारखा आहे, असं तुम्हांला नाहीं वाटत? अशी पद्धत आपल्याकडेहि रूढ झाली तर वक्तेहि अभ्यास केल्यावांचून तोंड उघडायला धजणार नाहींत आणि सामान्य माणसांतील चिकित्सक वृत्ति जागृत होईल असा विचार सारखा माझ्या मनांत येतो. सामान्य मनुष्य असा चिकित्सक व्हावा असं बाळकडू त्याला इथं शिक्षणांतूनच मिळतं आणि शिक्षण म्हणजे उपजीविकेचं साधन आणि शिक्षणाचं ध्येय पदवीसंपादन असं यामुळंच इथं कुणी मानीत नाहीं.

या तुलनेनं आपल्या देशांतली शिक्षणपद्धति कशी आहे? विद्यार्थ्यांची चिकित्सक वृत्ति जागृत व्हावी आणि तिची तृप्ति ज्ञानानं व्हावी अशी योजनाच आपण केलेली नाहीं. परकीय सरकारला अशा गोष्टीची आवश्यकता वाटणंच शक्य नव्हतं, पण स्वातंत्र्यकालांतील प्रत्येक नागरिक चिकित्सक झाला तरच आमची लोकशाही मूळ धरील हें लक्षांत घेतलं तर आपल्या शिक्षणपद्धतीकडे अधिक बारकाईनं लक्ष देण्यावांचून गत्यंतर नाहीं हें कुणीहि मान्य करील. आमच्या प्राथमिक आणि दुय्यम शाळांतून तर सोडाच, पण कॉलेजांतूनहि आम्हांला जे शिक्षण मिळतं त्याला पोपटपंची याहून दुसरं नांव नाहीं. शेक्सपीयरच्या हॅम्लेटबद्दल निकोल काय म्हणतो आणि रिचर्डस् काय म्हणतो, सांख्यदर्शनाबद्दल राधाकृष्णन् काय म्हणतात आणि मॅक्समुल्लर काय म्हणतो, हें आमचे प्राध्यापक करें

धडाधड सांगतात, पण तुम्हांला स्वतःला काय वाटतं असं विद्यार्थीहि कधीं विचारीत नाहीं, आणि 'तुझं काय म्हणणं आहे' अशी प्राध्यापकहि कधीं पृच्छा करीत नाहीं, कारण दोघांनींहि स्वतंत्रपणें कधीं विचारच केलेला नसतो !

इंग्लंडमधील शिक्षणपद्धतींत आणि आपल्या शिक्षणपद्धतींत फरक आहे तो हाच. हा फरक जोंपर्यंत आपण लक्षांत घेत नाहीं आणि शिक्षणामुळं आजचा विद्यार्थी—म्हणजेच उद्यांचा नागरिक–चिकित्सक होईल अशी दक्षता घेत नाहीं—तोंपर्यंत आमचं सामाजिक जीवन अधिक संपन्न होईल अशी अपेक्षा करणं म्हणजे नदी डोंगरावर वाहात जाईल म्हणून वाट पाहत बसण्यासारखंच आहे. अशी चिकित्सक वृत्ति समाजांत नसली म्हणजे आपलं सामाजिक जीवन केवढं हास्यास्पद होतं याचं कांहीं वर्षांपूर्वीं पुण्याच्या नगरपालिकेंत घडलेलं एक उदाहरण नमुनेदार म्हणून सांगतां येईल. आपलं उभं आयुष्य स्त्रीशिक्षणासाठीं (आणि सामाजिक समतेच्या प्रस्थापनेसाठीं) झिजविणारे महर्षि अण्णासाहेब कर्वे यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठीं पुण्यांतील एका महत्त्वाच्या रस्त्याला त्यांचं नांव द्यावं अशी सूचना आली असतांना "कर्व्यांचं नांव रस्त्याला द्यायचं रावसाहेब म्हणतात तर देऊं या, आमची कांहीं हरकत नाहीं, पण हे कर्वे कोण तेवढं सांगा" अशी पृच्छा एका सभासदानं केल्याचं सांगतात ! आतां असल्या प्रकारांना काय म्हणायचं, तुम्हीच सांगा. आमचं अज्ञान आणि मागासलेपणा यांचं तर हें उदाहरण आहेच, पण नगरपालिकेचे सभासद झालेल्या माणसांत अणुमात्रहि चिकित्सक-वृत्ति रुजलेली नाहीं याचंच हें ढळढळीत उदाहरण नाहीं काय ?

याचा अर्थ इंग्लंडमधील विद्यार्थी जन्माला येतो तेव्हांच चिकित्सक वृत्तीची सामग्री बरोबर घेऊन जन्माला येतो आणि आमच्या देशांतील विद्यार्थ्यांना हा वारसा मिळत नाहीं, असा नव्हे. विद्यार्थ्यांची चिकित्सक वृत्ति ही कांहीं त्याच्या कपड्यांसारखी शिंप्याकडून तयार करून आणून त्याच्या अंगावर घालायची वस्तु थोडीच आहे ? वस्तुतः ती प्रत्येकांत आहे. साऱ्या तत्त्वज्ञानाचा उगमच मुळीं आश्चर्यांतून—म्हणजे चिकित्सक वृत्तींतून—होतो म्हणतात. आणि हें जर खरं तर जीवनाला उपकारक असलेल्या या वृत्तीचं पोषण व्हावं अशी व्यवस्था समाजानंच करायला नको काय ? यासाठीं सर्वांत पहिली गोष्ट कोणती हवी असेल तर ही, कीं चिकित्सक वृत्ति ही मानवी जीवनांतील एक अत्यावश्यक बाब आहे ही जाणीव समाजाच्या तळापर्यंत जाऊन पोंचली पाहिजे. आमच्या विद्यार्थ्यांत ही चिकित्सक वृत्ति वाढत नाहीं याचं खरं कारण हेंच आहे कीं, आमच्या समाजा-

लाच अजून तिचं महत्त्व पटलेलं नाहीं. भलत्याच गोष्टींची चिकित्सा करणारा एखादा विद्यार्थी निघालाच तर तो 'व्रात्य' ठरतो. तथापि हा 'व्रात्यपणा' त्याच्या नैसर्गिक जिज्ञासेची तृप्ति विहित मार्गांनीं न झाल्यामुळंच आलेला असतो हें अवधान कांहीं आम्हांला राहत नाहीं.

आम्ही विद्यार्थ्याला जें शिकवतों त्यांत त्याला गोडी वाटते कीं नाहीं याची पर्वा कधीं करीत नाहीं. एकाद्या विद्यार्थ्याचा नैसर्गिक कल कोणत्या विषयाकडे आहे, त्याला कोणत्या विषयाबद्दल आकर्षण वाटतं हें जाणून घेतलं तरच त्याच्या मनोविकासाला आवश्यक असं वातावरण निर्माण करतां येईल आणि त्याचा मानसिक विकास होईल. त्याला नको असलेले विषय त्याच्यावर लादले, कीं त्याचा परिणाम येवढाच होतो कीं, शिक्षक काय सांगतो आहे इकडे त्याचं कधीं लक्षच नसतं. म्हणूनच त्याचं लक्ष वेधेल, त्याची चिकित्सक वृत्ति जागृत होईल आणि त्याची ज्ञानक्षुधा प्रक्षुब्ध होईल अशी योजना झाली तरच नवीन ज्ञानाचा प्रवेश त्याच्या मनःकोषांत होईल. ही गोष्ट येवढी उघड असतां या मार्गानं जाण्याऐवजीं पिढ्यान् पिढ्या आम्ही विद्यार्थ्याला भलत्याच आडरानांत नेत आहों आणि अप्रिय विषयाचे कांटे तुडवावे लागल्यामुळं 'नको तें शिक्षण' असं त्याला झालं आहे.

बालमनाचा हा अभ्यास पाश्चिमात्यांनीं केला आणि धैर्यानं त्या मार्गावर पाऊल टाकलं म्हणूनच आज त्यांच्या सामाजिक जीवनाला बहर आलेला दिसत आहे. विद्यार्थ्यांची नैसर्गिक प्रवृत्ति कोणती आहे हें अजमावल्यावांचून त्याला समाजाचा उपयुक्त घटक बनवितांच येणार नाहीं हें ओळखून शिक्षणाच्या सुरुवातीपासूनच या नैसर्गिक प्रवृत्ति सूक्ष्मतर साधनांनीं मोजण्याची प्रथा पाश्चिमात्य देशांतील शिक्षणक्षेत्रांत आज अनेक वर्षें सुरू आहे. त्यामुळं विद्यार्थ्यालाच नव्हे तर पालकालाहि आपला मुलगा अगर मुलगी समाजजीवनांतल्या कोणत्या क्षेत्रांत यशस्वी होईल याचा अंदाज बांधतां येतो आणि त्या मार्गानं जाणं सर्वांनाच सुलभ होतं. याच्या उलट, बाप वकील आहे म्हणून मुलानं वकीलच व्हायचं आणि बापानं रोग्यांना आवश्यक नसलेलीं इंजेक्शनं देऊन धंद्यांत 'नशीब' काढलं म्हणून मुलानं तोच धंदा करायचा यांत आम्ही भूषण मानीत आलों. 'वकील व्हायचं माझ्या मनांत मुळींच नव्हतं, पण वडील ऐकेनात' असं अनेक वकील म्हणतात आणि अनेक डॉक्टर रोग्याच्या शरीराकडे लक्ष देऊन उपचार करण्याऐवजीं त्याच्या मनोविकृतीचीं चित्रं रंगविणाऱ्या कथा आणि कादंबऱ्या लिहीत बसतात. याचा परिणाम अखेर अशिलाचा कज्जा बुडण्यांत आणि रोग्यांला

स्वर्गाचं दार उघडण्यांत होतो! विद्यार्थ्याची नैसर्गिक प्रवृत्ति ओळखणं आणि तिचा विकास होईल अशी योजना करणं पाश्चिमात्यांना आवश्यक वाटलं म्हणूनच या राष्ट्रांचं सामर्थ्य अनेक दृष्टींनीं वाढलं हें विसरून चालणार नाहीं.

इकडील विद्यार्थी चिकित्सक व्हावा म्हणून समाजानं व्यवस्था केली, त्याचे इतरहि परिणाम आपोआपच घडून आले. चिकित्सक वृत्ति एकदां काम करूं लागली, कीं जीवनाचीं सगळीं क्षेत्रं ती व्यापून टाकते. स्वतः चिकित्सक झालेला विद्यार्थीहि मग स्वतःला विचारूं लागला, कीं माझ्या शिक्षणासाठीं लागणाऱ्या खर्चाचा भार तरी मीं माझ्या पालकावर कां घालावा? निदान हा भार जेवढा कमी करतां येईल तेवढा तरी तो कमी करणं हें माझं कर्तव्य नाहीं काय? माझ्या रिकाम्या वेळांत किंवा निदान सुट्यांच्या दिवसांत मी नोकरी केली तर माझ्या पालकावरील भार कमी होईल ही जाणीव झालेला विद्यार्थी खरोखरच अशीं कामं इकडे करतो. Holiday jobs हा इकडील नोकऱ्यांचा त्यामुळं एक भागच होऊन बसला आहे. प्रत्येक सुटींत अशा अनेक प्रकारच्या नोकऱ्याहि मिळण्याची व्यवस्था समाजानं केली आहे. उपाहारगृहांतून तर अशीं कामं मिळतातच, पण कारकून, शिपाई, माल दाखविणारे, पेट्यांत माल भरणारे, ट्रॅम आणि बसं कंडक्टर, कांचा पुसणारे, मालावर लेबलं चिकटविणारे अशीं विविध कामं विद्यार्थ्यांना सहज मिळूं शकतात आणि स्वावलंबन हा पाश्चिमात्य जीवनाचा महामंत्र असल्यामुळं विद्यार्थीहि हीं कामं कोणत्याहि प्रकारें कमीपणाचीं न मानतां करतात. याचा परिणाम पैसे मिळविण्याबरोबरच जगाचं ज्ञान होण्यांतहि होतो. केवळ पुस्तकांतून ज्ञान मिळवीत बसलं तर जगाचं ज्ञान कधींच होत नाहीं, कारण जीवन हाच एक मोठा ग्रंथ आहे आणि ग्रंथांच्या अभ्यासांतून पोपट निर्माण होतात असं कुणीसं म्हटलं आहे, आठवतं तुम्हांला? स्वतंत्र भारताला आतां पोपट नकोत, माणसं हवीं आहेत, कर्तबगार माणसं हवीं आहेत, खरं ना?

तुमचा,

वि. आ. पत्की

## : १० :

# इंग्लंडांतील नाताळ

★

६, सॉंडर्स ग्रव्ह,
लंडन (डब्ल्यू. ११)
१ जानेवारी, १९५६

प्रिय बाळासाहेब,

यंत्रयुगाचा सर्वांत मोठा दोष कोणता असं जर मला कुणी विचारलं तर एक क्षणभरहि न थांबतां मी चटकन् म्हणेन, "जीवनाचा तोचतोपणा." माणसानं आपल्या सोयीसाठीं यंत्रं तयार केलीं खरीं, पण कालांतरानं असं झालं, कीं तोच यंत्राचा गुलाम बनला! याचा परिणाम अखेर असा झाला कीं आपलं जीवनच यांत्रिक होऊन बसलं आणि त्यांतून सुटका नाहीं अशी आपली खात्री झाली. रोज अमुक वाजले कीं शाळेंत, कचेऱ्यांत किंवा कारखान्यांत जावंच लागल्यामुळं माणसं कशीं घड्याळाचीं गुलाम बनलीं हें रोज आपणहि पाहतोंच कीं! घड्याळांत नऊ वाजले, कीं कचेरीच्या दिशेनं माणूस कसा यंत्रासारखा चालायला लागतो हें मोठमोठ्या शहरांत रोज दिसणारं दृश्य आहे. अमुक वेळीं कामावर जायचं, अमुक वेळीं जेवायचं, अमुक वेळीं गाडी किंवा बस गांठायची, अमुक वेळीं ठरलेल्या ठिकाणीं पोचायचं कींवा तिथून परत निघायचं इतकंच काय पण अमुक वेळीं झोंपायचं हें सारं कसं ठरून जातं या यंत्रयुगांत! अमुक वेळेला आपण उठतों ते निद्रासौख्य पुरे वाटलं म्हणून नव्हे तर कामावर जायची घाई असते म्हणून. अमूक वेळेला आपण जेवतों तें भूक लागलेली असते म्हणून नव्हे, तर जेवणाची वेळ झाली म्हणून! माणसानं आपल्या बुद्धिचातुर्यानं निर्माण केलेल्या यंत्राचाच तो अखेर गुलाम व्हावा हा केवढा विरोधाभास आहे!

आणि म्हणूनच यंत्राच्या या सासुरवासांतून आपली सुटका करणारी सुटी कधीं

एकदां येते यासाठीं माणूस अधीर झालेला असतो—नव्हे, त्या दिवसाकडे डोळे लावून सारखा धापा टाकीत धावत असतो. त्यांतून या सुटींत एखादा वर्षाचा सगच येत असेल तर केव्हां एकदां ही सुटी येते असा उतावळेपणाहि त्याच्या मनाला वाटत असतो. या सुटींत अमुक करायचं, अमक्या ठिकाणीं जायच, *अमक्याला भेटायचं, अमका खेळ खेळायचा,* हे सारे बेत करण्यांत माणसाला केवढा आनंद वाटतो, नाहीं ? योजनापूर्वक प्रत्येक गोष्ट करण्याची संवय लागलेल्या लोकांना तर या योजना आंखण्यांतच मग एक मोठी गंमत वाटत असते. मनुष्य हा मुळांतच उत्सवप्रिय आणि उत्सवप्रियतेला आर्थिक सुबत्तेची जोड मिळाली म्हणजे तिला नवा बहर आला नाहीं तरच नवल!

इथं या लंडन शहरांत गेला महिना दीड महिना नाताळच्या धांदलींत सारे स्त्री-पुरुष येवढे निमग्न झालेले मला दिसत होते तेव्हां मी मनांत म्हणत होतों, जीवनांतला आनंद जास्तींत जास्त कसा उपभोगावा हें शिकावं या पाश्चिमात्य लोकांपासूनच ! नाताळचा मुख्य दिवस यायला चांगला महिना होता, तेव्हां-पासूनच नाताळची तयारी करण्यांत स्त्रिया, पुरुष, मुलं येवढीं गढून गेलेलीं दिसत, कीं पाहणाराला आश्चर्य वाटावं. कुठल्याहि मोठ्या रस्त्यावर गेलांत तरी मोठमोठींच नव्हे तर छोटीं छोटींहि दुकानं येवढ्या आकर्षक रीतीनं सजविलेलीं दिसत कीं, माझ्यासारख्याला कांहीं घ्यायचं नसतांनाहि त्या अपूर्व शोभेकडे पाहत राहिल्यावांचून राहवत नसे. स्त्रियांच्या पूर्णाकृति मॉडेल्सवर स्त्रियांचीं निर-निराळ्या रंगांचीं, निरनिराळ्या आकारांचीं इतकीं भपकेदार आणि मौल्यवान् वस्त्रं घालून ठेवलेलीं प्रत्येक शो-रूममध्यें दिसत, कीं घाईनं आपल्या महत्त्वाच्या कामगिरीवर निघालेल्या माणसाच्या पावलांची गति मंदावल्यावांचून राहू नये. पुरुषांचे निरनिराळ्या रंगांचे उंची लोकरीचे सूट, मुलांचे तऱ्हेतऱ्हेचे रंगीबेरंगी कपडे, नानाविध प्रकारच्या बाहुल्या, घड्याळं, अंगठ्या, कॅमेरे, टाइप-रायटर्स, धूम्रपानाचीं साधनं, पुस्तकं, कातड्याच्या आकर्षक बॅगा—किती म्हणून सांगूं ?—प्रत्येक दुकानांतून येवढ्या कलात्मक रीतीनें लावून ठेवलेल्या दिसत कीं पाहणाराचं मन प्रसन्न व्हावं ! किंबहुना सुंदर वस्तूंच्या निर्मितीपेक्षांहि त्यांची कलात्मक मांडणी ही केवढी महत्वाची गोष्ट आहे यांचं प्रत्यंतर या मांडणीकडे पाहतांच लक्षांत आल्यावांचून राहत नसे. शोरूममध्यें चाळीस-पंचेचाळीस गिनींचा (म्हणजे सुमारें ५००-६०० रुपये किंमतीचा) स्कर्ट घातलेली स्त्रीची आकृति निरनिराळ्या रंगांच्या वेलींनीं येवढी आकर्षक केलेली दिसायची कीं

स्त्रीची मुलायम आकृति, वस्त्रांचे आल्हादक रंग आणि कागदाच्या वेलींत दिसणारा ताजेपणा यांतलं अधिक आकर्षक कोणतं याचा संभ्रम माणसाच्या दृष्टीला पडावा! साऱ्या रस्त्यांची शोभा वाढविण्यासाठीं रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या इमारतींच्या उंच टोकांवरून केसांपेक्षांहिं बारीक तारांनीं बांधलेल्या हिरव्या, तांबड्या, पिवळ्या, निळ्या रंगांच्या कागदांच्या इतक्या विविध आकृती सोडलेल्या असत, कीं एखादी अदृश्य देवताच प्रसन्न होऊन स्वर्गातून पुष्पवृष्टि करीत आहे कीं काय असा भास व्हावा!

आणि नाना तऱ्हेच्या वस्तू खरेदी करणाऱ्यांची फुटपाथवर आणि वाहनांची रस्त्यावर एवढी कांहीं प्रचंड गर्दी असे कीं कांहीं विचारू नका! या गर्दीमुळं अनेक वेळां रस्त्यावरची वाहतूकहि बंद पडे. दुकानांच्या शो-रूममध्यें मांडून ठेवलेल्या वस्तू पाहत पाहत एकमेकांच्या हातांत हात घातलेले तरुण स्त्री-पुरुष त्या वस्तूंतल्या कोणत्या विकत घ्यायच्या याबद्दल कुणालाहि ऐकूं जाणार नाहीं येवढ्या हलक्या आवाजांत कुजबुजत पुढें पुढें जात तेव्हां खरोखरच यांना कांहीं विकत घ्यायचं आहे कीं या वस्तू पाहात पाहात हीं नुसती गमतीनं फिरत आहेत हें कधीं कळत नसे. मुलांना आवडणाऱ्या वस्तू ज्या दुकानांत असत तिथें मुलं गोळा होत हें स्वाभाविक असलं, तरी आपणाला हवी असलेली वस्तु आईनं विकत घेऊन द्यावी म्हणून

Cry, cry, baby cry!
And make the mummy buy!

अशा पाट्या लावून मुलांना चिथावणी देणाऱ्या दुकानदारांच्या युक्तीची मोठी गंमत वाटायची. नाताळांत इकडे प्रत्येक माणूस आपल्या नात्यांतल्यांच नव्हे तर अनेक वेळां परिचयांतील व्यक्तीलाहि भेट म्हणून अनेक वस्तु देत असल्यामुळें अशा खास भेटीच्या वस्तु, वस्तूपेक्षांहि अधिक सुंदर आवरणांत गुंडाळून, शोरूममध्यें ठेवलेल्या असत आणि या वस्तूंना किंमतीच्या चिठीबरोबरच 'Why not give this present to her this christmas?' अशी चिठी लावून तरुणांच्या मनाला गुदगुल्या करण्याचा खेळ दुकानदार खेळत आणि याचा अर्थ ज्याचा त्याला उमगे! नाताळचा मुख्य दिवस जवळ येत चालला तशी ही गर्दी येवढी वाढूं लागली, कीं अगोदरच कचेऱ्या, कारखाने, शाळा सुटल्या, कीं स्टेशनवर किंवा बस स्टँडवर होणाऱ्या गर्दींत कल्पनातीत वाढ होऊं लागली व शाळा, कचेऱ्या आणि कारखाने यांना जाणाऱ्या-येणाऱ्या लोकांच्या



कबुतरांशीं खेळणारी मुलं . ट्रॅफलगार स्क्वेअर, लंडन



टेम्स नदीवरील लंडन



हिमकण झेलून
धरणारं
हिंवाळ्यांतील
झाड



हिंवाळ्यांतील
निष्पर्ण वृक्ष

जाण्या-येण्याच्या वेळीं लोकांनीं खरेदीसाठीं जाऊं नये म्हणून Shop between Ten and Four अशा पाट्या सर्वत्र लावलेल्या दिसूं लागल्या. मात्र हें खरेदीचं काम पुरुषांपेक्षां स्त्रियाच अधिक करतांना दिसत आणि त्यामुळं या गर्दींत बहुसंख्य स्त्रियाच असत.

तसं पाहिलं तर वास्तविक नाताळ हा एक धार्मिक सण आहे. पण इतर देशांप्रमाणें या देशांतहि धार्मिक प्रवृत्तीला ओहोटी लागलेली असल्यामुळं केवळ धार्मिक असं या सणाचं महत्त्व राहिलेलंच नाहीं. माझे एक शिक्षक तर नेहमीं म्हणत असतात, "Now-a-days, we go to church either to be married or to be buried!" नाताळचा सण पाळला जातो तो मुख्यता येशु ख्रिस्ताचा जन्मोत्सवकाल म्हणून, परंतु ख्रिस्ताचा जन्म-दिन कोणता याबद्दलच प्रथम मतभेद होते. ख्रिस्ताचा जन्मदिन कांहीं जण २५ डिसेंबरला मानीत, कांहीं जण १८ किंवा १९ एप्रिलला मानीत, तर कांहीं म्हणत, कीं ख्रिस्त २० मे रोजीं जन्माला आला. तथापि कांहीं कलानंतर २५ डिसेंबर हीच तारीख मान्य झाली आणि सर्वत्र हाच दिन पाळण्यांत येऊं लागला. हा दिवस हिंवाळ्यांत येत असल्यामुळें आणि हिवाळ्यांत दिवस पुष्कळच लहान व रात्र फारच मोठी असल्यामुळें माणसाला ही स्थिति स्वभावतःच नको असे. सूर्यावरच जगांतली सारी विपुलता अवलंबून असल्यामुळं आणि या दिवसांत सूर्य क्षीणतेज झालेला असल्यामुळें लोक मोठमोठे ओंडके जमवून मोठा जाळ करीत आणि (आपल्या कल्पनेप्रमाणें) सूर्याच्या तेजांत भर घालीत. याच काळांत येशू ख्रिस्ताचा जन्म झाल्यामुळं आणि दिवस हळूहळू मोठे होत जाऊन प्रकाश वाढत गेल्यामुळं प्रकाश जगांत वाढत जाण्याला तो कारणीभूत झाला अशी भावना लोकांच्या मनांत रुजली आणि जगाला प्रकाश देणारा या पूज्य भावनेनं लोक त्याच्याकडे पाहूं लागले, अशी या सणाची थोडक्यांत पार्श्वभूमि आहे.

तथापि कालांतरानं ही धार्मिक कल्पना मागं पडली आणि या कालाला उत्सवाचं किंवा सणाचं स्वरूप हळूहळू येत गेलं. आजहि एकाच ख्रिश्चन धर्माचे अनुयायी जर्मनी, फ्रान्स, इटली, अमेरिका, इंग्लंड या देशांत थोड्याफार फरकानं हा उत्सव साजरा करतात. तथापि येशू ख्रिस्ताचं गुणगान करण्यासाठीं प्रार्थना करणं, 'कॅरोल्स' म्हणणं यांचा अंतर्भाव बहुधा सर्वत्र या उत्सवांत करतात व प्रत्येक घरांत आपल्याकडे आपण दसऱ्याच्या दिवशीं आपट्याची फांदी आणून त्याचीं पानं 'सोनं' म्हणून वांटतों तशाच प्रकारें 'ख्रिसमस-बेरी' नांवाच्या

झाडाच्या फांद्या घरोघरीं आणतात, त्याच्यावर रंगीबेरंगी दिवे सोडतात आणि ल्हानमोठ्या शोभेच्या वस्तू या फांदीच्या हिरव्यागार पानांत अडकवून ठेवतात. मोठमोठ्या चौकांतूनहि अशींच मोठीं शोभिवंत झाडं उभीं करतात आणि निरनिराळ्या रंगांचे विजेचे दिवे त्यांत सोडले कीं रात्रीच्या वेळीं त्यांची शोभा खरोखरच अपूर्व वाटते. लंडन शहरांतल्या अनेक भागांत अशीं झाडं उभीं करतात आणि त्यांच्या भोंवती रोषणाई केली जाते. पण ट्रॅफल्गार स्क्वेअर आणि पिकॅडिली सर्कस या ठिकाणीं ही रोषणाई इतक्या भव्य प्रमाणांत करतात, कीं प्रत्येक जण त्या ठिकाणीं जातां यावं म्हणून त्या दिवशीं धडपडत असतो. या दोन्ही ठिकाणीं कबुतरं इतकीं आहेत आणि तीं डोक्यावर बसवून घेण्यांत लोकांना येवढी गंमत वाटते, कीं नाताळच्या दिवसांतच काय, बाराहि महिने या ठिकाणीं तरुण स्त्री-पुरुषांची अखंड गर्दी दिसते. या कबुतरांशीं खेळणं तर मुलांचा नित्याचाच खेळ आहे. नाताळाच्या आदल्या दिवशीं रात्रीं मनसोक्त मदिरापान केलेले रंगेल स्त्री-पुरुष या ठिकाणीं एकत्र गर्दी करतात आणि मुक्त हस्तानं—नव्हे, चुकलों !—मुक्त मुखानं चुंबनांची देवघेव होते ! पिकॅडिली सर्कसच्या मध्यभागीं तर मदना (Eros) चा पुतळाच आहे, तेव्हां अशा ठिकाणीं येऊन मोकळेपणानं मिसळल्यानंतर मदनबाधा झाली नाहीं तरच नवल ! संस्कृतीचीं आणि शिष्टाचाराचीं सारीं बंधनं झुगारून जवळजवळ ताळ सोडून स्त्री-पुरुष त्या दिवशीं वागतात म्हणूनच या काळाला ‘नाताळ’ म्हणणारा खरंच मोठा भाषामर्मज्ञ असला पाहिजे असं मला सारखं वाटूं लागतं !

हा सबंध कालच स्वच्छंदानं वागण्याचा, मैत्रीचे बंध अधिक दृढ करण्याचा आणि एकंदरीनं जीवनांतला आनंद मोकळेपणानं उपभोगण्याचा आहे असं मानलं जातं. आपल्या मित्रांची, मैत्रिणींची, नातेवाइकांची आठवण ताजी राहावी म्हणून कोणी त्यांना भेटी पाठवितं आणि हें ज्यांना खर्चाचं वाटत असेल तीं माणसं निदान भेट-कार्ड पाठवून एकमेकांबद्दल शुभेच्छा व्यक्त करतात. लोक हीं कार्डं पाठविण्याबद्दल किती जागरूक असतात आणि किती भेट-कार्डं एकंदरींत पाठविलीं जातात तें आंकड्यांनीं सांगण्यापेक्षां पोस्टांत पडलेलीं हीं कार्डं सॉर्ट करण्याकरितां, ती बॅगांत भरण्याकरितां, त्या बॅगा मोटरींत ठेवण्याकरितां, आणि त्या पत्रांचा बटवडा करण्याकरितां पोस्ट खात्याला दीड लक्ष जादा माणसं सुमारें दोन आठवडे नेमावीं लागतात यावरून या पत्रांच्या संख्येची कांहीं कल्पना आल्यास पाहा. नाताळच्या अगोदर दोन आठवडे या पोस्टांतल्या नोकऱ्या सामान्यतः कोणालाहि

मिळूं शकतात व रोज सुमारें दोन पौंड किंवा २५ रुपये सहज मिळवितां येतात. या नोकरांत बहुसंख्य तर विद्यार्थीच असतात.

हीं भेटकार्डे तरी किती आकर्षक आणि विविध प्रकारचीं असतात! उडतीं पाखरं, हंसरीं मुलं, चोचींत चोंच घालणारीं कबुतरं, स्त्री-पुरुषांतील स्नेह दाखवणारीं सूचक दृश्यं आणि निसर्गाचे भव्य पण आल्हादक देखावे येवढ्या आकर्षक रंगांत छापलेले असतात कीं त्यांचा मोह प्रत्येकाला पडावा. प्रत्येक चित्रांतील रंगसंगति, रेषा आणि सौष्ठव इतकं वेधक असतं, कीं आपलं हृद्गत तीं हातीं पडणाऱ्याला खचित सांगतील याबद्दल शंका वाटत नाहीं. खळबळ उडविणाऱ्या बातम्यांच्या शोधांत असणारीं वृत्तपत्रं तर कोणी कोणाला कसलं भेट-कार्ड पाठविलं याची बित्तंबातमी मिळवितात आणि आंबटशोकी वाचकाचं समाधान करतात! अशाच वर्तमानपत्रांपैकीं एकानं या वर्षीं राजकन्या मार्गारेटचं प्रेम संपादण्यांत अयशस्वी झालेल्या पीटर टाऊनसेंडनं आपल्या मित्रांना कसलीं भेट-कार्डे पाठविलीं याची बातमीच नुसती दिली नाहीं तर त्या कार्डांचे फोटो प्रसिद्ध केले आणि 'या वर्षीं मी कोणतंहि दृश्यं असलेलीं भेट-कार्डे पाठविलीं तरी लोकांचा गैरसमज होईल म्हणून साधीं कोरीं कार्डे घेऊन त्यांच्यावर शुभेच्छा लिहून पाठवीत आहे' असं तो म्हणाल्याचंहि जाहीर करून टाकलं!

पण एकदां २४ डिसेंबरची रात्र उलटून गेली कीं साऱ्या व्यवहारांना जी शिथिलता येते तीहि लक्षांत भरण्यासारखी असते. ज्या ट्रॅफलगार स्केअरमध्यें किंवा पिकॅडिली सर्कसमध्यें आदल्या रात्रींच येवढी दंगल उडून गेलेली असते त्या ठिकाणीं चिटपांखरूंसुद्धा नसतं! (किंवा पाखरंच तेवढीं अक्षरशः असतात!) दुपारीं बारा वाजले तरी सारे रस्ते उजाड दिसतात. एखादा फार मोठा लग्न-सोहळा एकदां आटोपला, कीं खरा उत्साह आटतो आणि साऱ्या व्यवहारांना मंदपणा येतो तसंच सर्वत्र दिसूं लागतं. सारीं दुकानं तर बंद असतातच, पण बसची आणि ट्यूबच्या गाड्यांची वाहतूकहि नाममात्र सुरू असते. आदल्या रात्रीं अतिरिक्त मदिरापानानं शिणलेलीं शरीरं विश्रांतीच्या आधीन व्हावीं हेंहि स्वाभाविकच आहे म्हणा! हा दिवस 'बॉक्सिंग डे' म्हणून पाळतात. मोठा सण असला कीं कुस्त्या आणि बैलगाड्यांच्या शर्यती असायच्याच या कल्पनेंत असणाऱ्या माझ्या मनाला 'बॉक्सिंग डे' च्या दिवशीं लोक मुष्टियुद्ध खेळत असतील असं वाटायचं, पण त्याऐवजीं आपलीं कामं ज्यांनीं केलेलीं असतील त्यांना भेट म्हणून निरनिराळ्या वस्तु 'बॉक्स' म्हणजे पेटीमध्यें घालून त्या

दिवशीं द्यायच्या असतात हें जेव्हां मला कळलं तेव्हां माझ्या अज्ञानाची मला गंमत वाटली आणि मी इकडे येण्यापूर्वी इंग्लंडांत शिक्षण घेतलेल्या मुंबईच्या सचिवालयांतील एका वरिष्ठ अधिकाऱ्यानां मी भेटलो असतां "In England you have not only to learn but unlearn many things" असं ते कां म्हणाले होते याचा बरोबर अर्थ लागला! बाकी शिक्षण म्हणजे तरी सत्कल्पनांचं बीजारोपण आणि निरर्थक कल्पनांच्या वांडगुळांचं छेदन अशीच क्रिया आहे, नाहीं का?

नाताळची ही दंगल हळूहळू कमी होत जाते, पण नव्या वर्षाच्या स्वागताची तयारीहि त्याच वेळीं सुरू होऊं लागते. रात्र संपून दिवस नेमका कोणत्या क्षणाला सुरू झाला हें जसं सांगतां येत नाहीं तशीच नाताळची गडबड संपून नवसंवत्सराच्या स्वागताची तयारी कधीं सुरू होते हेंहि नक्की सांगतां येत नाहीं. आणि ३१ डिसेंबरच्या रात्रीं तर अक्षरशः लक्षावधि लोक बाहेर पडतात आणि सारे फुटपाथ, बस, ट्यूब आणि मोठमोठे चौक माणसांनीं गजबजून गेलेले असतात. हातांत तऱ्हेतऱ्हेचे फुगे घेतलेले आणि डोक्यावर निरनिराळ्या आकाराच्या कागदाच्या टोप्या घातलेले तरुण स्त्री-पुरुष मन मानेल त्या दिशेनं हसत खिदळत जात असतात. रहदारीला अडथळा होऊं नये म्हणून पोलिस त्यांना अडवीत असतात आणि सारं वातावरण धुंद झाल्यासारखं वाटूं लागतं. ही प्रचंड गर्दी पुढें पुढें सरकत असतांना हातांतले फुगे वर हवेंत तरंगत असतात, आणि गर्दीकडे न पाहतां फुग्यांकडेच पाहात राहिलं तर सारे फुगेच हळूहळू पुढें सरकत आहेत असा भास होतो. ट्रॅफल्गार स्क्वेअर आणि पिकॅडिली सर्कस हीं तर साऱ्या लंडन शहरांतली गर्दी खेचणारीं स्थानं! ३१ डिसेंबरच्या रात्रीं या ठिकाणचीं 'ख्रिसमस ट्रीज' अधिकच आकर्षक रीतीनं सजविण्यांत आलीं होतीं आणि त्यांच्या सभोंवतीं फेर धरून तरुण स्त्री-पुरुष खुशाल नाचत, एकमेकांचीं चुंबनं घेत मोठमोठ्यनं गाणीं म्हणत होते. तथापि यांत प्रत्यक्ष भाग घेणाऱ्यांपेक्षां ही गंमत पाहात दूर उभ्या राहिलेल्या लोकांचीच संख्या फार मोठी होती. आजूबाजूच्या साऱ्या इमारती आणि मोठमोठ्या निऑन साइन्सच्या जाहिराती निरनिराळ्या रंगांच्या विजेच्या प्रकाशांत इतक्या चकाकत होत्या कीं रात्रीं ११-१२ वाजण्याची वेळ होत आलेली आहे हें घड्याळांकडे पाहिल्यानंतरच लक्षांत येत होतं. या वेळीं हवेंतलं उष्णतामान २९ अंश होतं तरीहि या थंडीकडे संपूर्णपणें दुर्लक्ष करून नवसंवत्सराच्या स्वागतासाठीं लोक प्रचंड संख्येनं जमलेले पाहिले, कीं कोणत्याहि गोष्टींतला आनंद

लुटण्यासाठीं पाश्चिमात्य लोक केवढे तत्पर असतात याची खात्री पटते. प्रत्येक जण दुसऱ्याला भेटतांच Wish you a happy new year असं म्हणत पुढं जातो. अक्षरशः मध्यरात्र होईपर्यंत हें असं चाललेलं असतं आणि बरोबर बारा वाजल्याबरोबर प्रार्थनामंदिरांतल्या घंटा मोठमोठ्यानं वाजूं लागतात आणि सुरू होत असलेल्या नव्या वर्षाचं स्वागत मोठ्या समारंभानं आणि उत्साहानं केलं जातं. सारीं माणसं आपलं सामान्य वैयक्तिक जीवन पूर्णपणें विसरल्या-सारखीं दिसतात आणि समुदायांत आपलं वैयक्तिक जीवन मिसळून टाकतात. किंबहुना प्रत्येक व्यक्तीला आपल्या जीवनांत दुःख, दैन्य, उपेक्षा, अपेक्षाभंग यांच्या ज्या पराण्या बोंचत असतात त्यांची विस्मृति या क्षणाला त्यांना झाल्या-सारखी दिसत असते आणि हें नवं वर्ष मोठ्या आनंदांत घालवायचा निश्चय प्रत्येक जण मनाशीं करीत असतो, हें खरंच मोठं अनुकरणीय आहे असं नाहीं तुम्हाला वाटत ?

तुमचा,

वि. वा. पत्की

: ११ :

# इंग्लंडांतील विद्येचीं तीर्थक्षेत्रं आणि ज्ञानाचीं सदावर्तं!

★

६, सॉंडर्स ग्रव्ह,
लंडन (डब्ल्यू. ११)
१६ जानेवारी, १९५६

प्रिय बाळासाहेब,

माणसाच्या शिक्षणांत प्रवासाचं महत्त्व किती आहे हें सांगायला का हवं? आधुनिक शिक्षणशास्त्रज्ञ इंद्रियाच्या द्वारें मिळणाऱ्या ज्ञानाला फारच किंमत देतात आणि मूल उपजल्यापासूनच त्याच्या शिक्षणाला सुरुवात होते हें तर गृहीतच धरलं जातं. मनुष्याच्या अंगीं चातुर्य येण्यासाठीं पंडितांची मैत्री, सभासंचार, शास्त्रीय ग्रंथांचं अवलोकन यांच्याबरोबर देशाटनहि महत्त्वाचं आहे हें आमच्या वामनपंडिताल सुद्धां माहीत होतं, पण आमच्या आधुनिक शिक्षणशास्त्रज्ञांना तें माहीत नाहीं असं मी कसं म्हणूं? पण गंमत अशी आहे कीं, सारं 'शास्त्र' आतां आम्हांला माहीत झालेलं आहे, त्याचा 'आचार' तेवढा होत नाहीं हीच खरी अडचण आहे. शिक्षण क्षेत्रांत तर आचारालाच अधिक महत्त्व—पहाटे उठणं चांगलं याच्या-बद्दलचा गीर्वाण भाषेतला श्लोक पाठ म्हणणाऱ्यापेक्षां प्रत्यक्ष पहाटे उठणारा माणूस हाच खरा पाठ विद्यार्थ्याला देतो, तत्त्वनिष्ठा अनुकरणीय हें आपल्या रसाळ वाणीनं पटवून देणाऱ्या प्राध्यापकापेक्षां व्यवहारांत आपलं कितीहि नुकसान झालं तरी प्रचंड वादळांत अचल राहणाऱ्या दीपस्तंभाप्रमाणें आपल्या निष्ठेला चिकटून राहणाराच तें तत्त्व पटवून देतो हें काय कुणाला माहीत नाहीं? शिक्षण क्षेत्रांतहि प्रवासाला महत्त्व आहे तें याच दृष्टीनं. पण प्रत्यक्ष व्यवहार पाहावा तर सारंच निराळं! आमच्या शाळा-कॉलेजांच्या ट्रिप्स निघतात त्या फार तर आजूबाजूच्या पांच-पन्नास मैलांत! प्रवास हा शिक्षणाचा एक आवश्यक भाग आहे असं आम्हीं

कधीं मानलेलंच नाहीं. त्याचे परिणाम केवढे विचित्र होतात याचं एक गंमतीचं उदाहरण सांगूं? पदवीपरीक्षा उत्तीर्ण झाल्यावर मी मुंबईला पदवीदान समारंभासाठीं गेलों तेव्हां माझे एक सहाध्यायीहि माझ्याबरोबर होते. पण मुंबईला पोंचल्याबरोबर ते मला म्हणाले, "मी कांहीं या पदवीदान समारंभासाठीं मुंबईला आलों नाहीं. मला मुंबई बघायची आहे आणि त्यापेक्षां खरं सांगायचं तर समुद्र बघायचा आहे!" त्यांच्या या प्रांजल निवेदनामुळं त्यांची थट्टा करणंहि मला निर्दयपणाचं वाटूं लागलं! गांवांतल्या तळ्याला सहस्रानं गुणलं कीं समुद्र झाला ही त्यांची कल्पना, पण प्रत्यक्ष चौपाटीवर मी त्यांना घेऊन गेलों आणि अगाध सागराचं दर्शन त्यांना घडलं तेव्हां बेडूक तो बेडूक आणि हत्ती तो हत्ती हें त्यांनीं मनानंच ओळखलं! मी त्यांना त्याबद्दल कधीं दोष देत नाहीं. पण चीड येते ती आमच्या शिक्षण पद्धतीची. पदवी परीक्षेचं शिक्षण होईपर्यंत माझ्या मित्रानं समुद्र पाहिला नाहीं हें खरं, पण त्याच्या दृष्टीला समुद्र पडावा अशी आमच्या शिक्षणशास्त्रज्ञांनीं काय व्यवस्था केली होती? मीहि त्याचाच मित्र! योगायोगानं मीं आज लंडन पाहात आहे, पण माझ्या मायभूमीचा तीन चतुर्थांश भाग तरी मला अजूनहि अज्ञातच आहे—आणि दिल्ली तर अद्याप 'बहोत दूर' आहे!

आपला देश दरिद्री आहे असं यावर चटकन् तुम्ही म्हणाल, मला माहीत आहे, पण निदान पदवीधर नागरिकाला आपला देशसुद्धां माहीत असूं नये ही स्थिति स्वातंत्र्यकालांत तरी तशीच राहावी असं तुम्ही खात्रीनं म्हणणार नाहीं. पदवीधर डॉक्टरनं खेड्यांत आणि साध्या पदवीधरांनीं खेड्यांतल्या शाळांत कामं केल्यावरच त्यांना पदवी द्यावी अशा सूचना आतां येऊं लागल्या आहेत, पण पदवीधरानं आपला देश पाहिलेला असलाच पाहिजे अशी सूचना अजून तरी आलेली मला माहीत नाहीं. असं कां होऊं नये? अजूनहि लोकसंख्येच्या मानानं आमच्या देशांतल्या पदवीधरांचं प्रमाण दशांश चिन्हांनींच सांगावं इतकं अल्प असतांना त्यांना सबंध देश पाहतां यावा अशीं सवलतीचीं तिकिटं विश्वविद्यालयंच कां मिळवून देत नाहींत? पाहायचंच झालं तर आपल्याच देशांत काय थोडं आहे? किती पदवीधरांनीं जगांतलं एक आश्चर्य म्हणून ओळखला जाणारा ताजमहाल पाहिला आहे? दिल्लीचा कुतुबमिनार किती जणांच्या दृष्टीस पडला आहे? राजघाटावरच्या महात्माजींच्या समाधीवर आदरानं मस्तक टेकायचं म्हटलं तर किती पदवीधरांना विश्वविद्यालयांनीं तशी संधि दिली आहे? जमशेटपूरचा कारखाना, अमृतसरचं सुवर्णमंदिर, भाक्रा-नानगलचं धरण, कोलारच्या

सोन्याच्या खाणी, गिरसप्पाचा धबधबा, मीनाक्षीचं मंदिर...एक ना दोन, किती पदवीधरांनीं पाहिलीं आहेत हीं ठिकाणं? मीं तरी पाहिलेलीं नाहींत. तरीहि समाजांतला एक सुशिक्षित नागरिक म्हणून तुम्ही मला ओळखणारच आहांत आणि डोक्याला मुंडासं गुंडाळून खेडेगांवांतून बाजाराला आलेल्या अज्ञानी शेतकऱ्यापेक्षां मी मोठा शहाणा आहें या ताठ्यानं मीहि समाजांत वावरणारच आहे!

यासाठींच विद्यार्थी शिकत असतांना त्याला प्रवासाची संधि देण्याची पाश्चिमात्य देशांतील शिक्षण संस्थांची योजना मला मोठी आकर्षक वाटली आणि तिचा जेवढा फायदा घेतां येईल तेवढा घ्यायचा असं मी इकडे आलों तेव्हांच मनाशीं ठरविलं. मी ज्या पॉलिटेक्निक संस्थेंत विद्यार्थी म्हणून दाखल झालों ती संस्था आपल्या विद्यार्थ्यांना निरनिराळीं ठिकाणं पाहतां यावीं म्हणून स्वतः थोडीफार झीज सोसून व्यवस्था करते, असं मला समजलं तेव्हां मला तर मला खरोखरच फार आनंद झाला आणि सुरुवातीलाच केंब्रिज आणि ऑक्सफर्डला जायचं ठरलं तेव्हां तर ज्ञानगंगाच माझ्या दारांत आल्याचं समाधान मला वाटलं. इंग्लंडला येऊन माझ्यासारख्या विद्येच्या एका नम्र उपासकानं ऑक्सफर्ड आणि केंब्रिज न पाहणं हें धार्मिक वृत्तीच्या माणसानं पंढरपूरला जाऊनहि विठ्ठलाचं दर्शन न घेण्याइतकंच विचित्र झालं असतं आणि म्हणूनच तशी संधि आली तेव्हां हा एक महापर्वणीचा योग आला असं मला वाटलं.

या दोन्ही ट्रिप्सच्या वेळीं आम्हाला माहिती देण्यासाठीं म्हणून एक प्राध्यापक बरोबर आले होते, पण आम्ही स्वतः फिरून शक्य तेवढी माहिती मिळवावी व अगदीं आवश्यक तेवढीच माहिती त्यांनीं द्यावी अशीच सर्व योजना होती. अशा ट्रिपसाठीं इथं सुमारें ४० सीट्स् असलेले ‘मोटर कोच’ भाड्यानं मिळतात आणि त्यांचं भाडं भरलं, कीं सबंध दिवस तो ‘कोच’ आपल्या ताब्यांत राहतो. हे कोच आणि आंतल्या सीट्स् येवढ्या आरामशीर असतात, कीं प्रवासाचा म्हणून कसलाहि त्रास होत नाहीं. इंग्लडांत सगळ्या ठिकाणीं जाणारे रस्ते गुळगुळीत, डांबरी असल्यामुळं या रस्त्यावरून कोच जाऊं लागला कीं पोटांतलं पाणीसुद्धां हालत नाहीं. आंत थंडीचा त्रास होऊं नये म्हणून इलेक्ट्रिक हीटर असतात, त्यामुळं ऊबदार घरांतच आपण आहों असं सारखं वाटतं आणि कोचमधल्या रेडिओंतून गाण्याचे सूर घुमूं लागले आणि मुलांनीं आपले स्वर त्यांत मिळविले, कीं बाहेर सदैव दिसणारी हिरवळ आकर्षक कीं हें स्वरलालित्य आल्हाददायक हें कळेनासं होतं.

केंब्रिज आणि ऑक्सफर्ड हीं दोन्हीं ठिकाणं लंडनहून सुमारें ६० मैलावर आहेत, पण या दोन्हीं ठिकाणीं जाण्यासाठीं लंडन शहराच्या बाहेर पडायलाच जवळजवळ एक तास लागतो, येवढा लंडन शहराचा विस्तार अफाट आहे! मात्र एकदां लंडन शहराच्या सीमा ओलांडून बाहेर पडलं कीं, हिरवळीचे गालिचे पसरलेले सभोंवती दिसूं लागतात आणि इंग्लंडला 'पाचूचं बेट' कां म्हणतात याचा अर्थ कोणीहि न सांगतांच मनांत उलगडूं लागतो. मोठमोठीं शेतं आणि त्यांत उभे असलेले ट्रॅक्टर्स, चरणाऱ्या मेंढ्यांचे किंवा गाईंचे कळप, आपल्याकडे बागेतलीं झाडं एका ठराविक उंचीवर कापतात तशींच कुंपणांचीं झाडं कापल्यामुळं आलेला आल्हाददायक रेखीवपणा यांची सोबत तर अखेरपर्यंत असते, त्यामुळं हा प्रवास कंटाळवाणा असा कधींच होत नाहीं.

आम्ही केंब्रिजला गेलों त्या दिवशीं लंडनमध्यें सकाळीं नऊ वाजतां इतकं दाट धुकं पसरलेलं होतं, कीं लंडन शहराच्या बाहेर पडायलाच सव्वा-दीड तास लागला. पंधरा-वीस फुटांच्या पलीकडे कांहींच दिसत नव्हतं. पाठीमागं पाहिलं तरी धुकं, पुढं पाहिलं तरी धुकं! जीवनाचा मार्ग हा अंधारांतूनच अंधाराकडे जात असल्याचं माधव ज्यूलियन् यांना वाटलं, तर आमचा मार्ग धुक्यांतूनच धुक्याकडे धावत आहे असा भास होत होता! पण लंडनच्या बाहेर पडल्यानंतर मात्र धुकं वितळलं, गाण्याचे सूर अधिक जोरानं घुमूं लागले आणि आम्ही केंब्रिजला बारा वाजण्याच्या सुमारास पोंचलों तेव्हां तर इंग्लंडांत आल्यापासून दुर्लभ झालेलं ऊन बऱ्याच दिवसांनीं दृष्टीस पडलं! 'Oh, what a lovely day!' असं त्याचं वर्णन जवळजवळ प्रत्येकानं केलं! असला 'lovely day' माझ्या भारतांत जवळजवळ रोज असतो असं मीं म्हटलं तेव्हां प्रत्येकानं विचारलं, 'Really?' जें दुष्प्राप्य त्याचं मोल माणसाला वाटावं हा मानवी स्वभावच आहे म्हणा!

केंब्रिजला गेल्याबरोबर कुणाचंहि लक्ष वेधतं तें रस्त्यावरच्या असंख्य सायकली पाहून. मागं एक जगप्रवासी पुण्याला आले असतांना 'पुण्याइतक्या सायकली जगांतल्या कोणत्याच शहरांत नाहींत' असं म्हणाले होते. केंब्रिजमधील सायकलींची गर्दी पाहून 'पुणं हें भारताचं केंब्रिज आहे' असं म्हणायला हरकत नाहीं असा विचार चटकन् माझ्या मनांत येऊन गेला आणि तिथल्या असंख्य शिक्षणसंस्था पाहून तर मग माझी तशी खात्रीच झाली. या शिक्षण संस्था पाहात पाहात मग आम्ही गटागटांनीं फिरलों तेव्हां या शिक्षण संस्थांचा एक ठराविक सांचा आहे हें

माझ्या लक्षांत येऊं लागलं. या शिक्षण संस्था सर्व शहरभर पसरलेल्या आहेत. आपल्याकडे अनेक शहरांतून शिक्षणसंस्था लोकवस्तीपासून तुटलेल्या, निवांत ठिकाणीं असलेल्या दिसतात, तशा केंब्रिजमध्यें नाहींत. बाजारांतून आपण जाऊं लागलों कीं मध्येंच एखादी प्रचंड जुनाट भिंत उभी असलेली दिसते, त्या भिंतीवर निरनिराळीं चिन्हं (Crests) किंवा कोणाच्या तरी पूर्णाकृति कोरलेल्या दिसतात आणि भिंतीच्या मध्यभागीं आपल्याकडे जुन्या वाड्यांचे दरवाजे असतात ना, तसलाच दरवाजा दिसतो. कोणी तरी माहीतगार किंवा आमचे प्राध्यापकच मग आंत शिरतां शिरतां म्हणत, "This is Emmanuel College...This is Chr'st College...This is Trinity College...This is Clare College..." त्या दरवाजांतून गेलं कीं एखादा मोठा चौक असायचा, त्याच्या मध्यभागीं एखादं कारंजं किंवा पुतळा किंवा दोन्ही असायचीं आणि एका बाजूला मोठं प्रार्थनामंदिर (Chapel) असायचं हें सारं ठरलेलं! या चौकांत सर्वत्र हिरवीगार हिरवळ, तिच्यामधून आकर्षक, गोल 'शाळिग्राम' बसविलेले रेखीव रस्ते आणि "Dont, tread on grass, please" अशा पाट्या सर्वत्र दिसतात. हा एक चौक ओलांडून पुढें गेलं कीं पुन्हां दरवाजा, पुन्हां चौक, पुन्हां हिरवळ आणि पुन्हां सुंदर रेखीव रस्ते. साऱ्या दुमजली छोट्या इमारती आणि छोट्या छोट्या खोल्या. कोठें दोन चौक, तर कोठं तीन. तथापि प्रत्येक कॉलेजांत मोठीं संग्रहालयं, मोठी लायब्ररीहि आहेच. आणि वाचनालयांतील ग्रंथांची संख्या तरी केवढी मोठी ! पुस्तकं लाखांनीं मोजायचीं! प्रत्येक कॉलेजला चारचारशें, पांचपांचशें वर्षांची परंपरा आहे. मिल्टन आपल्या कॉलेजांत शिकला याचा ख्राइस्ट कॉलेजला अभिमान, तर न्यूटन, बेकन, मॅकोले हे आपले विद्यार्थी होते याचा ट्रिनिटी कॉलेजला. पंडित जवाहरलाल नेहरू हे ट्रिनिटी कॉलेजांतच विद्यार्थी होते हें मला माहीत होतं म्हणून या कॉलेजांत फिरतांना, जिन्यावरून जातांना सारखं माझ्या मनांत येई, पंडितजींच्या व्यक्तिमत्वाला पैलू पाडणारं हेंच तें पवित्र स्थान! मानवी संस्कृतीवर आपला ठसा उमटविणाऱ्या न्यूटन, बेकन, टेनिसन यांच्या श्रेणींत पंडित जवाहरलाल अखेर बसणार ही गोष्ट ते या विद्यालयांत आले तेव्हांच काळानं ठरवून टाकली असावी. जगाचा इतिहास घडविणाऱ्या महापुरुषांची स्मृती या कॉलेजांनीं जिवंत ठेवली आहे, त्याचप्रमाणें तेवढ्या महत्वाच्या नसलेल्या पण कर्तृत्ववान इतिहासकारांच्या, कवींच्या, तत्त्ववेत्त्यांच्या, शास्त्रज्ञांच्या स्मृती, त्यांच्या ग्रंथांची हस्तलिखितं, त्यांच्या हातानं लिहिलेल्या कविता, त्यांच्या शोधांचीं खाडाखोड केलेलीं टाचणं इत्यादींच्या

रूपानं-शतकानुशतकं या शिक्षण संस्थांनीं जतन करून ठेवल्या आहेत आणि आपल्या जुनाट इमारतीइतकाच या हस्तलिखितांचाहि या संस्थांना ज्वलंत अभिमान वाटत असतो. या दृष्टीनं आपण काय केलं आहे या विचारानं हें सारं पाहत असतांना माझं मन व्यग्र होत होतं. केवळ ऐतिहासिक महत्त्वाचे कागदपत्र एखादं इतिहास संशोधक मंडळ किंवा सरकारचं पुराणवस्तु खातं जतन करून ठेवील, पण आपल्या संस्थेंतून बाहेर पडून इतिहासाला नवं वळण लावणाऱ्या व्यक्तींच्या स्मृती, राष्ट्र किंवा निदान त्या त्या संस्था कितीशा जिवंत ठेवतात ? अगदीं महाराष्ट्रा-पुरतंच बोलायचं तर लोकमान्य टिळकांच्या किती हस्तलिखितांची आम्ही काळजी घेतली आहे ? त्यांचा 'पुनश्च हरि ॐ' हा अग्रलेख राष्ट्राचं धन म्हणून जपून ठेवण्याच्या लायकीचा नाहीं काय ? शिवरामपंत परांजप्यांचे निबंध, वामनराव जोशांची 'रागिणी', हरिभाऊ आपट्यांची 'पण लक्षांत कोण घेतो', फडक्यांची 'जादुगार', खांडेकरांची 'उल्का', गडकऱ्यांचा 'राजहंस', यशवंतांची 'आई' यांची हस्तलिखितं मिळविण्याची आणि जतन करण्याची दक्षता आम्हीं घ्यायला नको काय ? महात्मा गांधींचीं आणि नेहरूंचीं हस्तलिखितं कदाचित् राष्ट्र जतन करील, पण वाङ्मय, काव्य, इतिहास यांच्या क्षेत्रांत ज्यांनीं इतिहास घडविला त्यांना भावी पिढ्यांनीं विसरून जावं असं का कुणाला वाटेल ? मला सांगायचं आहे तें येवढंच, कीं ही दृष्टीच अजून आपणाला आलेली नाहीं.

केंब्रिजमधील शिक्षण संस्थांची माहिती तुम्हांला सांगतां सांगतां हें निराळंच कांहीं सांगत बसलों कीं मी ! आमच्या या सफरींत मुख्य मुख्य सगळं पाहून झालं कीं, प्रत्येकाला मोकळा वेळ द्यायचा आणि त्यानं वाटेल तिकडे फिरायचं, आपला 'लंच' आटपायचा आणि ठरलेल्या वेळीं कोच उभा असतो त्या ठिकाणीं यायचं असं ठरलेलं असतं. मीहि असाच मग एकटा फिरत गेलों आणि उगीचच गांवातून वाहणाऱ्या नदीच्या एका छोट्या पुलावर उभा राहिलों. गांवांतून नदी वाहते खरी, पण दोन्ही तट किती आकर्षक रीतीनं बांधून काढलेले आहेत ! त्यामुळं नदीची रुंदी कुठेंहि २०-२५ फुटांपेक्षांहि अधिक दिसत नाहीं आणि पांच-सात फूट तरी खोल असते. या नदींतून छोट्या छोट्या नावा फिरवीत 'बोटिंग' करणारीं किती जोडपीं होतीं ! कदाचित् मित्र-मैत्रिणी असतील, पण जोड्या होत्या खऱ्या ! एका जोडीचं हसणं-खिदळणं ऐकूनच कीं काय निष्पर्ण झालेल्या वृक्षशाखांवर बसलेल्या पक्ष्यांनीं किलबिलाट केला, म्हणून मीं सहज वर पाहिलं तों तिथंहि एक युगुलच दिसलं ! Two is a company, three is a

crowd हें माणसांप्रमाणेंच पक्ष्यांनांहि अवगत असलेलं मला उघड दिसत होतं! तरीहि आम्हीं माणसं स्वतःला बुद्धिवान् प्राणी म्हणवतों आणि पशुपक्ष्यांना बुद्धि नाहीं असं स्वतःला सोयिस्कर असलेलं तत्त्वज्ञान आपल्याच भाईबंदांना सांगत असतों! पशुपक्ष्यांना हें समजलं तर आम्हांला जगांत राहणं सुद्धां ते अशक्य करून टाकतील!

या पुलावर माझ्या शेजारीं येऊन उभ्या राहिलेल्या विद्यार्थ्याला मी सहज 'या नदीचं नांव काय?' असं विचारलं, तेव्हां तो म्हणाला, 'कॅम (Cam).' कोचमध्यें बसण्यासाठीं मी परत आलों आणि खात्री करून घेण्यासाठीं आमच्याबरोबर आलेल्या प्राध्यापकांना विचारलं तेव्हां ते म्हणाले, "It is Cam." ते येवढं म्हणूनच थांबले नाहींत. ते मला म्हणाले, "कॅम (Cam) नदीच्या पुला (bridge) जवळ हें गांव वसलेलं आहे म्हणूनच त्याला Cambridge असं म्हणतात." इंग्रज माणूस मोठा व्यवहारवादी (Matter-of-fact) आहे हें मी इतके दिवस पाहात होतों, त्याचा हा आणखी एक पुरावा मला सांपडला! इंग्रज कधीं शब्दांच्या मागं लागायचा नाहीं, शब्दावडंबर करायचा नाहीं. त्याच्या रेडिओ कंपनीचं नांव आहे British Broadcasting Corporation त्याच्या आगगाड्या British Railways या नांवानं ओळखल्या जातात, परदेशीं जाणाऱ्या विमानांच्या कंपनीचं नांव आहे British Overseas Airways Corporation. लांबच लांब भिंत बाजूला असलेल्या एका रस्त्याचं नांव आहे Longwall Street आणि म्हणूनच कॅम (Cam) नदीच्या पुला (bridge) जवळ वसलेल्या गांवाला त्यानं Cam bridge म्हणावं हे योग्यच आहे.

केंब्रिजला प्रथम जाऊन मग ऑक्सफर्ड पाहायला गेलं (किंवा उलट केलं) म्हणजे मात्र अनेक ठिकाणीं गोंधळ उडतो. कारण केंब्रिज आणि ऑक्सफर्ड या दोन्ही ठिकाणचीं कॉलेजं इतकीं सारखीं आहेत कीं आंत गेल्यावर आपण ऑक्सफर्डमध्यें आहों कीं केंब्रिजमध्यें आहों हें कळेनासंच होतं. अर्थात् प्रत्येकाच्या परंपरा भिन्न आहेत. आंत गेलं कीं चौक, हिरवळ, प्रार्थनामंदिर, वाचनालय हीं इतकीं सारखीं वाटतात कीं आश्चर्य वाटतंच, पण केंब्रिज आणि ऑक्सफर्ड येथील कॉलेजांचीं अनेक नांवंहि सारखीं आहेत. ट्रिनिटी, सेंट जॉन्स, जीझस हीं नावं दोन्ही ठिकाणीं आहेत, पण प्रत्येकाचं वैशिष्ट्य म्हणून कांहीं तरी निराळं आहेच. ऑक्सफर्ड येथील सेंट जॉन्स कॉलेजची हिरवळ इतकी शोभिवंत, मऊ आणि हिरवीगार आहे कीं अशी सुंदर हिरवळ आपल्या बंगल्याच्या कंपाउंडांत असावी अशी एका

श्रीमंत अमेरिकन माणसाला इच्छा झाली म्हणतात आणि त्यानं तात्काळ त्या बागेची निगा ठेवणाऱ्या बागवानाला बोलावून विचारलं, तेव्हां तो हंसत हंसत म्हणाला, "हात्तिच्या! त्यांत काय येवढं कठीण आहे? या हिरवळीचं बी इथं बाजारांत मिळतं तें घ्या, जमीन खणून तिच्यांत तें पेरा, रोज पाणी घाला आणि गवत वाढूं लागलं कीं तें 'रोल' करा. शंभर वर्षं असं करीत राहिलांत कीं होईल अशी हिरवळ तयार!" ही हकीगत आम्हीं ऐकली तेव्हां कॉलेजाप्रमाणें कॉलेजच्या बागेलाहि परंपरा आहे याची मोठी गंमत वाटली आणि 'गवतावर चालूं नका' अशी पाटी असतांना सुद्धां आम्ही सर्वजण ही हिरवळ आहे तरी किती मऊ हें पाहण्यासाठीं खुशाल तिच्यावरून चालत गेलों! जमिनीवरून चालण्याऐवजीं आपण हवेंत तरंगत आहों असं सारखं वाटत होतं, येवढंच म्हणतों यावरून कांहीं कल्पना आल्यास पाहा! नाहीं ना येत? येणार नाहींच ती!

ऑक्सफर्ड येथील कॉलेजं केंब्रिजच्या कॉलेजांहूनहि जुनीं आहेत. मर्टन कॉलेजची स्थापना तर १२७४ साली झाली, म्हणजे आतां ७०० वर्षं होतील या कॉलेजला! मॅगडॅलीन कॉलेजचा टॉवर शोभिवंत तर आहेच, पण या टॉवरशीं स्पर्धा करणारी सुरूची उंचच उंच झाडं त्यांच्या सभोंवतीं आहेत, त्यामुळं गर्द झाडींत त्याची शोभा अधिकच वाढलेली वाटते. ख्राइस्ट चर्च कॉलेजचं मधलं पटांगण तर येवढं मोठं आणि शोभिवंत आहे कीं मुंबईच्या ब्रेबर्न स्टेडियमच्या क्रिकेट ग्राउंडची आठवण येते. या पटांगणांत मध्यभागीं छोटंच पण सुंदर तळं आहे आणि त्यांत तांबडेलाल मासे सोडलेले आहेत. रात्रीं नऊ वाजले कीं, या कॉलेजच्या टॉवरवर असलेल्या घंटेचे एकशें एक ठोके वाजवितात, कारण १५३२ सालीं वुल्सीनं हें कॉलेज सुरू केलं तेव्हां सुरुवातीला जे १०१ विद्यार्थी या कॉलेजांत होते त्यांचं स्मरण या रूपानं कॉलेज रोज करतं! प्रत्येक कॉलेजच्या अशा परंपरा आहेत, पण आपल्या कॉलेजांत शिकून इंग्लंडविरुद्ध लढलेल्या व धारातीर्थीं पडलेल्या विद्यार्थ्यांचं स्मारकहि न्यू कॉलेजनं केलं आहे हें खरं वाटेल तुम्हांला? याचं नांव स्वाभिमान!

अशा किती म्हणून गंमती सांगूं? तुम्ही कंटाळाल, पण गंमती संपणार नाहींत! ऑक्सफर्ड शहर तर कमालीचं स्वच्छ आणि आधुनिक वाटतं. वस्तुतः तें फार जुनं शहर आहे आणि पूर्वीं त्याच्या भोंवतीं मोठीच्या मोठी भिंत होती. तिचे अवशेष अजूनहि शहरांत दिसतात. प्रत्येक माणसाला आपल्या गांवचा अभिमान वाटावा हें स्वाभाविक असलं तरी ऑक्सफर्डबद्दल सर्वत्र आदराची

भावना स्पष्ट दिसते. कीट्स कवीनं तर This oxford, I have no doubt, is the finest city in the world असं म्हटलं आहे, तर डॅन रॉजर्सनं—

He that has Oxford seen for beauty, grace,
And cleanliness, never saw a better place

या काव्यपंक्तींनीं ऑक्सफर्डला गौरविलं आहे.

पण ऑक्सफर्ड किंवा केंब्रिज म्हणजे कांहीं केवळ विद्यार्थ्यांनीं गजबजलेलीं शहरं नव्हेत. या ठिकाणची विद्यार्थ्यांची संख्या तर मोठी आहेच, पण विद्यार्थ्यांची चिकित्सक वृत्ति पोसणाऱ्या आणि स्वतंत्रपणें निर्णय घेण्याची शक्ति त्यांच्यांत निर्माण करणाऱ्या, शतकानुशतकें जतन केलेल्या ऑक्सफर्ड आणि केंब्रिज या संस्था आहेत. देशांत राजे आले आणि गेले, साम्राज्यं निर्माण झालीं आणि त्यांचं विसर्जन झालं, राज्यक्रांत्या झाल्या, पण माणसाला माणुसकी आणणाऱ्या आणि त्याचं मन सहिष्णु करणाऱ्या ज्ञानाची उपासना इथें अहोरात्र सुरू आहे, आणि ज्ञानज्योत इथं अखंड तेवत आहे, यांतच या स्थानांचं माहात्म्य आहे. विद्येच्या उपासकानं इथं यावं, व्याख्यानं, चर्चा, वाचन यांच्या साहचर्यांत आपलं मनोमालिन्य घालवावं आणि आपल्या ज्ञानक्षुधेचं शमन करावं, कारण हीं स्थानं म्हणजे विद्येचीं तीर्थक्षेत्रं आणि ज्ञानाचीं सदावर्तं आहेत !

तुमचा,

वि. वा. पत्की.

## : १२ :

# इंग्लंडांतील हिंवाळा

★

६, सॉंडर्स ग्रव्ह,
लंडन (डब्ल्यू. ११),
१ फेब्रुवारी, १९५६

प्रिय बाळासाहेब,

काळाचा महिमा अगाध असतो म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं. काळ काय करीत नाहीं ? तो रंकाचे राव करतो, सिंहासनं धुळीला मिळवितो, लक्षाधीशाच्या हातांत उलटी अंबारी देतो आणि जीवनाच्या यातनांतून सोडवितो तोहि काळच ! 'कालाय तस्मै नमः' असं कवीनं म्हटलं तें कांहीं उगीच नाहीं !

पण येवढं दूर जाण्याचहि कारण नाहीं. काळानं आजपर्यंत अनेक चमत्कार केले आहेत, मग माझीं सामान्य माणसाचीं मतं म्हणजे कुठल्या झाडाचा पाला ! मी चार महिन्यांपूर्वीं इथं आलों आणि कुतूहलानं ट्यूबमध्यें बसायला गेलों तों मला केवढी भीति वाटली होती ! भुयारांत शिरतांना 'नको ट्यूबचा प्रवास' असं मला होऊन गेलं होतं, पण आतां रोज घरांतनं बाहेर पडलों कीं केव्हां एकदां ट्यूब गांठतों असं होऊन जातं ! ट्यूबबद्दल मला एकाएकीं येवढं प्रेम वाटूं लागलं आहे याचं कारण इथला हिंवाळा ! तुम्ही म्हणाल, 'इथला हिंवाळा म्हणतां तर त्यांत येवढं विशेष काय आहे ? प्रत्येक देशांतच सर्व ऋतु येतात आणि जातात, मग तुमच्या इंग्लंडांतच त्याचं येवढं कसलं महत्त्व ? थंडी काय हिंवाळ्यांत आमच्याकडेहि असते. इंग्लंडांत थोडी अधिक असेल, येवढंच !'

मात्र 'थोडी अधिक' म्हणजे किती याची कल्पना खरंच करतां यायची नाहीं. ती कल्पना यायची असेल तर प्रत्यक्ष या थंडींत कुडकुडायला हवं ! हातापायांच्या बोटांतून थंडीनं कळा येऊं लागल्या कीं वाटूं लागतं, ही थंडी केवळ

'थोडी अधिक' नाहीं, तिचं स्वरूपच निराळं आहे! अष्टवर्षा आणि षोडशवर्षा यांच्या तुलनेंत एक दुसरीपेक्षां वयानं 'थोडी अधिक'च नसते, तिचं स्वरूप आणि प्रकृतीच भिन्न असते, तसंच या थंडीचं आहे! मी इथं आलों तेव्हां मलाहि असंच वाटायचं कीं असेल थोडी अधिक थंडी, त्याचं काय येवढं मोठं! पण हिंवाळा सुरू झाला तेव्हां मात्र माझी खात्री होऊं लागली कीं, हें प्रकरण कांहीं निराळं आहे! म्हणूनच सुरुवातीला ट्यूब म्हटली, कीं माझ्या अंगावर कांटा उभा राहायचा, पण आतां थंडीनं आलेला कांटा ट्यूबमध्यें शिरल्याबरोबर नाहींसा होतो आणि ट्यूबमधून बाहेर पडण्याच्या कल्पनेनंच हुडहुडी भरते! हिंवाळ्यांतल्या थंडीनं माझं मतपरिवर्तन कसं केलं आहे, पाहिलंत? डोळ्यांसमोर नकोशी वाटणारी भुयारांतली ट्यूब आतां माझ्या शरीराला ऊब आणते म्हणून हवीशी वाटते. पृथ्वीला माता म्हणतात तें काय उगीच? तिच्या पोटांत शिरल्यावर कसली थंडी आणि कसला वारा?

या थंडीमुळं थंड प्रदेशांत किती तरी नवे प्रश्न उपस्थित होत असतात. अगदीं उत्तर ध्रुवाजवळच्या प्रदेशांची गोष्ट सोडा, पण युरोपमधले देश घेतले तरीहि प्रत्येक देशांत थंड हवेमुळं निरनिराळे प्रश्न निर्माण झालेले आहेत. थंडीपासून माणसाला खरं संरक्षण मिळायचं तें उष्णतेमुळं, पण हवेंतली उष्णता पाण्याचं बर्फ होण्याइतकी किंवा त्याच्याहिपेक्षां (म्हणजे ३२ अंशांच्याहि पेक्षां) खालीं जाते तेव्हां कृत्रिम उष्णता निर्माण करणं हा एकच उपाय उरतो. प्रत्येक घरांत कोणत्या ना कोणत्या प्रकारचा 'फायर' हा यासाठींच असतो. लाकडाचे किंवा दगडी कोळसे पेटवून अग्नि तयार केला कीं त्याच्या उष्णतेंत सारे व्यवहार करतां येतात, पण या अग्नीमुळं थोडा तरी धूर होतोच आणि कारखान्यांच्या धुराड्यांतून बाहेर पडणाऱ्या धुरांत हा धूर मिसळला, कीं मोठ्या शहरांतून माणसाच्या प्रकृतीला अपायकारक अशी हवा निर्माण होते. तेव्हां कोळसे पेटवून लोकांनीं अग्नि तयार करूं नये म्हणून सरकारनंच प्रयत्न सुरू केले तेव्हां परंपरापूजक समाजानं त्याला विरोध करावा यांत कांहींच नवल नाहीं. कोणताहि समाज झाला तरी सरकारला विरोध करायची एकहि संधि तो कधीं वायां जाऊं देत नाहीं असंच दिसतं! सरकार ही संस्थाच कृत्रिम असली तरी माणसाच्या स्वाभाविक प्रवृत्तींवर निरनिराळीं बंधनं घातल्यावांचून तिला कार्यच करतां येणार नाहीं, हा विवेक कोणाला कधीं सुचत नाहीं आणि म्हणून इंग्लंडसारख्या सुधारलेल्या देशांतहि लोकांना तो सुचला नाहीं तर तें

स्वाभाविकच आहे! कोळशाऐवजीं लोकांनीं वीज किंवा गॅसचा उपयोग करावा व उष्णता निर्माण करावी असं सरकारनं म्हटलं तर त्यांत वास्तविक गैर असं कांहीं नाहीं. पण पिढ्यान् पिढ्या कोळशाचा उपयोग करायची संवय झालेल्या लोकांनीं सुरुवातीला तरी विरोधानं सारं आकाश दणाणून सोडलं! पण कालांतरानं सरकारच्या म्हणण्यांतील सयुक्तिकता लोकांना पटली आणि आतां बहुधा गॅस किंवा वीज यांचाच उपयोग घरांत उष्णता निर्माण करण्यासाठीं केला जातो. प्रत्येक घरांत साधारण खोलीच्या एका भिंतींत एक छोटीशी चौकट जमिनीशीं समांतर अशी बसविलेली असते आणि त्या चौकटींत ठिसूळ दगडाची आकृति बसवून तिच्या पाठीमागं गॅसच्या नळ्या किंवा विजेच्या तारा आणून सोडलेल्या असतात. ठिसूळ दगडाच्या ज्या आकृती गॅसच्या नळीच्या पुढें बसविलेल्या असतात त्यांचे मोठे तऱ्हेतऱ्हेचे आकार घरोघरीं दृष्टीस पडतात, तथापि मधमाशांचं पोळं जसं लांबून दिसेल तशा छोटे छोटे चौक असलेल्या आकृतीच पुष्कळ ठिकाणीं दिसतात. विजेचा प्रवाह सुरू करण्यासाठीं बटन असतं त्याचप्रमाणें गॅस सुरू करण्यासाठीं किल्ली ठेवलेली असते. ज्या वेळीं फायर हवा असेल त्या वेळीं विजेचं बटन खालीं ओढलं किंवा गॅसची किल्ली फिरवून चौकटीच्या पुढं काडी पेटवून धरली कीं गॅस पेट घेतो व त्यांत ज्वाला दिसूं लागतात. एक-दोन मिनिटांच्या आंतच ठिसूळ दगडाची आकृति तांबडी लाल होऊन त्यांतून उष्णता बाहेर फेकली जाते आणि हळूहळू सबंध खोलींतील उष्णता वाढूं लागते. तथापि विजेच्या बाबतींत फारसा धोका नसला तरी गॅस विषारी असल्यामुळं त्यांतून क्वचित् अपघात होतात. पण यांची संख्याहि अत्यल्प असतं. या गॅसला मीटर बसविलेले असतात. नाणं आंत पडल्यानंतरच तो सुरु होतो आणि नाण्याची किंमत संपेपर्यंत तो चालू राहतो. जरूर तर अधिक नाणींहि एकदमच टाकून ठेवतां येतात आणि तीं संपेपर्यंत गॅस पेटत राहतो.

तथापि राहण्याच्या छोट्या छोट्या जागांतून गॅसचा, कोळशाचा किंवा विजेचा 'फायर' ठेवणं शक्य असलं तरी मोठमोठ्या कचेऱ्यांतून, कारखान्यांतून, शाळा-कॉलेजांतून आणि दुकानांतून असे 'फायर' ठेवीत नाहींत. त्या ठिकाणीं सबंध इमारतच आंतून उष्ण राहील अशी व्यवस्था केलेली असते. या व्यवस्थेला Central Heating System म्हणतात. प्रत्येक खोलींतील एका कोपऱ्यांत किंवा मध्यभागीं (पण भिंतीला लागून) मोटमोठ्या लोखंडी नळ्यांची एक चौकट ठेवलेली असते आणि त्यांतून सर्व खोलींत उष्णता बाहेर फेकली

जाते. या नळ्यांना हात लावला तरी तो फारसा भाजत नाहीं आणि बाहेरून थंडीनं कुडकुडून आपण आलों आणि या नळ्यांच्या जवळ जाऊन दोनचार मिनिटं उभे राहिलों, कीं भयंकर गारठ्यांतून आपण आंत आलों आहों याची आठवणहि राहत नाहीं. रोजचे व्यवहार करण्यासाठीं जेवढी उष्णता माणसाला लागते तेवढी या नळ्यांतून सोडली जाते आणि एकदां आपण अशा Central Heating ची व्यवस्था असलेल्या इमारतींत आलों कीं थंडीचा यत्किंचितहि त्रास होत नाहीं. आपल्याकडे उष्णतेमुळं माणसाला काम करणं अवघड वाटूं लागतं आणि म्हणून मोठमोठ्या इमारतींच्या आंत हवा थंड राहावी यासाठीं Air-conditioning ची व्यवस्था करतात. इकडचा प्रकार बरोबर त्याच्या उलट आहे. आपल्याकडे हवा थंड करावी लागते, इथं ती गरम करावी लागते. ऑक्टोबर ते एप्रिल असे वर्षांतून जवळजवळ सात महिने ही Central Heating ची व्यवस्था चालू ठेवतात आणि त्यामुळें रोजच्या कामांत थंडीमुळं कोणतेहि अडथळे येत नाहींत. इमारतींच्या आंत असतांना तर बाहेर थंडी आहे याची कल्पनाहि येत नाहीं. घरीं किंवा ज्या ठिकाणीं मनुष्य आपल्या कामासाठीं जातो त्या ठिकाणीं अशी उष्णता निर्माण करण्याचीं साधनं असतात त्याचप्रमाणें कामावर जाण्यासाठीं ट्यूब किंवा बस यांसारखीं जीं वाहनं वापरलीं जातात त्यांतहि उष्णता निर्माण करणारीं साधनं असतातच !

थंडीपासून संरक्षण करणारं दुसरं साधन म्हणजे कपडे. तेव्हां ते चांगले ऊबदार असले पाहिजेत हें उघड आहे. किंबहुना थंडीच्या दिवसांत एका विशिष्ट रंगाचेच कपडे घालणं आवश्यक असतं. लोकरीचे कपडे तर थंडीसाठीं आवश्यक असतात, पण तेहि काळ्या रंगाचे ! पुरुष आणि स्त्रिया आपल्या कपड्यांवर पायघोळ असा ओव्हरकोटहि इकडे घेत असतात आणि इंग्लंडांत अलीकडे स्त्रिया पुरुषांसारखेच केस कापून घेत असल्यामुळं रस्त्यानं जातांना हे कोट घातलेली व्यक्ति पुरुष आहे कीं स्त्री आहे हें ओळखण्यासाठीं डोक्यापेक्षां पायांकडेच पाहावं लागतं ! मात्र ज्याला आपण ओव्हरकोट म्हणतों त्याला इकडे नुसता 'कोट' म्हणतात. आपण ज्याला कोट म्हणतों त्याला इकडे 'जॅकेट' (आपला अपभ्रंश जाकीट !) म्हणतात आणि आपण ज्याला जाकीट म्हणतों त्याला इकडे वेस्ट-कोट (Waist-coat) म्हणतात. म्हणजे पुरुषाचे रोजचे कपडे म्हटले कीं गंजिफ्रॉक, शर्ट, स्वेटर, वेस्ट कोट, जॅकेट आणि कोट असे होतात असं इकडच्या परिभाषेंत म्हणायला हरकत नाहीं. हिंवाळ्याच्या दिवसांत तरी फिकट

रंगाचे कपडे कोणी घालीत नाहींत आणि हिंवाळ्यांत सुती कपडे घालणं म्हणजे तर न्यूमोनियासारख्या रोगाला आमंत्रण देण्यासारखं आहे. दुकानांतून खास हिंवाळ्यासाठीं तयार केलेले उबदार कपडे मोठ्या आकर्षक रीतीनं मांडून त्यावर Winter Warmth अशा पाट्या अनेक ठिकाणीं लावलेल्या दिसतात.

रात्रीं पांघरण्यासाठीं तीनचार रग लागतातच, पण रोजचा बिछाना तयार करण्याची इकडे एक विशिष्ट पद्धत आहे. पांघरण्यासाठीं जे रग असतात त्यांतला सर्वांत वरचा पुष्कळच मोठा असतो. तो बिछान्याच्या तीन बाजूंनीं दुमडून बिछान्याच्या खालीं घालतात व आंत शिरण्यासाठीं उशीकडची बाजू मोकळी ठेवतात. हा बिछाना असा बंद झाला कीं एक पिशवीच होते म्हणा ना! तिच्यांत पायाजवळ गरम पाण्याची रबरी पिशवी भरून ठेवली, कीं आंत वाफ कोंडते व सारा बिछाना आंतून ऊबदार होतो आणि मग बाहेर कितीहि थंडी असली तरी ती जाणवत नाहीं.

हिंवाळ्याची सुरुवात साधारणतः डिसेंबरपासून होते आणि फेब्रुवारी अखेर-पर्यंत तो टिकतो. तथापि जानेवारी महिना हाच थंडीचा खरा महिना असतो असं म्हणायला हरकत नाहीं. हिंवाळ्याला सुरुवात झाली कीं हवेंतली उष्णता कमी कमी होत जाते आणि इंग्लंडच्या उत्तर भागांत तर डिसेंबर महिन्यांतच बर्फ पडायला सुरुवात होते. झाडांवरचीं सारीं पानंहि गळून पडतात. पर्णांचे आणि फुलांचे सारे अलंकार हिवाळ्यानं हिरावून घेतल्यामुळं सारीं झाडं ओकीं-ओकीं दिसतात आणि निष्पर्ण वृक्षशाखा भेसूर वाटूं लागतात. किंबहुना वृक्षांच्या इतक्या वेड्यावाकड्या शाखा असतात हें हिवाळ्यांतच लक्षांत येतं. हवेंत उष्णता अशी वाटतच नाहीं आणि सूर्याचं दर्शन कधीं चुकून झालंच तरी त्याच्या किरणांची उष्णता जाणवत नाहीं. घरांत पाणी सांडलं तरी तें पुसूनहि जागा कोरडी होत नाहीं, इतकंच काय पण फाऊंटनपेनच्या शाईनं लिहिलं तरी लिहिलेला मजकूर लवकर वाळत नाहीं! बाहेर जायचं झालं तर लोकरीचे किंवा कातड्याचे हातमोजे घालावेच लागतात आणि अगदींच २०–२५ अंशांच्या मानानं उष्णतामान असलं म्हणजे तर रस्त्यावरून जातांना हातांच्या आणि पायांच्या बोटांतून कळा येऊं लागतात. त्यामुळं निवाऱ्याच्या ठिकाणीं कधीं एकदां येतों असं होऊन जातं.

थंडीचा असा कहर झाला असतांना धुकं पडलं कीं जो काय गोंधळ उडतो तो कांहीं विचारूं नका! धुक्याचं आवरण येवढं दाट असतं कीं २५–३० फुटांच्या पलीकडे फारसं दिसत नाहीं आणि आपल्या कामाच्या ठिकाणाहून परत यावं

लागतं तें आंधळा मनुष्य ठराविक खुणांच्या साधनानीं इच्छित स्थळीं जातो तसंच! पण गंमत अशी कीं इतकं दाट धुकं पडलं तरी कसलेहि व्यवहार थांबत नाहींत. माणसं कामावर जात असतात, वाहनं जात-येत असतात. धुकं फारच दाट असलं म्हणजे तर एखाद् वेळेस तें ट्यूबच्या भुयारांतहि शिरतं आणि घराच्या खिडकीची ल्हानशी फट मिळाली तरी परवानगीशिवाय आंत न शिरण्याचा इंग्रजांचा शिरस्ता खुशाल मोडून आपले हात-पाय आंत पसरतं! रस्त्यावर माणसं एकमेकांनीं दिसली नाहींत तरी रहदारीचे तांबडे, पिवळे, हिरवे दिवे चकाकत असतात आणि त्यांच्या अनुरोधानंच रस्ते ओलांडावे लागतात. एकेकदां धुकं पडलं कीं तीन-तीन, चार-चार दिवस तें निवळत नाहीं, पण तें निवळलं नाहीं म्हणून माणसंहि अडून बसत नाहींत.

या धुक्याची मला खरी गंमत वाटली ती टेम्स नदीच्या पाण्यावर. गेल्या महिन्यांत लंडन शहरांत असं धुकं दोन-तीनदां तरी पडलं होतं आणि केवळ या धुक्याची गंमत पाहण्यासाठीं मी मुद्दाम तास–दोन तास लंडनमध्यें फिरलों. टेम्स नदी लंडनमधून वाहते. तिच्यावर किती पूल आहेत मला माहीत नाहीं, पण त्यांपैकीं पार्लमेंट-गृहाशेजारच्या वेस्टमिन्स्टर पुलावर उभं राहून टेम्स नदीच्या प्रवाहावर पसरलेलं धुकं मीं पाहिलं, तेव्हां नदीच्या पाण्यांतून वाफा येत आहेत असा मोठा गंमतीचा भास मला तरी झाला. त्या धुक्यांतून नदीच्या पाण्यांत तरंगणाऱ्या नावा दिसल्या त्याहि झिरझिरीत मच्छरदाणीच्या आड झोपलेल्या मुलानं झोंपेंतच हालचाल करावी तशा!

मात्र खरं काव्य आहे तें बर्फवृष्टींत! बर्फ म्हटलं कीं थंड पेयांच्या दुकानांच्या बाहेर आणून टाकलेले पांढरे शुभ्र, झिरपणारे ठोकळे अशी माझी कल्पना. हिंदुस्थानांतहि जेव्हां गारा पडतात तेव्हां कधीं सुपारीएवढे तर कधीं सफरचंदाएवढे खडे आकाशातून पडतांना मीं अनेकदां पाहिले होते. तेव्हां इथंहि तसंच बर्फ पडत असावं अशी माझी कल्पना होती. डिसेंबर महिना अर्धा उलटून गेल्यानंतर स्कॉटलंडमध्यें अनेक वेळां बर्फ पडल्याच्या आणि दोन-दोन दिवस रस्ते मोकळे न झाल्याच्या बातम्या वर्तमानपत्रांत मी वाचूं लागलों, तसं बर्फ पडलेलं कधीं पाहायला मिळेल म्हणून माझं मन उतावीळ होऊं लागलं. पण माझ्या मनाची भूक भागविण्यासाठीं बर्फ थोडंच पडणार होतं मला पाहिजे तेव्हां? मात्र अखेर बर्फ पडलं तें केवढ्या अनपेक्षित रीतीनं! कांहीं तरी वाचीत मी खिडकीजवळ बसलों असतांना कांचेंतून कापसाचे पांढरे शुभ्र तुकडे हवेंत तरंगत

असलेले दिसले. वर्फ पडतं म्हणजे काय याची मला कांहींच कल्पना नसल्यामुळं कापसासारखे हवेंत तरंगणारे तुकडे म्हणजेच वर्फ असेल अशी शंकाहि मला आली नाहीं. पण पांच-दहा मिनिटांतच कापसाचीं पिकलेलीं सहस्रावधि बोंडं फुटावीं तसं सारं आसमंत या हलक्या, पांढऱ्याशुभ्र हिमकणांनी इतकं भरून गेलं कीं त्यांतले कांहीं हातांत घेऊन पाहण्याचा मोह मला आवरेना. मीं माझा कोट (आतां ओव्हरकोट म्हणत नाहीं!) अंगांत घातला आणि इमारतींतून रस्त्यावर गेलों तों काय? सारी हिमवृष्टि थांबली! माझी अगदीं निराशा झाली! पांच-दहा मिनिटांतच सारं आटोपलं होतं. रस्त्यावर पडलेला थर येवढा विरळ होता, कीं त्यांतलं वर्फ उचलून हातांत घेणंच अशक्य होतं. पुन्हां कधीं वर्फ पडेल तेव्हां आतां नीट पाहायचं असं म्हणत मी कोपऱ्यावरच्या वर्तमानपत्राच्या दुकानांत गेलों, तों काय? येवढ्या जोरानं पुन्हां वर्फ पडूं लागलं कीं त्या अखंड हिमवृष्टींत उभं राहण्याचा मोह आवरणं कठीण होतं. त्यांतच वारा येवढा जोराचा होता, कीं आकाशांतून पडणारे सारे पांढरे स्फटिकतुल्य हिमतुषार इतस्ततः विखुरले जात होते. आकाशांतून जुईच्या इवल्या इवल्या पाकळ्या अनंत हस्तांनीं जणूं कुणी तरी उधळींत होतं आणि वाऱ्यानं त्या साऱ्या भूभागावर पसरल्या जात होत्या! दोन हातांच्या ओंजळींनं त्या घ्यायच्या म्हटल्या तरी मला किती वेतां येणार होत्या? किती वेळा तरी असं चाललं होतं, पण कोणतेहि व्यवहार थांबले नव्हते. लोक जात होते, वाहनं सुरू होतीं, म्हणून मीहि घरीं येण्यासाठीं म्हणून निघालों आणि पांच मिनिटांतच घरीं आलों तों माझा कोट पांढऱ्या शुभ्र, चिमुकल्या 'जुईच्या पाकळ्यां'नीं भरून गेला होता!

आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी उठलों तों काय आश्चर्य? मी जरा लवकर उठलों होतों आणि बाहेर अजून जरा अंधारच होता. पण त्या संधिप्रकाशांतहि बाहेर साऱ्या वस्तू इतक्या पांढऱ्या शुभ्र दिसत होत्या कीं प्रथम चांदण्याचा प्रकाशच पसरला असावा असं मला वाटलं. पण थोड्या वेळांतच चांगलं दिसूं लागलं तसं माझ्या लक्षांत आलं कीं साऱ्या रात्रभर वर्फ पडत असलं पाहिजे. मी राहतों त्या इमारतीच्या पाठीमागं केरकचरा टाकण्याच्या ज्या कुंड्या आहेत त्यांच्यावरहि वर्फाचा इतका छान थर सांचला होता कीं त्या थराखालीं काय आहे हें ओळखणंच अशक्य होतं. घराचीं छपरं, मोटारी, हातगाड्या—इतकंच काय, रस्त्यावरचे खांबहि पांढरे शुभ्र झाले होते आणि रस्त्यावर पडलेल्या इंच–दीड इंच वर्फाच्या थरांतून चालतांना स्वतःचा तोल सांभाळणं कठीण वाटत होतं.

पण असं समजूं नका कीं, बर्फ पडलं कीं सारी गंमतच गंमत असते! कोणत्याहि गोष्टीचा अतिरेक झाला कीं अनर्थ ठरलेला. हा सिद्धांत बर्फवृष्टीच्या बाबतींत तर सर्वच दृष्टींनीं खरा आहे. बर्फ जेव्हां अतोनात पडतं तेव्हां गंमत तर वाटत नाहींच, पण सारेच व्यवहार थंडावतात! सारे रस्ते बर्फानं भरून गेले कीं वाहनं चालत नाहींत आणि रस्ते मोकळे करणं हें पहिलं काम होऊन बसतं. एकेकदां इतकं बर्फ पडतं कीं रस्ते मोकळे करणं मानवी शक्तीच्या बाहेरचं असतं. कित्येकदां दिवस हवेंत गारठा एवढा असतो कीं एकदां पडलेलं बर्फ चार चार दिवस वितळत नाहीं. कल्पनेंतलीं ध्येयं वास्तवतेच्या स्पर्शानं मलीन व्हावीं तसं आकाशांत पांढरं शुभ्र दिसणारं बर्फ भूमीच्या स्पर्शानं हळूहळू मलिन होऊं लागतं आणि अखेर त्याला कर्दमाची अवकळा येते. आपल्याकडे पावसाळ्यांत रस्त्यावर सांचलेला चिखल फावड्यानं काढावा लागतो तसाच हा बर्फाचा ढीग बाजूला करून रस्ते मोकळे करावे लागतात. आगगाडीच्या रस्त्यावर बर्फ सांठलं कीं आगगाड्या जात–येत नाहींत आणि खाद्यपदार्थांची वाहतूक थांबली कीं अन्नाचा तुटवडा पडतो. गवतावर बर्फाचा थर सांचल्यामुळं जनावरांना चारा मिळत नाहीं आणि रहदारी थांबल्यामुळं अत्यवस्थ माणसाला औषधोपचार मिळणं अशक्य होऊन जातं. असं झालं कीं दुसऱ्या शहरांना बिनतारी संदेश पाठवून अनेक वस्तू मागवाव्या लागतात आणि त्याहि दुसरं कोणतंहि वाहन त्या भागांत जाणं शक्य नसल्यामुळं हेलिकॉप्टरच्या साहाय्यानं आकाशांतून तिथं टाकाव्या लागतात!

सबंध हिवाळ्यांत दिवसहि इतके लहान असतात, कीं मनुष्याला केव्हां एकदां हे दुर्दिन संपतात असं होऊन जातं. या दिवसांत सूर्य उगवतो सकाळीं आठ वाजतां आणि मावळतो दुपारीं चार वाजण्याच्या आंत! म्हणजे आठ तास प्रकाश, तर सोळा तास अंधार! त्यांतच गारठलेली हवा आणि अंधारलेलं आकाश! त्यामुळं हिंवाळ्यांतील दिवस मोठे कंटाळवाणे तर होतातच, पण माणसाला काम करण्याइतका हुरूपच राहत नाहीं. तरीहि इंग्लंडांतील हवा मोठी उत्साहजनक असते असं आमचे प्रवासी बातमीदार खुशाल सांगत आले आहेत! मला इथं येऊन आतां चार महिने झाले आहेत, पण इथली हवा मोठी उत्साहदायक आहे, असं मला चुकूनहि कधीं वाटलं नाहीं. इंग्रजांचं राज्य आमच्यावर होतं आणि जो न्यूनगंड आमच्या मनांत निर्माण झालेला होता, त्यामुळं इंग्रजांचं सारंच चांगलं असं मानण्यांत आम्ही स्वतःच्या राजनिष्ठेचं प्रदर्शन करीत होतों

कीं काय असं सारखं माझ्या मनांत येतं. कारण, निदान हिंवाळ्यांतली हवा आणि एकंदर वातावरण इतकं कुंद आणि निरुत्साही असतं कीं, 'नको हा हिंवाळा' असं खुद्द इंग्रज माणसालाच वाटत असतं. दिवस लहान असतात, सूर्य-दर्शन होत नाहीं, अंगाला थंडी झोंबत असते म्हणूनच हा हिंवाळा संपून वसंतऋतु केव्हां येईल असं त्याला झालेलं असतं. दुःखाची परमावधि झाली कीं सुखाचा काळ खचित येईल या आशेवर मनुष्य जगत असतो, तसाच हा हिंवाळा इतका असह्य आहे कीं वसंत ऋतु फार दूर नाहीं असं शेली कवीलाहि म्हणावंसं वाटलं, यांतच इथं राहणाऱ्यांचं मनोगत व्यक्त झालं आहे असं मला तरी वाटतं. मग तुम्ही कांहींहि म्हणा!

तुमचा,

वि. वा. पत्की

## : १३ :

# इंग्लंडांतील कल्याणकारी राज्य—१

★

६, सॉंडर्स ग्रव्ह,
लंडन (डब्ल्यू. ११)
१६ फेब्रुआरी, १९५६

प्रिय बाळासाहेब,

माझ्या वयाची चाळिशी उलटल्यामुळं असेल कदाचित्, पण इकडे आल्यानंतर अगदीं थोड्याच दिवसांत हिंदुस्थानांत असतांना कधींहि वाटला नव्हता असा एक नवा त्रास मला होऊं लागला. पुस्तक किंवा वर्तमानपत्र वाचायला घेतलं कीं जवळ धरल्यावर तें नीट वाचतां येईना आणि हें वाचन केल्यावांचून तर एक दिवसहि चालेना! तें वाचण्यासाठीं जरा दूर धरलं कीं, अक्षरं स्पष्ट दिसूं लागत. (मला थोडी तरी 'दूरदृष्टि' आहे हें आतां तरी कबूल कराल काय?) पण अभ्यासासाठींच मला इथं वर्तमानपत्रं रोज वाचावीं लागत असल्यामुळं असं वाचन करणं त्रासाचं होऊं लागलं तेव्हां मीं मनांत म्हटलं,

'आतां चष्मा घेण्यावांचून गत्यंतर नाहीं!'

वास्तविक मला चष्म्याची आवड मुळींच नाहीं. पण आतां माझ्या आवडी-निवडीचा मुळीं प्रश्नच नव्हता, त्याची गरज निर्माण झाली होती. इथली एकंदर राहणी अगोदरच महागाईची, त्यांत आतां चष्म्यासाठीं बराच खर्च येणार हें मला उघड दिसत होतं. पण आतां बोलून उपयोग नव्हता. मात्र अखेर मी डॉक्टरांच्याकडे गेलों तेव्हां मला समजलं कीं इथं डोळे तर फुकट तपासतातच, पण चष्म्यालाहि फारच थोडी किंमत पडते! आणि तीहि किती? चष्म्याच्या नेहमींच्या किंमतीच्या जवळ जवळ एक चतुर्थांश! माझ्या दृष्टीची नैसर्गिक शक्ति कमी झाल्यामुळं मला चष्मा लावावा लागणार या दुःखापेक्षां तो पुष्कळच स्वस्त

मिळतो कसा याचं कुतूहल माझ्या मनाला सारखं वाटूं लागलं. इंग्लंड हें एक कल्याणकारी राज्य (Welfare State) आहे आणि राष्ट्राची कार्यक्षमता वाढायची असेल तर प्रत्येक मनुष्य निरोगी असणं ही अखेर राष्ट्राचीच जबाबदारी आहे, ही जाणीव इथं लोकमताला फार काळापूर्वी झाली आहे. तथापि, राष्ट्रानं लोकांना निरोगी ठेवण्यासाठीं किती खर्च करावा यावरच इथं मतभेद होते आणि गेल्या मजूर मंत्रिमंडळांत तर या प्रश्नावर फाटाफूटहि झाली होती.

मात्र, ज्या योजनेमार्फत लोकांना सर्व औषधोपचार जवळजवळ विनामूल्य मिळण्याची सोय सरकारनं केली आहे ती राष्ट्रीय आरोग्य योजना (National Health Service) पिकलेलं फळ झाडावरून एकदम खालीं पडावं तशी लोकांच्या पदरांत पडलेली नाहीं. तिची वाढ क्रमाक्रमानं होत गेलेली आहे. राष्ट्रीय आरोग्य योजना १९४८ सालीं अंमलांत आली आणि रोगांचं निदान होऊन औषधोपचार मिळण्याची सोय झाली, तरी या घटनेची तयारी राष्ट्रांत जवळ जवळ शंभर वर्षं होत होती असं म्हणणं अतिशयोक्तीचं होणार नाहीं. आरोग्याला आवश्यक असणारं शुद्ध पाणी, स्वच्छ रस्ते, चांगलीं घरं आणि घाणीचा निचरा या गोष्टी एकोणिसाव्या शतकांतच इथं हळूहळू होत गेल्या तरी राष्ट्रांतील तरुण माणसं असावीं तितकीं निरोगी नाहींत ही गोष्ट लक्षांत आली ती या शतकाच्या सुरुवातीला झालेल्या बोअर युद्धाच्या निमित्तानं! युद्धावर पाठवायच्या सैनिकांचं आरोग्य चांगलं नाहीं याचं कारण चांगल्या वातावरणांत वाढण्याची संधि त्यांना मिळाली नाहीं, या वस्तुस्थितीकडे विचारवतांच लक्ष गेलं आणि या प्रश्नाला चालना मिळाली. फार पूर्वी इकडे रोग्यांची काळजी धार्मिक संस्था घेत, परंतु हें सारं केवळ दया म्हणून! तथापि धार्मिक मठ जसजसे कमी होऊं लागले तसतसं नगरपालिका या प्रश्नांत लक्ष घालू लागल्या आणि श्रीमंत लोकांच्या औदार्यामुळं अनेक मोठीं हॉस्पिटलं निघालीं. पण अखेर केवळ भूतदयेनं हा प्रश्न सुटणार नाहीं हें ओळखून सरकारनं या प्रश्नाचा सर्वांगीण विचार व्हावा म्हणून १९०६ सालीं एक रॉयल कमिशन नेमलं. या कमिशननं ज्या शिफारशी केल्या त्यांतून कारखान्यांत काम करणाऱ्या लोकांना मोफत वैद्यकीय मदत व औषधोपचार मिळाला पाहिजे हा कायदा जन्माला आला. मात्र, अजूनहि कारखान्यांत काम करणाऱ्यांवर अवलंबून असणाऱ्यांची कांहींहि सोय झालेली नव्हती, त्यामुळं त्यांच्यापैकीं कोणी जेव्हां आजारी पडत तेव्हां खाजगी रीतीनंच त्यांना पैसे देऊन औषधोपचार घ्यावे लागत. पहिल्या महायुद्धानंतर हा प्रश्न

लोकांच्यापुढें अधिकच तीव्र स्वरूपांत आला तेव्हां मंत्रिमंडळांत आरोग्य मंत्र्याची एक खास जागा निर्माण करण्यांत आली. हळुहळू लोकांच्या आरोग्याबद्दलची सरकारची जबाबदारी येवढी वाढत गेली, कीं या प्रश्नाचा सर्वांगीण विचार पुन्हां एकदां व्हावा असं सरकारला वाटूं लागलं आणि १९४० सालीं सरकारनं सर विल्यम (आतां लॉर्ड) बीव्हरिज यांच्या अध्यक्षतेखाली एक कमीटी नेमली.

या कमिटीनं १९४२ सालीं आपला रिपोर्ट प्रसिद्ध केला. त्यांत देशांतल्या प्रत्येक नागरिकाच्या आरोग्यरक्षणासाठीं जी जी वैद्यकीय मदत व औषधोपचार आवश्यक असतील तें सर्व विनामूल्य मिळावे असं आग्रहानं प्रतिपादन केलं. सरकारनंहि या रिपोर्टांतील सूचना लक्षांत घेऊन त्या अमलांत आणायचं ठरविलं आणि १९४६ सालीं मजूर मंत्रिमंडळानं याबद्दलचं एक विस्तृत बिल पार्लमेंटांत मांडलं. सर विल्यम बिव्हरिज यांनीं मूळ रिपोर्ट लिहिला तेव्हां या योजनेसाठीं सुमारें १७ कोटि पौंड (म्हणजे सुमारें २२५ कोटि रुपये!) खर्च येईल अशी अपेक्षा व्यक्त केली होती. परंतु सरकारला हा अंदाज अधिक वाटला होता. या रिपोर्टाबद्दल सरकारनं जी श्वेत–पत्रिका काढली होती तिच्यांत हा खर्च १४ कोटि पौंड येईल असें म्हटलं होतं. परंतु १९४९ सालीं ही योजना पूर्णपणें अमलांत आली तेव्हां प्रत्यक्ष खर्च ३० कोटि पौंड (म्हणजे सुमारें ४०० कोटि रुपये) आला! हा खर्च दरसाल थोडा थोडा वाढतच गेला आणि एका वर्षी या योजनेसाठी सरकारला ४७ कोटि पौंड (म्हणजे सुमारें ६४० कोटि रुपये) खर्च करावे लागले! तुलनेनंच सांगायचं तर भारत सरकारच्या सबंध वार्षिक खर्चापेक्षांहि ब्रिटिश सरकारच्या आरोग्य योजनेचा खर्च अधिक आहे असं म्हणावं लागेल.

तथापि हा खर्च करणं आपलं कर्तव्य आहे असं लोकमतावर निवडून आलेल्या पार्लमेंटनच ठरविलं आहे. या योजनेची प्रत्यक्ष सुरुवात मजूर मंत्रिमंडळानं केलेली असली तरी देशांतील सर्व पक्षांनीं या योजनेला संमति दिलेली आहे आणि सैन्यासाठीं राष्ट्र खर्च करतं तसाच आरोग्य योजनेसाठींहि खर्च करणं आपलं कर्तव्य आहे असं राष्ट्रानं आतां मानलं आहे. या योजनेचा मूळ हेतूच हा आहे कीं, राष्ट्रांतील कोणाहि व्यक्तीला केवळ औषधोपचार मिळत नाहीं म्हणून रोगग्रस्त राहण्याचा प्रसंग येऊं नये. मनुष्य गरीब असो, श्रीमंत असो, भिकारी असो, इतकंच काय पण गुन्हेगार असला तरी त्यालाहि विनामूल्य औषधोपचार मिळालाच पाहिजे हें या योजनेच्या मूळ कायद्यांत सांगितलं आहे.

याचा अर्थ असा नव्हे, कीं इथं आतां सारे सरकारी किंवा म्युनिसिपालिट्यांचे

दवाखाने झाले आहेत आणि या सरकारी दवाखान्यांतून सर्वांना मोफत औषध मिळतं. राष्ट्रीय आरोग्य योजनेचं सारं स्वरूप याहून पुष्कळच निराळं आणि सर्वंकष आहे. या योजनेप्रमाणें १६ वर्षांवरील स्त्रीपुरुषांना कोणत्याहि डॉक्टरकडे आपलं नांव नोंदवावं लागतं (१६ वर्षांखालील मुलांचीं नांवं त्यांच्या पालकांनीं नोंदवायचीं असतात.) एकदां आपलं नांव असं नोंदविलं, कीं त्या व्यक्तीला आजारीपणांतून लवकर बरं होतां यावं यासाठीं आवश्यक असलेलीं सर्व औषधं विनामूल्य मिळण्याची कायद्यांत तरतूद आहे. ज्या डॉक्टरकडे आपलं नांव नोंदविलेलं असेल तो डॉक्टर आपणांकडे आलेल्या रोग्याचा रोग बरा करण्यासाठीं आवश्यक असलेलीं सर्व औषधं रोगाचं निदान करून लिहून देतो व तीं औषधं कोणत्याहि केमिस्टकडून घेतां येतात. ही औषधं किती किंमतीचीं आहेत हा मुळीं प्रश्नच नसतो. रोग्याचा रोग बरा होण्यासाठीं किंवा त्या रोगाचा प्रतिबंध करण्यासाठीं तीं औषधं आवश्यक आहेत असं डॉक्टरनं लिहून दिलं, कीं तीं सारी त्या रोग्याला कसलाहि खर्च न करतां मिळूं शकतात. रोग बरा करण्यासाठीं ऑपरेशन करणं किंवा एक्स-रे काढणं जरुरीचं असलं तरी तें खास हॉस्पिटलमधून केलं जातं व केवळ गरिबीमुळं औषधोपचार मिळत नाहींत हा प्रश्नच उरत नाहीं. या उपचारांत केवळ औषधंच तेवढीं दिलीं जातात असं नव्हे तर चष्मे, दातांच्या कवळ्या व कृत्रिम अवयव यांचाहि अंतर्भाव होतो.

मात्र १९४९ नंतर पहिल्या दोन वर्षांत अनुभव आला कीं, या योजनेवरील खर्च अपेक्षेबाहेर वाढत आहे व त्याला कुठं तरी मर्यादा घालणं आवश्यक आहे. म्हणून १९५०–५१ सालीं जो खर्च आला होता तो प्रमाण मानून या योजनेसाठीं दरसाल सुमारें ४० कोटी पौण्डांपेक्षां (म्हणजे सुमारें ५५० कोटि रुपयांपेक्षां) अधिक खर्च करूं नये असं बंधन सरकारनंच स्वतःवर घालून घेतलं. पण असं बंधन घालणं म्हणजे सर्वांना विनामूल्य सर्व औषधोपचार मिळतील यावरच बंधन घालण्यासारखं होतं व केवळ थोड्याशा खर्चासाठीं तत्त्वच्युति पत्करायची कीं काय असा पेचप्रसंग निर्माण झाला होता. तथापि, यांतूनहि अखेर मार्ग निघाला व डॉक्टरनं दिलेल्या प्रत्येक प्रिस्क्रिप्शनसाठीं रोग्यानं फक्त १ शिलिंग द्यावा, चष्म्यासाठीं व दातांच्या कवळीसाठीं नाममात्र म्हणजे जवळजवळ मूळ किंमतीच्या चतुर्थांश किंमत द्यावी असं ठरविण्यांत आलं. औषधांच्या किंमतीचं येवढ्या मोठ्या असतात, कीं या योजनेमुळं सरकारला कितीसा पैसा मिळाला असेल असं वाटतं तुम्हांला? एकूण खर्चाच्या फक्त पांच टक्के!

या सर्व योजनेचं यश हा व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांचं सहकार्य किती मिळतं यावरच होतं हें उघड आहे. १९४४ सालीं बिव्हरिज रिपोर्टांतील सूचना मान्य करायचं सरकारनं श्वेतपत्रिकेच्या रूपानं जाहीर केलं तेव्हां सर्व डॉक्टर मंडळींत एकच कल्लोळ उसळला! आजपर्यंत स्वतंत्र असणाऱ्या वैद्यकीय व्यवसायावर हें एक उघड उघड आक्रमण होतं आणि त्याच्यापुढें मान वाकविणं म्हणजे आपल्या व्यावसायिक स्वातंत्र्याबरोबरच आपल्या प्राप्तीवरहि बंधन घालण्याला संमति देण्यासारखंच होतं. तथापि, एकंदर समाजांत गेल्या अर्ध शतकांतच विचारांचे जे नवे वारे वाहूं लागले होते, त्याकडे आपणाला दुर्लक्ष करतां येणार नाहीं हें त्या व्यवसायांतील विचारवंतांना माहीत झालेलं होतं. समाजांतल्या द्रष्ट्यांना भावी समाजाचं चित्र प्रथम दिसावं आणि तें त्यांनीं लोकांपुढं मांडलं कीं प्रथम त्याची हेटाळणी होत होत समाजानं अखेर त्या तत्त्वांचा अंगिकार करावा आणि मानवी प्रगतीचं पाऊल पुढें पडावं, हा इतिहासाचाच क्रम आहे. कार्ल मार्क्सच्या विचारसरणीचा इतर देशांप्रमाणें इंग्लंडांतहि जसजसा प्रसार होऊं लागला तसतसे नवे विचार समाजांत पसरविण्याचं काम तत्कालीन पुरोगामी विचारांच्या व्यक्तींनीं लोकमताची पर्वा न करतां केलं. हाईन्डमन (Hyndman) नांवाच्या केंब्रिज विश्वविद्यालयांतून शिकून बाहेर पडलेल्या माणसानं हें नवविचारांचं लोण इंग्लंडांतील सामान्य माणसापर्यंत नेण्याचा प्रथम प्रयत्न केला आणि पुढें सिडने व बिॲट्रिस वेब आणि एच. जी. वेल्स यांनीं निरनिराळ्या संस्था काढून त्यांचा प्रचार केला. बर्नार्ड शॉ यानं तर आपल्या नाटकांतून श्रोत्यांच्या कानांवर हे विचार आपल्या लोकविलक्षण पद्धतीनं घातले आणि समाजरचनेवरच चौफेर हल्ला चढविला. या माऱ्यांतून वैद्यकीय व्यवसायहि सुटला नाहीं आणि आपल्या Doctor's Dilemma या नाटकांत तर लंडन शहरांतल्या ज्या हार्ली स्ट्रीटवर मोठमोठी कमाई करणारे डॉक्टर्स राहात त्या व्यवसायाचं राष्ट्रीयीकरण करावं या हेतूनं Municipalise Harley Street अशी १९११ सालीं लिहिलेल्या या नाटकाच्या प्रस्तावनेंतच शॉनं गर्जना केली.

राष्ट्रीय आरोग्य योजना अंमलांत यायचं ठरलं तेव्हां सुरुवातीला डॉक्टरांचा विरोध झाला खरा, पण सरकारनंहि एकदां हातीं घेतलेला प्रश्न सोडविण्यांत आपलं सारं कौशल्य पणाला लावलं. ही योजना यशस्वी व्हायची असेल तर वैद्यकीय व्यवसायाचं खरंखुरं सहकार्य आपणाला पाहिजे हे ओळखून या योजनेंत सामील होणाऱ्या डॉक्टरांना किती मोबदला द्यावा हें ठरविण्यासाठीं सरकारनें सर

विल स्पेन्स यांच्या अध्यक्षतेखालीं १९४५ मध्यें एक कमिटी नेमली. या कमिटीनं ज्या शिफारशी केल्या त्या सरकारनें स्वीकारल्या, पण त्यांच्या अंमलबजावणींत जे अनुभव आले त्यामुळें वैद्यकीय व्यवसायांतील मंडळी फार असंतुष्ट झाली. तेव्हां १९५१ सालीं पुन्हां हा प्रश्न लवादाकडे सोपविण्याचं सरकारनं ठरविलं व न्यायमूर्ति डंकवर्टस यांनीं जो निवाडा दिला त्याप्रमाणें आतां डॉक्टरांना मोबदला देण्यांत येत आहे.

सध्यां डॉक्टरला त्याच्याकडे नोंदविलेल्य प्रत्येक रोग्याबद्दल दरसाल १७ शिलिंग द्यायचे असं ठरलं आहे. याचा अर्थ एखादा मनुष्य वर्षांतून एकदांहि औषधोपचारासाठीं आपल्या डॉक्टरकडे गेला नाहीं तरीहि त्याचं नांव ज्या डॉक्टराच्या यादींत नोंदविलेलं असल्यामुळं डॉक्टरला त्या सरकारकडून वर्षाचे १७ शिलिंग मिळतील. प्रत्येक डॉक्टरला जास्तींत जास्त ३५०० रोगी वर्षांत घेतां येतात, तथापि अगदींच कमी रोगी एखाद्या डॉक्टरकडे आले तर त्याचं नुकसान होऊं नये म्हणून ५०१ ते १५०० रोग्यांपर्यंत प्रत्येक रोग्यापाठीमागं १० शिलिंग दरसाल जादा द्यायचे असंहि ठरविण्यांत आलं आहे. अगदीं नवीन डॉक्टरला वर्षाला कमींत कमी ६०० पौंड (म्हणजे महिना सुमारें ६५० रुपये) मिळण्याची व ज्या डॉक्टरकडे ३५०० रोगी येतील त्याला दरसाल ३४७५ पौंड दरमहा सुमारें ३८०० रुपये मिळण्याची सोय या योजनेंत आहे. त्याशिवाय रोग्याला पाहण्यासाठीं आडवळणाच्या गांवीं जावं लागलं तर जादा मोबदला मिळतोच, पण अशा आडवळणाच्या व ज्या ठिकाणीं साधारणतः कोणीहि डॉक्टर प्रॅक्टिससाठीं जायला तयार होत नाहीं त्या ठिकाणीं प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टरला ठरलेल्या मोबदल्याशिवाय वर्षाला सुमारें २५० पौंड अधिक मिळतात. या योजनेसाठीं जो खर्च करण्यांत आलेला आहे त्यांत डॉक्टरांच्या मोबदल्यासाठीं ५ कोटी पौंड बाजूला काढून ठेवण्यांत येतात.

सुरुवातीला या योजनेंत किती डॉक्टर सामील होतात हा प्रश्न होता. पण जसजशी ही योजना विकसित होत गेली आणि लोकप्रिय झाली तसा डॉक्टरांचा विरोध मावळत गेला व गेल्या वर्षी इंग्लंडमधील २१,००० डॉक्टरांपैकीं सुमारें १९,५०० डॉक्टर, देशांतील जवळजवळ सर्व म्हणजे १,००० डोळ्यांचे डॉक्टर, १३,००० केमिस्ट व चष्मे पुरविणारे सुमारें ७,००० दुकानदार या योजनेंत सामील झाले आहेत. केमिस्टांनीं रोग्यांना पुरविलेल्या औषधाबद्दल त्यांना सरकारकडून परस्पर पैसे मिळतात व गिऱ्हाइकानं नेलेल्या मालाची किंमत

वसूल करण्याचा प्रश्नच उरत नाहीं. ज्या रोग्यांना सरकारनं प्रत्येक प्रिस्क्रिप्शन-साठीं जी नाममात्र एक शिलिंग किंमत ठेवली असेल ती देतां येत नसेल त्यांनीं राष्ट्रीय मदत मंडळा (National Assistance Board) कडे अर्ज केल्यास त्याची चौकशी होऊन योग्य वाटल्यास औषधाची दिलेली ही नाममात्र किंमतहि परत मिळते. दीर्घ मुदतीच्या आजारानंतर रोग्याची प्रकृति सुधारण्यासाठीं या योजनेंत मुद्दाम व्यवस्था करण्यांत आलेली असून रोगी परगांवीं गेला असतां तिथं आजारी पडला तर या योजनेंत सामील झालेल्या तेथील डॉक्टरकडून त्याला विनामूल्य औषधोपचार मिळूं शकतात.

पण केवळ मनुष्य आजारी पडल्यानंतरच तो बरा होण्यासाठीं औषधोपचार मिळतात असं नव्हे, तर रोगाचा प्रतिबंध व्हावा यासाठींहि या योजनेंत तरतूद आहे. विशेषतः जन्माला येणाऱ्या मुलाची तें गर्भावस्थेंत असल्यापासूनच त्याची व त्याच्या आईची काळजी घेतली जाते. गरोदर स्त्रीला दररोज एक पिंट (म्हणजे सुमारें साडेतीन कप) दूध फक्त दीड पेन्साला (म्हणजे दीड आण्याला) या योजनेमुळं मिळूं शकतं व जन्माला आलेलं मूल पांच वर्षांचं होईपर्यंत हीच सवलत त्यालाहि मिळते. त्याशिवाय मोसंब्यांचा रस सवलतीच्या (Subsidised) दरानं आणि कॉडलिव्हर ऑईल व व्हिटॅमिनमुक्त पदार्थ मोफत मिळतात. ज्यांना दूध व मोसंब्यांचा रस या सवलतीच्या दरानहि घेतां येत नसेल त्यांना या दोन्ही वस्तू विनामूल्य मिळूं शकतात. गरोदर स्त्रीला सर्व प्रसूतिपूर्व सल्ला तर तज्ज्ञांकडून मिळतोच, पण प्रसूतीनंतर हेल्थ व्हिजिटर घरीं जाऊन जरूर ती सर्व माहिती देतात. जन्माला येणाऱ्या मुलाची कशी काळजी घ्यावी यासाठीं या योजनेमधून मुद्दाम वर्ग चालविले जातात व नोकरीवर जाणाऱ्या स्त्रियांच्या मुलांना सांभाळ-ण्यासाठीं बालसंगोपनगृहं चालविलीं जातात. त्याशिवाय मुलांना बालसंगोपन-गृहांऐवजीं खाजगी दायां (Baby Sitters) कडे मुलं देतां येतात. बालसंगोपन-गृहें व दिवसा मुलांची काळजी घेणाऱ्या (Day-minders) स्त्रियांच्यासाठीं मात्र निराळा चार्ज द्यावा लागतो. सर्वसामान्य मातांप्रमाणेंच अविवाहित मातांनाहि या सर्व सवलतींचा फायदा मिळतोच, पण या अविवाहित मातांना कांहीं खास सवलतीहि आहेत. आपल्या मुलांची पुढें काय व्यवस्था करायची याबद्दलचा सल्ला खास तज्ज्ञांकडून त्यांना मिळण्याची व्यवस्था केली जाते व मुलांच्यासाठीं स्थानिक संस्थांच्या मदतीनं वसतिगृहंहि चालविली जातात.

सर्व प्रकारची वैद्यकीय मदत प्रत्येक व्यक्तीला विनामूल्य देण्याची व्यवस्था

करणारी ही योजना सुरू होण्याच्यावेळीं लोक या योजनेचा गैरफायदा घेतील व उठल्या सुटल्या डॉक्टरकडे जातील अशी भीति व्यक्त करण्यांत आली होती, परंतु अनुभवानं ही भीति निखालस खोटी ठरली आहे. एकदां सर्व प्रकारची वैद्यकीय मदत कोणत्याहि क्षणीं मिळूं शकते अशी खात्री झाली, कीं तिचा फायदा कारणावांचून लोक घेणार नाहींत हें अनुमान चुकलं नाहीं. पण या योजनेचा या सहा-सात वर्षांत केवढा प्रचंड व्याप वाढला आहे याची कल्पना आहे तुम्हांला? या योजनेंत १९,५०० पेक्षां अधिक डॉक्टर काम करीत आहेत हें तर झालंच, पण गेल्या वर्षी सुमारें ४ कोटी ३० लक्ष लोकांनीं (म्हणजे लोकसंख्येच्या ९६ टक्के) निरनिराळ्या डॉक्टरांकडे रोगी म्हणून आपलीं नांवें नोंदविलीं, ९३ लक्ष लोकांनीं आपले दांत आणि ४४ लक्ष लोकांनीं डोळे तपासून घेतले आणि त्यांपैकीं ३९ लक्ष लोकांना चष्मे पुरविण्यांत आले! पांच वर्षांखालील १३ लक्ष मुलांची काळजी हेल्थ व्हिजिटर्सनीं घेतली. रोग्यांना दवाखान्यांत आणण्यासाठीं स्थानिक संस्थांनीं ३८९६ अँब्युलन्स गाड्या ठेवलेल्या आहेत, व त्यांतून सुमारें १ कोटि ३६ लक्ष रोगी नेण्यांत आले व त्यासाठीं या गाड्या एकंदर सुमारें ९ कोटि ८७ लक्ष मैल फिरल्या!

आणि तरीहि ही योजना यशस्वी झाली नाहीं अशी टीका मधून मधून ऐकूं येते. ती पाहिली कीं मनुष्यस्वभावाची मोठी गंमत वाटते, नाहीं? अर्थात् कितीहि सवलती माणसाला उपलब्ध करून दिल्या तरी तो असंतुष्ट राहावा यांत नवल नाहीं, परंतु मनुष्याला केवळ औषधोपचारासाठीं पैसा नाहीं म्हणून रोगग्रस्त राहण्याचा प्रसंग त्याच्यावर येऊं नये अशी दक्षता या योजनेनं खास घेतली आहे. आपणाला अमुक एक डॉक्टर नको असेल किंवा डॉक्टरला अमुक एक रोगी नको असेल तर दुसरा डॉक्टर निवडता येतो. त्यामुळं ही योजना म्हणजे एक पोलादी चौकट आहे या टीकेंत कांहींच अर्थ उरत नाहीं. औषधोपचारासाठीं जे पैसे द्यावे लागतात ते नाममात्र आहेत हें प्रत्येक प्रिस्क्रिपशनसाठीं सरासरी खर्च सुमारें सव्वाचार शिलिंग होत असतांना फक्त एक शिलिंग घेतला जातो यावरून सहज दिसून येईल. इतकंहि करून ज्यांना येवढा आकार देणंहि कठीण होईल त्यांना ते पैसे परत मिळण्याची तरतूज आहेच!

तथापि, इथं केवळ आजारी पडल्यानंतर औषधोपचाराचीच तेवढी सोय आहे असं नव्हे. मनुष्य आजारी पडला तर त्याची कमाई बंद होते, मग त्या वेळीं काय करायचं हा या मोफत औषधोपचारापेक्षाहि अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. मनुष्य

नोकरी नसल्यामुळं बेकार झाला, आजारीपणांत त्याची कमाई थांबली, प्रसूतीमुळं स्त्री नोकरीवर जाऊं शकली नाहीं तर काय करायचं हा प्रश्न त्यापेक्षां अधिक मूलगामी आहे. म्हणूनच मनुष्याला मनुष्य म्हणून जगतां यावं यासाठीं त्याच्या प्राथमिक गरजा प्रथम कशा भागतील याची काळजी कल्याणकारी राज्याच्या शिल्पकारांनीं इथं कशी घेतली आहे तें खरंच पाहण्यासारखं आहे.

तुमचा,

वि. बा. पत्की

: १४ :

# इंग्लंडांतील कल्याणकारी राज्य—२

★

६, सॉंडर्स ग्रव्ह,
लंडन (डब्ल्यू. ११)
१ मार्च, १९५६

प्रिय बाळासाहेब,

ब्रिटिश सरकारनं राष्ट्रीय आरोग्य योजना सर्व देशाला लागू केल्यामुळं देशांतील प्रत्येक माणसाला जवळजवळ मोफत सर्व प्रकारचे औषधोपचार मिळण्याची सोय झाली खरी, परंतु तेवढ्यानं सारे प्रश्न सुटले असं नव्हे. या योजनेमुळं रोग होऊं नये म्हणून प्रतिबंधक औषधं देण्याची सोय झाली, मनुष्य आजारी पडला तर त्याला कितीहि महाग किंमतीचं औषध असलं तरी तें मिळूं लागलं, तो आजारांतून उठल्यानंतर चांगला बरा होईपर्यंत त्याची शश्रूषागृहांत ठेवण्याची सोय झाली, पण हें सारं होऊनहि तो संपूर्णपणें सुखी झाला असं म्हणतां येईल काय? मनुष्य निरोगी असला आणि तो आजारी पडला नाहीं म्हणजे तो पूर्ण सुखी आहे असं थोडंच आहे? कारण असं समजा, कीं औषधोपचार मिळण्याची सोय झाली, आणि त्याला पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र मिळण्याचीच वानवा असेल तर स्वतःच्या निरोगी शरीरापेक्षां भुकेलेल्या पोटाकडे आणि थंडीवाऱ्यानं कुडकुडणाऱ्या शरीराकडेच त्याचं लक्ष अगोदर जाईल. पोटभर आणि सकस अन्न, संरक्षण देणारे कपडे आणि राहायला लागणारं घर या माणसाच्या मूलभूत गरजा आहेत. म्हणूनच त्या त्याला प्रथम मिळण्याची सोय करणं ही गोष्ट त्याच्या शरीरस्वास्थ्याची काळजी घेण्याइतकीच महत्त्वाची आहे. किंबहुना हे सर्वच प्रश्न एकमेकांशीं इतके निगडित आहेत, कीं एकाची मर्यादा कुठें संपली आणि दुसऱ्याचं क्षेत्र कुठें सुरू झालं हें सांगतां यायचं नाहीं, म्हणूनच कल्याणकारी

राज्याची कल्पना मूर्त स्वरूपांत आणणाऱ्यांनीं हे सर्व प्रश्न हळूहळू सोडवू असं न म्हणतां हे सर्व प्रश्न परस्परावलंबी आहेत हें ओळखून व त्यांचा एकदमच विचार तें करून सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला असं म्हणणंच योग्य होईल.

आजारीपणांत मनुष्याच्या औषधोपचारांची सोय करणं हें खऱ्या कल्याणकारी राज्यसत्तेचं एक आवश्यक कर्तव्य असतंच, पण त्याचा विकास कोणत्याहि कारणानं खुरटणार नाहीं हेंहि पाहणं आवश्यक असतं. त्यांतून पाश्चिमात्य जीवन हें शास्त्रीय शोधामुळं आणि त्यांनीं घडवून आणलेल्या औद्योगिक क्रांतीमुळं इतकं अस्थिर झालं आहे, कीं आर्थिक संकटांना तोंड देण्याची कांहीं ना कांहीं योजना समाजजीवनांत असणं हें समाजस्वास्थ्याच्या दृष्टीनंच आवश्यक झालं आहे. जोंपर्यंत मनुष्य काम करूं शकतो तोंपर्यंत त्याला मजुरी मिळूं शकते, त्याचा व त्याच्या कुटुंबाचा चरितार्थ चालतो, परंतु तो आजारी पडला आणि त्याला आपल्या कामावर जातां आलं नाहीं तर त्याचा चरितार्थ कसा चालायचा? त्यानं आणि त्याच्या कुटुंबियांनीं काय भुकेनं तडफडून मरावं? तो ज्या कारखान्यांत नोकरी करतो तिथं संप झाला तर त्याची चूल पेटणार कशी? मालक, भांडवल-शाही किंवा सत्ताधारी यांच्याविरुद्ध त्यानं संपाचं हत्यार उचललं म्हणून काय त्याचा संसारच उधळला जावा? तो कामावर जायला असमर्थ झाला, बेकार झाला, त्याला वृद्धत्व आलं, त्याला कामावर असतांना किंवा इतरत्रहि अपघात झाला तर त्यानं काय करायचं? एखादा मनुष्य ऐन तारुण्यांत मृत्यूवश झाला तर त्याच्या विधवा पत्नीनं काय जन्मभर नुसतं रडतच बसावं किंवा भिक्षापात्र अवलंबून लाजिरवाणं जिणं जगावं? त्याच्या मुलांचं काय व्हायचं? नोकरी करणारी स्त्री प्रसूतिपूर्व व प्रसूत्युत्तर कालांत नोकरीवर जाऊं शकली नाहीं तर तिची व्यवस्था कुणी करायची? हे सारे प्रश्न सामाजिक जीवनाचा विचार करणाऱ्या विचारवंतांचं मन व्यग्र करण्याइतके खचित महत्त्वाचे आहेत आणि इंग्लंडांतील विचारवंतांनीं या प्रश्नांकडे खरोखरच आज अनेक वर्षं लक्ष दिलं आहे. त्यामुळं मनुष्य जिवंत असतानांच नव्हे तर मृत्यूनंतरही त्याच्या और्ध्वदैहिकाची व्यवस्था व्हावी अशी व्यवस्था सरकारनंच केली आहे!

मात्र हें सारं यदृच्छया किंवा एका रात्रींत घडून आलं असं समजूं नका. त्याच्या पाठीमागं प्रथम विस्कळीत स्वरूपाची आणि नंतर सूत्रबद्ध अशी योजना होती. समाजांतल्या दीनदुबळ्यांकडे दयार्द्र बुद्धीनं पाहणारा धर्म या कामांत अग्रभागीं होता हें स्वाभाविकच आहे, पण पंधराव्या आणि सोळाव्या शतकांत गरिबांच्या

विषयीं कायदे ( Poor Laws ) झाले त्यांची अंमलबजावणीहि चर्चच्या मार्फतच झाली. तथापि हे उपायहि पुढें अपुरे वाटूं लागल्यामुळें १८३० सालीं या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं सरकारनें एक रॉयल कमिशन नेमलं. या कमिशनमध्यें एडविन चॅड्विक नांवाची एक अतिउत्साही आणि समाजहिताबद्दल विलक्षण जागरूक असणारी व्यक्ति होती. या कमिशनच्या कामकाजावर चॅड्विकची विलक्षण छाप पडली आणि त्या कमिशननं सुचविलेले मार्ग जरी फारसे लोकप्रिय झाले नाहींत आणि स्वतः चॅड्विकला विरोधाच्या वावटळीला तोंड द्यावं लागलं तरी या प्रश्नाला नवी गति देण्याचं काम या कमिशननं निःसंशय केल. या प्रश्नाकडे लोकांचं लक्ष एकदां वेधल्यामुळं राज्यकर्त्यांनाहि तिकडे दुर्लक्ष करणं कठीण होऊन बसलं आणि पुढें पुढें तर हा प्रश्न एखादं मंत्रिमंडळ कसं हाताळतं यावरच तें टिकायचं कीं त्याची इतिश्री व्हायची असं होऊन गेलं! इंग्लंड हा मुख्यतः उद्योगधंद्यांचा देश असल्यामुळं अनेक वेळां मजुरांसाठीं केलेल्या कायद्यांच्या स्वरूपांत या वैचारिक क्रांतीला दृश्य स्वरूप येत गेलं, पण नंतर मात्र व्यक्तीचं दारिद्र्य हें केवळ व्यक्तीचं लांच्छन नसून तें दूर करणं ही अखेर समाजाचीच जबाबदारी आहे या विचारसरणीचं बीज समाजमनांत पेरलं गेलं.

चालू शतकाच्या सुरुवातीला नवविचारांचे जे वारे सर्वत्र वाहूं लागले होते त्यामुळें या प्रश्नाला नवी धार आली. केवळ गरिबांना मदत देणारे कायदे, त्यांच्यासाठीं क्वचित् मिळणारी रोख मदत किंवा काम करीत असतां मनुष्य जखमी झाला तर त्याला देण्यांत येणारी नुकसानभरपाई असल्या मलमपट्टयांनीं दारिद्र्याचा रोग बरा होणार नाहीं हें ओळखून ज्या कारणांनीं दारिद्र्य निर्माण होतं, आणि ज्यामुळं मनुष्याचं शरीर आणि मन दुबळं होतं तीं कारणं नाहींशीं करण्याकडे विचारांचा ओघ वळला. प्रत्येकाला काम मिळालंच पाहिजे आणि मिळालं नाहीं तर बेकारीच्या काळांत त्याचा योगक्षेम चालेल अशी व्यवस्था समाजानं केली पाहिजे, या विचारसरणीवर जेव्हां विचारवंत आले तेव्हां राजकीय क्षेत्रांत त्याचे पडसाद उमटल्यावांचून राहिले नाहींत. याच काळांत राजकीय क्षितिजावर उगवलेले लॉईड जॉर्ज किंवा विन्स्टन चर्चिल यांनीं या बदलत्या काळाचीं पावलं ओळखलीं आणि लॉईड जार्ज यांनीं सर्व वृद्धांना केवळ ते वृद्ध आहेत याच कारणासाटीं पेन्शन मिळणं आवश्यक आहे अशी मोहीम सुरू केली, तर चर्चिल यांनीं ज्यांना काम पाहिजे आहे त्यांना तें मिळावं म्हणून 'लेबर

एक्सचेंज' ( Labour Exchange ) निर्माण केली. तथापि १९११ सालीं पास झालेल्या राष्ट्रीय विमा कायद्या ( National Insuracce Act ) नं एक नवं युगच निर्माण केलं असं म्हणावं लागेल. या कायद्यानं वैद्यकीय मदतीबरोबरच बेकारीच्या काळांत वेतन मिळण्याची सोय केली आणि पुढें ३०–३५ वर्षांनीं होणाऱ्या सर्वांगीण विकासाचा पाया घातला. लाईड जॉर्ज यांनीं तर बेकारीच्या काळातील तरतुदीसाठीं प्रत्येक कामगाराला आठवड्याला जे चार पेन्स भरायचे होते त्यांत मालक तीन पेन्स व सरकार दोन पेन्स घालील व अशा रीतीनं कामगारानं भरलेल्या चार पेन्सांमुळं त्याला नऊ पेन्स परत मिळतील असं नुसतं घोषितच केलं नाहीं, तर 'चार पेन्सला नऊ पेन्स' हें त्यांचं निवडणुकींतलं घोषवाक्यच झालं ! पण त्यानंतर लवकरच जें पहिलं महायुद्ध झालं त्यानं सारंच पारडं फिरवलं. युद्ध काळांत भरपूर नोकऱ्यांचं पीक आलं आणि कोणाची उपासमार होण्याचा प्रश्न उरला·नाहीं. उलट बेकारीच्या काळांत आपली तरतूद व्हावी म्हणून प्रत्येक कामगार जो हप्ता भरीत असे त्यांतला कांहींच खर्च न झाल्यामुळं हा फंड सुमारें ३०–३५ कोटी रुपयांइतका साठला !

पण युद्धानंतर पुन्हा मंदीचा काळ आला आणि कोणत्याहि पक्षाचं मंत्रिमंडळ आलं तरी देशांतल्या वाढत्या बेकारीला तोंड देणं कठीण होऊन बसलं. कायद्यांत अनेक बदल करूनहि फारसा उपयोग होण्याचीं चिन्हं दिसेनात आणि आरोग्य व बेकारी यांच्या योजना पार पाडायच्या तर देशाच्या आर्थिक शक्तीवर विलक्षण ताण पडूं लागला. तथापि हळूहळू दुसऱ्या महायुद्धाची चाहूल लागूं लागली तसे सारे हिशोब पुन्हा चुकणार असं दिसूं लागलं आणि प्रत्यक्ष युद्ध सुरू झाल्यावर हा सर्वच प्रश्न पुन्हा तपासून पाहणं जरुरीचं झालं. तेव्हां सरकारनं सर विल्यम् बिव्हरिज यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिशन नेमलं आणि हा सबंध सामाजिक स्थैर्या ( Social Security ) चा प्रश्नच नव्यानं हाताळला.

या कमिशनच्या शिफारशींतूनच पुढें मजूर मंत्रिमंडळानं राष्ट्रीय विमा योजना ( National Insuaance Scheme ) व राष्ट्रीय मदत योजना (National Assistance Scheme) अंमलांत आणण्यासाठीं पार्लमेंटांत एक बिल मांडलं आणि ५ जुलै १९४८ या दिवशीं ही नवी सर्वांगीण योजना प्रत्यक्ष अंमलांत आणली. या योजनेप्रमाणें प्रत्येक नागरिकाला संकटकालीं सर्व प्रकारची मदत मिळण्याची व्यवस्था तर झाली आहेच, पण हें सर्व हक्कानं. भीक किंवा दया म्हणून नव्हे ! बिव्हरिज यांच्या मूळ रिपोर्टांत या सर्व सुखसोयी आम्हांला हक्कानं

मिळाव्या, त्यासाठीं जरूर ते कर आम्ही आनंदानं देऊं असा लोकांनीं व्यक्त केलेला निर्धार ग्रथित करण्यांत आलेला आहे, म्हणून या योजनेप्रमाणें बालकापासून वृद्धापर्यंत सर्वांना सर्व प्रकारचं आर्थिक साहाय्य (याला साहाय्य म्हणणं हेंहि चूक आहे!) कसं मिळतं हे पाहणं खरंच मोठं गंमतीचं आहे.

राष्ट्रीय विमा योजनेचा फायदा मनुष्याला मिळतो तो स्वतः जन्माला येण्यापूर्वी! हें ऐकून मोठी गंमत वाटते, नाहीं? जन्माला येण्यापूर्वी योजनेचा फायदा मिळण्याची सोय झाली आहे याचा सरळ अर्थ असा, कीं प्रसूतीपूर्वी सुमारें तीन महिने अगोदर स्त्रीला प्रसूतीसाठीं जी मदत देण्यांत येते तिची मागणी करतां येते व तिनं किंवा तिच्या नवऱ्यानं जे ठरलेले विमा-हप्ते भरावयाचे असतात ते भरलेले असलेले कीं विनासायास ही मदत मिळते. स्त्री कामावर जात असेल तर योग्य वेळीं तिला आपली नोकरी सोडतां यावी व जन्माला येणाऱ्या बालकावर गर्भाशयांत कोणताहि ताण पडूं नये यासाठीं ही योजना आहे हें उघड आहे. त्याचप्रमाणें प्रसूतीनंतर तावडतोब तिनं कामावर जाणं धोक्याचं असल्यामुळं प्रसूतीनंतर सुमारें दोन महिने तिला ही मदत मिळून शिवाय स्त्री प्रसूत झाल्याबरोबर (किंवा जरूर तर थोडी अगोदरहि) तिला एका रकमेनं १० पौंड (म्हणजे सुमारें १३५ रुपये) मिळतात व प्रसूतिपूर्व व प्रसूत्युत्तर मदत म्हणून दर आठवड्याला २ पौंड (सुमारें २७ रुपये) मदत एकंदर १८ आठवडे याशिवाय तिला मिळते. मनुष्याला या जगांत प्रवेश करतांनाच शक्य तों निरनिराळ्या सुखसोयी उपलब्ध व्हाव्या या एकमेव हेतूनं प्रसूतिपूर्व व प्रसूत्युत्तर मदत देण्यांत किती दूरदृष्टि आहे हें सांगायला का हवं? जन्माला आलेलं मूल फार मोठ्या कुटुंबांत जन्माला आलं म्हणजे त्याची आबाळ होण्याची शक्यता नसते हें लक्षांत घेऊन कुटुंबांतील प्रत्येक मुलाला आठवड्याला ८ शिलिंग (सुमारें ६ रुपये) मिळण्याची सोय कायद्यानंच केली आहे. याला अपवाद एकच. पहिल्या किंवा एकुलत्या एक मुलाला तेवढी ही मदत मिळत नाहीं. (पहिलं मूल आईबापांचं लाडकं असतं म्हणून तर ही सवलत काढून घेण्यांत आलेली नाहीं?) मुलं सामान्यतः १५ वर्षें वयाचीं होईपर्यंत सर्व मुलांना ही मदत मिळते. दोन किंवा दोहोंपेक्षां अधिक मुलं असणाऱ्याला ही मदत मिळतेच, पण मूल दत्तक घेतलेलं असेल तरीहि ही मदत मिळते! विवाहबाह्य संबंधातून जन्माला आलेल्या मुलांच्या बाबतींत त्या मुलाच्या आईला ही मदत देण्यांत येते. तथापि ज्या मुलांचे आईबाप वारल्यामुळं तीं पोरकीं झालीं असतील त्यांना दर आठवड्याला इतर मुलांच्याप्रमाणें ८

शिलिंग न मिळतां १८ शिलिंग मिळतात आणि हीं मुलं एकाच पालकाकडे न राहतां निरनिराळ्या ठिकाणीं राहात असतील तरी त्या त्या पालकांना ही रक्कम देण्यांत येते. मुलं १५ वर्षांचीं होईपर्यंत ही मदत द्यायची हा नियम या पोरक्या मुलांनाहि लागू असतो.

स्त्री किंवा पुरुष आपलं शिक्षण आटोपलं कीं अर्थातच मिळेल ती नोकरी करण्यासाठीं प्रयत्न करतात. परंतु नोकरी करण्याची इच्छा असून आणि नोकरी करण्यासारखी शरीरप्रकृति सुदृढ असतांहि या व्यक्तीला नोकरी मिळत नसेल तर मजूर खात्यानं चालविलेल्या एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजमध्यें नांव नोंदवावं लागतं. तथापि नोकरी मधेंच सुटली आणि व्यक्ति बेकार झाली, कीं त्या दिवशींच त्याला एम्प्लॉयमेंट एक्सचेंजमध्यें आपण बेकार आहों हें कळविल्यापासून बेकारी-साठीं मिळणारी मदत मिळूं लागते. अर्थातच नोकरीवर असतांना त्यानं ठरलेले विम्याचे हप्ते भरलेले असले पाहिजेत हें उघड आहे. या बेकारीच्या काळांत त्या व्यक्तीला किती मदत मिळायची हे आंकडे थोडेफार बदलत असतात, परंतु सध्यां बेकार असलेल्या व्यक्तीला आठवड्याला दोन पौंड मिळण्याची सोय आहे. घरांतील १८ वर्षांखालच्या मुलांमुलींच्यासाठीं या काळांत दर आठवड्याला २३ शिलिंग, कुटुंबांत अवलंबून असलेल्या प्रौढ व्यक्तीसाठीं २५ शिलिंग याप्रमाणें मदत सध्यां मिळते. त्याचप्रमाणें आपलं काम करीत असतां व्यक्ति आजारी पडून काम करायला असमर्थ झाली तरीहि आजारीपणाच्या काळांत याचप्रमाणें मदत मिळते. बेकारी आणि आजार यांच्या काळांत मिळणारी मदत सारखीच आहे. त्याशिवाय राष्ट्रीय आरोग्य योजनेमधून सर्व औषधो-पचार जवळ जवळ मोफत मिळण्याची जी सोय आहे तिचाहि फायदा घेतां येतो.

तथापि वैधव्य ही स्त्रीच्या जीवनांतील फार मोठी आपत्ति येते तेव्हां तिला मदत म्हणून बेकारी किंवा आजारीपण या कालांत मिळणाऱ्या मदतीपेक्षांहि अधिक मदत मिळते. पतीचं निधन झाल्यापासून पहिले तेरा आठवडे तिला दर आठवड्याला ५५ शिलिंग याप्रमाणें मदत देतात, तिच्या मुलांना नेहमीं मिळ-णाऱ्या मदतींत वाढ करतात आणि या तेरा आठवड्यांनंतर कांहीं काल आपल्या मुलांची पालनकर्त्री म्हणून तिला दर आठवड्याला ५१॥ शिलिंग मिळतात. यानंतर पुढें मात्र तिला दर आठवड्याला २ पौण्ड मिळूं लागतात. तथापि मूल नसणाऱ्या ५० वर्षांच्या आंतील विधवेला ही मदत १३ आठवड्यांची मुदत

संपल्यावर मिळत नाहीं. कारण त्या कालानंतर तिनं स्वतः नोकरी करून उपजीविका करावी, अशी अपेक्षा असते.

वार्धक्यांत जेव्हां मनुष्य कांहींही काम करावयास असमर्थ होतो तेव्हां समाजानं त्याची काळजी वाहिली पाहिजे, हें तत्त्व इंग्लंडांत १९०८ सालापासूनच मान्य करण्यांत आलं आहे. ज्यांनीं आपल्या श्रमानं (आणि पुष्कळ वेळां कमी वेतन घेऊन) राष्ट्राची संपत्ति निर्माण केली त्यांचं ऋण समाजानं मानलंच पाहिजे हें लोकांना पटलं, तेव्हां प्रथम ज्यांच्या वयाला ७० वर्षे पूर्ण झालीं होतीं त्यांना आठवड्याला ५ शिलिंग द्यावे असं १९०८ सालीं ठरविण्यांत आलं होतं. ही रक्कम अर्थातच फार कमी होती. पण ती वृद्धांच्या ऋणाला समाजानं मान्यता दिल्याची द्योतक होती आणि म्हणून तिला ऐतिहासिक महत्त्व आहे. पुढें १९२० सालीं ती मदत दुप्पट करण्यांत आली व सध्यां आठवड्याला दोन पौंड मिळतात. मात्र आतां वार्धक्य याचा अर्थ पुरुषाच्या बाबतींत ६५ वर्षे आणि स्त्रीच्या बाबतींत ६० वर्षे असा मानण्यांत येतो. याचा अर्थ ६५ वर्षांनंतर प्रत्येक पुरुषाला व ६० वर्षांनंतर प्रत्येक स्त्रीला त्यांनीं ठरलेले विम्याचे हप्ते भरले असल्यास आठवड्याला दोन पौंड मिळतात असा आहे.

आणि यानंतरहि अखेरची मदत मिळते ती स्वतःच्या मृत्यूनंतर! मनुष्य मृत्यु पावल्यानंतर त्याच्या और्ध्वदेहिकासाठीं राष्ट्रीय विमा योजनेंतून, और्ध्वदैहिकाची सर्व कृत्यं करणाऱ्याला एका रकमेनं २० पौण्ड मदत देण्यांत येते. तीन वर्षांच्या आंतील मुलाच्या मृत्यूबद्दल ६ पौण्ड, ३ ते ५ वर्षांतील मुलाबद्दल १० पौण्ड व ६ ते १७ वर्षांच्या मुलाबद्दल १५ पौण्ड याप्रमाणें मदत देण्यांत येते.

पण राष्ट्रीय विमा योजनेखालीं ज्यांना मदत मिळूं शकत नाहीं असेहि कांहीं लोक असणार, हें उघड आहे. तेव्हां त्यांची सोय कशी करतात असं तुम्ही विचाराल. समाजांतले अपंग, अंध, दुबळे किंवा अग्नि, जलप्रलय किंवा अशाच निसर्गकोपाला बळी पडलेले निराश्रित यांच्याकडे लक्ष पुरविण्याची खबरदारीहि राष्ट्रीय मदत मंडळ (National Assistance Board) या नांवाची एक स्वतंत्र संघटना निर्माण करून सरकारनं घेतली आहे.

अशा रीतीनं बालपणांत, तारुण्यांत, वार्धक्यांत, वैधव्यांत, इतकंच काय पण मृत्यूनंतरहि मदत मिळण्याची सोय राष्ट्रीय विमा योजनेनं केली आहे. या मिळणाऱ्या पैशाला 'मदत' असं जरी म्हणण्यांत आलं तरी वस्तुतः ती मदत

नाहीं, ही गोष्ट या योजनेचं नांवच राष्ट्रीय 'विमा' योजना असं आहे यांत स्पष्ट झाली आहे. कुणी म्हणेल, इतक्या अनेक तऱ्हेची मदत जवळ जवळ प्रत्येक नागरिकाला गरजेच्या वेळीं मिळते तर यासाठीं या सर्व योजनेला खर्च तरी केवढा अवाढव्य येत असेल, नाहीं? 'मदत' या शब्दांतून हा भ्रम निर्माण होतो खरा, पण ही 'मदत' मिळावी यासाठीं प्रत्येक मिळवत्या व्यक्तीला यासाठीं दर आठवड्याला हप्ते भरावे लागतात ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे हें कोडं सहज उलगडेल. आपल्या आपत्कालीं आपण निराधार होऊं नये म्हणून प्रत्येकानं स्वतःची सोय या योजनेनं केली आहे म्हणा ना!

पण तसं कशाला? या योजनेसाठीं गेल्या वर्षी किती पैसे जमले याचा हिशोबच सांगतों तुम्हांला. या योजनेप्रमाणें प्रत्येक व्यक्तीनं आपला ठरलेला हप्ता भरला, त्यांत ज्याच्याकडे नोकरी करायची त्या मालकानं आपला हिस्सा दिला आणि सरकारनं आपला वांटा दिल्यानंतर जी रक्कम एकत्र झाली ती रक्कम म्हणजेच हा राष्ट्रीय विमा निधि. या निधींतूनच मग जरूर असेल त्याप्रमाणें मदत मिळायची असते. प्र येक मिळवऱ्या स्त्री पुरुषानं किती हप्ता भरायचा हें वेळोवेळीं जाहीर केलं जातं. सध्यां नोकरींत असलेल्या ज्या पुरुषाला या योजनेचा फायदा हवा असेल त्यानं दर आठवड्याला ६ शिलिंग ९ पेन्स भरले कीं त्याचा मालक (नोकरी करणारी व्यक्ति सरकारी नोकर असेल तर सरकार) दर आठवड्याला ६ शिलिंग भरतो आणि सरकार त्यांत २ शिलिंगांची दर आठवड्याला भर घालतं. अशा रीतीनं प्रत्येक पुरुष नोकराचे दर आठवड्याला १४ शिलिंग ९ पेन्स या योजनेंत जमा होतात. तर स्त्रीच्या बाबतींत ही रक्कम १२ शिलिंग होते. गेल्या वर्षी अशा रीतीनें ४८ कोटि पौंड इतकी रक्कम हप्त्यांच्या रूपानं जमा झाली. त्यांत सरकारनं आपला वांटा म्हणून ७ कोटि पौंड दिले. अशा रीतीनं जी रक्कम एकत्रित झाली तिच्यांतून निरनिराळ्या प्रकारची 'मदत' गरजू लोकांना मिळाली. ही मदत मिळण्यासाठीं, मदत मिळण्याची अपेक्षा करणारानं ठराविक हप्ते भरलेले असले पाहिजेत हा नियम अर्थातच आहे. उदाहरणार्थ, वार्धक्यामुळं पेन्शन मिळण्यासाठीं त्या व्यक्तीनं १५६ हप्ते तरी भरलेले असले पाहिजेत, प्रसूतीची मदत मिळण्यासाठीं स्त्रीनं निदान २६ हप्ते तरी भरलेले असले पाहिजेत इत्यादि नियम आहेत, पण हा सारा तपशीलाचा भाग आहे.

ही योजना अत्यंत कार्यक्षम व्हावी याची दक्षता मात्र कटाक्षानं घेण्यांत आली

आहे. कारण गरजेच्या वेळीं मदत मिळाली नाहीं तर काय उपयोग? हिंवाळ्यांत गरम कपडे घेण्यासाठीं मागितलेली मदत एखाद्याला उन्हाळ्यांत मिळाली तर मदत मिळूनहि योजना निष्फळ झाली असंच म्हणावं लागेल. म्हणूनच या योजनेसाठीं ठिकठिकाणीं ९०० कचेऱ्या उघडण्यांत आलेल्या आहेत व त्या ठिकाणीं प्रत्येक योजनेची संपूर्ण माहिती मिळूं शकते. लोकांच्या अडचणींचा नेहमीं सहानुभूतीनं विचार व्हावा या धोरणानं या कचेऱ्यांचा कारभार चालतो. कारण अडचणीच्या वेळीं पैशाइतकीच या सहानुभूतीचीहि आवश्यकता असते. नियमाप्रमाणें मिळणारी मदत तावडतोब 'ड्रॅफ्ट'नं दिली जाते व हे ड्रॅफ्ट कोणत्याहि पोस्टांत वटवितां येतात. बेकारीच्या वेळीं मिळणारी मदत एम्प्लॉयमेंट एक्सचेंज मधूनहि देण्याची व्यवस्था केली जाते. या योजनेच्या मुख्य कचेरींत ७,००० नोकर काम करतात यावरून तिच्या व्यापाची कल्पना करा. या योजने-प्रमाणें विमा उतरलेल्या सुमारें अडीच कोटी लोकांचीं कार्डें या कचेरींत ठेवण्यांत आलीं आहेत व प्रत्येकानं आपला हप्ता भरला कीं त्याची नोंद या कार्डांवर तावडतोब होते. प्रत्येक व्यक्तीचं हें रेकॉर्ड अद्यावत् ठेवणं अत्यंत आवश्यक असतं. कारण, कोणत्या व्यक्तीला कोणत्या मदतीची केव्हां गरज लागेल हें अगोदर थोडंच कळणार आहे?

कल्याणकारी राज्यांत लोकहिताच्या अनेक योजना असतात. इंग्लंडांतहि तशा आहेत. राष्ट्रीय आरोग्य योजनेनं मनुष्याला सर्व प्रकारचे औषधोपचार विनामूल्य मिळतात आणि याचा सर्व खर्च सरकारच्या तिजोरींतून होतो. उलट, राष्ट्रीय विमा योजना ही बव्हंशीं लोकांनीं स्वखुषीनं भरलेल्या व सरकारनं त्यांत भर घात-लेल्या रकमेंतून चालते. तथापि, राष्ट्राचं मोठेपण टिकवायचं आणि वाढवायचं असेल तर येवढं करूनहि पुरे होत नाहीं. राष्ट्र मोठं होतं तें माणसांनीं. केवळ मोठ्या इमारतींनीं, मोठ्या रस्त्यांनीं, मोठ्या हॉस्पिटलांनीं, मोठ्या विमानांनीं, मोठ्या सैन्यानं राष्ट्र मोठं होत नाहीं. तेव्हां कर्तबगार माणसांचा पुरवठा देशाला सदैव होत राहील अशी योजना करण्यांतच राष्ट्रधुरीणांचं खरं कौशल्य! झाडांवर फुलं फुललीं, कीं त्यांच्या सुगंधानं आसमंत दरवळून जातं. देशाचंहि तसंच आहे. देशाची कीर्ति आणि वैभव वाढविणाऱ्या मोठ्या माणसांची वाण इंग्लंडला कधीं पडली नाहीं असा या देशाचा इतिहास आहे आणि याला कारण जर कोणतं असेल तर मुख्यतः इथली शिक्षणव्यवस्था. तेव्हां ती जास्तींत जास्त कार्यक्षम कशी होईल आणि सामान्यांतल्या सामान्य माणसाच्या मुलालाहि शिक्ष-

णाचे सर्व फायदे मिळून त्याच्या सुप्त शक्तींचा विकास होईल अशी व्यवस्था कल्याणकारी राज्याच्या प्रवर्तकांनीं केवढ्या नमुनेदारपणें केली आहे तेंहि आपण समजावून घेणं आवश्यक आहे असें नाहीं तुम्हांला वाटत ?

तुमचा,

वि. वा. पत्की

: १५ :

# इंग्लंडांतील कल्याणकारी राज्य—३

★

६, सॉंडर्स ग्रव्ह,
लंडन (डब्ल्यू. १)
१६ मार्च, १९५६

प्रिय बाळासाहेब,

आपल्याकडे शाळेचं वार्षिक संमेलन किंवा बक्षिस समारंभ असला, कीं अध्यक्ष म्हणून जी व्यक्ति बोलावलेली असते, ती आपलं अध्यक्षीय भाषण करतांना समोर मांड्या दुमडून बसलेल्या मुलामुलींचा उल्लेख 'राष्ट्राचे भावी आधारस्तंभ', 'राष्ट्रमातेचे सुपुत्र आणि सुकन्या' इत्यादि शब्दसमुच्चयांनीं नेहमीं करते, खरं ना ? हें वर्णन कोणत्याहि अर्थानं चूक किंवा अतिशयोक्त आहे असं मी मुळींच म्हणत नाहीं. पण हीं चिमुरडीं मुलं राष्ट्राचे भावी आधारस्तंभ व्हावे अशी दक्षता समाज खरोखरच घेतो काय ? राष्ट्राची उगवती पिढी तेजःपुंज होईल अशी काळजी समाज वाहतो काय ? आणि हीं मुलं सुपुत्र आणि सुकन्या या पदवीला पात्र व्हावीं अशी कोणती व्यवस्था समाज करतो, हा खरोखरच विचार करण्यासारखा प्रश्न आहे. आपला देश पारतंत्र्यांत होता तेव्हां या शब्दांचे अर्थ केवळ लाक्षणिक होते, पण आतां स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आजचीं मुलं उद्यां खरोखरच राष्ट्राची धुरा वाहणार आहेत आणि देशाला लागणारे राजकीय पुढारी, शास्त्रज्ञ, इंजिनियर, कवी, तत्त्ववेत्ते या मुलांमुलींतूनच निर्माण होणार आहेत हें लक्षांत घेतलं म्हणजे मृत्तिकेचं कवच फोडून बाहेर पडलेल्या कोंबाची जोपासना चतुर माळी जेवढ्या दक्षतेनं करतो त्यापेक्षांहि अधिक तत्परतेनं या मानवी अंकुरांचं संगोपन केलं पाहिजे, हें उघड आहे. जीं राष्ट्रं मोठीं झालीं आणि मानवी इतिहासाला ज्यांनीं वळण लावलं त्यांनीं आपल्या मुलांची काळजी खरो-

खरच मोठ्या परिश्रमानं घेतलेली होती, याची साक्ष कोणत्याहि मोठ्या देशाचा इतिहास देईल. देशाची उंची वाढविणारीं मोठीं माणसं हीं सद्ग्रंथांप्रमाणेंच योगायोगानं निर्माण होतात हें कितीहि खरं असलं तरी देशांतल्या प्रत्येक माणसाला मोठेपण मिळण्याची संधि देणं राष्ट्रधुरीपणांचं कर्तव्य असतं. खाणींतले सगळेच 'खडे' कोहिनूर होणार नाहींत, पण प्रत्येक खड्यावर संस्कार झाल्यावरच हें कळणार ना? यासाठींच प्रत्येक मुलामुलीला शिक्षणाची जास्तींत जास्त संधि देणं हें कल्याणकारी राज्यांत तरी अत्यंत आवश्यक असतं.

इंग्लंडांत अशी संधि प्रत्येक व्यक्तीला मिळेल असा सारा शिक्षणक्रमच आंखण्यांत आला आहे. देशांतला प्रत्येक नागरिक सुसंस्कृत आणि कर्तृत्वसंपन्न झाला तरच अखेर राष्ट्र मोठं होतं हें लक्षांत घेऊन निदान प्रत्येक व्यक्तीला वाचन (Reading), लेखन (Writing) व अंकगणित (Arithmetic) यावं असा सक्तीच्या शिक्षणाचा कायदा इथं १८७० सालींच झाला. त्यामुळं एकोणिसाव्या शतकाच्या अखेरी पूर्वींच प्राथमिक शिक्षण सर्वांना सक्तीनं आणि तेंहि मोफत मिळण्याची सोय झाली. याचा परिणाम सर्व सामाजिक जीवनावर आपोआप झाला. लिहितां वाचतां येऊं लागल्यामुळं वाचनाची अभिरुचि वाढत गेली आणि देशांत किंवा परदेशांत काय चाललं आहे याबद्दलची जिज्ञासा सामान्य माणसाच्या मनांत जागृत झाली. पण केवळ लिहितां वाचतां येणं (Three Rs) येवढंच ध्येय कोणी समोर ठेवलं नव्हतं. देशांतला प्रत्येक नागरिक सुबुद्ध झाला पाहिजे हा हेतु शिक्षणतज्ज्ञांनीं कधींहि दृष्टीआड होऊं दिला नाहीं, त्यामुळ १८७० सालीं पास झालेल्या सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्यांत वेळोवेळीं बदल होत गेले आणि आतां तर लहान मुला-मुलींना जें शिक्षण द्यायचं त्यामुळं त्यांचं बालपण आनंदांत जाऊन त्यांच्या जीवनाची सुरुवात मोठ्या उत्साहानं व्हावी, प्रत्येकाला आपल्या नैसर्गिक बुद्धिमत्तेचा विकास करण्याची संधि मिळावी आणि आपल्या राष्ट्राचा जो वारसा आपणाकडे आलेला आहे त्यापेक्षांहि अधिक मोठा वारसा भावी पिढ्यांना आपणाला ठेवायचा आहे अशी ईर्षा प्रत्येक मुलामुलीच्या मनांत रुजावी, अशी सोय शिक्षणव्यवस्थेनं आतां इथं केली आहे.

शिक्षणाच्या या नव्या व्याख्येमुळं शिक्षणाकडे पाहण्याचा सारा दृष्टिकोनच बदलून गेला आहे आणि केवळ लिहितां वाचतां (Three Rs) येणं हें शिक्षणाचं ध्येय आतां राहिलेलं नाहीं. प्रत्येकाचं वय (Age) कुवत (Ability) व कल (Aptitude) लक्षांत घेऊन त्याप्रमाणं त्याला शिक्षण मिळालं पाहिजे, असा नवा

दृष्टिकोन आतां आला आहे. म्हणजे पूर्वींची Three Rs ची कल्पना मागं पडली असून Three As ची कल्पना आतां रूढ झाली आहे. प्रत्येक मुलामुलीचा नैसर्गिक कल व बुद्धीची कुवत कळावी यासाठीं बौद्धिक चांचणी (Mental Test) घेण्याची व्यवस्था केलेली असते. त्यामुळं कोणती व्यक्ति कोणत्या शिक्षणक्रमाला उपयुक्त आहे याचा अंदाज सहज बांधतां येतो. थोडथोड्या कालखंडानंतर ही चांचणी घेतां यावी असेच शिक्षणक्रमाचे भाग पाडलेले आहेत: प्राथमिक शिक्षण हें ६ ते १० वर्षांपर्यंत असतं. या वेळीं मुलगे व मुली एकत्रच शिकतात. तथापि ही वयोमर्यादा ओलांडल्यानंतर त्या मुलामुलींनीं एकाच पद्धतीचं शिक्षण देणं किती इष्ट आहे हें बौद्धिक चांचणी घेऊन ठरविलं जातं आणि दुय्यम शिक्षणाला वयाच्या ११ व्या वर्षी सुरुवात होते तेव्हां मुलांना बौद्धिक शाळां (Grammar Schools) मध्यें किंवा व्यावसायिक शाळां (Technical shools) मध्यें पाठविण्यांत येतं. १९४४ सालच्या शिक्षणविषयक कायद्याप्रमाणें प्रत्येक मुलामुलीला हें दुय्यम शिक्षण सक्तीचें करण्यांत आलं आहे. प्रत्येक मुलगा-मुलगी या दोहोंपैकीं एका शाळेंत (याशिवाय तिसराहि Comprehensive shool नांवाचा प्रकार आतां रूढ होऊं लागला आहे) जातात व त्या ठिकाणीं त्याच्यासाठीं ५ वर्षांचा शिक्षणक्रम असतो. ११ ते १६ या वयांत मुलगे व मुली यांच्यासाठीं निरनिराळ्या शाळा असतात. सोळाव्या वर्षी पुन्हां त्यांना General Certificate of Education (Ordinary) या परीक्षेला बसावं लागतं. या सर्वच शिक्षणक्रमांत केवळ आपल्या उपजीविकेचं साधन म्हणून या शिक्षणक्रमाकडे न पाहतां भावी जीवनाची पूर्व तयारी या व्यापक दृष्टीनं पाहण्याची सवय विद्यार्थी-विद्यार्थिनींना लावली जाते. G. C. E. (Ordinary) परीक्षेंत विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यानंतर ज्यांना आपल्या व्यवसायाला सुरुवात करायची असेल त्यांना ती करतां येते, परंतु ज्यांना विश्वविद्यालयांतलं उच्च शिक्षण घ्यायचं असेल त्यांना मात्र G. C. E. (Advanced) किंवा G. C. E. (Scholarships) या परीक्षांसाठीं पुन्हा तयारी करावी लागते व वयाच्या १८ व्या वर्षी या परीक्षेला बसून त्यांत यश मिळालं तरच कॉलेजांत प्रवेश मिळूं शकतो. म्हणजे केवळ आर्थिक परिस्थिति अनुकूल आहे येवढ्यामुळं सामान्य बुद्धीचा मुलगा किंवा मुलगी इथं कॉलेजांत जाऊं शकत नाहीं, तर त्यासाठीं त्याला आपली बौद्धिक पात्रता अनेक तऱ्हेनं सिद्ध करावी लागते. त्यामुळं इकडे कॉलेजांत प्रवेश मिळणं ही गोष्ट अत्यंत कठीण झाली आहे. तथापि प्रत्येक मुला-मुलीला वयाच्या १६ व्या वर्षापर्यंतच दुय्यम शिक्षण घ्यावंच लागतं, तें सक्तीचं आहे.

मात्र हें सर्व शिक्षण सक्तीचं असलं तरी त्याचा भार पालकांवर मुळींच पडत नाहीं. सरकारच्या तिजोरींतूनच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा सर्व खर्च होतो. शाळेंत जाणाऱ्या मुलांना कोणत्याहि प्रकारची फी तर पडत नाहींच, पण विद्यार्थ्यांना लागणारीं पुस्तकं आणि इतर उपकरणं मोफत पुरविलीं जातात. याशिवाय शाळेंत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना आणखी किती तरी सवलती मिळतात. आठ आठ वर्षांच्या आंतील जीं मुलं दोन मैलांपेक्षां अधिक अंतरावर राहात असतील त्यांना शाळेंत नेण्या-आणण्यासाठीं मोफत वाहनं पुरविलीं जातात तर आठ वर्षांवरील मुलांना हें अंतर तीन मैलांपेक्षां अधिक असेल तर ही सवलत मिळते. ज्या ठिकाणी हीं वाहनं पुरविण्यांत आलेलीं नसतील तिथं मुलांना सार्वजनिक वाहनांचा (म्हणजे बस किंवा ट्रॅमचा) उपयोग करावा लागतो. त्यासाठीं पडणारं भाडं या मुलांना शिक्षण खात्याकडून मिळतं. त्याशिवाय ज्या विद्यार्थ्यांना बूट किंवा कपडे नसतील त्यांना ते पुरविले जातात. अगदीं गरीब मुलांना शाळेंत दुपारचं जेवण देण्याची व्यवस्था इंग्लंडांत या शतकाच्या सुरुवातीसच झाली, परंतु आतां १९४४ च्या शिक्षणविषयक कायद्यानुसार शाळेंत जाणाऱ्या सर्व मुलांना एक तृतीयांश पिंट दूध (सुमारें सव्वा कप) मोफत मिळतं तर दुपारचं जेवण अवघ्या ९ पेन्साना (म्हणजे आठ आण्याला) त्यांना शाळेंतच मिळतं. इकडच्या एकंदर राहणीचा विचार केला तर ९ पेन्स ही किमत मूळ किंमतीच्या जवळ जवळ एक तृतीयांशाइतकीच असते असं म्हणावं लागेल. तथापि ही किंमतहि एखाद्याची परिस्थिति नसेल तर अंशतः किंवा पूर्णपणें परत केली जाते. एकंदर विद्यार्थ्यांपैकीं निदान ४५ टक्के विद्यार्थी तरी शाळेंतील या दुपारच्या जेवणाचा आणि जवळजवळ ९९ टक्के मुलं दुधाचा फायदा घेतात असं दिसून आलं आहे. मिळणारं दूध आणि जेवण चांगलं असेल अशी दक्षता घेण्यांत येते. मुद्दाम तज्ञांकडून या जेवणाची व दुधाची तपासणी करण्यांत येते आणि तें स्वच्छ, सकस व ताजं आहे अशी खात्री करून नंतरच तें विद्यार्थ्यांना देण्यांत येतं.

पण साऱ्या शिक्षणक्रमांत खरी काळजी घ्यावी लागते ती ज्या मुलांची बौद्धिक पातळीच कमी असते त्यांची. सर्वसाधारण बुद्धिमत्तेचीं मुलं जो अभ्यासक्रम सहजगत्या पार पाडूं शकतात त्याचं अनेक मुलांना ओझं वाटूं लागतं आणि तें हलकं करण्यावर तर शिक्षणतज्ञांच्या चातुर्याची खरी कसोटी लागते. केवळ मुलाची शाळेंतील अभ्यासांत प्रगति होत नाहीं म्हणून तें मूल शिकण्यालाच

अपात्र असं म्हणणं म्हणजे त्या मुलाच्या भावी जीवनाशीं निर्घृण खेळ खेळण्यासारखं आहे. अभ्यासांत प्रगति दिसून येत नसेल तर त्याच्या जन्मसिद्ध आवडीनिवडी काय आहेत, त्याचा स्वाभाविक कल कोणत्या विषयाकडे आहे हें शोधून काढण्याचं काम शिक्षणतज्ञांचं आहे असं इकडे मानलं जातं आणि शिक्षणाबद्दलची गोडी ज्यामुळं मुलाच्या मनांत निर्माण होईल अशी व्यवस्था केली जाते. मुलांत —तीं कितीहि मंदबुद्धीचीं असलीं तरी—एक नैसर्गिक जिज्ञासाबुद्धि असते, ती अधिकाधिक जागृत कशी करायची आणि तिचं समाधान कसं करायचं हाच शिक्षणांतला खरा प्रश्न आहे. मुलाचं मन हें बंद केलेल्या पेटीसारखं आहे आणि त्यांत ज्ञान जबरदस्तीनं कोंबून ती पेटी भरायची आहे ही कल्पना आतां पार शिळी झाली आहे. म्हणूनच ज्या मुलांची बौद्धिक पातळी कमी आहे त्यांची काळजी विशेष परिश्रमानं इकडे घेतली जाते. त्याचप्रमाणं अंध, अधु दृष्टीचीं, बहिरीं, कमी ऐकूं येणारीं, नाजुक प्रकृतीचीं, शारीरिक विकृति असलेलीं, फिट येणारीं इत्यादि प्रकारचीं जीं मुलं असतात त्यांची खास काळजी घेणाऱ्या सुमारें ७०० शाळा इंग्लंडात आहेत. तरीहि त्या अपुऱ्या आहेत आणि या बाबतींत अद्याप आपणाला पुष्कळच प्रगति करायची आहे असं इकडचे शिक्षणतज्ञ आजहि मानीत आहेत. केवळ पालकाकडे ‘ तुमच्या मुलाला कांहीं सुद्धां येत नाहीं ’ अशी तक्रार शिक्षकानं केली म्हणजे त्याची जबाबदारी संपत नाहीं. मुलाचा नैसर्गिक कल आणि त्याची कुवत शोधून काढण्याच्या कामीं शिक्षक आणि पालक यांचं सहकार्य झालं तर त्या मुलाच्या शिक्षणाचा प्रश्न सुलभ होतो आणि जीवनाबद्दल एक नवी गोडी त्याला वाटूं लागते. म्हणून त्याच्या स्वाभाविक, विकसनशील प्रवृत्ति खुरटणार नाहींत, त्याला आपण अंधारांत चाचपडत आहोंत असं वाटणार नाहीं, अशी शिक्षणव्यवस्था करणं हें समाजाचंच कर्तव्य आहे ही भावना आतां इकडे दृढमूल झाली असं म्हणावयास हरकत नाहीं.

मुलाच्या बौद्धिक प्रगतीबरोबरच त्याच्या शारीरिक विकासाकडेहि शिक्षणसंस्था अत्यंत बारकाईनं लक्ष पुरवितात. देशाचे नागरिक म्हणून शाळेंतल्या मुलांना राष्ट्रीय आरोग्य योजने (National Health Service) चा फायदा मिळतोच. पण शाळेंत जाणाऱ्या मुलांची एक विशेष काळजी घेतली पाहिजे हें तत्त्व सरकारनं मान्य केलं असून राष्ट्रीय आरोग्य योजनेच्या जोडीला शालेय आरोग्य योजना (School Health Service) हि आंखण्यांत आलेली आहे. कांहीं रोग असे असतात कीं, अगदीं लहान वयांत त्यांच्याकडे योग्य वेळीं लक्ष दिलं तर

त्यांची वाढ होत नाहीं म्हणून ही उपाययोजना वेळींच व्हावी अशी व्यवस्था करण्यांत येते. विद्यार्थी शाळेंत असतांना त्याची वैद्यकीय तपासणी अनेक वेळां होते आणि मुलाच्या दातांची तपासणी तर मूल सहाव्या वर्षी शाळेंत आल्याबरोबरच करण्यांत येते.

मुलांना जें शिक्षण द्यायचं तें केवळ पुस्तकी असूं नये म्हणून निरनिराळ्या साधनांचा उपयोग केला जातो. इंग्लंडांत आठवड्यांतून पांचच दिवस शाळा असते आणि शनिवार-रविवार नेहमीं सुट्टी असते. याचा फायदा घेऊन विद्यार्थ्यांच्या ट्रिप्स नियमितपणें निघतात आणि शिक्षणसंस्थाच बव्हंशीं या ट्रिप्सचा खर्च सोसतात. यामुळं प्रत्यक्ष जीवनाशीं विद्यार्थ्यांचा अधिकाधिक संबंध येत जातो आणि जीवनाचा अर्थ त्यांच्या मनांत स्पष्ट होऊं लागतो. याशिवाय प्रत्येक शाळेंत रेडिओचा उपयोग मोठ्या प्रमाणावर केला जातो आणि निरनिराळे विषय अत्यंत मनोरंजक रीतीनं समजावून सांगण्यांत येतात. दर आठवड्याला ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन (B. B. C.) तर्फे ५० तरी शालेय कार्यक्रम होतात आणि त्यांचा फायदा २७००० पेक्षां अधिक शाळा घेतात. प्रत्येक वयाच्या मुलाला कोणत्या विषयांत गोडी वाटेल हें लक्षांत घेऊन हे कार्यक्रम आंखलेले असतातच. पण संगीत, काव्य, नाट्य यांच्याबद्दल विद्यार्थ्यांच्या मनांत विशेष आवड निर्माण व्हावी अशी खास योजना केलेली असते. भूगोल किंवा निसर्गविज्ञान (Nature Study) या विषयांचं ज्ञान खास तज्ञांच्याकडून मुलांना मिळण्याची व्यवस्था होते. याशिवाय प्रत्येक शाळेंत निरनिराळ्या विषयांवरचे शैक्षणिक चित्रपट तर नेहमींच दाखविले जातात आणि असे चित्रपट दाखविण्याची व्यवस्था प्रत्येक वर्गातच असते. काळ्या, जाड कापडांचे पडदे प्रत्येक वर्गाच्या प्रकाश आंत येणाऱ्या भागाच्या वर गुंडाळून ठेवलेले असतात. ते खालीं सोडले कीं वाटेल तेव्हां अंधार करतां येतो व वर्गातच चित्रपट दाखवितां येतात. त्या शिवाय मोठमोठे नकाशे किंवा मॉडेल्स! तथापि हें सारं अपुरं आहे अशी वाढती जाणीव शिक्षणतज्ज्ञांना होऊं लागली असून एकदोन वर्षांतच सर्व शाळांतून टेलिव्हिजनचा उपयोग करतां यावा असे प्रयत्न आतां सुरू झाले आहेत.

पण विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सर्व प्रकारें सोय केली म्हणजे हा प्रश्न संपला असं इकडे कोणी मानीत नाहीं. विद्यार्जनांत शिक्षण घेणाऱ्याइतकाच शिक्षण देणारा हाहि तितकाच महत्त्वाचा दुवा आहे. बालमन नेहमीं टवटवीत आणि

उत्साही ठेवण्याची जबाबदारी ज्याच्यावर सोंपविली जाते, त्याचं स्वतःचं मन नेहमीं ताजंतवानं आणि आनंदी असणं फार आवश्यक असतं हें ओळखून शिक्षणव्यवस्थेंत शिक्षकांनाहि हरप्रकारांनीं मदत केली जाते. ज्या शिक्षकांचीं मनं सांसारिक विवंचनांनीं ग्रासलेलीं असतील, आपल्या ज्ञानाबद्दलच जे साशंक असतील, जगाबद्दलच ज्यांचं स्वतःचंच ज्ञान अत्यंत तोकडं असेल ते मुलांच्या मनांत तीव्र ज्ञानलालसा निर्माण करतील अशी अपेक्षा करणं म्हणजे वाळवंटांत फुलांचा ताटवा बहरेल म्हणून वाट पाहण्यासारखंच आहे. यासाठींच शिक्षकाला राहायला चांगलं घर मिळेल यांपासून त्याचा योगक्षेम त्याच्या दर्जाला शोभेल अशा रीतीनं चालेल इतकं वेतनहि त्याला दिलं जातं. पण तसं नको. इकडे शिक्षकांना काय पगार मिळतो हेंच तुम्हांला सांगतों, म्हणजे याची नीट कल्पना तुम्हाला येईल. इकडे प्राथमिक शाळेंत शिक्षक नेमला गेला, कीं लगेच त्याला 'ट्रेनिंग' ला पाठविलं जातं. शिक्षक होण्यासाठीं आलेला उमेदवार १८ वर्षांचा व General Certificate of Education (आपल्याकडचा मॅट्रिक झालेला म्हणा ना क्षणभर!) ही परीक्षा पास झालेला असेल त्याला २ वर्षांचं ट्रेनिंग मिळालं कीं वार्षिक ४५० पौंड (महिना सुमारें ५०० रुपये) पगार मिळूं लागतो, तो दरसाल १८ पौंडांनीं (म्हणजे महिना सुमारें २० रुपयांनीं) वाढत वाढत ७२५ पौंडांपर्यंत (म्हणजे महिना सुमारें ८०० रुपयांपर्यंत) जातो. दुय्यम शाळेंत पदवीधर शिक्षक काम करूं लागतो तेव्हां त्याला ४५०-१८-७२५ हीच वेतनश्रेणी मिळते, पण तो पदवीधर असल्याबद्दल दरसाल ६० पौंड अधिक मिळतात. (तो 'ऑनर्स ग्रॅज्युएट' असेल तर दरसाल ९० पौंड अधिक मिळतात.) याशिवाय या शिक्षकांतून जे शाळाप्रमुख (Head master or Head mistress) होतात त्यांना त्या जागीं आल्याबरोबर दरसाल १०० पौंड अधिक मिळूं लागतात व पांच वर्षांत ही रक्कम क्रमाक्रमानं वाढत २५० पौंडांपर्यंत जाते. थोडक्यांत प्राथमिक शिक्षकाला सुरुवातीला दरमहा ५०० रुपये, दुय्यम पदवीधर शिक्षकाला ६०० रुपये व शाळाप्रमुखाला त्याच्या वेतनश्रेणीप्रमाणें जो पगार असेल तो अधिक शाळाप्रमुखाचा जादा पगार मिळून निदान १००० रुपये तरी कमींत कमी मिळतात. इंग्लंडांतील राहणीचं मान पुष्कळच महागाईचं आहे हें लक्षांत घेऊनहि ही वेतनश्रेणी शिक्षकाला सुखानं जगतां येण्याइतकी आणि शिक्षकाचं समाजांतलं स्थान ठरविण्याइतकी खचित चांगली आहे असं तुम्हांला नाहीं वाटत ? शिक्षकाला आपल्या विषयांचं भरपूर वाचन करतां यावं यासाठींहि उत्तेजन दिलं जातं आणि

खास शिक्षकांच्यासाठीं म्हणून दरसाल निदान २०० व्याख्यानं तरी लंडनसारख्या ठिकाणीं दिलीं जातात. याशिवाय शाळांतील शिक्षकांना परदेशांतहि शिक्षक म्हणून सरकारी खर्चानंच पाठविलं जात व परदेशांतील शिक्षकांची एक वर्षपर्यंत अदलाबदल (Interchange) केली जाते. या योजनेप्रमाणें दरसाल इंग्लंडांतील १०० शिक्षक अमेरिकेंत व ५० कॅनडांत जातात व तेवढेच शिक्षक तिकडून येऊन त्यांच्या जागेवर काम करतात. त्याशिवाय फ्रेंच, स्विस, जर्मन, स्पॅनिश भाषा शिकविणारे जे शिक्षक इंग्लंडांत काम करीत असतात त्यांना त्या त्या देशांत एक वर्ष त्या त्या भाषांत संभाषण करतां यावं म्हणून पाठविलं जातं व त्या देशांतील शिक्षक इंग्रजी भाषा शिकण्यासाठीं त्या मुदतींत इंग्लंडांत येतात. अशा रीतीनं ज्ञानाची देवाण-घेवाण अव्याहत सुरू असते.

इंग्लंडांतील साऱ्या शिक्षणसंस्था सर्वसामान्यपणें शिक्षणखातं चालवितं असं म्हटलं तरी प्रत्यक्ष जबाबदारी शिक्षणखात्यावर नसते. नैमित्तिक व्यवहाराच्या सोयीसाठीं ज्या स्थानिक संस्था (Local Government Authorities) असतात त्याच आपल्या शिक्षण संस्था चालवितात व त्यांना सरकारकडून मदत मिळते. म्हणजे समजा, मँचेस्टर येथें ज्या दुय्यम शाळा आहेत त्या मँचेस्टर बरोमार्फत चालविल्या जातात, उलट विश्वविद्यालयं हीं पूर्णपणें स्वतंत्र (autonomus) असतात व त्यांना सरकारी ग्रँट मिळते. तथापि विश्वविद्यालयांत प्रवेश मिळविणं ही गोष्ट इकडे फार कठीण असते. इथं विश्वविद्यालयांत प्रवेश मिळविण्यासाठीं उच्च दर्जाची बौद्धिक पात्रता ही एकच कसोटी आहे. इंग्लंडांत जीं एकंदर १४ विश्वविद्यालयं आहेत त्यांत.जगांतील जवळजवळ सर्व विषय, सर्व शास्त्रं, सर्व भाषा शिकविल्या जातात. कॉलेजांतील शिक्षकांनाहि आपल्या विषयांचं भरपूर वाचन व संशोधन करतां यावं म्हणून चांगलं वेतन दिलं जातं. कॉलेजांतील लेक्चररला वर्षाला कमीतकमी १००० पौंड (महिन्याला ११०० रुपये), तर प्राध्यापकाला वार्षिक २००० पौंड (महिना सुमारें २१०० रुपये) वेतन मिळतं. त्याशिवाय दर सहा वर्षांनीं एक वर्ष संशोधन किंवा वाचन करण्याकरितां भरपगारी रजा मिळते ती निराळीच!

विद्यार्थ्याला एकदां कॉलेजांत प्रवेश मिळाला कीं, केवळ आर्थिक परिस्थितीची अनुकूलता नाहीं यासाठीं कॉलेज सोडण्याचा प्रसंग कोणावरहि येत नाहीं. सरकारनं सर्व विश्वविद्यालयांत मिळून ३,२५० स्कॉलरशिप्स् ठेवलेल्या आहेत, त्याशिवाय प्रत्येक स्थानिक संस्थेकडे (Local Government) विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यासाठीं अनेक तऱ्हेचे फंड असतात. प्रत्येक स्थानिक संस्थेकडे असणाऱ्या या

शिष्यवृत्त्यांची संख्या ११,००० पर्यंत असते हें खरंसुद्धां वाटणार नाहीं कोणाला. याशिवाय विश्वविद्यालयांकडे निरनिराळ्या व्यक्तींनीं दिलेले मोठमोठे फंड असतात त्यांतूनहि हुषार विद्यार्थ्याला शिष्यवृत्ति मिळूं शकते. सारांश, एक बौद्धिक पात्रता असली, कीं कोणाहि विद्यार्थ्याला अत्युच्च पदवीपर्यंतचं सारं शिक्षग सहज मिळूं शकतं.

पांच कोटि लोकसंख्येच्या या देशांत प्राथमिक आणि दुय्यम शिक्षग आतां सक्तीचं झालं असल्यामुळं आज सुमारें ६८ लक्ष मुलं शाळांत व सुमारें ८४ हजार विद्यार्थी विश्वविद्यालयांत शिक्षग घेत आहेत आणि त्या सर्व शिक्षगासाठीं सरकारला जवळ जवळ ५० कोटि पौंड (सुमारें ७०० कोटि रुपये) खर्च येतो. म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्यासाठीं सरकार दरसाल सुमारें १००० रुपये खर्च करतं असं म्हणायला हरकत नाहीं. सारा शिक्षगक्रमच असा आंखण्यांत आलेला आहे, कीं प्रत्येकाला स्वतःच्या आवडीप्रमाणें शिक्षण मिळेल, पण कोणतं ना कोणतं तरी शिक्षग घेतलंच पाहिजे अशी सक्ति मात्र आहे. राष्ट्राची बौद्धिक पातळी वाढावी आणि जीवनांतील आनंद पूर्णांशानं उपभोगण्याची पात्रता सर्व-सामान्य नागरिकांतहि यावी हा हेतु या योजनेच्या पाठीमागं आहेच, पण उच्च शिक्षगांत सामान्य बुद्धिमत्तेच्या विद्यार्थ्यांची गर्दी होऊं नये अशी दक्षताहि घेण्यांत आली आहे. समाजांतल्या कोणत्याहि थरांत जन्माला आलेली व्यक्ति या शिक्षणपद्धतीमुळं स्वतःच्या कर्तबगारीवर अत्युच्च शिक्षणहि मिळवूं शकते आणि महत्पदावर जाऊं शकते. इंग्लंडला थोर लोकांची वाण कां पडत नाहीं या कोड्याचं उत्तर अल्पांशानं तरी या देशांतल्या शिक्षग व्यवस्थेंत आहे हा विचार सारखा माझ्या मनांत येतो आणि आपल्यालाहि जें कल्याणकारी राज्य निर्माण करायचं आहे त्याच्या निर्मितीसाठीं ब्रिटिश लोकांचं अंधानुकरण म्हणून नव्हे, पण हंसक्षीर न्यायानं या शिक्षण व्यवस्थेंतलं मर्म स्वीकारावंच लागेल असं म्हणण्याचा मोह मला आवरत नाहीं. आपल्या परिश्रमानं आपणाला महत्पद मिळवितां येतं ही जाणीव कुणालाहि कार्यप्रवृत्त करायला खचित पुरेशी आहे, नाहीं?

तुमचा,

वि. वा. पत्की

: १६ :

# इंग्लंडांतील कल्याणकारी राज्य—४

★

६, सॉंडर्स ग्रव्ह,<br>लंडन (डब्ल्यू. ११)<br>२६ मार्च, १९५६

प्रिय बाळासाहेब,

"इंग्लंडांतील तुमच्या मुक्कामांत, इंग्लंडमध्यें कम्युनिझम कां वाढला नाहीं या प्रश्नाचा अभ्यास तुम्हांला करतां आला तर पाहा—" असं महाराष्ट्रांतील एक कॉंग्रेसपक्षीय मजूर कार्यकर्ते मी इकडे येण्याला निघण्यापूर्वी मला म्हणाले तेव्हां त्यांच्या अपेक्षेप्रमाणें मला वागतां येणं कठीण होतं हें ओळखून मी म्हणालों होतों—

"मी कांहीं राजकारणशास्त्राचा अभ्यास करायला जात नाहीं, तेव्हां—" माझ्या म्हणण्यांतील अभिप्राय लक्षांत येऊनहि ते म्हणाले होते,

"तें माहीत आहे मला, पण खरंच या विषयाचा अभ्यास करा तुम्ही तिथं."

मीं नुसतां हसून त्यांचा निरोप घेतला होता, पण खरं सांगायचं तर त्यांनीं विचारलेला प्रश्न अनेक वेळां इकडे आल्यापासून माझ्याहि मनांत येऊन गेला आहे. तथापि, वरवर सोप्या दिसणाऱ्या या प्रश्नाचं उत्तर आंतरराष्ट्रीय राजकारण आणि अर्थशास्त्र यांचा गाढ अभ्यास केलेल्या विद्वानालसुद्धां चटकन् देणं कठीण असतांना माझ्यासारख्या अनभिज्ञाला त्या प्रश्नाचं उत्तर सहज कसं सांपडेल? पण कार्ल मार्क्सनं ज्या लंडन शहरांतल्या ब्रिटिश म्युझियमच्या ग्रंथालयांत वर्षानुवर्ष अध्ययन, मनन आणि चिंतन करून कम्युनिझम्‌चा वेद म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'कॅपिटल' ग्रंथाला जन्म दिला, एकाच लंडन शहरांत 'गरिबांचं लंडन' आणि

'श्रीमंतांचं लंडन' अशीं दोन शहरं आहेत असं ज्यानं आग्रहानं म्हटलं त्या देशांत त्याच्या विचारसरणीचा प्रसार होऊं नये हें खरंच एक आश्चर्य नव्हे काय? कीं 'पिकतं तिथ विकत नाहीं' हा सिद्धांत बाजारांतल्या वस्तूंप्रमाणेंच मौलिक सिद्धांतांनाहि लागू आहे? तें कसं कां असेना, कोणत्याहि अर्थानं इंग्लंड हा देश कम्युनिस्ट आहे असं कोणी चूकूनहि म्हणणार नाहीं. इतकंच नव्हे तर इंग्लंडांत कम्युनिस्ट पक्ष नांवापुरताच आहे हें काय कुणाला माहीत नाहीं?

म्हणजे जगभर 'कम्युनिझम्' या शब्दांत जी समाजव्यवस्था अभिप्रेत आहे त्या अर्थानं इंग्लंडांत 'कम्युनिझम' नं कधीं मूळ धरलं नाहीं हें उघड आहे. असं कां झालं याची कारणमीमांसा अर्थशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रवेत्ते कांहींहि करोत, पण परंपरेला चिकटून राहायची जी प्रवृत्ति इंग्रज माणासाच्या रक्तांत शतकानुशतकं मुरलेली आहे तिच्याबरोबरच 'कम्युनिझम' मध्यें जी क्रांतीची कल्पना आहे ती इंग्रज माणसाच्या मनाला मानवणारीच नाहीं असं मला तरी वाटतं आणि त्यामुळंच कम्युनिझमच्या वाढीला इंग्लंडची भूमि योग्य ठरली नसावी. कोणताहि फार मोठा बदल हा इंग्रज माणसाच्या मनाला पेलतच नसावा आणि म्हणून क्रांतीपेक्षां उत्क्रांतीकडेच त्यांचा नैसर्गिक कल आहे. पण असं असलं तरी इंग्रज माणूस हा स्वभावतःच मोठा व्यवहारी आहे. त्यानं स्वतःच्या मनाशीं विचार केला असला पाहिजे, 'ज्या कम्युनिझम्चा मोह विचारवंतांना होतो त्याचा उगम आहे तरी कशांत?' उत्पादनाच्या साधनांवर समाजाची मालकी असावी आणि वर्गविग्रह अपरिहार्य आहे असं 'कम्युनिझम' मानतो हें सारं तत्त्वज्ञान इंग्लंडांतल्या विद्वानांनाहि समजत होतं, पण त्यांनीं या तत्वचर्चेत स्वतःला गुरफटून न घेतां एक साधा प्रश्न स्वतःलाच विचारला, 'कम्युनिझम् निर्माण होतो तरी कशामुळं?'

या प्रश्नाचं उत्तर तसं पाहिलं तर अगदीं सोपं आहे. समाजांतली विषमता माणसाला अनेक तऱ्हेनं जेव्हां बोचूं लागते तेव्हां तिच्याविरुद्ध बंड करायची तो भाषा बोलूं लागतो. आपल्या गरजा भागविण्यासाठीं लागणारीं साधनं आपल्याजवळ नाहींत हें त्याला दिसूं लागलं कीं त्याला वाटतं, 'मी असं काय म्हणून जन्मभर दारिद्र्यांत आणि दुःखांत पिचत राहाव? मी आजारी पडलों तर मला औषधोपचार मिळत नाहींत, नोकरी नसली तर उपासमारीची पाळी माझ्यावर येते, मला राहायला चांगलं घर मिळत नाहीं, माझ्या मुलाबाळांच्या शिक्षणाची आबाळ होते. हे सारं काय पृथ्वीच्या अंतापर्यंत असंच चालू राहणार आहे? छे! छे!

मी असं चालू देणार नाहीं !' या विचारसरणीचा परिणाम ज्या भांडवलशाही समाजरचनेमुळं हें सारं घडतं तिच्यावर आघात होण्यांत आणि रक्तपातांत होतो, हें जेव्हां विचारवंतांनीं पाहिलं, तेव्हां रक्तमय क्रांति टाळायची असेल तर ज्या दारिद्र्याच्या आणि दुरवस्थेच्या कर्दमांत कम्युनिझम् जन्माला येतो ती परिस्थितीच निर्माण होणार नाहीं अशी दक्षता घेणं जरूर आहे, हा विचार त्यांनीं समाजापुढें मांडला. खुद्द इंग्लंडांत हे विचार या शतकाच्या सुरुवातीच्या पहिल्या दशकांतच लोकांच्या मनांत घोळूं लागले आणि माणसाला परक्यांच्या आक्रमणापासून संरक्षण मिळावं म्हणून राष्ट्र सैन्यावर खर्च करतं, बलिष्ठांनीं त्याच्या वित्ताचं अपहरण केलं तर त्याला अन्याय होऊं नये म्हणून न्यायालयावर सरकार पैसा खर्च करतं, तशाच त्याच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठीं सरकारनं व्यवस्था केली पाहिजे या विचारसरणीचीं बीजं समाजमनांत रुजूं लागलीं. समाजांत जे दीनदुबळे, रुग्ण, निराधार लोक होते त्यांची काळजी इंग्लंडांत धार्मिक संस्था सोळाव्या शतकापासून घेत होत्या हें खरं असलं तरी केवळ दयार्द्र बुद्धीनं प्रश्नाकडे न पाहतां प्रत्येक गरजू व्यक्तीला हक्कानं या सवलती उपलब्ध झाल्या पाहिजेत अशा विचारांचे वारे जेव्हां समाजांत जोरानं वाहूं लागले, तेव्हां राजकीय मुत्सद्द्यांनाहि तिकडे दुर्लक्ष करणं कठीण होऊं लागलं. अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकांत औद्योगिक क्रांतीमुळं ज्या सुधारणा घडून आलेल्या होत्या त्या तेवढ्या वेळेपुरतं लोकांचं समाधान करूं शकल्या हे खरं, पण कालांतरानं त्या अपुऱ्या वाटूं लागल्या होत्या आणि समाजांतल्या गरिबांची काळजी राज्यसंस्थेनंच घेतली पाहिजे ही विचार-प्रणालि विचारवंतांनीं समाजाला पटवून देण्याचा प्रयत्न केला तेव्हां राजकारणाला नवा रंग चढायला मदतच झाली. १९०८ सालीं वृद्धांना पेन्शन देण्याचा आणि १९११ सालीं राष्ट्रीय विम्याबद्दलचा कायदा पास झाला, तेव्हांच भावी सुधारणांचा पाया घातला गेला आणि कल्याणकारी राज्याची कल्पना हळूहळू साकार होऊं लागली असं म्हणावयास हरकत नाहीं.

पण अजूनहि बव्हंशीं कल्पनेंतच असलेल्या सुधारणा प्रत्यक्षांत आल्या त्या पहिल्या महायुद्धानंतर. युद्धानं नवे नवे प्रश्न उपस्थित केले होते, जुने अधिक तीव्र केले होते. पार्लमेंटनं पास केलेल्या कायद्यामुळं समाजांतल्या बेकारांची आणि वृद्धांची थोडीफार सोय झाली होती, पण त्यापेक्षांहि उगवत्या पिढीची योग्य काळजी घेण्याची गरज अधिकच मोठी होती. पहिलं आणि दुसरं महायुद्ध यांच्यामधील (१९१९-१९३९) वीस वर्षांच्या काळांत या बाबतींत पुष्कळच

सुधारणा झाल्या. नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या मुलांची आबाळ होऊं नये म्हणून बालसंगोपन गृहं (Day Nurseries) व बालकांच्यासाठीं शाळागृहं (Nursery Schools) निघालीं, बौद्धिकदृष्ट्या मागासलेल्या मुलांच्यासाठीं खास शाळा निघाल्या, शाळांतून मुलांच्यासाठीं जेवणाची व मोफत दूध मिळण्याची सोय झाली आणि एकंदरीनं त्यांची सुदृढ वाढ होण्यासाठीं आवश्यक अशा ज्या ज्या गोष्टीं होत्या त्या सरकारनं केल्या. प्राथमिक आणि दुय्यम शाळांतून आमूलाग्र सुधारणा करण्यांत आल्या, दुय्यम शिक्षण संपल्यानंतर उच्च शिक्षणाची मोठ्या प्रमाणावर सोय करण्यांत आली, त्यामुळं त्यांची मानसिक वाढ मोठ्या प्रमाणावर होत राहिली आणि त्यांचा भविष्यकाळ उज्ज्वल झाला.

दोन महायुद्धांमधल्या वीस वर्षांच्या या काळांत केवळ मुलांच्या विकासासाठींच सरकारनं प्रयत्न केले असं नव्हें तर अंध, अपंग आणि कोणतंहि काम करण्यास अपात्र असलेल्या लोकांचीहि प्रत्यक्ष मदत देऊन काळजी घेतली, त्याचप्रमाणें वेड लागलेल्या किंवा क्षयी माणसासाठीं खास दवाखाने उघडून त्यांचा भार इतरांच्यावर पडणार नाहीं अशी दक्षता घेतली. १९२१ सालीं फक्त ५ हजार क्षयी लोकांची सोय दवाखान्यांत होत असे ती १९३८ सालीं ३० हजारांवर गेली, यावरून या रोगाच्या निवारणासाठीं सरकार किती दक्ष असेल याची कल्पना करा.

रोगनिवारणाइतकाच महत्त्वाचा प्रश्न म्हणजे राहण्याच्या घरांचा. दोन महायुद्धांतल्या काळांत ४० लक्ष नवीं घरं बांधण्यांत आलीं आणि घाणेरड्या घरांचा आणि शहरांत वाढलेल्या बेसुमार गर्दीचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्यांत आला. यासाठीं १९३९ सालीं सरकारनं एक कमिशन नेमलं होतं आणि ज्या कारखान्यांच्या मुळं ही गर्दी वाढते ते एकेच ठिकाणीं वाढूं द्यायचे कीं नाहींत याचा समग्र विचार करण्यांत येऊन जास्तींत जास्त लोकांचं आरोग्य व सुख लक्षांत घेऊन यानंतर कारखान्यांच्या जागा ठरविण्यांत याव्या, असं बंधन घालण्यांत आलं.

अशा रीतीनं १९३९ सालापर्यंत किती गोष्टी झाल्या पाहा. मूल जन्माला येण्याच्या घटकेपासून वृद्धावस्थेपर्यंत या सुखसोयींचं क्षेत्र पसरलेलं आहे असं म्हटलं तरी चालेल; कारण या सुखसोयींत गरोदर स्त्रियांची आणि बालकांची व्यवस्था आहे, शाळेंत जाणाऱ्या मुलांची काळजी आहे, बेकारांची सोय आहे, संसर्गजन्य रोगांनीं पछाडलेल्या लोकांची शुश्रूषा आहे. या सुधारणांनीं विधवांना आणि पोरक्या मुलांना आधार दिला आहे, गरिबांचा कैवार घेतला आहे आणि

वृद्धांना परावलंबी ठेवलेलं नाहीं. सामाजिक जीवनांत जी जी गरज निर्माण झाली ती ती पुरी करण्याचा प्रयत्न या सुधारणांनीं केला, पण अजूनहि पुष्कळ करायचं आहे ही जाणीव विचारवंतांनीं कधीं दृष्टीआड होऊं दिलेली नाहीं हें तर विशेष.

आणि १९३९ सालीं सुरू झालेल्या दुसऱ्या महायुद्धानं पूर्वीच्या सुधारणा आणि सुखसोयी अपुऱ्या वाटूं लागतील हे जेव्हां दिसूं लागलं तेव्हां हा सारा प्रश्नच पुन्हां नव्यानं सरकारनं तपासून पाहायचं ठरविलं आणि सामाजिक सुखसोयींच्या प्रश्नाबद्दल सदैव नवे नवे विचार समाजापुढं मांडणारे एक प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ सर विल्यम बिव्हरिज यांच्या नेतृत्वाखालीं एक कमिशन नेमलं. बिव्हरिज यांनीं आपल्या ऐन पंचविशींत १९०२ सालींच बेकारीबद्दल एक पुस्तक लिहून तत्कालीन विचारवंतांपुढें एक नवा विचार मांडला होता आणि त्यानंतरच्या ३०–३५ वर्षांत त्यांनीं सामाजिक सुरक्षितते (Social Security) चा हा प्रश्न इतक्या तऱ्हेनं आणि आग्रहीपणानं लोकांच्या पुढं मांडला होता कीं या प्रश्नांचा सामग्र्यानं विचार करायचं सरकारनं ठरविलं तेव्हां बिव्हरिज यांचं नांव सरकारच्या दृष्टीसमोर असावं हें स्वाभाविकच होतं. किंबहुना सामाजिक सुरक्षिततेच्या या प्रश्नाशीं बिव्हरिज् यांचं नांव इतकं निगडित झालं आहे, कीं ही सर्व योजनाच 'बिव्हरिज् प्लॅन' या नांवानं ओळखली जाते (बिव्हरिज् हे एका आय्. सी. एस्. गृहस्थांचे भारतांत जन्माला आलेले चिरंजीव आहेत हें पाहून तुम्हांला मोठी गंमत वाटेल!) बिव्हरिज् यांनीं आजपर्यंत निरनिराळ्या योजनांखालीं सरकारनं लोकांना ज्या ज्या सवलती मिळत होत्या त्यांचं एकसूत्रीकरण तर केलंच, पण देशांतल्या प्रत्येक नागरिकाला विनामूल्य औषधोपचार मिळावे, बेकारी, आजारपण, वैधव्य, वार्धक्य, पोरकेपण, प्रसूतिपूर्व व प्रसूत्युत्तर काल, इतकंच काय पण मृत्यूनंतरहि मदत मिळण्याची सर्वांगीण सोय व्हावी आणि ज्यामुळं राहणीचं मान वाढेल आणि सर्व प्राथमिक गरजा भागण्याची सोय होईल अशी व्यवस्था केली. सरकारनंहि बिव्हरिज् कमिशननं ज्या शिफारशी केल्या त्या स्वीकारल्या आणि त्यांचं कायद्यांत रूपांतर केलं.

सामाजिक सुरक्षिततेच्या या सर्वांगीण योजनेमुळं इंग्लंडांत जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला आरोग्य, शिक्षण, व्यवसाय यांच्या बाबतींत समान संधि मिळण्याची सोय झाली, येवढंच नव्हे तर या योजनेनं आजची निश्चिंतता आणि उद्यांची निश्चिंतता निर्माण केली असं म्हणणंहि अतिशयोक्तीचं होईल असं मला वाटत नाहीं. अर्थात् हें सर्व घडून यायला अर्धशतक लागलं. कोणत्याहि व्यक्तीला

सुखानं जगण्यासाठीं जें जें अत्यावश्यक आहे तें तें मिळण्याची ग्वाही या योजनेनं दिली आणि कोणत्याहि व्यक्तीचं राहणीचं मान एका ठराविक मर्यादेखालीं जाऊं नये अशी व्यवस्था केली. याचा परिणाम इथं लोकांच्या राहणीवर झालेला उघड दिसतो. सामान्य मजुराच्या घरांत रेडिओ तर असतोच, पण आतां टेलिव्हिजनहि दिसूं लागले आहेत. प्रत्येकाच्या किमान गरजा भागविण्याची सोय झाली आहे, त्यामुळं कोणी दरिद्री किंवा भिकारी उरलेला नाहीं, याचं एक मोठं नमुनेदार उदाहरण तुम्हांला सांगूं? पण तसं नको! 'मँचेस्टर गार्डियन' या दैनिकांत सुमारें दीड महिन्यापूर्वी प्रसिद्ध झालेली ही बातमीच वाचा:

## HALF-CROWNS FOR THE ASKING
### —But No Claimants

For three hours a man sat in a room at Sheffield courthouse on Saturday waiting to give money away, but no one came to collect it. Mr. W. Oates was ready to give away half-crowns to poor filesmiths under a 200-year old charity administered by the Sheffield Town Trustees, who date back to 1297. Every February 4 for the last 37 years he has sat there.

"People used to come" he said yesterday. "There used to be 36 claimants, and sometimes a waiting list right up to the early years of the Second World War." In 1954, there were only four claimants and last year one half-crown was paid to a man who called at Mr. Oates office later. Now, apparantly there are no poor filesmiths.

या बातमींत एक धर्मादाय संस्था प्रत्येक लोहाराला अर्धा क्राऊन (म्हणजे सुमारें पावणेदोन रुपये) फुकट वांटीत असतां एकहि व्यक्ति तो घ्यायला यंदा पुढें आली नाहीं असं म्हटलं आहे, पाहिलंत? पूर्वी अशी रक्कम वाटीत तेव्हां रांगा लागत, पण १९५४ सालीं फक्त ४ लोक पुढें आले तर यंदा कोणीहि पुढें आलं नाहीं! कल्याणकारी राज्यांत लोकांना धर्म केल्याचाहि आनंद लोक कोणाला मिळूं देत नाहींत, याचंच हें एक नमुनेदार उदाहरण आहे असं नाहीं तुम्हांला वाटत? प्रत्येकाला प्रामाणिकपणें श्रम केल्यानंतर आपली भाकरी मिळण्याची सोय असतांना कोणाचीहि मोफत मदत घ्यायची त्याला बुद्धीच कां होईल? अशी मदत घेणं हें त्याला मग लांच्छन वाटतं, हेंच या उदाहरणानं सिद्ध केलं नाहीं काय?

म्हणूनच इंग्लडांत कम्युनिझम् कां वाढला नाहीं याचं उत्तर येथील कल्याणकारी राज्याच्या योजनांत कांहीं अंशानं तरी आहे असं मीं म्हटलं तर माझं म्हणणं अगदींच चुकीचं आहे असं तुम्ही म्हणणार नाहीं. त्याला आणखीहि कारणं असतील, पण लोकांच्या मूलभूत गरजा भागविण्याची जी योजना या राष्ट्रानं केली तिचं मोल फार मोठं आहे. पण या गरजा भागवायच्या तर त्यासाठीं लागणारा पैसा कररूपानंच वसूल झाला पाहिजे हें उघड आहे. सध्यां तर दारू, सिगरेट, रेडिओ, टेलिव्हिजन, इत्यादि चैनीच्या वस्तूंवर किंमतीच्या पन्नास ते पंचाहत्तर टक्के विक्रीकर वसूल केला जातो. म्हणजे एक प्रकारें श्रीमंतांकडून पैसे वसूल करून त्यांचा फायदा समाजांतल्या सामान्य लोकांना मिळण्याची सोय निरनिराळे कायदे करून सरकारनंच केली आहे म्हणा ना! गरिबी आणि श्रीमंती यांच्यातलं अंतर फार मोठं नसलं म्हणजे ती विषमता बोथट होते आणि तिचे क्लेश वाटेनासे होतात. कम्युनिझम झाला तरी हें अंतर जास्तींत जास्त कमी करण्याचीच आकांक्षा धरतो ना? हें अंतर कमी करण्याच्या प्रयत्नांत इथं एकेक नवे प्रश्न मात्र उपस्थित होत आहेत. मनुष्याचं बालपण सुखांत गेलं, चांगलं शिक्षण मिळालं, आरोग्याचे नियम अधिक समजले, आजच्या जीवनाबद्दल निश्चितता असली, राहायला स्वच्छ हवेशीर घर मिळालं, आणि वृद्धापकाळ कसा जाईल याबद्दल त्याचं मन निश्चित झालं, कीं त्याची आयुर्मर्यादा वाढणार आणि त्याची आयुर्मर्यादा वाढली, कीं त्याला वृद्धापकाळांत द्यावयाच्या वेतनाचा सरकारवरील भार अधिकाधिक वाढत जाणार! हा खर्च कसकसा वाढत जाईल याचा अंदाज सरकारच्या आंकडेशास्त्रज्ञांनीं घेतला आहे. त्यावरून १९४५ सालीं पेन्शन देण्यासाठीं १६ कोटि पौंड आणि १९५५ सालीं २० कोटि लागले, तर १९७५ सालीं ३२ कोटि लागतील! कारण १९४५ सालीं पेन्शनरांची संख्या ४४ लक्ष होती, ती १९७५ सालीं ६१ लक्ष होईल! म्हणजे मनुष्याला सुखसोयी उपलब्ध करून दिल्या, याचा परिणाम राष्ट्राचा भार कमी होण्याऐवजीं वाढत जाणार असाच आहे!

तथापि राष्ट्रानं आतां कल्याणकारी राज्याची योजना स्वीकारली आहे. कल्याणकारी राज्याची सर्वांगीण कल्पना मजूर मंत्रिमंडळानं १९४८ सालीं अंमलांत आणली म्हणजे ती मजूर मंत्रिमंडळाची योजना आहे असं म्हणणं मात्र चुकीचं आहे. सर्व राजकीय पक्षांनीं या योजनेला आपला पाठिंबा दिला आहे, त्यामुळं तपशिलांत क्वचित् कधीं फरक झाले तरी प्रत्येक व्यक्तीच्या विकासासाठीं

कसलाहि भेदाभेद न करतां सर्व साधनं उपलब्ध करून देण्याची जी प्रतिज्ञा कल्याणकारी राज्याच्या प्रवर्तकांनीं केलीं तीं कायमच राहणार आहे. या योजनेला मजूर मंत्रिमंडळानं मूर्त स्वरूप दिलं तरी ती योजना 'सरकारची' आहे, 'पक्षाची' नव्हे. मजूर मंत्रिमंडळ अधिकारावरून गेल्यानंतर सुद्धां त्यानंतर आलेल्या हुजूरपक्षीय मंत्रिमंडळानं ती योजना चालूच ठेवली आहे हें मी पाहतों तेव्हां मजूर आणि हुजूर या दोन पक्षांतील अंतर वस्तुतः किती कमी आहे हें माझ्या लक्षांत येतं. सहा हजार मैलांवरून हे अंतर फार मोठं असावं आणि इंग्लंडांतील हुजूर पक्ष हा अत्यंत बुरसटलेला आणि प्रतिगामी पक्ष असला पाहिजे असं मला वाटायचं! उलट, मजूर पक्ष तेवढाच अत्यंत पुरोगामी आणि अद्यावत् कल्पनांचा सदैव पुरस्कार करणारा असं मी मानायचा! पण आम्हांला बुरसटलेला वाटणारा हुजूर पक्षहि कल्याणकारी राज्याच्या कल्पना मजूर पक्षाच्याच उत्साहानं अंमलांत आणतांना पाहिला, कीं हा भ्रम फार वेळ टिकत नाहीं आणि घरगुती प्रश्न सोडवितांना तरी दोन्ही पक्ष एकाच पक्ष्याच्या डाव्या आणि उजव्या पंखांसारखे वाटूं लागतात.

कल्याणकारी राज्याच्या एकेका तपशिलांत शिरून मी पाहूं लागतों तेव्हां मला सारखं वाटतं, यांतून आमच्या राष्ट्राला कांहींच शिकण्यासारखं नाहीं काय? राष्ट्रीय विमा योजनेसारखी बेकारीच्या काळांतील वेतन देणारी योजना ही देशांत फक्त आठ टक्के बेकारी असेल तरच अंमलांत आणतां येते असं अर्थशास्त्रज्ञ म्हणतात. तें खरंहि असेल आणि म्हणून बेकारांची संख्या केवढी तरी मोठी असतांना अशी योजना कदाचित् आपणाला अमलांतहि आणतां येणार नाहीं. पण प्रश्न आहे तो केवळ अंधानुकरणानं कोणतीहि गोष्ट करण्याचा नव्हे, तर त्याच्या मागची तत्त्वप्रणालि स्वीकारण्याचा. इंग्लंडांत वार्धक्य वेतन (Retirement Pension) आठवड्याला आज दोन पौंड मिळतं म्हणून आम्हीं आमच्या वृद्धांना तेवढंच वेतन आजच द्यावं असं कुणीहि म्हणणार नाहीं, पण आपल्या तारुण्यांत ज्यांनीं काबाडकष्ट केले आणि देशाची संपत्ति वाढविली त्यांचं ऋण आम्ही थोडं तरी मानणार आहों कीं नाहीं हा खरा प्रश्न आहे. अर्थात् वृद्धांना वेतन मिळायला पाहिजे तें ते केवळ वृद्ध आहेत म्हणून, त्यांच्या सेवेचा मोबदला म्हणून नव्हे. इंग्लंडांत सर्व औषधोपचार विनामूल्य मिळतात म्हणून तात्बडतोब अशी योजना आंखणं आर्थिक दृष्ट्या आम्हांला परवडणार नाहीं, पण सामान्यांतल्या सामान्य माणसाला असाध्य रोग झाला तर त्याची जास्तीत जास्त काळजी घेतली जाईल व

सारं राज्ययंत्र त्याच्या पाठीशीं उभं राहील अशा आशेनं त्यानं आमच्या राज्ययंत्राकडे कां पाहूं नये ? निदान इंग्लंडसारख्या देशांत अशा योजना सुरुवातीला कशा अंमलांत आल्या याचा अभ्यास तरी आमच्या महत्त्वाकांक्षी कार्यकर्त्यांनीं कां करूं नये ? कुणापासून कांहीं शिकण्यांत कमीपणा का आहे ? खुद्द इंग्लंडनं यांत कमीपणा मानला नाहीं हें खरं वाटेल तुम्हांला ? इंग्लंडपेक्षां स्वीडन हें कल्याणकारी राज्य म्हणून अधिक प्रगतिपर राष्ट्र आहे, तेव्हां तिथं कोणत्या योजना चालू आहेत, त्या कशा अंमलांत आल्या, त्यांच्या अडचणी काय होत्या, या गोष्टींचा अभ्यास इंग्लंडांतल्या मजूर पक्षानं १९३७ सालीं मुद्दाम केला. या पक्षाच्या राजकारणाची बौद्धिक मीमांसा करणारी 'न्यू फेबिअन रिसर्च ब्यूरो' नांवाची एक छोटीशी संघटना आहे. या संघटनेच्या प्रमुख पदावर त्या वेळीं सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. जी. डी. एच्. कोल होते, तर आजचे पार्लमेंटमधील मजूर पक्षाचे नेते ह्यू गेट्स्केल कार्यवाह होते. या संघटनेंतील सुमारें १५ सभासदांनीं स्वीडनला जाऊन तिथली शेती, उद्योगधंदे, निर्यात आणि आयात, शिक्षण, आरोग्य यांबद्दलच्या योजनांचा अभ्यास करून व तज्ज्ञांबरोबर चर्चा करून एक पुस्तक प्रसिद्ध केलं आणि लोकमतापुढें या योजना मांडल्या. आपल्याला असं कांहींच का करतां येणार नाहीं ? सार्वजनिक हिताची कळकळ असणारे कांहीं कार्यकर्ते इंग्लंडांत राष्ट्रीय आरोग्य योजना कशी कार्यक्षम झाली हें प्रत्यक्ष पाहून आम्हांला पुष्कळ गोष्टी सांगूं शकतील आणि त्या प्रत्यक्ष अंमलांत यायला वेळ लागला तरी नवा दृष्टिकोन आपणाला खचित येईल. विचारवंतांना उद्यांच्या समाजाचं चित्र प्रथम दिसावं आणि त्यांनीं तें समाजापुढं मांडलं कीं त्याची चर्चा व्हावी, त्याचा पुरस्कार व्हावा किंवा त्याला विरोध व्हावा आणि यांतूनच अखेर समाजाचं पाऊल पुढें पडावं असं नेहमीं घडलं आहे. म्हणूनच समाजाचा गाडा आज पुढें नेणाऱ्या कर्तबगार माणसांइतकींच हा गाडा कोणत्या दिशेनं जाणार आहे हें ओळखणारीं माणसं निर्माण होण्यावरच अखेर आपली प्रगति अवलंबून आहे हें आम्हीं ओळखायला नको काय ?

तुमचा,

वि. वा. पत्की

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम : २७ : 22821 दि: ९-१-४४
क्रमांक ... 228 ..... नों: दि: ३१-१

# युरोप-दर्शन—१

☆

६, सॉंडर्स ग्रव्ह,
लंडन (डब्ल्यू. ११),
१६ एप्रिल, १९५६

प्रिय बाळासाहेब,

पाश्चिमात्य समाजांत ज्या कल्पना आतां दृढमूल झाल्या आहेत त्यांत प्रत्येक व्यक्तीनं वर्षांतून एकदां तरी सुटी (Holiday) घेऊन आपल्या राहण्याच्या आणि व्यवसायाच्या ठिकाणाहून कुठें तरी दूर जायचं, जीवनांतल्या विवंचना विसरण्याचा प्रयत्न करायचा आणि पुन्हां ताजेतवानं होऊन आपल्या उद्योगाला लागायचं ही एक प्रमुख कल्पना आहे. मोठमोठे राजकारणी तर अशा सुटीवर जातातच, पण सामान्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तीहि सुटीवर जाण्याची परंपराच इकडे आहे. किंबहुना प्रत्येकानं सुटीवर जावं या गोष्टीला इकडे उत्तेजनच दिलं जातं. मनुष्य नोकरीला लागला कीं या वर्षी तुला केव्हां सुटीवर जायचं आहे, याची चौकशी सुरुवातीलाच केली जाते आणि त्याप्रमाणें ठरलेल्या वेळीं त्या व्यक्तीला रजेवर जातां येईल अशी व्यवस्था केली जाते. एकसारखं काम करीत राहिल्यानं शरीरावर आणि मनावर जो ताण पडतो त्यामुळें कोणतीहि व्यक्ति आपलं काम तत्परतेनं करण्यास असमर्थ होते, स्वभावांत चिडखोरपणा येऊं लागतो आणि जीवनांतला आनंद उपभोगण्याची पात्रताच त्यामुळं अखेर कमी होत जाते, हें मानसशास्त्र पाश्चिमात्यांनीं ओळखलं आहे आणि म्हणूनच व्यक्तीची कार्यक्षमता वाढायची असेल आणि जीवनानंदाचं सौख्य तिला लाभायचं असेल तर अशी विश्रांति मिळण्याची सोय करणं समाजाचंच कर्तव्य आहे हें ओळखून तशी व्यवस्था इकडच्या समाजरचनेंत आतां झाली आहे.

उलट आपल्याकडे अजूनहि ही कल्पना सुशिक्षित म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकांतहि फारशी रूढ झालेली नाहीं. दारिद्र्यामुळं पुष्कळ लोकांना असं सुटीवर जातां येणार नाहीं हें मला माहीत आहे, पण ज्यांना असं सुटीवर जातां येणं शक्य असतं असे लोक तरी कितीसे सुटी घेऊन जातात? किराणा मालाच्या दुकानांत पुड्या बांधणाऱ्याला आपल्या व्यवसायांतून भारतांतल्या परिस्थितींत तरी सुटीवर जाण्यासाटीं सवड मिळणार नाहीं हें खरं, पण ज्यांना शक्य असतं असे किती सरकारी नोकर, शाळांतले शिक्षक, कॉलेजांतले प्राध्यापक, बँकांचे मॅनेजर, वृत्तपत्रांचे संपादक, व्यापारी कंपन्यांचे संचालक आणि स्वतंत्र व्यवसाय करणारे सधन वकील आणि डॉक्टर सुटीवर जातात? 'गेल्या बारा वर्षांत मीं एक दिवसहि सुटी घेतली नाहीं' अशी आत्मकथा सांगणारे एक अधिकारी मला परवां परवांपर्यंत मोठे कर्तव्यदक्ष वाटत, पण पाश्चिमात्य देशांतले त्यांच्याच दर्जाचे अधिकारी कसे रजेवर जातात हें जेव्हां मीं इकडे पाहिलं तेव्हां आमच्या अधिकाऱ्यांच्या कर्तव्यदक्षतेचा बुडबुडा माझ्या मनानं क्षणांत फोडला. 'मी रजेवर गेलों तर माझ्या कामाचं काय होईल?' या चिंतेनं ग्रासलेल्या लोकांचं तर मला आतां हसूं येतं आणि त्यांना सांगांवसं वाटतं, "बाबा रे, या जगांत कुणा-वाचूनहि अडत नाहीं. तेव्हां माझ्या कामाचं काय होईल ही चिंता तुला नको!"

सारांश, प्रत्येक व्यक्तीनं सुटीवर जाण्याची कल्पनाच अजून आम्हांला परकी आहे. सुटीवर जाणं म्हणजे कांहीं तरी गैरवाजवी चैन आहे याच कल्पनेंत अजून आपण आहों. उलट सुटीवर जाणं ही पाश्चिमात्य जीवनांतील एक अत्यावश्यक बाब झाली आहे. प्रत्येक व्यक्ति, लहान असो कीं मोठी असो, श्रीमंत असो कीं हातावर पोट असणारी असो, आपल्याला शक्य असेल तेवढा खर्च करून सुटीवर जाते, आपल्या जीवनांतला तोचतोपणा विसरते आणि नव्या उत्साहानं आपल्या कामाला पुन्हां लागते. युरोपांतल्या देशांत सामान्यतः नोव्हेंबर ते मार्च हा काल थंडीचा असल्यामुळं साहजिकच सुटीवर जाण्यासाटीं हा काल कुणी निवडीत नाहीं, परंतु बाकीच्या काळांत लोक सारखे सुटीवर जात असतात. त्या सुटीचे बेत मात्र चार-चार, सहा-सहा महिने अगोदर सुरू असतात. साधारणतः नाताळ संपून नवं वर्ष उजाडलं, कीं या बेतांना पंख फुटूं लागतात आणि पुढच्या महिन्याभरांत आपण या वर्षी सुटींत कुठें जायचं हें ठरवून त्याप्रमाणें माणसं तयारीलाहि लागतात. इंग्लं-डांतल्या लोकांचंच उदाहरण घेऊन सांगायचं तर कुणी म्हणतं, सूर्यप्रकाश भरपूर असलेल्या स्पेनला यंदा जायचं, तर कुणी म्हणतं यंदा स्वित्झर्लंडचं निसर्गसौंदर्य

पाहायचं! उन्हाळ्याच्या दिवसांत नाना रंगांच्या फुलांनीं नटणाऱ्या इटलींत जाण्याचा स्वप्नं कांहीं जणांना पडूं लागतात, कोणी फ्रेंच रिव्हिराला तर कुणी बेल्जिअमच्या समुद्रकिनाऱ्यावर, कोणी ऱ्हाईन नदीच्या खोऱ्यांत तर कोणी आल्प्स पर्वताच्या कुशींत ही सुटी घालवायचे बेत करतात. ज्यांना इतकंहि दूर जाण्याचं आर्थिक सामर्थ्य नसतं तीं माणसं जवळपासच्या भागांत जातात, पण सामान्यतः सुटीवर न जाणारी व्यक्ति अपवादात्मकच असते.

सुटीवर जायचं एकदां ठरविलं, कीं अनेक मार्गांनीं जांतां येतं. मोटारी, आगगाड्या, आगबोटी, विमानं, फार काय सायकलींचाहि उपयोग लोक करतात. तथापि ज्यांना थोडया वेळांत पुष्कळ पाहायचं असतं किंवा एकदां प्रवासाला निघाल्यावर राहण्याची, जेवणाची कसलीच दगदग नको असते अशा लोकांची सर्व तऱ्हेची सोय करणाऱ्या शें-पन्नास कंपन्या तरी एका लंडन शहरांतच आहेत. युनिव्हर्सल, ग्लोबल, युरोपियन, मोटरवेज, फोरवेज, एअरवेज, कुक्स, कॉक्स, पुलमन हीं त्यापैकीं फक्त कांहीं कंपन्यांचीं नांवें आहेत आणि त्यांच्या कचेऱ्या साऱ्या लंडन शहरभर पसरलेल्या आहेत. तुम्हांला कुठेंहि जायचं असो—फ्रान्स, स्वित्झर्लंड, स्पेन, इटली, हॉलंड, डेन्मार्क, स्वीडन, जर्मनी कोणताहि देश असो—फार काय पण भारतांत सुटीवर जायचं असेल तरीहि एक महिन्यांत भारतांतील सर्व प्रसिद्ध स्थळं, शहरं दाखवून पुन्हां लंडनला परत आणणारी एक कंपनी आहे. फक्त साडेचारशें पौंड (सुमारें सहा हजार रुपये!) दिले कीं झालं! आपणाला कुठं जायचं आहे, किती दिवस राहायचं आहे आणि किती खर्च करण्याची आपली तयारी आहे हें एकदां ठरवलं कीं सारा कारभार बिनबोभाट पार पाडतां येतो. आपणाला कांहीं म्हणजे कांहीं करावं लागत नाहीं. सर्व ठिकाणीं उतरण्याची, जेवणाची, स्थळं दाखविण्याची सगळी सगळी व्यवस्था होते. फार काय, पण या निरनिराळ्या देशांत जाण्यासाठीं लागणारा प्रत्येक देशाचा परवाना (व्हिसा) सुद्धां थोडे अधिक पैसे दिले कीं या कंपन्या मिळवून देतात.

मी इकडे आल्यापासूनच युरोपांतले कांहीं देश तरी पाहायचं माझ्या मनांत होतं. तथापि कोणते देश पाहायचे हें ठरविणं, सर्वच आवडत्या पक्वान्नांतलं एकादंच निवडण्याइतकंच कठीण होतं. प्रत्येक देशाचं म्हणून कांहीं तरी वैशिष्ट्य आहेच आणि प्रवासी कंपन्यांचीं जीं विलक्षण आकर्षक पद्धतीनं छापलेलीं पुस्तकं विनामूल्य मिळण्याची सोय केलेली असते ती पाहिलीं कीं माणूस अधिकच गोंधळून जातो. एकेका देशांत दहा-पंधरा दिवस राहायचं म्हटलं तरी ज्याप्रमाणें

या कंपन्या सोय करतात त्याचप्रमाणें दहा–पंधरा दिवसांत पांचसात देश पाहायचे म्हटले तरी तसंहि करतां येतं. बहुतेक कंपन्यांनीं चार-चार, पांच-पांच देशांचे गट पाडलेले आहेत आणि प्रत्येक गट दहा ते पंधरा दिवसांत पाहतां येतो. कोणत्या गटाला ४० पौंड, तर कोणत्याला ५० पौंड, कोणत्याला १०० पौंड तर कोणत्याला १५० पौंड येवढा खर्च करावा लागतो. युरोपांतल्या सगळ्या राजधान्याच एखाद्याला दहा-पंधरा दिवसांत पाहायच्या असल्या तरीहि तशी सोय करणाऱ्या कंपन्या आहेत.

मला युरोपांतले देश पाहायचे होते, परंतु माझ्या बाबतींत कांहीं मर्यादाहि होत्या. पहिली पैशांची व दुसरी कालावधीची. मी जेव्हां निरनिराळ्या कंपन्यांचीं सचित्र पुस्तकं आणि ठराविक देशांच्या गटांना द्यावा लागणारा खर्च पाहिला तेव्हां सुमारें ५० पौंड (अदमासें ६६० रुपये) तरी खर्च करावे लागणार असं मला दिसूं लागलं. एकदां वाटे, इंग्लंडपेक्षांहि प्रगतिपर कल्याणकारी राज्य असलेल्या स्वीडन-डेन्मार्कला जाऊन यावं, तर एकदां वाटे, स्वित्झर्लंडची निसर्गशोभा आणि पॅरिसचा एफेल टॉवर पाहिल्याशिवाय का भारताला परत जायचं? तथापि स्वीडन-डेन्मार्कला जाणं अशक्य आहे हेंहि माझ्या लक्षांत आलं, कारण त्या देशाला नेणाऱ्या ट्रिप्स एप्रिलच्या १५ तारखेपूर्वीं सुरूच होत नव्हत्या आणि मला माझा प्रवास आटपावयाचा होता तो २४ मार्चपासून सुरू होणाऱ्या १५ दिवसांच्या ईस्टरच्या सुटींत! बरं, हें सारं निदान दोन महिने तरी आधीं ठरविणं जरूर होतं, कारण आयत्या वेळीं अशा ट्रिप्समध्यें जागा मिळणंच अशक्य होऊन जातं. अखेर बेल्जिअम, जर्मनी, स्वित्झर्लंड आणि फ्रान्स या देशांचा समावेश करणारी ग्लोबल (Global) नांवाच्या कंपनीची १० दिवसांची आणि ४१ पौंड पडणारी ट्रिप मीं निवडली आणि माझ्याबरोबर भारतांतून आलेले माझे मेहुणे डॉ. सातोसकर यांना कळविलं, तेव्हां त्यांनींहि या ट्रिपमधून यायचं ठरविलं आणि अखेर या ट्रिपसाठीं आमचीं दोघांचींहि नांवं मीं नोंदविलीं. ज्या देशांना आम्ही जाणार होतों त्यांचे परवाने (व्हिसा) मिळविण्याचं काम आम्हीं ग्लोबल कंपनीवरच सोपविलं. प्रत्येक देशाचा व्हिसा मिळविण्यासाठीं निरनिराळे आकार भरावे लागतात. बेल्जिअमचा व्हिसा मिळविण्यासाठीं ५० फ्रँक्स, स्वित्झर्लंडच्या व्हिसासाठीं ५ फ्रँक्स, फ्रान्सच्या व्हिसासाठीं १५०० फ्रँक्स, तर भारतीय प्रवाशांना जर्मनींत जाण्यासाठीं मुळीं व्हिसाच लागत नाहीं! व्हिसासाठीं भरावी लागणारी ही किंमत ऐकली कीं कांहींच अर्थबोध होत नाहीं, खरं ना? बेल्जिअम, स्वित्झर्लंड आणि फ्रान्स या तिन्ही

देशांतील नाणं 'फ्रँकस' या नांवानं ओळखलं जातं खरं, पण प्रत्येक ठिकाणीं त्याची किंमत निराळी आहे. इंग्लिश नाण्याशीं त्याचे संबंध सांगायचे तर असं म्हणतां येईल, कीं एक पौंडाला (म्हणजे सुमारें साडे तेरा रुपयांना) बेल्जिअम फ्रँक्स १४० मिळतात, स्विस फ्रँक्स १२ मिळतात, तर फ्रेंच फ्रँक्स १००० मिळतात! प्रत्यक्ष त्या त्या भागांतून आपण प्रवास करूं लागलों कीं हें सारं अंगवळणीं पडतं खरं, पण सुरुवातीला मोठी गंमत वाटते. ट्रिपचा सर्व खर्च एकदां भरलेल्या पैशांतून होतो खरा, परंतु मध्यंतरीं चहा कॉफीसाठीं (किंवा मद्यपानासाठीं!) आणि प्रत्येक ठिकाणीं जीं अनेक प्रेक्षणीय स्थळं किंवा करमणुकीचे कार्यक्रम असतात ते पाहायचे झाल्यास स्वतः खर्च करावा लागतो. त्यासाठीं प्रत्येक देशाचीं थोडींफार तरी नाणीं (किंवा चलन) बरोबर न्यावींच लागतात.

हें सर्व करायला अर्थातच फारसा कालावधि लागण्याचं कारण नसतं. ज्या कंपनीमार्फत आपली ट्रिप आंखलेली असते तिच्या कचेरींत गेलं कीं, अर्ध्या तासांत हीं सगळीं कामं होतात, पण युरोपच्या प्रवासाची माझी ही सर्व पूर्वतयारी झाल्यावर एक मोठी गंमतीची घटना घडली, ती सांगू का तुम्हांला? मी ज्या वृत्तपत्रलेखनाच्या वर्गांत शिकत आहे त्यांत २५ विद्यार्थी आहेत आणि त्यांतले ११ जण परदेशांतून आलेले आहेत. एके दिवशीं मी माझ्या कॉलेजांत गेल्यावर समजलं, कीं ईस्टरच्या सुटींत ब्रिटिश सरकारच्या प्रसिद्धी खात्यामार्फत या परदेशीय विद्यार्थ्यांना दहा दिवस इंग्लंडच्या निरनिराळ्या भागांत घेऊन जाणार आहेत आणि त्यासाठीं कुणालाहि एक पैसुद्धां (किंवा एक पेन्स सुद्धां म्हणा हवं तर!) खर्च येणार नाहीं! ब्रिटिश सरकारच्या खर्चानं सबंध इंग्लंड पहायला मिळणार आणि आपणाला कांहींच खर्च करावा लागणार नाहीं याचा अर्थातच सर्वांना आनंद झाला, पण माझ्यापढें एक नवाच पेंच उभा राहिला! ग्लोबल टूर्समधून युरोपमध्यें जाण्यासाठीं मी पैसेहि भरले होते आणि युरोप पाहायची ही संधि गेली तर ती कायमची जाणार होती, कारण माझा अभ्यासक्रम आटोपल्याबरोबर भारताला परत येण्यासाठीं मी माझा तिकीटहि रिझर्व्ह करून ठेवलेलं! पण या पेंचाची निरगांठ जेवढ्या विलक्षण रीतीनं बसली तेवढ्याच विलक्षण रीतीनं तिची उकलहि झाली! परदेशीय विद्यार्थ्यांना इंग्लंड दाखवायला नेणार असल्याचं ज्या दिवशीं अधिकृतपणें आम्हांला समजलं, त्या दिवशीं या ११ परदेशीय विद्यार्थ्यांतून एक विद्यार्थी वगळला जाणार आहे असंहि सांगण्यांत

आलं आणि तो विद्यार्थी मीच होतों ! हें सारं ऐकून मला कमालीचं आश्चर्य वाटलं, पण नंतर समजलं कीं वृत्तपत्रलेखनाच्या वर्गांतील ज्या परदेशीय विद्यार्थ्यांना इंग्लंड दाखविण्याचं ब्रिटिश सरकारच्या वसाहत कचेरी (Colonial Office) नं ठरवलं होतं, त्यांतले १० जण निरनिराळ्या ब्रिटिश वसाहतीं (Britsh Colonies) तून आलेले होते आणि स्वतंत्र देशांतून आलेला मी एकटाच होतों! त्यामुळं वसाहतींतून आलेल्या विद्यार्थ्यां (Colonial Students) त माझा अंतर्भाव होऊं शकत नव्हता आणि म्हणून मला वगळण्यांत आलं होतं! एका अर्थानं हे बरंच झालं, पण ज्या स्वातंत्र्याचा प्रत्येक माणसाला अभिमान वाटतो त्याचे कांहीं तोटेहि असतात हें या निमित्तानं मला आयुष्यांत प्रथमच कळलं! आणि तेंहि इंग्लंडासारख्या स्वातंत्र्यप्रिय देशांत!

प्रवासाची पूर्वतयारी अशी फारच थोडी करावी लागते हें या ट्रिप्सचं एक वैशिष्ट्य म्हणून सांगायला हरकत नाहीं. म्हणूनच आम्ही दोघे जण २७ मार्च रोजीं सकाळीं या ट्रिपमधून जाण्यासाठीं लंडनमधील व्हिक्टोरिया कोच-स्टेशनवर आलों ते फक्त एक छोटीशी हँडबॅग हातांत घेऊन. जाणाऱ्या प्रवाशांचं स्वागत करून त्यांना निरोप देण्यासाठीं आणि उभ्या असलेल्या कोचमधील प्रत्येकाची जागा दाखविण्यासाठीं ग्लोबल कंपनीतर्फें एक अधिकारी हजर होते आणि या सबंध प्रवासभर सर्व प्रकारची माहिती सांगण्यासाठीं आणि सर्व व्यवस्था करण्यासाठीं जो वाटाड्या (Courier) असतो तो तर हसत हसत प्रत्येकाच्या जागेजवळ येऊन चौकशी करीत होता. अखेरीस साडेसात वाजतां आमचा कोच व्हिक्टोरिया कोच—स्टेशनमधून बाहेर पडला आणि लंडन शहर हळूहळू मागं राहूं लागलं.

वास्तविक आम्ही निघालों तेव्हां सारं वातावरण कुंद होतं. आकाशांत ढग जमलेले होते, पावसाची झिमझिम सुरू होती आणि कोचमधील ३० माणसं एखादा गंभीर प्रसंग ओढवल्यासारखीं लांबट चेहरे करून बसलीं होतीं. कोच पुढें पुढें धावत होता, आंतली हवा हीटरमुळं हळू हळू गरम होऊं लागली होती पण शेजारीं बसलेल्या माणसाची ओळख करून देण्यांत आलेली नसल्यामुळं त्याच्याशीं बोललं तर शिष्टाचारभंग होणार होता म्हणून कुणी कुणाशीं बोलत नव्हतं. माझे मेहुणे आणि मी हळूहळू बोलत होतों, पण तें येवढ्या हलक्या आवाजांत कीं आमचं आम्हांलाच नीट ऐकू येत नव्हतं! पाश्चिमात्य देशांत मोठ्यानं बोलण्याची पद्धतच नाहीं हें आंतापर्यंतच्या अनुभवानं माहीत झाल्यामुळं 'रोममध्यें असतांना रोमन लोकांसारखे वागा' या उपदेशाप्रमाणें मागण्यावांचून गत्यंतर नव्हतं. पण

लंडल शहराच्या बाहेर कोच पडल्याबरोबर एकदम शब्द कानांवर आले. " I welcome you, Ladies and Gentlemen ! " कोचमधील अगदीं पुढच्या खुर्चीवर बसलेला कुरियर छोट्या मायक्रोफोनमधून बोलत होता आणि कोचमध्यें लावलेल्या लाऊडस्पीकर्समधून ते शब्द ऐकूं येत होते, हें लक्षांत यायला वेळ लागला नाहीं. तो पुढें सांगूं लागला, " मला आज ३० नवे मित्र आणि मैत्रिणी मिळाल्या आहेत ! आज त्यांच्याबरोबरच मी या प्रवासाला निघालोंय् ! मजेंत सुटी घालवण्यासाठीं ! तेव्हां मला तुमच्यांतलाच एक समजा आणि 'कॅल्विन' असं माझ्या आडनावानं हांक मारण्याऐवजीं 'सर्ज' या माझ्या स्वतःच्या नांवानं हांक मारा ! केव्हां वाटेल तेव्हां ! आतां १० दिवस आपण एकत्र राहाणार आहों, जेवणार आहों, गंमती पाहणार आहों, आणि तुम्हांला आवडो किंवा न आवडो, आपलं हें एक कुटुंबच होणार आहे. मला ठाऊक आहे, आपण सर्व एकमेकांना आवडणार आहों, पण प्रवासाच्या पहिल्या दिवशीं लांबट चेहरे करून सगळीं बसतात. आतां तुम्ही बसलां आहांत ना, अगदीं तश्शीं ! पण प्रवास संपत आला कीं तुमची केवढी गट्टी होते, मला माहीत आहे. प्रवास संपायच्या वेळीं एकमेकांचे पत्ते काय घेतां, टेलिफोन नंबर काय विचारता, पुन्हा भेटायचं काय ठरवतां आणि निरोप घेतांना एकमेकांचीं चुंबनं काय घेतां..." सर्जच्या या शब्दांनीं सारं वातावरण एकदम बदललं ! आतांपर्यंतच्या गंभीर चेहऱ्यांवर हास्यरेषा उमटल्या. कोपऱ्याकोपऱ्यांत खसखस पिकूं लागली आणि कोचमधल्या बदलल्या वातावरणाला निसर्गानंहि साथ दिली. हवेतला कुंदपणा कमी होऊं लागला, कोवळीं उन्हं पसरूं लागलीं आणि सारं वातावरण मोठं प्रसन्न झालं !

अगदीं ७५ मैल दूर असलेल्या डोव्हरपर्यंत लहर येईल तेव्हां सर्ज मायक्रोफोन उचलून गमतीगंमतीनं अनेक गोष्टी सांगत होता. रोजचा आपला कार्यक्रम कसा राहणार आहे, प्रत्येक शहर किंवा प्रेक्षणीय स्थळ पाहतांना वेळेचं भान प्रत्येकानं कसं ठेवलं पाहिजे आणि आपल्या आहाराची काळजी प्रत्येकानं कशी घेतली पाहिजे हें सांगतांना आजपर्यंतच्या प्रवाशांचे अनेक नमुने तो सांगे व म्हणे, " विशेषतः जेवणाबद्दल फार काळजी घ्या. हलकं अन्न खा, कारण तुम्ही आजारी पडलात तर मलाच तुमची शुश्रूषा करावी लागणार आहे. Don't make your courier your nurse" असं त्यानं अखेर म्हटलं तेव्हां एकच हंशा पिकला.

इंग्लंडच्या या भागांतून मी प्रथमच प्रवास करीत होतों. त्यामुळं युरोपमधील प्रवासांत दिसणाऱ्या गोष्टींप्रमाणेंच हा भागहि मला नवीनच होता. हिंवाळा

नुकताच संपल्यामुळं अजून झाडांवर पालवी अशी कुठें दिसत नव्हतीच आणि साऱ्या शेतजमिनीहि अगदीं उजाड आणि भकास दिसत होत्या. ओकचीं उंचच उंच निष्पर्ण झाडं, मध्येंच चरणारे मेंढ्याचे कळप, कोंबड्यांची अधूनमधून दिसणारीं खुराडीं आणि हिरव्या गालिच्यासारखी भूभागावर पसरलेली अखंड हिरवळ या दृश्यांत कुठेंच खंड पडलेला दिसत नव्हता. इंग्लंडच्या खेडेगांवांतूनहि टेलिव्हिजनचा केवढा प्रसार झाला आहे हें घरावरच्या टेलिव्हिजनच्या विशिष्ट चौकटीवरून लक्षांत येत होतं आणि खेडीं दिसत तींहि केवढीं स्वच्छ आणि आधुनिक सुखसोयींनीं नटलेलीं! किंबहुना यांना खेडीं म्हणायचं तें केवळ तिथं कमी लोकवस्ती आहे म्हणून, नाहीं तर मोठ्या शहरांत आणि त्यांच्यांत कुठेंच फरक दिसत नव्हता.

लंडन ते डोव्हर हा प्रवास सुमारें तीन तासांत संपवून आम्ही इंग्लिश खाडी ओलांडण्यासाठीं बोटींत बसलों ते कस्टमचे सारे सोपस्कार झाल्यानंतरच! आम्ही इंग्लंडची सरहद्द ओलांडून जाणार होतों म्हणून आमचे पासपोर्ट तपासण्यांत आले, किती ब्रिटिश चलन आम्ही बरोबर नेणार आहों याची चौकशी झाली, आणि अखेर Maid of Orleans बोटींत आम्हीं पाऊल टाकलं तेव्हां बारा वाजले होते आणि प्रसन्न ऊन चहूंकडे पसरलं होतं.

इंग्लिश खाडींतला सारा २० मैलांचा हा प्रवास, पण मोठा नमुनेदार होता. आम्ही सगळे तिसऱ्या वर्गांत होतों खरे, पण बसायला मऊमऊ कोच होते येवढ्यावरूनच तिसऱ्या वर्गाची कल्पना करा. हळूहळू डोव्हरचे पांढरे खडक दूर सरकूं लागले, बोटीला जोराचे हेलकावे बसूं लागले आणि हिंदोळ्यावर बसल्यासारखं वाटून झोपेनं डोळे मिटूं लागले. पण हें सारं थोडा वेळच. कारण फ्रान्सचा किनारा मग लगेच दिसूं लागला आणि उतरण्याची गडबड पुन्हा सुरू झाली.

तुमचा,

वि. वा. पत्की

: १८ :

# युरोप-दर्शन—२

★

६, सॉडर्सग्रव्ह,
लंडन (डब्ल्यू. ११)
१ मे, १९५६

प्रिय बाळासाहेब,

इंग्लंडांतून युरोपमध्यें जायचं म्हटलं कीं, एका अर्थानं हा परदेशचाच प्रवास ! म्हणून इंग्लिश खाडी ओलांडतां—ओलांडतां आमच्या कुरीअरनं या प्रवासाबद्दल किती तरी नव्या गोष्टी सांगितल्या. आम्ही प्रथम फ्रान्समध्यें उतरणार होतों, तेव्हां कस्टमची तपासणी डोव्हरसारखीच कशी होईल, प्रत्येकानं आपल्या जवळच्या मौल्यवान् वस्तूंबद्दल कशी माहिती द्यायची असते आणि फ्रेंच शब्दांचे अर्थ समजले नाहींत तरी ते समजल्याची बतावणी कशी करायची असते हें सारं सांगत असतांनाच कॅले (Calais) च्या चिंचोळ्या बंदरांत आमची बोट शिरली. भराभर माणसं खालीं उतरलीं. पण ज्या घाईनं तीं खालीं उतरलीं ती तिथल्या अधिकाऱ्यांच्या गांवींहि नव्हती ! सारा कारभार संथपणें चालला होता. पासपोर्ट उघडल्याचं नाटक होत होतं आणि बरोबर आणलेल्या बॅगांवर न उघडतांच तपासल्याची खूण केली जात होती ! फ्रेंच अधिकाऱ्यांचं थोडंसं बेफिकिरीचं वागणं पाहिलं, कीं कस्टमचा अधिकारी ही जात साऱ्या जगांत सारखीच असावी असं सारखं वाटूं लागतं. कदाचित् रोज तेच तेच उतारू, त्याच त्याच सामानाच्या बॅगा, आणि तीच तीच घाई—हीं सारीं त्यांच्या अंगवळणीं पडत असावीं आणि या साऱ्या प्रकाराकडे थोडंसं सुस्तपणानं पाहावयाची संवयच त्यांना लागत असावी. निदान कॅलेला उतरल्यावर तरी हा अनुभव सर्वांनाच आला.

पण या गोष्टीकडे लक्ष देत बसायला सवड होतीच कुणाला ? बंदरांतून आग-

गाडीचे रूळ ओलांडून आम्ही पलीकडे आलों तों एक चकचकीत, आरामशीर सीट्सचा कोच उभा असलेला दिसला. आम्ही ज्या ग्लोब्ल कंपनीमार्फत हा प्रवास करीत होतों त्या कंपनीचं ध्येयवाक्यच मुळीं 'Your Coach Awaits' (तुमचा कोच तुमची वाट पाहत आहे) असं आहे आणि आम्ही कॅले बंदरांतून रस्त्यावर आलों तों खरोखरच आमचा कोच आमची वाट पाहत उभा होता! आंतल्या सीट्स तर येवढ्या आरामशीर होत्या कीं Arm-chair Travel (आराम-खुर्चीतला प्रवास) हें या प्रवासाचं या कंपनीनं केलेलं वर्णन वस्तुस्थितिदर्शकच वाटावं! पण या कोचापेक्षांहि सर्वांचं लक्ष वेधलं तें त्याच्या ड्रायव्हरकडे! त्याचा ऐटदार पोषाख आणि त्याची लुसलुशीत फ्रेंच भाषा यामुळं तर सर्वांचं लक्ष त्याच्यांकडे गेलंच, पण हंसत हंसत प्रत्येकाजवळ येऊन त्याला मदत करण्याची त्याची तत्परता कुणाच्याहि लक्षांत भरण्याइतकी स्पष्ट होती. 'आमचा ज्यो तुम्हां सर्वांना आवडेल' अशी सर्जनं त्याची ओळख करून दिली खरी, पण त्याच्या-पूर्वीच त्यानं सर्वांचीं मनं जिंकलीं होतीं आणि थोड्याच वेळांत आमचा कोच सफाईनं धावूं लागला, तेव्हां तर त्याच्या वाणीच्या माधुर्याइतकंच त्याचं गाडी चालविण्याचं कौशल्यहि सर्वांच्या प्रत्ययास यायला वेळ लागला नाहीं. आम्हांला सुमारें १५०० मैलांचा प्रवास १० दिवसांत करायचा होता आणि तोहि एवढ्या आरामशीर गाडींतून, पोटांतलं पाणीसुद्धां हलूं न देतां!

युरोपांत प्रवास करायला सुरुवात केल्याबरोबर पहिली गोष्ट लक्षांत येते, ती रस्त्याच्या उजव्या बाजूनं वाहनं जाण्याच्या पद्धतीची. युरोपांतले इंग्लंड आणि स्वीडन हे देश सोडले तर सर्वच देशांत उजव्या बाजूनं वाहनं जाण्याची पद्धत आहे. प्रवासाला सुरुवात झाल्याबरोबर यामुळं थोडंसं चुकल्या चुकल्यासारखं वाटतं आणि समोरून भरधाव येणारी मोटार आपल्याच अंगावर येत आहे अशीहि भीति क्षणभर वाटते,पण मग हेंहि अंगवळणीं पडूं लागतं. पहिल्या दिवशीं आम्हीं कॅले ते ब्रुसेल्स हा प्रवास केला तेव्हां उजव्या बाजूनं वाहनं जाण्याची संवय नव्हती, पण पुढच्या आठ दिवसांत याची इतकी संवय झाली, कीं दहाव्या दिवशीं इंग्लंडांत परत आल्यावर चुकल्यासारखं वाटूं लागलं! उजव्या बाजूनं वाहनं जाण्याच्या या पद्धतीबरोबर इंग्लंडपेक्षां युरोपांत दोन गोष्टी अगदीं भिन्न आहेत. युरोपांत अंतर मैलांनीं न मोजतां किलोमीटर्सनीं मोजतात आणि हिंवाळ्याच्या दिवसांत इंग्लंड-पेक्षां युरोपांतील वेळ एक तासानं पुढें असते. डाव्या ऐवजी उजव्या बाजूनं वाहनं जाण्याची पद्धत, मैलांऐवजीं किलोमीटर्स, वेळ एक तासानं पुढें—या सर्व प्रकारा-


मुळं आपण खरोखरच एका नव्या जगांत आलों आहों असं वाटूं लागतं आणि यांतच भाषेची आणि नव्या नाण्यांची भर पडली कीं, जो कांहीं गोंधळ उडतो तो विचारूंच नका!

पण असा गोंधळ उडूं नये म्हणून आमचा कुरिअर सारी दक्षता घेत होता. कॅलेमधून आमची गाडी बाहेर पडत असतांनाच युरोपांतल्या या नव्या गोष्टींचा परिचय मायक्रोफोनमधून त्यानं करून दिला. पण कॅले बंदरांत न सांगतां एक गोष्ट सर्वांच्याच लक्षांत आली, ती म्हणजे बॉम्बहल्ल्यांनीं उध्वस्त झालेल्या इमारतींची. भारतापासून युद्ध फार दूर होतं, यामुळं युद्धाची तीव्रता आम्हांला कधीं जाणवली नाहीं. पण युरोपच्या प्रवासाच्या सुरुवातीसच कॅले बंदरांतल्या कोसळलेल्या इमारती दिसल्या, तेव्हां युद्धाच्या कल्पनेनं सामान्य माणसाच्या अंगावर कांटा कां येतो याची थोडी तरी कल्पना मला आली. युद्धाची तीव्रता आम्हांला जाणवली ती महागाईचा वणवा भडकला म्हणून, पण इथं बॉम्बहल्ल्यांनीं इमारतींना आगी लागल्या होत्या आणि प्रासादतुल्य इमारती जमीनदोस्त झाल्या होत्या, याची साक्ष क्षणाक्षणाला दिसत होती. वास्तविक महायुद्ध संपल्याला आतां एक दशक उलटून गेलं आहे, पण आजहि अनेक भग्न इमारती इथं दिसत आहेत यावरून युद्धाच्या भीषणतेची कल्पनाच करवत नाहीं. कॅलेप्रमाणेंच डंकर्क येथेंहि किती तरी उध्वस्त इमारती तर दिसतातच, पण या शहरानं दुसऱ्या महायुद्धाला एक नवी कलाटणी दिली याचा पुरावा आजहि उपलब्ध आहे. या शहरावर बॉम्बफेक्या विमानांनीं इतका भयानक हल्ला केला, कीं सबंध शहरांत उभ्या असलेल्या इमारतींची संख्या अत्यल्पच आहे. आजहि कोसळलेल्या इमारतींच्या विटांचे आणि दगडांचे मोठमोठे ढीग ठिकठिकाणीं दिसतात आणि गेल्या दहा वर्षांत अनेक नव्या इमारती बांधलेल्या दिसत असल्या तरी मध्यवस्तींतहि अनेक रिकाम्या जागा दिसतात त्यावरून बॉम्बहल्ल्यांनीं केलेल्या नुकसानीचं चित्र डोळ्यांपुढें उभं राहतं.


मात्र एकदां ही फ्रान्सची मर्यादा ओलांडून पुढें गेलं, कीं या भीषण दृश्यांची आठवणहि होत नाहीं, कारण यानंतर बेल्जिअमची हद्द सुरू होते आणि मैलच्या मैल पसरलेलीं विस्तीर्ण शेतं दिसूं लागतात. या शेतांतून नांगराला बैलाऐवजीं घोडे जुंपलेले दिसत होते आणि शेतकरी जमिनी नांगरीत होते हें पाहिलं, कीं बेल्जिअम् हा कृषिप्रधान देश आहे हें कुणी सांगावंच लागत नव्हतं. क्वचित् कोठें ट्रॅक्टरनं चाललेली नांगरट दिसे, पण बहुशः घोडे जोडलेले नांगरच सर्वत्र

दिसत. 'तसं पाहिलं तर बेल्जिअम हा कांहीं फार मोठा देश नाहीं. त्याचं क्षेत्रफळ सारं अकरा हजार चौरस मैल आणि एक कोटीच्या आंत साऱ्या देशाची लोकसंख्या, पण या छोट्याशा देशानं शेतीच्या बाबतींत केलेली प्रगति पाहिली कीं मोठं नवल वाटतं. ओसाड माळ किंवा पड जमिनी कुठें दिसतच नाहींत. जो कांहीं जमिनीचा तुकडा उपलब्ध असेल त्याचा धान्योत्पादनासाठीं जास्तींत जास्ती उपयोग करून घेतलेला दिसतो. मात्र बेल्जिअममध्यें नुसती शेतीच आहे असं नव्हे. मोटारच्या रस्त्यानं जाऊं लागलं कीं लहानमोठे कारखाने सर्वत्र पसरलेले दिसतात आणि कारखान्यांत काम करणाऱ्या मजुरांना शेतावरहि काम करतां यावं अशी मुद्दाम व्यवस्था या देशांत केलेली आहे. या कारणामुळं उत्पादनाच्या बाबतींत हा चिमुकला देश युरोपमधील एक प्रगत देश म्हणून ओळखला जातो. तथापि या देशाचं भाग्य उदयाला आलं ते परवांच्या महायुद्धांत. युरोपांतल्या बहुतेक देशांच्या वसाहती आहेत, तशा त्या बेल्जिअमच्याहि आहेत. या वसाहतींपैकीं बेल्जिअम कांगो या वसाहतींत अगदीं युद्धाच्या ऐन मोक्यावर युरेनिअमची खाण बेल्जिअमला सांपडली आणि ही धातु अमेरिकेला विकून बेल्जिअमनं अमेरिकेकडून कोट्यवधि डॉलर्स मिळविले असं म्हणतात देशाला आलेली ही संपन्नता प्रवास करतांना सर्वत्र दिसत असते. जर्मनीच्या शेजारींच असल्यामुळं बॉंबहल्ल्यांपासून बेल्जिअमचीहि सुटका झाली नव्हती. पण मिळालेल्या संपत्तीचा उपयोग करून बेल्जिअमनं उध्वस्त इमारती बांधून काढल्याच, पण अनेक अद्यावत् पद्धतीच्या नव्या इमारतीहि बांधल्या. कॅलेकडून ब्रुसेल्स या बेल्जियमच्या राजधानीच्या शहराकडे जातांना ऑस्टेंड (Ostend) नांवाचं जें पहिलंच शहर लागतं त्याची आकर्षक बांधणी आणि युरोपांतहि पहिल्या दर्जाचं ठरेल इतकं या शहरांतलं भव्य नृत्यगृह (Casino) पाहिलं, कीं या देशाच्या संपन्नतेची अंधुक कल्पना येते. शिवाय ऑस्टेंड हें समुद्रकिनाऱ्यावर वसलेलं शहर आहे, त्याचा फायदा घेऊन सुटीच्या दिवसांत येणाऱ्या लोकांना मोह पाडणारीं अनेक आकर्षणं या ठिकाणीं उपलब्ध करून देण्यांत आलीं आहेत. मोठमोठीं हॉटेलं, मोठमोठीं स्नानगृहं आणि छोटे छोटे बंगले यांची रेलचेल या छोट्याशा शहरांत आहे.

आमच्या प्रवासाच्या पहिल्या छोट्या मुक्कामांत आम्ही याच शहरांत थांबलों होतों. चहा घेण्यासाठीं म्हणून आमच्या ड्रायव्हरनं आमचा कोच एका छोट्याच पण आकर्षक उपाहारगृहापुढें आणून उभा केला, तों त्या हॉटेलांतून दोनचार तरुण वेट्रेसिस चटकन् मोटारजवळ आल्या आणि कुरिअर सर्जे आणि ड्रायव्हर




ऑस्टेंड (बेल्जिअम्) : 'कॅसिनो'



ब्रुसेल्स(बेल्जिअम्) :
पॅलेस ऑफ् जस्टिस



जर्मनी . ऑटोबॅन रस्ता आणि ब्लॅक फॉरेस्ट



जर्मनी : बोपार्ड येथील ऱ्हाइन नदी

ज्यो यांचं चुंबन घ्यायचंच तेवढं त्यांनीं शिल्लक ठेवलं! आम्ही ज्या ग्लोबल टूर्समधून हा प्रवास करीत होतों त्यांची चालू हंगामांतली ही पहिलीच खेप असल्यामुळं आपल्या हॉटेलांना हीं भरघोस गिऱ्हाइकं आणून देणाऱ्यांचं हें स्वागत स्वाभाविकच होतं म्हणा! आमचा कुरिअर आणि ड्रायव्हर सफाईनं फ्रेंच भाषेंत बोलत होते आणि त्यांतला एकहि शब्द जरी आमच्यापैकीं कुणाला समजत नव्हता तरी त्यांच्या मुक्तकंठ हास्याचा संसर्ग इतरांनाहि झाल्याशिवाय राहिला नाहीं, पण आम्ही हॉटेलांत गेलों तों सारा फ्रेंच भाषेंतला कारभार! युरोपांत चहाऐवजीं कॉफीच चांगली मिळते हें सर्जनं सांगितलेलं होतं, पण काफी मागायची झाली तरीहि भाषेची अडचण! पण कल्पनाशक्तीचा वरदहस्त लाभलेला मानव असल्या अडचणींना थोडाच जुमानतो? आपलं मनोगत शब्दांनीं व्यक्त करतां येत नव्हतं तरी हावभाव आणि खुणा हीं आदिमानवाची भाषा शब्दांपेक्षां अधिक बोलकी असते हें ओळखून आम्ही शक्यतों खुणांवर आणि हावभावांवरच सारं भागवून नेलं! 'दोन कप कॉफी पाहिजे' हें सांगतांना दोन बोटं दाखवून तोंडानं 'कॉफी' म्हटलं कीं झालं! पुढें पुढें 'कॉफी' न म्हणतां 'कॅफे' म्हणायचं असतं आणि ती पुढ्यांत आणून ठेवल्यावर Thank you हे आतां जिव्हाग्रीं बसलेले शब्द न म्हणतां Merci म्हणायचं असतं हें आम्ही शिकलों म्हणा! सामान्यतः सर्व युरोपभर फ्रेंच भाषाच चालते आणि बेल्जिअममध्यें त्या देशाची स्वतःची फ्रेमिश भाषा असली तरी बहुसंख्य लोक फ्रेंच भाषाच बोलतात. हॉटेलांतील नोकरांना समजत नसली तरी हॉटेलच्या मॅनेजरांना बहुधा इंग्रजी भाषा समजते. मात्र ती तुम्ही त्यांची स्तुति करण्यासाठीं वापरली तरच समजते, त्या भाषेंत तक्रार केलीत तर ती आपणास मुळींच समजत नसल्याचं नाटक हॉटेलचे मॅनेजर बेमालूम करतात हा सर्जनं दिलेला कानमंत्र कधीं विसरण्यासारखा नव्हता! तथापि, गिऱ्हाइकांकडून 'टिप्' मागण्याच्या बाबतींत भाषेची अडचण येऊं नये अशी व्यवस्था युरोपांत सर्वत्र आहे! आपण मागितलेल्या वस्तूच्या किंमतीवर किंमतीच्या १५ ते २० टक्के 'टिप्' आकारूनच गिऱ्हाइकाच्या हातांत बिल देतात आणि भाषेची अडचण दूर करतात! ऑस्टेंडला कॉफीच्या कपाला १० फ्रँक आणि वर टिप् दोन फ्रँक्स्—म्हणजे एका कपाला सुमारें रुपया द्यावा लागला, तेव्हां युरोपांतल्या महागाईचा पहिली चाहूल लागली. मात्र इंग्लंडांतल्या हॉटेलांतून जो औपचारिकपणा दिसतो त्याच्याऐवजीं युरोपांत थोडी लाघवी भाषाच ऐकूं येते, हा अनुभव ऑस्टेंडला

आला. कारण हॉटेलांतून कॉफी घेऊन आम्ही बाहेर पडून कोचमध्यें बसलों तों साऱ्या वेट्रेसिस गिन्हाइकांना निरोप द्यायला बाहेर आल्या आणि कोच सुरू झाला तेव्हां "बाय्-बाय्" चे ध्वनी किती वेळ तरी घुमत राहिले.

ऑस्टेंडमधून बाहेर पडून ब्रुसेल्सकडे जाऊं लागलं, कीं पुन्हा मोकळीं शेतं आणि कारखाने दिसूं लागतात, पण चटकन् लक्ष वेधतं तें छोट्या आकारांच्या घरांकडे! छोट्या छोट्या गांवांमधून आणि शेतांमधून बांधलेल्या घरांचे आकार इतके विविध आहेत कीं पाहणाऱ्याला अचंबा वाटावा. साधारणतः पिरामिडच्या आकाराचं त्रिकोनी घर हा ठरलेला नमुना आहे, पण घराच्या दुसऱ्या मजल्यावरील छोटीशी गच्ची आणि परिसरांतील शोभिवंत बाग व तांबडी लाल कौलं यामुळं या घरांचे नमुने मोठे आकर्षक वाटतात. या निरनिराळ्या आकारांत अक्षरशः आगबोटीसारखं बांधलेलं घर पाहून तर सर्वांनाच मोठी गंमत वाटली. घरांच्या आकारांची ही विविधता इंग्लिश प्रवाशांनासुद्धां आश्चर्यकारक वाटली आणि या घरांचे फोटो, मुद्दाम कोच थांबवून, अनेकांनीं घेतले. सुंदर, नितळ, गुळगुळीत रस्ते, आकर्षक घरं आणि लांबच लांब पसरलेलीं विस्तीर्ण शेतं हें बेल्जिअमचं वैशिष्ट्य कोणाच्याहि लक्षांत भरण्याइतकं स्पष्ट होतं. मोटारीच्या रुंदच रुंद रस्त्याच्या जोडीनं सायकलीनं प्रवास करणाऱ्या लोकांच्यासाठींहि खास रस्ते इकडे आहेत हें खरंसुद्धां वाटणार नाहीं. रस्त्यावर भरधाव धावणाऱ्या मोटारींची वाहतूक येवढी मोठी असते, कीं साय-कलीनं प्रवास करणाऱ्या लोकांच्यासाठीं निराळे रस्तेच इथं बांधलेले आहेत. प्रत्येकाला आपल्या गतीनं जाऊं द्यायचं आणि कुणीहि कुणाच्या मार्गांत आडवं यायचं नाहीं या पाश्चिमात्यांच्या विचारसरणीचं हें एक नमुनेदार प्रतीकच वाटलं मला तरी!

आम्ही ब्रुसेल्सला येऊन पोंचलों तेव्हां संध्याकाळ झाली होती आणि आमच्या दहा दिवसांच्या प्रवासाची कल्पना पहिल्याच दिवशीं आली होती. पण रात्रीं ज्या गांवांत मुक्कामासाठीं राहायचं असे त्या ठिकाणची आमची सोय करणारीं हॉटेलं अक्षरशः बादशाही थाटाचीं असत. ब्रुसेल्समधलं हॉटेलहि असंच होतं. गरम पाण्याचे नळ, मऊ मऊ बिछाने, उंची फर्निचर, खिडक्यांचे आकर्षक पडदे आणि खालीं घातलेले उंची गालिचे! पण आम्ही विद्युद्दीपांचा झगझगाट असलेल्या आणि रंगीबेरंगी फुलांच्या कुंड्या ठेवलेल्या जेवणाच्या विस्तीर्ण दिवाणखान्यांत आलों तिथं झालेली गंमत सांगण्यासारखी आहे. सकाळीं निघतांना कुणा-कुणाला कसले विशिष्ट आहार या प्रवासांत घ्यायचे आहेत, असं कुरिअरनं

विचारलं, तेव्हां शक्य तों शाकाहार पाहिजे असं मी आणि माझ्या मेहुण्यांनीं सांगितलं होतं. तशी व्यवस्था थोड्या परिश्रमानं झाली आणि शाकाहारी पदार्थ टेबलावर आले, पण मीं पिण्यासाठीं पाणी मागितलं तेव्हां वेटरनं प्राणिसंग्रहालयांतील एखाद्या विचित्र प्राण्याकडे आश्चर्यचकित मुद्रेनं पाहावं तसं माझ्याकडे पाहात विचारलं, "Plain water ?" (साधं पाणी ?) आणि त्याला वाटलेलं आश्चर्य लक्षांत घेऊनहि मीं म्हटलं, "Yes, plain water, please." माझे इंग्रजी शब्द त्याला समजले कीं नाहींत मला माहीत नाहीं, पण सर्व टेबलांवर लोक मद्यपान करीत असतांना 'साधं पाणी' मागणारे हे मुशाफिर त्याच्या दृष्टीनं मोठे विचित्र असले पाहिजेत असं त्याला वाटलं असावं. कारण पाण्यानं भरलेलं कांचपात्र त्यानं माझ्या पुढ्यांत आणून ठेवलं तें हंसत हंसतच!

रात्रीचं जेवण झालं, कीं ज्या ठिकाणीं आमचा मुक्काम असेल त्या ठिकाणीं नाटकं, चित्रपट किंवा इतर करमणुकीचीं साधनं असत त्यांचा आस्वाद घेतां यावा म्हणून कुरिअर ती माहिती सांगे. पण बहुतेक जण अशा ठिकाणीं जाण्याऐवजीं ज्या शहरांत मुक्काम असेल त्याचीच शोभा जेवढी पाहतां येईल तेवढी पाहून घेत. ब्रुसेल्सला तर हें एक फारच मोठं आकर्षण होतं. ब्रुसेल्स हें युरोपांतलं उत्कृष्ट रोषणाई (Well-lighted) असलेलं दुसऱ्या नंबरचं शहर आहे हें कुरिअरनं सांगितलं होतं त्याची सत्यता दृष्टीला पटतच होती. पांच-पांच, सहा-सहा मजली इमारतींच्या वरच्या टोकापासून जमिनीपर्यंत निरनिराळ्या रंगांच्या चित्रविचित्र 'निऑन साईन्स' च्या जाहिराती जवळजवळ प्रत्येक रस्त्यावर होत्या आणि त्यामुळं अंधाराला किंवा अंधुक प्रकाशाला कुठें जागाच नव्हती. संध्याकाळचं जेवण आठ वाजण्याच्या आंत आटोपून रात्रीं बाहेर पडण्याची पद्धत इंग्लडांत आणि युरोपांत सर्वत्रच असल्यासुळं मोकळेपणानं फिरणारे स्त्री-पुरुष आणि असंख्य मोटारी यांची एकच गर्दी रस्त्यावर होती. आपल्याकडे भुईमुगाच्या शेंगा किंवा मक्याचीं कणसं शेगड्यांवर भाजीत उभ्या असणाऱ्या गाड्या अनेक शहरांतून दिसतात तशाच अक्रोड आणि मटारच्या शेंगाच नव्हेत तर समुद्रांतले किंवा नदींतले खेंकडे (Crabs) भाजून ते विकणाऱ्या हातगाड्या रस्तोरस्तीं होत्या. झगझगीत दिव्यांच्या प्रकाशांत कुठें हॉटेलांत तर कुठें हॉटेलच्या बाहेर खाद्यपेयांचा समाचार घेत असलेलीं माणसं सर्वत्र दिसत होतीं.

पण याच ब्रुसेल्स शहरांत सकाळीं आठ वाजून गेले तरी विलक्षण सामसूम असलेली दुसऱ्या दिवशीं दृष्टीस पडली. रात्रीं विजेच्या प्रकाशांत उजळलेली ही

स्वप्नसृष्टि आतां भकास दिसत होती इतकंच नव्हे तर रात्रीं लक्षांत न आलेली एक गोष्ट सकाळीं चटकन् लक्षांत येत होती. आम्ही ज्या ठिकाणीं उतरलों होतों तिथून पाहिलं कीं दोन्ही बाजूंना विलक्षण उतार असलेला आणि आम्ही उतरलों होतों तेवढा भागच उंचावर असलेला स्पष्ट दिसत होता. शहराची ही विचित्र रचना होण्याचं कारण असं, कीं दहा लक्ष वस्तीच्या या शहराच्या खालून दक्षिणोत्तर सेन नदी वाहात गेलेली आहे आणि तिचा प्रवाह सर्व बाजूंनीं बांधून काढल्यामुळं सबंध शहरांत ही नदी कुठेंच दृष्टीस पडत नाहीं. जो भाग झांकलेला आहे तो अर्थातच उंच झाला आहे आणि त्याच्या दोन्ही बाजूंना उतार आहे. युरोपांतल्या पुष्कळ शहरांत मध्य भागांतून वाहणाऱ्या नद्या आहेत आणि त्यांचीं पात्रं मोठ्या आकर्षक रीतीनं बांधून काढलेलीं आहेत, पण सबंध मोठी नदी शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत झांकून टाकलेलं आणि त्याच्यावर गजबजलेली वस्ती असलेलं ब्रुसेल्स हें जगांतलं एकच शहर आहे.

हें शहर आज अनेक शतकं राजधानीचं शहर असल्यामुळं आणि आजहि बेल्जिअमचा राजा तिथंच राहत असल्यामुळं राजवैभवाच्या अनेक खुणा सर्वत्र विखुरलेल्या आहेत. टाऊन हॉल, पॅलेस ऑफ जस्टिस, राजवाडा हीं तर सर्व प्रेक्षणीय आहेतच, पण आमच्या कुरिअरनं या शहरांतल्या तीनशें वर्षांपूर्वीच्या एका नागरिकाचा पुतळा एका चिंचोळ्या गल्लींत आम्हांला नेऊन दाखविला तेव्हां हंसतां हंसतां सर्वांना पुरेवाट झाली! हा नागरिक दीड वर्षांचा आहे आणि स्वारी एका उंच स्तंभावर उभी राहून खुशाल लघुशंका करीत आहे! या मुलाबद्दल अनेक दंतकथा आहेत, पण तो एका श्रीमंत माणसाचा मुलगा होता आणि तो हरवतांच भ्रांतचित्त बापानं तो ज्या ठिकाणीं ज्या स्थितींत सांपडेल तिथं त्याचा पुतळा उभा करीन असं जाहीर केलं होतं आणि अखेर ज्या स्थितींत तो दिसला तसाच त्याचा पुतळा त्यानं तिथं उभा केला, हीच दंतकथा मला तरी विश्वसनीय वाटली. आज तीनशें वर्षं हा पुतळा या ठिकाणीं उभा आहे आणि ब्रुसेल्सला येणारा प्रत्येक प्रवासी त्याचं दर्शन घेत कौतुक करीत आहे. आमच्या सफरींत स्त्रिया—आणि त्यांतहि साठी उलटलेल्या—पुष्कळ होत्या. ड्रायव्हर जोनं आमचा कोच या पुतळ्याच्या समोर आणून उभा करतांच "Naughty boy, Naughty boy!" म्हणत त्या येवढ्या मोकळेपणानं खदखदून हसल्या, कीं इतरांनाहि आपलं हंसणं आवरणं कठीण झालं!

ब्रुसेल्समधल्या या साऱ्या गंमती पाहात आम्ही शहराबाहेर पडलों आणि वाटेंत

लागलेलं लीज हें उद्योगधंद्यांनीं गजबजलेलं चार लाख वस्तीचं शहर ओलांडून वेल्जिअमच्या सीमेवर आलों तेव्हां बारा वाजायला आले होते. पासपोर्ट पुन्हां तपासले गेले आणि ज्यांना आपल्याजवळचीं नाणीं बदलून घ्यायचीं होतीं तींहि त्यांनीं बदलून घेतलीं. आमच्या कोचच्याभोवतीं एवढ्या वेळांत आपल्या गोष्ट्या खेळत खेळतच अनेक मुलं जमा झालीं होतीं आणि आम्हांला न समजणाऱ्या भाषेंत त्यांचीं बोलणीं सुरू होतीं, तोंच तपासणी आटोपली, तपासणी अधिकाऱ्यांनीं 'तुमचा प्रवास सुखाचा होवो' म्हटलं आणि कोच सुरू झाल्यावर पुढच्या सीटवर बसलेल्या सर्जचे शब्द ऐकू आले, "And now we enter the Fatherland" तेव्हां सर्वांनींच ओळखलं कीं आतां आपण जर्मनींत प्रवेश करीत आहों.

तुमचा,

वि. वा. पत्की

: १९ :

# युरोप-दर्शन—३

✯

६, सॉंडर्स ग्रव्ह,
लंडन (डब्ल्यू. ११)
१६ मे १९५६

प्रिय बाळासाहेब,

बेल्जिअमची सरहद्द ओलांडून आम्ही जर्मनींत आलों ते कोणाचीहि भूमि नसलेला (No Man's Land) विभाग ओलांडल्यानंतरच! गेल्या महायुद्धानं युरोपांत ज्या अनेक घटना घडवून आणल्या त्यांत जर्मनीची झालेली वाताहात ही एक अग्रगण्य घटना आहे असं म्हणावं लागेल. बेल्जिअम–जर्मनीच्या सरहद्दीवर यामुळंच दोनतीन मैलांचा पट्टा ठेवण्यांत आला आहे आणि तो कोणाच्या मालकीचा हें अजून ठरायचं आहे! सध्यां तो जर्मनीच्या ताब्यांत आहे, पण कालांतरानं तो बेल्जिअमला मिळेल असं म्हणतात. सबंध जर्मनींत यानंतरच्या प्रवासांत जीं दृश्यं दिसलीं त्यांची पूर्वसूचना या कोणाच्याहि मालकीच्या नसलेल्या भूभागानं प्रथम दिली आणि तो भाग ओलांडून दोनतीन मैलांवर असलेल्या आकेन (Aachen) या पहिल्या जर्मन शहरांत आम्ही आलों तों सर्वत्र मातीचे आणि दगडांचे ढिगारे, उध्वस्त इमारती आणि बॉंबहल्ल्यांनीं नामशेष केलेले चौक यांच्या खुणाच काय त्या दृष्टीस पडल्या. ज्या इमारती उभ्या होत्या त्यांच्याहि भिंतींना बारीक बारीक भोकं किती होतीं यांना गणतीच नाहीं. गेल्या दहा वर्षांत बांधलेल्या छोट्या छोट्या अनेक इमारती या शहरांत दिसत होत्या, पण महापुरांत सांपडलेल्या दुर्दैवी माणसांनीं निवाऱ्यासाठीं झोंपड्या बांधाव्या आणि आपली गुजराण करावी तशीच अवकळा या शहराला आलेली उघड दिसत होती. जर्मनीच्या सरहद्दीवर हें शहर वसलेलं असल्यामुळं या शहरावर बॉंब टाकून

दोस्त विमानांना आपल्या भागांत चटकन् जातां येत होतं, त्याचा परिणाम या शहराचा पुरा पुरा विध्वंस होण्यांत झाला.

पण या शहराची रचना मोठी नमुनेदार आहे. शहरांतल्या रस्त्याच्या दुतर्फा झाडं लावण्याची पद्धत युरोपांतील बहुतेक शहरांत आहे, तशीं झाडं तर इथं होतींच, पण प्रत्येक घराच्यापुढें छोटीशी बाग आणि फुलझाडं लावण्यासाठीं तयार करून ठेवलेल्या विटांच्या आकृती सर्वत्र दिसत होत्या. मात्र कुठेंहि झाडांवर पानं किंवा फुलं नव्हतीं. हिंवाळा नुकताच संपल्यामुळं वृक्षांवरचीं सारीं पानं गळून गेलेलीं होतीं आणि नवीं यायला अजून थोडा अवकाश होता. मात्र निसर्गशोभेची उणीव प्रशस्त हॉटेल, त्यांत ठेवलेल्या पितळेच्या चकचकीत कुंड्या आणि त्यांत फुललेलीं नाना रंगांचीं फुलं यांच्यामुळं जाणवत नव्हती. आकेनमध्यें आम्ही फक्त दुपारचं जेवण घेण्यापुरतेच दीड, दोन तास थांबलों होतों, पण जेवतांना ब्रुसेल्समध्यें आलेल्या अनुभवाची इथं पुनरावृत्तीच झाली. ब्रुसेल्सला वेटरनं साधं पाणी (Plain water) मागितल्यानंतर आणून तरी दिलं, पण इथं तें मागण्याच्या आधींच वेटरनं सूचना दिली—' No water here, please ! ' (इथं पाणी मिळणार नाहीं !) ज्यांना जेवतांना मद्यपान करायचं नव्हतं त्यांना ऑरेंज किंवा लेमन घ्यावं लागत होतं आणि त्या ब्राटलीची किंमत एक मार्क (सुमारें सव्वा रुपया) होती ! हळूहळू कपभर चहा किंवा कॉफी, लेमन किंवा ऑरेंज या पेयांना साधारणतः सर्वत्रच एक रुपयाच्यापुढें किंमत युरोपांत पडते, ही गोष्ट सर्वांच्या परिचयाची झाली, कारण रोज निदान चार वेळां तरी तीं घ्यावीं लागत होतीं आणि त्यांचे पैसे स्वतः द्यावे लागत होते !

महायुद्धांत भयंकर बॉंबहल्ला झालेलं आणि युद्ध संपल्याबरोबर दोस्तांनीं प्रथम व्यापलेलं हें शहर मागं टाकून जर्मनीच्या अंतर्भागांत जसजसं पुढें जावं तसतसं मात्र या देशाचं खरं स्वरूप दिसूं लागतं. गजबजलेली वस्ती मग दिसेनाशी होते खरी, पण अनेक छोटे छोटे कारखाने आणि अखंड धूर ओकणारीं त्यांचीं धुराडीं यांची मालिका संपतां संपत नाहीं. रुंद, प्रशस्त, डांबरी रस्ते, मोटारींची अखंड रांग आणि सर्वत्र वीज खेळविण्यासाठीं उभे केलेले अजस्र खांब यांचं जाळं सर्वत्र पसरलेलं दिसतं. आगगाडीचे रस्ते उभ्या-आडव्या धाग्यांनीं कापड विणावं तसे सर्वत्र गेलेले दिसतात आणि छोटीं छोटीं गांवं लागतात त्यांना युद्धाची झळ मुळींच लागलेली दिसत नाहीं. छोट्या, शें-पन्नास घरांच्या गांवावर कशाला कोण बॉंब टाकील ? युद्धकाळांत सारा रोख असतो तो मोठ्या प्रमाणावर नासधूस करण्याकडे,

त्यामुळं मोठीं शहरं बॉम्बहल्ल्याचं लक्ष्य होतात आणि लहानसहान खेड्यांकडे कुणी लक्ष देत नाहीं याचं हें प्रात्यक्षिकच होतं म्हणा ना! एकजुटींत सामर्थ्य असतं हें नेहमीचं तत्त्वज्ञान आजच्या युद्धकालांत निरुपयोगी ठरतं, कारण एके ठिकाणीं एकजूट करून राहिलं कीं नेमका त्याच ठिकाणीं हल्ला व्हायचा हें निश्चित! युद्धकाळांत सारेच अंदाज चुकतात हें सांगण्यासाठीं Divided we stand, united we fall अशी एक नवी म्हणच एव्हलिन वॉ (Evelyn Waugh) या आजच्या एका प्रमुख इंग्रजी कादंबरीकारानं तयार केली आहे ती किती सार्थ आहे, हें हीं दृश्यं पाहिलीं तेव्हां चटकन् माझ्या लक्षांत आलं.

या भागानंतर कोलोन (Cologne), बॉन (Bonn), कॉब्लेंझ (Coblenz) इत्यादि जीं मोठमोठीं शहरं लागतात त्याची झालेली नासधूस पाहिली कीं खरोखर कोणतं शहर अधिक उध्वस्त झालेलं आहे याविषयीं मनांत संभ्रम निर्माण होतो. वाकलेल्या तुळया, कोसळलेल्या भिंती, जळलेलीं दारं, फुटलेल्या कांचा जिकडे पाहावं तिकडे दिसतात. राक्षसी महत्त्वाकांक्षेला बळी पडलेल्या हिटलरनं आपल्या देशावर केवढं संकट ओढवून घेतलं हें पाहून मतभेदाचे प्रश्न मिटविण्यासाठीं युद्धाशिवाय दुसरा मार्गच नाहीं काय हा विचार सारखा माझ्या मनांत तरी येई व भारताची शांततावादी भूमिका केवढ्या थोर नैतिक मूल्यांवर आधारलेली आहे याची खात्री पटे. हीं भयानक दृश्यं पाहून एकेकदां असंहि वाटे, कीं हिटलरचं तत्त्वज्ञान तर तिरस्करणीय होतंच, पण त्याचं पारिपत्य करण्यासाठीं म्हणून दोस्तांनीं जर्मनीला आणलेली अवकळा माणुसकीला काळिमा लावणारी आहे.

आमचा कुरिअर हीं सर्व दृश्यं तर आम्हांला दाखवीत होताच, पण बॉम्ब-हल्ल्यांत झालेले चमत्कारहि सांगत होता. पांच लाख वस्तीच्या कोलोन शहरावर बॉम्ब टाकणारीं पांच-पांच हजार विमानं एकाच वेळीं येऊनहि या शहरांतल्या भव्य प्रार्थनामंदिरावर मात्र त्यापैकीं एकहि बॉम्ब कसा पडला नाहीं याचा अनेकांना मोठा चमत्कार वाटे आणि दैवी सामर्थ्याचा साक्षात्कार होई. हें प्रार्थना-मंदिर सात-आठशें शतकांपूर्वी बांधलेलं असून त्याचीं शिखरं सुमारें पांचशें फूट उंच आहेत आणि आजूबाजूला मोठे कारखाने, रेल्वे स्टेशन आणि अजस्र पूल आहेत. त्यामुळं या भागावर अखंड बॉम्बवृष्टि होऊनहि हें प्राचीन प्रार्थना-मंदिर अभंग राहिलं हा एक योगायोग आहे खराच! आम्ही त्या सर्व भागांतून चांगले तास दोन तास फिरलों तेव्हां गजबजलेलीं दुकानं आणि जर्मनींत तयार झालेल्या हरतऱ्हेच्या वस्तू पाहून मोठा अचंबा वाटला. दुकानांतून मांडलेले कॅमेरे

हें तर जर्मनीचं एक खास वैशिष्ट्य—आणि त्यांचे प्रकार तरी किती होते! जर्मनींत येणारा प्रत्येक प्रवासी एखादा तरी कॅमेरा घेणारच हें ओळखून दूरदर्शी व्यापाऱ्यांनीं English spoken, English money accepted (येथें इंग्रजी भाषा समजते व इंग्रजी चलन आम्ही स्वीकारतों) अशा पाट्या लावलेल्या होत्या. इंग्रजीप्रमाणेंच फ्रेंच, फ्लेमिश, स्पॅनिश या भाषेंतहि अशाच पाट्या होत्या. कारण कोणत्याहि देशांतला प्रवासी आला तरी त्याच्या भाषेंत बोलून त्याच्या गळ्यांत (अक्षरशः!) कॅमेरा बांधल्यावांचून हे दुकानदार रहातच नव्हते!

या शहरांत ऱ्हाईन नदीचं प्रथमच दर्शन घडतं आणि तिचे दोन्ही तट उत्कृष्ट रीतीनं बांधून काढलेले असल्यामुळं जलवहातुकीसाठीं तिचा केवढा उपयोग होतो हेंहि लक्षांत येतं. पुलावरून आगगाडीचे रस्ते आणि पुलाखालून मोठमोठ्या बोटी जात असलेल्या दिसत आणि ऱ्हाईन नदींतून केवढी प्रचंड वाहतुक चालते याची अंधुक कल्पना येई. आल्प्स पर्वतांत उगम पावून उत्तर समुद्राला मिळणाऱ्या या नदीचा गेलीं दोन हजार वर्षं जलवाहतुकीसाठीं उपयोग होत आला आहे. या नदीनं जर्मनींत झालेल्या अनेक उलथापालथी, संस्कृतीचे उदय आणि अस्त पाहिले आहेत आणि मोठमोठे कवी आणि लेखक यांना ऱ्हाईन नदीच्या खोऱ्यांतील निसर्गसौंदर्यानं वेड लावलं आहे. वास्तविक ही नदी ज्या डोंगरभागांतून वाहते तिथं शहरं वसण्यासारखी जागा फार नाहीं, कारण दोन्ही बाजूंना उंचच उंच डोंगर आणि मधून संथपणें वाहणारा ऱ्हाईनचा प्रवाह असं दृश्य सर्वत्र आहे. पण नदीच्या दोन्ही बाजूला डोंगरांत रस्ते कोरलेले आहेत आणि दोन्ही तीरांवरून आगगाड्या आणि मोटारी यांची अखंड रहदारी चालू असते. डोंगर-पठारावर द्राक्षांचे मळे तर इतके आहेत, कीं डोंगराचाहि इतका उपयोग करून घेण्याच्या प्रवृत्तीचं कौतुक वाटल्यावांचून राहत नाहीं. या डोंगरभागांत सपाटीवर जराशी रुंद जागा ज्या ठिकाणीं सांपडेल त्या ठिकाणीं छोटीं छोटीं शहरं वसलेलीं आहेत आणि त्यांचा उपयोग प्रवासी लोकांची सोय करून पैसा मिळविण्यासाठीं करण्यांत आला आहे.

अशा छोट्या शहरांपैकींच बोपार्ड (Boppard) या एका गांवीं आम्ही मुक्कामासाठीं आलों तेव्हां हें टुमदार शहर, ऱ्हाईनचा संथ प्रवाह आणि उलट्या छत्रीसारखीं दिसणारीं किनाऱ्यावरचीं टेंगणीं झाडं यांतलं अधिक सुंदर कोणतं हें ठरविणंच कठीण वाटूं लागलं. ऱ्हाईन नदीच्या खोऱ्यांतील सर्वांत सुंदर शहर (Queen of the Rhine resorts) हें वर्णन यथार्थ वाटावं इतकी अप्रतिम

निसर्गशोभा इथं खचित आहे. डोंगराकडे दृष्टि वळविली तर द्राक्षांचे मळे, खालीं पाहिलं तर ऱ्हाईनचा प्रवाह आणि सभोवतीं दिसणारी वनश्री हें सौंदर्य हिंवाळ्यानंतरहि मोठं आल्हादक वाटत होतं. या भागांत द्राक्षांचे मळेच मळे असल्यामुळं दारूचं उत्पादन तर मोठ्या प्रमाणावर होतंच, पण दरसाल सप्टेंबर महिन्यांत लोक मोठ्या उत्साहानं मदिरा-महोत्सव (Wine Festival) साजरा करून लोकगीतं म्हणतात आणि अनेक तऱ्हेचीं नृत्यं करतात. तथापि, ऱ्हाईन नदीच्या या भागांतून जातांना केवळ डोळ्यांनीं ऱ्हाईन नदी आपण पाहावी याचं अनेकांना वैषम्य वाटलं आणि नदीतून प्रवास करण्याची संधि मिळाल्यास पाहावी म्हणून कुरिअरला विचारलं तेव्हां तो म्हणाला, "त्यांत काय कठीण आहे ? प्रत्येक जण सहा मार्क (सुमारें साडेसात रुपये) द्यायला तयार असेल तर आपण एक मोटर-बोट ठरवूं आणि यानंतर पंधरा मैल असलेल्या गांवीं जाऊं. आपला कोच रस्त्यानं जाईल आणि आपलं स्वागत करण्यासाठीं ज्यो तिथं वाट पाहत उभा राहील!" सर्जची कल्पना अर्थातच सर्वांना आवडली आणि आम्ही मोटर-बोटींत आणि ड्रायव्हर ज्यो कोचमध्यें बसून आमचा प्रवास सुरू झाला.

तथापि प्रत्यक्ष मोटर-बोटींत आम्ही बसलों आणि प्रवाहाच्या उलट्या दिशेनं जाऊं लागलों तेव्हां नदी वाटली तितकी संथ नव्हती हें लक्षांत येऊं लागलं. बोटीला हेलकावे बसूं लागले आणि ज्या नदींतून पाणी कापीत आमची बोट चालली होती ती नदी अवघ्या दीड-दोन महिन्यांपूर्वींच थंडीनं संपूर्ण गोठली होती हें खरंहि वाटेना. युरोपांतली थंडी हें खरोखरच एक महाकाव्य आहे. यंदा तर गेल्या साठ वर्षांत पडली नव्हती अशी थंडी युरोपांत आणि इंग्लंडमध्येंहि पडली होती. या थंडीमुळं इंग्लंडांत पाण्याचे नळ आंतल्या पाण्याचं बर्फ झाल्यामुळं फुटले होते आणि बाटल्यांतील दुधाचं घट्ट आईस्क्रीम झालं होतं, तर सायबेरियांत दुधाचे ठोकळे (blocks) पावासारखे विकण्यांत आले होते आणि ज्या ऱ्हाईन नदींतून आमची बोट हलतडुलत चालली होती ती गोठून गेल्यामुळं लोक अक्षरशः तिच्या पृष्ठभागावरून चालत गेले होते! या नदीच्या दोन्ही बाजूना जे डोंगर आहेत त्यांच्यावर कित्येक शतकांपूर्वीं बांधलेले आणि आजहि सुस्थितींत असलेले इतके किल्ले आहेत कीं आश्चर्य वाटावं. प्रत्येक किल्ला दिसूं लागला कीं त्याचा पूर्वेतिहास सर्ज सांगत होता—एक भाऊ लढाईवर गेल्यानंतर दुसऱ्यानं त्याच्या पत्नीशीं विवाह केल्यामुळं हाडवैरी झालेल्या बंधूंचे हे किल्ले (Enemy brother's castles), तर उंदरा-मांजरांसारखे दिसणारे ते 'कॅट अँड

माऊस' किल्ले! निरनिराळ्या राजवटींत होऊन गेलेल्या अमीर-उमरावांचे किल्ले तर या खोऱ्यांत इतके आहेत—आणि प्रत्येकाचे इतिहास इतके गुंतागुंतीचे आहेत, कीं त्यांच्या वर्णनासाठीं एक महाभारतच रचावं लागेल!

ऱ्हाईन नदीच्या या खोऱ्यांतनं बाहेर पडलं, कीं पुन्हा मोठमोठीं शहरं दिसूं लागतात आणि जर्मनींतलं शहर म्हटलं कीं तें बॉम्बहल्ल्यानं उध्वस्त झालेलं असायचंच हें माहीत झालेलं असल्यामुळं या दृश्यांचीहि दृष्टीला संवय होत जाते. आधुनिक मुद्रणकलेचा जनक गटेनबर्ग (Gutenberg) ज्या शहरांत जन्माला आला तें मेंझ (Mainz) आणि जर्मनींतलं एक प्रमुख औद्योगिक केंद्र म्हणून ओळखलं जाणारं मॅनहिम (Mannheim) हीं शहरंहि अशींच उध्वस्त झालेलीं आहेत खरीं, पण जिवंत झाडाच्या फांद्या तोडून टाकल्या तरी त्या पुन्हा फुटाव्या तशीं हीं शहरं पुन्हा गजबजूं लागलीं आहेत. वाटेंत लागलेल्या लहान लहान शहरांतूनहि ट्रॅम धावत असलेल्या दिसत होत्या. पाहून जर्मनीनं केवढी प्रगति केली आहे हें न सांगतां समजत होतंच, पण शहरांतल्या या सुखसोयींपेक्षां या शहरांना जोडणारा जो एक प्रचंड रस्ता आहे त्याच्याकडे कोणाचंहि लक्ष वेधल्यावांचून राहत नव्हतं. या भागांतून जाणारा हा रस्ता हिटलरच्या राजवटींत लष्करी वाहतुकीसाठीं मुद्दाम बांधण्यांत आला होता आणि त्याची लांबी एक हजार मैलांपेक्षांहि अधिक आहे! हा एक रस्ता म्हणजे वस्तुतः चार रस्ते आहेत! जाणारे दोन आणि येणारे दोन आणि दोहोंच्यामध्यें मुद्दाम तयार केलेल्या हिरवळीचा अखंड पट्टा! या 'ऑटो-बॅन' (Auto-Bahn) रस्त्यावर येवढी प्रचंड वाहतूक आहे, कीं एकदां उलट दिशेनं जाणाऱ्या मोटारी मोजण्याचा मोह मला झाला आणि मी खरोखरच मोजल्या तों एक मिनिटांत विरुद्ध दिशेनं ३५ मोटारी गेल्या होत्या! आपल्या पुढें जाणाऱ्या मोटारनं आपणाला 'साईड' दिली नाहीं ही तक्रारच इथं नाहीं, कारण ज्याला वेगानं पुढें जायचं असेल त्याच्यासाठीं एक रस्ता रिकामाच असतो! त्या रस्त्यानं पुढें जायचं आणि पुन्हा आपल्या रस्त्यावर यायचं कीं आपल्यापुढंहि कोणाला जायचं असलं तरी रस्ता मोकळा राहतोच! हिटलरच्या राजवटींत माणुसकीला कलंक लावणाऱ्या गोष्टी घडल्या आहेत, पण त्याच राजवटींत हा रस्ताहि बांधला गेला आणि हिटलरची स्मृति पुसून टाकण्याचा कुणी कितीहि प्रयत्न केला तरी 'ऑटो-बॅन' रस्ता हें हिटलरचं स्मारक कांहीं केल्या पुसलं जाणार नाहीं, याबद्दल मी तरी निःशंक आहे!

जर्मनींत प्रवेश केल्यापासून बॉम्बहल्ल्यांनीं उध्वस्त केलेलीं शहरं ज्याप्रमाणें

नजरेंत भरतात तसंच आणखीहि एका गोष्टीकडे आपोआप लक्ष वेधतं. ती गोष्ट म्हणजे ठिकठिकाणीं दिसणारीं युद्धाचीं स्मारकं! 'इथं मागच्या महायुद्धांत अखेरची तुकडी धारातीर्थी पडली', 'इथं शत्रूशीं पहिला मुकाबला झाला', 'इथं दोस्तांनीं जर्मन सैन्याची फळी फोडली', तर 'इथं दोस्तांच्या सैन्याबरोबर जर्मनांनीं दोन हात केले!' प्रत्येक ठिकाणीं प्राणहानि आणि प्रत्येक ठिकाणीं त्या सैनिकांचीं स्मारकं! शरीरावर झालेल्या जखमा बऱ्या झाल्या तरी त्यांची आठवण देणारे वण कायम राहावे तशींच ही स्मारकं मला तशी वाटलीं!

पण उध्वस्त इमारती आणि सैनिकांचीं स्मारकं यांची आठवणहि होत नाहीं ती जर्मनींतलं सुप्रसिद्ध काळं रान (Black Forest) सुरू झालं म्हणजे! एकदां मॅनहिम शहरांतून बाहेर पडलं, कीं थोड्या वेळांतच दाट जंगल सुरू होतं आणि तें मैलच्या मैल गेले तरी संपत नाहीं. सूचिपर्ण वृक्षांचीं सरळ, उंच झाडं इतकीं पद्धतशीर लावलेलीं दिसतात, कीं त्या झाडांच्या फटींमधून सरळ मैल-मैल तरी अंतर सहज दिसतं. डोंगरांच्या उतारावरहि या वृक्षांची लागवड केलेली आहे. सूचिपर्णांचा रंगच काळसर असल्यामुळं हें सबंध जंगल काळंभोर दिसतं आणि त्याचं 'ब्लॅक फॉरेस्ट' हें नांव अन्वर्थक वाटतं. डोंगरपठारावर द्राक्षांचे मळे असंख्य आहेत. त्यामुळं थोडा भाग द्राक्षांच्या मळ्यांचा तर थोडा जंगलाचा अशी विभागणी आपोआपच झालेली दिसते. या जंगलाची तोडहि मोठी पद्धतशीर होते. कुठें नवीं झाडं वाढत आहेत, कुठें उंचच उंच उभीं आहेत, तर कुठें मोठीं तोडून त्यांचे यंत्रानं तुकडे केले जात आहेत, अशी दृश्यं अखंड दृष्टीस पडतात. जंगलांतील झाडं तोडलीं जात असतातच, पण नवी लागवडहि सारखी सुरू असते त्यामुळं जंगलाचं सातत्य कायम टिकतं आणि लाकडांची उणीव देशाला भासत नाहीं.

या प्रदेशांत अनेक छोटीं छोटीं गांवं आहेत आणि केवढंहि लहान गांव असलं तरी तिथं सर्व आधुनिक सुखसोयी आहेत, हें जातां जातांहि दृष्टीस पडतं. या गांवांतून वीज तर असतेच पण पोहण्याचे तलाव (Swimming Pools) चित्रपटगृहं आणि छोटींशींच पण सर्व सुखसोयी असलेलीं हॉटेलंहि असतात. या काळ्या जंगलाच्या विभागांत जसजसं पुढं जावं तसतशीं विस्तीर्ण शेतं, खळाळून वाहणारे ओढे, त्यांच्यावरचे छोटे पूल आणि डोंगरपठारावर चरणारीं जनावरं दिसूं लागतात; आणि धुरानं काळवंडलेलीं शहरं, भरधाव जाणाऱ्या मोटारी, उध्वस्त झालेल्या इमारती यांच्यापासून आपण दूर दूर जात आहों असं वाटून मनाला

प्रसन्नता वाटते. हळूहळू सपाटीवरून डोंगरावर रस्ता जाऊं लागतो, शेतं दिसेनाशीं होतात, दाट सूचिपर्ण वृक्षांची गडद छाया पसरूं लागते आणि निसर्गशोभेच्या कुशींत दडलेलीं ट्रिबर्ग (Triberg) आणि शोनवाल्ड (Schonwald) हीं गांवं आलीं, कीं या जगांत एक नव्हे तर दोन महायुद्धं एका पिढींत झालीं होतीं आणि त्यांचा भयानक आघात जर्मनीवर झाला होता याची आठवणहि राहत नाहीं.

शोनवाल्डला तर आम्हांला मुक्कामच करायचा होता. पण आम्ही आलों तेव्हां अंधार पडूं लागला होता आणि म्हणून कुठें बाहेर जाणंहि शक्य नव्हतं. शोनवाल्ड म्हणजे सारं शें-पन्नास घरांचं गांव, पण येवढं नमुनेदार आहे कीं पांचगणीची आठवण व्हावी. मात्र, गांव अगदीं लहान असल्यामुळं रात्रीं रस्त्यावर दिवे लावलेले नव्हते आणि रस्त्यावर माणूसहि क्वचित् दिसे. आम्ही समुद्रसपाटीपासून पुष्कळच उंचावर आलों होतों. हिवाळ्यांत पडलेलं बर्फ, हिवाळा संपून गेला तरी, डोंगर-पठारावर आणि तळ्यांत अजून तसंच होतं. ज्या हॉटेलांत आम्ही उतरलों होतों तिथं द्राक्षांची फार चांगली दारू मिळते हें माहीत झाल्यामुळं आमच्या कोचमधील फारसे लोक बाहेर जायलाच तयार नव्हते! बाहेर जाण्यासाठीं धडपडत होती ती एक सत्तरीच्या घरांतील संसारी स्त्री! प्रत्येक गांवांत मिळणाऱ्या बाहुल्या आपल्या नातीसाठीं ती गोळा करीत होती आणि म्हणून तिला दुकानांत जाऊन बाहुली मिळते काय हें पाहायचं होतं, पण एकहि दुकान उघडं नाहीं हें पाहून ती निराश झाली. 'सकाळीं तरी दुकान उघडेल का?' म्हणून तिनं हॉटेलच्या मालकिणीजवळ चौकशी केली आणि 'उघडलं नाहीं तर तुमच्यासाठीं मी उघडायला सांगेन' असं तिला मालकिणीनं सांगितलं तेव्हां कुठें तिचा जीव भांड्यांत पडला! नेहमींसारखंच हें हॉटेलहि ऐषारामी होतं, पण तिथं साऱ्या स्त्रियाच होत्या! हॉटेलची व्यवस्था स्त्रीच पहात होती, जेवणाचे पदार्थ देखील स्त्रियाच आणून देत होत्या, ग्लासांत मद्य ओतीत होत्या त्याहि स्त्रियाच आणि खोली दाखवयाला येत त्याहि स्त्रियाच! पुरुष एकच होता—आमच्या जड जड बॅगा धापा टाकीत उचलणारा, डोक्यावर अक्षरशः एकहि केंस नसलेला!

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही हॉटेलशेजारच्याच लहानशा टेकडीवर गेलों तेव्हां सूचिपर्ण वृक्षांच्या दाट छायेंत डोंगरपठारावर वसलेलं हें छोटंसंच गांव मला विलक्षण शांत वाटलं आणि आजच्या जगांतली गडबड, धांदल, धावपळ यांच्या-पासून अलिप्त राहिलेल्या या भूभागापासून निघून जातांना माझ्या मनांत आलं, 'निसर्गाच्या कुशींत केवढं सौख्य आहे!' या डोंगरमाथ्यावरून आमचा कोच

हळूहळू खालीं उतरूं लागला, दाट झाडी कमी होऊं लागली, हिरव्यागार गवतानं आच्छादिलेल्या माळजमिनी आणि त्यांच्यांतून वाहणारे ओढे दिसूं लागले, तसे पुढच्या सीटवर बसलेल्या सर्जंचे शब्द ऐकूं आले, "Have your passports ready, please" ! (तुमचे पासपोर्ट काढा). पासपोर्ट काढीपर्यंत कोच उभाहि राहिला होता आणि ऐटदार, निळसर रंगाचे युनिफॉर्म घातलेले पोलिस अधिकारी आले होते, तेव्हां स्वित्झर्लंडची सरहद्द आली हें कुणाला सांगावंच लागलं नाहीं.

तुमचा,

वि. वा. पत्की

: २० :

# युरोप-दर्शन—४

★

६ सॉंडर्स ग्रव्ह,
लंडन (डब्ल्यू. ११)
१ जून, १९५६

प्रिय बाळासाहेब,

सुपीक भूमि किंवा प्रचंड कारखाने यांचा अभाव असतांहि एखादा देश विलक्षण भरभराटीला कसा येऊं शकतो याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे स्वित्झर्लंड. भूमीची सेवा करणारा शेतकरी आणि कारखान्यांत घाम गाळणारा मजूर हें जगांतील संपत्ति निर्माण करतात हें खोटं नाहीं, पण निसर्गाची संपन्नता आणि मानवाची कल्पकता राष्ट्राचं वैभव कसं वाढवितात हें पाहायचं असेल तर स्वित्झर्लंडकडेच पाहावं लागेल. वास्तविक स्वित्झर्लंड हा चिमुकला पंचेचाळीस लाख वस्तीचा देश, पण सदैव बर्फानं आच्छादलेले डोंगरमाथे, प्रचंड जलसंचय आणि मानवी कल्पकतेनं या दोहोंचाहि उपयोग करून उपलब्ध करून दिलेल्या सुखसोयी—यामुळं युरोपांतल्याच नव्हे तर जगांतल्या सर्व लोकांचंच लक्ष या देशानं आज शतकानुशतकं आपल्याकडे वेधून घेतलेलं आहे.

स्वित्झर्लंडमध्यें प्रवेश केल्यापासूनच निसर्गशोभेची मोहिनी मनावर पसरूं लागते. हिरव्यागार गवतानं आच्छादिलेल्या माळजमिनी आणि बर्फानं आच्छादिलेलीं पर्वतशिखरं संपतां संपतच नाहींत. त्यांतच मधून मधून वाहणारे ओढे आणि डोंगरपठारावर उभे असलेले, सदैव हिरवेगार दिसणारे सूचिपर्ण वृक्ष! छोटीं छोटीं गांवंसुद्धां बाहेरून येणाऱ्या माणसाला मोह वाटावा इतक्या सुखसोयींनीं समृद्ध असलेलीं दिसतात. अशीं अनेक गांवं ओलांडून आमचा कोच स्वित्झर्लंडच्या हद्दींत प्रथम थांबला तो एका धबधब्याजवळ! हें शॅफॉसेन (Schaffhausen)

शहर होतं. या शहरामधून ऱ्हाईन नदी वाहत जातांना दिसते आणि गांव संपलं, कीं एका कड्यावरून खालीं उडी घेते ! वास्तविक हा धबधबा कांहीं फार मोठा नाहीं. सारा शंभर फूट उंच आणि तीनशें सत्तर फूट लांब, पण युरोपांत येवढाहि मोठा धबधबा नाहीं, त्यामुळं युरोपांतले सारे प्रवासी हा धबधबा पाहायला बाराहि महिने एकच गर्दी करून सोडतात. मात्र तो पाहतां यावा अशी मोठी छान व्यवस्था इथं केलेली आहे. धबधब्याच्या अगदीं जवळ जातां यावं असे गच्ची-सारखे भाग मुद्दाम बांधलेले आहेत आणि त्यांच्यावर जाऊन उभं राहिलं, कीं अंगावर येणाऱ्या जलतुषारांचं सौख्य हवं तेवढं लुटतां येतं आणि हें पाहून मन कंटाळलंच तर मनाची प्रसन्नता वाढविणारं बादशाही उपाहारगृहं शेजारींच आहे ! किंबहुना जसजसं पुढें पुढें जावं तसतशीं युरोपांत उपाहारगृहांची मोठी नमुनेदार व्यवस्था असते हें लक्षांत येऊं लागतं. तऱ्हेतऱ्हेच्या रंगीबेरंगी फुलांनीं आच्छादि-लेल्या मांडवाखालीं टेबलं आणि खुर्च्या मांडलेल्या असतात आणि सेवातत्पर नोकरांची धांवपळ सारखी सुरू असते. मागितलेलीं खाद्यपेयं क्षणांत पुढ्यांत येतात आणि तुमची इच्छा असो वा नसो, प्रत्येक व्यक्तीकडून खाद्यपेयांच्या बिलाबरोबरच 'टिप्' वसूल करायला या सेविका कधीं विसरत नाहींत ! स्वित्झ-लँडमधल्या या पहिल्याच मुक्कामांत कॉफीच्या कपाला एक स्विस फ्रँक (सुमारें सव्वा रुपया) पडतो आणि कुणाला आपणाजवळ शिल्लक असलेलीं जर्मन नाणीं खपवायचीं असलीं तर तींहि इथं घेतलीं जातात असं कळलं तेव्हां अनेकांनीं उरलेलीं नाणीं खपविण्यासाठीं नको असलेलीं पेयं आणि खाद्यं घेतलीं आणि खिशाचा भार हलका केला !

शॅफॉसेनच्या धबधब्यापासून झुरिच या स्वित्सलँडमधील सर्वांत मोठ्या शहरांत येईपर्यंतचा मधला तीस-चाळीस मैलांचा प्रदेश, डोंगरउतारावरची वस्ती, क्वचित् दिसणाऱ्या शेतजमिनी, खळखळून वाहणारे ओढे, उंचच उंच सूचिपर्ण वृक्ष आणि सर्वत्र पसरलेला हिरवळीचा मऊमऊ गालिचा यांनीं व्यापलेला आहे. प्रत्यक्ष झुरिच शहरांत आल्यावरच स्वित्झर्लँडच्या वैभवाची खरी कल्पना येते. आंतरराष्ट्रीय दळणवळणाचा भव्य विमानतळ मागं टाकून शहराकडे येऊं लागलं कीं झुरिच तलावाचा विस्तार दृष्टीस पडूं लागतो. गांवातून वाहणारी लिमा (Limmat) नदी वेडीं-वाकडीं वळणं घेत वाहत असलेली दिसते आणि प्रत्यक्ष गांव आलं, कीं तें इतकं स्वच्छ वाटतं कीं इतकं स्वच्छ शहर असूं शकतं याचा अचंबा वाटतो. शहरांत आल्यावर झुरिच तलावाचा विस्तार

तर येवढा पसरलेला दिसतो, कीं हा तलाव नसून छोटासा समुद्रच आहे असं वाटूं लागतं. आम्ही या शहरांत आलों तेव्हां युरोपांत दुर्मिळ असलेलं प्रसन्न ऊन पसरलं होतं आणि आकाशांत एकहि ढग नव्हता. मला गंमत वाटली ती निळ्या रंगाची. गांवांतल्या ट्रॅम निळ्या रंगाच्या होत्या, स्त्री-पुरुषांचे कपडे निळ्या रंगाचे होते, तलावांतल्या नौकांना निळा रंग दिलेला होता, नदीचं पाणी निळसर होतं, तलावांत गडद् निळा रंग मिसळल्याचा भास होत होता आणि वर पसरलं होतं तेंहि निळं निळं आकाश! लिमा नदीच्या संथ प्रवाहांत क्रीडा करणारे अनेक तऱ्हेचे पांढरेशुभ्र पक्षी, तलावांतल्या असंख्य नौका आणि प्रसन्न उन्हांत मोकळेपणानं फिरणारे स्त्री-पुरुष हें झुरिचचं चित्र माझ्या मनावर तरी कायमचं उमटलं आहे. बागांची गर्दी तर शहरांत इतकी झालेली आहे, कीं लोकांच्या निसर्गप्रीतीचा मला तरी हा पुरावाच वाटला. हिंवाळा संपल्याला अजून फारसा काळ लोटलेला नव्हता तरीहि बागांतल्या झाडांवर हिरवे पिंवळे पल्लव आणि हिरवळींत फुललेली पांढरीं–तांबडीं फुलं दिसत तेव्हां पानांफुलांतून वसंत हसूं लागला होता, हें उघड दिसत होतं. झुरीचला आम्ही आलों, त्या दिवशीं गुड्‌फ्रायडे असल्यामुळं सारीं दुकानं बंद होतीं, पण युरोपांतल्या पद्धतीप्रमाणें शो-रूम्समध्यें सर्व वस्तू मांडलेल्या असल्यामुळं दुकानं बंद आहेत हें लक्षांतहि येत नव्हतं. उलट, सुटीचा दिवस असल्यामुळं रस्त्यावर, नदीच्या आणि तलावाच्या कांठावर फिरणाऱ्या लोकांची विलक्षण गर्दी होती आणि प्रशस्त आणि उघड्या उपाहारगृहांतून गिऱ्हाइकांची वर्दळ सारखी सुरू होती. युरोपांतल्याच नव्हे तर जगांतल्या पदच्युत राजे–राण्या आणि निरनिराळ्या राजवटींत छळलीं गेलेलीं कर्तबगार माणसं यांचं स्वित्झर्लंड हें आज शतकानुशतकं आश्रयस्थान झालेलं आहे आणि यांतले अनेक लोक झूरिचलाच येऊन राहिलेले होते, त्यामुळं जगांतले नाना विचारप्रवाह आणि संस्कृती यांचा मोठा मनोहर संगम या शहरांत झाला आहे. प्रशस्त रुंद रस्ते, अनेक प्रार्थनामंदिरं, आधुनिक बांधणीच्या सुंदर इमारती, दूरवर पसरलेला विस्तीर्ण तलाव, हिरव्यागार बागा आणि त्यांत फुललेलीं नाना रंगांचीं फुलं आणि गांवांतून संथपणें वाहणारी लिमा नदी— या दृश्याचा निरोप घेतांना वाटलं, "स्वित्झर्लंडनं जगाला वेड लावलं तें उगीच नाहीं!" झुरिच शहर मागं टाकून पुढें पुढें जावं तशी सूचिपर्ण वृक्षांचीं दाट जंगलं लागतात आणि पद्धतशीर कापलेलीं झाडं आणि हिरवीगार वनश्री यांच्या या प्रदेशांत छोट्या छोट्या घरांचे पुंजके इतस्ततः पसरलेले दिसतात—अगदीं

ल्यूसर्न या शौकिनांच्या प्रसिद्ध शहरांत येईपर्यंत !

पण ल्यूसर्न (Lucerne) मध्यें आलं, कीं आतांपर्यंत पाहिलेल्या निसर्गसौंदर्यांची आठवणहि होऊं नये इतकीं नवीं वेधक दृश्यं डोळ्यांपुढें उभीं राहतात. सुमारें साडेचारशें चौरस मैल विस्तार असलेला प्रचंड तलाव, सभोंवतीं बर्फाच्छादित आल्प्स पर्वताचीं गगनचुंबी शिखरं आणि तलावाच्या कांठावर सर्व दिशांना पसरलेलं अद्यावत् बांधणीचं ल्यूसर्न शहर पाहिलं, कीं जगांतील साऱ्या कोलाहला-पासून निसर्गरम्य, शांत, प्रसन्न वातावरणांत आपण आलों आहों याची खात्री पटते आणि सकाळच्या पहिल्या प्रहरांत तर दूरवर पसरलेल्या शांत जलाशयांत शेजारींच उभ्या असलेल्या माउंट पिलॅटस (Mount Pilatus) च्या बर्फाच्छादित शिखरांचं जें प्रतिबिंब दिसतं त्याची शोभा अपूर्व वाटते. पर्वताचीं पांढरींशुभ्र शिखरं, उतारावरील हिरवेगार सूचिपर्ण वृक्ष, निळं निळं पाणी, इमारतींना दिलेले पिंवळे-सोनेरी रंग आणि तळ्याच्या कांठावरील बागांतून फुललेलीं असंख्य रंगांचीं फुलं पाहिलीं, कीं निसर्गातल्या साऱ्या रंगांचं संमेलनच भरल्यासारखं वाटतं आणि शहरांतल्या कोपऱ्याकोपऱ्यांवरच्या कारंजांच्या तुषारांतून निर्माण होणाऱ्या इंद्रधनुष्याच्या रंगांमधून हीं दृश्यं पाहिलीं, कीं पृथ्वीवर स्वर्ग आल्यासारखं वाटतं. निदान कल्पनेंतला स्वर्ग यापेक्षां कितीसा निराळा असेल याची मग कल्पनाच करवत नाहीं !

तसं पाहिलं तर ल्यूसर्न शहर लोकसंख्येनं फारसं मोठं नाहीं. सारी साठ हजार लोकसंख्या आहे या शहराची. पण मार्च ते ऑक्टोबर या काळांत रोजची लोक-संख्या सरासरीनं दोन लक्ष असते ! सुमारें दीड लाख लोक या शहरांत रोजच नवे आल्यामुळं त्यांना राहण्यासाठीं प्रशस्त हॉटेलं, फिरण्यासाठीं झाडांच्या गर्द छाया असलेल्या बागा, मोटारींच्या रस्त्यांपेक्षांहि रुंद असलेले फूटपाथ, करमणुकीसाठीं नृत्य आणि चित्रपटगृहं यांची एकच गर्दी या शहरांत झालेली आहे. किंबहुना, प्रवाशांना सर्व सुखसोयी उपलब्ध करून देणं (tourism) हाच स्वित्झर्लंडमधला प्रमुख राष्ट्रीय धंदा असल्यामुळं आलेल्या प्रवाशांचीं मनं हरप्रयत्नांनीं उल्हसित कशीं ठेवायचीं ही कला स्विस् लोकांच्या रक्तांतच पिढ्यान्‌पिढ्या भिनली आहे. बाजारांत गेल्याबरोबर चटकन् लक्ष वेधतं तें घड्याळांच्या दुकानांकडे. स्वित्झर्लंड म्हटलं कीं घड्याळ आठवावं इतकी ख्याति स्वित्झर्लंडच्या घड्याळांनीं मिळविली आहे. जगांत असं एकहि गांव मिळणार नाहीं कीं ज्या ठिकाणीं स्वित्झर्लंडमधलं घड्याळ मिळ-णार नाहीं. या देशांतून दरसाल सुमारें अडीच कोटि घड्याळं जगाच्या बाजार–

पेटांत जातात, यावरून संपत्तीचा केवढा ओघ अव्याहतपणें या देशाकडे वाहत असेल, कल्पना करा! तरीहि घड्याळांचा हा खप वाढावा अशी दक्षता सारा देश घेत असतो. घड्याळ तयार करणं हा आपला राष्ट्रीय धंदा आहे, हें ओळखून तो वाढविण्यासाठीं प्रत्येक जण झटत असतो. "You are in Switzerland; Don't forget to buy a watch" अशा पाट्या तर सर्वत्र दिसतातच, पण परदेशांतील प्रवासी ज्या ठिकाणीं उतरलेले असतात त्या ठिकाणचीं स्नानगृहं, बसावयाचे दिवाणखाने, झोपायच्या खोल्या, जेवणाच्या टेबलांवरचे टेबलक्लॉथ, फार काय पण जेवणाच्या पदार्थांची जी यादी (Menu) वेटर हातांत आणून देतो तिच्यावरहि घड्याळं करणाऱ्या एखाद्या कल्पक कारागिराचं चरित्र सर्व भाषांत छापलेलं असतं!

बाहेरून येणाऱ्या प्रवाशांसाठीं करमणुकीचे निरनिराळे कार्यक्रम असतातच, पण तलावांत जलविहारासाठीं केलेल्या सोयी मोठ्या गंमतीच्या आहेत. इंजिनं बसविलेल्या लहानमोठ्या जलनौका तर आहेतच, पण दोघां दोघांना फिरतां येण्यासारख्या सायकलीचं पॅडल बसविलेल्या विमानाच्या आकाराच्या छोट्या होड्या अगदीं अल्प दरांत मिळतात. आमच्या ट्रिपमधील कांहीं जण अशा होड्या घेऊन गेले होते, पण इतरांच्यासाठीं योजलेला कार्यक्रम याहूनहि रोमांचकारी होता. एका मोटार–बोटींतून आम्ही चार-पांच मैलांवर असलेल्या मॅटग्रॅट (Mattgrat) या दोन हजार फूट उंचावर असलेल्या शिखराच्या पायथ्याशीं गेलों आणि या डोंगरावर गेलों ते चार सीटस् असलेल्या एरिअल केबल कार-मधून! ज्या निमुळत्या कड्यावर आम्हांला जायचं होतं तिथं जायला रस्ता मुळींच नव्हता, पण पायथ्यापासून वरच्या टोकापर्यंत एक भलीमोठी पोलादी दोरी ताणून तिच्यावरून खालून वर सरकत जाणारा एक छोटासा बंद डबाच होता म्हणा ना! आम्ही चार चार जणांच्या गटांनीं वर गेलों तेव्हां वर जातांना जमीन सोडून विमानच हळूहळू अंतरळांत जात आहेसं वाटत होतं आणि खालीं पाहिलं कीं भयाण दरी दिसत होती! या शिखरावरून ल्यूसर्नचा सारा तलाव आणि सर्व बाजूंना पसरलेलं शहर दिसतं आणि प्रवाशांना अशा ठिकाणीं आणून पैसे मिळविणाऱ्यांच्या कल्पकतेचं मोठं नवल वाटतं.

आम्ही मॅटग्रॅटला गेलों त्याच दिवशीं रात्रीं खास प्रवाशांसाठीं ठरविण्यांत आलेला स्विस् लोकगीतांचा आणि लोकनृत्याचा कार्यक्रम तर एरिएल केबल-कारच्या अनुभवापेक्षांहि मोठा आल्हादक होता. दिवसा पोस्टमनचं काम करणाऱ्या

फ्रँक हुग नांवाच्या एका कलावंतानं आपल्या जोडीदारांच्या साहाय्यानं नृत्य आणि लोकगीतं यांनीं प्रेक्षकांचं रंजन केलंच, पण ज्या उंचच उंच सूचिपर्ण झाडांचीं दाट जंगलं या आल्प्सच्या भागांत आहेत त्या झाडापासून तयार केलेलं बारा फूट लांबीचं शिंग (Alpine horn) त्यानं वाजवून दाखविलं, या झाडापासून तयार केलेल्या चमच्यांच्या साहाय्यानं वाद्यवादन केलं आणि स्विझर्लंडच्या खेड्यापाड्यांतून सूचिपर्ण झाडांच्या फळ्यांची फरशी जमिनीवर घालतात तिच्यावर केर काढूं लागलं म्हणजे कसा "ब्रुम्-ब्रुन्" आवाज होतो आणि त्यावरूनच झाडूला "ब्रूम्" (Broom) शब्द कसा रूढ झाला याची मोठी गंमतीदार कहाणी आपल्या मोडक्या-तोडक्या इंग्रजी भाषेंत सांगितली. प्रेक्षकांना कांहीं समजलं नाहींसं वाटलं, कीं प्रत्येक वेळीं 'Any Question ?' असं तो विचारी, तेव्हांचे त्याचे शब्दोच्चार येवढे मजेदार वाटत, कीं आमच्या प्रवासांत पुढें पुढें आमचा कुरिअर नवीन माहिती सांगून झाली, कीं 'Any Question ?' म्हणूं लागला आणि सारे जण खो खो हसूं लागले. 'केबलकारनं केलेला प्रवास आणि फ्रँक हुगचा करमणुकीचा कार्यक्रम यांच्यामुळं 'तुम्ही स्वित्झर्लंडमध्यें आहां, घड्याळ विकत घ्यायला विसरूं नका' अशा पाट्या दिसत असतांहि घड्याळाची आठवण कुणाला झाली नाहीं आणि हे कार्यक्रम आटोपून आम्ही परत आलों तेव्हां रात्रीचा एक वाजला होता ! इतके सुंदर कार्यक्रम आंखल्याबद्दल मी झोंपायला जाण्यापूर्वीं आमच्या कुरिअर-जवळ आनंद व्यक्त केला तेव्हां तो म्हणाला, "हें तर कांहींच नाहीं ! स्वित्झर्लंड-मधली खरी गंमत अजून तुम्हांला पाहायचीच आहे !"

सर्जचे हे शब्द किती सार्थ होते हें दुसऱ्या दिवशीं सकाळींच ल्यूसर्नमधलं 'पॅनोरमा' ( Panorama ) हें भव्य चित्र आम्ही पाहायला गेलों तेव्हां लक्षांत आलं. १८७०–७१ सालच्या फ्रेंच-प्रशियन युद्धांत फ्रेंच सैन्याची जेव्हां पिछेहाट झाली तेव्हां तें आश्रयासाठीं स्वित्झर्लंडच्या एका गांवांत आलं, त्या वेळचं हृदय-द्रावक दृश्य चित्रित करणारं 'ग्रँड पॅनोरमा' हें एक भव्य चित्र आहे. त्या अखंड चित्रानं एक मोठी इमारतच व्यापली आहे, कारण त्याचा विस्तार अकरा हजार चौरस फूट आहे ! जगांतील अत्यंत मोठ्या चित्रांत त्याची गणना होते. सुमारें दहा चित्रकारांना हें चित्र रंगवायला दहा वर्षें लागलीं आहेत. हें चित्र वास्तववादी वाटावं म्हणून सैनिकांच्या आकृती खऱ्याखुऱ्या आकृतीयेवढ्या ( Life-size ) आहेतच, पण ज्या आगगाडींतून हे सैनिक आले त्या गाडीच्या डब्यांपैकीं एक डबा खरोखरच रुळावर उभा केलेला आहे आणि त्याला जोडून इतर डबे

आकृतींनीं दाखविलेले आहेत, ते इतके हुबेहुब आहेत कीं खरा डबा कोणता आणि चित्रं कोणतीं हें चट्‌कन लक्षांतहि येऊं नये ! ज्या गांवांत हें सैन्य आलं त्या गांवांतल्या प्रार्थनामंदिराचं लोकांनीं हॉस्पिटलांत कसं रूपांतर केलं आणि आपल्याकडे आलेल्या आश्रितांची स्विस् लोकांनीं सर्व प्रकारें मदत करून केवढी काळजी घेतली याचं मूर्तिमंत चित्र हा देखावा डोळ्यांपुढें उभा करतो ! हें चित्र वर्तुळाकार भिंतीला लावलेलं आहे आणि तें सबंध पाहण्यासाठीं स्वतःभोंवतींच संपूर्ण प्रदक्षिणा घालावी लागते. स्विस् लोकांची परोपकारवृत्ति लोकांच्या निदर्शनास आणावी या हेतूनं रंगविलेलं हें चित्र आपल्या भव्यपणामुळं कलाकृतीचा एक उत्कृष्ट नमुना ठरलं आणि आज एक अतिप्रचंड चित्र म्हणून तें ओळखलं जातं.

ल्यूसर्ननंतर पुढच्या प्रवासाला सुरुवात करण्यापूर्वी दोन दिवस आम्ही ज्या प्रासादतुल्य हॉटेलांत राहिलों होतों, तिथं आलों तों हॉटेलचा मॅनेजर दारांत उकडलेलीं अंडीं एका छोट्याशा टोपलींत घेऊन दारांत उभा ! ईस्टरमधला आज रविवार होता आणि आपणाकडे आलेल्यांना उकडलेलीं अंडीं देऊन मॅनेजर निरोप घेत होता. ज्यांना हा शिष्टाचार माहीत नव्हता त्यांनीं या प्रकारची माहिती देणाऱ्या सर्जकडे प्रश्नार्थक दृष्टि वळविली तेव्हां 'Any Question?' असं विचारून त्यानं एकच हंशा पिकविला! अशा या प्रसन्न वातावरणांत आम्हीं ल्यूसर्न सोडलं तें कितीहि पाहिलं तरी दृष्टीची तृप्ति होत नव्हती अशा तळ्याकडे, बर्फाच्छादित पिलॅटस पर्वतशिखराकडे आणि या अद्यावत् नगरीकडे पाहत पाहतच !

ल्यूसर्न सोडून थोडं पुढें गेलं, कीं पुन्हा उंचच उंच झाडं आणि पर्वतशिखरांच्या श्रेणी यांची मालिकाच सुरू होते. सपाटीवरून रस्ता डोंगरावर चढूं लागतो तो अखेर तीन हजार फूट उंचीवर असलेल्या बुनिग खिंडी (Brunig Pass) पर्यंत. उंच कड्यावर जाणारा रस्ता येवढ्या कौशल्यानं कोरलेला आहे, कीं स्थापत्यशास्त्रांतील अद्वितीय कौशल्यांचा नमुना म्हणूनच हा रस्ता ओळखला जातो. एका बाजूला भयाण, खोल दरी, तर दुसऱ्या बाजूला गगनचुंबी पर्वतशिखरं! डोंगरमाथ्यावर अजून पांढरंशुभ्र बर्फ तसंच होतं आणि पायथ्याशीं असलेल्या तळ्यांतलं पाणी पुष्कळच कमी झालेलं दिसत होतं, पण उद्यां बर्फ वितळूं लागलं कीं हें तळं भरून जाणार होतं, पुन्हा त्या पाण्याची वाफ होऊन बर्फ पडणार होतं आणि हा क्रम असा वर्षानुवर्षे चालणार होता. बुनिग खिंडींत आल्याबरोबर पुन्हा दुसऱ्या बाजूला उतार सुरू होतो. हा सबंध रस्ता येवढा भीतिदायक आहे, कीं कधीं अपघात घडलाच तर जवळपास मदत मिळणंहि

अशक्य आहे, यासाठीं या रस्त्यावर सर्वत्र टेलिफोनच्या पेट्या ठेवलेल्या आहेत. म्हणजे कधीं जरूर पडलीच तर टेलिफोन करून तात्काळ मदत मागवितां येते. कांहीं वर्षांपूर्वी या भागांत सबंध डोंगरच्या डोंगर एका गांवावर कोसळून तें गांव जिवंत माणसांसहित गाडलं गेलं होतं आणि म्हणूनच आतां जो उभा आहे तोहि मृत्युगिरि (Mountain of Death) या नांवानंच ओळखला जातो! एका बाजूला कड्यावरून उड्या घेणारे धबधबे आणि दुसऱ्या बाजूला लांबवर पसरलेलं तळं हें दृश्य अखंड आहे. मात्र आल्प्स पर्वताचीं बर्फाच्छादित शिखरं पाहाण्यासाठीं मान उंच करावीच लागली नाहीं! खालीं शांत तळ्यांत पर्वतशिखरांचं प्रतिबिंब पडलं होतं आणि विरल धुक्याच्या आवरणामुळं हें असामान्य जलसौंदर्य निसर्गानं झांकून ठेवल्यासारखं वाटत होतं!

इंटर—लाकेन (Inter-Laken) येईपर्यंत ही तलावाची सोबत आहेच, पण या शहराच्या पुढेंहि लगेच दुसऱ्या मोठ्या तलावाची सुरवात होते. ब्रिएंझ (Brienz) व थन (Thun) या दोन तलावांच्या सांध्यावरच हें शहर वसलेलं आहे आणि म्हणूनच 'दोन तळ्यांना जोडणारं' असं नांव त्याला त्याच्या स्थानामुळंच मिळालं आहे. हा सगळा प्रदेश बर्न (Berne) या स्वित्झर्लंडच्या राजधानीच्या वरच्या बाजूस असल्यामुळं (Bernese Oberland) या नांवानं ओळखला जातो आणि इंटर-लाकेन या विभागाच्या मध्यभागीं असल्यामुळं आजूबाजूच्या प्रदेशांतील प्रेक्षणीय स्थळं पाहण्यास सोयिस्कर ठिकाण म्हणून त्याचं महत्त्व आपोआपच वाढलं आहे.

या प्रदेशांतील ग्रिंडलवॉल्ड (Grindelwald) हें ठिकाण आल्प्स पर्वताच्या कुशींत असल्यामुळं निसर्गशोभेचं माहेरघर तर झालं आहेच, पण या ठिकाणीं आल्प्स पर्वताच्या सात हजार फूट उंचीवरील शिखरावर जाण्यासाठीं मानवी कल्पकतेनं जी सोय केली आहे ती युरोपांतच नव्हे, तर जगांतहि अपूर्व आहे असंच म्हणावं लागेल. मॅटग्रॅट (Mattgrat) ला जाण्यासाठीं एरिएल केबल-कारचा जसा उपयोग करण्यांत आला आहे तसा या ठिकाणीं करणं अशक्य असल्यामुळं या ठिकाणीं हवाई खुर्ची (Chair-lift) चा उपयोग करण्यांत आला आहे. जाड पोलादी दोऱ्या जमिनीपासून सुमारें शंभर फूट उंचीवरून मोठमोठ्या लोखंडी खांबांवरून नेण्यांत आल्या आहेत आणि या दोऱ्यांवरून दोन सीट्स् असलेली लोखंडी खुर्ची विजेच्या साहाय्यानं पुढें पुढें सरकत जाण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. पहिल्या खांबापेक्षां दुसरा खांब अधिक उंचीवर, तर

त्याच्या पुढचा त्याच्याहि पेक्षां अधिक उंचीवर, असे वर वर नेलेले आहेत आणि हें एकंदर अंतर सुमारें साडेतीन मैल आहे! एकदां या खुर्चीत बसलं, कीं पुढें एक आडवा दांडा घालून ती बंद केली जाते आणि आपणाला कळण्याच्या आंतच आपण हळूहळू अंतराळांत जाऊं लागतों. निघण्याच्या ठिकाणाहून वर पर्वत-शिखरावर जाईपर्यंत पांच स्टेशनं करण्यांत आलीं आहेत, त्यामुळं वर पोंचेपर्यंत चार वेळां आपण जमिनीवर येतों. तिथं तिकिटं तपासलीं जातात आणि पुन्हा हवाई खुर्ची अंतराळांत वर वर जाते. सामान्यतः हें अंतर फारसं खोल नसतं हें खरं, पण दोन टेकड्यांवर दोन खांब असले आणि मध्यें भयंकर खोल दरी असली कीं खालीं पाहायचा धीरच होत नाहीं! वास्तविक खुर्चीत बसलेला मनुष्य अगदीं सुरक्षित असतो, परंतु खालीं पुष्कळच खोलवर जमीन आणि झाडांचे शेंडे दिसत असल्यामुळं भीतीची लकेर मनांत आल्यावांचून राहत नाहीं.


मी अशाच एका खुर्चीत बसून गेलों तो अनुभव खरोखरच अविस्मरणीय आहे. निघण्याच्या ठिकाणीं या खुर्चीत आम्हीं बसलों तेव्हां बारीक बारीक पाऊस पडत होता, पण जसजसे आम्ही वर वर जाऊं लागलों तसं पावसाचं बर्फ झालं होतं आणि सुमारें अर्धा तास हळूहळू वर जाऊन अखेरच्या स्टेशनवर आलों तेव्हां तर सारा भूभाग पांढऱ्याशुभ्र बर्फानं आच्छादलेला होता आणि हवाई खुर्चीत बसतांना आम्हांला अंगावर घेण्यासाठीं मुद्दाम एक जाड, कातडी कोट देण्यांत आला होता तरीहि इतकी भयानक थंडी सात हजार फूटावरील आल्प्स पर्वताच्या या शिखरा-वर होती, कीं सारे हातपाय तर थंडीनं गारठून गेलेच, पण हातापायांच्या बोटांतून थंडीमुळं भयंकर कळा येऊं लागल्या. तथापि या ठिकाणीं आल्यावर आणि तिथल्या उपाहारगृहांत गरम गरम कॉफी घेतल्यावर किती बरं वाटलं असेल तें अनुभवल्या-वांचून कळायचं नाहीं! या कॉफीच्या कपाला दीड स्विस फ्रँक (म्हणजे पावणे दोन रुपये!) पडले, त्यामुळं तर ही गरम कॉफी चांगलीच 'गरम' वाटली! या हवाई खुर्चीला बारा फ्रँक्स (सुमारें १३ रुपये) भाडं द्यावं लागलं तें निराळंच! पण या असामान्य थंडींतहि बर्फावरून घसरत जाण्याचा (Ski-ing) खेळ खेळणारीं अनेक माणसं होतीं आणि त्यांत स्त्रियांची संख्या कांहीं अगदींच कमी नव्हती!

किंबहुना इंटर-लाकेनपासून मॉंट्रो (Montreux) या तितक्याच प्रसिद्ध शहरांत येईपर्यंत बर्फावरून घसरण्याचा खेळ खेळण्यासाठीं इतके लोक आलेले दिसले, कीं या खेळाचं लोकांना येवढं वेड असावं याचं आश्चर्य वाटे. या सबंध प्रदेशांत इतकं


दाट बर्फ पडलेलं होतं, कीं रिकामी जागा अशी कुठें नव्हती. घरांचीं छपरं आणि झाडंझुडपं पांढऱ्याशुभ्र बर्फवृष्टीन झांकलीं गेलीं होतींच, पण निष्पर्ण वृक्षांच्या चिमुकल्या फांद्यांनींहि अंतराळांतून पडणारे हिमकण आपल्या अंगावर घेऊन आपली काळी काया झांकून टाकली होती. डोंगराच्या उतारावरून बर्फांतून खालीं घसरत येण्यासाठीं मुद्दाम 'स्काय लिफ्ट' बांधलेले अनेक ठिकाणीं दिसत होते आणि समुद्रकिनाऱ्यावर खेळणारीं मुलं वाळूचे गोळे करून एकमेकांच्या अंगावर फेकण्याचा खेळ खेळतात तसे बर्फाचे गोळे एकमेकांच्या अंगावर मारण्यांत वयानं वाढलेलीं माणसंहि कमीपणा मानीत नव्हतीं.

स्वित्झर्लंडमधील झुरिच, ल्यूसर्न, इंटरलाकेन, मॉंट्रो, जिनिव्हा, बर्न इत्यादि सर्वच शहरं प्रवासी लोकांचीं आवडतीं आहेत खरीं, पण मॉंट्रोला त्यांतल्या त्यांत श्रीमंत लोकांचा खास आश्रय आहे. पूर्वी तर सारे राजे व राण्या याच शहरांत महिने न् महिने राहत. आतां चित्रसृष्टींत राजा-राणीच्या भूमिका करणारे नट आणि नट्या येऊन राहतात, येवढाच फरक !

श्रीमंतांच्या या आश्रयामुळं इथलीं हॉटेलं येवढीं भव्य आणि प्रशस्त आहेत, कीं राजवाड्यांतच आपण उतरलों आहों असा भास प्रवाशांना व्हावा ! मुसोलिनीचं तर हें फार आवडतं शहर होतं आणि आपल्या पूर्वायुष्यांत तो या ठिकाणच्या एका हॉटेलांत वेटर होता म्हणतात ! जिनिव्हा सरोवराच्या एका टोकाला मॉंट्रो तर दुसऱ्या टोकाला जिनिव्हा आणि मध्यें सुमारें पन्नास मैल लांबीचा समुद्रासारखा दिसणारा तलाव या भौगोलिक वैशिष्ट्यामुळं ल्यूसर्नप्रमाणेंच या शहरांतहि नौकाविहाराच्या अनेक सोयी आहेत, तशाच सरोवरच्या किनाऱ्यावर शोभिवंत, प्रशस्त बागा आणि दाट वृक्षच्छायांनीं आच्छादिलेले रस्तेहि अनेक आहेत. मॉंट्रो शहरांत आल्यानंतर चिलॉनचा किल्ला न पाहणं म्हणजे काशीला जाऊन विश्वेश्वराचं दर्शन न घेण्याइतकंच विलक्षण ! तथापि हा किल्ला पाहायला आम्ही गेलों तेव्हां तिथलीं जुनीं शस्त्रास्त्रं आणि चिलखतं पाहून माझं मन तरी यत्किंचितहि हेलावलं नाहीं. मात्र या किल्ल्याच्या अंधाऱ्या भुयारांत राजद्रोहाच्या आरोपाखालीं दगडी खांबाला बांधून एका देशभक्ताला सहा वर्षे ठेवल्यानंतरहि त्याची तत्त्वनिष्ठा कशी ढळली नाहीं ही हकीगत मी ऐकली तेव्हां मात्र माझं मन म्हणालं, 'आज विजेच्या प्रकाशांतहि जिथं भीति वाटते त्या ठिकाणीं पावाचे तुकडे खात सहा वर्षे काढणारा आणि याहि परिस्थितींत आपल्या मतांना चिकटून राहणारा खरंच असामान्य निग्रहाचा तत्त्वनिष्ठ माणूस



स्वित्झर्लंडमध्यें आल्पस पर्वतावर 'चेअर-लिफ्ट 'मधून जातांना
लेखक व डॉ. सातोसकर




स्वित्झर्लंड : सूचिपर्ण वृक्ष आणि बर्फाच्छादित आल्प्स.



पॅरिस :
स्वतंत्रतेचा
पुतळा

पॅरिस .
एफेल टॉवर



असला पाहिजे!' माँट्रो शहराच्या समोरच तळ्याच्या पलीकडे फ्रान्सच्या हद्दींत असलेलं एक छोटंसं शहर आहे आणि त्या ठिकाणीं कृत्रिम मोत्यांची मोठी बाजारपेठ आहे हें कळतांच आमच्या ट्रिपमधील स्त्रियांनीं तिथं गेलंच पाहिजे, असा हट्ट धरला आणि 'कल्चर मोतीं कशीं तयार करतात हें फक्त मी तुम्हांला दाखविणार आहे, तुम्ही कांहीं दुकानांतला माल घ्यावा म्हणून नव्हे!' असं दुकानदारानं म्हटलं तरीहि मोत्यांचे लहानमोठे दागिने विकत न घेणारी स्त्री अपवादादाखलहि सांपडली नाहीं! बाकी, दागिन्यांच्या दुकानांत जाऊन रिक्त-हस्तानं परत येणारी स्त्री आणि स्त्री-गिऱ्हाइकांच्या गळ्यांत त्यांना नको असणाराहि माल कौशल्यानं न बांधणारा जातिवंत दुकानदार, जगांत दुर्मिळच!

स्वित्झर्लंडमधलीं हीं सारीं शहरं पाहतां पाहतां चार दिवस केव्हांच संपले, पण निसर्गशोभा कांहीं संपली नाहीं! छोटीं छोटीं शहरं, तळ्यांच्या कांठावरच्या बागा आणि द्राक्षांचे मळे ओलांडून आम्ही सरहद्दीजवळ आलों तों सर्जनं आमचा कोच मुद्दाम थांबवला आणि एके ठिकाणीं आगगाडीच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना सीमेंटचे मोठमोठे ठोकळे कुंपणासारखे ठेवलेले होते, त्यांच्याकडे अंगुलिनिर्देश करून तो म्हणाला, "पाह्यलंत हें काय आहे तें? तुम्हांला वाटेल, आगगाडीच्या रस्त्याचं संरक्षण व्हावं म्हणून हे ठोकळे ठेवलेले आहेत...छे, छे, तसं मुळींच नाहीं! स्विस् लोकांनीं ही पर्वतांची नवी लागवड सुरू केली आहे! आपल्याला सभोंवतीं जे उंच पर्वत दिसत आहेत ते दरसाल थोडे थोडे झिजत आहेत आणि त्या मातीनं खालचे तलाव भरूं लागले आहेत. स्विस शास्त्रज्ञांचं असं म्हणणं आहे, कीं आणखी ७० लक्ष वर्षांनीं हे डोंगर पार नाहींसे होतील आणि साऱ्या तळ्यांच्या ठिकाणीं जमिनी तयार होतील. उंच उंच बर्फाच्छादित पर्वत आणि मोठमोठीं तळीं नाहींशीं झालीं तर कोण येणार या स्वित्झर्लंडमध्यें? आपला राष्ट्रीय धंदाच तसं झालं तर बुडेल या भीतीनं स्विस् लोकांनीं जुने पर्वत नाहींसे होण्यापूर्वींच नवे निर्माण व्हावे म्हणून पर्वतांची लागवड करण्याची ही मोठी महत्त्वाकांक्षी योजना हातीं घेतली आहे!" सर्जचं म्हणणं सारे जण शांतपणें ऐकत होते. पण अखेर कोच सुरू झाला तेव्हां मला तो हळूच म्हणाला, "असं कांहीं तरी सांगून तुम्हां लोकांना प्रवासाचा कंटाळा येणार नाहीं अशी युक्ति मला योजावीच लागते. कांहीं लोकांना तरी हें सारं खरंच वाटलं असणार!"

हें सारं होतां होतांच फ्रान्सची सरहद्द आली, पासपोर्ट तपासले गेले आणि

तळ्यांचा, घळ्याळांचा, शौकिनांचा आणि वनश्रीचा हा प्रदेश मागं टाकून युरोपच्या विलासनगरीच्या दिशेनं आमचा कोच धावूं लागला, तसा मी मनांतल्या मनांत म्हणालों, 'जन्माला यावं आणि स्वित्झर्लंड पाहावं!'

तुमचा,

वि. वा. पत्की

# युरोप-दर्शन—५

★

६, सॉंडर्स ग्रव्ह,
लंडन (डब्ल्यू. ११)
१६ जून, १९५६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ........................ नों: दि: ............

प्रिय बाळासाहेब,

स्वित्झर्लंडमधील असामान्य निसर्गशोभा मागं टाकून फ्रान्समध्यें प्रवेश केल्याबरोबर जो उजाड, भकास आणि सौंदर्यहीन भूभाग दृष्टीस पडतो त्यामुळं हा विरोध मनाला चटकन् जाणवतो आणि असामान्य सौंदर्य आणि असामान्य कुरूपता एकाच सृष्टीच्या कुशींत कशीं जन्माला येतात याचं मोठं नवल वाटतं. आम्हीं स्वित्झर्लंडची सरहद्द ओलांडून फ्रान्समध्यें प्रवेश केला तो दिवसहि मोठा उत्साहजनक नव्हता. पावसाळी ढग हवेंत यावे आणि सारं वातावरण कुंद होऊन जावं तसं झालं होतं. स्वित्झर्लंडमधील हिरवीगार वनश्री आणि फ्रान्समधील भकास शेतं, स्वित्झर्लंडमधलं प्रसन्न ऊन आणि फ्रान्समधील अभ्राच्छादित आकाश हा फरक मनाला सारखा बोचत होता, पण जगांतलं पॅरिस हें सुंदर शहर पाहायला आपण निघालों आहों म्हणून, पुढ्यांतल्या वाळलेल्या कडब्यापेक्षां बाहेरच्या हिरव्यागार तृणांकुरांकडे पाहणाऱ्या वासरासारखं, मन ओढ घेत होतं !

पण पॅरिस अजून पुष्कळ दूर होतं. आम्ही ज्या बर्गंडी (Burgundy) च्या भागांतून जात होतों, तो भाग द्राक्षांच्या लागवडीबद्दल प्रसिद्ध आहे. पण आम्ही अशा काळांत या भागांतून जात होतों कीं द्राक्षांच्या वेली अजून पल्लवित व्हायच्या होत्या. त्यामुळं नांगरलेल्या शेतजमिनी आणि उद्यां ज्यांच्या आधारानं द्राक्षांच्या वेली उभ्या राहणार होत्या ते लाकडी खुंट यांच्याशिवाय कुठेंच कांहीं दिसत नव्हतं. झाडं पुष्कळ होतीं, पण सारीं पर्णहीन ! मेंढ्यांचे कळप क्वचित् कुठें दिसत

आणि ल्हान ल्हान घरांचे समुदाय आले कीं गांव आलं हें लक्षांत येई. अशीं ल्हान ल्हान गांवं या भागांत अनेक आहेत. किंबहुना हा सारा प्रदेश दृष्टीसमोरून झरझर सरकत असतांना आपण फ्रान्समध्यें आहों कीं पुणें–कोल्हापूर किंवा पुणें-अहमदनर रस्त्यावर आहो हेंच कळेनासं होई—या भागांत अगदीं विरळ लोकवस्ती तर आहेच, पण मोठीं शहरंहि फारशी नाहींत, अगदीं दिजाँ (Dijon) येईपर्यंत ! पण हें शहर आलं कीं आपण पुन्हां गजबजलेल्या शहरांत आलों आहों असं वाटूं लागतं. कारण, एक लाखाहूनहि फारशी अधिक लोकवस्ती नसलेल्या या शहरांत ट्रामगाड्या भरधाव धावत असलेल्या दिसतात आणि फूटपाथवर माणसांची वर्दळ अखंड सुरू असते. फ्रान्सच्या दक्षिण भागांत जाणारे सारे प्रमुख रस्ते आणि लोहमार्ग या शहरांतून जात असल्यामुळं दिजाँ हें एक रहदारीचं मोटं केंद्र झालं आहे आणि एके काळीं तर हें (बर्गंडी)चं राजधानीचं शहर होतं.

इथं दुपारच्या जेवणासाठीं आम्ही एका हॉटेलांत गेलों तेव्हां मात्र आम्ही खरेखुरे फ्रान्समध्यें आलों याची खात्री पटली. कारण या ठिकाणीं ऑरेंज किंवा लेमनपेक्षां दारूच स्वस्त होती ! दारूच्या बाटलीला ५० फ्रँक्स तर ऑरेंजच्या तेवढ्याच आकाराच्या बाटलीला ७० फ्रँक्स ! पुन्हा फ्रेंच नाण्यांचीहि गंमत येथपासून सुरू झाली ! ऑरेंजच्या बाटलीला ७० फ्रँक्स पडतात म्हणजे किती किंमत पडते कांहीं कळत नाहीं, खरं ना ? एका पौंडाला सुमारें एक हजार फ्रँक्स मिळतात हें कोष्टक लक्षांत घेतलं म्हणजे एका ऑरेंजच्या बाटलीला सुमारें एक रुपया पडतो हें लक्षांत येतं आणि फ्रान्समधल्या राहणीच्या मानाची अस्पष्ट अशी कल्पना येऊं लागते. बर्गन्डीमधील प्रसिद्ध दारू आणि तीहि इतकी स्वस्त मिळत असतां तिचा फायदा न घेणारा अगदींच अव्यवहारी असला पाहिजे असं तुम्ही म्हटलंत तर हा अव्यवहारीपणा मान्य करण्यावांचून मला तरी गत्यंतर नाहीं ! दुपारीं आमचा प्रवास पुन्हां सुरू झाला तेव्हांहि पुढच्या चाळीस-पन्नास मैलांत कसलंच नावीन्य दृष्टीस पडलं नाहीं आणि रात्रीं सेंट फ्लोरिन्टिन् (St. Florentin) या गांवांत आम्ही राहिलों तें तर एक अगदींच छोटं शहर होतं. तिथं रस्त्यावर फारशी रहदारी नव्हती आणि हॉटेलांतलं जुनं फर्निचर आणि खोल्यांतल्या विशोभित भिंती स्वित्झर्लंडमधील ल्यूसर्न, इंटरलाकेन किंवा मॉंट्रोमधील राजैश्वर्यांची विरोधामुळं आठवण आणून देत होत्या ! या भागांत इंग्रजी भाषा लोकांना फारशी समजत नव्हती, त्यामुळं जेवणाच्या टेबलावर सुद्धां आमच्या दुभाष्याची मदत घ्यावी लागत होती आणि आपण मागितलेले पदार्थ आले कीं Merci (आभारी आहे) हा एकुलता

एक माहीत असलेला फ्रेंच शब्द उच्चारतांना मोठी धन्यता वाटत होती!

सेंट फ्लोरिन्टिन् सोडून पॅरिसच्या दिशेनं आमचा प्रवास दुसऱ्या दिवशीं सकाळीं सुरू झाला, तेव्हां मात्र सारा मनु पालटला. उजाड शेतांची जागा दाट—नव्हे, घनदाट—जंगलानं घेतली आणि मैलच्या मैल गेले तरी तें संपत नव्हतं. हें फॉंटन ब्ल्यू (Fontain Bleau) चें प्रसिद्ध जंगल होतं आणि या दाट जंगलामधून जाणारा रुंद रस्ता आणखी ठिकठिकाणीं रुंद करण्याचीं कामं सुरू होतीं. हा भाग प्रवासी लोकांचा दिवसेंदिवस आवडता भाग होऊं लागल्यामुळं या रस्त्यावरची रहदारी वर्षानुवर्षं सारखी वाढत आहे आणि म्हणून प्रवाशांना अधिक सुखसोयी उपलब्ध करून देण्याचं धोरण सरकारनं आंखलं आहे. किंबहुना अगोदरच रुंद असलेले रस्ते अधिक रुंद करण्याची प्रवृत्ति ही पाश्चिमात्यांच्या प्रत्येक गोष्टीचा दूरवर विचार करण्याच्या प्रवृत्तीचं मला तरी एक मोठं नमुनेदार उदाहरणच वाटलं. देशाच्या राजकीय पुढाऱ्याची निवड असो, कारखान्यांतला अधिक खपणारा माल असो कीं साधा रहदारीचा रस्ता असो, फार दूरवर पाहून यांतली प्रत्येक गोष्ट पाश्चिमात्य राष्ट्रांत होते, उलट आपण पाहतों ते आजच्या फायद्याकडे! आपला माल अधिक खपतो हें पाहून आपल्याकडचे किती कारखान-दार तो अधिक चांगल्या दर्जाचा निघावा म्हणून दक्षता घेतात याचा विचार करा म्हणजे माझ्या म्हणण्यांतला अभिप्राय तुमच्या लक्षांत येईल!

फॉंटनब्ल्यूचं जंगल संपण्यापूर्वीच या जंगलाच्या जवळ जवळ मध्यावर त्याच नांवाचं शहर आहे आणि या चिमुकल्या शहराकडेहि आज लोकांचं लक्ष वेधलं आहे तें नाटो (N. A. T. O.) या लष्करी संघटनेचं तें मुख्य ठिकाण आहे म्हणून. आम्ही या कचेऱ्यांच्या जवळ आलों तों 'नाटो' या संघटनेंत सामील झालेल्या सर्व राष्ट्रांचीं निशाणं डौलानं फडकत असल्याचं आणि ध्वजवंदनाचा कार्यक्रम सुरू असल्याचं दिसलं, आणि मग समजलं कीं आज ४ एप्रिलचा दिवस असल्यामुळं नाटो संघटनेचा वर्षदिन होता आणि त्या निमित्तानं ध्वजवंदनाचा कार्यक्रम सुरू होता. या कचेऱ्या संपल्या कीं थोड्या वेळांतच गांवाची सुरुवात होते आणि एका भव्य चौकांत फार मोठा जुना राजवाडा दृष्टीस पडतो. हा नेपोलियनचा राजवाडा होता हें त्याच्या अजस्र लोखंडी दारावरच्या मोठ्या गरुडांच्या आकृतीवरून आणि नेपोलियन नांव सूचित करणाऱ्या N या आद्याक्षरावरून सहज लक्षांत येतं.

या शहरांत पाहण्यासारखं कांहीं नव्हतं, म्हणून आम्ही तिथं थांबलों नाहीं हें तर खरंच, पण पॅरिसला जाण्याची उतावीळी झाली होती हेंहि कांहीं खोटं नाहीं.

पुढच्या सीटवर बसलेल्या सर्जनं आतां पॅरिसच्या गोष्टी मायक्रोफोनमधून सांगायला सुरुवात केली होती. पहिलीच गोष्ट त्यानं सांगितली ती अशी, कीं आपण बारा वाजण्याच्या सुमारास पॅरिसमधल्या आपल्या हॉटेलांत जाऊं आणि तिथं आपल्या खोल्या रिझर्व केलेल्या असल्या तरी दुपारीं तीन वाजेपर्यंत त्या तुमच्या ताब्यांत कदाचित् मिळणार नाहींत! 'असं कां?' असं कुणीसं विचारलं तेव्हां त्या व्यक्तीला सरळ सरळ उत्तर देण्याऐवजीं सर्ज म्हणाला, "तें मला विचारूं नका! आपल्या या ट्रिपमध्यें पूर्वी पॅरिसमध्यें राहिलेलीं माणसं आहेत त्यांना विचारा!" आणि ज्यांना सर्जच्या या उद्‌गारांचा गर्भितार्थ कळला तीं सारीं माणसं मोठ्यानं मनमुराद हंसलीं! पण ज्यांना हा अर्थ माहीत नव्हता त्यांना सर्जनं फार वेळ संशयांत ठेवलं नाहीं आणि तो म्हणाला, "पॅरिसचं नाईट-लाईफ (Night-life) पाहायला गेलेलीं माणसं परत येतात तेव्हां रात्रीचे तीन-चार वाजलेले असतात आणि नंतर झोपतात तीं दुपारीं दोन-तीन वाजेपर्यंत!" सर्जनें हें सांगतांच मला कांहीं वर्षांपूर्वी कुठें तरी वाचलेली एक गोष्ट चटकन् आठवली. दोन फ्रेंच माणसं मद्यपान करीत, गप्पा मारीत बसलीं होतीं आणि संध्याकाळीं सुरू केलेलं मद्यपान मध्यरात्र उलटून गेली तरी संपलं नव्हतं. पण किती रात्र झाली याची पर्वा त्यांना होतीच कुठें? मद्याची नशा चढूं लागली तसा त्यांच्या बोलण्यांतला तोल सुटूं लागला, त्यांच्या गप्पांना भांडणाचं स्वरूप येऊं लागलं आणि सध्यां फ्रान्समध्यें कुणाचं मंत्रिमंडळ आहे या प्रश्नावर त्यांचं कांहीं केल्या एकमत होईना! पलीकडच्या खोलींत त्या दिवसाचीं वर्तमानपत्रं होती आणि त्यांत कदाचित् मुख्य मंत्र्याचं नांव सांपडलंहि असतं, पण मद्य सोडून वर्तमानपत्र आणायला जाणार कोण? शेवटीं त्यांनीं ज्याचं मंत्रिमंडळ आहे असं प्रत्येकाला वाटत होतं त्याचं नांव एका कागदावर लिहिलं आणि दुसऱ्या दिवशी जो पैज हरेल त्यानं आजच्या दिवसाचं मद्यपानाचं बिल भागवावं असं ठरलं. पुन्हा त्यांचं मद्यपान सुरू झालं आणि त्या नशेंतच दोघेहि झोपीं गेले. दुसऱ्या दिवशीं दुपारीं दोन वाजल्यानंतर स्वाऱ्या जाग्या झाल्या तेव्हां त्यांना पैजेची आठवण झाली. चटकन् एकजण बाहेर गेला आणि ताजं वर्तमानपत्र घेऊन आला. आणि पाहतात तों काय? दोघांपैकीं एकाचंहि उत्तर बरोबर नव्हतं. कारण त्यांनीं मद्यपान केल्यानंतर जुन्या मंत्रिमंडळानं राजीनामा दिला होता. आणि ते मद्यपानाच्या नशेंतून जागृतावस्थेंत येईपर्यंत तिसऱ्याच गृहस्थाचं नवं मंत्रिमंडळ अधिकारावरहि आलं होतं!

ही हकीगत अतिरंजित असेल, पण काल्पनिक खचित नाहीं. गेल्या वर्षींच फ्रान्सचे त्या वेळचे पंतप्रधान मेंडेस फ्रान्स यांनीं पंडित नेहरूंना ते युरोपांत येत होते याचा फायदा घेऊन फ्रान्सला भेट देण्याचं निमंत्रण दिलं, पण पंडितजी येण्यापूर्वीच त्यांचं मंत्रिमंडळ गडगडलं होतं आणि अखेर केवळ फ्रान्समधील एक सद्‌गृहस्थ या भूमिकेवरून ते पंडितजींना फक्त विमानतळावर भेटले हा इतिहास अगदीं ताजाच आहे कीं! दुपारीं तीन वाजेपर्यंत रिझर्व केलेल्या खोल्याहि ताब्यांत मिळणार नाहींत असं सर्जनं सांगितलं तेव्हां आपण फ्रान्समध्यें आहों याची आठवण झाली ती यामुळंच. आमचा कोच पॅरिसला पोंचण्यापूर्वींच सर्जजवळ सर्वांची घाई चालली होती ती 'नाईट क्लब' चीं तिकिटं रिझर्व करण्याबद्दल! नाईट क्लबला जायचं तर तीन हजार फ्रॅंक्स (सुमारें ४० रुपये!) तिकीट पडणार होतं आणि तिथल्या जीवनाचीं जीं वर्णनं आज इतके दिवस ऐकूं येत होतीं त्यावरून अर्धनग्न किंवा संपूर्ण नग्न स्त्रियांचीं नृत्यं, संगीतिका (opera), उंची मद्य (यासाठीं निराळे पैसे अर्थातच द्यावे लागणार होते!) यांची रेलचेल तिथं असते येवढं माहीत झालं होतं आणि त्यासाठीं सारींजणं येवढीं अधिर झालीं होतीं! किंबहुना पॅरिसला यायचं ते 'नाईट लाइफ' पाहण्यासाठींच असं समीकरण अनेकांनीं मांडलेलं उघड उघड दिसत होतं! 'नाईट क्लब' चीं तिकिटं कुणाकुणाला पाहिजेत असं अखेर सर्जनं विचारलं तेव्हां आम्हां ३० जणांपैकीं तिकिटं नको म्हणणारे माझे मेहुणे आणि मी असे दोघेजणच निघालों! फ्रेंच संगीतिकेला जायचं माझ्या मनांत होतं, पण त्यासाठीं निराळं तिकीट मिळत नव्हतं, फ्रेंच मद्याचा आस्वाद घेण्याची मला इच्छा नव्हती आणि येवढं झाल्यानंतर अर्धनग्न किंवा नग्न स्त्रियांचीं नृत्यं पाहण्यासाठीं ४० रुपये खर्च करायला मी तयार नव्हतों. दारिद्र्यामुळं ज्यांना अर्धनग्न स्थितींत राहावं लागतं अशा स्त्रिया, इच्छा नसतांनाहि, माझ्या भारतांत खेड्यापाड्यांतून दृष्टीस पडत असतां त्यासाठीं येवढा खर्च करण्याची मला आवश्यकता वाटली नाहीं आणि माझे मेहुणे तर धंद्यानं डॉक्टरच होते. हे सारे बेत होतां होतांच आमचा कोच पॅरिसच्या उपनगरांत शिरूं लागला होता. छोट्या छोट्या इमारती, रेंगाळत जाणारीं माणसं, घरांपुढच्या बागांत फुललेलीं फुलं, प्रशस्त रुंद रस्ते आणि पॅरिसचा भव्य विमानतळ आला तेव्हां आम्ही पॅरिसमध्यें आलों हें सांगावंच लागलं नाहीं. विमानतळावर तर जगांतल्या सर्व देशांचीं विमानं होतीं, फार काय भारतांतल्या 'एअर इंडिया' चं विमानहि उभं होतं आणि भारताचं तिरंगी निशाण त्याच्यावर डौलानं फडकत होतं. या

सबंध प्रवासांत भारत दिसला तो पॅरिसच्या विमानतळावर, डौलानं फडकतांना!

पॅरिसमधल्या हॉटेलांत अखेर आम्ही उतरण्यासाठीं आलों तेव्हां खरोखरच आमच्या रिझर्व केलेल्या खोल्यांपैकीं बहुतेक रिकाम्या झालेल्या नव्हत्या, परंतु आम्हां दोघांना जी खोली मिळाली होती ती रिकामी झाली असल्याचं समजलं. आमच्या पूर्वी या खोलींत राहिलेले कदाचित् आमच्याच जातीचे असावे—अरसिक, पॅरिसला माणसं कशासाठीं येतात हें न कळणारे! दुपारच्या जेवणाला थोडा अवकाश होता आणि संध्याकाळीं 'नाईट-लाईफ' नसलं तरी शहर पाहायला जायचं होतं, तेव्हां शक्य तर स्नान करावं म्हणून चौकशी केली तों कळलं कीं इथं स्नानाला ४०० फ्रँक्स (म्हणजे सुमारें ६ रुपये) द्यावे लागतात! लंडनमध्यें आंघोळीसाठीं शिलिंग–दीड शिलिंग (रुपयाभर) खर्च येतो हें मी पाहातच होतों. परंतु युरोपांतील देशांत हा दर वाढत वाढत अखेर पॅरिसमध्यें तो आठ शिलिंगांवर आल्याचं पाहिलं तेव्हां म्हटलं, आतां लंडनला परतल्यावरच स्नान!

दुपारच्या जेवणानंतर पॅरिस दाखविण्याची व्यवस्था ५०० फ्रँक्स दिल्यावर होणार होती म्हणून या ट्रिपमध्येंच सामील होण्याचं आम्हीं ठरविलं आणि एका स्थानिक कंपनीच्या कोचमधून सुमारें दोन–अडीच तासांत पॅरिसमधील सारीं प्रेक्षणीय स्थळं पाहिलीं. राहण्याच्या ठिकाणांहून बाहेर पडलं, कीं पॅरिसमध्यें पहिली गोष्ट लक्षांत येते ती पॅरिसच्या योजनाबद्ध रचनेची. पॅरिसमध्यें मोठमोठे चौक तर इतके आहेत, कीं शहराच्या महापालिकेला तरी त्यांची नक्की संख्या ठाऊक आहे कीं नाहीं कुणास ठाऊक? प्रत्येक चौकांतून निरनिराळ्या दिशांना अनेक रस्ते गेलेले दिसतात आणि प्रत्येक चौकांत एकादा तरी भव्य पुतळा उभा असतोच. या पुतळ्यांत मोठमोठे योद्धे आणि राजकारणी पुरुष यांचे पुतळे आहेतच, पण निव्वळ कलाकृति म्हणून तयार केलेले संपूर्ण नग्न स्त्री-पुरुषांचे पुतळेहि अनेक आहेत. जर्मनींतल्या मॅनहिम शहरांत आणि स्वित्झर्लंडमधल्या झुरिच, ल्यूसर्न, मॉंट्रो या सर्वच शहरांत ग्रीक पुराणांतल्या कथांवर आधारलेले, अर्धा भाग स्त्रीचा किंवा पुरुषाचा आणि आर्धा प्राण्याचा असे, अनेक पुतळे दृष्टीस पडले होते. ल्यूसर्नच्या तळ्याच्या कांठावरील बागांत नग्न स्त्रीचे विशिष्ट पोजमधील पुतळे ठिकठिकाणीं होते, पण ऐन रहदारीच्या चौकांत मध्यभागीं असे पुतळे मात्र पॅरिस शहरांतच आहेत.

पॅरिस शहराच्या मधून सीन नदी वाहात जाते आणि तिच्या दोन्ही कडा आकर्षक रीतीनं बांधून काढलेल्या दिसतात. नदींतून चालणारी वाहतूकहि फार

मोठी आहे. नदीच्या दोन्ही बाजूंवर उंचच उंच झाडं आहेतच, पण दोन्ही बाजूंना उंच झाडं असलेले रस्ते (Boulevards) हें तर पॅरिसचं एक वैशिष्ट्य आहे. अशा रस्त्यांतून फिरतांना भरगच्च भरलेलीं निरनिराळ्या वस्तूंचीं आणि फुलांचीं दुकानं, उपहारगृहं, चित्रपटगृहं एकापाठोपाठ मागं जात होतीं आणि अखेरीस आम्ही येऊन थांबलों ते प्रसिद्ध एफेल टॉवरच्या पुढ्यांत! हा टॉवर म्हणजे पोलादाच्या बांधकामाचा एक अप्रतिम नमुना समजण्यांत येतो आणि त्याची उंची सुमारें २०० फूट आहे. त्याच्या टोकावर जाण्यासाठीं लिफ्ट आहेत आणि मध्यावर एक मद्यगृहहि आहे! या टॉवरच्या बांधकामासाठीं सात हजार टन पोलाद लागलं आहे आणि हा टॉवर म्हणजे पोलादाचं केवढं भक्कम काम होऊं शकतं याचं प्रात्यक्षिकच आहे. हा टॉवर पाहण्यासाठीं पॅरिसमध्यें आलेला प्रत्येक प्रवासी तर येतोच, पण त्याच्या सभोंवतीं असलेल्या हिरव्यागार हिरवळीवर गर्दी असते ती बहुधा शहरांतल्या शौकिनांचीच! गाढवावर बसून त्यांना पिटाळणारीं मुलं आणि त्यांच्या पाठीमागं धावणारे वयस्क स्त्री-पुरुष हें दृश्य तर कायमचंच इथं आहे!

इफेल टॉवरइतकंच प्रवासी लोकांचं दुसरं आकर्षण म्हणजे नोत्रदॅमचं प्रार्थनामंदिर. बाराव्या शतकांत हें प्रार्थना मंदिर बांधलेलं असून तें बांधायला सुमारें १०० वर्षं लागलीं होतीं. प्रार्थनेसाठीं लोकांना एकत्र येतां यावं म्हणून बांधलेला मंदिरांतला हॉल तर येवढा प्रचंड आहे, कीं त्यांत सुमारें दहा हजार माणसं एकाच वेळीं बसूं शकतात. आम्ही या प्रार्थनामंदिरांत गेलों तेव्हां दुपारचे चार वाजलेले होते. आंत भरपूर प्रकाश होता तरीहि किती तरी मेणबत्त्या संथपणें तेवत असलेल्या दिसत होत्या. या प्रार्थना मंदिरांतून बाहेर पडलं, कीं सभोंवतीं निरनिराळ्या खेळण्यांचीं दुकानंच दुकानं दिसतात. आमच्या या ट्रिपमध्यें आपल्या नातीसाठीं गांवोगांवचीं खेळणीं गोळा करणारी जी वृद्ध बाई होती तिला हीं दुकानं पाहून येवढा आनंद झाला कीं काय घेऊं आणि काय नको असं तिला होऊन गेलं आणि आमचा कुरिअर घाई करीत होता, तरीहि तेवढ्या घाईत तिनं जवळजवळ डझनभर खेळणीं खरेदी केलींच!

पण पॅरिसमधल्या जीवनाला खरी सुरुवात होते ती अंधार पडल्यावर! पॅरिसमधल्या 'नाईट क्लबां' तलं नसलं तरी पॅरिसमधलं रस्त्या-रस्त्यावरचं हें 'नाईट लाईफ' मात्र आम्हीं चांगलं रात्रीं अकरा-साडेअकरा वाजेपर्यंत पाहून घेतलं आणि पॅरिसच्या रंगेल जीवनाची थोडी तरी कल्पना आली. कोणत्याहि रस्त्यावर

गेलं तरी मोठमोठीं गरगर फिरणारीं चाकं दिसत होतीं आणि त्यावर जुगाराचे डाव सर्रास सुरू होते. चाकाच्या सभोवतीं क्रमानं आंकडे लिहिलेले होते आणि चाकाला गति दिल्यानंतर आंकड्यांवर भराभर पैसे लावले जात होते आणि गति थांबल्यावर ज्या आंकड्यावर तें स्थिर होत होतं त्याला ते पैसे मिळत होते. हें सगळं रस्तोरस्तीं चाललें होतं. मद्यार्चीं दुकानं आणि नृत्यगृहं भरगच्च भरलेलीं होतींच, पण रस्त्यारस्त्यावर स्त्री-पुरुषांच्या रंगेलपणाला भरती आलेली होती. In Europe, Paris is spelt N-A-U-G-H-T-Y ! असं म्हणण्याचा प्रघात आहे त्याचं प्रत्यंतर ठिकठिकाणीं दिसत होतं आणि त्यांत कांहीं निषिद्ध आहे असं कुणी मानीत नव्हतं. कारण, Paris is always right ! नग्न स्त्रियांचीं आकर्षक रंगाचीं मुखपृष्ठ असलेलीं नियतकालिकं तर दुकानांदुकानांतून झगझगीत दिव्यांच्या प्रकाशांत ठेवलेलीं होतीं. 'नाईट क्लब' मध्यें चालत्याबोलत्या शरीरांचं जें प्रदर्शन होतं (म्हणतात) त्या मानानं हें कांहींच नाहीं असं तज्ज्ञ सांगतात, यावरून 'नाईट लाईफ'ची कांहीं कल्पना करतां आल्यास पाहा! मीं तें पाहिलेलं नाहीं, तेव्हां त्याचं वर्णन करून 'पत्रकारानं ऐकीव माहिती देण्याचा मोह नेहमीं कटाक्षानं टाळला पाहिजे' या ब्रीदाला कलंक कशाला लावूं? आमच्यापैकीं एक जण सपत्नीक या 'नाईट क्लब'ला गेले होते आणि ते तरुण होते, तरीहि "It was all disgusting!" असं दुसऱ्या दिवशीं आमच्या जवळ म्हणत होते यावरून जें काय मत बनेल तें बनवा, यापेक्षां मी तरी काय सांगूं? (ते सपत्नीक गेले होते म्हणूनच असं म्हणतात अशी मल्लिनाथी हळूच एकानं केली, बरं का!) तथापि या सर्व जीवनाचा मोह मोठा अनावर असला पाहिजे असं वाटूं लागतं, कारण दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही पॅरिस सोडलं तेव्हां आमच्या ट्रिपपैकीं दहाबारा व्यक्ती तरी (यांत स्त्रियाहि होत्या!) मागं राहिल्या आणि निघतांना आम्हांलाच त्यांनीं निरोप दिला! एका स्त्रीनं तर चुंबन घेऊनच ड्रायव्हरचा निरोप घेतला!

पॅरिसमधून बाहेर पडल्यानंतर मात्र आतांपर्यंतचा सारा उत्साह पार मावळला. 'नाईट क्लब'हून परत यायला रात्रीं तीन वाजून गेले होते त्यामुळं बहुतेक जण डोळे मिटून बसले होते आणि रोज चालणारी कुजबुज शांत झाली होती. सर्जेहि आज माईकमधून कांहीं सांगत नव्हता, कारण सांगण्यासारखंच कांहीं नव्हतं! सारीं उजाड शेतं आणि पर्णहीन झाडं! कॅलेला येईपर्यंत छोटीं छोटीं गांवं अनेक लागलीं आणि बोलोन (Bologne) शहर तर बॉंबहल्ल्यानं पुष्कळच उध्वस्त

झालेलं दिसलं. पण कॅलेला आल्यावर साऱ्यांची धांदल उडाली ती निरनिराळ्या वस्तू खरेदी करण्यासाठीं ! ज्या वस्तू युरोपांतून इंग्लंडमध्यें आणायला परवाना लागत नव्हता, पण ज्या स्वस्त मिळत होत्या त्या तर बहुतेकांनीं खरेदी केल्याच, पण ज्यांच्यावर कर भरूनहि इंग्लंडपेक्षां स्वस्त मिळत होत्या त्या वस्तूंची खरेदीहि भरपूर झाली. खरेदीसाठीं गेलेल्या स्त्रिया दिलेली वेळ संपत आली तरी परत आल्या नाहींत तेव्हां सर्ज त्यांच्या शोधार्थ गेला आणि कॅलेहून डोव्हरला सुटणारी बोट अखेर आम्ही कशी तरी गांठली !

–आणि बोटींतल्या मऊमऊ कोचमध्यें आरामशीरपणं पडल्यावर अवघ्या दहा दिवसांत केवढा भूभाग आपण पाहिला, केवढं वैचित्र्य आपल्या दृष्टीस पडलं, याचा अंदाज माझं मन घेऊं लागलं. बेल्जिअमचा समुद्रकिनारा, जर्मनीमधील ऱ्हाईनचा प्रदेश आणि काळं रान, स्वित्झर्लंडमधील बर्फाच्छादित पर्वतशिखरं आणि विस्तीर्ण तलाव आणि पॅरिसमधील विविध सौंदर्य स्थळं यांच्या स्मृती मनःकोषांत अगदीं ताज्या होत्या. युरोपांतले चारच देश मीं पाहिले, पण जिकडे जावं तिकडे उत्कृष्ट रस्ते, असंख्य मोटारी, सुंदर छोटीं छोटीं घरं, सुंदर पोषाख केलेले स्त्री-पुरुष माझ्या दृष्टीस पडले होते. दैन्य आणि दारिद्र्य यांची कृष्णच्छाया कुठेंच नव्हती. युरोपचं वैभव दुकानांत, रस्त्यांत, कारखान्यांत, हॉटेलांत, स्त्रीपुरुषांच्या पोषाखांत सर्वत्र दिसलं होतं, त्यामुळं इंग्लिश खाडी ओलांडून लंडनला येईपर्यंत एकच विचार माझ्या मनांत सारखा घिरट्या घालीत होता, 'माझ्या भारतांत हें सारं वैभव कधीं आणि कसं येईल?'

तुमचा,

वि. वा. पत्की

: २२ :

# इंग्लंडांतील वृत्तपत्रव्यवसाय

★

६, सॉडर्स ग्रव्ह,
लंडन (डब्यू. ११)
१० जुलै, १९५६

प्रिय बाळासाहेब,

इंग्लंडचं वर्णन अनेक व्यक्तींनीं अनेक तऱ्हेनं केलेलं आहे. बाराहि महिने हिरव्यागार गवतानं आच्छादलेला या देशांतला भूभाग पाहून हीं 'पाचूचीं बेटं' आहेत असं कुणाला वाटलं आहे, परंपरेला चिकटून राहायची या देशांतल्या लोकांची प्रवृत्ति पाहून हा 'परंपराभिमान्यांचा देश' आहे असं कुणीसं म्हटलं आहे आणि कदाचित् लोकांचीं अनेक कारणांनीं बनलेली व्यवहारी दृष्टि पाहून हा केवळ एक 'दुकानदारांचा देश' आहे असं नेपोलियनला वाटलं असेल. पण यापैकीं खरं काय? कदाचित् यांतलं प्रत्येक वर्णन थोडं-फार खरं असेल, पण हिरवळींचा गालिचा काय इंग्लंडांतच पसरलेला आहे? परंपराभिमानी लोक काय इंग्लिश मातेच्या पोटींच जन्माला येतात? आणि आपल्यापुरतं पाहायची बाजारी वृत्ति काय केवळ इंग्रज माणसाच्या रक्तांतच आहे? आणि हें जर खरं तर 'पाचूचीं बेटं', 'परंपराभिमान्यांचा मुलूख' किंवा 'दुकानदारांचा देश' हीं बिरुदं झिजलेल्या नाण्यांसारखींच निरुपयोगी झालीं आहेत असं कां मानूं नये? निदान, केवळ परंपरेनं चालत आलेलं या देशाचं हें वर्णन आजहि कितीसं खरं आहे हा प्रश्न माझ्या मनांत तरी अनेक वेळां येऊन गेला आहे. विशेषतः या देशांतलीं वृत्तपत्रं, त्यांचा खप, त्यांचा लोकमतावरील प्रभाव आणि त्यांचा व्याप जसजसा मी पाहात आहे तसतसं आजपर्यंत अनेकांनीं अनेक तऱ्हेनं केलेलं या देशाचं वर्णन अपुरं आहे असं मला वाटूं

लागलं आहे आणि म्हणूनच इंग्लंडचं वर्णन नव्या काळाला साजेसं करायचं मीं ठरविलं तर मी खात्रीनं म्हणेन—"इंग्लंड हा वृत्तपत्रांचा देश आहे!"

इंग्लंडला वृत्तपत्रांचा देश म्हणावं असं खरोखरच वृत्तपत्रांचं महत्त्व या देशांत आहे आणि या देशांतला वृत्तपत्रांचा खप तर जगांतल्या कोणत्याहि इतर देशापेक्षां अधिक आहे. सुमारें एक कोटी लोकसंख्या असलेल्या एकट्या लंडन शहरांतच वर्तमानपत्रांचे रोज सुमारें दीड कोटि अंक खपतात ही गोष्ट अनेकांना खरी-सुद्धां वाटणार नाहीं. जगांत वृत्तपत्रांचा खप किती होतो ही माहिती जेव्हां गोळा करण्यांत आली तेव्हां इंग्लंडांत दर हजार माणसांपाठीमागं ५९८ अंक खपतात असं दिसून आलं, तर हेंच प्रमाण लक्झेंबुर्गमध्यें ४४१, ऑस्ट्रेलियांत ४४० आणि अमेरिकेंत ३५६ आहे असं दिसून आलं. इंग्लंडची लोकसंख्या सुमारें ५ कोटि आहे आणि या देशांत रोज सुमारें तीन कोटि अंक खपतात हें खरं वाटेल तुम्हांला? दैनिकांच्या या खपाशिवाय रविवारचीं साप्ताहिकंहि या देशांत बेसुमार खपतात. या साप्ताहिकांचा खप साडेतीन कोटि आहे. खपाचं हें प्रमाण लोकसंख्येच्या मानानं तर जगांत पहिलं आहेच, पण जगांतील सर्वांत अधिक खप असलेलं 'न्यूज ऑफ दि वर्ल्ड' हें साप्ताहिक आणि 'डेली मिरर' हें दैनिक लंडन शहरांतच निघतं. 'न्यूज ऑफ दि वर्ल्ड' चा खप ८० लाख आहे, तर 'डेली मिरर' चा खप ५० लाख आहे. सकाळ असो कीं संध्याकाळ असो, प्रत्येक व्यक्तीच्या हातांत सकाळचं किंवा संध्याकाळचं वर्तमानपत्र हें असायचंच. ही इथं पद्धतच आहे. लोक गाडींतून किंवा बसमधून प्रवास करतांना हातांतलं वर्तमानपत्र उघडून सारखं वाचीत असतात, कोणी कोणाशीं एक शब्द बोलेल तर शपथ! इंग्रज माणसाला फारसं बोलायला नको असतं असं मी इंग्लंडला येण्यापूर्वीं ऐकलं होतं, पण स्वभावतःच त्याला अघळपघळ बोलायला नको असल्यामुळं तो वर्तमानपत्र वाचीत असतो, कीं वर्तमानपत्राच्या वाचनांत गुंतल्यामुळं त्याला बोलायला सवड नसते, हें कोडं आतां नऊ-दहा महिने लंडनमध्यें राहिल्यानंतरहि मला अजून तरी सुटलेलं नाहीं!

इंग्लंडांतल्या वर्तमानपत्रांचे खपावरून पाडण्यांत आलेले राष्ट्रीय (National) आणि प्रांतीय (Provincial) असे दोन मुख्य भाग मानले जातात, पण या शद्बांची काटेकोर व्याख्या मात्र करतां यायची नाहीं. लंडनमध्यें प्रसिद्ध होऊन साऱ्या देशभर खपणारीं असा 'राष्ट्रीय' पत्रांचा अर्थ मानला जातो, उलट लहान लहान शहरांत निघणाऱ्या वृत्तपत्रांना 'प्रांतीय' म्हणतात. पण मँचेस्टर या

शहरांत प्रसिद्ध होऊनहि साऱ्या देशभर खपणारं 'मँचेस्टर गार्डियन' हें पत्र आहे, आणि अजूनहि वृत्तपत्रसृष्टींतील कर्मठ धंदेवाईक त्या पत्राला राष्ट्रीय पत्र मानीत नाहींत, पण या पत्रानं जो खप मिळविला आहे त्यावरून जाणते लोक निःशंकपणें राष्ट्रीय पत्रांतच आतां त्याची गणना करतात. खपावरून 'राष्ट्रीय' आणि 'प्रांतीय' हें वर्गीकरण जसं करण्यांत येतं, तसंच पत्राच्या एकंदर वृत्तीवरून तें भारदस्त (Quality) पत्र आहे कीं, लोकांच्या अभिरुचि चाळविणारं (Popular) पत्र आहे कीं खळबळजनक सचित्र बातम्या देणारं (Tabloid) पत्र आहे असं वर्गीकरण करण्यांत येतं. राष्ट्रीय पत्र म्हणून जीं वृत्तपत्रं ओळखलीं जातात त्यांतील 'टाईम्स', 'डेली टेलिग्राफ' आणि 'मँचेस्टर गार्डियन' हीं पत्रं भारदस्त पत्रं म्हणून ओळखलीं जातात. 'डेली एक्सप्रेस', 'डेली मेल', 'डेली हेरल्ड', 'न्यूज क्रानिकल' आणि 'डेली वर्कर' ही लोकांच्या अभिरुचीला बळी पडलेलीं असं मानतात, तर 'डेली मिरर' आणि 'डेली स्केच' हीं दैनिकं गुन्हे, लैंगिक विषय आणि खळबळजनक गोष्टी यांच्या सचित्र बातम्या देण्याबद्दल प्रसिद्ध आहेत. या सर्व दैनिकांत 'डेली मिरर' चा खप सर्वांत अधिक म्हणजे सुमारें ५० लाख आहे. त्याच्या खालोखाल 'डेली एक्सप्रेस' हें पत्र खपतं, कारण त्याचा खप सुमारें ४० लाख आहे. 'डेली मेल'चा खप २० लाख, 'डेली स्केच'चा १५ लाख, 'डेली हेरल्ड'चा १८ लाख, 'न्यूज क्रॉनिकल'चा १४ लाख, 'डेली टेलिग्राफ'चा १० लाख, 'टाईम्स'चा तीन लाख, 'मँचेस्टर गार्डियन'चा दोन लाख व 'डेली वर्कर'चा सुमारें एक लाख आहे. त्याशिवाय लाखांनीं खप असलेलीं प्रांतीय वृत्तपत्रं आहेत. या देशांत सुमारें १५० दैनिकं, २० रविवारचीं साप्ताहिकं, सुमारें १५ इतर साप्ताहिकं आणि सुमारें ४,००० नियतकालिकं निघतात आणि त्यांचा खप कोटींनीं होतो हें लक्षांत घेतलं म्हणजे इंग्लंडला वृत्तपत्रांचा देश असं मी कां म्हणतों तें तुमच्या लक्षांत येईल.

या वृत्तपत्रांत सर्व मतांचीं आणि राजकीय पक्षांचीं पत्रं आहेत, पण कांहीं कांहीं वृत्तपत्रांचे राजकीय रंग ओळखतां येण्याइतके स्पष्ट आहेत. सर्वांत मोठ्या खपाचं 'डेली मिरर' मुख्यतः डाव्या गटाला व मजूर पक्षाला पाठिंबा देतं, तर लॉर्ड बीवरब्रुकचं 'डेली एक्सप्रेस' हें चाळीस लाख खपाचं पत्र हुजूर पक्षाची तरफदारी तर सदा करतंच, पण अजूनहि ब्रिटिश साम्राज्याच्या कल्पनांच्या प्रसारांत दंग असतं. परवांच इथं राष्ट्रकुलांतील पंतप्रधानांची परिषद झाली ना, तिचं वर्णन डेली एक्सप्रेसनं सर्वांच्या प्रमाणें Commonwealth Prime

Ministers' Conference असं न करतां Empire Prime Ministers' Conference या शब्दांनीं केलं होतं आणि ब्रिटिश राष्ट्रकुलांतील देशांतील महत्त्वाच्या बातम्या हें पत्र दररोज Empire News या सदराखालीं संकलित स्वरूपांत देत असतं. 'डेली टेलिग्राफ', 'डेली स्केच' हीं पत्रंहि हुजूर पक्षीयांना पाठिंबा देतात, तर 'डेली हेरल्ड' मजूर पक्षाला उचलून धरतं. 'डेली वर्कर' हें एकच पत्र कम्युनिस्ट पक्षाची द्वाही फिरवीत असतं, तर 'न्यूज क्रॉनिकल' आणि 'मँचेस्टर गार्डियन' हीं पत्रं उदारमतवादित्वाची ध्वजा फडकवितात. या मेळ्यांत कोणत्याहि मताच्या पुरस्कारासाठीं हातांत निशाण न धरणारं एकच पत्र आहे. तें म्हणजे टाईम्स. तें स्वतंत्रमतवादी पत्र म्हणून ओळखलं जातं आणि कोणत्याहि घटनेचा वस्तुस्थिति-निदर्शक (factual) वृत्तांत वाचावा तर तो टाईम्समध्येंच अशी कीर्ति त्यानं संपादन केली आहे.

या देशांतला एकेका वर्तमानपत्राचा खप लाखांनीं मोजावा लागतो, याचा परिणाम येथील वृत्तपत्रांच्या एकंदर व्यवस्थेवरहि आपोआप झाला आहे. रोज दहा, पंधरा, पंचवीस, पन्नास लाख प्रती छापाव्या लागत असल्यामुळं आणि त्यांची पृष्ठसंख्याहि बारा, सोळा, वीस अशी असल्यामुळं एक व्यक्ति केवढीहि मोठी असली तरी या व्यापाची आर्थिक जबाबदारी पेलूंच शकत नाहीं. यामुळंच इंग्लंडांतील या शेंकडों वृत्तपत्रांपैकीं संपूर्ण खाजगी मालकीचं पत्र असं वृत्तपत्र जवळजवळ नाहींच असं म्हटलं तरी चालेल. जवळजवळ सर्वच वर्तमान-पत्रं हीं 'जॉईन्ट–स्टॉक' कंपन्यामार्फत चालविलीं जातात आणि अशा कंपन्या मग देशांतल्या अनेक वृत्तपत्रांची मालकी सांभाळूं शकतात. दोनचार उदाहरणंच तुम्हांला सांगतों म्हणजे या प्रचंड व्यापाची तुम्हांला कल्पना येईल. केम्स्ले (Kemsley), नॉर्थक्लिफ (Northcliff), वेस्टमिन्स्टर (Westminster) या संस्थांमार्फत एकाच वेळीं अनेक दैनिकं, सायंदैनिकं आणि साप्ताहिकं चालविलीं जातात. केम्सले संस्थेमार्फत एक राष्ट्रीय साप्ताहिक, ६ प्रांतीय दैनिकं, ९ प्रांतीय सायंदैनिकं, ६ प्रांतीय साप्ताहिकं आणि ९ इतर सप्ताहिकं चालविलीं जातात आणि यांपैकीं प्रत्येकाचा खप लाखांनींच मोजावा लागतो. लार्ड नॉथक्लिफ् यांच्या संस्थेमार्फत १७ वृत्तपत्रं निघतात, तर वेस्टमिन्स्टर संस्था ४६ वृत्तपत्रं चालविते! केम्स्ले संस्थेचं शेअर भांडवल सुमारें ९० लाख पौंड ( सुमारें बारा कोटी रुपये) आहे आणि इतर संस्थांचं भांडवलहि कोटि रुपयांनींच मोजावं लागेल! सामा-न्यतः एकेक पौंडाचे शेअर काढलेले असतात व अशा रीतीनं भांडवल उभं

केलेलं असतं. या सगळ्या गोष्टींचा परिणाम पत्रांच्या धोरणावरहि आपोआपच होतो आणि वैयक्तिक हेवेदावे आणि असभ्य शिवीगाळ यांना वृत्तपत्रसृष्टींत स्थानच उरत नाहीं. अमुक एका व्यक्तीवर हल्ला करण्यापेक्षां त्याच्या विचारसरणीवर प्रहार करण्याची भूमिका वृत्तपत्राकडे यामुळं येत जाते आणि वृत्तपत्रांचा दर्जा सुधारण्यास मदत होते. मोठमोठ्या संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या सांखळींतील वर्तमानपत्रांचा धंद्यावर अनिष्ट परिणाम होतो अशी तक्रार गेल्या महायुद्धानंतर ऐकू येऊं लागली तेव्हां वृत्तपत्रांची मालकी, बातम्या देण्याच्या पद्धती आणि समाजांतील वृत्तपत्रांचं कार्य यांचा सामग्र्यानं विचार करण्याकरितां सरकारनं एक रॉयल कमिशनच १९४७ सालीं नेमलं होतं. त्यानंहि इंग्लंडमधील वृत्तपत्र व्यवसाय हा कोणत्याहि दृष्टीनं कमी दर्जाचा नाहीं असा अभिप्राय व्यक्त केला आणि या व्यवसायाच्या सर्वांगीण सुधारणेसाठीं अनेक योजनाहि सुचविल्या.

इंग्लंडांतील सकाळच्या दैनिकाप्रमाणेंच सायंदैनिकं आणि साप्ताहिकंहि मोठीं कर्तबगार आहेत. खुद्द लंडन शहरांत इव्हिनिंग न्यूज (Evening News), स्टार (Star), व इव्हिनिंग स्टँडर्ड (Evening Standard) अशीं तीन सायंदैनिकं निघतात आणि त्यांचा खप अनुक्रमें १६ लाख, १२ लाख आणि ८ लाख असा आहे. याचा सरळ अर्थ असा, कीं नोकरीवरून परत जाणारी प्रत्येक स्त्री आणि पुरुष जातांना एकेक तरी वर्तमानपत्र घेऊन घरीं जातो. ट्यूब स्टेशनवर कधींहि संध्याकाळीं उभं राहिलं, कीं प्रत्येक व्यक्ति एकेक अंक घेतांना दिसते आणि वाचीत वाचीतच प्रवास करते. मात्र सायंदैनिक म्हटलं म्हणून तें संध्याकाळींच निघतं असं समजूं नका हं! सकाळीं साडे दहा वाजले, कीं सायंदैनिकांची पहिली आवृत्ति रस्त्यावर दिसूं लागते आणि अखेरची आवृत्ति साडेचारला निघते. दरम्यान तासातासाला आवृत्त्या निघतात आणि दुपारच्या जेवणाच्या वेळीं निघणारी आवृत्ति (Lunch Hour Edition) तर भरमसाट खपते. सनसनाटी बातम्या, फोटो, मुलाखती, शर्यतींचे निकाल यांची एकच धमाल या सायंदैनिकांत उडालेली असते. यांची पृष्ठसंख्या सामान्यतः १६ किंवा २० असते आणि रस्त्यावर मोठमोठे फलक लावून त्यांच्यावर महत्त्वाच्या बातम्या दिलेल्या असतात. अनेक ठिकाणीं अंकांचे ढीग रचून ठेवलेले असतात. गिऱ्हाईक अंक घेऊन शेजारच्या पेटींत पैसे टाकतं आणि पैसे दिल्याबद्दल ती पेटी आभार मानीत असते, कारण तिच्यावर Thank You अशीं अक्षरं असतात! बातम्या देणारीं लंडन शहरांतील साप्ताहिकं आणि दैनिकं यांच्यामध्यें जणुं एक अलिखित करार आहे. रविवारीं सर्व दैनिकं

बंद असतात आणि बातम्या देणारीं सर्व साप्ताहिकं रविवारींच निघतात. 'न्यूज ऑफ दि वर्ल्ड', 'संडे पिक्टोरिअल', 'संडे टाईम्स', 'ऑब्झर्व्हर', 'संडे ग्राफिक', 'पीपल' अशीं किती तरी साप्ताहिकं रविवारीं निघतात. जगांतील शनिवारीं घडणाऱ्या घडामोडी तर हीं देतातच, पण पुस्तक-परीक्षणं, चित्रपट-समीक्षा, नाट्यावलोकन, क्रिकेट, गोल्फ, बुद्धिबळ, ब्रिज, स्त्रियांचं कलाकौशल्य इत्यादि विषयांवरचीं खास अधिकारी व्यक्तींनीं लिहिलेलीं सदरं त्यांत असतात आणि प्रत्येक सदराचा खास वाचक वर्ग निर्माण झालेला असतो. यांतलं एखादं सदर एखाद्या आठवड्यास आलं नाहीं तर वाचक वर्ग संपादकावर तुटून पडतो आणि गंमत म्हणजे आपल्यावर खरमरीत टीका करणारीं हीं वाचकांचीं पत्रं संपादक पुढच्या अंकांत प्रसिद्ध करतात! त्याशिवाय, खास विषयास वाहिलेलीं 'इकॉनमिस्ट', 'न्यू स्टेट्स्मन अँड नेशन', 'स्पेक्टेटर', 'जॉन बुल' इत्यादि साप्ताहिकं आणि खास स्त्रियांच्यासाठीं चालविलेलीं 'वूमन', 'वूमन्स ओन' इत्यादि साप्ताहिकं आहेतच! स्त्रियांच्या या साप्ताहिकांचा एकेकाचा खप वीस वीस लाखांपेक्षां अधिक आहे!

या सर्व वृत्तपत्रांचा साद्यंत इतिहास सांगायचा झाला तर वीस-पंचवीस खंडांचा ज्ञानकोशच लिहावा लागेल. किंबहुना इंग्लंडांतील बहुतेक सर्व मोठ्या पत्रांना आतां दीडशें-दोनशें वर्षं झालेलीं असल्यामुळं कोणत्या ना कोणत्या प्रसंगानं प्रत्येकानं आपला समग्र इतिहास, कार्यपद्धति आणि कर्तृत्व सांगण्यासाठीं ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. या सर्वांची माहिती तुम्हांला कशी सांगूं? पण कानामागून येऊन तिखट झालेल्या त्रेपन्न वर्षं वयाच्या 'डेली मिरर' या जगांतल्या सर्वांत अधिक खपाच्या दैनिकाची हकीकत मीं तुम्हांला वानगीदाखल सांगितली तर ब्रिटिश वृत्तपत्रांच्या डोळे दिपविणाऱ्या वैभवाची थोडी तरी कल्पना तुम्हांला येईल, म्हणून तीच एक कहाणी सांगतों.

'डेली मिरर' पत्र १९०३ सालीं लॉर्ड नॉर्थक्लिक या महत्त्वाकांक्षी गृहस्थांनीं 'खास स्त्रियांचं दैनिक' म्हणून काढलं आणि एका स्त्रीची संपादकत्वावर नेमणूक केली. हें पत्र काढण्यापूर्वी नॉर्थक्लिफ यांनीं त्याची इतकी जाहिरात केली, कीं एक नवं, बाणेदार पत्र जन्माला येत आहे याची जाणीव प्रत्येक सुबुद्ध व्यक्तीला झाली. 'डेली मिरर' हें पत्र निघणार आहे हें अजूनहि कोणाला कळलं नसेल तर तो बहिरा, मुका किंवा आंधळा (किंवा तिन्ही) असला पाहिजे, असं नॉर्थक्लिफ म्हणत असत. अखेर २ नोव्हेंबर १९०३ या दिवशीं हें पत्र निघालं तेव्हां त्याच्या

पहिल्याच दिवशीं २,६५,००० प्रती खपल्या! तथापि त्यानंतरच्या तीन महिन्यांत हा खप रोडावत रोडावत अखेर २५ हजारांवर आला तेव्हां आपलं कुठें तरी चुकलं असं नॉर्थक्लिफला वाटलं. त्यानं एका पुरुषाची संपादकपदावर नेमणूक केली आणि 'डेली मिरर' हें नुसतं 'वृत्तपत्र' न ठेवतां पहिलं 'चित्रपत्र' करायचं त्यानं ठरवलं. अनेक छायाचित्रकार नेमण्यांत आले आणि जगांत ज्या ज्या ठिकाणीं कांहींहि महत्वाचं घडत होतं त्याची चित्ररूप कहाणी वाचकांना मिळूं लागली. याचा परिणाम असा झाला कीं पत्राचा खप दिवसेंदिवस वाढून पहिल्या महायुद्धाच्या सुरुवातीला तो १० लाखांवर गेला.

पहिल्या महायुद्धानंतर खप वाढायला मात्र पत्राचं राजकीय धोरणच बव्हंशानं कारणीभूत झालं. या काळांत हिटलरचा उदय युरोपांत होऊन त्याच्या कर्तृत्वाची प्रभा फाकूं लागली होती. या प्रकाशानं अनेक जण दिपून गेले होते पण ही नवशक्ति मानव जातीचा अखेर घात करील असा प्रचार 'डेली मिरर'नं सुरू केला तेव्हां हिटलरला संतुष्ट करण्यासाठीं पराकाष्ठा करणाऱ्यांना तें रुचलं नाहीं. इंग्लंडच्या या धोरणावर प्रखर टीकेच्या आसूडाचे फटके मारण्यास 'डेली मिरर'नं प्रारंभ करतांच सरकारला तें आवडलं नाहीं, पण 'डेली मिरर'नंहि आपलं व्रत सोडलं नाहीं. तोंच दुसरं महायुद्ध आलं. हिटलरला कडवा विरोध करायला ही उत्कृष्ट संधि आहे हें ओळखून युद्ध सुरू झाल्यापासून चोवीस तासांच्या आंत या पत्रानं आपल्या पत्राच्या एका सबंध पृष्ठावर फरारी गुन्हेगारांच्या जाहिराती जशा लावतात तशीच जाहिरात लावली :

**WANTED**

For Murder .. For Kidnapping
For Theft ..... For Arson

Adolf Hitler

This Reckless Criminal Is Wanted
Dead or Alive.

या बातमीनं एकच कल्लोळ उसळला. हिटलरला संतुष्ट करणं हा वेडेपणा आहे हें आपलं म्हणणं पत्रानं सारखं लोकांच्या दृष्टीसमोर ठेवलं आणि सरकार ज्या ज्या वेळीं नमतं घेत आहे असं वाटलं त्या त्या वेळीं सरकारवर कडाडून टीका केली. या वेळपर्यंत चेंबरलेनच्या ऐवजीं चर्चिल हे मुख्य मंत्री झाले होते आणि

हिटलरला कडवा विरोध करणारे चर्चिल तेंच धोरण चालवीत आहेत असं दिसतांच 'डेली मिरर'नं चर्चिलवरहि टीकेचे प्रहार करायला कमी केलं नाहीं. 'तुम्ही युद्धप्रयत्नांत अडथळे निर्माण करीत आहां' असें चर्चिलनं पत्राच्या संचालकांना म्हटलं तेव्हां 'देशभक्तीचा मक्ता कांहीं तुम्हांला आणि तुमच्या मंत्रिमंडळालाच दिलेला नाहीं' असं खरमरीत उत्तर सेसिल किंग या गृहस्थांनीं चर्चिलला दिलं! या सर्व गोष्टींचा परिणाम पत्राच्या खपावर येवढा झाला, कीं १९४० सालीं असलेला १६ लाखांचा खप १९४६ सालीं ३४ लाखांवर गेला आणि सुरुवातीपासून या पत्राशीं खपाच्या बाबतींत स्पर्धा करणारं 'डेली एक्सप्रेस' पत्र मागं पडलं तें आजपर्यंत! कारण आज 'डेली मिरर'चा खप ५० लाख तर 'डेली एक्सप्रेस'चा ४० लाख आहे. हें फक्त एका पत्राचं कर्तृत्व उदाहरण म्हणून तुम्हांला सांगितलं! वास्तविक 'डेली मिरर' हें कांहीं भारदस्त पत्र नाहीं, पण लोकमतावर या पत्राचा येवढा विलक्षण प्रभाव आहे, कीं देशांत कोणत्या पक्षाचं सरकार यावं हें ठरविण्याचं विलक्षण सामर्थ्य या पत्राच्या ठिकाणीं आहे. हा अनुभव १९४५ सालीं इंग्लंडला आलेला आहे.

किंबहुना लोकमतावर किंवा सरकारवर विलक्षण दडपण आणण्याचं सामर्थ्य ब्रिटिश पत्रव्यवसायांत आहे, असं म्हणणंहि अतिशयोक्तीचं होईल असं मला वाटत नाहीं. देशांत कोणत्या पक्षाचं सरकार यावं याबद्दल वाचकांचे कौल घेत घेत आपलं मत प्रभावी बनविण्याचं एक शास्त्रच इथं बनलं आहे. एकाद्या पक्षाचं नेतृत्व कोणाकडे जावं हेंहि अखेर हीं वृत्तपत्रेंच ठरवितात, या गोष्टीवर आपल्याकडे कुणाचा विश्वासहि बसणार नाहीं! गेल्या वर्षीच, मजूर पक्षानं आतां नवा नेता निवडावा, ॲटली आतां फार म्हातारे झाले आहेत, नवं नेतृत्व निर्माण झालं पाहिजे अशी मोहीम वृत्तपत्रांनीं सुरू केली आणि अखेर ॲटलींना मजूरपक्षाच्या नेतृपदाचा राजीनामा द्यावा लागला! दैनिक वृत्तपत्रं रोज इतक्या प्रश्नावर वाचकांचीं मतं प्रसिद्ध करतात कीं आश्चर्य वाटावं. त्या मानानं आपल्याकडे वाचक जीं पत्रं संपादकांना लिहितात तीं वाचलीं कीं आमचा सामान्य माणूस अजून कोणत्या अवस्थेंत आहे याची कल्पना येते. आमच्या गल्लींत म्युनिसिपालिटीचा दिवा नाहीं, तगाई अर्ज केल्याला सहा महिने झाले तरी उत्तर येत नाहीं, आमच्या गांवाला पोस्टाची सोय नाहीं, या रस्त्यावर एस्. टी. सुरू कां करीत नाहीं, या प्रश्नांच्या पलीकडे आमचा वाचकवर्ग अजून फारसा गेलेला नाहीं याचं प्रत्यंतर आपल्याकडचं कोणतंहि दैनिक उघडल्यावर तात्काल येतं.

याच्या उलट, इकडच्या दैनिकांत वाचकांचीं जीं पत्रं प्रसिद्ध होतात त्यांत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रश्नांची चर्चा असते, सरकारच्या धोरणाचा पुरस्कार केलेला किंवा समाचार घेतलेला असतो आणि सरकारलाहि लक्षांत घ्याव्या लागतील अशा विधायक सूचना असतात.

वृत्तपत्रांचं वैभव किंवा वाचकांची चिकित्सक वृत्ति ही केवळ यदृच्छया आलेली नाहीं. शिक्षणप्रसारामुळं वाचकवर्ग वाढत गेला हें निर्विवाद आहे. आज दोन व्यक्तींना एक वृत्तपत्र असं इथं प्रमाण आहे. पण शंभर वर्षांपूर्वी तें ३० व्यक्तींना एक असं होतं आणि लोक निरक्षर असल्यामुळं लोकांना वृत्तपत्रं वाचून दाखवावीं लागत किंवा त्यांचं सामुदायिक वाचन होई. १८७० च्या सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्यानं साराच मनु पालटला. वृत्तपत्रांचा खप जसजसा वाढत गेला, तसतशी त्यांच्यामधील स्पर्धाहि वाढत गेली आणि अत्यंत वेधक स्वरूपांत वृत्त-पत्रं काढणाऱ्यांच्या अंगीं असामान्य वृत्तपत्रलेखनचातुर्य असणं आवश्यक होऊन बसलं. तथापि, हें चातुर्य येण्यासाठीं वृत्तपत्रव्यवसायांत शिरणारी व्यक्ति उच्चविद्याविभूषित असली पाहिजे असं प्रेस कमिशननंहि आपल्या रिपोर्टांत म्हटलं आहे. याच्या उलट, पत्रकार हा कवीप्रमाणेंच जन्मावा लागतो असं मानणारीं माणसं या देशांतहि आहेत. वृत्तपत्रलेखन हें व्यवसाय करतां करतांच येतं असं ते म्हणतात आणि वृत्तपत्रलेखनाचं शिक्षण देण्याची कल्पनाच त्यांना हास्यास्पद वाटे. पण हें शिक्षण देतां येईल, येवढंच नव्हे तर वृत्तपत्रव्यवसायाला तें पोषक होईल असं मानणारीं जीं माणसं होतीं त्यांनीं लंडन युनिव्हर्सिटींत याचा एक अभ्यासक्रम आंखला आणि त्याचा फायदा गेलीं ३०–३५ वर्षं वृत्तपत्र-व्यवसायाला मिळत आहे. गेल्या महायुद्धाच्या काळांत हा अभ्यासक्रम बंद पडला होता, परंतु त्यानंतर तो पॉलिटेक्निक या संस्थेनं पुन्हा सुरू केला. या शिक्षण-क्रमांतून विद्यार्थी बाहेर पडण्यापूर्वीच वृत्तपत्रं त्याला आपल्याकडे ओढून घेतात या एकाच गोष्टीवरून या अभ्यासक्रमाची उपयुक्तता उघड होईल. कलेचं ज्ञान हें केवळ पुस्तकी असूं शकत नाहीं हें खरं असलं तरी त्या कलेचंहि एक शास्त्र असतं आणि त्याचं ज्ञान या कलोपासकांना उपयुक्त ठरतं हें विसरून चालणार नाहीं. तर्कशास्त्राची माहिती नसणारीं माणसंहि सुसंगतपणें विचार करतात हें खरं, पण विचारांच्या सुसंगतीचं एक शास्त्र आहे हें ओळखून त्याचा अभ्यास करणाऱ्याला विचारपद्धतींतले दोष आकलन होऊन सुसंगत विचार मांडण्यास सुलभ जातं, तसंच वृत्तपत्रलेखनाचंहि आहे.

इंग्लंडांतील वृत्तपत्रांत काम करणारीं माणसं हें चातुर्य तर अंगीं आणण्यासाठीं झटतात, पण बातम्या मिळविण्यासाठीं प्रसंगीं आपला जीवहि धोक्यांत घालतात. तथापि, खळबळजनक बातमी खास आपल्या पत्रासाठीं मिळविण्यासाठीं इंग्लंडांतले पत्रकार जें धाडस आणि जी कल्पकता दाखवितात तिला जगांत इतरत्र क्वचितच तोड सांपडेल. तीन-चार महिन्यांपूर्वींच येथील 'संडे टाईम्स' या साप्ताहिकाच्या खास बातमीदारानं केवढी खळबळजनक बातमी आपल्या पत्रासाठीं कल्पकतेनं मिळविली तें सांगूं तुम्हांला? तीन महिन्यांपूर्वींच रशियाचे नेते बुल्गॉनिन आणि क्रुश्चेव्ह इथं आले होते, माहीत आहे तुम्हांला. तथापि ते येण्यापूर्वीं आपल्या वाचकांना रशियांतील जीवनाची पार्श्वभूमि कळावी, तिथल्या पंचवार्षिक योजनांची माहिती आपल्या वाचकांना व्हावी म्हणून 'संडे टाईम्स'नं रिचर्ड ह्यूजिस या आपल्या खास बातमीदाराला रशियांत पाठविलं होतं आणि आजच्या रशियाची कल्पना देणारे लेख त्यानं दहा आठवडे रशियाची पाहणी केल्यानंतर पाठवावे असं त्याला सांगण्यांत आलं होतं. ह्यूजिसनं हें काम तर केलंच, पण हें करतांना त्याला एक नवी कल्पना सुचली. बुल्गॉनिन आणि क्रुश्चेव्ह इंग्लंडला भेट देणार आहेत, या संधीचा फायदा घेऊन गेलीं तीन-चार वर्षं लोकांच्या कुतूहलाचा आणि चिंतेचा विषय झालेलं इंग्लंडच्या परराष्ट्र-कचेरींतलं एक प्रकरण त्यानं उकरून काढलं. इंग्लंडच्या परराष्ट्र-कचेरींतले बर्गेस आणि मॅक्लिन या नांवाचे दोन अधिकारी कांहीं गुप्त कागदपत्र घेऊन फरारी झाले होते आणि ते रशियांत असावे अशी शंका अनेक वेळां व्यक्त करण्यांत आलेली होती. गेल्या चार वर्षांत अनेक पत्रकारांनीं रशियन अधिकाऱ्यांच्या पोटांत शिरून त्यांचा ठावठिकाणा हुडकण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता, पण दर वेळेला 'छे छे, आम्हांला यांतलं कांहीं सुद्धां माहीत नाहीं' असं उत्तर मिळालं होतं. ह्यूजिसनं एक नवीन युक्ति योजली. आपला रशियांतला मुक्काम संपण्याच्या सुमाराला त्यानं (तेव्हांचे) परराष्ट्रमंत्री मोलोटॉव्ह यांना एक पत्र लिहिलं आणि त्यांत त्यानं म्हटलं, "बुल्गॉनिन आणि क्रुश्चेव्ह आतां लवकरच इंग्लंडला जाणार आहेत. पण तिथं गेल्यावर दुसरा कोणताहि प्रश्न विचारण्याऐवजीं पत्रकार त्यांना एकच सवाल टाकतील, 'बर्गेस आणि मॅक्लीन कुठें आहेत?' या प्रश्नाला जर नेहमींसारखं 'छे छे, आम्हांला यातलं कांहीं सुद्धां माहीत नाहीं!' असं ठरलेलं उत्तर त्यांनीं दिलं तर त्यांच्यावर कोणाचाच विश्वास बसणार नाहीं. बर्गेस आणि मॅक्लीन रशियाच्या तुरुंगांत आहेत किंवा त्यांना केव्हांच गोळ्या घालण्यांत

आल्या आहेत असा प्रवाद आज कित्येक दिवस इंग्लंडांत आहे आणि या प्रश्नाला जर सरळ उत्तर मिळालं नाहीं तर बुल्गॅनिन आणि क्रुश्चेव्ह यांच्या मित्रत्वाच्या भाषेवर कुणाचाच विश्वास बसणार नाहीं—त्यांची इंग्लंडची भेट फुकट जाईल हें लक्षांत ठेवा!" आपण मॉस्को कधीं सोडणार हें आपल्या पत्रांत ह्यूजिसनं कळविलं होतं, पण निघण्याची वेळ दोन तासांवर आली तरीहि मॉलोटॉव्हकडून कांहीं उत्तर आलं नाहीं तेव्हां ह्यूजिसनं आशा सोडली आणि त्यानं निघण्याची तयारी केली. तोंच त्याच्या खोलींतली टेलिफोनची घंटा खणखणली, तो ज्या हॉटेलांत राहत होता त्याच हॉटेलच्या एका खोलींत त्याला बोलावण्यांत आलं आणि तिथं तो गेला तों बर्गेस आणि मॅक्लीन त्याची वाट पाहत बसलेले त्याला आढळले! 'इंग्लंडचे आणि रशियाचे संबंध मित्रत्वाचे व्हावे म्हणून आम्ही इकडे आलों'—असं त्यांनीं ह्यूजिसला सांगितलं, त्याच्या हातांत दोघांनीं सही केलेलं हें आपलं निवेदन दिलं आणि ते जे अंधारांत गडप झाले ते आजपर्यंत! या बातमीनं दुसऱ्या दिवशीं इंग्लंड-अमेरिकेंतल्या सर्व पत्रांचीं मुखपृष्ठं किंवा महत्वाचीं पृष्ठं व्यापलीं आणि गेल्या चार वर्षांतील रहस्याचा स्फोट झाला. एका वृत्तपत्राच्या बातमीदारानं परराष्ट्रमंत्र्याला केवळ स्वतःच्या जबाबदारी-वर पत्र लिहिलं आणि लक्ष्यवेध झाला याचा अभिमान त्या पत्राला कां वाटूं नये? अशीं उदाहरणं इकडे प्रत्यहीं घडतात आणि म्हणूनच वृत्तपत्रांतला ताजेपणा टवटवीत राहतो. वृत्तपत्रलेखक म्हणजे केवळ घडलेल्या घटनांचीं वर्णनं करणारा ही कल्पना आतां पार शिळी झाली आहे. कवीची तरल कल्पकता आणि तत्त्ववेत्याची मूलगामी विचारपद्धति यांचा मनोज्ञ संगम म्हणजेच वृत्तपत्रलेखन! असे वृत्तपत्रलेखकच वाचकांच्या मनाची भूक भागवितात आणि पाप्यांच्या मनाचा थरकांप उडवितात. सगळ्या वृत्तपत्रांना मनसोक्त वागायला दिलं तर महिनाभरसुद्धां माझी धडगत लागायची नाहीं असं दीड शतकापूर्वी नेपोलियन म्हणाला आणि अणुयुगाच्या या विसाव्या शतकांतहि वृत्तपत्र ही चतुर्थ शक्ति आहे असं राजकारणधुरंधर म्हणतात तें उगीच नाहीं. वृत्तपत्रांचं सामर्थ्यच तसं आहे!

हें सामर्थ्य लोकशाहींत तर फार जाणवतं आणि म्हणून एखाद्या राष्ट्रांत विचारस्वातंत्र्य कितीसं आहे हें तिथलीं वृत्तपत्रं पाहिलीं कीं क्षणांत समजतं. इंग्लंडांतल्या वृत्तपत्रसृष्टीशीं गेल्या दहा महिन्यांत माझा जसजसा अधिकाधिक परिचय होत गेला तसतसं मला वाटूं लागलं, कीं इंग्लंडांत लोकशाही जिवंत

आहे ती वृत्तपत्रांच्यामुळंच ! तींच लोकशाही पोसतात, वाढवितात, आणि सर्व क्षेत्रांत तिचा विस्तार करतात. त्यांचं सामर्थ्य दुबळं झालं तर राष्ट्र दुबळं होईल, त्यांचं सामर्थ्य वाढलं तर राष्ट्राचं सामर्थ्य वाढेल, ही काळ्या दगडावरची रेघ आहे !

तुमचा,

वि. वा. पत्की

: २३ :

## मागं वळून पाहतांना—

★

एस्. एस्. 'कॅंटन'
लंडन-पोर्टसैद प्रवास
२८ जुलै, १९५६

प्रिय बाळासाहेब,

प्रत्येक गोष्टीला शेवट असतो हें माहीत असूनहि माझा वृत्तपत्रलेखनाचा नियोजित अभ्यासक्रम संपला आणि भारताला परत जाण्यासाठीं मन अधिकाधिक उतावीळ होऊं लागलं, तसा एक विचार माझ्या मनांत सारखा येऊं लागला—अगदीं योगायोगानं सतरा वर्षांनंतर लाभलेली विद्यार्थीदशा संपली! मनुष्य जन्माला आल्यापासून जगाचा निरोप घेईपर्यंत सारखा कांहीं ना कांहीं शिकत असतो आणि ज्या वर्गाला दगडचुन्याच्या भिंती नाहींत, त्या जगाच्या शाळेंत रोज नवे धडे घेत असतो हें खरं असलं तरी प्रयत्नपूर्वक नवं ज्ञान संपादन करण्यांत जो आनंद असतो—जो निर्भेळ आनंद असतो—तो यापुढें कधीं मिळणार नाहीं, या विचारानं, कां कुणास ठाऊक, माझं मन विषण्ण होत होतं. एखाद्या विषयाचा अभ्यास मी अजूनहि करीन, पण इतर विद्यार्थ्यांच्या बरोबर बसून अभ्यास करण्याचं सौख्य यापुढें कधींहि—होय, कधींहि—लाभणार नाहीं या विचारानं माझ्या मनांत कालकाकालव होत होती. ज्या जगांत कल्पनांचीं फुलं आणि आशेची हिरवळ सदैव असते, तें विद्यार्थीदशेंतलं जग इंग्लंडचा किनारा सुटल्याबरोबर मागं राहणार होतं आणि ज्या जगांत स्वार्थी हेवेदावे आणि मत्सर यांचे कांटे पसरलेले होते, त्या व्यवहारी जगांत मी विद्यार्थी-दशेचा कोष टाकुन पुन्हां आतां प्रवेश करणार आहें, ही कल्पनाच अंगावर कांटा आणीत होती!

पण असं असलं तरी भारताच्या पुनर्दर्शनासाठीं मन कसं व्याकुळ झालं होतं हें

सांगून कळायचं नाहीं. किंबहुना मला तें तुम्हांला सांगतांहि यायचं नाहीं. विरहानं व्याकुळता वाटते म्हणतात तें खोटं नाहीं—मग तो विरह प्रेयसीचा असो, पुत्राचा असो, मातेचा असो, स्वदेशाचा असो कीं स्वभाषेचा असो! म्हणूनच विद्यार्थीदशेचा अंत उघड्या डोळ्यांनीं पाहात असतांनाहि माझे डोळे लागले होते ते माझ्या मायभूमीकडे! तथापि, थोड्या दिवसांनीं भारत दृष्टीस पडणार होता हें जसं खरं, तसंच ज्या ठिकाणीं नवं जग दृष्टीस पडलं आणि नवकल्पनांचीं बीजं मनोभूमींत पडलीं तें जगहि पारखं होणार होतं हेंहि खरं होतं. म्हणून त्याच्या ज्या ज्या आठवणी मनःकोषांत सांठवून ठेवतां येतील तेवढ्या माझं मन ठेवीत होतं. लोकशाहीचीं बीजं मनांत पेरणारं हें पार्लमेंटगृह, माणसांचीं मनं चिकित्सक करणारीं हीं विद्यामंदिरं, आकाशाप्रमाणेंच विद्येलाहि अंत नाहीं हें मनावर ठसविणारा हा ब्रिटिश म्युझियम्, भुयारी लोहमार्गाची ही पाताळनगरी आणि मानवी जीवनांत दुःख आणि निराशा यांना जणुं अवकाशच नाहीं अशा वृत्तीनं वावरणारीं हीं प्रसन्नमुख माणसं—यांचं पुनर्दर्शन कधीं घडेल का म्हणून बावरलेलं माझं मन त्यांच्या दर्शनाची एकहि संधि घालवीत नव्हतं. उद्यां दृष्टीस पडणारा भारत आणि आज हळूहळू दृष्टीआड होऊं लागलेली आंग्लभूमि यांचीं कल्पनाचित्रं रंगवितां रंगवितांच अखेर भारताला परत जाण्याचा २० जुलैचा दिवस उजाडला तसं माझं मन म्हणालं, 'जो दिवस फार दूर आहेसं सारखं वाटत होतं तो तर आला!'

लंडन शहरांतल्या ज्या पश्चिम भागांत गेले दहा महिने मी राहिलों होतों त्या भागांतून २० जुलैच्या सकाळच्या प्रहरीं माझी टॅक्सी वॉटर्लू स्टेशनच्या दिशेनं जाऊं लागली तसं मागं राहणारं लंडन शहर जेवढं पाहतां येईल तेवढं पाहून घेण्यासाठीं माझं मन धडपडूं लागलं. हिरव्यागार पानांच्या अलंकारांनीं नटलेले वृक्ष, कोपऱ्याकोपऱ्यावरचे तांबडे-पिंवळे-हिरवे 'ट्रॅफिक लाईटस्', त्यांच्याजवळ थांबलेला मोटारींचा थवा, गेले दोन दिवस चालू असलेली पावसाची बुरबुर आणि पाश्चिमात्य जगांत नित्य परिचयाचं झालेलं धुकं यांची सोबत आजहि होती, ती कदाचित् इंग्लंडची आठवण माझ्या मनांत सदैव ताजी राहावी म्हणूनच असेल! नाहीं तर एप्रिलच्या सुरुवातीपासूनच थंडी, पाऊस, धुकं आणि बर्फ नाहींसं होऊन ऊबदार हवा आणि प्रसन्न ऊन यांचा सहवास लाभला असतांना नेमका मी इंग्लंड सोडायच्या दिवशीं थंडी आणि धुकं पुन्हा प्रगट व्हावं याचा दुसरा कोणता अर्थ असणार? लंडन शहरांत तर धुक्याचं आवरण सर्वत्र होतंच, पण वॉटर्लूला गाडींत

बसून सुमारें पाऊणशें मैलांवर असलेल्या साऊर्दम्प्टनला मला भारताला घेऊन जाणाऱ्या 'कॅंटन' बोटींत बसण्यासाठीं मी आलों तोंपर्यंत धुकं आणि पाऊस आमचा पाठलाग करीत होतीं !

पण साउर्दम्प्टनच्या धक्क्यावर आलों तेव्हां सारं वातावरण निवळलं होतं. आणि परदेशला जाण्यासाठीं उभ्या असलेल्या बोटींची रांग दृष्टीस पडली तेव्हां तर कसल्या तरी अनामिक आनंदानं माझं मन भरून गेलं. मात्र सारं वातावरण किती शांत होतं! इंग्लंडला येण्यासाठीं मी निघालों तेव्हां मुंबईच्या धक्क्यावर जी धांदल, गडबड, धांवपळ दिसली होती तिचा इथं कुठें मागमूसहि नव्हता आणि संथपणें सारे व्यवहार होत होते. अगोदर गाडींतून आम्ही उतरलों तेच बोटीच्या धक्क्यावर! किंबहुना एकाच धक्क्याला एका बाजूला बोट आणि दुसऱ्या बाजूला गाडी लागलेली होती आणि मध्यें पन्नास-पाऊणशें फुटांचंहि अंतर नव्हतं. पासपोर्टतपासणी आणि बोटीवर चढण्याचा पास या गोष्टींना पधरा–वीस मिनिटंहि लागलीं नाहींत, तेव्हां मुंबईला दोन तास कसं ताटकळत राहावं लागलं होतं आणि निरोप द्यायला आलेल्या माणसांच्या बरोबर कसं दोन शब्दहि बोलतां आलं नव्हतं याची मला आठवण झाली. कोणतीहि गोष्ट गाजावाजा न करतां करण्यांत ब्रिटिश माणूस किती चलाख असतो याचा दहा महिन्यांच्या वास्तव्यांत अनेक वेळां आलेला अनुभव या अखेरच्या घटकेलाहि आला होता, पण मला भारताकडे घेऊन जाणाऱ्या बोटींत पाऊल टाकायला अधीर झालेल्या माझ्या मनाला या विचारांशीं चाळा करायला सवड होतीच कुठें ?

मात्र दुपारीं दोन वाजायला पांच-दहा मिनिटं उरलीं तेव्हां बोट सुटण्याचे इशारे झाले, निरोप देण्यासाठीं आलेल्या लोकांना खालीं उतरण्याबद्दल विनंतिपूर्वक सांगण्यांत येऊं लागलं आणि जमिनीशीं संबंध जोडणारा जिना अखेर क्रेननं खालीं ओढून घेतला तेव्हां इंग्लंडचा संबंध खरंच सुटला असं वाटून क्षणाक्षणाला मागं राहणाऱ्या त्या भूमीकडे पुनः पुन्हां पाहावंसं सारखं वाटू लागलं. साउर्दम्प्टनच्या विस्तीर्ण गोदींतून बोट हळूहळू बाहेर पडूं लागली, निरोप द्यायला आलेलीं माणसं दिसेनाशीं झालीं आणि बोटीला वेग येऊन खोल समुद्राच्या दिशेनं ती जाऊं लागली तशीं सारीं माणसं डेकवर जमा झालीं. मायदेशाहून दूर जाणारीं माणसं मातृभूमीचं अखेरचं दर्शन घेत होतीं तर मायभूमीला जायला निघालेलीं माणसं मागं राहाणाऱ्या भूमीकडे पुनः पुन्हां वळून पाहात होतीं. चांगलं दीड-दोन तास असं चाललं होतं. हिरवीगार झाडी आतां काळसर झाली होती आणि टेकड्यांना

काळसर, अंधुक रेषांचं स्वरूप आलं होतं. अखेर तेंहि दिसेनासं झालं. आकाश आणि पाणी कुठें तरी दूरवर एकमेकांत मिसळत असल्याचा भास होत होता, कारण निळं आकाश आणि निळसर पाणी यांपैकीं एकाची सीमा कुठें संपली आणि दुसऱ्याची कुठें सुरू झाली हें मुळीं समजतच नव्हतं!

बोटींत थोडया वेळांतच स्थिरस्थावर झाली होती. परिचित किंवा कुटुंबीय मंडळी गटागटांनीं डेकवरच्या खुर्च्यांवर बसून वेळ घालवीत होतीं, पण ज्यांचा कुणाशींच परिचय नव्हता अशी माणसंहि कांहीं थोडीं नव्हतीं. सबंध बोटीवरच्या सुमारें चारशें उतारूमध्यें माझ्या परिचयाचे तर एकच गृहस्थ होते—मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ् आर्ट्समधील लेक्चरर रानडे! गंमत अशी कीं, गेल्या वर्षी आम्ही दोघेहि 'सिलिसिया' याच बोटीनं इंग्लंडला गेलों होतों आणि दोघांनींहि आपला अभ्यासक्रम आटोपल्याबरोबर असलेल्या एकाच बोटीचीं (एकमेकांना नकळत!) तिकिटं रिझर्व्ह केलीं होतीं आणि मोठ्या योगायोगानं निघण्यापूर्वी एक आठवडाच आधीं लंडनच्या रस्त्यांत भेटलों होतों. पण बोटीवर कुणाचा परिचय नव्हता तरीहि आतां परकेपणा वाटत नव्हता. एक वर्षापूर्वी मुंबईहून निघतांना नाविन्याच्या कल्पनेनं मन जसं थोडंफार भांबावून गेलं होतं, ती वृत्ति आतां नव्हती. नववधूची बावरलेली मनःस्थिति आतां उरली नव्हती, अनुभवी गृहिणीचा संथपणा आतां नकळत आला होता. अपरिचिताशींहि कसं बोलावं याचा सराव झाला होता. त्यामुळं या अपरिचित जगांतहि फारसा परकेपणा वाटत नव्हता. त्यांतच माझ्या केबिनमध्यें योगायोगानं आलेले एक सहप्रवासी आणि मी यांच्यामध्यें एकमेकांना भेटण्यापूर्वीच जो जिव्हाळा निर्माण झाला होता त्याची कथा तुम्हांला अविश्वसनीय वाटेल इतकी विलक्षण आहे! इंग्लंडचा किनारा दिसेनासा झाल्याबरोबर आपलं सामान नीट लावून ठेवावं म्हणून मी माझ्या केबिनमध्यें आलों तों शेजारच्याच बर्थवर जें सामान ठेवलेलं होतं त्याच्यावर नांव दिसलं— "पी. डी. गडकरी, न्यूयॉर्क टु बॉंबे!" तें नांव वाचतांच मला आश्चर्याचा धक्काच बसला आणि आनंद झाला, कारण सुमारें २५ वर्षांपूर्वी आम्ही जंजिरा-मुरूड येथील एकाच शाळेंत, एकाच वर्गांत विद्यार्थी होतों पण या दीर्घ मुदतींत कधीं भेटलोंहि नव्हतों! आपला हा बालमित्र अमेरिकेला कशासाटीं आणि कधीं गेला होता याचा कांहींच अंदाज मला बांधतां येईना पण अशी अचानक भेट होणार याचा आनंदहि वाटत होता. पण किती वेळ झाला तरी माझा हा बालमित्र केबिनमध्यें आला नाहीं तेव्हां तो कुठें दिसतो

का, म्हणून पाहण्यासाठीं मी तिन्ही-चारही डेकवरून फिरून आलों, पण कुठें दिसलाच नाहीं. 'रात्रीं तरी भेटेल?' असं म्हणत मी बाहेत जाणार तोंच एक उंचेले, चष्मा लावलेले गृहस्थ केबिनमध्यें येत म्हणाले, "तुम्ही पत्की का?" मी 'होय' म्हणतांच ते म्हणाले, "माझा अंदाज चुकला. अमरावतीला पत्की नांवाचे माझे एक बालमित्र आहेत ते इंग्लंडला कधीं आले असं मला वाटत होतं, पण–" त्यांचं तें बोलणं ऐकून मला मोठी गंमत वाटली आणि मी म्हणालों, "तुमचाच अंदाज चुकला असं नव्हे, माझाहि चुकला आहे. तुमचं पी. डी. गडकरी हें नांव वाचून माझा बालमित्र मला अचानक भेटणार म्हणून मला आनंद झाला होता. पण त्याच नांवाचे तुम्ही भेटलांत यांतहि केवढा आनंद आहे!" या विलक्षण योगायोगाचं आश्चर्य त्यांनाहि वाटलं आणि मला ते म्हणाले, "आपल्या एकमेकांच्या नांवांचे एकमेकांचे बालमित्र असावे हा एखाद्या कादंबरींत शोभण्यासारखा प्रसंग आहे! या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला, कीं या अपरिचित वातावरणांतहि परकेपणाचं धुकं नाहींसं झालं आणि जिव्हाळ्याची प्रसन्नता आपोआप आली. ते माझ्यासारखेच सरकारी नोकर आहेत, वयाची पंचेचाळीस वर्षे उलटल्यावर अमेरिकेला कृषिविषयक पदवी मिळविण्यासाठीं ते गेले होते आणि मराठी वाङ्मयाचं त्यांचं वाचन पुष्कळच अद्यावत् आहे हें कळतांच या योगायोगानं माझं मन जितकं स्तंभित तितकंच हर्षभरित झालं.

अशा प्रसन्न वातावरणांत माझ्या या प्रवासाची सुरुवात झाली आणि बोटी-वरचे नैमित्यिक कार्यक्रम सुरू झाले, तसा इतर सहप्रवाशांचाहि परिचय होत गेला. आमच्या या बोटीवर मुंबईला उतरणाऱ्या प्रवाशांइतकेच हाँगकाँगला जाणारे जपानी प्रवासीहि आहेत. किंबहुना या जपानी स्त्री-पुरुषांच्या शरीराच्या—विशेषतः नाकाच्या—ठेवणीकडे पाहिलं म्हणजेच ते जपानी आहेत हें लक्षांत येतं, नाहीं तर त्यांची अंगकांति आणि पोषाखच नव्हे तर त्यांची भाषाहि उच्चारा-सहित इंग्रजी वळणाची आहे! भारतांत परत येणाऱ्यांत अर्थातच बहुसंख्य विद्यार्थी आहेत—इंग्लंडांत, अमेरिकेंत, स्वीडनमध्यें, हॉलंडमध्यें विद्यार्जनासाठीं गेलेले! कुणी म्हणतो, मी पांच वर्षांनीं परत जात आहे; कुणी म्हणतो, मी तीन वर्षांनीं भारत पाहणार आहें. इंग्रजी आचारविचार आणि शब्दोच्चार प्रत्येकच्या वाणींत स्पष्टपणें दिसत आहेत. आपण मायभूमीला परत जात आहों, याचा आनंद त्यांच्या शब्दाशब्दांतून प्रगट होत आहे, पण 'संधि मिळाली तर मी इंग्लंडांतच 'सेटूल' होईन, किंवा 'एकदां अमेरिकेंत राहिलं कीं अमेरिका

सोडावीशीच वाटत नाहीं,' असं म्हणणारेहि अगदींच थोडे नाहींत. पहिल्या दोन-तीन दिवसांत अनेकांचीं आपापसांत चालणारीं हीं बोलणीं मी ऐकलीं तेव्हां मला मोठं आश्चर्य वाटलं आणि परदेशांचं आकर्षण या विद्यार्थ्यांना येवढं जबरदस्त कां वाटावं हा विचार माझ्या मनांत सारखा येऊं लागला. अमेरिकेतलं जीवन मीं पाहिलेलं नसलं तरी इंग्लंडांतील जें जीवन दहा महिने माझ्या दृष्टीस पडलं त्याच्याकडे मागं वळून पाहतांना पाश्चिमात्य जीवन आमच्या जीवनापेक्षां कां आणि कसं निराळं आहे आणि पाश्चिमात्यांची कोणतीहि गोष्ट केवळ आंधळेपणानं उचलण्याची आवश्यकता नसली तरी त्यांचं जीवन मोह पाडण्याइतकं सुखी आणि समृद्ध कां झालं याची मीमांसा करणं अत्यंत आवश्यक आहे असं मला वाटूं लागलं आणि मीं स्वतःशींच म्हटलं, 'यापासून आपण कांहींच शिकण्यासारखं नाहीं काय ?'

पाश्चिमात्य जीवनाची आमच्या जीवनाशीं मी जेव्हां तुलना करूं लागतों तेव्हां माझ्या मनांत सारखं येतं, कीं सर्वच दृष्टींनीं आमचं जीवन खुरटलं आहे. अगदीं सामान्य ब्रिटिश माणसाचंच जीवन घ्या, त्याच्या रोजच्या जीवनांत जो उल्हास आहे, सुखासाठीं जी धडपड आहे ती पाहिली कीं वाटतं, तो सुखी आहे याला बाह्यपरिस्थितीइतकीच त्याची मनोधारणा बव्हंशीं कारणीभूत झाली आहे. देशाचं औद्योगीकरण संपूर्ण झालेलं असल्यामुळं नोकऱ्यांची विपुलता इथं आहे आणि प्रत्येकाला आपल्या प्राथमिक गरजा भागविण्या इतकच नव्हे तर थोड्याफार ऐषारामांत राहतां येईल इतकं भरपूर वेतन मिळण्याची समाजांत सोय आहे, यामुळं तर त्याचं जीवन समृद्ध झालं आहेच, पण याच्यापेक्षांहि जीवनाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोनच आपल्या दृष्टिकोनापेक्षां अनेक दृष्टींनीं निराळा आहे. 'एक दिवस मरायचंच आहे, मग उगीच धडपड कशाला ?' ही आमची पौर्वात्यांची वृत्ति, तर 'एक दिवस जर जगाचा निरोप घ्यायचाच आहे तर येणारा प्रत्येक दिवस सुखाचा आणि आनंदाचा होईल यासाठीं धडपड कां करायची नाहीं ?' ही पाश्चिमात्यांची विचारसरणी! याचा परिणाम अखेर असा झाला आहे, कीं आम्ही जीवनाबद्दल उदासीन, तर ते उत्साही; आम्ही गलितगात्र, तर ते धावण्याच्या पवित्र्यांत; आम्ही दुर्मुखलेले, तर ते प्रसन्नमुख ! किंबहुना या भिन्न प्रवृत्तींचा मी जेव्हां स्वतःशीं विचार करतों तों तों मला अधिकाधिक वाटूं लागतं कीं आम्हांला जीवनाबद्दलच गोडी नाहीं. संसार असार आहे, शरीराच्या बंदिवासांतून आत्म्याला मुक्त करायचं आहे, या सुप्त

विचारांचा पगडा आमच्या मनावर येवढा आहे, कीं सारं जीवनच अर्थहीन आहे असं आम्ही नकळत मानीत आलों आहों आणि जगण्यांत आनंद आहे, धडपडींत सुख आहे असं आम्हांला फारसं कधीं वाटलेलंच नाहीं. धडपडावं, पडावं, उठावं, धावावं, असं आम्हांला कधीं वाटत नाहीं. गोगलगायीसारखे पोटांत पाय घेऊन आम्ही पडून राहातों आणि कोणी धक्का दिलाच तर थोडी हालचाल करतो, येवढंच !

उलट, जगण्यांत आनंद आहे असं तर पाश्चिमात्य मनुष्य मानतोच, पण जीवनांतला आनंद पूर्णांशानं उपभोगतां येईल अशीच कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाची घडी त्यानं बसविली आहे. इतकंच नव्हे तर प्रत्येक व्यक्तीला जीवनानंद उपभोगतां यावा अशी समाजानंच व्यवस्था केली आहे. कसं तें सांगूं तुम्हांला ? पाश्चिमात्यांची कुटुंबव्यवस्थाच घ्या. पति-पत्नी हे जीवनसाथी, तेव्हां परस्परांना एकमेकांचं जीवन सुखी आणि आनंदमय करतां आलं तरच अखेर मानवी संसार सुखाचा होणार आहे हें ओळखून पाश्चिमात्यांनीं स्वतःचा संसार स्वतःच्या हातांनीं घडविण्याचं स्वातंत्र्य प्रत्येक स्त्री-पुरुषाला दिलं आहे. याचा परिणाम असा झाला आहे, कीं विवाहबंधनांनीं एकत्र आलेला पुरुष आणि स्त्री त्या क्षणापासून स्वतःचं स्वतंत्र जीवन जगूं लागतात आणि एकत्र कुटुंब पद्धतीमुळं परस्परांच्या स्वार्थांच्या संघर्षांतून निर्माण होणारा कडवटपणा संसारांत उरतच नाहीं. प्रत्येक व्यक्ति ही समाजाची एक स्वतंत्र घटक आहे हें समाजानंच मान्य केल्यामुळं (आणि तशी प्रत्येकाची स्वतंत्र व्यवस्था केल्यामुळं) कुणाचा भार कुणावर पडत नाहीं. संसाराला सुरुवात करणाऱ्या स्त्री-पुरुषांना मावळल्या पिढीची जबाबदारी घ्यावी लागत नाहीं कीं उगवत्या पिढीच्या पालनपोषणाची चिंता वाहावी लागत नाहीं. कल्याणकारी राज्याचा प्रवर्तकांनीं एकाला वार्धक्यवेतन तर दुसऱ्याला संवर्धनवेतन मिळण्याची व्यवस्था केली आहे, आणि कुटुंबांतला कोणीच कोणावर अवलंबून नसल्यामुळं रक्ताच्या नात्यालाहि निर्भेळ मैत्रीचं स्वरूप आलं आहे.

त्याशिवाय, समाजाची एकंदर घडणच अशी झाली आहे, कीं प्रत्येक महत्त्वाकांक्षी व्यक्तीला आपल्या विकासाला भरपूर संधि मिळेल अशी खात्री वाटावी. अगदीं गरीब कुटुंबांत जन्माला आलेला विद्यार्थी सुद्धां आपल्या अभ्यासांतील प्रगति दाखवून, निरनिराळ्या शिष्यवृत्त्या मिळवून, केवळ स्वतःच्या जबाबदारीवर विश्वविद्यालयांतील अत्युच्च पदवी मिळवूं शकतोच, पण अशा कर्तबगार विद्या-

र्थ्याला आपल्या संस्थेंत घेण्यासाठीं अनेक नामवंत संस्थांची अहमहमिका लागलेली असते. याचा अखेर परिणाम असा होतो, कीं आपल्या अंगीकृत कार्यासाठीं आपलं शक्तिसर्वस्व वेचण्यांत विद्यार्थ्याला भूषण वाटतं आणि उद्यां शिक्षणांतून बाहेर पडल्यावर माझं कसं होईल या चिंतेनं त्याचं जीवन काळवंडून जात नाहीं. कोणत्याहि क्षेत्रांतील अत्युच्चपद त्या क्षेत्रांतील कर्तबगार माणसाला हटकून मिळतं, यामुळं आपला तेजोभंग झाला असं कधीं कुणाला वाटत नाहीं आणि त्याच्या गुणांचा राष्ट्रविकासासाठीं उपयोग होतो. अमक्या माणसाला अमकी मोठी जागा वशिल्यानं मिळाली अशी टीका तर सोडाच, पण प्रवादहि क्वचितच ऐकूं येतो. त्या त्या क्षेत्रांत कामं करणाऱ्या माणसांनाहि आपण आपणापेक्षां श्रेष्ठ असलेल्या माणसाच्या हाताखालीं काम करतों आहों असं समाधान वाटतं आणि याचा परिणाम अखेर राष्ट्राची कार्यक्षमता वाढण्यांत होतो. देशाच्या सैन्यांत एक सामान्य सैनिक म्हणून शिरलेला चर्चिल स्वतःच्या कर्तबगारीनं देशाचा मुख्य प्रधान होऊं शकतो हें एकच उदाहरण इंग्लंडांत व्यक्तिविकासाला केवढा अवकाश मिळूं शकतो हें दाखविण्यास खचित पुरेसं आहे.

समाजजीवनांत व्यक्तीच्या विकासाला भरपूर वाव ठेवल्यामुळं आकाशाच्या अनंत पोकळींत आपल्या जोमानं विस्तारणाऱ्या वृक्षासारखं त्याचं जीवन झालं आहे. पाश्चिमात्यांच्या सामाजिक जीवनाची ही पार्श्वभूमि ज्यांना आकलन होत नाहीं, स्वातंत्र्य आणि स्वैराचार यांतली सीमाच ज्यांना ओळखतां येत नाहीं ते 'पाश्चिमात्य लोक स्वैराचारी आहेत' असा आक्रोश सुरू करतात. माणसाच्या नैसर्गिक प्रेरणांचा कोंडमारा झाला आणि विहित मार्गांनीं त्यांना वाट मिळाली नाहीं म्हणजेच समाजबंधनांच्या विरुद्ध बंड करण्याची प्रवृत्ति बळावते. उलट, माणसाच्या अंतःकरणांत उदित होणाऱ्या नैसर्गिक भावना—वासना ह्या पवित्र आहेत आणि त्यांचा कोंडमारा झाला तर कोंडलेली वाफ मिळेल त्या मार्गांनीं बाहेर पडावी तशा या प्रवृत्ती समाजजीवनांत डोकं वर काढतात, हें मानसशास्त्र पाश्चिमात्य समाज-धुरीणांनीं ओळखलं, येवढंच नव्हे तर माणसांच्या नैसर्गिक प्रवृत्तींना वाट मिळेल अशी साऱ्या समाजजीवनाची घडीच त्यांनीं बसविली. या पायाशुद्ध समाज-रचनेचा परिणाम असा झाला, कीं त्यांचं समाजजीवन उमलत्या फुलासारखं विकसित होत गेलं आणि व्यक्तीचं जीवन आनंदमय झालं.

सारांश, जीवनाकडे पाहायचा आशावादी दृष्टिकोन, व्यक्तिविकासाला भरपूर अवकाश, स्वयंपूर्ण कौटुंबिक जीवन आणि व्यक्तिविकासाला आवश्यक असलेली

सामाजिक सुरक्षितता यांच्यामुळं पाश्चिमात्य जीवन स्थिर झालं आहे आणि म्हणूनच त्या जीवनाचा मोह अनेकांना होतो. याचा अर्थ पाश्चिमात्य जीवनांत आतां विकासाला अवकाश नाहीं असा मात्र खास नव्हे. पौर्वात्यांच्या दृष्टीनं पाश्चिमात्यांना लाभलेलं जीवन मोठं हेवा वाटण्यासारखं असलं, तरी स्वतः पाश्चिमात्यांना अजूनहि तें अपूर्ण आहे असं वाटतं आणि यांतच, मला वाटतं, त्यांच्या प्रगतीचीं बीजं आहे. पाश्चिमात्य देशांतला सामान्य माणूस स्वतःच्या मोटारींतून फिरतो, स्वतःच्या घरीं टेलिव्हिजन नसला तर 'कसलं माझं हें दरिद्री जीवन' या विचाराचे चटके त्याला बसतात, सुटीच्या दिवसांत पृथ्वीच्या दुसऱ्या गोलार्धांत जाण्यायेवढे पैसे आपणांजवळ नाहींत म्हणून तो कुरकुरतो, हें पाहिलं कीं 'कसली ही पाश्चिमात्यांची भौतिक प्रगति' असं म्हणून केवळ भागणार नाहीं. 'आम्ही अध्यात्मवादी, पाश्चिमात्य भौतिकवादी' असं सोयिस्कर वर्गीकरण करून आम्ही डोळ्यांवर कातडं ओढून घेत आहों आणि स्वतःला श्रेष्ठ मानीत आहों. मनुष्याला मनुष्य म्हणून जगण्यासाठीं प्रथम भौतिक वस्तूंचीच आवश्यकता आहे. त्या मिळत नसतांना त्यांची उपेक्षा करणं (किंवा तसं दाखविणं) म्हणजे न मिळणारीं द्राक्षं आंबट आहेत असा अभिप्राय व्यक्त करण्यासारखंच आहे. किंबहुना आमच्या सामाजिक जीवनाचा मी जों जों अधिकाधिक विचार करतों तों तों आमचं जीवन हें होकायंत्र नसल्यामुळं धुक्यांत गुरफटलेल्या आणि प्रवाहाबरोबर किंवा वाऱ्याबरोबर जाणाऱ्या जहाजासारखं झालं आहे असं वाटूं लागतं...

पश्चिमात्यांचं जीवन समृद्ध कां झालं याचं उत्तर, मला वाटतं, त्यांच्या या सामाजिक नियोजनांत आहे आणि म्हणूनच तसे प्रयत्न माझ्याहि देशांत होत आहेत, हेंच भावी काळांतील खरं आशास्थान आहे. ते जसजसे यशस्वी होत जातील तसतशी समृद्धि येत जाईल आणि परदेशांत जाणारा मनुष्य 'संधि मिळाली तर मी तिथंच 'सेटल' होईन' असं म्हणेनासा होईल. नियोजनानं आमच्या जीवनाला दिशा येईल हाच खरा फायदा आहे, नाहीं ?

माझ्या मनांतले हे विचार आमच्या जहाजाच्या गतीप्रमाणें अखंड सुरू होते आणि पोर्टसैद बंदरांत आठ दिवसांच्या प्रवासानंतर आमची बोट थांबली तेव्हांच ते थांबले ! या काळांत बोटीवरचं जीवन अक्षरशः यंत्रासारखं सुरू होतं. न्याहारी, दुपारचं जेवण, संध्याकाळचं जेवण, खेळ, जुगार, मद्यपान, गप्पा यांपैकीं ज्याला ज्याला ज्यांत रस होता तो त्याचा आस्वाद घेत होता आणि यांचा

विसर पडत होता तो या अफाट सागरांत भूमीचा तुकडा किंवा माणसाच्या अस्तित्वाच्या खुणा दिसल्या म्हणजेच ! जें दुर्मिळ त्याचा मोह माणसाला वाटावा हा त्याचा स्वभावच आहे, खरं ना ?

तुमचा,

वि. वा. पत्की

## : २४ :

# मातृभूमीचं पुनर्दर्शन

★

एस्. एस्. 'कॅटन'
पोर्टसैद-मुंबई प्रवास,
५ ऑगस्ट, १९५६.

प्रिय बाळासाहेब,

जिब्राल्टर, आल्जेरिया आणि माल्टा यांचं दुरूनच दर्शन घेत आमची बोट पोर्ट सैदच्या जवळ जवळ येऊं लागली तसा बोटीवरच्या सर्व उतारूंमध्यें एक नवा उत्साह येऊं लागला. आठ दिवस आकाश आणि पाणी यांच्या संगतींत घालविल्यानंतर तसं झालं नसतं तरच नवल ! त्यांतच बोट पोर्ट सैदला चांगली पांचसहा तास थांबणार होती आणि तीन तास तरी धक्क्यावर उतरून मोकळे-पणानं फिरतां येणार होतं, म्हणून केव्हां एकदां पोर्ट सैद येतं असं सर्वांनाच झालं होतं.

आणि अखेर कस्टमकडून मिळणारा पास घेऊन माणसं तरंगत्या धक्क्यावरून जमिनीवर चालत गेलीं तेव्हां सर्वांनाच कसं हायसं वाटलं. सुएझ कालव्याच्या प्रवेशद्वारावरच असल्यामुळं पोर्ट सैदला आपोआप अनन्यसाधारण महत्त्व आलं आहे. तसं पाहिलं तर या शहराची लोकसंख्या सुमारें दोन लाखच आहे, पण या शहराचा रुबाब मात्र दहा लाख लोकसंख्येच्या शहरासारखा आहे. पूर्वेकडून येणारा प्रत्येक प्रवासी किंवा पाश्चिमात्य देशांत राहिलेला माणूस या शहरांत आला कीं पूर्व आणि पश्चिम याचं मोठं गंमतीदार मिश्रण त्याच्या दृष्टीस पडतं. सगळीं दुकानं तर पूर्व आणि पश्चिम गोलार्धांत मिळणाऱ्या नाना तऱ्हेच्या वस्तूंनीं भरलेलीं आहेतच, पण उंटांच्या कातड्यांच्या हरतऱ्हेच्या वस्तू रस्त्या-रस्त्यावर मांडलेल्या दिसतात. दुकानदारांना मोडकीतोडकी इंग्रजी भाषा बोलतां येते, पण

येणारं गिऱ्हाईक ज्या देशांतलं असेल त्या देशाबद्दल आपणाला विशेष जिव्हाळा आहे असं दाखवून गिऱ्हाइकाच्या गळ्यांत त्याला नको असलेलाहि माल बांधण्याचं जातिवंत दुकानदाराचं कौशल्य त्यांच्या रक्तांत आहे. बोटीवरच्या तीन-चार भारतीय मित्रांच्याबरोबर मीहि या बाजारपेठेंत फिरलों तेव्हां "इंडियन-इजिप्शियन फ्रेंड" असं म्हणत दुकानदारांनी सलगी केलीच, पण 'नेहरू-नासर फ्रेंड' म्हणून आपला माल खपविण्यासाठीं जवळचं नातं सांगितलं! दुकानांत वस्तूंची मांडणी मोहक असतेच, पण मिठ्ठास वाणी आणि सलगीची भाषा यामुळं खरेदीचा मोह स्त्रियांना तरी अनावर होतो आणि कांहींहि घ्यायचं नाहीं अशा निश्चयानं बाजार-पेठेंत फिरणाऱ्या स्त्रिया परत येतांना पांचदहा पौंडांनीं तरी आपली पर्स हल्की करून आलेल्या असतात! आपणाला मिळालेली वस्तू आपण फारच स्वस्त मिळविली असं ती खरेदी करतांना प्रत्येकाला वाटतं, पण बोटींत आल्यावर आपण तीस शिलिंगांना घेतलेली वस्तु इतरांना पंचवीस शिलिंगांना मिळालेली पाहिली, कीं स्वतःचं व्यवहारचातुर्य गुप्त ठेवण्यावांचून मार्गच उरत नाहीं! यामुळंच धक्क्यावर असतांना आपण केलेला सौदा केव्हां एकदां इतरांना सांगतों अशी झालेली उताविळी बोट सुरू झाल्यावर मावळते आणि मग प्रत्येक जण स्वतःशींच विचार करतो तो इतरांपेक्षां आपला किती फायदा झाला याचा नव्हे, तर इतरांपेक्षां किती कमी तोटा झाला याचा!

पोर्ट सैदला किनाऱ्यावर गेलेले बहुतेक सर्व प्रवासी हा हिशोब मनाशीं करीत पुढच्या प्रवासाला लागले, पण बोटीच्या कंपनीनं ज्यांना कैरोजवळचे पिरॅमिड पाहायचे होते त्यांची कांहींच सोय केली नाहीं याचं वैषम्य वाटलं. आणि मग मी चौकशी केली तेव्हां समजलं, कीं अशी ट्रिप आखणं नेहमींच सोयीचं नसतं. आमची बोट सुएझच्या कालव्यांत सकाळीं ११ वाजतां शिरणार होती, आणि दुसऱ्या दिवशीं पहाटे पांच वाजतां ती कालव्याच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या सुएझला पोंचणार होती. त्यामुळं पिरॅमिड पाहायला जाण्याचं अनेकांचं स्वप्न भंगलं होतं आणि गेल्या वर्षी इंग्लंडला जातांना आठ पौंडांना महाग वाटलेली संधि घेतली याचं माझ्या मनाला खरंच समाधान वाटून आजची गोष्ट उद्यांवर टाकणं कसं धोक्याचं असतं हें अनुभवानं पटलं होतं, कारण आतां आठच काय सोळा पौंड देऊनहि पिरॅमिड पाहायला मिळणं शक्य नव्हतं.

तथापि, इंग्लंडला जातांना पाहायला न मिळालेला सुएझचा कालवा आतां पाहायला मिळणार या आनंदांत मी होतो. पोर्ट सैदमधील रस्त्यांतून फिरतांना

शहराच्या बाजूनं बांधीत नेलेला कालवा दिसला होता. तरी प्रत्यक्ष त्या कालव्या-मधून अक्षरशः गजगतीनं आमची बोट जाऊं लागली तेव्हां हा कालवा म्हणजे स्थापत्य शास्त्रांतलं एक महदाश्चर्य असं कां मानतात तें स्पष्ट होऊं लागलं. हा कालवा सुमारें १०० मैल लांबीचा असून त्याची रुंदी अवघी ४०० फूट आहे. अर्थातच या कालव्यांतून एकमार्गी वाहतूकच ठेवावी लागते आणि म्हणून एका दिशेनं वाहतूक सुरू झाली कीं एखाददुसरी बोट न जातां दहा-पंधरा अजस्र बोटींचा काफला एकाच दिशेनं जाऊं लागतो व तोंपर्यंत विरुद्ध दिशेहून येणारी वाहतूक बंद असते. तथापि, सबंध १०० मैलांपर्यंत अशी एकमार्गी वाहतूक करण्याची आवश्यकता राहूं नये अशीच या कालव्याची रचना केलेली आहे. या कालव्याच्या १०० मैलांच्या मार्गांत तिमसा (Timsah) व बिटर (Bitter) या नांवाचे दोन मोठे तलाव आहेत व या तलावांचा कालव्याच्या मार्गासाठीं उपयोग करून घेण्यांत आला आहे. परस्पर विरुद्ध जाणाऱ्या बोटी या दोन तलावांत एकमेकींच्या विरुद्ध दिशांना जाऊं शकतात, त्यामुळं हा कालवा ओलांडायला जो वेळ लागला असता तो पुष्कळच कमी झाला आहे. हे तलाव कालव्याच्या मध्यावरच असल्यामुळं जवळजवळ निम्म्या वेळेची बचत झाली आहे असं म्हणायला हरकत नाहीं. या सबंध तलावांत बोटीचा वेग ताशीं ५ किंवा ६ मैलांपेक्षां कधींच अधिक नसतो. त्यामुळं हा कालवा ओलांडून जायला सुमारें १७–१८ तास लागतात.

पोर्ट सैदला या कालव्याच्या प्रवेशद्वारावरच हा कालवा ज्यानं बांधला त्या फर्डिनंड डी लेसेप्स या फ्रेंच इंजिनियरचा पुतळा आहे. या कालव्याचं काम १८६९ सालीं पुरं झालं व ९९ वर्षांच्या करारानं हा कालवा एका कंपनीच्या ताब्यांत देण्यांत आला. या हिशोबानं १९६८ सालपर्यंत हा कालवा या कंपनीच्या ताब्यांत राहणार होता आणि या कंपनीच्या भांडवलांत इंग्लंडचा मोठा हिस्सा असल्यामुळं व्यवहा-रतः ब्रिटिशांचं वर्चस्व या कालव्यावर राहणार होतं, परंतु आमची बोट या काल-व्यांत शिरण्याच्या अगोदर १०–१२ तासच ईजिप्तनं या कालव्याचं राष्ट्रीयीकरण केल्याची घोषणा केली आणि या बातमीनं इंग्लंड–अमेरिकेंत मोठी खळबळ उडाली असावी असं ज्या बातम्या बोटीवर मिळत होत्या त्यावरूनहि दिसत होतं. इजिप्तला जें आस्वान धरण बांधायचं आहे, त्याला राजकीय मतभेदामुळं अमेरि-केनं मदत द्यायचं नाकारतांच आपल्या दारांत आज इतके दिवस उभी असलेली ही कामधेनु इजिप्तनं आपल्या गोठ्यांत नेली आणि जागतिक मुत्सद्यांनं तोंडांत

घोटं घालायला लावलं! या कालव्याचं दरसाल सुमारें ५० कोटि रुपयांचं उत्पन्न येत असल्यामुळं या उत्पन्नांतून आस्वान धरण आपण बांधून पुरं करूं, अशी इजिप्तला खात्री वाटली आणि अँग्लो-अमेरिकनांच्या कारवायांना तोंड देण्यासाठीं हा कालवाच इजिप्तनं ताब्यांत घेतला! 'कालव्याचा हा वाद आम्ही हेगच्या आंतरराष्ट्रीय कोर्टात नेऊं' यापासून 'ईजिप्तला धडा शिकविण्यासाठीं पॅलेस्टाईन-मधून नवा कालवाच आम्ही काढूं' येथपर्यंत ब्रिटिश मुत्सद्यांनीं आदळआपट चालविली आहे या गोष्टीवरून ईजिप्तनं केवढा मर्माघात केला आहे हें कुणाच्याहि लक्षांत येईल.

सुएझचा कालवा ओलांडून तांबड्या समुद्रांत आम्हीं प्रवेश केला तेव्हां लंडन-मुंबई प्रवासांतला अर्धा प्रवास संपला याचा आनंद प्रत्येक भारतीय प्रवाशाला झालेला उघड दिसत होता आणि 'आतां काय, एक आठवडा गेला कीं मुंबई दिसूं लागेल' असं प्रत्येक जण म्हणूं लागला होता. पण तांबड्या समुद्रांत प्रवेश केल्या-पासून एडनला येईपर्यंतच्या सुमारें तीन दिवसांत बोटींत जो भयंकर उकाडा होत होता, अंगांतून घामाच्या ज्या धारा लागत होत्या त्यामुळं या आनंदाला ग्रहण लागलं होतं आणि खेळ, गप्पा आणि वाचन यांच्याकडे कुणाचं लक्षच लागत नव्हतं. गर्दी होत होती, ती पोहण्याच्या बंदिस्त जागेभोंवतीं उघड्या बंब स्त्री-पुरुषांची!

एडन जसजसं जवळ येऊं लागलं तसतसे हे उष्ण वारे कमी झाले खरे, पण एडनमध्यें हरतऱ्हेच्या ज्या स्वस्त वस्तू मिळतात त्या खरेदी करण्याबद्दल मात्र गर-मागरम चर्चा सुरू झाली. कुणी म्हणत, एडनमध्यें वस्तू स्वस्त मिळतात हें खरं, पण आपण कधीं फसविले जाऊं याचाहि नियम नसतो, तेव्हां शहाण्यांनीं त्या फंदांत न पडलेलंच बरं! तथापि, नेहमीं शहाणपणानं वागणाऱ्यांनीं एखाद वेळेस तरी मूर्खपणा करण्यांत गंमत असते असं स्वतःचं समाधान करीत अखेर बहुसंख्य प्रवासी एडनला उतरून बाजारपेठेंत फिरले होते आणि ज्यानं एकहि वस्तु खरेदी केली नव्हती असा एकहि शहाणा उरला नव्हता! या शहाण्यांत मीहि अर्थात् होतोंच, आणि एडनला घेतलेल्या वस्तू मुंबईत त्यापेक्षांहि स्वस्त मिळतात हें जोंपर्यंत समजलेलं नाहीं तोपर्यंत तरी त्या खरेदी करण्यांत मीं चूक केली असं कशाला म्हणूं? सामान्य मनुष्य आपली चूक चटकन् कबूल करतो, पण ती कबूल करण्यांत दिरंगाई करतो आणि आढेवेढे घेतो त्याला मुत्सद्दी म्हणतात हें खरं असेल तर माझ्यासारख्या सामान्य माणसाला मुत्सद्दी होण्याची आलेली ही महा-पर्वणी मी तरी कशाला घालवूं?

मात्र एडनमधून बोट बाहेर पडून मुंबईच्या दिशेनं जाऊं लागली, इतके दिवस संथपणें चाललेली बोट आतां फेसाळलेल्या लाटांबरोबर सामना करूं लागली आणि बोटीला हेलकावे बसूं लागले तसे माझ्या मनांत नवे नवे तरंग उठूं लागले. अकरा महिन्यांपूर्वी अदृश्य झालेली मायभूमि आतां तीन दिवसांनीं, आतां दोन दिवसांनीं, नव्हे, उद्यां दिसणार हें लक्षांत आलं आणि मन आनंदित झालं तसा एक विचार माझ्या मनांत येऊं लागला, माझ्या गरीब देशांतले आठ हजार रुपये मीं परदेशांत नेऊन खर्च केले, माझ्या देशांतली येवढी संपत्ति मीं कमी केली तिचा कोणता मोबदला मी भारताला देणार आहें? या विचारानं अस्वस्थ झालेलं माझं मन मग स्वतःला विचारूं लागलं, आठ हजार रुपये देऊन मी भारताला काय परत नेत आहें? हा विचार माझ्या मनांत आला तसं भारत सोडल्यापासून परत येईपर्यंतचं परदेशांत मीं घालविलेलं सारं जीवन माझ्या डोळ्यांपुढं तरळूं लागलं आणि रुपये-आणे-पैचं धन खर्च करून इतर कसलं नसलं तरी माझ्या देशाला उपयोगी पडेल असं विचारधन तरी मी परत नेत आहे का हा विचार माझ्या मनांत येऊं लागला...

माझं इंग्लंडांतलं वास्तव्य जसजसं संपत येऊं लागलं तसतशी एक गोष्ट माझ्या मनांत अधिकाधिक स्पष्ट होऊं लागली, कीं इंग्लंडचं किंवा कोणत्याहि पाश्चिमात्य देशाचं सहीसही अनुकरण करणं राष्ट्र या दृष्टीनं भारताला अशक्य आहे असंच नव्हे तर इष्टहि नाहीं. जीवनाकडे पाहण्याचे पौर्वात्य आणि पाश्चिमात्य लोकांचे दृष्टिकोन भिन्न आहेत हें तर खरंच, पण मानवी विकासाच्या भिन्नभिन्न टप्प्यांवर आपण आलेलों असल्यामुळं पाश्चिमात्य लोक आणि पौर्वात्य लोक यांचे प्रश्नच सर्वस्वी भिन्न झाले आहेत. इंग्लंडांत असतांना शक्य तेवढीं वर्तमानपत्रं मुखपृष्ठापासून मलपृष्ठापर्यंत वाचणं हा माझ्या अभ्यासक्रमांतला एक भागच होता. एकच बातमी निरनिराळीं वृत्तपत्रं आपापल्या पद्धतीप्रमाणें देऊनहि कशी आकर्षक करतात, चार ओळींच्या एकाच बातमीवरून अग्रलेख, स्फुट लेख, खास लेख, व्यंगचित्र, मनमोकळ्या गप्पा कशा मारतां येतात हें पाहतां पाहतांहि या बातम्या आणि त्यांवरून व्यक्त होणारी सामाजिक परिस्थिति यांचा विचार माझ्या मनांत सारखा येई आणि आमच्या पौर्वात्य जीवनापेक्षां ती किती भिन्न आहे या गोष्टीचा कानोसा घेतां येई. वृत्तपत्रांत वाचकांची पत्रं प्रसिद्ध होत त्यांत तक्रारी असत त्या कसल्या, तर कसलं हें आमचं जीवन, आमच्या शहरांत आमच्या मोटारी उभ्या करण्याकरितां रिकाम्या जागाहि नाहींत, सारीं शहरं कारखान्यांनीं

नुसतीं गजबजलीं आहेत ! दवाखान्यांत रोग्यांना मिळणारं कसलं हें अन्न—नुसतीं अंडीं, फळं आणि दूध ! आमच्या खेड्यांतून आज आणलेले पदार्थ दुसऱ्या दिवसापर्यंत टेबलावर ठेवावे लागतात, कारण अजून रेफ्रिजरेटर्स आमच्या शहरांतच आहेत ! अंधांना कांहीं पाहतां येत नाहीं, सरकारनं त्यांना रेडिओ तरी कां देऊं नयेत'?...सामाजिक जीवनांतल्या या तक्रारी आणि उणीवा मीं पाहिल्या तेव्हां मला वाटूं लागलं, जगण्यासाठीं जें जें लागतं तें सारं मिळाल्यामुळं पाश्चिमात्य समाजांत नव्या नव्या गरजा निर्माण झाल्या आहेत, त्यांच्यापुढें आतां नवे नवे प्रश्न आले आहेत. रोगनिवारणाच्या सर्व सोयी झाल्यामुळं त्यांना रोगानं शरीरं जर्जर होतील ही भीति वाटत नाहीं, तर आज नाहीं उद्यां म्हातारपण येईल,तें कसं टाळायचं ही चिंता त्यांना अस्वस्थ करीत आहे ! समाजांतली घटस्फोटांची संख्या अशीच वाढत राहिली तर समाजाचं कसं होईल हा विचार विचारवंतांना तिथं व्यग्र करतो ! वेळ घालविण्यासाठीं भरविलेल्या मांजरांच्या प्रदर्शनासाठीं देशाच्या कोनाकोपऱ्यांतनं आपलीं लाडकीं मांजरं घेऊन स्त्री—पुरुष येतात तेव्हां प्रदर्शनासाठीं आलेल्या वीस हजार मांजरांना ठेवायला जागा अपुरी आहे या चिंतेनं व्यवस्थापकांचं चित्त व्याकुळ होतं आणि त्या मांजरांना एके ठिकाणीं ठेवलं तर यांत्रिक 'मुक्या प्राण्यांची काय ही दुर्दशा !' म्हणून एकच टाहो फोडला जातो ! जीवनामुळं कांहीं कला नामशेष होत आहेत, त्यांत 'लाजण्याची कला'हि आहे याची हळहळ वाटून तरुण स्त्रियांना (आणि प्रत्येक स्त्री स्वतःला नेहमीं तरुणच समजते !) 'लाजावं कसं ?' हें शिकविण्यासाठीं सप्रयोग व्याख्यानं (Demonstration Lectures on Blushing) तिथं दिलीं जातात !

याच्या उलट, आपले प्रश्न किती निराळे आहेत पाहा. या वर्षी एका भागांत अवर्षणानं दुष्काळ पडला तर दुसऱ्या भागांत अतिवृष्टीनं उभी पिकं वाहून गेलीं; एका प्रांतांत कॉलरा उद्भवला तर दुसऱ्या प्रांतांत मलेरियाचा प्रादुर्भाव झाला; एके ठिकाणीं साऱ्या झोंपड्या आगीच्या भक्ष्यस्थानीं पडल्यामुळं लोक निराधार झाले, तर दुसऱ्या ठिकाणीं महापुरानं सारीं घरंच वाहून गेलीं; अशी आज दुरवस्था आहे. अमक्या ठिकाणीं दुष्काळी कामं सुरू करा, अमक्या ठिकाणीं मलेरियाप्रतिबंधक पथक पाठवा, अमक्या ठिकाणीं तात्पुरतीं घरं उभारा, अमक्या ठिकाणीं कपडे पाठवा या समस्या सोडवितां सोडवितांना आमच्या नाकीं नऊ येत आहेत. अशिक्षित मनं, व्याधिजर्जर शरीरं, भुकेलेलीं पोटं यांची चिंता वाहणं राज्यधुरीणांचं कर्तव्य होऊन बसलं आहे. आणि सगळे प्रश्न सुटायचे असतील तर

आधीं आर्थिक संपन्नता आली पाहिजे या विचारसरणीवर आपण आलों आहों.

पाश्चिमात्य राष्ट्रांत माणसांच्या मूलभूत गरजा सहज भागतील येवढी आर्थिक सुस्थिति असल्यामुळं पाश्चिमात्यांचा सारा जीवनक्रमच निराळा झाला आहे. एक काळ असा होता, कीं पाश्चिमात्यांच्या वैभवानं आपण नुसते दिपून जात होतों, आणि हें वैभव आपल्या राष्ट्रांत येणं अशक्य आहे म्हणून हताशपणें उसासे टाकण्यापलीकडे कांहीं करीत नव्हतों. त्या स्थितींतून आतां राष्ट्र या नात्यानं आपण बाहेर पडून प्रत्येक गोष्टीचा स्वतंत्रपणें विचार करण्याच्या नव्या अवस्थेंत आलों आहों, पण अजूनहि आपल्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनांतील दोषांची चर्चा करायला आपलं मन धजत नाहीं हेंच साऱ्या अनर्थाचं उगमस्थान आहे. स्वतःच्या दोषांची चर्चा करण्याची तत्परता आणि त्या चर्चेतून निर्माण होणारी विचारांची निर्भयता जसजशी अधिक येत जाईल तसतसं आमचं सारं जीवन उजळेल हे ओळखण्याची वेळ आतां तरी खचित आली आहे.

म्हणजे मनुष्य म्हणून जगण्यासाठीं समाजजीवनाची नवी घडी कशी बसावयाची हीच आजची खरी समस्या आहे. ही घडी पाश्चिमात्यांनीं बसविली म्हणूनच त्यांचं जीवन आज बहरलेलं दिसत आहे, पण माणसाच्या प्राथमिक गरजा जोंपर्यंत भागूं शकत नाहींत, तोंपर्यंत त्याचं जीवन समृद्धिपूर्ण होईल अशी अपेक्षा करणं म्हणजे भूगर्भांत पाळंमुळं पसरण्यापूर्वीच वृक्ष फलपुष्पांनीं बहरेल म्हणून वाट पाहण्यासारखंच आहे. पाश्चिमात्य माणूस—विशेषतः ब्रिटिश माणूस—मोठा स्वाभिमानी असतो असं नेहमीं सांगितलं जातं आणि तें बव्हंशीं खरंहि आहे, पण या स्वाभिमानीपणाचा उगम त्यांच्या सामाजिक स्थैर्यात आणि समाजाच्या आर्थिक घडींत आहे हें कधीं फारसं कोणी लक्षांत घेत नाहीं. अधिकारावर असलेला मनुष्य—मग तो कारखान्याचा चालक असो, बँकेचा मॅनेजर असो, वृत्तपत्राचा मालक असो कीं कचेरींतला अधिकारी असो, हाताखालच्या माणसाला त्याच्या सद्विवेकबुद्धीला न पटणाऱ्या गोष्टी करायला सांगूं लागला, कीं ब्रिटिश माणूस ताडकन् त्याला सांगतो, "तुमचं म्हणणं चूक आहे आणि तसा मी वागणार नाहीं. वाटलं तर आजच्या आज नोकरी सोडायची माझी तयारी आहे!" असं तो सांगूं शकतो याला कारण असं, कीं प्रामाणिकपणें श्रम करण्याची तयारी असली, कीं आपली उपासमार होणार नाहीं अशी सामाजिक घडीच त्या देशांतून बसली आहे. उलट, आपल्या देशांत वरिष्ठाचा हुकूम तो चूक आहे हें माहीत नसूनहि पाळावा लागतो, लाचार व्हावं लागतं. कारण सामान्य माणसाला हातांतली

नोकरी गेली तर उपाशी मरण्याची पाळी येईल अशी भीति वाटते, म्हणूनच पाश्चिमात्य मनुष्य स्वाभिमानी असतो आणि आम्ही लाचार असतों याचा उगम सभोंवतालच्या परिस्थितींत आहे हें आतां तरी आम्हीं ओळखायला हवं आहे. तथापि हें न ओळखतां लोकांना स्वाभिमानी होण्याचा परोपदेश जेव्हां केला जातो तेव्हां, एका दुय्यम नटाला—'तुला राजाची भूमिका दिलीय, तेव्हां राजासारखा जरा रुबाबानं, छाती पुढें काढून चाल ना!' असं एका दिग्दर्शकानं सांगतांच 'साहेब, गेल्या दोन महिन्यांत पगार मिळाला नसल्यामुळं पोटभर जेवायलाहि मिळालं नाहीं, मग राजाचा रुबाब आणूं कसा?' असं उत्तर दिल्याचं सांगतात, त्याची मला नेहमीं आठवण होते. पाश्चिमात्य देशांत जी सामाजिक सुरक्षितता लाभली आहे तिचे परिणाम सर्व क्षेत्रांत स्पष्टपणें दिसतात. पश्चिमात्यांच्या सार्वजनिक जीवनांत जो प्रामाणिकपणा आला आहे त्याचा उगमहि असाच व्यक्तीला लाभलेल्या सामाजिक सुरक्षिततेंत आहे, पण ही सामाजिक सुरक्षितता आपोआप थोडीच आली आहे? देशाचं संपूर्ण औद्योगीकरण झालं, प्रत्येकाला प्रामाणिक श्रमानंतर आपल्या गरजा भागतील अशी शाश्वती लाभली आणि देशांतली संपत्ति वाढली म्हणूनच हें शक्य झालं हें विसरून चालणार नाहीं. सारांश, देशांतली संपत्ति वाढली आणि तिची वांटणी संपूर्णतया नसली तरी पुष्कळशा समप्रमाणांत झाली तरच आजचे आपले प्रश्न सुटतील, ही जाणीव आमच्या समाजाच्या तळापर्यंत जेवढ्या लौकर पोंचेल तेवढ्या लवकर व्यक्तीचं जीवन समृद्धिपूर्ण होईल.

यासाठीं दोन गोष्टींची प्रथम आवश्यकता आहे. पहिली गोष्ट म्हणजे कडवा स्वदेशाभिमान आणि दुसरी म्हणजे दुहीचीं बीजं पेरणाऱ्या प्रवृत्तींचं निर्मूलन. परदेशांत जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या लक्षांत एक गोष्ट चटकन् येते ती म्हणजे त्यांचं आपल्या देशावरचं असामान्य प्रेम. लंडन शहरांतल्या वूलवर्थ, मार्क अँड स्पेन्सर, लिटल्वर्थ, सल्फरिजिस या प्रसिद्ध दुकानांतून मी ज्या ज्या वेळीं गेलों त्या त्या वेळीं माझं लक्ष गेलं तें प्रत्येक वस्तूवरच्या 'Made in England' या शब्दांकडे. आपणाला लागणारी प्रत्येक वस्तू विकत घेतांना ती आपल्या देशांत झालेली आहे असं प्रत्येक जण तर पाहतोच, पण दुकानदारच इतर देशांतल्या वस्तू मुद्दाम पुढें मांडीत नाहींत. मोठमोठ्या वस्तूंचं तर सोडाच, पण रोज लागणारी भाजी आणि फळं विकत घेतांना सुद्धां तीं Home-grown आणि English आहे याची खात्री प्रत्येक जण करून घेतो आणि हात-

गाड्यावर माल विकणारेसुद्धां तशा पाट्या लावायला कधीं विसरत नाहींत. ब्रिटिश लोकांच्या या वृत्तीपासून आपण कांहींच शिकण्यासारखं नाहीं काय ?

आमच्या उत्कर्षासाठीं स्वदेशाचा कडवा अभिमान आमच्या रक्तांत निर्माण झाला पाहिजे आणि सगळे भारतीय एक आहेत ही एकात्मतेची जाणीवहि प्रत्येकाच्या मनांत वाढीला लागली पाहिजे. गंमत अशी कीं, लंडनसारख्या शहरांत भेटणारे मद्रदेशीय, बंगाली, पंजाबी, गुजराती, महाराष्ट्रीय आपण त्या त्या प्रांतांतले आहोंत हें संपूर्ण विसरतात आणि सर्व जण आपण भारतीय आहों असं मानतात. सर्व प्रांतीयांचे संयुक्त कार्यक्रम होतात, गर्बा नृत्य एका तालावर सर्व प्रांतांतले लोक नाचूं शकतात, रवींद्र–संगीत एका सुरांत गाऊं शकतात, पण घरीं पाहावं तर बंगाली मनुष्य पंजाबी माणसाचा द्वेष करतो, पंजाबी गुजराथ्याची अवहेलना करतो, गुजराती महाराष्ट्रीयाला पाण्यांत पाहतो, महाराष्ट्रीय मद्रासी माणसाची कुचेष्टा करतो आणि एकाच भूमींत आपण जन्माला आलों आहों आणि आपलं देहविसर्जनहि अखेर याच भूमीवर होणार आहे याची आठवण कधीं कोणाला राहात नाहीं. परदेशांत दृष्टोत्पत्तीस येणारी एकत्वाची जाणीव आणि घरांत पेरलेली दुहीचीं बीजं पाहिलीं कीं वाटतं, हें असं कां होतं ?

मी इंग्लंडाला जाऊन काय शिकलों याचा विचार करतांना हें सारं सुचलं, नाहीं ? मी वृत्तपत्रलेखन शिकायला गेलों हें तर खरंच, पण तें शिकतांनाहि मला अल्पशी तरी जाणीव झाली ती आमच्या साऱ्या प्रश्नांच्या विशालतेची. पाश्चिमात्यांचे पुष्कळसे प्रश्न सुटले ते आर्थिक विकासामुळं, हें मीं, पाहिलं तेव्हां ‘देशांतलं उत्पादन वाढल्याशिवाय देशाला तरणोपाय नाहीं’ असं आमचे राष्ट्रधुरीण सांगतात त्याचं मर्म माझ्या ध्यानांत येऊं लागलं, त्याचा अर्थबोध मला होऊं लागला. राष्ट्राची घडी नव्यानं बसविण्यासाठीं केवढे विशाल प्रश्न आपणाला सोडवायचे आहेत, देशांतलं उत्पादन वाढविल्याशिवाय कोणताच प्रश्न कसा सुटणार नाहीं ही जाणीव मला होण्यासाठींहि आठ हजार रुपये खर्च झाले तरी ते व्यर्थ गेले असं मला वाटत नाहीं. कारण ती जाणीव प्रत्येकाला होणं हीच आजची खरी निकड आहे, अशी माझी तरी श्रद्धा आहे. राष्ट्रांतलं दारिद्र्य, अज्ञान, रोगराई यांच्याविरुद्ध जें निकराचं युद्ध आज आपल्याला करायचं आहे तें यशस्वी होण्यासाठीं ही जाणीव समाजांतल्या खालच्या थरापर्यंत पोंचली पाहिजे. किंबहुना राष्ट्राची पुनर्रचना करणं हें गोवर्धन पर्वत उचलून आणण्याइतकंच कठीण आहे. त्या कार्याची सुरुवात आतां कुठें झाली आहे. आणि म्हणूनच मातृभूमीचं

पुनर्दर्शन होत असतांना राष्ट्रविकासाचा गोवर्धन जे उचलीत आहेत, त्यांच्या प्रयत्नांना माझीहि 'काठी' लागावी या पेक्षां दुसरी कोणती इच्छा माझ्या मनांत असणार, तुम्हीच सांगा !

तुमचा,

वि. वा. पत्की

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रमांक 22e22 वि:
क्रमांक 22e नों: दि: 3/9/

समाप्त

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९५४९

REFBK-0009746

REFBK-0009746